CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

3.1 VHP



(ज्योतिषविषय नवीन शिकणाऱ्यांकरितां)

ज्योतिर्मयूख.

२४८६
म. २८

लेखक,

गोविंद रामचंद्र मोघे.

सुधारून वाढविलेली पांचवी आवृत्ति.

प्रकाशक,

तुकाराम पुंडलीक शेट्ये,

बुकसेलर आणि पब्लिशर, माधवबाग—मुंबई.

किंमत २॥ रुपये.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

वर्ग संख्या म० २०   प्राप्ति-संख्या २४८६

ग्रन्थ-कार्ड

श्री गणेश वर्णी दि० जैन (शोध) संस्थान

ग्रन्थागार

नरिया, वाराणसी-५

ग्रन्थ नाम ज्योतिर्मयूख

लेखक गोविंद रामचन्द्र मोघे

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

२४८५
म. २६

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पाठवून एक एक फार्म मीं छापवून काढिला ! समग्र पुस्तक प्रथम लिहून तें अनेक वेळां तपासून नंतर छापावयास द्यावयाचें, ही जी शिष्टजनांची सामान्य पद्धति, तिचा जर मीं स्वीकार केला असता, तर हें पुस्तक अधिक निर्दोष व अधिक व्यवस्थित झालें असतें हें खरें; पण तसें करण्याचा यत्न केला असता, तर तो यत्न ह्या रूपानें लोकावलोकनांत आला असता किंवा नाहीं, याविषयीं मला बरीच शंका आहे ! असें होण्याचीं दुसरींही अनेक कारणें आहेत, तीं येथें लिहून वाचकांना कळविण्यांत तादृश महत्त्व नाहीं. इतकें मात्र खरें आहे कीं, एक फार्म छापून तयार झाल्यानंतर त्याच्या पुढील फार्माकरितां मजकूर पाठविण्यासाठीं छापखान्यांतून वारंवार माझ्या मागें नेट असल्यामुळें, "अकरणान्मंदकरणं श्रेयः" या न्यायानें हें पुस्तक माझ्या हातून पुरें होऊन वाचकांच्या हातीं पडत आहे. आतां वर निर्दिष्ट केलेल्या कारणांमुळें या पुस्तकांत न्यूनाधिक्य असण्याचा मात्र बराच संभव आहे. परंतु त्या भयास्तव, पुस्तक प्रसिद्ध न करणें ही गोष्ट मात्र मला इष्ट वाटली नाहीं. कालेंकरून जर ह्या पुस्तकाची पुनरावृत्ति काढण्याचा सुयोग आलाच, तर ही माझी प्रस्तुत कृति त्या वेळीं मला पुष्कळ साह्यभूत होईल व तिला आतां अधिक नीटनेटकें रूप देण्याला फारसे प्रयास पडणार नाहींत, असा मला पूर्ण भरंवसा आहे. असो. आतां पुस्तकांतील मजकुराविषयीं दोन शब्द लिहिणें अगत्याचें आहे.

व्यवहारांत नित्य लागणारें कारणापुरतें ज्योतिष शिक्षकाच्या साहाय्यावांचून स्वतःला शिकतां यावें, ह्याच केवळ उद्देशानें हें पुस्तक तयार केलें आहे. मराठी भाषेंत फलज्योतिषावर अनेक ग्रंथ हल्लीं उपलब्ध आहेत; परंतु ते सर्व एकदेशीय असून असावे तितके सुलभ नसल्यामुळें सामान्य जनसमूहास त्यांचा सर्व प्रसंगीं सारखा उपयोग होत नाहीं. ही उणीव अंशतः तरी या पुस्तकानें दूर होईल, अशी मला पूर्ण आशा आहे. हें पुस्तक ज्योतिषविषयावर म्हणून जरी मीं लिहिलें आहे, तरी ज्यांचा ज्योतिषाशीं कांहीं संबंध नाहीं, असे दुसरेही अनेक व्यवहारोपयोगी विषय बुद्धिपुरःसर यांत घातले आहेत. त्यांपैकीं कांहीं विषय कित्येकांस कदाचित् अप्रासंगिकही वाटतील, परंतु ह्या पुस्तकाची योजना नवीन शिकणाऱ्यांकरितां असल्यामुळें तसें करणेंच मला इष्ट दिसलें. बहुतेक स्थळीं समजण्यास व ध्यानांत ठेवण्यास सुलभ असे आधाराकरितां निरनिराळ्या ग्रंथांतील सुमारें पांचशांहून अधिक श्लोक देऊन खालीं त्यांचा भावार्थ दिला आहे. गणितविषयाचा जेथें संबंध आला आहे, तेथें मात्र मूळ श्लोक पारिभाषिकसंज्ञायुक्त असल्यामुळें शिकणाऱ्यांस अवघड वाटतील असें समजून, त्यांचा ह्या पुस्तकांत समावेश न करितां, नुसता भावार्थच लिहिला आहे. कित्येकांस ह्या पुस्तकाचा विशेष उपयोग व्हावा या हेतूनें शेवटीं गोत्रें व उपनांवें यांसंबंधीं माहिती दिली आहे. ह्या पुस्तकांत माझ्या पदरचें किंवा अगदीं नवें असें मीं फारसें लिहिलें आहे असें नाहीं. इतस्ततः जी माहिती निरनिराळ्या प्राचीन व

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

अर्वाचीन ग्रंथांतून मला आढळली, तिचें एकीकरण मीं या पुस्तकांत केलें आहे. वस्तुतः या जगांत नवीन असें कांहींच नाहीं. जसें तूप, साखर, गहूं इत्यादि पाकसामुग्रीचे पदार्थ जरी जुनेच आहेत, तरी त्यांचीं ताजीं ताजीं पक्वान्नें, भोजनसमारंभांतील वृद्ध तरुण भोक्त्यांच्या रुचीप्रमाणें मृदु कठिण अशीं सिद्ध केलेलीं असलीं म्हणजे जशीं त्यांना ग्राह्य होतात, त्याचप्रमाणें ह्या पुस्तकांत जरी प्राचीन ग्रंथकारांचाच अनुवाद मीं केलेला आहे, तरी सर्व अनभिज्ञ वाचकांच्या रुचीला ग्राह्य व्हावें म्हणून हें पुस्तक सुलभ पद्धतीनें लिहिण्याचा प्रयत्न केला आहे, तो कितपत साधला आहे याचा निर्णय करणें सुज्ञ व बहुश्रुत वाचकांकडे आहे.

हें पुस्तक ज्या अनेक ग्रंथांच्या साहाय्यानें लिहिलें आहे, त्यांची संख्या बहुत असल्यामुळें त्या सर्व ग्रंथांचा स्थलसंकोचास्तव येथें नामनिर्देश न करितां फक्त मोघम रीतीनें त्या त्या ग्रंथकारांचे व त्यांच्या प्रकाशकांचे मी मनःपूर्वक आभार मानितों. तसेंच, या पुस्तकाचीं मुद्रितें तपासण्यास मला स्वतःला असावा तितका अवकाश नसल्यामुळें, माझे स्नेही रा. रा. सीताराम बाबाजी गुर्जर यांनीं केवळ मित्रकार्य म्हणून बहुतेक सर्व मुद्रितें तपासिलीं, याकरितां त्यांचेही आभार मी येथें मानितों. शेवटीं वाचकांस एक सविनय सूचना करावीशी वाटते, ती ही कीं, ज्योतिष हा विषय कादंबऱ्या किंवा नाटकें इत्यादि विषयांप्रमाणें अर्थातच मनोरंजक नाहीं; म्हणून न कंटाळतां अत्यंत लक्षपूर्वक एकवार हें पुस्तक समग्र वाचलें असतां ह्यांत किती उपयुक्त विषय आले आहेत व पुस्तक संग्राह्य आहे किंवा नाहीं, याविषयीं त्यांची सहज खात्री होईल. तसेंच, ज्यांच्या ज्यांच्या हातीं हें पुस्तक जाईल, त्या सर्वांस आणखी एक नम्र विनंति आहे कीं, या पुस्तकांत हस्तदोषानें वगैरे जें न्यूनाधिक्य पडलें असेल, तें त्यांनीं मित्रत्वानें मला कळविण्याची कृपा करावी, म्हणजे पुढील आवृत्तींत त्याचा विचार करितां येईल.

उदरनिर्वाहाच्या साधनांत सर्वस्वी गुंतून गेल्यामुळें ग्रंथरचनेसारख्या कामास हवा तसा वेळ मला मिळत नसतांही हें कार्य ज्याच्या कृपाकटाक्षानें निर्विघ्नपणें सिद्धीस गेलें, त्या जगत्सूत्रधाराला, शेवटीं कृतज्ञताबुद्धिपूर्वक अनेक प्रणाम करून हा लेख येथें संपवितों.

शिव–मुंबई आषाढ शुद्ध ११,
शके १८३३.
तारीख ७ जुलै सन १९११.

गोविंद रामचंद्र मोघे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

द्वितीयावृत्तीची प्रस्तावना.

ह्या आवृत्तींत बरेच नवीन विषय घालावे असा माझा पूर्वसंकल्प होता; परंतु पुस्तक छापावयास दिल्यानंतर थोड्याच दिवसांनीं आकस्मिक जीवावरचें दुखणें येऊन चार महिने आंथरुणांत पडून रहावें लागलें, आणि त्यामुळें उद्दिष्ट हेतु जागच्या जागींच राहिले. निरुपाय आहे. ईशकृपेनें पुढील आवृत्ति काढण्याचा सुयोग येईल, तेव्हां योग्य ती सुधारणा करून पुस्तक अधिक उपयुक्त करण्याचा विचार आहे.

मिती माघ वद्य १४,
शके १८४०, सन १९१९.

ग्रंथकर्ता.

तिसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना.

जगन्नियंत्या परमेश्वराच्या कृपाप्रसादानें ज्योतिर्मयूख पुस्तकाची ही तिसरी आवृत्ति आज आम्ही मराठी वाचकांच्या हातीं देत आहोंत. फलज्योतिषविषयात्मक सांप्रत नवे नवे अनेक ग्रंथ प्रसिद्ध होत असूनही ज्योतिर्मयूख पुस्तकासंबंधीं जनतेची आकांक्षा कमी झालेली नाहीं, असें अनुमान करणें चुकीचें नाहीं. कारण, एरवीं ह्या पुस्तकाच्या हजारों प्रति खपून ही नवी आवृत्ति काढण्याचा प्रसंग आलाच नसता. एवढ्यावरूनच पुस्तकाची उपयुक्तता सिद्ध होते. सारांश, कल्पनेच्या बाहेर ह्या पुस्तकाला जो लोकाश्रय मिळाला, त्याबद्दल ग्रंथकर्त्याला व प्रकाशकाला समाधान वाटणें स्वाभाविक आहे.

असो. मागील आवृत्तीपेक्षां ह्या आवृत्तींत पर्जन्यवृष्टीसंबंधीं विचार, वर्षफल, कुंडली, इत्यादि नवीन विषय घालून सुधारणा केली आहे. तथापि लोकांच्या सोयीसाठीं पुस्तकाची किंमत पूर्वीं होती तितकीच ठेविली आहे. म्हणून, आजपर्यंत जसा ह्या पुस्तकाला लोकाश्रय मिळाला, तसाच पुढेंही मिळेल व पुनः नवी आवृत्ति काढण्याचा सुयोग लवकरच येईल अशी आशा आहे.

मुंबई, जान्युआरी
सन १९२४.

ग्रंथकर्ता.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

॥ श्रीः ॥

अथ ज्योतिर्मयूखप्रारंभः ।

मंगलाचरण.

प्रणम्य पार्वतीपुत्रं भारतीं भास्करं भवम् ।
वैकुंठवासिनं विष्णुं सानंदं सकलान् सुरान् ॥ १ ॥
ज्योतिषं व्यवहारार्थं ग्रंथान् संशोध्य यत्नतः ।
क्रियते बालबोधाय गोविंदेन यथामति ॥ २ ॥

आरंभीं गणपति, सरस्वती, सूर्य, शंकर, विष्णु इत्यादि सर्व देवतांना मोठ्या आनंदानें नमस्कार करून माझ्या अल्पमतीप्रमाणें अनेक ग्रंथांच्या आधारानें, ज्योतिषविषय ज्यांना अपरिचित आहे, त्यांच्यासाठीं मी ज्योतिर्मयूखनामक ग्रंथ लिहितों.

ज्योतिःशास्त्र शब्दाची व्याख्या.

ज्योतिःशास्त्रांत कालाचें विधान सांगितलेलें असतें. ज्योतिष हा शब्द 'ज्योतिः' ह्या संस्कृत शब्दावरून मूळ निघाला आहे. ज्योतिः या शब्दाचा अर्थ तेज किंवा प्रकाशकारक अवयव असा आहे; आणि त्यावरूनच मराठींत ज्योत असा शब्द झाला आहे. दिव्याप्रमाणें जे प्रकाशदायक पदार्थ आहेत, त्यांच्या प्रकाशकारक अवयवास आपण ज्योत म्हणतों, हें सर्वांस ठाऊक आहेच. आकाशांतील गोलरूप चंद्रसूर्यादिक तेजःपुंज तारा दिव्याच्या ज्योतीप्रमाणें तेजस्वी आणि प्रकाशदायक असल्यामुळें तत्संबंधीं विषयास लोक ज्योतिष म्हणूं लागले असावे, असें दिसतें. शास्त्र या शब्दाचा अर्थ अनुशासन, शिकविणें किंवा नियम असा आहे. तेव्हां ज्योतिषविषयासंबंधीं जें शिक्षण किंवा जे नियम तें ज्योतिःशास्त्र होय.

ज्योतिःशास्त्राचें महत्त्व.

यथा शिखा मयूराणां नागानां मणयो यथा ।
तद्वद्वेदांगशास्त्राणां ज्योतिषं मूर्धनि स्थितम् ॥ ३ ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

शिक्षा, कल्प (सूत्र), व्याकरण, निरुक्त, छंद आणि ज्योतिष अशीं वेदाचीं सहा अंगें आहेत, म्हणून वेदाला षडंगवेद असें म्हणतात. ह्या सहा अंगांपैकींच जरी ज्योतिष हें एक अंग आहे, तरी इतर शास्त्रांहून ज्योतिःशास्त्राचें महत्त्व मोठें मानिलेलें आहे. ऋग्वेदज्योतिषाच्या शेवटच्या म्हणजे सातव्या खंडांतील जो श्लोक वर दिला आहे त्याचा अर्थ असा आहे कीं, मोराची शिखा म्हणजे तुरा जसा सर्वांगांत प्रधान अंग जें मस्तक त्या मस्तकावर शोभतो, किंवा सर्पमणि जसा सर्पाच्या फणेमध्यें असतो, त्याप्रमाणें वेदांचीं जीं सहा अंगें म्हणजे शास्त्रें आहेत त्या सर्वांच्या शिरोभागीं ज्योतिषाची गणना आहे. यावरून ज्योतिःशास्त्राचें महत्त्व प्राचीन कालापासून फार मोठें मानिलेलें आहे हें स्पष्ट दिसतें.

ज्योतिःशास्त्राच्या शाखा.

सिद्धान्तसंहिताहोरारूपं स्कंधत्रयात्मकम् ।
वेदस्य निर्मलं चक्षुर्ज्योतिःशास्त्रमनुत्तमम् ॥ ४ ॥

सिद्धान्त, संहिता आणि होरा असे ज्योतिःशास्त्राचे तीन स्कंध म्हणजे तीन शाखा आहेत. हीं तीन अंगें मिळून झालेलें ज्योतिःशास्त्र वेदाचे केवळ नेत्र होत. सिद्धान्तग्रंथांत ग्रहांच्या कक्षा म्हणजे त्यांचे भ्रमणमार्ग, ग्रहादिकांच्या स्पष्टगतिस्थिति म्हणजे अमुक वेळेस अमुक ग्रह आकाशांत कोठें असेल हें ठरविणें, इत्यादि गोष्टींचा गणिताच्या साहाय्यानें निर्णय केलेला असतो, म्हणून सिद्धांतस्कंधाला गणितस्कंध असेंही म्हणतात. संहिताग्रंथांत धूमकेतु, ग्रहणें, ग्रहादिकांचे उदयास्त इत्यादि आकाशस्थ गोलांच्या स्थितीमुळें जगाला होणाऱ्या बऱ्यावाईट फलांचें वर्णन केलेलें असतें, आणि होरास्कंधांत एकाद्या मनुष्याच्या जन्मकाळच्या ग्रहनक्षत्रलग्नादिकांवरून त्याला त्याच्या जन्मांत कायकाय सुखदुःखें होतील इत्यादि गोष्टींचें कथन केलेलें असतें. होरास्कंधाला जातकस्कंध असेंही म्हणतात. ह्याप्रमाणें ज्योतिःशास्त्राच्या तीन शाखा आहेत. जातकाची ताजिक म्हणून एक पोटशाखा आहे. ताजिकग्रंथांत वर्षफलाची माहिती सांगितलेली असते. एकाद्याच्या जन्मकाळीं आकाशांत जितक्या राशीअंशादिकांवर रवि असेल तितक्या राशीअंशादिकांवर तो पुनः आला म्हणजे त्या मनुष्याच्या आयुष्याचें कोणतेंही एक वर्ष पूर्ण होतें. त्या वेळेच्या लग्नकुंडलीवरून त्या वर्षांत त्याला काय काय सुखदुःखें होतील हें समजतें. त्या कुंडलीला वर्षफलकुंडली म्हणतात.

---

१. शिक्षा कल्पो व्याकरणं नैरुक्तं छंदो ज्योतिषमिति षडंगानि भवन्ति ॥ चरणव्यूह खंड २.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

*ग्रहज्योतिष आणि फलज्योतिष.

अप्रत्यक्षाणि शास्त्राणि विवादास्तेषु केवलम् ।
प्रत्यक्षं ज्योतिषं शास्त्रं चंद्रार्कावेव साक्षिणौ ॥ ५ ॥

ज्योतिषाचे दोन प्रकार आहेत. एक ग्रहज्योतिष व दुसरें फलज्योतिष. ग्रहज्योतिषाला खज्योतिष म्हणजे आकाशज्योतिष असेंही म्हणतात. चंद्र, सूर्य, ग्रह, नक्षत्रें व इतर तारा आकाशांत रोज उदयास्त पावून ज्याची प्रत्यक्ष साक्ष देत आहेत, तें खगोल किंवा ग्रहज्योतिष होय. ग्रहज्योतिषाच्या आधारानें अमुक योग असतां अमुक घडेल, त्यापासून अमक्याला अमुक प्रकारचें सुख किंवा दुःख होईल, किंवा अमुक दिवसांनीं अमक्याची पीडा दूर होईल इत्यादि गोष्टींचें ज्ञान स्वानुभवावरून विद्वान् ऋषींनीं जें अनेक ग्रंथांतून लिहून ठेविलें आहे तें फलज्योतिःशास्त्र होय. अमक्या योगाचीं अमुक फलें असें ज्या ग्रंथांत सांगितलेलें असतें, त्या ग्रंथाला फलग्रंथ असें म्हणतात.

अंकसंज्ञा.

एकं भूमींदुरूपं द्वावश्विपक्षाक्षिदोर्यमाः ।
त्रयः क्रमग्रामरामपुरलोकगुणास्त्रयः ॥ ६ ॥
चत्वारोब्धिश्रुतियुगकृताः पञ्चेषुवायवः ।
भूताक्षौ षड्रसाङ्गर्तुतर्काः सप्तर्षयः स्वराः ॥ ७ ॥
तुरङ्गपर्वतौ चाष्टौ वसुसर्पमतंगजाः ।
नवसङ्ख्या नन्दरन्ध्रनिधिगोङ्कनभश्चराः ॥ ८ ॥
दशाशाः शून्यमभ्रं स्यादेकादश महेश्वराः ।
द्वादशार्कास्तथा विश्वे त्रयोदश चतुर्दश ॥ ९ ॥
मन्विद्रभुवनं पंचदशतिथ्योथ षोडश ।
कलाष्टिराजोऽथात्यष्टिर्घनाः सप्तदश स्मृताः ॥ १० ॥
अष्टादशं धृतिश्चातिधृतिरेकोनविंशतिः ।
विंशतिः स्युः कृतिनखाङ्गुलयोथैकविंशतिः ॥ ११ ॥
प्रकृतिर्मूर्च्छनास्वर्द्वाविंशतिर्जातिराकृतिः ।
विकृतिश्च त्रयोविंशत् संकृतिश्चार्हदित्यपि ॥ १२ ॥
जिनाः सिद्धाश्चतुर्विंशतिस्तत्वं पञ्चविंशतिः ।
पञ्चविंशस्त्वतिकृतिः षड्विंशतिरिहोत्कृतिः ॥ १३ ॥
स्युः सप्तविंशतिर्भानिः द्वात्रिंशद्दशना द्विजाः ।
त्रयस्त्रिंशत्सुरास्तानि ऊनपञ्चाशदित्यपि ॥ १४ ॥

---

* ग्रहज्योतिष म्हणजे Astronomy आणि फलज्योतिष म्हणजे Astrology.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पर्यायशब्दैरपि कल्पनीयाः सङ्ख्याङ्कसंज्ञाः सुधिया धियासाम् ।
सामान्यसंज्ञामभिधाय तां तां विशेषसंज्ञामधुनाभिधास्ये ॥ १५ ॥

ज्योतिषग्रंथांत संख्या दाखविण्याकरितां अंकांच्या पारिभाषिक संज्ञा योजितात. ही योजना फार सोयीची आहे. कारण तिच्या योगानें तद्विषयक पद्यें बरींच आटपशीर होतात. आणि त्यामुळेंच बहुतेक ग्रंथकारांनीं ही पद्धति स्वीकारलेली आहे. या पुस्तकांत आलेलीं पद्यें निरनिराळ्या ग्रंथांतून घेतलेलीं असल्यामुळें, अर्थात् अनेक ठिकाणीं त्यांत ह्या संज्ञा आलेल्या आहेत. म्हणून वाचकांच्या समजुतीकरितां आरंभींच त्याविषयीं माहिती देणें योग्य दिसतें. तथापि, वाचकांचा घोटाळा होऊं नये म्हणून बहुतेक संख्यादर्शक कठिण शब्दांवर ती ती संख्या मांडली आहे. ह्या सर्व संज्ञा अन्वर्थक आहेत. उदाहरणार्थ, इंदु किंवा भूमि हे शब्द एक या संख्येचे वाचक ठरविलेले आहेत. याचें कारण इंदु म्हणजे चंद्र एकच आहे किंवा भूमि म्हणजे पृथ्वी एकच आहे, म्हणून एक ही संख्या दाखविण्याकरितां इंदु, भूमि इत्यादि शब्द योजितात. तसेंच, वेद चार आहेत किंवा युगें चार आहेत म्हणून चार ही संख्या दाखविण्याकरितां युग, वेद इत्यादि शब्द घेतले आहेत. त्याचप्रमाणें त्या त्या शब्दांचे दुसरे पर्यायशब्द घालण्याचाही परिपाठ आहे. उदाहरणार्थ, इषु म्हणजे पांच. पण इषु या शब्दाचे समानार्थक दुसरे शब्द बाण, शर हे होत; म्हणून पांच ही संख्या दाखविण्याकरितां इषु, बाण, शर किंवा या अर्थाचे दुसरे शब्द घालण्याची रीति आहे. याचप्रमाणें इतर अंकांचें जाणावें. संख्या कशा वाचितात किंवा मांडितात हें पुढें दाखविलें आहे. प्रथम अंकसंज्ञा सांगतों.

(१) एक, भूमि, इंदु, रूप, कु. इ० (२) द्वौ, अश्वि, पक्ष, अक्षि, दो, यम इ०
(३) त्रयः, क्रम, ग्राम, राम, पुर, लोक, गुण, अग्नि इ०
(४) चत्वारः, अब्धिः, श्रुति, युग, कृत, वेद इ०
(५) पंच, वायु, भूत, इषु, अक्ष, बाण, इंद्रिय इ०
(६) षट्, रस, ऋतु, अंग, तर्क इ०
(७) सप्त, ऋषि, स्वर, तुरंग, पर्वत, मुनि, अश्व इ०
(८) अष्ट, वसु, सर्प, मतंगज, नाग इ०
(९) नव, संख्या, नंद, रंध्र, निधि, गो, अंक, ग्रह, खग, नभश्चर इ०
(१०) दश, आशा, दिशा, (०) शून्य, आकाश, ख, अंबर इ०
(११) एकादश, महेश्वर, रुद्र, शिव इ० (१२) द्वादश, अर्क, आदित्य, सूर्य, इ०
(१३) त्रयोदश, विश्वे इ० (१४) चतुर्दश, मनु, इंद्र, भुवन इ०
(१५) पंचदश, तिथि इ०
(१६) षोडश, कला, अष्टि, राज इ० (१७) सप्तदश, घन, अत्यष्टि इ०

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

(१८) अष्टादश, धृति इ० (१९) अतिधृति, एकोनविंशति इ०
(२०) विंशति, कृति, नख, अंगुलय इ० (२१) एकविंशति, प्रकृति, मूर्छना, स्वः इ०
(२२) द्वाविंशति, जाति, आकृति इ० (२३) त्रयोविंशति, संकृति, अर्हत् इ०
(२४) चतुर्विंशति, जिन, सिद्ध इ० (२५) पंचविंशति, तत्व, अतिकृति इ०
(२६) षड्विंशति, उत्कृति इ० (२७) सप्तविंशति, भानि, नक्षत्राणि इ०
(३२) द्वात्रिंशत्, दशन, द्विज इ० (३३) त्रयस्त्रिंशत्, सुर इ०
(४९) ऊनपंचाशत्, तान इ०

कार्यप्रकाशक चिन्हें.

+ हें बेरजेचें चिन्ह आहे.
− ,, वजाबाकीचें चिन्ह आहे.
× ,, गुणाकाराचें ,, ,,
÷ ,, भागाकाराचें ,, ,,
= ,, उत्तर दाखविणारें चिन्ह आहे.

उदाहरणार्थ, ९+२=११ येथें नऊ आणि दोन या अंकांमध्यें + हें चिन्ह आहे, म्हणून त्यांची बेरीज करावयाची. याचप्रमाणें इतर चिन्हांविषयीं जाणावें.

संख्या मांडण्याची रीति.

अंकानां वामतो गतिः ।

संस्कृतांत अंकांची गति उलट असते. मराठींत जशी संख्या डावीकडून उजवीकडे मांडितात आणि तशीच वाचितात तसा प्रकार संस्कृत भाषेंत नाहीं. कोणतीही संख्या संस्कृतांत उच्चारितांना उजवीकडून शेवटचा अंक प्रथम उच्चारितात व मांडतांनाही अंकांचा उच्चार केल्याप्रमाणेंच उजव्या हाताकडून डाव्या हाताकडे मांडीत येतात. उदाहरणार्थ १९५३ ही संख्या घ्या; हे अंक संस्कृत पद्धतीप्रमाणें उच्चारावयाचे म्हणजे ३, ५, ९, आणि १ या अनुक्रमानें उच्चारिले पाहिजेत. जसें, "गुणबाणग्रहेंदुः" गुण म्ह० ३ बाण म्ह० ५ ग्रह म्ह० ९ आणि इन्दु म्ह० १ हे मराठीप्रमाणें मांडिले तर ३५९१ होतील पण तसे मांडावयाचे नाहींत. अंकांचा उच्चार केल्याप्रमाणें प्रथम ३ हा अंक मांडावा आणि नंतर तिहींच्या पुढील उच्चारिलेला अंक ५ तो पुढें न मांडितां तिहींच्या मागें मांडावा. तसेंच, ९ पांचांच्या मागें आणि १ हा नवांच्या मागें मांडिला म्हणजे १९५३ झाले.

युगांचें प्रमाण.

द्वात्रिंशद्भिः सहस्रैश्च युक्तं लक्षचतुष्टयम् ।
प्रमाणं कलिवर्षाणां प्रोक्तं पूर्वैर्महर्षिभिः ॥ १६ ॥
युगानां कृतमुख्यानां क्रमान्मानं प्रजायते ।
कलेर्मानं क्रमान्निघ्नं चतुस्त्रिद्विमितैस्तदा ॥ १७ ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पर्यायेंकरून पुनः पुनः होणारें जें दीर्घ कालमान त्यास युग म्हणतात. हीं युगें चार आहेत. १ कृतयुग किंवा सत्ययुग, २ त्रेतायुग, ३ द्वापारयुग आणि ४ कलियुग. या चार युगांस चौकडी म्हणतात. कलियुगाचें प्रमाण ४,३२,००० वर्षें आहे. या संख्येला चोहोंनीं गुणिलें म्हणजे सत्ययुगाचीं, तिहींनीं गुणिलें म्हणजे त्रेतायुगाचीं आणि दोहोंनीं गुणिलें म्हणजे द्वापारयुगाचीं वर्षें निघतात. म्हणजे कृतयुगाचीं १७,२८,००० वर्षें. त्रेतायुगाचीं १२,९६,००० वर्षें आणि द्वापारयुगाचीं ८,६४,००० वर्षें होतात. चार युगें म्हणजे एक महायुग होतें. आणि एक हजार महायुगें मिळून एक कल्प होतो. प्रस्तुत कल्पाचीं एकंदर २७ महायुगें पुरीं होऊन २८ व्या महायुगांतील कृत, त्रेता आणि द्वापार अशीं तीन युगें गत होऊन सांप्रत चवथें कलियुग चाललें आहे. म्हणून पूजेच्या वगैरे नित्य संकल्पांत 'अष्टाविंशतितमे कलियुगे' असें म्हणतात. प्रत्येक युगाचें लक्षावधि वर्षांचें प्रमाण असल्यामुळें कांहीं तरी दीर्घकाळ अशा अर्थींही व्यवहारांत युग शब्दाचा उपयोग करितात. वेदांगज्योतिषांत पंचवर्षात्मक कालाला युग अशी संज्ञा दिलेली आहे.

गतकलीचें प्रमाण.

खगशैलेंदुरामाद्ये ३१७९ शाकेब्दास्ते कलेर्गतः ।
तैर्विहीनं कलेर्मानं शेषे शेषकलेर्मितः ॥ १८ ॥

शालिवाहन शक सुरू झाला, त्या वेळीं कलियुगाचीं ३१७९ वर्षें गत झालीं होतीं. म्हणून शालिवाहन शकामध्यें ३१७९ मिळवून जी बेरीज येईल ती संख्या गेलेल्या कलियुगाच्या वर्षांचें प्रमाण होय आणि तीच बेरीज कलियुगाच्या एकंदर वर्षसंख्येंतून वजा केली असतां राहील ती संख्या शेष कलीचें प्रमाण होय. उदाहरणार्थ, शालिवाहन शके १८३२ ह्या सालीं कलीचीं किती वर्षें गेलीं आहेत, हें काढावयाचें आहे म्हणून, वर लिहिल्याप्रमाणें १८३२ त ३१७९ मिळविले म्हणजे ५०११ ही बेरीज झाली. हें गतकलीचें प्रमाण झालें, आणि हीच संख्या म्हणजे ५०११ एकंदर कलीच्या वर्षसंख्येंतून म्हणजे ४,३२,००० ह्या संख्येंतून वजा केली म्हणजे बाकी ४,२६,९८९ वर्षें राहतात. हीं वर्षें शके १८३२ सालीं कलियुगाचीं बाकी भोगावयाचीं राहिलीं असें समजावें.

शककर्ते.

युधिष्ठिरो विक्रमशालिवाहनौ ततो नृपः स्याद्विजयाभिनंदनः ।
ततस्तु नागार्जुनभूपतिः कलौ कल्की षडेते शककारकाः स्मृताः ॥ १९ ॥

कलियुगांत एकंदर सहा शककर्ते होतील असें विद्वान् ऋषींनीं लिहून ठेविलें आहे. त्या सहांतून तीन होऊन गेले आणि तीन अद्यापि व्हावयाचे आहेत.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ते शककर्ते कोणते व कोणाचा शक कोठें स्थापित होऊन किती वर्षें चालेल हें खालीं दिलें आहे.

पहिला–इंद्रप्रस्थ म्हणजे दिल्ली येथें युधिष्ठिरशक	... ...	३०४४ वर्षें.
दुसरा–उज्जयिनी येथें विक्रमशक (संवत्)...	... ...	१३५ ,,
तिसरा–पैठण येथें शालिवाहनशक	... ...	१८,००० ,,
चवथा–वैतरणेच्या कांठीं विजयाभिनंदनशक ...	... ...	१०,००० ,,
पांचवा–बंगाल देशांत धारातीर्थी नागार्जुनशक	... ...	४,००,००० ,,
सहावा–कर्नाटकांत करवीरपत्तनीं कल्कीशक...	... ...	८२१ ,,
	एकंदर कलियुगाचीं वर्षें	४,३२,०००

सांप्रत शालिवाहनाचा शक चालू आहे.

शालिवाहनशक.

शक ह्या शब्दाचा अर्थ व्यवहारांत काल असा समजतात. पण वास्तविक अर्थ निराळा आहे. प्राचीन कालीं शककुलोत्पन्न राजे होते. त्यांच्या वर्षांस शककाल किंवा शकनृपकाल म्हणजे शककुलांतील राजांचीं वर्षें असें म्हणत असत. त्यांचा काल संपल्यानंतर पुढें शालिवाहनाचा काल सुरू झाला, त्यास शालिवाहनाचा काल असें न म्हणतां काल शब्दाऐवजीं पूर्वींचा शक शब्द कायम ठेवून लोक शालिवाहनाचा शक असें म्हणूं लागले. सुमारें ४०० वर्षांपूर्वीं शालिवाहन-शकालाही शककाल किंवा शकनृपकाल असें म्हणत असत. सारांश, शक हें वस्तुतः प्रथम एका कुलाचें नांव असून हल्लीं तो शब्द कालबोधक समजतात.

गोदातीरीं पैठणक्षेत्रामध्यें शालिवाहन या नांवाचा राजा होता. त्यानें विक्रमाच्या शकानंतर १३५ वर्षांनीं आपला शक सुरू केला म्हणून त्याच्या शकास त्याच्या नांवावरून शालिवाहनशक असें म्हणतात. ह्या शकाचा वर्षारंभ चैत्रशुक्ल प्रतिपदेस होतो. म्हणून त्या दिवसास वर्षप्रतिपदा म्हणतात. शालिवाहनशक नर्मदानदीच्या दक्षिणेकडे म्हणजे महाराष्ट्रांत फार प्रचारांत आहे. शालिवाहनशक आणि इसवीसन ह्यामध्यें ७८। वर्षांचें अंतर आहे.

विक्रमसंवत्.

उज्जयिनीस विक्रमादित्य नांवाचा राजा होऊन गेला. त्यानें इसवीसनापूर्वीं सुमारें ५६।५७ वर्षें आपला शक सुरू केला. ह्याच्या शकास संवत् असें म्हणतात. संवत् हा संवत्सर ह्या शब्दाचा अपभ्रंश आहे. ह्या शकाचा वर्षारंभ कार्तिकशुक्ल प्रतिपदेस होतो. व्यापारी लोकांचें व्यापारासंबंधीं ह्या दिवशीं वर्ष बदलतें. गुजराथेंत कित्येक ठिकाणीं ह्या वर्षाचा आरंभ चैत्रांत व कित्येक ठिकाणीं आषाढांत होतो. नर्मदेच्या उत्तरेकडे म्हणजे गुजराथप्रांतांत विक्रम

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

संवत् फार प्रचारांत आहे. नर्मदेच्या दक्षिणेकडे व्यापारी लोक मात्र आपल्या व्यापारासंबंधीं लिहिण्यांत संवत् मानितात. शालिवाहनशकांत १३५ मिळविले म्हणजे कार्तिकांत शुक्ल प्रतिपदेस आरंभ होणाऱ्या वर्षारंभाचा संवत् निघतो.

युरोपियनशक.

इंग्रजी राज्यामुळें तिथीपेक्षां तारखेची गरज अलीकडे विशेष लागते, म्हणून लोकांच्या सोयीसाठीं पंचांगांतून इंग्रजी तारखा व महिने वगैरे लिहिण्याची चाल पडली आहे. म्हणून त्याविषयीं खालीं माहिती देतों.

युरोपियनांच्या म्हणजे ख्रिस्ती लोकांच्या शकास इसवीसन असें म्हणतात. सन हा शब्द मूळचा यवनी आहे आणि इसवी हा कदाचित् येशूशब्दाचा अपभ्रंश असेल. ह्या शकाचा आरंभ येशूख्रिस्ताच्या जन्मापासून धरिला आहे. आणि त्याचा वर्षारंभ ज्यान्युआरी महिन्याच्या पहिल्या तारखेस होतो. शालिवाहन-शकांत ७८। मिळविले किंवा विक्रमसंवतांतून ५६ वजा केले म्हणजे इसवीसन निघतो. ह्याचा अर्थ असा कीं, शालिवाहनशक इसवीसनानंतर ७८। वर्षांनीं सुरू झाला व विक्रमसंवत् ५६ किंवा ५७ वर्षें इसवीसनापूर्वीं सुरू झाला. ह्याचें सौरमानाचें म्हणजे ३६५ दिवसांचें वर्ष आहे. सूक्ष्म मानानें ३६५ दिवस ६ तास आणि ९ मिन्युटें इतक्या काळाचें एक सौरवर्ष होतें. व त्यांच्या वर्षांचे दिवस फक्त ३६५ असतात; आणि वरचा ६ तास ९ मिन्युटांचा फरक नाहींसा व्हावा, म्हणून दर चार वर्षांनीं फेब्रुआरीचे २९ दिवस धरितात. त्यांच्या बारा महिन्यांचे दिवस सारखे नसतात. ज्यान्युआरी ३१ फेब्रुआरी २८ मार्च ३१ एप्रिल ३० मे ३१ जून ३० जुलई ३१ आगष्ट ३१ सप्टेंबर ३० आक्टोबर ३१ नोव्हेंबर ३० डिसेंबर ३१ याप्रमाणें असतात. ज्या वर्षीं फेब्रुआरीचे २९ दिवस धरितात त्या वर्षास लीप म्हणजे अधिकाहवर्ष म्हणतात. ज्या सनास चोहोंनीं पूर्ण भाग जातो तें लीपवर्ष होय. उदाहरणार्थ, १८९२, १८९६ इत्यादि. तसेंच जेव्हां सनाच्या शेवटीं दोन शून्यें असतात, तेव्हां जर त्या सनाला ४०० नीं निःशेष भाग जात असेल तरीही तें लीप वर्ष समजावें. परंतु निःशेष भाग जात नसेल तर तें लीपवर्ष होत नाहीं. उदाहरणार्थ, सन १७००, १८०० किंवा १९०० ह्या सनाला ४०० नीं भागिलें असतां निःशेष भाग जात नाहीं, म्हणजे भागाकाराची बाकी शून्य राहात नाहीं, म्हणून ह्यांपैकीं कोणतेंही लीपवर्ष नव्हे. पण सन १६०० किंवा २००० ह्याला ४०० नीं भागून पूर्ण भाग जातो, म्हणून हीं लीपवर्षें होत. याप्रमाणें प्रत्येक ४०० वर्षांत तीन दिवस वजा होतात. याचें कारण असें आहे कीं, दर चार वर्षांनीं फेब्रुआरी महिन्याचा जो एक दिवस अधिक धरितात, त्यांत हिशेबापेक्षां सुमारें पाऊण तास अधिक धरिला जातो; म्हणजे दर चारशें वर्षांत तीन दिवस ज्यास्त मोजले जातात. ही चूक नाहींशी व्हावी म्हणून दर चारशें वर्षांत तीन दिवस वजा करावे लागतात.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

यवनी शक.

मुंबई, पुणें इत्यादि ठिकाणच्या पंचांगांतून बहुधा यवनी शक दाखवितात, याकरितां त्यांपैकीं कांहीं शकांची संक्षिप्त माहिती येथें सांगतों.

हिजरी सन—हिजरा या यवनी शब्दाचा अर्थ पळून जाणें असा आहे. महंमद पैगंबर इसवीसन ६२२ तारीख १५ जुलई रोजीं मकेहून मदिना येथें पळून गेला आणि त्या दिवसापासून ह्या शकाची सुरवात झाली, म्हणून त्यास हिजरी सन म्हणतात. ह्या सालाचा वर्षारंभ मोहरम महिन्याच्या पहिल्या तारिखेस होतो. ह्याचें चांद्रमासाचें वर्ष आहे. अमावास्येनंतर ज्या रात्रीं प्रथम चंद्रदर्शन होईल तो महिन्याचा प्रथम दिवस समजतात. चंद्रदर्शन झाल्यावेळेपासून महिन्याचा आरंभ होत असल्यामुळें वाराचा आरंभ अर्थात् रात्रीपासून होतो. म्हणजे आपली शनिवारची रात्र ती त्यांची आदित्यवारची रात्र असते. महिन्याच्या दिवसाला पहिला चंद्र, दुसरा चंद्र असें म्हणतात; किंवा तारीख शब्दाचाही उपयोग करितात. त्यांचे बारा महिने हिंदूंच्या चांद्रमासाबरोबर असून सर्व महिन्यांचे दिवस सारखे नसतात. म्हणजे आपल्या महिन्याच्या जशा कधीं २९ आणि कधीं ३० तिथि होतात, त्याप्रमाणेंच त्यांच्या महिन्यांचे कधीं २९ आणि कधीं ३० चंद्र होतात; आणि वर्षांचे दिवस ३५४ भरतात. पण मुसलमान लोक आपल्याप्रमाणें अधिक महिना धरीत नाहींत, त्यामुळें त्यांच्या वर्षांचा सौरवर्षाशीं मेळ नसतो. ज्या वर्षीं आपला अधिकमास येतो, त्या वर्षीं त्यांचा मोहरम एक महिना मागें जातो. ह्याप्रमाणें दर तिसऱ्या वर्षीं एक महिना मागें गेल्यामुळें दर ३२ किंवा ३३ वर्षांनीं त्यांच्या सनाचा एक अंक वाढतो. त्यांच्या बारा महिन्यांचीं नांवें:—१ मोहरम २ सफ्फर ३ रविलावल ४ रविलाखर ५ जमादिलावर ६ जमादिलाखर ७ रजब ८ साबान ९ रमजान १० सव्वाल ११ जिल्काद १२ जिल्हेज.

२ फसली सन—पेरणीचे सुमारास ह्या सनाचा वर्षारंभ होतो म्हणून याला फसलीसन म्हणतात. फसल शब्दाचा अर्थ पेरणें, शेत करणें असा आहे. दक्षिण हिंदुस्थानांत शहाजान नांवाच्या बादशहानें इसवी सन १६३६ त ह्या सनाचा आरंभ केला; पण त्यापूर्वींच सुमारें ८० वर्षें अकबरानें उत्तरहिंदुस्थानांत हा सन प्रचारांत आणिला होता. फसलीस फारशी असें सांप्रत म्हणतात. पंचांगांतून फारशी तारखा असतात, त्या फसली महिन्याच्याच होत. पारशी व फारशी सन निराळे आहेत पण महिन्यांचीं नांवें मात्र एकच असतात. मुंबई प्रांताच्या पंचांगांतून फसली सनाचा फक्त वर्षारंभ दाखवितात, पण तारखा दाखवीत नाहींत. हा वर्षारंभ जून महिन्याच्या सुमारें सातव्या तारखेस असतो. थोड्या वर्षांपूर्वीं माजी निजामसरकारांनीं जुन्या फसलीच्या तारखेंत फेरफार करून आजूर महिन्यापासून सनाचा आरंभ ठरविला आहे. तो भाद्रपद किंवा आश्विन या महिन्यांत असतो.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

फारशी महिन्यांचीं नांवें—आजूर ३० दय २९ बहमन ३० इस्पिंदाद ३० फरवर्दी ३१ आर्दिबेहस्त ३१ खुर्दाद ३१ तीर ३१ अमरदाद ३१ शहरेवार ३१ मेहेर ३० आवान ३० ह्याप्रमाणें एकंदर वर्षाचे दिवस ३६५ असतात. दरवर्षांत पूर्ण वर्षाचा काल भरण्यास सुमारें सहा तास कमी पडतात, म्हणून इंग्रजी पद्धतीप्रमाणें ज्या फसली सनाच्या अंकांस चार या संख्येनें निःशेष भाग जातो त्या सालीं दय महिना ३० तारखेचा धरितात. ह्या सनाचा मूळ आरंभ इसवीसन ५९० म्हणजे शके ५१२ या वर्षीं झाला. फसली साल हिजरी सालाप्रमाणें चांद्रमानाचें नसून सौरमानाचें असल्यामुळें दर ३३ वर्षांनीं त्या दोहोंत एक वर्षाचें अंतर पडतें.

अरबी सन—ह्याला सुरुसन किंवा शाहुरसन म्हणतात. ह्या सनाचा आरंभ इसवी सन ५९९ या वर्षीं म्हणजे फसली सनानंतर नऊ वर्षांनीं झाला. फसली सनाप्रमाणेंच मृगनक्षत्रीं सूर्य जातो त्या दिवशीं याचा वर्षारंभ होतो. याचें वर्ष सौरमानाचें आणि महिने चांद्रमानाचे आहेत, त्यामुळें दर तिसऱ्या वर्षीं एक वर्ष तेरा महिन्यांचें होतें.

पारशी शक.

पारशी लोकांच्या शकाला एजदीजर्द असें म्हणतात. हाही आपल्या पंचांगांत दाखवितात. हा शालिवाहन शकाच्या ५५२ वर्षांनंतर आणि इसवी सनाच्या ६३० वर्षांनंतर सुरू झाला. हा सन परशिआंत (इराणांत) सुरू झाल्यानंतर सुमारें ४०।५० वर्षांनीं पारशी लोक हिंदुस्थानांत आले. ते परशिआ देशांतून आले म्हणून त्यांस पारशी म्हणतात. पारशी लोकांना हिंदुस्थानांत येऊन सुमारें १३०० वर्षें होऊन गेलीं. ह्यांचा महिना सावन म्हणजे पूर्ण तीस दिवसांचा असतो. अर्थात वर्षाचे दिवस ३६० होतात. परंतु सौरवर्षाशीं मेळ बसावा म्हणून हे लोक वर्षाच्या शेवटीं पांच दिवस अधिक धरितात, त्यांस गाथागंबर असें म्हणतात. हे दिवस पारशी लोक फार महत्त्वाचे समजतात. त्यांच्या महिन्यांचीं नांवें:—१ फरवर्दिन २ आर्दीबेहस्त ३ खोरदाद ४ तीर ५ अमरदाद ६ शहरेवर ७ मेहर ८ आबान ९ आजूर १० दय ११ बहमन १२ इस्पिंदाद.

संवत्सरांचीं नांवें.

प्रभवो विभवः शुक्लः प्रमोदोऽथ प्रजापतिः ।
अङ्गिरा श्रीमुखो भावो युवा धाता तथैव च ॥ २० ॥
ईश्वरो बहुधान्यश्च प्रमाथी विक्रमो वृषः ।
चित्रभानुः सुभानुश्च तारणः पार्थिवो व्ययः ॥ २१ ॥
सर्वजित्सर्वधारी च विरोधी विकृतिः खरः ।
नन्दनो विजयश्चैव जयो मन्मथदुर्मुखौ ॥ २२ ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

हेमलम्बी विलम्बी च विकारी शार्वरी प्लवः ।
शुभकृच्छोभकृत्क्रोधी विश्वावसुपराभवौ ॥ २३ ॥
प्लवङ्गः कीलकः सौम्यः साधारणविरोधकृत् ।
परिधावी प्रमादी स्यादानन्दो राक्षसोऽनलः ॥ २४ ॥
पिङ्गलः कालयुक्तश्च सिद्धार्थी रौद्रदुर्मती ।
दुन्दुभी रुधिरोद्गारी रक्ताक्षी क्रोधनः क्षयः ॥ २५ ॥
षष्टिसंवत्सरा ह्येते क्रमेण परिकीर्तिताः ।
स्वाभिधानसमं ज्ञेयं फलमेषां मनीषिभिः ॥ २६ ॥

सम्+वसंति+ऋतवः म्हणजे चांगले ऋतु ज्यांत आहेत असें जें कालगणनेचें प्रमाण त्यास संवत्सर असें म्हणतात. ऐकिवांत दुसरी एक संवत्सर शब्दाची व्युत्पत्ति अशी आहे कीं, वत्स म्हणजे वांसरूं आणि तत्संबंधीं काळ तो वत्सर. गाईम्हशींना सुमारें १२ महिन्यांनीं एक वेत किंवा वांसरू होतें त्यावरून वत्सर या शब्दाची कल्पना कदाचित् निघाली असावी. तसेंच पृथ्वीची सूर्यासभोंवतीं एक प्रदक्षिणा पूर्ण होण्यास सुमारें एक वर्ष लागतें, त्यावरून पुढें वत्सर हा शब्द वर्षाचा वाचक समजला गेला. असो. आपल्या ज्योतिःशास्त्रांत साठ वर्षांचें एक मंडळ कल्पून प्रत्येक संवत्सरास एकेक नांव अशीं साठ संवत्सरांस निरनिराळीं साठ नांवें दिलेलीं आहेत. हींच नांवें संवत्सरांस पर्यायेंकरून साठ वर्षांनीं पुनःपुनः येतात. त्यांचीं फलें त्यांच्या नांवांप्रमाणें जाणावीं. तीं नांवें येणेंप्रमाणें:—

१ प्रभव	१६ चित्रभानु	३१ हेमलंबी	४६ परिधावी
२ विभव	१७ सुभानु	३२ विलंबी	४७ प्रमादी
३ शुक्ल	१८ तारण	३३ विकारी	४८ आनंद
४ प्रमोद	१९ पार्थिव	३४ शार्वरी	४९ राक्षस
५ प्रजापति	२० व्यय	३५ प्लव	५० अनल
६ अंगिरा	२१ सर्वजित्	३६ शुभकृत्	५१ पिंगल
७ श्रीमुख	२२ सर्वधारी	३७ शोभकृत्	५२ कालयुक्त
८ भाव	२३ विरोधी	३८ क्रोधी	५३ सिद्धार्थी
९ युव	२४ विकृति	३९ विश्वावसु	५४ रौद्र
१० धाता	२५ खर	४० पराभव	५५ दुर्मति
११ ईश्वर	२६ नंदन	४१ प्लवंग	५६ दुंदुभी
१२ बहुधान्य	२७ विजय	४२ कीलक	५७ रुधिरोद्गारी
१३ प्रमाथि	२८ जय	४३ सौम्य	५८ रक्ताक्षी
१४ विक्रम	२९ मन्मथ	४४ साधारण	५९ क्रोधन
१५ वृष	३० दुर्मुख	४५ विरोधकृत्	६० क्षय

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

संवत्सराचें नांव काढण्याची रीति.

शाको द्वादशभिर्युक्तः षष्टिहृद्वत्सरो भवेत् ।
रेवाया दक्षिणे भागे मानवाख्यः स्मृतो बुधैः ॥ २७ ॥
स एव नवभिर्युक्तो नर्मदायास्तथोत्तरे ।
यो वै वाचस्पतेर्मध्यराशिभागेन कथ्यते ॥ २८ ॥

शालिवाहनशकांतील ज्या संवत्सराचें नांव पाहिजे असेल त्या शकांत बारा मिळवावे, आणि त्या बेरजेस साठांनीं भागावें; जी बाकी राहील तो अंक त्या संवत्सराचें नांव समजावें. तसेंच, विक्रमसंवतांत नऊ मिळवून त्या बेरजेस साठांनीं भागावें आणि जो अंक बाकी राहील तें विक्रमसंवत्सराचें नांव होय.

उदाहरण—शके १८५६ या संवत्सराचें नांव पाहिजे आहे. वर लिहिलेल्या रीतीप्रमाणें त्यांत १२ मिळविले म्हणजे १८६८ झाले. ह्या बेरजेस साठांनीं भागिलें म्हणजे बाकी ८ राहिली. वर संवत्सराच्या नांवांचें जें कोष्टक दिलें आहे, त्यांत ८ अंकासमोर 'भाव' असें नांव आहे, म्हणून शके १८५६ ह्या वर्षास 'भावनामसंवत्सरे' असें म्हणावें. ह्याप्रमाणें पाहिजे त्या वर्षाचें नांव काढतां येतें. तसेंच, विक्रमसंवत् १९९० यांत नऊ मिळविले म्हणजे १९९९ झाले. ह्या बेरजेस साठांनीं भागून बाकी १९ राहते. वरील कोष्टकांत एकोणिसाव्या संवत्सराचें नांव 'पार्थिव' असें आहे. म्हणून तेंच १९९० या सालाचें विक्रमसंवत्सराचें नांव होय. ह्याचा वर्षारंभ कार्तिक शुक्ल प्रतिपदेस होतो.

संवत्सरांचीं फलें.

प्रभवाद् द्विगुणं कृत्वा त्रिभिर्न्यूनं च कारयेत् ।
सप्तभिस्तु हरेद्भागं शेषं ज्ञेयं शुभाशुभम् ॥ २९ ॥
एकं चत्वारि दुर्भिक्षं पञ्चद्वाभ्यां सुभिक्षकम् ।
त्रिषष्ठे तु समं ज्ञेयं शून्यं पीडा न संशयः ॥ ३० ॥

अर्थ—प्रभवापासून म्हणजे पहिल्या संवत्सरापासून चालू संवत्सरापर्यंत मोजून जितके अंक होतील त्यांची दुप्पट करून त्यांत तीन वजा करावे, बाकी राहील त्या संख्येस सातांनीं भागावें, शेष १ किंवा ४ असतां त्या वर्षी महागाई होईल; २ किंवा ५ असतां स्वस्ताई होईल; ३ किंवा ६ असतां साधारण सम राहील आणि बाकी शून्य राहिली तर रोग उत्पन्न होतील.

अयन.

भानोर्मकरसंक्रान्तेः षण्मासा उत्तरायणम् ।
तद्देवदिवसस्तत्र शुभं कार्यं प्रशस्यते ॥ ३१ ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कर्कादिराशिषट्केर्के षण्मासा दक्षिणायनम् ।
देवरात्रिस्तदेवात्र प्रोक्तं कार्यं प्रसिध्यति ॥ ३२ ॥

अयनें दोन आहेत. १ उत्तरायण व २ दक्षिणायन. शिशिर, वसंत आणि ग्रीष्म ह्या तीन ऋतूंत म्हणजे मकरसंक्रांतीच्या आरंभापासून तों कर्कसंक्रांतीच्या आरंभापर्यंत सूर्याची गति म्हणजे जाणें उत्तरेकडे असतें, म्हणून त्या कालास उत्तरायण किंवा उदगयन म्हणतात; आणि वर्षाऋतु, शरदृतु व हेमंतऋतु ह्या तीन ऋतूंत म्हणजे कर्कसंक्रांतीच्या आरंभापासून तों मकरसंक्रांत लागेपर्यंत सूर्याचें जाणें दक्षिणेकडे असतें म्हणून त्या कालास दक्षिणायन म्हणतात. मकरसंक्रांत पौष महिन्यांत म्हणजे प्रायः जांन्युआरीच्या तेराव्या किंवा चवदाव्या तारखेस व कर्कसंक्रांत आषाढांत म्हणजे बहुतकरून जुलईच्या पंधराव्या किंवा सोळाव्या तारखेस असते; म्हणजे उदगयनाला पौषांत व दक्षिणायनाला आषाढांत आरंभ होतो. ह्याप्रमाणें सहा महिने उत्तरायण व सहा महिने दक्षिणायन असतें. उत्तरायण हा देवांचा दिवस आणि दक्षिणायन ही देवांची रात्र कल्पिलेली आहे.

उत्तरायणांतील कृत्यें.

गृहप्रवेशस्त्रिदशप्रतिष्ठा विवाहचौलव्रतबन्धदीक्षा ।
सौम्यायने कर्म शुभं विधेयं यद्गर्हितं तत्खलु दक्षिणे च ॥ ३३ ॥

उत्तरायण हें प्रायः सर्व कार्यांस उक्त मानिलेलें आहे. नव्या घरांत जाणें, देवाची अर्चा म्हणजे प्रतिष्ठा करणें, विवाह, चौल, उपनयन, मंत्र–तंत्र शिकणें इत्यादि सर्व कृत्यें उत्तरायणांत करावीं. ह्याशिवाय अन्य कृत्यें दक्षिणायनांत करावीं. तथापि मार्गशीर्ष मासांत दक्षिणायन असूनही विवाह करणें उक्त आहे.

ऋतु आणि त्यांचे काल.

वसंतो ग्रीष्मसंज्ञश्च ततो वर्षा ततः शरत् ।
हेमंतः शिशिरश्चैव षडेते ऋतवः स्मृताः ॥ ३४ ॥
मीनमेषगते सूर्ये वसंतः परिकीर्तितः ।
वृषभे मिथुने ग्रीष्मो वर्षाः सिंहेथ कर्कटे ॥ ३५ ॥
शरत्कन्यातूलयोश्च हेमंतो वृश्चिके धने ।
शिशिरो मकरे कुंभे षडेवमृतवः स्मृताः ॥ ३६ ॥
चैत्रादि द्विद्विमासाभ्यां वसंताद्यृतवश्च षट् ।

ऋतूंचा संबंध सूर्याच्या गतीशीं आहे. जसजसा सूर्य क्रांतिवृत्तांतून फिरतो तसतसे ऋतु बदलतात. हे ऋतू सहा आहेत. वसंत, ग्रीष्म, वर्षा, शरत्, हेमंत आणि शिशिर. सूर्य कोणत्या राशीस आला म्हणजे कोणता ऋतु असतो हें खालीं लिहिल्यावरून ध्यानीं येईल. चैत्रादि बारा महिन्यांत, क्रमानें दोन दोन महिन्यांचा एकेक ऋतु होतो. म्हणजे चैत्र वैशाख वसंतऋतु, ज्येष्ठ आषाढ ग्रीष्मऋतु, इ० सहा ऋतु बारा महिन्यांत पूर्ण होतात.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

राशी	ऋतु	राशी	ऋतु
मीन व मेष	वसंतऋतु	कन्या व तूळ	शरदृतु
वृषभ व मिथुन	ग्रीष्मऋतु	वृश्चिक व धन	हेमंतऋतु
कर्क व सिंह	वर्षाऋतु	मकर व कुंभ	शिशिरऋतु

ह्याप्रमाणें सूर्यानें दोन संक्रांति किंवा राशि भोगिल्या म्हणजे चैत्रादिकरून बारा महिन्यांत सहा ऋतु पूर्ण होतात. राशि किंवा संक्रांति म्हणजे काय हें येथें सांगितलें पाहिजे. ज्या* मार्गांतून सूर्य फिरतोसा दिसतो त्या मार्गाचे म्हणजे क्रांतिवृत्ताचे बारा भाग कल्पिलेले आहेत. ते बारा भाग ह्याच बारा राशि होत. सूर्य एका वर्षांत सर्व क्रांतिवृत्तावरून म्हणजे बारा राशींवरून जातो. या ठिकाणीं सूर्य फिरतो असें लिहिलें आहे, तें केवळ विषयाच्या समजुतीकरितां लिहिलें आहे. वास्तविक सूर्य फिरत नाहीं. पृथ्वी सूर्याभोंवतीं फिरते आणि त्यामुळें सूर्यच फिरतो आहे असें भासतें. एका भागांतून दुसऱ्या भागांत जें सूर्याचें जाणें त्यास संक्रांति म्हणतात. ह्या बारा राशींचीं किंवा संक्रांतींचीं निरनिराळीं नांवें आहेत तीं येणेंप्रमाणें:—

मेषो वृषोऽथ मिथुनं कर्कः सिंहोऽथ कन्यका ।
तुलाऽथ वृश्चिको धन्वी मकरः कुंभमीनकौ ॥ ३७ ॥

१ मेष २ वृषभ ३ मिथुन ४ कर्क ५ सिंह ६ कन्या ७ तूळ ८ वृश्चिक ९ धन १० मकर ११ कुंभ आणि १२ मीन.

महिने.

मासश्चैत्रोऽथ वैशाखो ज्येष्ठ आषाढसंज्ञकः ।
ततस्तु श्रावणो भाद्रपदोऽथाश्विनसंज्ञकः ॥ ३८ ॥
कार्तिको मार्गशीर्षश्च पौषो माघोऽथ फाल्गुनः ।
एतानि मासनामानि चैत्रादीनां क्रमाद्विदुः ॥ ३९ ॥

महिने बारा आहेत. त्यांचीं नांवें-चैत्र, वैशाख, ज्येष्ठ, आषाढ, श्रावण, भाद्रपद, आश्विन, कार्तिक, मार्गशीर्ष, पौष, माघ आणि फाल्गुन.

मासनामांची उत्पत्ति.

यस्मिन्मासे पौर्णमासी येन धिष्ण्येन संयुता ।
तन्नक्षत्राह्वयो मासः पौर्णमासी तदाह्वया ॥ ४० ॥

चैत्र, वैशाख इत्यादि मासनामें प्रथम नक्षत्रांवरून उत्पन्न झालीं; म्हणजे प्रत्येक महिन्यांत ज्या नक्षत्राजवळ चंद्र पूर्ण होतो त्या नक्षत्रावरून त्या महिन्याचें नांव

* आकाशांत चंद्र सूर्य ज्या नियमित वर्तुळ मार्गानें फिरतात असें दिसतें, त्यास क्रांतिवृत्त म्हणतात. क्रांति म्हणजे जाणें आणि वृत्त म्हणजे वर्तुळ.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पडलें. पूर्णिमेसच पूर्ण चंद्र असतो हें सर्वांस ठाऊक आहेच, अर्थात् प्रत्येक महिन्याच्या नांवाचें नक्षत्र सुमारें त्या महिन्याच्या पौर्णिमेस किंवा एकदोन दिवस मागेंपुढें असतें. ह्याप्रमाणें बारा महिन्यांचीं निरनिराळीं बारा नांवें पडलीं तीं अशीं:—

महिन्याचें नांव.	नक्षत्राचें नांव.	महिन्याचें नांव.	नक्षत्राचें नांव.
चैत्र	चित्रा.	आश्विन	अश्विनी.
वैशाख	विशाखा.	कार्तिक	कृत्तिका.
ज्येष्ठ	ज्येष्ठा.	मार्गशीर्ष	मृगशीर्ष.
आषाढ	उत्तराषाढा.	पौष	पुष्य.
श्रावण	श्रवण.	माघ	मघा.
भाद्रपद	पूर्वाभाद्रपदा.	फाल्गुन	उत्तराफाल्गुनी.

पण नेहमींच ही स्थिति असते असें नाहीं. कधीं कधीं दोन किंवा तीन नक्षत्रें सुद्धां पौर्णिमेच्या मागेंपुढें होतात. ही नक्षत्रांची अनियमित स्थिति ज्योतिष्यांच्या ध्यानीं आल्यावरून त्यांनीं माससंज्ञेचा दुसरा एक असा नियम बांधिला कीं,

मीनादिस्थो रविर्येषामारंभे प्रथमे क्षणे ।
भवेत्तेऽब्दाश्चांद्रमासाश्चैत्राद्या द्वादश स्मृताः ॥ ४१ ॥

म्हणजे ज्या चांद्रमासाच्या शुक्ल प्रतिपदेचा आरंभ मीन संक्रांतींत सूर्य असतांना होईल तो चैत्र. मेष संक्रांतींत होईल तो वैशाख. याप्रमाणें चैत्रादि द्वादश मासांविषयीं जाणावें. पण याचा अर्थ असा मात्र कोणीं समजूं नये कीं, त्या प्रतिपदेच्या आरंभक्षणींच त्या त्या संक्रांतीचा उदय झाला पाहिजे; किंवा संपूर्ण मासपर्यंत तीच संक्रांत असली पाहिजे. केवळ त्या महिन्याच्या प्रतिपदेचा आरंभ वरील नियमाप्रमाणें त्या त्या संक्रांतींत असावा म्हणजे झालें. मग प्रतिपदेच्या दुसऱ्या दिवशीं किंबहुना त्याच दिवशीं सूर्य पुढील राशींत जात असला तरी चालेल.

चांद्रमास.

चैत्रादिसंज्ञाश्चांद्राणां मासानां संप्रकीर्तिताः ।
श्रौतस्मार्तक्रियाः सर्वाः कुर्याच्चांद्रमसर्तुषु ॥ ४२ ॥
चांद्रस्तु द्विविधो मासो दर्शांतः पौर्णिमांतिमः ।
देवार्थे पौर्णमास्यंतो दर्शांतः पितृकर्मणि ॥ ४३ ॥

आपले चैत्र, वैशाख इत्यादि वर सांगितलेले बारा महिने हेच चांद्रमास होत. व्रतें, हवनें, शांति, विवाह इत्यादि धर्मशास्त्रांतील सर्व कृत्यें नित्य चांद्रमासाप्रमाणेंच करावीं. चांद्रमास मोजण्याच्या दोन पद्धति आहेत. एक पूर्णिमांत मास आणि दुसरा अमांत मास. एका पूर्णिमेपासून दुसऱ्या पूर्णिमेपर्यंत जो महिना मोजितात, तो पूर्णिमांत मास; आणि एका अमावास्येपासून दुसऱ्या अमावास्ये-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पर्यंत जे तीस दिवस, तो अमांत मास होय. पूर्णिमांत मास देवकार्यास उक्त मानिलेला आहे, म्हणून कार्तिकस्नानें किंवा माघस्नानें वगैरे पूर्णिमांत मासाप्रमाणें करितात; म्हणजे आश्विनकृष्णपक्ष प्रतिपदेपासून कार्तिकशुक्ल पूर्णिमेपर्यंत कार्तिक महिना समजतात. ह्याचप्रमाणें इतर मासांविषयीं समजावें. आतां चैत्र, वैशाख इत्यादि महिन्यांना चांद्रमास म्हणतात त्याचें कारण असें आहे कीं, हे महिने चंद्राच्या स्थितीवरून आपणास समजतात. चंद्राच्या कलांचा पूर्ण क्षय होऊन ज्या रात्रीं चंद्र आपल्या दृष्टीस पडत नाहीं, त्या रात्रीपासून पुनः तो तसा दिसेनासा होईपर्यंत, म्हणजे एका अमावास्येपासून दुसऱ्या अमावास्येपर्यंत, अथवा चंद्राच्या कलांची पूर्ण वृद्धि होऊन ज्या रात्रीं चंद्र आपणांस पूर्ण दिसतो, त्या रात्रीपासून पुनः तो आपणांस पूर्ण दिसेपर्यंत, म्हणजे एका पूर्णिमेपासून दुसऱ्या पूर्णिमेपर्यंत, मध्यें जे तीस दिवस जातात, त्यासच आपण एक महिना समजतों. हें आपणांस चंद्राच्या योगानें समजतें म्हणून त्याचें नांव चांद्रमास. चांद्रमासाचे दिवस म्हणजे तिथि आपण तीस धरितों. परंतु वास्तविक त्या २९॥ असतात. ह्याप्रमाणें बारा चांद्रमासाचे म्हणजे एका चांद्रवर्षाचे ३५४ दिवस भरतात. चांद्रमासाचा आरंभ चैत्रशुक्ल प्रतिपदेस होतो.

सौरमास.

मेषादि सौरमासास्ते भवंति रविसंक्रमात् ।
मधुश्च माधवश्चैव शुक्रः शुचिरथो नभः ॥ ४४ ॥
नभस्यश्चेष ऊर्जश्च सहश्चाथ सहस्यकः ।
तपस्तपस्यः क्रमतः सौरमासाः प्रकीर्तिताः ॥ ४५ ॥
सौरो मासो विवाहादौ यज्ञादौ सावनः स्मृतः ।
आब्दिके पितृकार्ये च चान्द्रो मासः प्रशस्यते ॥ ४६ ॥

जे मास सूर्याच्या गतीच्या अनुरोधानें मोजले जातात त्यांस सौरमास म्हणतात. मागें मेषादिक ज्या बारा संक्रांति सांगितल्या आहेत, तेच बारा सौरमास होत. पण त्यांच्या संज्ञा निराळ्या आहेत. त्या येणेंप्रमाणें:—१ मधु २ माधव ३ शुक्र ४ शुचि ५ नभ ६ नभस्य ७ इष ८ ऊर्ज ९ सह १० सहस्य ११ तप १२ तपस्य. पण व्यवहारांत मधुमास किंवा माधवमास असें कोणी म्हणत नाहीं. मेष संक्रांत किंवा वृषभ संक्रांत असेंच म्हणतात. ह्या बारा सौरमासांचे दिवस सारखे नसतात. एकाद्या महिन्याचे तीस आणि एकाद्या महिन्याचे एकतीस दिवस असतात. बारा सौरमासांचे म्हणजे एका सौरवर्षाचे ३६५ दि० १५घ० ३१ प० इतके दिवस भरतात. बंगाल्यांत व मलबारांत व्यवहारांत सौरमासच धरितात. आपलीं विवाहादि धर्मकृत्यें पूर्वी सौरमासाप्रमाणें होत असत, पण सांप्रत तीं चांद्र-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मासप्रमाणेंच होतात. पितृकार्याला मात्र चांद्रमास प्रशस्त धरिलेला आहे. यज्ञयागादि कर्में सावनमासप्रमाणें करावीं.

सावन व नाक्षत्रमास.

त्रिंशद्दिनः सावनिको नाक्षत्रो विधुभभ्रमात् ।

पूर्ण तीस दिवसांचा जो एक महिना त्यास सावनमास म्हणतात. बारा सावनमास मिळून एका सावनवर्षाचे दिवस ३६० भरतात.

अश्विनीपासून रेवतीपर्यंत सत्तावीस नक्षत्रें चंद्राला भोगण्यास लागणारा जो काल त्यास नाक्षत्रमास म्हणतात. नाक्षत्रमासाचे दिवस २७ असतात.

अधिकमास.

असंक्रांतिरमांतो यो मासश्चेत्सोऽधिमासकः ।
मलमासाह्वयो ज्ञेयः प्रायश्चैत्रादिसप्तसु ॥ ४७ ॥
द्वात्रिंशद्भिर्गतैर्मासैर्दिनैः षोडशभिस्तथा ।
घटिकानां चतुष्केण पतत्यधिकमासकः ॥ ४८ ॥

चांद्रमान किंवा सौरमान या दोहोंचा मेळ असावा, म्हणून मध्यें ज्या एकाद्या अमान्त महिन्यांत संक्रांत गणली जात नाहीं, त्या महिन्याला अधिकमास किंवा मलमास म्हणतात. चैत्रापासून आश्विनापर्यंत जे सात महिने, त्यांपैकींच बहुतकरून एकादा अधिकमास असतो. क्वचित् फाल्गुन पण येतो. माघमास मात्र कधीं अधिकमास किंवा क्षयमास नसतो. स्थूलमानानें बत्तीस महिने, सोळा दिवस आणि चार घटिका इतका काळ गेल्यानंतर, म्हणजे दर तिसऱ्या वर्षी अधिकमासाचा संभव होतो. एकदां झालेला अधिकमास प्रायः पुनः १९ वर्षांनीं येतो. अधिकमास धरण्याचें कारण असें आहे कीं, चांद्रवर्षाचे दिवस ३५४ व सौरवर्षाचे दिवस ३६५ असतात; म्हणजे, चांद्रमानाचें वर्ष व सौरमानाचें वर्ष ह्या दोहोंत अकरा दिवसांचें अंतर असतें. हें अंतर भरून यावें व चांद्रवर्षाचा आणि सौरवर्षाचा मेळ असावा, म्हणून सुमारें ३३ महिन्यांनीं एक अधिक महिना धरितात. अधिक महिन्यास त्याच्या पुढील महिन्याचें नांव देतात. दर तीन वर्षांनीं येणारा अधिक मास शुभ कर्मास वर्ज्य सांगितला आहे; परंतु ज्या वर्षी क्षयमास येतो, त्या वर्षी दोन अधिक मास येतात; त्यांपैकीं क्षयमासापूर्वी येणारा जो अधिकमास, ज्याला संसर्प म्हणतात, तो शुभ कार्यास वर्ज्य नाहीं. मागाहून येणाऱ्या अधिकमासास अंहस्पति म्हणतात, तो मात्र शुभ कार्यास वर्ज्य आहे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

अधिकमास काढण्याची रीति.

मासस्य कृष्णपंचम्यां रविः संक्रमते यदि ।
अधिमासः सविज्ञेयः परवर्षेण योजयेत् ॥ ४९ ॥

रीति पहिली—पूर्वीच्या संवत्सरांत ज्या महिन्याच्या कृष्णपंचमीस महिन्याची संक्रांति येईल, तोच महिना प्रायः पुढील वर्षीं अधिक मास होतो, असें समजावें. तथापि हें स्थूलमान आहे म्हणून पंचमीच्या मागेंपुढें एकदोन प्रहर संक्रांतिप्रवेश झाला तरी चालेल. उदाहरणार्थ, ग्रहलाघवाप्रमाणें शके १८५५ संवत्सरांत वैशाख कृष्णपंचमीस त्या महिन्याची वृषभसंक्रांति आली होती, म्हणून १८५६ संवत्सरांत वैशाख हाच अधिकमास झाला.

शाकोर्क[१२]घ्नोंकभूतष्टोऽक्षाल्पो[५] भूनो दशाल्पकः ।
घ्नूनेश्चैत्रात्स एवाधिमासो नैवान्यथा भवेत् ॥ ५० ॥

रीति दुसरी—शालिवाहनशकास बारांनीं गुणून त्या गुणाकारास एकोणिसांनीं भागावें. आणि शेवटीं जी बाकी राहील ती जर नऊ किंवा नवांच्या आंतील एकादा अंक असेल तर त्या वर्षीं अधिकमास पडेल असें समजावें. तसेंच, चैत्रादि बारा महिन्यांतून कोणता महिना अधिकमास होईल, हें समजण्याची रीति अशी आहे कीं, भागाकाराची बाकी जर पांच किंवा पांचांपेक्षां अधिक असेल तर त्यांतून दोन वजा करावे, आणि पांच अंकांच्या आंत असेल तर एक वजा करावा. बाकी जो अंक राहील तो चैत्रापासून मोजून अधिकमास समजावा. उदाहरणार्थ, शके १८३४ या वर्षीं अधिकमासाचा संभव आहे कीं नाहीं व असेल तर कोणता अधिकमास येईल हें सिद्ध करावयाचें आहे, म्हणून वरील रीतीप्रमाणें १८३४×१२=२२००८÷१९=११५८ भागाकाराची बाकी ६ राहिली. ही बाकी नऊ अंकांच्या आंत आहे म्हणून १८३४ या वर्षीं अधिकमास आहे हें प्रथम निश्चित झालें. तसेंच, बाकी ६ राहिली आहे, याकरितां रीतिप्रमाणें त्यांतून २ वजा करितां बाकी ४ राहिली. म्हणून चैत्रापासून चवथा महिना जो आषाढ तो अधिकमास होईल. तथापि ही रीति स्थूलमानाची आहे. या रीतीनें कधीं कधीं थोडा फरक पडतो. उदाहरणार्थ, शके १८३१ या वर्षीं वरील रीतीनें भाद्रपद हा अधिकमास येतो. पण या वर्षीं सूक्ष्म गणितानें श्रावण अधिकमास आला होता. म्हणून शके १८५८ पासून पुढील ऐंशीं वर्षांतील अधिकमासांचें कोष्टक खालीं दिलें आहे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

अधिकमासाचें कोष्टक.

१८५८ भाद्रपद	१८६१ श्रावण	१८६४ ज्येष्ठ	१८६७ चैत्र	१८६९ श्रावण
१८७२ आषाढ	१८७५ वैशाख	१८७७ भाद्रपद	१८८० श्रावण	१८८३ ज्येष्ठ
१८८६ चैत्र	१८८८ श्रावण	१८९१ आषाढ	१८९४ वैशाख	१८९६ भाद्रपद
१८९९ आषाढ	१९०२ ज्येष्ठ	१९०४ आश्विन	१९०७ श्रावण	१९१० ज्येष्ठ
१९१३ वैशाख	१९१५ भाद्रपद	१९१८ आषाढ	१९२१ ज्येष्ठ	१९२३ आश्विन
१९२६ श्रावण	१९२९ ज्येष्ठ	१९३२ वैशाख	१९३४ भाद्रपद	१९३७ आषाढ

ह्यांशिवाय क्षयमासामुळें शके १८८५ आणि १९०४ या वर्षीं अनुक्रमें आश्विन व फाल्गुन अधिकमास होतील.

क्षयमास.

द्विसंक्रांतिः क्षयाख्यः स्यात् कदाचित् कार्तिकत्रये ।
युग्माख्ये स तु तत्राब्दे ह्यधिमासद्वयं भवेत् ॥ ५१ ॥

एका महिन्यांत दोन संक्रांति येतात तेव्हां क्षयमास होतो. कार्तिक, मार्गशीर्ष किंवा पौष या तीन महिन्यांपैकींच एकादा क्षयमास असतो. याचें कारण असें आहे कीं, या तीन महिन्यांत सूर्याची गति शीघ्र असते; म्हणून वृश्चिक, धन आणि मकर या तीन राशि चालून जाण्यास सूर्यास नेहमींप्रमाणें तीस दिवस न लागतां कधींकधीं कमी काळ पुरतो. अशा वेळेस एका महिन्यांत दोन संक्रांति येण्याचा संभव कधीं कधीं असतो, म्हणून क्षयमास होतो. क्षयमास येतो तेव्हां क्षयमासाच्या पूर्वीं एक, आणि क्षयानंतर एक, असे दोन अधिक महिने येतात, व त्या वर्षीं तेरा महिन्यांचें वर्ष असतें. क्षयमास एकदां येऊन गेला म्हणजे बहुतकरून १४१ वर्षांनीं किंवा १९ वर्षांनीं पुनः येतो. मागें शके १७४४ या वर्षीं मार्गशीर्ष क्षयमास आला होता; आतां पुढें शके १८८५ आणि १९०४ या वर्षीं अनुक्रमें मार्गशीर्ष व पौष हे क्षयमास होतील.

पक्षविचार.

शुक्लकृष्णावुभौ पक्षौ दैवे पित्र्ये च कर्मणि ।
ग्राह्यौ तथा शुभं सर्वं शुक्लपक्षे प्रशस्यते ॥
आदौ शुक्लः प्रवक्तव्यः केचित्कृष्णोऽपि मासकम् ॥ ५२ ॥

महिन्याच्या तिथि तीस असतात हें सर्वांस ठाऊक आहेच. पंधरा तिथींचा

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

एक भाग असे तीस तिथींचे म्हणजे महिन्याचे दोन भाग कल्पिलेले आहेत. त्यांस पक्ष किंवा पंध्रवडे म्हणतात. एक शुक्ल म्हणजे चांदण्याचा पक्ष व दुसरा कृष्ण म्हणजे काळोखाचा पक्ष. प्रतिपदेपासून पूर्णिमेपर्यंत जे पंधरा दिवस तो शुक्लपक्ष, व पूर्णिमेनंतर अमावास्येपर्यंत जे पंधरा दिवस तो कृष्णपक्ष. शुक्लपक्षांतील प्रत्येक तिथीस रात्रीच्या आरंभापासून चंद्रोदय होऊन तिथीच्या दुप्पटीइतक्या घटिकांपर्यंत चांदणें असतें. उदाहरणार्थ, प्रतिपदेस दोन घटिका चांदणें असतें, द्वितीयेस चार घटिका, अष्टमीस सोळा घटिका, आणि पूर्णिमेस तीस घटिका म्हणजे सारी रात्र चांदणें असतें. या वेळेस चंद्राच्या कला पूर्ण होतात. नंतर कृष्णपक्षास आरंभ झाला म्हणजे प्रत्येक तिथीस चंद्राचें चांदणें दोन दोन घटिका कमी होत जातें. म्हणजे रोज तिथीच्या दुप्पटीइतक्या घटिका उशीरां चंद्र उगवतो. उदाहरणार्थ, प्रतिपदेस दोन घटिका रात्रीं, चतुर्थीस आठ घटिका रात्रीं, अष्टमीस सोळा घटिका रात्रीं चंद्रोदय होऊन चांदणें पडतें, व अमावास्येस सारी रात्र काळोख असतो. यांवरून हें स्पष्ट झालें कीं, शुक्लपक्षांत तिथींच्या दुप्पटीइतक्या घटिकांनीं रात्रीं चंद्र मावळतो, आणि कृष्णपक्षांत पूर्णिमेपासून गेलेल्या तिथींच्या दुप्पटीइतक्या घटिकांनीं तो रात्रीं उगवतो, उदाहरणार्थ, शुक्ल अष्टमीस सोळा घटिका रात्रीं चंद्र मावळतो, आणि कृष्ण अष्टमीस सोळा घटिका रात्रीं तो उगवतो. याचें कारण मागें सांगितलेंच आहे कीं, प्रत्येक तिथीस चंद्र बारा अंश पुढें जातो म्हणजे आजच्या तिथीस ज्या वेळीं तो उगवेल त्या वेळेच्या बारा अंश मागाहून उद्यां उगवेल हें स्पष्ट आहे. पृथ्वीला तीनशेंसाठ अंश फिरण्यास ६० घटिका लागतात; या हिशोबानें १२ अंशाला म्हणजे एका तिथीला २ घटिका पाहिजेत. शुक्लपक्षांत चंद्राच्या कलांची वृद्धि होत असल्यामुळें रोज दोन दोन घटिका चांदणें अधिक पडतें व कृष्णपक्षांत क्षय होत असल्यामुळें रोज रात्रीच्या आरंभींच्या दोन दोन घटिका चांदणें कमी होत जातें.

नर्मदेच्या उत्तरेकडील प्रदेशांत पूर्णिमान्त मास धरितात; म्हणजे आपण जसा आपला महिना अमावास्येस संपतो असें समजतों, त्याप्रमाणें त्यांचा महिना पूर्णिमेस संपतो असें ते समजतात. यावरून कित्येकांची अशी समजूत झालेली असते कीं, आपला जो शुक्लपक्ष तो त्या लोकांचा कृष्णपक्ष असतो. या म्हणण्याचा अर्थ असा होतो कीं, आमच्या येथें ज्या रात्रीं चांदणें त्या रात्रीं त्यांच्या प्रदेशांत काळोख; पण असें होणें अशक्य आहे. कारण ज्या रात्रीं एके ठिकाणीं चांदणें असेल त्या रात्रीं पृथ्वीच्या एका गोलार्धांवर कोठेंही गेलें तरी चांदणेंच आढळेल. तेव्हां आमचा शुक्लपक्ष तो त्यांचा कृष्णपक्ष किंवा त्यांचा कृष्णपक्ष तो आपला शुक्लपक्ष कसा होईल? तसेंच, स्फटिकासारखें शुभ्र असें आल्हादजनक पौर्णिमेचें चांदणें पाहून कित्येक असें म्हणतांना आढळतात कीं, परमेश्वरानें प्रतिरात्रीं अशा चांदण्याची योजना कां केली नाहीं? परंतु, जसा प्रतिदिनीं सूर्याचा पूर्ण प्रकाश

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

असतो त्याप्रमाणें, प्रतिरात्रीं जर चंद्राचें पूर्ण चांदणें असतें तर, आज ज्या असंख्य ताऱ्यांचा शोध लागला आहे, तो लागला असता काय? चंद्रप्रकाश असतांना बहुतेक तारे दिसत नाहींत हें जसें आपण पाहतों, तसेंच अमावास्येच्या रात्रीं अगणित तारे आपणास दृष्टिगोचर होतात हेंही आपण पाहतों. याशिवाय ही अशी व्यवस्था करण्यांत परमेश्वराचे दुसरे अनेक महत्वाचे हेतु असतील. तात्पर्य, ईश्वरकृति परिपूर्ण व निर्दोष आहे, तींत सुधारणेला लेशही अवकाश नाहीं.

शुक्लकृष्णपक्षाचें स्वरूप.

आपूर्यमाणो मुख्यः स्यात्सर्वस्मिन् शुभकर्मणि ।
कृष्णो गौणो दशांतः स्यान्नागांतो व्रतबंधने ॥ ५३ ॥

ज्या पंध्रवड्यांत चंद्राच्या कला पूर्णत्वास पावून रात्रिसमय मनोल्हादक होतो असा शुक्लपक्ष सर्व मंगलकृत्यें करण्यास विशेष प्रशस्त मानिला आहे. मौंजी बंधनाकरितां कृष्णपक्ष तर निषिद्धच आहे तथापि कृष्ण पंचमी पर्यंत गौणपक्ष समजून उपनयन करावें. कृष्ण षष्ठीपासून उपनयन कृत्य अवश्य वर्ज्य करावें. उपनयनाशिवाय इतर शुभकृत्यें मात्र कृष्ण दशमीपर्यंत करावीं. पुढें एकादशीपासून अमावास्येपर्यंत पांच दिवस सर्वथा त्याज्य होत. कारण, असें सांगितलें आहे कीं,

कृष्णे एकादशीषट्कं निंद्यं निंद्यतरं तु यत् ।
द्वादश्यादि चतुष्कं तत् भूतान्निंद्यतमंद्वयं ॥ ५४ ॥

कृष्णपक्षांतील एकादशीपासून शुक्ल प्रतिपदेपर्यंत सहा तिथि शुभकार्यास निंद्य होत. त्यांतही द्वादशीपासून अमावास्येपर्यंत चार तिथि विशेष निंद्य होत. त्याहीपेक्षां चतुर्दशी व अमावास्या ह्या दोन तिथि तर अत्यंतच निंद्य आहेत असें जाणावें.

तेरा दिवसांचा पंध्रवडा.

त्रयोदशदिने पक्षे विवाहादि न कारयेत् ।
गृहारंभादि कर्माणि वर्जयेत् व्रतबंधनम् ॥ ५५ ॥

एक पक्ष, म्हणजे पंध्रवडा; हा सामान्यतः पंधरा दिवसांचा असतो; असें जरी आहे तरी तिथींच्या क्षयवृद्धीमुळें कधीं कधीं चवदा किंवा सोळा तिथींचाही पंध्रवडा होतो. क्वचित् प्रसंगीं तेरा दिवसांचाही होतो, त्याला विश्वघस्रपक्ष म्हणतात. विश्वघस्रपक्ष येतो, तेव्हां प्रतिपदा द्वितीया किंवा तृतीया यांपैकीं एकाद्या तिथीचा क्षय होऊन त्या मानानें पुढील तिथींची व्याप्तिही कमीच होत जाते; आणि शेवटीं चतुर्दशी, पूर्णिमा किंवा अमावास्या यांतून एकाद्या तिथीचा क्षय होतो व त्यामुळें तेरा दिवसांचा विश्वघस्रपक्ष संभवतो. तो जगांत उद्भवणाऱ्या संकटांचा सूचक असतो. अशा तेरा दिवसांच्या पंध्रवड्यांत विवाह, वास्तुशांति, गृहारंभ, उपनयन किंवा कोणतेंही मंगलकृत्य करूं नये. कृष्णपक्षांत विश्वघस्रपक्ष संभवेल तर फारच अशुभ होय. शुक्लपक्षांत असलेला त्याहून किंचित् कमी भयसूचक असतो इतकेंच.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

तिथिप्रकरणम्.

प्रतिपच्च द्वितीया च तृतीया तदनंतरं ।
चतुर्थी पंचमी षष्ठी सप्तमी चाष्टमी तथा ॥ ५६ ॥
नवमी दशमी चैकादशी च द्वादशी ततः ।
त्रयोदशी ततो ज्ञेयास्ततः प्रोक्ता चतुर्दशी ॥ ५७ ॥
पौर्णिमा शुक्लपक्षे सा कृष्णपक्षेत्वमा स्मृता ।
अन्योन्यं चंद्रसूर्यौ तौ यदा तद्दर्श उच्यते ॥ ५८ ॥

तिथि तीस आहेत. १ प्रतिपदा, २ द्वितीया, ३ तृतीया, ४ चतुर्थी, ५ पंचमी, ६ षष्ठी, ७ सप्तमी, ८ अष्टमी, ९ नवमी, १० दशमी, ११ एकादशी, १२ द्वादशी, १३ त्रयोदशी, १४ चतुर्दशी, १५ पौर्णिमा आणि ३० अमावास्या. पौर्णिमेच्या पुढल्या म्हणजे सोळाव्या तिथीस षोडशी किंवा सत्राव्या तिथीस सप्तदशी अशीं नांवें नसून प्रतिपदा, द्वितीया असेंच म्हणण्याची चाल आहे. तिसाव्या तिथीस मात्र अमावास्या, सूर्यचंद्रसंगम किंवा दर्श म्हणतात.

तिथींची उपपत्ति.

अर्काद्विनिःसृतः प्राचीं यद्यात्यहरहः शशी ।
तच्चांद्रमानमंशैस्तु ज्ञेया द्वादशभिस्तिथिः ॥ ५९ ॥

तिथी ह्या मुख्यत्वेंकरून चंद्राच्या गतीवर अवलंबून आहेत. चंद्र व सूर्य हे महिन्यांतून एकदां एके ठिकाणीं जमतात. ज्या दिवशीं ते एकत्र असतात त्या दिवसास अमावास्या म्हणतात. अमा म्हणजे एकत्र आणि वस् म्हणजे राहणें असा अमावास्येचा अर्थ आहे. चंद्र आणि सूर्य एकत्र मिळाल्यानंतर दोघेही चालत असतात. चंद्राची गति सूर्यापेक्षां फार शीघ्र असल्यामुळें चंद्र नेहमीं सूर्यापुढें जात असतो. प्रत्येक बारा अंश सूर्यापुढें जाण्यास चंद्रास लागणारा जो काळ त्याच तिथी होत. उदाहरणार्थ, अमावास्येस चंद्रसूर्य एके ठिकाणीं जमून नंतर दोघेही चालूं लागले असें समजा. चंद्र वेगगतीनें सूर्यापुढें जाऊं लागला कीं, पहिल्या तिथीस म्हणजे प्रतिपदेस आरंभ झाला. पूर्ण बारा अंश सूर्यापुढें चंद्र गेला कीं प्रतिपदा संपली. बारा अंशांच्या पलीकडे गेला कीं द्वितीयेस आरंभ झाला, व हे दुसरे बारा अंश संपले कीं द्वितीया संपून तृतीयेस आरंभ झाला. याप्रमाणें इतर तिथींचें जाणावें. एका तिथीचे बारा अंश म्हणजे ३० तिथींचे ३६० अंश होतात. तिथींचा संबंध आरंभस्थानाशीं नसल्यामुळें सायन व निरयण तिथि सारख्या असतात.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

तिथींच्या संज्ञा.

नंदा च भद्रा च जया च रिक्ता पूर्णेति सर्वास्तिथयः क्रमात्स्युः ।
कनिष्ठमध्येष्ट फलास्तु शुक्लेकृष्णे भवंत्युत्तममध्यहीनाः ॥ ६० ॥

नंदा, भद्रा, जया, रिक्ता आणि पूर्णा, अशा तिथींच्या पांच संज्ञा आहेत. ह्याच संज्ञा प्रतिपदेपासून अनुक्रमें पुनः पुनः येतात. जसें, प्रतिपदा, षष्ठी, एकादशी ह्या नंदा तिथि होत. द्वितीया, सप्तमी, द्वादशी ह्या भद्रा तिथि होत. तृतीया, अष्टमी, त्रयोदशी ह्या जया तिथि होत. चतुर्थी, नवमी, चतुर्दशी ह्या रिक्ता आणि पंचमी, दशमी आणि पौर्णिमा ह्या पूर्णा तिथि होत. शुक्लपक्षांतील प्रतिपदेपासून पंचमीपर्यंत पांच तिथि कनिष्ठ, षष्ठीपासून दशमीपर्यंत पांच तिथि मध्यम व शुक्ल एकादशीपासून पूर्णिमेपर्यंत पांच तिथि उत्तम होत. तसेंच, कृष्णपक्षांतील पहिल्या पांच तिथि उत्तम, षष्ठीपासून पांच मध्यम आणि एकादशीपासून पांच कनिष्ठ होत. हा नियम कोणत्याही महिन्यांतील तिथींविषयीं जाणावा.

शुभाशुभ तिथि.

द्वितीया पंचमी चैव तृतीया सप्तमी तथा ।
दशम्येकादशी कृष्णा प्रतिपच्च त्रयोदशी ॥ ६१ ॥
पौर्णिमा तिथयो ह्येताः सर्वकार्यशुभावहाः ।
अन्यास्तु तिथयो नेष्टाः प्रोक्तकृत्यशुभा मताः ॥ ६२ ॥

वर सांगितलें आहे त्याशिवाय शुक्ल व कृष्ण पक्षांतील द्वितीया, तृतीया, पंचमी, सप्तमी, दशमी, एकादशी, प्रतिपदा (ही फक्त कृष्णपक्षांतील), त्रयोदशी आणि पौर्णिमा ह्या तिथि सामान्यतः सर्व शुभ कार्यांना उक्त आहेत. यांशिवाय बाकी ज्या तिथि राहिल्या त्या म्हणजे चतुर्थी, षष्ठी, अष्टमी, नवमी, द्वादशी, चतुर्दशी आणि अमावास्या ह्या अशुभ तिथि होत. ह्यांना पक्षरंध्र तिथि म्हणतात. ह्या सर्व शुभकृत्यांसाठीं त्याज्य आहेत. तथापि संकटकाळीं पुढें सांगितल्याप्रमाणें आरंभींच्या कांहीं घटिका सोडून ह्या तिथींवर शुभकृत्यें करावीं. केवळ संपूर्ण तिथीचा त्याग न केला तरी चालेल.

अशुभ तिथींच्या त्याज्य घटिका.

४ ६ ८ ९ १२ १४
वेदषट्वसुनंदार्कशक्रेषु तिथिषु त्यजेत् ।
८ ९ १४ २५ १० ५
वसुनंदेंद्रतत्त्वाशापंचनाड्यः क्रमात्सदा ॥ ६३ ॥
कृष्णा चतुर्दशी शुक्ला प्रतिपद्दर्शसंज्ञिकाः ।
एताः शुभेषु कार्येषु वर्जनीयाः प्रयत्नतः ॥ ६४ ॥

चतुर्थी, षष्ठी, अष्टमी, नवमी, द्वादशी आणि शुक्ल चतुर्दशी ह्या तिथींवर कोणतेंही कृत्य करावयाचें असेल तर, त्या तिथींच्या अनुक्रमानें पहिल्या आठ, नऊ,

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

चवदा, पंचवीस, दहा आणि पांच घटिका सोडाव्या. म्हणजे चतुर्थीच्या आरंभापासून पहिल्या आठ घटिका, षष्ठीच्या नऊ घटिका, अष्टमीच्या चवदा घटिका, नवमीच्या पंचवीस, द्वादशीच्या दहा आणि चतुर्दशीच्या (शुक्ल) पांच घटिका सोडून बाकी राहिलेल्या तिथींवर शुभकृत्यें करावीं. कांहीं ऋषि सर्व पक्षरंध्र तिथींच्या प्रारंभाच्या केवल दहा घटिका मात्र सोडाव्या असें म्हणतात. कृष्णपक्षांतील चतुर्दशी, शुक्ल प्रतिपदा आणि अमावास्या ह्या तिथि मात्र संपूर्ण वर्ज्य कराव्या.

कुहू व सिनीवाली तिथि.

राकानुमत्याविति पौर्णमास्यौ रात्रिंद्युदृष्टेंदुवशाद्भवेताम् ।
कुहूः सिनीवाल्यपि नष्ट दृष्ट-चंद्रे स्मृते चासितपंचदश्यौ ॥ ६५ ॥

ज्या पूर्णिमेला रात्रींच चंद्रोदय होतो तिला राका म्हणतात, आणि ज्या पूर्णिमेला दिवसा चंद्रोदय असतो तिला अनुमति अशी संज्ञा आहे; त्याचप्रमाणें ज्या अमावास्येमध्यें चंद्रदर्शन होत नाहीं तिला कुहू आणि ज्या अमावास्येंत चंद्रदर्शन घडतें तिला सिनीवाली म्हणतात.

तिथींची क्षयवृद्धि.

मागें सांगितलें आहे कीं, चांद्रवर्षाचे दिवस ३५४ असतात, व तिथि ३६० असतात. याचा अर्थ असा कीं, ३५४ दिवसांत ३६० तिथि भुक्त होतात. म्हणजे सहा तिथींचें अंतर क्षयवृद्धि होऊन निघून जातें. ज्या वेळेस तिथींचें प्रमाण साठ घटिकांपेक्षां ज्यास्त असतें, त्या वेळेस तिथीची वृद्धि होते व साठ घटिकांपेक्षां कमी असतें त्या वेळेस तिथीचा क्षय होतो असें समजतात. वृद्धि म्हणजे वाढणें आणि क्षय म्हणजे कमी होणें.

वृद्धीचें उदाहरण. प्रतिपदा रविवारीं ५७ घटिका आहे असें समजा. म्हणजे रविवारीं सूर्योदयापासून इतका काळ गेल्यानंतर प्रतिपदा संपून द्वितीयेस आरंभ झाला. द्वितीयेचें प्रमाण ६५ घटिका आहे, अशी कल्पना करा. म्हणजे प्रतिपदेनंतर चंद्राला बारा अंश सूर्यापुढें जाण्यास इतका काळ लागला. तेव्हां प्रतिपदा संपल्यानंतर रविवारच्या राहिलेल्या ३ घटिका, सोमवारच्या सर्व दिवसाच्या ६० घटिका व मंगळवारीं सूर्योदयानंतर २ घटिका, अशा एकंदर ६५ घटिका जातील तेव्हां द्वितीया संपेल. या उदाहरणांत सोमवारीं व मंगळवारीं अशी दोन दिवस सूर्योदयीं द्वितीया असल्यामुळें पंचांगांत दोन दिवस लिहिली पाहिजे, म्हणून येथें द्वितीयेची वृद्धि झाली.

क्षयतिथीचें उदाहरण. रविवारीं दोन घटिका प्रतिपदा आहे अशी कल्पना करा. नंतर द्वितीया लागली. द्वितीयेचें प्रमाण फक्त ५४ घटिका आहे, म्हणजे प्रतिपदेनंतर चंद्राला बारा अंश सूर्यापुढें जाण्याला इतकाच काळ पुरला. रविवारीं

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

प्रतिपदेच्या २ घटिका व द्वितीयेच्या ५४ घटिका असा एकंदर सूर्योदयापासून ५६ घटिका काळ गेल्यानंतर म्हणजे दुसऱ्या दिवसाचा सूर्योदय होण्यापूर्वींच तृतीया लागली. या उदाहरणांत रविवारीं प्रतिपदा व सोमवारीं तृतीया लिहावी लागेल. द्वितीया सूर्योदयाला कोणत्याही दिवशीं नव्हती, म्हणून ती पंचांगांत दाखविण्याचें कारण नाहीं. कारण सूर्योदयीं जी तिथि किंवा जें नक्षत्र वगैरे असतें तेंच पंचांगांत दाखवितात. येथें द्वितीयेचा क्षय झाला, म्हणजे द्वितीया मुळींच नाहीं असा अर्थ नव्हे, तर ती सूर्योदयाला मात्र कोणत्याही दिवशीं नव्हती इतकेंच.

तिथींच्या क्षयवृद्धींचा दोष.

तिथीनां त्रितयं वारमेकं स्पृशति यत्र वै ।
अवमं तद्दिनं ज्ञेयं शुभकार्येषु संत्यजेत् ॥ ६६ ॥
वाराणां त्रितयं यत्र तिथिमेकां स्पृशेद्यदा ।
वृद्धिस्पृक् चेति सा ख्याता न ग्राह्या मंगलादिषु ॥ ६७ ॥

कोणत्याही तिथीचा क्षय होतो तेव्हां एका वारीं तीन तिथि असतात. आणि वृद्धि होते तेव्हां तीन वारीं एक तिथि असते. वर क्षयतिथीचें उदाहरण दिलें आहे, त्यांत रविवारीं प्रथम २ घटिका प्रतिपदा, नंतर ५४ घटिका द्वितीया आणि नंतर ४ घटिका तृतीया होती, म्हणजे रविवाराला प्रतिपदा, द्वितीया आणि तृतीया अशा तीन तिथींचा स्पर्श झाला. तसेंच, वृद्धीचें उदाहरण पहा. प्रतिपदा रविवारीं ३ घटिका, सोमवारचा सर्व दिवस आणि मंगळवारच्या २ घटिका याप्रमाणें रविवार, सोमवार आणि मंगळवार अशा तीन वारांना प्रतिपदेचा स्पर्श झाला. म्हणून एका वारीं तीन तिथि किंवा तीन वारीं एक तिथि असा तिहींचा संबंध असल्यामुळें धर्मशास्त्रकारांनीं क्षयवृद्धींचे दिवस शुभकार्याला वर्ज्य मानिले आहेत. 'तथापि सबले भानौ लाभस्थे वा तथा विधौ' या वचनाप्रमाणें बलवान् सूर्य किंवा बलिष्ठ चंद्र एकादश स्थानांत असेल तर क्षयतिथींचा आणि वृद्धितिथींचा दोष नाहींसा होतो. एक्यावारीं तीन तिथि आल्या म्हणजे त्या अवम तिथि होत. तसेंच, एक तिथि तीन वारीं सूर्योदय समयीं असतां तिला त्रिद्युस्पृक् तिथि म्हणतात.

वार.

आदित्यश्चंद्रमा भौमो बुधश्चाथ बृहस्पतिः ।
शुक्रः शनैश्चरश्चैव वासराः परिकीर्तिताः ॥ ६८ ॥
गुरुश्चंद्रो बुधः शुक्रः शुभा वाराः शुभे स्मृताः ।
क्रूरास्तु क्रूरकृत्येषु ग्राह्या भौमार्कसूर्यजाः ॥ ६९ ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

वारदोषाश्च ये प्रोक्ता रात्रौ न प्रभवंति ते ।
शनिभौमार्कवारेषु विशेषादिति केचन ॥ ७० ॥

'उदयादुदयं वारः' म्हणजे एका सूर्योदयापासून दुसऱ्या सूर्योदयापर्यंत मध्यें जाणारा जो काळ त्यास वार अशी संज्ञा आहे. हे वार सात आहेत. त्यांचीं नांवें येणेंप्रमाणें–१ आदित्यवार, रविवार किंवा भानुवार, २ सोमवार, इंदुवार किंवा चंद्रवार, ३ मंगळवार किंवा भौमवार, ४ बुधवार किंवा सौम्यवार, ५ बृहस्पतिवार किंवा गुरुवार, ६ शुक्रवार किंवा भृगुवार, ७ शनिवार किंवा मंदवार. पृथ्वीवर सर्व देशांत सातच वार असून ते याच अर्थांचे आहेत. एके ठिकाणीं जो वार असेल, तोच पृथ्वीवर कोठेंही गेलें तरी असेल. वाराला वासर असेंही म्हणतात. वर लिहिलेल्या सात वारांपैकीं सोमवार, बुधवार, गुरुवार आणि शुक्रवार हे चार वार सर्व कार्यांस साधारणपणें शुभ मानिलेले आहेत. मंगळ आणि शनि हे क्रूर वार आहेत, म्हणून त्या वारांवर क्रूर कृत्यें मात्र करावीं. उदाहरणार्थ, शिकार करणें, शस्त्रप्रयोग, भेद, युद्ध इत्यादि. दुष्ट वाराचा दोष रात्रीं नसतो. शनि, भौम आणि रवि हे जरी क्रूर वार आहेत तरीही त्यांचा रात्रीं दोष नाहीं, असें कित्येक ग्रंथकार म्हणतात.

वारांच्या नांवांची उत्पत्ति.

शनिर्जीवः कुजश्चैव रविः शुक्रबुधेन्दवः ।
एवं क्रमेण विज्ञेयाः कालहोरेश्वरा ग्रहाः ॥ ७१ ॥

दिवसाच्या प्रथम होऱ्याचें जें नांव तेंच त्या वाराचें नांव असतें. याचा स्पष्टार्थ असा आहे कीं, वारांवर ग्रहांचें अधिपतित्व आहे. अहोरात्राचे २४ विभाग कल्पून कित्येक विभागास होरा अशी संज्ञा दिलेली आहे. येथें समजुतीकरितां आपण होऱ्याला पाहिजे तर तास किंवा कलाक म्हणूं. पृथ्वीसभोंवतीं फिरणारे सात ग्रह हे त्या चोवीस तासांचे किंवा होऱ्यांचे अधिपति मानिलेले आहेत. त्यांचा क्रम वरील श्लोकांत दिल्याप्रमाणें प्रथम शनि, नंतर त्याच्या खालीं अनुक्रमानें गुरु, मंगळ, रवि, शुक्र, बुध आणि चंद्र असा आहे. याच सात ग्रहांचे पुनः पुनः फेरे होतात. म्हणजे ग्रह ७ आणि अहोरात्राचे होरे २४ म्हणून अहोरात्रांत २४÷७=३ याप्रमाणें सात ग्रहांच्या पुनःपुनः तीन आवृत्त्या होऊन चवथ्या आवृत्तीचे तीन तास शेष राहिले; त्या तीन तासांना चवथ्या आवृत्तीचे तीन ग्रह दिले. अर्थात् चवथ्या फेऱ्याचा चवथा ग्रह, जो उगवत्या दिवसाच्या पहिल्या होऱ्याचा किंवा तासाचा अधिपति असतो, तोच वार होय. उदाहरणार्थ, शनीपासून होऱ्याचा आरंभ मोजावा म्हणजे त्यापासून चवथा रवि येतो, म्हणून शनीच्या पुढील रविवार होय. त्याचप्रमाणें रवीच्या पुढें चवथा चंद्र, चंद्रापासून

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

चवथा मंगल इत्यादि. वारांची उत्पत्ति होऊन सुमारें पांच हजार वर्षे झालीं असावीं, असें विद्वान् ज्योतिष्यांचें म्हणणें आहे. ऋग्वेदासारख्या प्राचीनतम ग्रंथांत ह्याच क्रमानें वारांचीं नांवें आढळलीं तर वारांची उत्पत्ति याहूनही प्राचीन ठरेल.

नक्षत्रप्रकरणं.

सर्वेषु कार्येषुहि शोभनेषु नक्षत्रशुद्धिं मृगयंति पूर्वं ।
यत्कर्मयस्मिन्करणीयमुक्तं तत्तत्रदेयं विदुषाविदित्वा ॥ ७२ ॥

सर्व शुभकृत्यांविषयीं प्रथम नक्षत्रशुद्धि पहावी, म्हणजे ज्या नक्षत्रांवर जें कर्म करणें उक्त आहे, त्याच नक्षत्रांवर तें कर्म करावें. नक्षत्रांचा संबंध आरंभस्थानाशीं आहे, म्हणून सायन व निरयन नक्षत्रें भिन्न असतात.

अश्विनी भरणी चैव कृत्तिका रोहिणी मृगः ।
आर्द्रा पुनर्वसुः पुष्यस्तथाश्लेषा मघा ततः ॥ ७३ ॥
पूर्वाफाल्गुनिका तस्मादुत्तराफाल्गुनी ततः ।
हस्तश्चित्रा तथा स्वाती विशाखा तदनंतरम् ॥ ७४ ॥
अनुराधा ततो ज्येष्ठा ततो मूलं निगद्यते ।
पूर्वाषाढोत्तराषाढा त्वभिजिच्छ्रवणस्ततः ॥ ७५ ॥
धनिष्ठा शततारारख्यं पूर्वाभाद्रपदा ततः ।
उत्तराभाद्रपाच्चैव रेवत्येतानि भानि च ॥ ७६ ॥

'न क्षरति तत् नक्षत्रं' जें ढळत नाहीं तें नक्षत्र. चंद्राच्या गतीचें प्रमाण ठरविण्याकरितां क्रांतिवृत्ताचे सत्तावीस विभाग कल्पिलेले आहेत. त्या विभागांपैकीं प्रत्येक विभाग चालून जाण्यास चंद्रास लागणारा जो काल त्यास नक्षत्र म्हणतात. अमुक दिवशीं अमुक नक्षत्र आहे असें आपण म्हणतों त्याचा अर्थ असा कीं, त्या दिवशीं त्या नक्षत्रांत चंद्र असतो. निरयन पंचांगांतील अश्विनी नक्षत्र म्हणजे रेवती योग तारेपासून क्रांतिवृत्तापैकीं १३⅓ अंश किंवा ८०० कला. (१३⅓×६०=८००) अश्विनी नक्षत्राच्या पुढील १३⅓ अंश म्हणजे भरणी नक्षत्र होय. याच क्रमानें सर्व

---

१ एशियाखंडांतील तुर्कस्थानांत टैग्रिस नदीचे कांठीं मोसल नांवाचें शहर आहे. त्याचे समोरचे बाजूस जमिनींत निनेव्हे (Nineveh) म्हणून शहर सांपडलें, त्या वेळीं तेथें ज्या जुनाट वस्तु सांपडल्या, त्यांत तेथील सार्वजनिक पुस्तकालयांत ज्योतिःशास्त्रावरचा एक ग्रंथ सांपडला. त्याचें नांव "Odsrvations of Bel." म्हणजे "बेल यानें केलेले वेध" असें असून त्याचे ६० भाग आहेत. त्यांवरून असें स्पष्ट दिसतें कीं, रविवारापासून शनिवारापर्यंत ज्या क्रमानें हल्लीं वारांवर ग्रहांचें आधिपत्य आहे, त्याचप्रमाणें त्या वेळीं ख्र० इ० सनापूर्वीं २५०० वर्षांचे सुमारास होतें.

—नि० मा० पत्रव्यवहार.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

नक्षत्रें होतात. तात्पर्य, रेवती योगतारा हें आरंभस्थान मानून क्रांतिवृत्ताचे सारखे २७ भाग पाडले म्हणजे प्रत्येक भाग हींच निरयन नक्षत्रें होत. नक्षत्रें अर्थात् सत्तावीस आहेत. त्यांचीं नांवें:—१ अश्विनी २ भरणी ३ कृत्तिका ४ रोहिणी ५ मृगशीर्ष ६ आर्द्रा ७ पुनर्वसु ८ पुष्य ९ आश्लेषा १० मघा ११ पूर्वा किंवा पूर्वाफाल्गुनी १२ उत्तरा किंवा उत्तराफाल्गुनी १३ हस्त १४ चित्रा १५ स्वाती १६ विशाखा १७ अनुराधा १८ ज्येष्ठा १९ मूळ २० पूर्वाषाढा २१ उत्तराषाढा २२ श्रवण २३ धनिष्ठा २४ शततारका २५ पूर्वाभाद्रपदा २६ उत्तराभाद्रपदा २७ रेवती. तिन्ही पूर्वा, म्हणजे पूर्वा, पूर्वाषाढा आणि पूर्वाभाद्रपदा आणि तिन्ही उत्तरा म्हणजे उत्तरा, उत्तराषाढा आणि उत्तराभाद्रपदा असें समजावें. तिथींची क्षयवृद्धि मागें सांगितली आहे, त्याप्रमाणेंच नक्षत्रांची देखील क्षयवृद्धि कधीं कधीं होते.

अभिजित् म्हणून एक अठ्ठाविसावें नक्षत्र आहे, तें उत्तराषाढा आणि श्रवण यांच्यांमध्यें मोजतात. पंचांगांत रोजचीं जीं चंद्राचीं नक्षत्रें दिलेलीं असतात, त्यांत हें नसतें. याचें कारण असें कीं, चंद्राच्या कक्षेंत म्हणजे भ्रमणमार्गांत हें नसून त्याच्या अगदीं बाहेर म्हणजे उत्तरेकडे आहे. सूर्यनक्षत्रें (ह्यांविषयीं पुढें माहिती सांगितली आहे) जीं पंचांगांत दाखविलेलीं असतात त्यांत हें दाखवितात; परंतु इतर नक्षत्रांतून फिरण्यास सूर्यास जसे तेरा किंवा चवदा दिवस लागतात, त्याप्रमाणें ह्या नक्षत्रांतून सूर्याला जाण्यास इतका काळ न लागतां फक्त चार साडे-चार दिवस पुरतात. म्हणजे अभिजित् नक्षत्राला आरंभ झाल्यापासून सुमारें चार दिवसांनीं दुसरें सूर्यनक्षत्र लागतें.

अभिजित् नक्षत्राचा भोग्य काळ.

वैश्वांत्यपादः श्रुत्याद्यतिथ्यंशश्चाभिजिद्भवेत् ।
यत्राष्टाविंशतिर्भानां गण्योऽयं तत्र नान्यथा ॥ ७७ ॥

वैश्व म्हणजे उत्तराषाढा नक्षत्राचा अंत्य चरण आणि श्रवण नक्षत्राचा पहिला पंधरावा अंश मिळून अभिजित् नक्षत्राचा भोग्य काळ असतो; आणि जेथें अठ्ठावीस नक्षत्रें घेणें असतील तेथेंच अभिजित् नक्षत्र धरावें; अन्यत्र ह्याचें ग्रहण करूं नये.

शुभाशुभ नक्षत्रें.

मघा मृगशिरो हस्तः स्वाती मूलानुराधयोः ।
रोहिणी रेवती चैव उत्तराणां त्रयं तथा ॥ ७८ ॥
आवाहे च विवाहे च कन्यासंवरणे तथा ।
वापयेत्सर्वबीजानि गृहं ग्रामं प्रवेशयेत् ॥ ७९ ॥
पुष्याऽश्विनी तथा चित्रा धनिष्ठा श्रवणं वसुः ।
सर्वाणि शुभकार्याणि सिध्यन्त्येषु च भेषु च ॥ ८० ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मघा, मृग, हस्त, स्वाती, मूळ, अनुराधा, रोहिणी, रेवती, उत्तरा, उत्तराषाढा आणि उत्तराभाद्रपदा अशीं अकरा नक्षत्रें कोणत्याही शुभ कार्याचे आरंभास, विवाहास, कन्या वरण्यास, शेतांत बीं पेरण्यास, कांहीं वस्तु संग्रह करण्यास, गृहप्रवेश आणि ग्रामप्रवेश करण्यास प्रशस्त मानिलेलीं आहेत. तसेंच अश्विनी, पुष्य, चित्रा, धनिष्ठा, श्रवण आणि पुनर्वसु हीं सहा नक्षत्रें देखील शुभ कार्यास उक्त मानिलेलीं आहेत. परंतु त्या नक्षत्रांवर विवाह मात्र करूं नये. यांशिवाय राहिलेल्या नक्षत्रांपैकीं तिन्ही पूर्वा, ज्येष्ठा, आर्द्रा आणि शततारका हीं मध्यम नक्षत्रें होत. आणि भरणी, कृत्तिका, आश्लेषा हीं तीन नक्षत्रें अत्युग्र होत. म्हणून हीं अत्युग्र नक्षत्रें शुभ कार्यांना सर्वथा वर्ज्य करावीं.

नक्षत्रांच्या विशेष संज्ञा.

स्थिरनक्ष० ध्रुवस्थिरमिति ख्यातं रोहिणी चोत्तरात्रयम् ।
तत्रामरगृहग्रामाभिषेकाद्याः स्थिरक्रियाः ॥ ८१ ॥
चरनक्ष० श्रवणादित्रिभं स्वाती पुनर्वसु चरं चलम् ।
तस्मिन्वाजिगजारोहो वाटिका गमनादिकम् ॥ ८२ ॥
मृदुनक्ष० मृगश्चित्रानुराधा च रेवती मृदुमैत्रकम् ।
तत्र गीतांबरक्रीडा मित्रकार्यविभूषणम् ॥ ८३ ॥
लघुनक्ष० पूषाश्विन्यभिजिद्धस्तं लघुक्षिप्रमुदाहृतं ।
तस्मिन्पण्यरतिज्ञानं भूतौषधकलादिकं ॥ ८४ ॥
क्रूरनक्ष० क्रूरमुग्रमिति ख्यातं त्रिपूर्वा भरणी मघा ।
विषशस्त्राग्निघातादि तत्रच्छेदविनाशनं ॥ ८५ ॥
दारुणनक्ष० ज्येष्ठार्द्रामूलमाश्लेषा तीक्ष्णं दारुणमुच्यते ।
तत्र भेदो वधो बंधो मंत्रभूतादिसाधनं ॥ ८६ ॥
मिश्रनक्ष० विशाखा कृत्तिका द्वाभ्यां मिश्रं साधारणं स्मृतं ।
वृषोत्सर्गोग्निकार्यं च मिश्रं तत्र च सिध्यति ॥ ८७ ॥

ध्रुव किंवा स्थिर नक्षत्रें:—रोहिणी आणि तिन्ही उत्तरा म्हणजे उत्तरा, उत्तराषाढा आणि उत्तराभाद्रपदा अशा चार नक्षत्रांना ध्रुव किंवा स्थिर नक्षत्रें म्हणतात. ह्या नक्षत्रांवर देवालय किंवा घर बांधणें, नवा गांव वसविणें राज्याभिषेक, बागबगीचा करणें इत्यादि कृत्यें करावीं. तात्पर्य, फार दिवस टिकलीं पाहिजेत अशीं सर्व कार्यें स्थिरनक्षत्रांवर करावीं.

चर किंवा चल नक्षत्रें:—श्रवण, धनिष्ठा, शततारका, स्वाती आणि पुनर्वसु, ह्या नक्षत्रांवर घोडा, हत्ती, इत्यादि वाहनांवर बसणें, उपवनांत विहारार्थ जाणें, इत्यादि कृत्यें करावीं.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मृदु किंवा मैत्र नक्षत्रें:—मृग, चित्रा, अनुराधा आणि रेवती ह्यांवर गायन, क्रीडा, वस्त्रालंकार, मित्रकार्य, इत्यादि कृत्यें करावीं.

लघु किंवा क्षिप्र नक्षत्रें:—पुष्य, अश्विनी, अभिजित् आणि हस्त; ह्यांवर वस्तूंची देवघेव करणें, मंत्रतंत्र शिकणें, चित्रें काढणें, इत्यादि कृत्यें करावीं.

क्रूर किंवा उग्र नक्षत्रें:—तिन्ही पूर्वा, भरणी आणि मघा; ह्यांवर शाठ्य किंवा क्रूर कृत्यें करावीं.

तीक्ष्ण किंवा दारुण नक्षत्रें:—ज्येष्ठा, आर्द्रा, आश्लेषा आणि मूळ; ह्यांवर जारणमारणकलहादि कृत्यें करावीं.

मिश्र किंवा साधारण नक्षत्रें:—विशाखा आणि कृत्तिका; ह्यांवर वृषोत्सर्ग, अग्निहोत्रादि कृत्यें करावीं.

यांशिवाय नक्षत्रांना ऊर्ध्वमुख, अधोमुख, अंधलोचन, मध्यलोचन; इत्यादि दुसऱ्या संज्ञा आहेत, त्यांविषयीं माहिती सांगतो.

ऊर्ध्वमुखाधोमुखादि नक्षत्रें.

त्र्युत्तरा रोहिणी चैव पुष्यार्द्रा श्रवणत्रयम् ।
एतान्यूर्ध्वमुखान्यत्र प्रासादगृहतोरणम् ॥ ८८ ॥
मूलाश्लेषामघापूर्वा विशाखा भरणीद्वयम् ।
अधोमुखानि भान्यत्र वापीकूपादि सिध्यति ॥ ८९ ॥
पुनर्वस्वनुराधाख्यं ज्येष्ठा हस्तत्रयं मृगः ।
रेवतीद्वितयं तिर्यग्वक्रमत्र रथादिकान् ॥ ९० ॥

ऊर्ध्वमुख नक्षत्रें:—तिन्ही उत्त०, रोहि०, पुष्य, आर्द्रा, श्रव०, धनि०, शतता०.

अधोमुख नक्षत्रें:—मूळ, आश्ले०, मघा, तिन्ही पूर्वा, विशा० भर०, कृत्तिका.

तिर्यङ्मुख नक्षत्रें:—पुनर्वसु, अनुराधा, ज्येष्ठा, हस्त, चित्रा, स्वाती, मृग, रेवती, अश्विनी.

ऊर्ध्वमुख नक्षत्रांवर घर, वाडा, देवालय वगैरे बांधणें; अधोमुख नक्षत्रांवर विहिरी, तळीं वगैरे खणणें आणि तिर्यङ्मुख नक्षत्रांवर गाडी, घोडा घेणें, नांगर करणें, वगैरे कृत्यें करावीं.

नक्षत्रांच्या लोचनसंज्ञा.

अंधकं मंदनेत्रं च मध्यचक्षुः सुलोचनम् ।
रोहिणी गणयेत् पूर्वं साभिजिच्च पुनः पुनः ॥ ९१ ॥

हीं नक्षत्रें समजण्याची अशी रीति आहे कीं, रोहिणीनक्षत्रापासुन मोजण्यास आरंभ करावा; जसें, प्रथम रोहिणी हें अंधलोचन, मृग हें मंदलोचन, नंतर

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आर्द्रा हें मध्यलोचन आणि शेवटीं पुनर्वसु हें सुलोचन; ह्याच क्रमानें पुनः पुनः मोजीत जावें. हीं नक्षत्रें मोजतांना अभिजित् नक्षत्रसुद्धां मोजावें. खालीं ह्या नक्षत्रांचें कोष्टक दिलें आहे त्यावरून सर्व नक्षत्रांच्या लोचनसंज्ञा स्पष्ट कळतील.

अंधनक्षत्रें.	मंदनक्षत्रें.	मध्यलोचननक्षत्रें.	सुलोचननक्षत्रें.
रोहिणी.	मृग.	आर्द्रा.	पुनर्वसु.
पुष्य.	आश्लेषा.	मघा.	पूर्वा.
उत्तरा.	हस्त.	चित्रा.	स्वाती.
विशाखा.	अनुराधा.	ज्येष्ठा.	मूळ.
पूर्वाषाढा.	उत्तराषाढा.	अभिजित्.	श्रवण.
धनिष्ठा.	शततारका.	पूर्वाभाद्रपदा.	उत्तराभाद्रपदा.
रेवती.	अश्विनी.	भरणी.	कृत्तिका.

पुष्यनक्षत्रवर्णन.

सिंहो यथा सर्वचतुष्पदानां तथैव पुष्यो बलवानुडूनां ॥
चन्द्रे विरुद्धेऽप्यथ गोचरेऽपि सिध्यन्ति कार्याणि कृतानि पुष्ये ॥९२॥

ज्याप्रमाणें सर्व चतुष्पाद जनावरांत सिंह बलवान् अतएव श्रेष्ठ आहे, त्याप्रमाणें सर्व नक्षत्रांत पुष्यनक्षत्र श्रेष्ठ आहे. कोणत्याही कार्यसमयीं चवथा, आठवा किंवा बारावा, असा जरी स्वराशीला अनिष्ट चंद्र असेल, आणि त्या दिवशीं पुष्यनक्षत्र असेल, तरी अनिष्ट चंद्रामुळें कार्यास कोणत्याही प्रकारचें विघ्न न येतां पुष्यनक्षत्राच्या योगानें निश्चयपूर्वक कार्यसिद्धि होते. पण 'विहाय पाणिग्रहमेव पुष्यः' या वचनाप्रमाणें पुष्यनक्षत्र विवाहाला मात्र अनिष्ट मानिलेलें आहे.

सूर्यनक्षत्रें.

पंचांगांत प्रत्येक तिथीस जीं नक्षत्रें लिहिलेलीं असतात, तीं चंद्राचीं नक्षत्रें आहेत; म्हणजे त्या नक्षत्रांजवळ त्या दिवशीं चंद्र असतो. ह्या नक्षत्रांस दिन किंवा दिवसनक्षत्रें असें आपण म्हणतों. जशीं हीं चंद्राचीं, तशींच सूर्याचीं नक्षत्रें आहेत. सर्व नक्षत्रांतून सूर्य एका वर्षांत एकदां फिरतो. एका नक्षत्रांतून फिरण्यास सूर्याला तेरा किंवा चवदा दिवस लागतात, म्हणजे सुमारें तेरा चवदा दिवसांनीं प्रत्येक सूर्यनक्षत्र बदलतें. सूर्यनक्षत्राला महानक्षत्र असेंही नांव आहे. पंचांगांत सर्व कोष्टकांच्या बाहेर 'भरण्यर्कः' 'कृत्तिकार्कः' 'मृगार्कः' 'पुष्यार्कः' 'उत्तरार्कः' वगैरे जीं नक्षत्रें लिहिलेलीं असतात, तींच सूर्यनक्षत्रें होत. ह्या नक्षत्रांपैकीं ज्या नक्षत्रांजवळ सूर्य आला म्हणजे पाऊस पडतो, त्या नक्षत्रांस पावसाचीं नक्षत्रें असें म्हणतात. तीं आर्द्रापासून चित्रापर्यंत नऊ आहेत. कोणी

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मृगापासून हस्तापर्यंत नऊ धरितात. हीं नऊ सूर्यनक्षत्रें मात्र पावसामुळें शेतकरी वगैरे सर्व लोकांस ठाऊक असतात. मृगनक्षत्र ज्या वारीं असतें, त्याच वारीं बहुतकरून पावसाचीं सर्व पुढील नक्षत्रें असतात.

ह्या पावसाच्या नऊ नक्षत्रांविषयीं अशी एक आख्यायिका आहे कीं, एका गृहस्थानें सत्तावीस नक्षत्रें मनांत आणून एका मुलाला विचारिलें, कीं सत्ताविसांतून नऊ गेले तर बाकी काय राहील? मुलानें, बाकी अठरा राहील, असें बरोबर उत्तर दिलें. तथापि तो गृहस्थ म्हणाला, "मुला, तूं चुकलास." नंतर त्या गृहस्थानें मुलाला समजावून सांगितलें. तो म्हणाला, "मुला, सत्ताविसांतून नऊ गेले तर बाकी मृत्तिका राहिली." याचा अर्थ असा कीं, सत्तावीस नक्षत्रांतून पावसाचीं नऊ नक्षत्रें फुकट गेलीं, म्हणजे जर पाऊस पडला नाहीं, तर जगांत मातीवांचून दुसरें काय सांपडणार!

दिवसनक्षत्र काढण्याची रीति.

चैत्रादि द्विगुणं कृत्वा मिश्रितं तिथयो गताः।
कारयेत् त्रीणि हीनं च शेषं दिवसभं ध्रुवं ॥ ९३ ॥

ज्या महिन्यांतील नक्षत्र पाहिजे असेल त्या महिन्यासुद्धां चैत्रापासून सर्व महिने मोजून त्यांची दुप्पट करावी; अधिक महिना असेल तर तोही मोजावा. नंतर ज्या तिथीचें नक्षत्र आपणास पाहिजे असेल, त्या तिथीचे अंक, महिन्याच्या दुप्पट केलेल्या अंकांत मिळवावे. कृष्णपक्षांतील तिथि असेल तर त्या तिथींत शुक्ल पक्षांतील पंधरा तिथी मिळवून नंतर ते अंक महिन्याच्या दुप्पट केलेल्या अंकांत मिळवावे. त्या बेरजेंतून तीन वजा करावे. बाकी जो अंक राहील तें नक्षत्र जाणावें. बाकी राहिलेला अंक सत्ताविसांपेक्षां जास्त असेल तर त्यांतून सत्तावीस वजा करून जो अंक राहील, तें नक्षत्र समजावें. ही रीति सुमाराची असल्यामुळें ह्या रीतीनें कधींकधीं सुमारें पाव नक्षत्राचा म्हणजे पंधरा-वीस घटिकांचा फरक पडेल. परंतु हा फरक ज्या तिथीचें नक्षत्र पाहिजे असेल त्या तिथीपूर्वीं त्या महिन्यांत एकाद्या तिथीची किंवा चालू नक्षत्रमालेपैकीं म्हणजे अश्विनी नक्षत्रापासून एकाद्या नक्षत्राची क्षयवृद्धि असेल तरच बहुधा पडतो. अशा वेळेस तिहींच्या जागीं दोन वजा केले तर हा फरक प्रायः पडत नाहीं; तथापि ही रीति स्थूल मानाची आहे, हें ध्यानांत ठेवावें.

नक्षत्रांचे स्वामी.

नासत्यांतकवह्निधातृशशभृद्रुद्रादितीज्योरगा
ऋक्षेशाः पितरो भगोर्यमरवित्वष्ट्राशुगाश्च क्रमात्।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

शक्राग्नी खलु मित्रशक्रनिर्ऋतिनीरंच विश्वे विधि-
गोविंदो वसु तोयपाजचरणाऽहिर्बुध्न्यपूषाभिधाः ॥ ९४ ॥

वरील श्लोकांत अश्विनीपासून रेवतीपर्यंत सत्तावीस नक्षत्रांचे स्वामी अनुक्रमें सांगितलेले आहेत ते येणेंप्रमाणेः—

नक्षत्रें—स्वामी	नक्षत्रें—स्वामी	नक्षत्रें—स्वामी	नक्षत्रें—स्वामी
अश्विनी—नासत्य	पुष्य—गुरु	स्वाती—वायु	अभिजित्—विधि
भरणी—यम	आश्लेषा—सर्प	विशाखा—इंद्राग्नी	श्रवण—विष्णु
कृत्तिका—अग्नि	मघा—पितर	अनुराधा—मित्र	धनिष्ठा—वसु
रोहिणी—धाता	पूर्वा—भग	ज्येष्ठा—इंद्र	शततारका—वरुण
मृग—चंद्र	उत्तरा—अर्यमा	मूळ—राक्षस	पू०भा.—अजचरण
आर्द्रा—रुद्र	हस्त—रवि	पू० षाढा—जल	उ०भा.—अहिर्बुध्न्य
पुनर्वसु—अदिति	चित्रा—त्वष्टा	उ०षाढा—विश्वेदेव	रेवती—पूषा

एकाद्या ठिकाणीं नक्षत्रांच्या नांवांचा उपयोग न करितां त्यांच्या स्थानीं त्यांच्या स्वामींच्या नांवांनींही नक्षत्रें व्यक्त करण्याचा परिपाठ आहे. जसें, आश्लेषाबद्दल सर्प, रेवतीबद्दल पूषा इत्यादि.

नक्षत्रांच्या तारा.

वह्नि त्रिऋत्विषु गुणेंदु कृताग्निभूत
बाणाश्विनेत्रशरभूकुयुगाब्धिरामाः ।
रुद्राब्धिराम गुण वेद शतद्वियुग्म
दंताः बुधैर्निगदिताः क्रमशोभतारा: ॥ ९५ ॥

अभिजित् नक्षत्रासहित अश्विनी भरणी आदिकरून जीं अठ्ठावीस नक्षत्रें त्यांच्या तारांची संख्या क्रमानें खालीं दिल्या आहेत. जसें, अश्विनीच्या तीन तारा भरणीच्या ३ कृत्तिकाच्या ६ या क्रमानें सर्व नक्षत्रांच्या तारा जाणाव्या.

३।३।६।५।३।१।४।३।५।५।२।२।५।१।१।४।४।३।११।४।३।३।३।४।१००।२।२।३२

नक्षत्रांच्या तारांचें फल.

नक्षत्रजमुद्वाहे फलमब्दैस्तारकामितैः सदसत् ।
दिवसैर्ज्वरस्य नाशोव्याधेरन्यस्य वा वाच्यः ॥ ९६ ॥

विवाहादि कार्यांमध्यें जें नक्षत्र घेतलें असेल, त्या नक्षत्रा संबंधानें जें काहीं बरें वाईट फल सांगितलें असेल तें फल त्या नक्षत्राच्या जितक्या तारा असतील तितक्या वर्षांनीं प्राप्त होतें. तसेंच, एकाद्या नक्षत्रावर ज्वरादिरोग उत्पन्न झाल्यास त्या रोगाचा नाश, नक्षत्राच्या जितक्या तारा असतील, तितक्या दिवसांनीं होईल असें जाणावें.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

नक्षत्रांच्या संज्ञा, स्वामीस्वरूप इ० कोष्टक.

अनुक्रमं.	नक्षत्रांची नांवें.	शुभाशुभ संज्ञा.	स्वामीचीं नांवें.	मुखसंज्ञा.	रूपसंज्ञा.	लोचन संज्ञा.	आकृति.	ताऱ्यांची संख्या.
१	अश्विनी	शुभ	अश्वि.कु.	तिर्यङ्मु.	लघु,क्षिप्र	मंदलो.	अश्वमुख	३
२	भरणी	नाशक	यम	अधोमु.	उग्र,क्रूर	मध्यलो.	योनिरूप	३
३	कृत्तिका	कार्यनाश	अग्नि	अधोमु.	मिश्र,साधारण	सुलोचन.	घो. खुर	६
४	रोहिणी	सिद्धि	ब्रह्मा	ऊर्ध्वमु.	ध्रुव,स्थिर	अंधलो.	रथाकृति	५
५	मृगशीर्ष	शुभ	चंद्र	तिर्यङ्.	मृदु,मैत्र	मंदलो.	हरिणाकृ.	३
६	आर्द्रा	शुभ	शिव	ऊर्ध्वमु.	तीक्ष्ण,दारुण	मध्यलो.	मणिसम	१
७	पुनर्व०	मध्यम	देवमाता	तिर्यङ्मु.	चर,चल	सुलो.	गृहाकार	४
८	पुष्य	शुभ	गुरु	ऊर्ध्वमु.	लघु,क्षिप्र	अंधलो.	शरासम	३
९	आश्ले०	शोक	सर्प	अधोमु.	तीक्ष्ण,दारुण	मंदलो.	चक्राकार	५
१०	मघा	नाशक	पितर	अधोमु.	उग्र,क्रूर	मध्यलो.	शालासम	५
११	पूर्वा	मृत्युप्रद	भगः	अधोमु.	उग्र,क्रूर	सुलोच.	शय्यासम	२
१२	उत्तरा	विद्या	अर्यमा	ऊर्ध्वमु.	ध्रुव,स्थिर	अंधलो.	पर्यंकासम	२
१३	हस्त	लक्ष्मी	रवि	तिर्यङ्मु.	लघु,क्षिप्र	मंदलो.	हस्तासम	५
१४	चित्रा	शुभदा.	त्वष्टा	तिर्यङ्मु.	मृदु,मैत्र	मध्यलो.	मौक्तिक	१
१५	स्वाती	अशुभ	वायु	तिर्यङ्मु.	चर,चल	सुलोच.	पोंवळ्या.	१
१६	विशाखा	अशुभ	इंद्राग्नी	अधोमु.	मिश्र,साधारण	अंधलो.	तोरणाकार	४
१७	अनुरा०	सिद्धि	मित्र	तिर्यङ्मु.	मृदु,मैत्र	मंदलो.	राशीसम	४
१८	ज्येष्ठा	क्षय	इंद्र	तिर्यङ्मु.	तीक्ष्ण,दारुण	मध्यलो.	कुंडलाकृ.	३
१९	मूळ	नाशप्र०	राक्षस	अधोमु.	तीक्ष्ण,दारुण	सुलोच.	सिंहासम	११
२०	पू.षाढा	अर्थना०	उदक	अधोमु.	उग्र,क्रूर	अंधलो.	शय्यासम	४
२१	उ.षाढा	बुद्धिदा.	विश्वेदेव	ऊर्ध्वमु.	ध्रुव,स्थिर	मंदलो.	हस्तिदन्त	३
२२	अभिजि.	बुद्धिदा.	ब्रह्मा	सर्वतो.	लघु,क्षिप्र	मध्यलो.	कोल्हास.	३
२३	श्रवण	सुखप्रद	विष्णु	ऊर्ध्वमु.	चर,चल	सुलोच.	वामनास.	३
२४	धनिष्ठा	शुभदा	वसु	ऊर्ध्वमु.	चर,चल	अंधलो.	ढोलक्या.	४
२५	शतता०	कल्याणी	वरुण	ऊर्ध्वमु.	चर,चल	मंदलो.	वर्तुलाका.	१००
२६	पू.भाद्र०	मृत्युदा.	अजैकपा.	अधोमु.	उग्र,क्रूर	मध्यलो.	यमलाका.	२
२७	उ.भाद्र०	लक्ष्मी	अहिर्बु.	ऊर्ध्वमु.	ध्रुव,स्थिर	सुलो.	मंचका.	२
२८	रेवती	कामदा	पूषा	तिर्यङ्मु.	मृदु,मैत्र	अंधलो.	मृदंगा.	३२

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

जन्मनक्षत्रादिकांवरून शुभाशुभ.

जन्मर्क्षमाद्यं दशमं च कर्मभं सांघातिकं षोडशभं च मानसं।
स्यात्पंचविंशं समुदायमष्टादशं त्रयोविंशतिभं विनाशकं ॥ ९७ ॥
एवं षड्भो जनः सर्वो देशजात्यभिषेकभैः।
नवभो नृपतिर्ज्ञेयो नाडी ताराः स्मृता अमूः ॥ ९८ ॥
एतासु नवसु प्राप्तैः क्रूरैरशुभसंभवः।
सौम्यग्रहेण युक्तिश्चेद्विपरीतं फलं भवेत् ॥ ९९ ॥

जन्म नक्षत्र, तसेंच त्यापासून दहावें तें कर्मनक्षत्र, जन्मनक्षत्रापासून सोळावें नक्षत्र तें संघात नक्षत्र, अठरावें समुदाय नक्षत्र, तेविसावें विनाश नक्षत्र आणि पंचविसावें मानस नक्षत्र; हीं सहा नक्षत्रें सर्वांनींच मंगलकार्यांस वर्ज्य करावीं. या शिवाय राजानें देश नक्षत्र, जाति नक्षत्र व अभिषेक नक्षत्र हीं तीन आणि पूर्वोक्त सहा नक्षत्रें, अशीं नऊ नक्षत्रें शुभकार्यांस वर्ज्य करावीं. हीं नऊ नक्षत्रें नाडीनक्षत्रें मानिलीं आहेत; आणि या नऊ नक्षत्रांवर पापग्रह असतां दुःख व शुभग्रह असतां सुख प्राप्त होतें. इतरांनीं सहा नक्षत्रेंच वर्जावीं.

योगविचार.

योग म्हणजे चंद्रसूर्यांच्या राश्यादि स्पष्ट गतीची बेरीज. या बेरजेस ८०० कलांनीं भागून भागाकार शून्य असेल तर विष्कंभ योग, १ असेल तर प्रीतियोग याप्रमाणें सर्व योग होतात. नक्षत्रादिकांप्रमाणें आकाशांतील स्थितीशीं योगांचा कांहीं संबंध नसावा असें दिसतें. हे योग सत्तावीस आहेत. त्यांचीं नांवें:—

विष्कंभः प्रीतिरायुष्मान् सौभाग्यः शोभनस्तथा।
अतिगंडः सुकर्मा च धृतिः शूलस्तथैव च ॥ १०० ॥
गंडो वृद्धिर्ध्रुवश्चैव व्याघातो हर्षणस्तथा।
वज्रं सिद्धिर्व्यतीपातो वरीयान् परिघः शिवः ॥ १०१ ॥
सिद्धिः साध्यः शुभः शुक्लो ब्रह्मा चैन्द्रोऽथ वैधृतिः।
सप्तविंशतियोगानां स्वनामसदृशं फलम् ॥ १०२ ॥

१ विष्कंभ	८ धृति	१५ वज्र	२२ साध्य
२ प्रीति	९ शूल	१६ सिद्धि	२३ शुभ
३ आयुष्मान्	१० गंड	१७ व्यतीपात	२४ शुक्ल
४ सौभाग्य	११ वृद्धि	१८ वरीयान्	२५ ब्रह्मा
५ शोभन	१२ ध्रुव	१९ परिघ	२६ ऐंद्र
६ अतिगंड	१३ व्याघात	२० शिव	२७ वैधृति
७ सुकर्मा	१४ हर्षण	२१ सिद्धि	

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

अशुभयोग.

वैधृतिव्यतिपाताख्यौ संपूर्णौ वर्जयेच्छुभे ।
वज्रविष्कंभयोश्चैव घटिकात्रयमादिकं ॥ १०३ ॥
परिघार्धं पंच शूले व्याघाते घटिका नव ।
गंडातिगंडयोः षट्ट च हेयाः सर्वेषु कर्मसु ॥ १०४ ॥

वरील सत्तावीस योगांचीं त्यांच्या नांवांप्रमाणें फळें समजावीं. व्यतीपात व वैधृति हे दोन योग संपूर्ण अशुभ आहेत. ह्या योगांवर कांहींच शुभकार्य करूं नये. परंतु कांहीं योग असे आहेत कीं, त्यांच्या आरंभापासून कांहीं घटिकांपर्यंत मात्र त्यांचा दोष असतो. ते योग येणेंप्रमाणें:—विष्कंभ आणि वज्र या योगांचा दोष आरंभापासून तीन घटिकांपर्यंत असतो. परिघयोगाचा पूर्वार्ध संपेपर्यंत, शूल योगाचा पहिल्या पांच घटिकांपर्यंत, व्याघातयोगाचा नऊ घटिकांपर्यंत आणि गंड आणि अतिगंड योगांचा पहिल्या सहा घटिकांपर्यंत दोष असतो. म्हणून तेवढ्या घटिका सोडून त्या त्या योगांवर शुभकार्यें करण्यास कांहीं हरकत नाहीं.

करणविचार.

तिथिं च द्विगुणीकृत्य एकहीनं च कारयेत् ।
सप्तभिश्च हरेद्भागं शेषं करणमुच्यते ॥ १०५ ॥
ववश्च वालवश्चैव कौलवस्तैतिलस्तथा ।
गरश्च वणिजो विष्टिः करणानि जगुर्बुधाः ॥ १०६ ॥
अंते कृष्णचतुर्दश्यां शकुनी दशभागयोः ।
ज्ञेयं चतुष्पदं नागं किंस्तुघ्नं प्रतिपद्दले ॥ १०७ ॥

करण म्हणजे तिथीचा अर्ध भाग; अर्थात् एका तिथीस दोन करणें भोगतात. तिथीच्या ज्या घटिका असतील त्यांची दुप्पट करून त्यांत एक कमी करावा. बाकी अंक राहतील त्यांस सातांनीं भागावें. जो अंक बाकी उरेल तें करण समजावें. करणें एकंदर अकरा आहेत. १ बव २ बालव ३ कौलव ४ तैतिल ५ गर ६ वणिज ७ विष्टि ८ शकुनी ९ चतुष्पाद १० नाग आणि ११ किंस्तुघ्न यांपैकीं पहिलीं सात करणें चल करणें आहेत व तीं अनुक्रमानें शुक्लप्रतिपदेच्या उत्तरार्धापासून कृष्णचतुर्दशीच्या पूर्वार्धाच्या समाप्तिपर्यंत असतात. हीं सात करणेंच महिन्यांतून पुनःपुनः आठवेळ येतात. शकुनी, चतुष्पाद, नाग आणि किंस्तुघ्न ह्या चार करणांस स्थिर करणें म्हणतात, त्यांची व्यवस्था अशी. शकुनीकरण हें नेहमीं कृष्णचतुर्दशीच्या उत्तरभागांत मात्र येतें; इतर दिवशीं असत नाहीं. चतुष्पाद आणि नाग हीं फक्त अमावास्येच्या दिवशींच असतात. आणि किंस्तुघ्न हें नित्य शुक्लप्रतिपदेच्या पूर्वभागांत मात्र असतें. शुक्लप्रतिपदेच्या उत्तरभागांत बव, पुढें द्वितीयेस बालव आणि कौलव, तृतीयेस तैतिल आणि गर याप्रमाणें करणांची नित्य स्थिति असते.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

नक्षत्रावरून चंद्र किंवा राशी पहाण्याची रीति.

सपादर्क्षं द्वयंभोगो मेषादीनामनुक्रमात् ॥

मागें सांगितलेंच आहे कीं, नक्षत्रें सत्तावीस आहेत व राशी बारा आहेत. अर्थात सवादोन नक्षत्रें मिळून एक राशि होतो. म्हणजे सवादोन नक्षत्रें संपत तोंपर्यंत चंद्र एकाच राशीस असतो. एकाद्या मनुष्याच्या जन्मकाळीं ज्या राशीस चंद्र असतो, तीच त्या मनुष्याची राशि (रास) होय असें समजावें. रोज कोणत्या राशीस चंद्र असतो, हें पंचांगांत शेवटच्या कोष्टकांत दाखविलेलें असतें. प्रत्येक नक्षत्राचे चार भाग म्हणजे चार चरण कल्पिलेले आहेत. चरणाला पाद अशीही संज्ञा आहे. उदाहरणार्थ, एक पाद म्हणजे पाव नक्षत्र, द्विपाद म्हणजे अर्धनक्षत्र, त्रिपाद म्हणजे तीन चतुर्थांश नक्षत्र याप्रमाणें समजावें.

मेषोऽश्विनी च भरणी कृत्तिका प्रथमं द॑लम् ।
त्रिंः कृत्तिका रोहिणी च मृगार्धं वृषभस्तथा ॥ १०८ ॥
मृगार्धार्द्रा पुनर्वस्वस्त्रिपादमिथुनाभिधः ।
वैस्वंत्यचरणं पुष्यो ह्याश्लेषा कर्कटाभिधः ॥ १०९ ॥
मघापूर्वोत्तरापादं सिंहराशिः प्रकीर्तितः ।
उत्तरात्रितयं हस्तश्चित्रार्धं कन्यका स्मृतः ॥ ११० ॥
चित्रार्धं स्वातिनक्षत्रं विशाखात्रितयं तुला ।
विशाँखांत्यानुराधा च ज्येष्ठांतं वृश्चिकाभिधः ॥ १११ ॥
मूलपूर्वोत्तराषाढा पादमेकं धनुः स्मृतम् ।
नैंक्रस्त्र्युषाढा श्रवणं धनिष्ठार्धं तथैव च ॥ ११२ ॥
कुंभो धनिष्ठा तारा च पूभापादत्रयं तथा ।
पादं पूर्भा उंभा रेवत्यंतं मीनः प्रकीर्तितः ॥ ११३ ॥

---

१ प्रथम चरण. २ कृत्तिकांचे शेवटचे तीन चरण. ३ वसुः म्ह० पुनर्वसु. ४ विशाखांचा शेवटचा चरण. ५ मकर. ६ त्रि+उषाढा म्ह० उत्तराषाढांचे तीन चरण. ७ शततारका. ८ पूर्वाभाद्रपदा. ९ उत्तराभाद्रपदा.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

नक्षत्रें.		नक्षत्रें.		नक्षत्रें.		चंद्र.
अश्विनी	पूर्ण	भरणी	पूर्ण	कृत्तिका	१/४	मेष
कृत्तिका	३/४	रोहिणी	पूर्ण	मृग	१/२	वृषभ
मृग	१/२	आर्द्रा	पूर्ण	पुनर्वसु	३/४	मिथुन
पुनर्वसु	१/४	पुष्य	पूर्ण	आश्लेषा	पूर्ण	कर्क
मघा	पूर्ण	पूर्वा	पूर्ण	उत्तरा	१/४	सिंह
उत्तरा	३/४	हस्त	पूर्ण	चित्रा	१/२	कन्या
चित्रा	१/२	स्वाती	पूर्ण	विशाखा	३/४	तूळ
विशाखा	१/४	अनुराधा	पूर्ण	ज्येष्ठा	पूर्ण	वृश्चिक
मूळ	पूर्ण	पूर्वाषाढा	पूर्ण	उत्तराषाढा	१/४	धन
उत्तराषाढा	३/४	श्रवण	पूर्ण	धनिष्ठा	१/२	मकर
धनिष्ठा	१/२	शततारका	पूर्ण	पूर्वाभाद्रपदा	३/४	कुंभ
पूर्वाभाद्र०	१/४	उत्तराभाद्र०	पूर्ण	रेवती	पूर्ण	मीन

कोणत्या राशीस कोणतीं नक्षत्रें किती भुक्त होतात, हें वरील कोष्टकावरून ध्यानांत येईल. उदा० अश्विनी नक्षत्र पूर्ण, भरणी पूर्ण, आणि कृत्तिकांचा एक चरण अशीं सवादोन नक्षत्रें संपलीं, म्हणजे मेष राशीचा चंद्र संपला. त्याचप्रमाणें इतर राशीचें समजावें. तसेंच, एकाद्याचें जन्मनक्षत्र समजलें म्हणजे त्यावरून त्याची कोणती राशी असावी हेंही वरील कोष्टकावरून सहज समजेल.

चंद्रबल किंवा शुभाशुभ चंद्र.

स्वजन्मराशिमारभ्य चंद्रराशिस्थितं फलम् ।
आद्ये चंद्रः श्रियं कुर्यान्मनस्तोषं द्वितीयके ॥ ११४ ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

तृतीये धनसंपत्तिश्चतुर्थे कलहागमम् ।
पंचमे कार्यनाशश्च षष्ठे संपत्तिरुत्तमा ॥ ११५ ॥
सप्तमे राजसंमानं दुःखदं चाष्टमे तथा ।
नवमे च भयं ज्ञेयं दशमे मानसेप्सितम् ॥ ११६ ॥
एकादशे सर्वलाभं द्वादशे हानिमेव च ।
शुक्लपक्षे शशिः श्रेष्ठो द्विपंचनवमेष्वपि ॥ ११७ ॥

सर्व कार्यांस चंद्रबल पहावें असें सांगितलें आहे, म्हणून ज्या दिवशीं आपल्याला कांहीं कार्य करावयाचें असेल किंवा कोठें जावयाचें असेल त्या दिवशीं ज्या राशीला चंद्र असेल त्या राशीपर्यंत आपल्या जन्मराशीपासून राशी मोजाव्या, आणि पुढें लिहिल्याप्रमाणें शुभाशुभ चंद्र समजावा. पहिला चंद्र असेल तर लक्ष्मी, दुसरा मनाला संतोष, तिसरा धनसंपत्ति देणारा, चवथा कलहोत्पादक, पांचवा कार्यनाशक, सहावा संपत्तिप्रद, सातवा राजमान देणारा, आठवा दुःख देणारा, नववा भयदायक, दहावा मनाची इच्छा पूर्ण करणारा, अकरावा सर्व लाभ करून देणारा आणि बारावा हानि करणारा, याप्रमाणें जाणावें. चवथा, आठवा, आणि बारावा चंद्र सर्व कार्यांस वर्ज्य करावा. अकरावा चंद्र सर्वांत उत्तम मानिलेला आहे. शुक्लपक्षांतील दुसरा, पांचवा आणि नववा हे शुभचंद्र मानिलेले आहेत.

कार्यपरत्वें इतर ग्रहांचें बल.

रविर्नृपविलोकने सुरगुरुर्विवाहोत्सवे
रणे धरणिनंदनो भृगुसुतः प्रयाणे बली ।
शनिश्च खलु दीक्षणे सकलशास्त्रबोधे बुधः
शशी सकलकर्मसु ध्रुवमुदाहृताः सूरिभिः ॥ ११८ ॥

राजदर्शनकालीं रवीचें, विवाहास गुरूचें, युद्धकार्यास मंगळाचें, प्रयाणकालीं शुक्राचें, मंत्रदीक्षाग्रहणास शनीचें, विद्यारंभास बुधाचें, व सर्व कार्यांस चंद्राचें याप्रमाणें कार्यपरत्वें ग्रहबल असावें असें ऋषिमत आहे.

अमृतसिद्धियोग.

रवौ हस्तो मृगश्चंद्रे गुरौ पुष्योऽश्विनी कुजे ।
अनुराधा बुधे शुक्रे रेवती रोहिणी शनौ ॥ ११९ ॥
अमृतः सिद्धियोगः स्यात्सर्वकार्यार्थसिद्धिदः ।
यथा सूर्यस्तमोहंतिदोषसंघांस्तथात्वयम् ॥ १२० ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

अमुक वारीं अमुक नक्षत्र आलें तरच अमृतसिद्धियोग होतो. जसें, रविवारीं हस्त, सोमवारीं मृग, मंगळवारीं अश्विनी, बुधवारीं अनुराधा, गुरुवारीं पुष्य, शुक्रवारीं रेवती आणि शनिवारीं रोहिणी. खालीं लिहिलेला अपवाद खेरीज करून अमृतसिद्धियोग सर्व कार्यांस शुभ मानिलेला आहे.

अनिष्ट अमृतसिद्धियोग.

गुरुपुष्यं विवाहे च प्रयाणे शनिरोहिणीम् ।
भौमाश्विनीं प्रवेशे च त्यजेदेतत्प्रयत्नतः ॥ १२१ ॥
पंचम्यादि तिथौ त्याज्या हस्तार्काद्याः क्रमाच्छुभे ।
योगश्चामृतसिद्धाख्यो अन्ये सर्वार्थसाधकाः ॥ १२२ ॥

गुरुवारीं पुष्यनक्षत्राच्या योगानें झालेला अमृतसिद्धियोग विवाहास वर्ज्य करावा. शनिवारीं रोहिणीनक्षत्रामुळें होणारा अमृतसिद्धियोग प्रयाणास वर्ज्य करावा. आणि मंगळवारीं अश्विनीनक्षत्र आल्यानें जो अमृतसिद्धियोग होतो तो गृहप्रवेशास वर्ज्य करावा. कारण हे योग अत्यंत निंद्य मानिलेले आहेत. तसेंच, आदित्यवारीं पंचमी, सोमवारीं षष्ठी, मंगळवारीं सप्तमी, बुधवारीं अष्टमी, गुरुवारीं नवमी, शुक्रवारीं दशमी, आणि शनिवारीं एकादशी ह्या तिथि त्या त्या वारीं असून अमृतसिद्धियोग असेल तर तोही वर्ज्य करावा. उदाहरणार्थ, रविवारीं हस्त नक्षत्र आलें तर प्रथम लिहिल्याप्रमाणें सर्व कार्यांना शुभ असा अमृतसिद्धियोग होतो खरा, पण त्याच दिवशीं पंचमी तिथि असेल तर तोच योग निंद्य होतो; याचप्रमाणें इतर वारतिथींविषयीं समजावें. हे अपवाद खेरीज करून बाकी सर्व अमृतसिद्धियोग शुभ होत.

मृत्युयोग.

अनुराधा रवौ सोमे उत्तराषाढभं त्यजेत् ।
बुधेऽश्विनी मृगो जीवे शुक्राश्लेषा शनौ करः[1] ।
भौमे शतभिषक् चायं मृत्युयोगोऽर्थनाशकः ॥ १२३ ॥

रविवारीं अनुराधा नक्षत्र आलें तर मृत्युयोग होतो. तसेंच, सोमवारीं उत्तराषाढा, मंगळवारीं शततारका, बुधवारीं अश्विनी, गुरुवारीं मृगशिर, शुक्रवारीं आश्लेषा आणि शनिवारीं हस्त, असे योग आले म्हणजेही मृत्युयोग होतो. तो प्रयाणास किंवा कोणत्याही शुभकार्यांस वर्ज्य करावा.

दग्धयोग.

द्वादश्यर्के विधौ रुद्रा भौमे पंच बुधेऽग्नयः ।
गुरौ षष्ठ्यष्टमी शुक्रे दग्धाख्यो नवमी शनौ ॥ १२४ ॥

---

1 हस्त.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

रविवारीं द्वादशी, सोमवारीं एकादशी, मंगळवारीं पंचमी, बुधवारीं तृतीया, गुरुवारीं षष्ठी, शुक्रवारीं अष्टमी आणि शनिवारीं नवमी असे योग आले म्हणजे दग्धयोग होतो; तो सर्व शुभ कार्यांस वर्ज्य करावा.

यमघंटयोग.

मघार्कवारे शशिने विशाखा आर्द्रा कुजे चेंदुसुते च मूलम् ।
वह्निर्गुरौ[1] शुक्रदिने विधाता[2] हस्तं च सौरे यमघंटयोगः ॥ १२५ ॥
गृहप्रवेशश्च सुरप्रतिष्ठा तथा प्रयाणं यमघंटयोगे ।
प्राप्नोति कृत्वा भयमेव नित्यं जातः शिशुः संततरोगवान्स्यात् ॥१२६॥

रविवारीं मघा, सोमवारीं विशाखा, मंगळवारीं आर्द्रा, बुधवारीं मूळ, गुरुवारीं कृत्तिका, शुक्रवारीं रोहिणी आणि शनिवारीं हस्त असे योग आले म्हणजे यमघंटयोग होतो. यमघंटयोगावर प्रयाण, गृहप्रवेश, देवाची स्थापना हीं कृत्यें करूं नयेत; केलीं असतां संकटें उत्पन्न होतात. यमघंटयोगावर जन्म झाल्यास बालकाला क्लेश होतात; परंतु शांति केली असतां तो दोष दूर होतो.

कल्याणीचें स्वरूप.

दैत्येंद्रैः समरेऽमरेषु विजितेष्वीशः क्रुधा दृष्टवान् ।
स्वात्कायात्किल निर्गता खरमुखी लांगूलिनी चक्रपात् ।
विष्टिः सप्तभुजा मृगेंद्रगलकक्षामोदरी प्रेतगा ।
दैत्यघ्नी मुदितैः सुरैस्तु श्रवणप्रांते नियुक्ता तु सा ॥ १२७ ॥

दैत्य आणि देव या उभयतांच्या युद्धप्रसंगीं देवांचा पराभव होणार असें पाहून शंकर अत्यंत क्रुद्ध होऊन त्यांनीं आपल्या देहांतून भद्रा नामक एक राक्षसी उत्पन्न केली. हिलाच विष्टि, कल्याणी अशीं दुसरीं नांवें आहेत. हिचें स्वरूप अमंगळ आहे.

---

* अमृतसिद्धियोग, मृत्युयोग व दग्धयोग यांसंबंधीं प्रायः सर्वत्र प्रचारांत असलेले पुढील तीन श्लोक येथें देतों.

अमृत०—आदित्यहस्ते गुरुपुष्ययोगे बुधानुराधा शनिरोहिणी च ।
सोमे च सौम्यं भृगुरेवती च भौमाश्विनी चामृतसिद्धियोगः ॥

मृत्युयोग—त्यज रविमनुराधा उत्तराषाढचंद्रे शतभिषगपि भौमे
चांद्रजे चाश्विनी च । मृगशिरगुरुवारे सार्पदैवं च
शुक्रे रविसुतमपि हस्ते मृत्युयोगं वदन्ति ॥

दग्धयोग—बुधे तृतीया कुजपंचमी च षष्ठी गुरावष्टमि शुक्रवारे ।
एकादशीसोम शनिर्नवम्यां द्वादश्यमर्काविति दग्धयोगः ॥

१ कृत्तिका. २ रोहिणी- 'शुक्रदिने विधाता' याबद्दल "शुक्रदिने च मैत्रं" असाही एक मतभेद आढळतो. त्याचा अर्थ शुक्रवारीं अनुराधा.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ही गर्दभमुखी, पुच्छवती, सप्तभुजा, सिंहासारखा गळा असलेली, कृशोदरी, प्रेतावर आरूढ झालेली व दैत्यांचा संहार करणारी असून देवांनीं आपल्या कर्णप्रांतीं ठेविलेली आहे.

कल्याणीच्या तिथि.

अष्टम्यां पूर्णिमायां च भद्रा पूर्वदले स्मृता ।
एकादश्यां चतुर्थ्यां च शुक्लपक्षे परे दले ॥ १२८ ॥
सप्तम्यां च चतुर्दश्यां विष्टिः पूर्वदले भवेत् ।
दशम्यां च तृतीयायां कृष्णपक्षे परे दले ॥ १२९ ॥

ही भद्रा किंवा कल्याणी शुक्लपक्षांत चार वेळ व कृष्णपक्षांत चार वेळ अशी महिन्यांतून नेहमीं आठ वेळ असते. म्हणजे शुक्लपक्षांत अष्टमी व पूर्णिमा ह्या तिथींच्या पूर्वभागांत आणि एकादशी आणि चतुर्थी ह्या तिथींच्या उत्तरभागांत कल्याणी असते. तसेंच, कृष्णपक्षांत सप्तमी आणि चतुर्दशी ह्या तिथींच्या पूर्वभागीं आणि दशमी आणि तृतीया ह्या तिथींच्या उत्तरभागीं कल्याणी असते. पूर्वभाग म्हणजे तिथीच्या आरंभापासून तीस घटिका आणि उत्तरभाग म्हणजे शेवटच्या तीस घटिका समजाव्या.

भद्रेचें मुख.

[14]शक्रा[8]ष्ट[7]मुनि[15]ति[4]थ्यब्धि[10]दि[11]गीशा[3]ग्निमिते तिथौ ।
प्रथमादिषु याम्येषु पंचनाड्यस्तु वै क्रमात् ।
भद्रामुखं परित्यज्य शुभकर्मसु सर्वदा ॥ १३० ॥

प्रत्येक महिन्यांत आठ वेळ कल्याणी असते, हें वर सांगितलेंच आहे. त्या तिथींच्या आरंभापासून कांहीं नियमित प्रहरांच्या पहिल्या पांच घटिकांना कल्याणीचें मुख अशी संज्ञा आहे तें अत्यंत अशुभ होय. कोणत्या तिथीच्या कितव्या प्रहराला मुख म्हणावें हें खालीं दिलें आहे.

	कृ.	शु.	कृ.	शु.	शु.	कृ.	शु.	कृ.
तिथि	१४,	८,	७,	१५,	४,	१०,	११,	३,
प्रहर	१,	२,	३,	४,	५,	६,	७,	८,

उदाहरणार्थ, कृष्णचतुर्दशीच्या पहिल्या प्रहराच्या पांच घटिका, शुक्ल अष्टमीच्या दुसऱ्या प्रहराच्या पांच घटिका इत्यादि. याप्रमाणें कल्याणीचें मुख सर्वत्र वर्ज्य करावें.

भद्रेचें पुच्छ.

[8]सर्पः स[7]प्त[15]स्तिथिः [14]शक्रो दि[10]ग्रु[11]द्रा[3]ग्निः[4]श्रुतिस्तिथौ ।
प्रथमादिषु याम्येषु क्रमादंत्यघटित्रयम् ॥
पुच्छं विष्टेर्विजानीयात्सर्वकार्येषु मंगलम् ॥ १३१ ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

	शु.	कृ.	शु.	कृ.	कृ.	शु.	कृ.	शु.
तिथि	८,	७,	१५,	१४,	१०,	११,	३,	४
प्रहर	१,	२,	३,	४,	५,	६,	७,	८

उदाहरणार्थ, शुक्ल अष्टमीच्या पहिल्या प्रहराच्या शेवटच्या तीन घटिका, कृष्ण सप्तमीच्या दुसऱ्या प्रहराच्या शेवटच्या तीन घटिका, इ० याप्रमाणें भद्रेचें पुच्छ जाणावें. हें निर्दोष असून सर्व कार्यांना प्रशस्त मानिलें आहे.

चंद्रपरत्वें शुभाशुभ कल्याणी.

मेषत्रये वृश्चिकेंदौ स्वर्गे भद्रा प्रकीर्तिता।
कन्याद्वये धनुर्युग्मे चंद्रे भद्रा रसातले॥ १३२॥
कुंभे मीने तथा कर्के सिंहे चंद्रे भुवि स्थिता।
भूलोकस्था सदा त्याज्या स्वर्गपातालगा शुभा॥ १३३॥

मेष, वृषभ, मिथुन आणि वृश्चिक या चार राशींस चंद्र असतां कल्याणी असेल तर ती स्वर्गलोकीं आहे असें जाणावें. तसेंच कन्या, तूळ, धन आणि मकर या राशींचा चंद्र असतां कल्याणी पाताळीं आहे असें समजावें. आणि कुंभ, मीन, कर्क व सिंह या राशींस चंद्र असतां भूलोकीं आहे असें जाणावें. भूलोकीं कल्याणी असतां तिचें फल अशुभ कल्पिलेलें आहे, म्हणून ती सर्व कार्यांना वर्ज्य करावी. कल्याणी स्वर्ग व पाताळ या लोकीं असतां तिचें फळ शुभ. म्हणून ती शुभ कृत्यास ग्राह्य होय असें जाणावें. पंचांगांत भद्राप्रवृत्ति (भ० प्र०) म्हणजे कल्याणीचा आरंभ व भद्रानिवृत्ति (भ० नि०) म्हणजे कल्याणीची समाप्ति हीं दाखविलेलीं असतात.

कल्याणीच्या दोषांचा अपवाद.

तिथेः पूर्वार्धजा रात्रौ दिने भद्रा परार्धजा।
भद्रा दोषो न तत्र स्यात्कार्येत्यावश्यके सति॥ १३४॥

ज्या तिथींच्या पूर्वार्धीं भद्रा असते असें वर लिहिलें आहे, तो पूर्वार्ध रात्रीमध्यें असेल तर, किंवा ज्या तिथींच्या उत्तरार्धीं भद्रा असते असें वर सांगितलें आहे तो उत्तरार्ध दिवसाचे ठायीं असेल तर, कल्याणीचा दोष शुभ कार्याला मानूं नये.

विष्टींत कोणतीं कर्में करावीं.

वधबंधविषाग्न्यस्त्रच्छेदनोच्चाटनादि यत्।
तुरंगमहिषोष्ट्रादि कर्म विष्ट्यां तु सिध्यति॥ १३५॥

प्राण्यांचा वध, बंधन, विषप्रयोग, अग्निप्रयोग, शस्त्रकर्म, तोडणें, उच्चाटन, घोडे, रेडे उंटें इत्यादिकांसंबंधीं कर्में विष्टीमध्यें म्हणजे कल्याणीमध्यें करावीं.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

प्रदोषाचे दिवस.

रात्रौ यामद्वयादर्वाक् सप्तमी वा त्रयोदशी।
तथैव नवनाडीषु चतुर्थी यदि दृश्यते।
प्रदोषः स तु विज्ञेयः सर्वविद्याविगर्हितः॥ १३६॥

षष्ठीच्या दिवशीं अर्धरात्रीच्या आंत सप्तमी, किंवा द्वादशीच्या दिवशीं अर्धरात्रीच्या आंत त्रयोदशी असेल तर, अथवा तृतीयेच्या दिवशीं नऊ घटिका रात्रीच्या आंत चतुर्थी असेल तर, त्या रात्रीं प्रदोष असतो. ह्या प्रदोषतिथि वेदाध्ययनाला वर्ज्य कराव्या, असें सांगितलें आहे.

धनिष्ठापंचक.

धनिष्ठापंचकं त्याज्यं तृणकाष्ठादिसंग्रहे।
दक्षिणस्यां प्रयाणे च गृहाद्याच्छादने तथा।
भवेत्पंचगुणं चात्र जातं लब्धं मृतं गतम्॥ १३७॥

धनिष्ठा नक्षत्राच्या आरंभापासून तों रेवती नक्षत्राच्या समाप्तीपर्यंत जीं पांच नक्षत्रें त्यांस धनिष्ठापंचक असें म्हणतात. दर महिन्यास हें पंचक असतेंच. परंतु तें कोणी मानीत नाहीं. वैशाखकृष्णपक्षांत षष्ठी सप्तमीचे सुमारास जें धनिष्ठापंचक येतें, तें मात्र कित्येक ठिकाणीं मानितात. मुंबई प्रांतांत ह्या पंचकास मढेपंचक असें म्हणतात. धनिष्ठापंचकांत लांकडें किंवा गवत यांचा सांठा करणें, घर शिवणें, दक्षिणेकडे गमन करणें इत्यादि कृत्यें करूं नयेत. विवाहादि शुभ कार्यें पंचकांत करण्यास कांहीं निषेध नाहीं, असें कित्येक ग्रंथकारांचें मत आहे, परंतु जसा देशाचार असेल त्याप्रमाणें करावें. धनिष्ठापंचकयोगावर जन्म, लाभ किंवा मृत्यु झाला तर पांच वेळ तसें होतें, असें मानिलेलें आहे. म्हणून धनिष्ठापंचकांत मृत्यु घडेल तर शांति केल्यानें दोषनिवृत्ति होते. कितीएक धनिष्ठानवकाचा म्हणजे ९ नक्षत्रांचा दोष मानितात.

त्रिपुष्करयोग.

त्रिपादर्क्षे तिथिर्भद्रा भौमार्कशनिवासरे।
तदा त्रिपुष्करो योगो द्वयोर्योगे द्विपुष्करः॥ १३८॥
पुनर्वसूत्तराषाढा कृत्तिकोत्तरफाल्गुनी।
पूर्वाभाद्रविशाखा च ज्ञेयमेतत्त्रिपादभम्।
मृगश्चित्रा धनिष्ठा च ज्ञेयमेतद्द्विपादभम्॥ १३९॥
दद्यात्तद्दोषनाशाय गोत्रयं मूल्यमेव वा।
द्विपुष्करे द्वयं दद्यान्न दोषस्त्वृक्षमात्रतः॥ १४०॥

भौमवार, रविवार आणि शनिवार ह्या वारांपैकीं कोणत्याही वारीं भद्रातिथि म्हणजे द्वितीया, सप्तमी किंवा द्वादशी असेल; आणि त्रिपाद नक्षत्रांपैकीं म्हणजे

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कृत्तिका, पुनर्वसु, उत्तरा, विशाखा, उत्तराषाढा आणि पूर्वाभाद्रपदा ह्या नक्षत्रांतून एकादें नक्षत्र असेल तर त्या तिहींच्या संयोगाला त्रिपुष्करयोग म्हणावें. तसेंच, त्याच वारीं त्याच तिथि, म्हणजे भद्रातिथि असून द्विपाद नक्षत्रांतून म्हणजे मृग, चित्रा आणि धनिष्ठा ह्यांतून एकादें नक्षत्र असतां द्विपुष्करयोग होतो. त्रिपुष्करयोगावर जन्म, मृत्यु किंवा लाभ झाला असतां तीन वेळ पुनः त्याप्रमाणें होतें आणि द्विपुष्करयोगावर दोन वेळ होतें, असें मानिलेलें आहे. परंतु शांतीनें तो दोष दूर होतो असेंही सांगितलें आहे. त्रिपुष्करयोगावर मृत्यु घडला किंवा वस्तु नष्ट झाली तर तद्दोषपरिहारार्थ हिरण्यद्वारा तीन गोप्रदानें करावीं. द्विपुष्करयोगावर झाल्यास दोन करावीं. पण केवळ त्रिपाद नक्षत्र किंवा द्विपाद नक्षत्र असेल तर पूर्वोक्त तिथिवारांवांचून नुसत्या नक्षत्रांचा दोष मानूं नये.

कुलिकादि दुर्मुहूर्त.

कुलिकः कालवेला च यमघंटश्च कंटकः ।
वाराद्द्विघ्ने क्रमान्मंदे बुधे जीवे कुजेक्षणः ॥ १४१ ॥

प्रत्येक वारीं दिवसामध्यें कांहीं घटिका वाईट असतात, त्यांना कुलिक, कालवेला इत्यादि नांवें आहेत. हे दुर्मुहूर्त समजण्याची रीति अशी आहे कीं, ज्या वाराचा कुलिकयोग आपणास काढावयाचा असेल, त्या वारापासून शनिवारापर्यंत वार मोजून जे अंक येतील, त्यांची दुप्पट करावी. आणि तो दुपटीचा अंक कुलिकनामक दुर्मुहूर्त होय, असें समजावें. उदाहरणार्थ, आपणाला गुरुवारीं कोणती वेळा कुलिक आहे हें पहावयाचें आहे, म्हणून गुरुवारापासून शनिवारापर्यंत दिवस मोजले असतां ३ होतात व त्याची दुप्पट ६ होते. म्हणून सहावा मुहूर्त हा गुरुवारीं कुलिक झाला. दिनमानाचे १५ भाग करून प्रत्येक भागाला मुहूर्त म्हणावें. याच रीतीनें इष्ट वारापासून बुधवारापर्यंत मोजून दुप्पट केली म्हणजे कालवेला होते. गुरुवारापर्यंत मोजून दुप्पट केल्यानें यमघंट होतो. आणि मंगळवारापर्यंत मोजल्यानें कंटक होतो. ह्या दुष्ट वेळा विवाहादि सर्व शुभ कार्यांस वर्ज्य कराव्या. दिवसाचे जे कुलिक सांगितले आहेत, त्यांत १ वजा करावा म्हणजे रात्रीचे कुलिक होतात.

यामार्धलक्षण.

अर्धयामाः परित्याज्या वेदसप्तद्विपंचमाः ।
अष्टत्रिषष्ठसंख्यांकाः क्रमतो रविवासरात् ॥ १४२ ॥

यामार्ध म्हणजे प्रहराचा अर्धभाग होय. रविवारीं चवथ्या प्रहराचा अर्ध, सोमवारीं सातव्या, मंगळवारीं दुसऱ्या, बुधवारीं पांचव्या, गुरुवारीं आठव्या, शुक्रवारीं तिसऱ्या आणि शनिवारीं सहाव्या प्रहराचा अर्ध, यांना यामार्ध म्हणतात. ह्या पूर्वोक्त निरनिराळ्या सर्व अर्धप्रहरांमध्यें कोणतेंही शुभकार्य करूं नये. प्रहराचा अर्धभाग म्हणजे पूर्वार्ध समजावा. हा यामार्धदोष रात्रीं नसतो असें कित्येक ग्रंथकार म्हणतात.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

तीन प्रकारचें गंडांत.

नक्षत्रतिथिराशीनां गंडांतं त्रिविधं त्यजेत् ।
प्रयत्नेन सदा जन्मयात्रोद्वाहव्रतादिषु ॥ १४३ ॥
नक्षत्रगं०-ज्येष्ठामूलर्क्षयोः संधौ रेवत्यश्विभयोस्तथा ।
आश्लेषामघयोरंतराले नाडीचतुष्टयम् ॥ १४४ ॥
तिथिगं०-अंतरे पंचमीषष्ठ्योः पूर्णिमाद्याह्वयोरपि ।
दशम्येकादशीसंधौ गंडांतं घटिकाद्वयम् ॥ १४५ ॥
लग्नगं०-कर्कसिंहाख्ययोर्मीनमेषयोरंतरे तयोः ।
वृश्चिकाख्यधनुस्संधौ लग्नस्यैकं घटीयुतम् ॥ १४६ ॥

गंडांत तीन प्रकारचें आहे. नक्षत्रगंडांत, तिथिगंडांत, आणि लग्नगंडांत. कांहीं नक्षत्रतिथिलग्नादिकांच्या संधीच्या घटिकांना गंडांत म्हणतात. जसें, ज्येष्ठा आणि मूल, रेवती आणि अश्विनी, आश्लेषा आणि मघा, हीं गंडांतनक्षत्रें होत. म्हणजे ज्येष्ठानक्षत्राच्या शेवटच्या २ घटिका व मूलनक्षत्राच्या आरंभींच्या २ घटिका अशी दोन नक्षत्रांची संधि हेंच गंडांत होय. त्याचप्रमाणें रेवतीच्या २ अंत्यघटिका व अश्विनीच्या २ आद्यघटिका, व आश्लेषाच्या २ अंत्यघटिका आणि मघाच्या २ आद्य-घटिका, हेंही नक्षत्रगंडांतच होय. तसेंच, पौर्णिमेची शेवटची १ घटिका व प्रतिपदेची आरंभींची १ घटिका; पंचमीची अंत्यघटी व षष्ठीची आद्य घटी; आणि दशमीची अंत्य-घटी व एकादशीची आद्यघटी यांना तिथिगंडांत म्हणतात. त्याचप्रमाणें कर्क व सिंह; मीन व मेष; आणि वृश्चिक व धन या लग्नांच्या संधीची अर्ध अर्ध घटिका म्हणजे दोन लग्नें मिळून १ घटिकात्मक लग्नसंधीचा काळ, हें लग्नगंडांत होय. हें तीन प्रकारचें गंडांत जन्म, प्रयाण, विवाह, व्रतबंध इत्यादि शुभकार्यांना निषिद्ध आहे. गंडांतामध्यें जन्म झाला असतां शांतीनें तो दोष परिहार होतो असें सांगितलें आहे.

कपिलाषष्ठी.

भाद्रे मास्यसिते पक्षे भानौ चैव करे स्थिते ।
पाते कुजे च रोहिण्यां सा षष्ठी कपिला भवेत् ॥ १४७ ॥
अस्यां हुतं च दत्तं च सर्वं कोटिगुणं भवेत् ।
अयं योगो दिवा ग्राह्यो नतु रात्रौ कदा बुधैः ॥ १४८ ॥

भाद्रपदमहिन्यांत कृष्णपक्षांत षष्ठी मंगळवारीं असून त्या दिवशीं रोहिणी-नक्षत्र, व्यतीपात व सूर्यनक्षत्र हस्त, इतके योग असतील तर कपिलाषष्ठी होते. असा योग साठ वर्षांत एकदां आला तर येतो. ह्या पर्वणीमध्यें दान, होम, श्राद्ध वगैरे केलें असतां कोटिगुण फळ मिळतें. हें सूर्यपर्व असल्यामुळें दिवसासच हे योग असले पाहिजेत. म्हणजे रात्रीं असल्यास निष्फळ समजावे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

गजच्छायायोग.

अमावास्यां नभस्ये तु सूर्यचंद्रौ करस्थितौ ।
सा विज्ञेया गजच्छाया श्राद्धेऽक्षय्यफलप्रदा ॥ १४९ ॥

भाद्रपद कृष्णपक्षांत अमावास्येचे दिवशीं हस्तनक्षत्र असून सूर्यनक्षत्रही हस्तच असेल तर त्या पर्वणीला गजच्छाया म्हणतात. त्या दिवशीं श्राद्धादि कृत्यें केलीं असतां अनंत फलांची प्राप्ति होते, असें मानिलेलें आहे.

अर्धोदययोग.

पौषे मासि रवौ दर्शे व्यतीपाते श्रवान्विते ।
अर्धोदयाभिधो योगः सूर्यपर्वशताधिकः ।
अयं शस्तो दिवायोगः किंचिदूनो महोदयः ॥ १५० ॥

पौषमासांत रविवारीं अमावास्या असून त्या दिवशीं व्यतीपात आणि श्रवण नक्षत्र असे योग असतील तर त्या पर्वणीला अर्धोदय म्हणतात. ही पर्वणी सूर्य-ग्रहणापेक्षां शतपटीनें फल देणारी आहे. हा योग दिवसास असेल तरच प्रशस्त मानिलेला आहे. या योगांत एकादा योग न्यून असतां त्याला महोदय म्हणतात. माघमासांतही हे योग असतां अर्धोदययोग होतो, असें कित्येकांचें मत आहे.

दिनमान व रात्रिमान.

सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत जो काळ जातो, त्यास आपण दिवस म्हणतों, त्याचें मान तें दिनमान होय; व सूर्य मावळल्यापासून सूर्याचा पुनः उदय होईपर्यंत जो काळ जातो, त्यास आपण रात्र म्हणतों; तिचें मान तें रात्रिमान होय. प्रचारांत अहो-रात्र म्हणजे दिवस व रात्र मिळून एक दिवस समजतात. उदाहरणार्थ, एका आठव-ड्याचे दिवस सात, असें आपण म्हणतों; पण समजतांना आठवडा म्हणजे सात दिवस व सात रात्री असें समजतों. यावरून एका दिवसाचे जे दोन विभाग दिवस व रात्र, यांचें मान सारखें असावें असें वाटणें साहजिक आहे. परंतु तें सर्वकाळ तसें असत नाहीं. याचें कारण असें आहे कीं, सूर्याचें जाणें कांहीं दिवस उत्तरेकडे व कांहीं दिवस दक्षिणेकडे असल्यामुळें दिनमान व रात्रिमान कमी अधिक होतें.

पृथ्वीच्या मध्यरेषेवर सूर्य आला म्हणजे दिनमान व रात्रिमान सारखें म्हणजे तीस तीस घटिकांचें असतें. मार्च महिन्याच्या एकविसाव्या तारखेस सूर्य मध्यरेषे-वर येतो, म्हणून दिवस व रात्र हीं त्या वेळीं सारखीं असतात. सूर्य मध्यरेषेपासून उत्तरेकडे जाऊं लागल्यापासून दिवस वाढत जातो, तो कर्कवृत्तावर जाईपर्यंत वाढत असतो. जून महिन्याच्या एकविसाव्या तारखेस सूर्य कर्कवृत्तावर जातो, म्हणून या वेळेस दिनमान वाढण्याची पराकाष्ठा होते. या वेळेस दिनमान सुमारें ३२ घटिका ५० पळें असतें. कर्कवृत्तापासून सूर्य मागें परत जाऊं लागला कीं,

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

दिनमान थोडें थोडें पुनः कमी होऊं लागतें, तें सप्टेंबरच्या तेविसाव्या तारखेस म्हणजे सूर्य मध्यरेषेवर आला कीं, बरोबर पुनः तीस घटिकांचें होतें. मध्यरेषेपासून सूर्य दक्षिणेकडे जाऊं लागला कीं, दिनमान कमी होऊं लागतें, तें तो मकरवृत्तावर जाईपर्यंत कमी असतें. डिसेंबरच्या एकविसाव्या तारखेस सूर्य मकरवृत्तावर जातो, म्हणून या वेळेस दिवस अगदीं लहान असतात. या वेळेस दिनमान सुमारें २७ घटिका १० पळें असतें. दक्षिणेकडून मध्यरेषेकडे सूर्य पुनः परत येऊं लागला कीं, दिनमान वाढत जातें, तें मध्यरेषेवर येईपर्यंत वाढत असतें. मार्च महिन्याच्या एकविसाव्या तारखेस पुनः सूर्य मध्यरेषेवर येतो. या वेळेस दिनमान पुनः तीस घटिका असतें. ह्याप्रमाणें सहा महिने उत्तरेकडे व सहा महिने दक्षिणेकडे सूर्य जात असतो. उत्तरेकडे फिरण्यास त्यास जो काळ लागतो, त्यास उत्तरायण म्हणतात, व दक्षिणेकडे फिरण्यास जो काळ लागतो, त्यास दक्षिणायन म्हणतात. दिवस व रात्र मिळून साठ घटिका असतात, म्हणून साठ घटिकांतून दिनमानाच्या घटिका वजा केल्या म्हणजे बाकी राहील तें रात्रिमान समजावें. ज्या वेळीं दिवस मोठे त्या वेळीं रात्री लहान असतात, व ज्या वेळीं रात्री लहान त्या वेळीं दिवस मोठे असतात.

ग्रहण. (गीति)

भूच्छायां स्वग्रहणे भास्करमर्कग्रहे प्रविशतीन्दुः।
प्रग्रहणमतः पश्चान्नेन्दोर्भानोश्च पूर्वार्धात् ॥ १५१ ॥
एवमुपरागकारणमुक्तमिदं दिव्यदृग्भिराचार्यैः।
राहुरकारणमस्मिन्नित्युक्तः शास्त्रसद्भावः ॥ १५२ ॥

ग्रहणाविषयीं सर्व माहिती ह्या लहानशा पुस्तकांत देतां येत नाहीं, म्हणून आवश्यक तेवढीच येथें देतों. ग्रहणें दोन प्रकारचीं आहेत. सूर्यग्रहण व चंद्रग्रहण. सूर्यग्रहण फक्त अमावास्येस व चंद्रग्रहण फक्त पूर्णिमेस येतें. सूर्य स्वयंप्रकाश असल्यामुळें वस्तुतः त्यास ग्रहण कधींच नाहीं; पण सूर्याच्या आड चंद्र येऊन चंद्राची छाया पृथ्वीवर पडते व त्यामुळें सूर्य दिसेनासा होऊन त्याचा प्रकाश अगदीं अंधक होतो, तेव्हां सूर्यास ग्रहण लागलें असें आपण समजतों. यावरून सूर्यग्रहण होण्यास सूर्यचंद्र एका राशीस वरखालीं असले पाहिजेत. ते अमावास्येस मात्र तसे येतात, म्हणून अमावास्येखेरीज इतर तिथींस सूर्यग्रहण होत नाहीं. चंद्रग्रहण होण्याचें कारण असें आहे कीं, पृथ्वीची छाया चंद्रावर पडून चंद्र आपणास दिसेनासा होतो, असें झालें म्हणजे चंद्रास ग्रहण लागलें असें आपण समजतों. तेव्हां चंद्रग्रहण होण्यास म्हणजे चंद्रावर पृथ्वीची छाया पडण्यास चंद्र व पृथ्वी या दोहोंच्या मध्यें अर्ध्या परिघाइतकें म्हणजे सहा राशींचें अंतर असलें पाहिजे. इतकें अंतर पूर्णिमेस मात्र असतें म्हणून चंद्रग्रहण पूर्णिमेस मात्र होतें. यावरून दर अमावास्येस किंवा दर पूर्णिमेस ग्रहण कां होत नाहीं अशी शंका कदाचित् कोणी घेईल तर, त्याचें

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

उत्तर असें आहे कीं, ग्रहण होण्यास चंद्र व पृथ्वी यांच्या कक्षा एकाच पातळींत असल्या पाहिजेत; परंतु चंद्र, सूर्य व पृथ्वी हीं एकाच रेषेंत येणें, हे योग दर पूर्णिमेस संभवत नाहींत, म्हणून दर पंध्रवड्यास पूर्ण ग्रहणें होऊन दिसत नाहींत. सूर्यग्रहण पूर्वेकडून कधींही लागत नाहीं व तसेंच चंद्रग्रहण पश्चिमेकडून लागत नाहीं. राहु चंद्रास ग्रासतो, आणि केतु सूर्यास ग्रासतो, व त्यामुळें ग्रहणें होतात, अशी जी कल्पना आहे, ती कविनिर्मित आहे. अलीकडील ज्योतिष्यांची व फार प्राचीन काळीं आमच्या विद्वान् ऋषींनीं वेदांत लिहून ठेविलेली ग्रहणांविषयींची कल्पना एकच आहे. राहू हा उपरागाला कारण नाहीं, हें वर दिलेल्या वराहमिहिराच्या मतावरून स्पष्ट कळेल.

राहूनें चंद्रास व केतूनें सूर्यास ग्रासिलें म्हणजे अनुक्रमें चंद्र व सूर्यग्रहण होतें. ह्या कल्पनेचा पुराणाशीं संबंध असावा असें दिसतें. देवदैत्यांनीं समुद्रमंथन करून ज्या वेळीं चौदा रत्नें काढिलीं त्या वेळीं त्या रत्नांपैकीं मद्य कोणी घ्यावें व अमृत कोणी घ्यावें, ह्याविषयीं देवदैत्यांत भयंकर वाद उत्पन्न झाला. तेव्हां विष्णूनें मोहिनीचें कपटरूप धारण करून देवदैत्यांपाशीं येऊन सारखी वांटणी करण्याचें कबूल केलें. नंतर, मोहिनी एका हातांत अमृत व दुसऱ्या हातांत मद्य घेऊन देवांकडे अमृत व दैत्यांकडे मद्य वाढूं लागली. राहूनें व केतूनें हें कपट पाहून, आपल्याला अमृताचा लाभ व्हावा म्हणून, ते दैत्यांच्या पंक्तींतून उठून देवांच्या पंक्तींत चंद्रसूर्यांच्या मागें अलक्षित येऊन बसले. मोहिनी अमृत वाढण्याकरितां देवांकडे आली, तेव्हां दोघांनींही आपआपले हात पुढें केले. मोहिनीनें चुकून राहूच्याही हातावर अमृत घातल्याबरोबर चंद्रानें नेत्रसंकेतानें ही गोष्ट मोहिनीस कळविली. त्याबरोबर मोहिनीनें आपल्या सुदर्शनानें राहूचा शिरश्छेद केला. परंतु अमृत कंठांतून खालीं गेलें असल्यामुळें त्याचें धड व शिर हीं जीवंत राहिलीं. केतु सूर्यामागें बसला होता त्यासही अर्थात् अमृतलाभ झाला नाहीं. असें होण्यास कारण चंद्रसूर्य झाले म्हणून राहुकेतु आणि चंद्रसूर्य यांच्यांत वैमनस्य पडलें! व त्यावरून राहु चंद्रास व केतु सूर्यास ग्रासितो अशी ग्रहणासंबंधीं भ्रामक कल्पना निघाली असावी असें वाटतें. वराहमिहिरानंतर ही विलक्षण कल्पना प्रचलित झाली असली पाहिजे हें उघड आहे. म्हणजे आज जवळ जवळ तिला चौदा शतकें होऊन गेलीं, तरी ती अद्यापि तशीच कायम आहे, याचें आश्चर्य वाटतें. तसेंच, पृथ्वीवर पाप फार होऊं लागलें म्हणून अलीकडे ग्रहणें फार होतात, असें कित्येक लोक म्हणतात, परंतु त्यांतही कांहीं अर्थ नाहीं. ग्रहणांचें प्रमाण पहिल्यापासून आहे तेंच आहे, असें अनेक ज्योतिष्यांनीं सिद्ध केलें आहे; आणि पृथ्वीवरील लोकांच्या बऱ्यावाईट आचरणाचा व आकाशांतील स्थितीचा परस्परांशीं कांहींएक संबंध नाहीं.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ग्रहणाचा वेध व स्पर्श.

सूर्यग्रहे तु नाश्नीयात्पूर्वं यामचतुष्टयम् ।
चंद्रग्रहे तु यामांस्त्रीन् वालवृद्धातुरैर्विना ॥ १५३ ॥
वालवृद्धातुराणां तु याममेकं न भोजनम् ।
चंद्रसूर्यग्रहे भुक्त्वा प्राजापत्येन शुद्ध्यति ॥ १५४ ॥
ग्रस्तोदये विधोः पूर्वं नाहर्भोजनमाचरेत् ।

ग्रहण लागण्यापूर्वीं ग्रहणाचा वेध लागतो, असें धर्मशास्त्रकारांनीं मानिलें आहे. याचें एक व्यावहारिक कारण असें दिसतें कीं, ग्रहण लागलें म्हणजे पृथ्वीवर सूर्याचा पुरेसा प्रकाश न पडल्यामुळें हवा दूषित होऊन त्या योगानें पचनादि क्रिया बरोबर घडत नाहीं आणि त्यामुळें प्रायः रोग उत्पन्न होण्याचा संभव असतो. म्हणून शास्त्रकारांनीं ग्रहणापूर्वीं कांहीं काळपर्यंत भोजनाचा निषेध सांगितला आहे. तसेंच, ज्या प्रमाणानें चंद्रसूर्यांच्या प्रकाशाचे पृथ्वीवर कमी अधिक परिणाम होतात, तदनुरोधानें भोजनाच्या निषेधाचा काळही कमीअधिक ठरविलेला आहे. तो असा कीं, चंद्रग्रहणाचा ग्रहणप्रहराच्या पूर्वींचे तीन प्रहर म्हणजे नऊ तास व सूर्यग्रहणाचा ग्रहणप्रहराच्या पूर्वींचे चार प्रहर म्हणजे बारा तास वेध लागतो. उदाहरणार्थ, दिवसाच्या पहिल्या प्रहरांत सूर्यग्रहण असेल तर आदल्या दिवशीं रात्रीं पहिल्या प्रहरापासून वेध लागतो. तसेंच, रात्रीच्या पहिल्या प्रहरीं चंद्रग्रहण असेल तर दिवसाच्या दुसऱ्या प्रहरापासून वेध लागतो. दिवसाचे प्रहर मोजणें ते सूर्योदयापासून मोजावे व रात्रीचे प्रहर मोजणें ते सूर्यास्तापासून मोजावे. तीन तासांचा एक प्रहर होतो. वेध लागल्यापासून ग्रहण सुटेपर्यंत भोजन वगैरे करूं नये. केलें असतां एक दिवस उपोषण करावें असें सांगितलें आहे. लहान मुलें, म्हातारीं माणसें आणि रोगी यांनीं ग्रहण लागण्यापूर्वीं यथाशक्ति दीड प्रहर म्हणजे साडे चार तास किंवा निदान सहा घटिका म्हणजे सुमारें अडीच तास मात्र भोजन करूं नये. कित्येक धर्मशास्त्रकारांच्या मतें हा चार प्रहरांच्या वेधाचा भोजनाविषयींचा नियम केवळ खग्रास ग्रहणालाच लागू आहे. म्हणजे पूर्ण मंडल ग्रास असेल तरच चार प्रहर वेध समजावा. यावरून $\frac{3}{4}$ ग्रास असेल तर ३ प्रहर वेध, अर्धग्रास असेल तर अर्धं म्हणजे २ प्रहर वेध व $\frac{1}{4}$ ग्रास असेल तर १ प्रहर वेध समजून वेधामध्यें भोजन करूं नये. चंद्रग्रहणाचे दिवशीं ग्रहण लागल्यानंतर चंद्रोदय होणार असेल तर त्या दिवशीं दिवसा भोजन करूं नये.

ग्रस्तावेवास्तमानं तु रवींदू प्राप्नुतो यदि ।
परेद्युरुदये स्नात्वा शुद्धोऽभ्यवहरेन्नरः ॥ १५५ ॥

तसेंच ग्रहण लागलें असून तशा स्थितींत चंद्रसूर्य अस्तास जातील तर दुसऱ्या दिवशीं ते ग्रह उदयास आल्यानंतर स्नान करून भोजन करावें.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ग्रहण लागूं लागलें म्हणजे ग्रहणाचा स्पर्श झाला असें म्हणतात; व ग्रहण सुटलें म्हणजे ग्रहणाचा मोक्ष झाला असें म्हणतात. ग्रहणाचा स्पर्श झाल्यापासून मोक्ष होईपर्यंत जो मधला काळ, त्यास पर्वकाळ म्हणतात. ग्रहणसमयीं बिंबाचा जितका भाग आच्छादित होतो, तितका ग्रास झाला असें समजतात. कोणत्या दिशेनें ग्रहणाचा स्पर्श व मोक्ष होतो हें पंचांगांत दाखविलेलें असतें. तसेंच, किती वाजतां होतो, हेंही घटिकापळांनीं व कलाकमिन्युटांनीं दाखविलेलें असतें.

शुभाशुभग्रहण.

ग्रहणं जन्मभात् श्रेष्ठं दशैकादशषट्त्रिकम् ।
मध्यमं पंचसप्ताश्विनवमस्थानसंस्थितम् ।
नेष्टमंत्याष्टतुर्यस्थं जपाच्छांतिर्भविष्यति ॥ १५६ ॥

ग्रहणदिवशीं ज्या राशीस चंद्र असेल त्या राशीस ग्रहण आहे असें समजावें. आपल्या जन्मराशीपासून तिसऱ्या, सहाव्या, अकराव्या किंवा दहाव्या राशीस जर ग्रहण असेल तर शुभ आहे असें समजावें. दुसऱ्या, सातव्या, नवव्या, किंवा पांचव्या राशीस असेल तर मध्यम, आणि आपल्या राशीस किंवा राशीपासून चवथ्या आठव्या किंवा बाराव्या राशीस किंवा जन्मनक्षत्रीं असेल तर अनिष्ट आहे असें जाणावें. ग्रहण आपल्या राशीस अनिष्ट असेल आणि सामर्थ्य असेल तर सुवर्णाचें बिंब करून तें, कांस्यपात्रांत तूप घालून तिळ, वस्त्र आणि दक्षिणा यांसह सत्पात्रीं दान द्यावें, असें धर्मशास्त्रकार म्हणतात. परंतु जपानेंही क्लेश दूर होतात असें मानिलें आहे. प्रत्यक्ष ग्रहण कोणींच पाहूं नये. त्यांत ज्यांच्या राशीस अनिष्ट असेल त्यांनीं किंवा गर्भवती स्त्रियांनीं मुळींच पाहूं नये. इतरांस पाहणेंच असेल तर वस्त्र, उदक किंवा कांच यांतून पहावें. दृष्टीनें ग्रहण पाहिलें नाहीं म्हणजे स्वराशीस अनिष्ट असतांही ग्रहणाचा दोष लागत नाहीं.

ग्रहणांतील कृत्यें.

रविग्रहः सूर्यवारे सोमे सोमग्रहस्तथा ।
चूडामणिरिति ख्यातस्तत्र दत्तमनन्तकम् ॥ १५७ ॥
सूर्येंदुग्रहणं यावत्तावत्कुर्याज्जपादिकम् ।
न स्वपेन्न च भुंजीत स्नात्वा भुंजीत मुक्तयोः ॥ १५८ ॥
चंद्रसूर्यग्रहे यस्तु श्राद्धं विधिवदाचरेत् ।
तेनैव सकला पृथ्वी दत्ता विप्रस्य वै करे ॥ १५९ ॥

चंद्रग्रहण असो अथवा सूर्यग्रहण असो, जोंपर्यंत तें डोळ्यांनीं दिसत असेल तोंपर्यंत त्याचा पुण्यकाळ असतो. रविवारीं आलेलें सूर्यग्रहण व सोमवारीं आलेलें

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

चंद्रग्रहण यांस चूडामणिग्रहण अशी संज्ञा आहे. चूडामणिग्रहणांत सत्पात्रीं म्हणजे विद्वान् व धार्मिक ब्राह्मणांना व अंध, पंगु, थोटे इत्यादिकांना दान केलें असतां अनंतफलप्राप्ति होते. ग्रहण लागल्याबरोबर स्नान, मध्यें जप देवपूजा वगैरे, व सुटण्यास आरंभ झाला म्हणजे दान व सुटलें म्हणजे पुनः स्नान, याप्रमाणें करावें असें धर्मशास्त्रकार म्हणतात. ग्रहणांत समुद्रस्नान फार पुण्यकारक मानिलें आहे. समुद्रस्नान घडणें अशक्य असेल, तर तीर्थांच्या ठिकाणीं स्नान करावें. तीर्थस्नान घडणें शक्य नसेल तर एकाद्या नदीचें स्नान करावें. तेंही न घडेल तर निदान शीतोदकानें स्नान करावें. अशक्तांनीं उष्णोदकानें स्नान करावें. सुवासिनी स्त्रियांनीं गळ्याखालीं स्नान करावें, असा शास्त्राचा आधार आहे. तथापि शिष्टांच्या स्त्रिया ग्रहणांत डोकीवरूनच स्नान करितात असें प्रायः सर्वत्र आढळतें. सुव्हेरांत किंवा सूतकांत ग्रहणसंबंधीं स्नान, दान वगैरे अवश्य केलेंच पाहिजे. चंद्रसूर्यग्रहणांमध्यें श्राद्ध केलें असतां पृथ्वीदानाचें फळ आहे. निदान आमश्राद्ध किंवा हेमश्राद्ध करावें. रजस्वला स्त्रियांनीं पात्रांत पाणी घेऊन स्नान करावें.

अन्नादिवस्तूंचा ग्रहणांत दोष.

आरनालं पयस्तक्रं दधिस्नेहाज्यपाचितम् ।
मणिकस्थोदकं चैव न दुष्येद्राहुसूतके ॥ १६० ॥

ग्रहणापूर्वीं तयार केलेले भक्षणाचे पदार्थ ग्रहणानंतर दूषित होतात असें मानिलेलें आहे. परंतु कांजी, दूध, ताक, दहीं, घृतपाचित फराळाचे सर्व पदार्थ, मोठमोठ्या माठांतील पाणी इत्यादि वस्तु ग्रहणानें अपवित्र होत नाहींत. अर्थात् "अन्नं पक्वमिदं त्याज्यं" या वचनाच्या आधारें ग्रहणापूर्वीं शिजविलेलें अन्न मात्र ग्रहणानंतर सेवन करूं नये. इतर पदार्थांवर ग्रहणांत तुलसीपत्र, दर्भ किंवा तीळ ठेवण्याचा परिपाठ आहे. त्यास "तिलदर्भैर्न दुष्यंति" असें निर्णयसिंधूंत दिलेलें अन्य ग्रंथांतील वचन आहे.

संक्रांति.

पूर्वं परित्यज्य यदा ग्रहाणां राशिं परं प्रत्ययनं स कालः ।
संक्रांतिवाच्योऽयमतिप्रशस्तः स्नाने च दाने च रवेर्विशेषात् ॥१६१॥

कोणत्याही ग्रहाचें एका राशींतून दुसऱ्या राशींत जाणें यास संक्रांतिकाल म्हणतात. हा स्नानदानाविषयीं फार प्रशस्त मानिलेला आहे. त्यांतल्या त्यांत सूर्यसंक्रमणाचा काल विशेष पुण्यदायक आहे. मेष, वृषभ आदिकरून सूर्याचे बारा संक्रांतिकाल आहेत. परंतु धर्मशास्त्रकारांनीं कर्क आणि मकर या संक्रांतींना इतर संक्रांतींपेक्षां विशेष महत्त्व दिलें आहे. त्यांतही मकरसंक्रमणाचा काल विशेष पुण्यदायक मानिला आहे. याचें कारण असें आहे कीं, ह्या दोन्ही दिवशीं आकाशांत सूर्याची गति

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

बदलते. म्हणजे कर्कसंक्रांतीचे दिवशीं दक्षिणायनाला व मकरसंक्रांतीचे दिवशीं उत्तरायणाला आरंभ होतो, हें मागें सांगितलेंच आहे. उत्तरायणाचा काल धर्मशास्त्रांतील सर्व शुभ कृत्यें करण्यास उक्त असल्यामुळें आणि त्या कालाचा आरंभ मकरसंक्रांतीपासून होत असल्यामुळें मकरसंक्रमणाचा काल त्यांतल्यात्यांत विशेष पुण्यदायक मानिलेला आहे.

संक्रांतीचा पर्वकाळ.

पुण्याः षोडश नाड्यस्तु पराः पूर्वास्तु संक्रमात् ।
त्रिंशत्कर्काटके पूर्वे चत्वारिंशत्परौ मृगे ॥ १६२ ॥
अस्तादूर्ध्वं तु मकरे रात्रौ संक्रमणं रवेः ।
तदोत्तरदिनं पुण्यं मध्याह्नात्प्राक् प्रकीर्तितम् ॥ १६३ ॥

कोणत्याही संक्रांतीचा आरंभापूर्वीं सोळा घटिका आणि नंतर सोळा घटिकांपर्यंत पर्वकाळ असतो. परंतु कर्कसंक्रांतीचा प्रवेश होण्यापूर्वीं तीस घटिकांपर्यंत आणि मकरसंक्रांतीचा संक्रांतिप्रवेशानंतर चाळीस घटिकांपर्यंत पर्वकाळ असतो. कांहीं ग्रंथकार मकरसंक्रांतीचा वीस घटिकांपर्यंतच उत्तम पर्वकाळ असतो असें म्हणतात. सूर्यास्तानंतर रात्रीं केव्हांही मकरसंक्रांतीचा प्रवेश होईल तर दुसऱ्या दिवशीं माध्याह्नकालापर्यंत पर्वकालाप्रीत्यर्थ स्नानदानादि कृत्यें करावीं. दिवसामध्यें केव्हांही संक्रांतिप्रवेश झाला असतां तत्काल पर्वकाळप्रीत्यर्थ स्नानदान करणें हा उत्तम पक्ष होय. कर्कसंक्रांतीच्या पर्वकाळाविषयीं पुढें तिथिनिर्णयप्रकरणांत माहिती दिली आहे.

संक्रांतीचीं शुभाशुभ फलें.

यस्य जन्मर्क्षमासाद्य तिथौ संक्रमणं भवेत् ।
तन्मासाभ्यंतरे तस्य वैरं क्लेशो धनक्षयः ॥ १६४ ॥
संक्रांत्यधरनक्षत्राद्गणयेज्जन्मभावधि ।
त्रिकं षट्कं त्रिकं षट्कं त्रिकं षट्कं पुनः पुनः ।
पंथा भोगो व्यथा वस्त्रं हानिश्च विपुलं धनम् ॥ १६५ ॥
रव्यादिवारतः संज्ञा घोरा ध्वांक्षी महोदरी ।
मंदाकिनी च नंदा च मिश्रा राक्षसिका क्रमात् ॥ १६६ ॥

---

१ 'मकरे विंशतिः परे' असाही पाठ आहे. त्याचा अर्थ नंतर वीस घटिकांपर्यंत.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

उग्रे क्षिप्रे चरे मैत्रे स्थिरे मिश्रे च दारुणे ।
ता एव संज्ञा गदिता नारदादिमुनीश्वरैः ॥ १६७ ॥
गुरौ गच्छति पूर्वस्यां याम्यां भास्करशुक्रयोः ।
प्रतीच्यां भौमबुधयोरुदक् च शनिचंद्रयोः ॥ १६८ ॥
अर्कौ शुक्रे मुखे पूर्वं सौम्ये भौमे च दक्षिणे ।
शनौ चंद्रे मुखं पश्चात् गुरौ चैत्रोत्तरामुखी ॥ १६९ ॥

जन्मनक्षत्रावर, जन्ममासांत किंवा जन्मतिथीवर संक्रांत झाली तर अनुक्रमें वैर, क्लेश आणि धनक्षय अशीं फळें त्या महिन्यांत होतात. तसेंच, पंचांगांत मकरसंक्रांतीचीं फलें सांगून त्याच्याखालीं 'अथ जन्मर्क्षवशात्फलं' या सदराखालीं सहा कोष्टकें दिलेलीं असतात. त्या सहा कोष्टकांत सर्व नक्षत्रें लिहिलेलीं असतात. आपलें जें जन्मनक्षत्र असेल तें सहा कोष्टकांपैकीं कोणत्या कोष्टकांत आहे हें पहावें. तें 'भोगः' 'वस्त्रं' 'विपुलं धनं' या कोष्टकांत असेल तर चांगलें फल, आणि 'पंथा' 'व्यथा' 'हानि' ह्या तीन कोष्टकांत असेल तर संक्रांतीचें आपल्याला वाईट फल आहे असें समजावें. ज्या वाहनावर संक्रांत बसली असेल किंवा ज्या वस्तु संक्रांतीनें धारण केल्या असतील, त्या सर्व वस्तु महाग होतात किंवा त्यांचा नाश होतो. संक्रांतीचीं वाहनें, उपवाहनें, भक्षणाचे व धारणाचे पदार्थ पंचांगांत लिहिलेले असतात, ते सर्व बवबालवादि करणांवरून ठरलेले आहेत. संक्रांत अमुक दिशेकडे जाते किंवा अमुक दिशेकडे पहाते, हें वारांवरून ठरविलेलें आहे. म्हणजे रविवारीं किंवा शुक्रवारीं संक्रांत असतां दक्षिणेकडे, सोमवारीं किंवा शनिवारीं असतां उत्तरेकडे, मंगळ आणि बुध या वारीं पश्चिमेकडे आणि गुरुवारीं असतां पूर्वेकडे जाते असें मानिलेलें आहे. ज्या दिशेकडे संक्रांतीचें गमन असतें, त्याच्या समोरच्या दिशेकडून आगमन होतें. आणि ज्या दिशेकडे मुख असतें, त्याच्या उजव्या हाताकडील उपदिशेकडे दृष्टि असते. उदाहरणार्थ, उत्तरेकडे गमन असेल तर दक्षिणेकडून आगमन आणि ईशान्येकडे अवलोकन असतें. संक्रांतीचीं घोरा, ध्वांक्षी, महोदरी, मंदाकिनी, नंदा, मिश्रा, राक्षसी अशीं रविवारादि सात वारांचीं अनुक्रमेंकरून निरनिराळीं सात वारनांवें आहेत. म्हणजे रविवारीं संक्रांति असतां घोरा, सोमवारीं असतां ध्वांक्षी इत्यादि. हींच नक्षत्रनामें होत. तीं उग्र, क्षिप्र, चर, मैत्र, स्थिर, मिश्र आणि दारुण ह्या सात प्रकारच्या नक्षत्रांचीं सात नांवें समजावीं. उदाहरणार्थ, उग्रनक्षत्रीं संक्रांति असतां घोरा, क्षिप्रनक्षत्रीं असतां ध्वांक्षी, चरनक्षत्रीं असतां महोदरी इ०. उग्रक्षिप्रादि नक्षत्रें कोणतीं हें मागें नक्षत्रांच्या विशेष संज्ञा लिहिल्या आहेत त्यांत सांगितलें आहे. शिवाय पुढील कोष्टकांत ही सर्व माहिती दिली आहे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

संक्रांतीचीं वारनामें व गमनादि दिशा.

वार	रवि	सोम	मंगळ	बुध	गुरु	शुक्र	शनि
नांवें गमन दृष्टि मुखाची दिशा	घोरा दक्षिण नैर्ऋत्य पूर्व	ध्वांक्षी उत्तर ईशान्य पश्चिम	महोदरी पश्चिम वायव्य दक्षिण	मंदाकिनी पश्चिम वायव्य दक्षिण	नंदा पूर्व आग्नेयी उत्तर	मिश्रा दक्षिण नैर्ऋत्य पूर्व	राक्षसी उत्तर ईशान्य पश्चिम

नक्षत्रांवरून संक्रांतीचीं नांवें.

नांवें	घोरा	ध्वांक्षी	महोदरी	मंदाकिनी	नंदा	मिश्रा	राक्षसी
नक्षत्रें	उग्रन० ३ पूर्वा भरणी मघा	क्षिप्रन० पुष्य अश्विनी अभिजित हस्त	चरन० स्वाती श्रवण धनिष्ठा शतता० पुनर्वसु	मैत्रन० मृग चित्रा अनुरा० रेवती	स्थिरन० रोहि० ३ उत्तरा	मिश्रन० विशा० कृत्ति०	दारुणन० ज्येष्ठा आर्द्रा आश्ले० मूल

संक्रांतीच्या वाहनवस्त्र भक्षणादि वस्तु.

करण	१ बव	२ बालव	३ कौलव	४ तैतिल	५ गर	६ वणिज	७ विष्टि	८ शकु०	९ चतु०	१० नाग	११ किंस्तु.
वाहन	सिंह	व्याघ्र	डुकर	गर्दभ	हत्ती	महिष	घोडा	श्वान	मेंढा	बैल	कोंबडा
उपवा.	गज	अश्व	बैल	मेंढा	खर	उंट	सिंह	वृषभ	वृषभ	व्याघ्र	वराह
वस्त्र	शुभ्र	पीत	हिरवें	पांडुर	तांबडें	निळें	काळें	चित्र	कंबल	नग्न	निळें
लेपन	कस्तुरी	कुंकूं	चंदन	गोपी०	गोरो०	आळता	हळद	काजळ	शेंदूर	अगरु	कर्पूर
पुष्प	चंपक	जाई	बकुळी	केवडा	बेल	रुई	दूर्वा	कमळ	मोगरा	राटला	जास्वंद
भक्षण	अन्न	पायस	भक्ष्य	अपूप	दूध	दहीं	चित्रान्न	गूळ	मध	घृत	शर्करा
आयुध	भृशुंडी	गदा	खड्ग	दंड	धनु	तोमर	भाला	पाश	अंकुश	अस्त्र	बाण
जाति	देव	भूत	सर्प	पक्षी	पशु	मृग	विप्र	क्षत्रि०	वैश्य	शूद्र	संकर
वय	बाळा	कुमारी	मुग्धा	तरुणी	प्रौढा	वृद्धा	वृद्धा	वंध्या	वंध्या	पुत्रेच्छु	संन्या.
भूषण	पोंवळें	मौक्ति०	रौप्य	हिरे	गोमेद	नील	सोनें	सिसें	कांसें	तांबें	लोखंड
	नूपूर	कंकण	मोतीं	पोंवळें	मुकुट	मणि	गुंजा	कवडी	नील	पाच	कनक
स्थिति	बसले.	बसले.	उभी	निजले.	बसले.	बसले.	बसले.	उभी	निजले.	निज०	उभी

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

संक्रांतीचा दानविधि.

यः कांस्यपात्रे कनकार्कबिंबं तिलाज्यपूर्णं विधिवत्प्रपूज्य ।
सदक्षिणं वेदविदे प्रदद्यात् संक्रांतिकाले स लभेदभीष्टम् ॥ १७० ॥
तिलतैलेन दीपाश्च देया विप्रगृहे शुभाः ।
उत्तरे त्वयने विप्रे वस्त्रदानं महाफलम् ॥ १७१ ॥
तिलस्नायी तिलोद्वर्ती तिलहोमी तिलोदकी ।
तिलभुक् तिलदाता च षट् तिलाः पापनाशकाः ॥ १७२ ॥

मकरसंक्रांतीच्या पर्वकाळांत कांस्यपात्रांत तीळ व तूप भरून, त्यावर सुवर्ण-प्रतिमा ठेवून व त्याची विधियुक्त पूजा करून विद्वान्, कुटुंबवत्सल अशा सदाचरणी ब्राह्मणाला तें कांस्यपात्र दान द्यावें, व दानसांगतेसाठीं दक्षिणा द्यावी. तिळाच्या तेलाचे दिवे ब्राह्मणाच्या घरीं लावावे. वस्त्रदानाचें फलही विशेष सांगितलें आहे. मकरसंक्रांतीचे दिवशीं १ अंगाला तीळ लावणें, २ तिळोदकानें स्नान करणें, ३ तिळांचा होम, ४ तिळोदकानें पितृतर्पण, ५ तिलदान व ६ तील भक्षण करणें अशा सहा प्रकारांनीं तिळांचा उपयोग करावा.

करीचे दिवस.

पंचकं ग्रहणहोलिकायनं प्रेतदाहविधि भाउकादिनं ।
तत्परं च करिसंज्ञकं दिनं गर्हितं सकलकर्मसूभयं ॥ १७३ ॥

ग्रहण, होळीचा दिवस, दोन अयनदिवस, म्हणजे कर्क व मकर या दोन संक्रांतींचे दिवस, प्रेतदहनविधि झालेला दिवस आणि भाउका दिन म्हणजे वैशाखमासाची अमावास्या या सहा दिवसांच्या दुसऱ्या दिवसाला करीचा दिवस म्हणतात. म्हणून हे उभय दिवस म्हणजे करीचा दिवस व त्याचा पूर्व दिवस असे दोन्ही दिवस शुभ कर्माला निंद्य आहेत म्हणून त्या दिवशीं प्रयाण किंवा कोणतेंही मंगलकृत्य करूं नये.

गतसंक्रांतीवरून नूतन संक्रांतिकाल.

वारे रूपं तिथौ रुद्रा नाड्यः पंचदशैवतु ।
जीर्णपत्रप्रमाणेन संक्रांतिर्नूतना भवेत् ॥ १७४ ॥

पूर्वसंवत्सराच्या संक्रांतीच्या वेळेवरून चालू वर्षांतील कोणत्याही संक्रांतीची वेळा काढावयाची असेल तर गतवर्षीच्या संक्रांतीच्या वाराच्या अनुक्रमांकांत १ मिळवावा. शुक्लप्रतिपदेपासून तिथि मोजून त्या तिथींमध्यें ११ मिळवावे. (ह्या बेरजेचा अंक तिसांहून ज्यास्त असल्यास तो तिसांमध्यें वजा करावा.) घटिकांमध्यें १५ मिळवावे. (हा मिळवणीचा अंक साठांहून अधिक असल्यास तो साठांतून वजा करावा.) म्हणजे चालू वर्षी कोणत्या वारीं कोणत्या तिथी ला सूर्योदयापासून किती

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

घटिकांनीं संक्रांतिप्रवेश होईल तें कळतें. उदाहरण—शके १८५५ ह्या संवत्सरांतील मकरसंक्रांति पौष कृष्ण १४ ला रविवारीं सूर्योदयापासून ४८॥ घटिकांनीं होती, म्हणून रविवाराचा अंक १ यांत १ मिळविला. १+१=२ म्हणजे सोमवार होय. तिथीमध्यें (शुक्लपक्षांतील १५ व कृष्णपक्षांतील १४=२९) अकरा मिळविले म्हणजे २९+११=४० तिथि झाल्या. ह्या तिसांतून वजा करितां शेष १० म्हणजे दशमी तिथि झाली. संक्रांतिप्रवेश ४८॥ घटिकांनीं होता. त्यांत १५ मिळविले. ४८॥+१५=६३॥ हे साठ घटिकांतून वजा जातां बाकी ३॥ घटिका राहिल्या. म्हणून पौष शुद्ध दशमीला सोमवारीं सकाळीं ३॥ घटिकांचे सुमारास १८५६ संवत्सरांतील मकरसंक्रांति असेल. संक्रांतीच्या पंधरवड्यांत तिथीची क्षयवृद्धि असतां एक दोन प्रहराचा क्वचित फरक पडण्याचा संभव आहे.

पंचांग पाहण्याची रीति.

तिथिर्वारश्च नक्षत्रं योगः करणमेव च ।
एतैः पंचभिरंगैः संयुतं पंचांगमुच्यते ॥ १७५ ॥

तिथि, वार, नक्षत्र, योग आणि करण हीं कालाचीं पांच मुख्य अंगें ज्यांत दाखविलेलीं असतात, त्यास पंचांग असें म्हणतात. ह्या पांच अंगांखेरीज ज्यांचा ज्योतिषाशीं मुळींच संबंध नाहीं अशा पुष्कळ उपयुक्त गोष्टी पंचांगांत दाखविण्याचा अलीकडे प्रचार पडला आहे. पंचांग बहुतकरून सर्वांस पाहतां येतें, परंतु ज्यांस तें पाहण्याची पद्धति ठाऊक नसेल त्यांच्याकरितां पुढील माहिती दिली आहे.

मुंबई किंवा पुणें येथील पंचांग घ्या, आणि कोणताही महिना काढा. पंचांगांत शिरोभागीं पहिल्या आडव्या ओळीस डाव्या हाताकडे शक, महिना व पक्ष हीं दाखविलेलीं असतात; व उजव्या हाताकडे अयन व ऋतु हीं दाखविलेलीं असतात. पंचांगांत उभीं कोष्टकें पुष्कळ आहेत. त्यांपैकीं पहिल्या कोष्टकांत एक, दोन, तीन असे जे अनुक्रमानें अंक दिलेले आहेत त्या तिथि होत. दुसऱ्या कोष्टकांत वार लिहिलेले असतात. वाराचें पूर्ण नांव न लिहितां फक्त पहिलें अक्षर लिहितात. तिसऱ्या व चवथ्या कोष्टकांत अनुक्रमें तिथींच्या घटिका व पळें हीं दाखविलेलीं असतात. पांचव्या कोष्टकांत दिवसाचें नक्षत्र लिहिलेलें असतें. वारांप्रमाणें नक्षत्राचें देखील फक्त पहिलेंच अक्षर लिहिण्याचा प्रचार आहे. सत्तावीस नक्षत्रांपैकीं ज्यांचीं आद्याक्षरें सारखींच आहेत, अशीं कांहीं नक्षत्रें आहेत. उदाहरणार्थ, 'अ' म्हणजे अश्विनी किंवा अनुराधा होईल. 'आ' म्ह० आर्द्रा किंवा आश्लेषा होईल. 'पु' म्ह० पुनर्वसु किंवा पुष्य होईल, 'पू' म्ह० पूर्वा, पूर्वाषाढा किंवा पूर्वाभाद्रपदा होईल. आणि 'उ' म्हणजे उत्तरा, उत्तराषाढा किंवा उत्तराभाद्रपदा होईल. अशा ठिकाणीं चुकी होण्याचा संभव असतो, म्हणून नक्षत्र पाहतेवेळीं मागचें व पुढचें नक्षत्र पाहून नंतर दिवसनक्षत्र ठरवावें. पंचांगकारांनीं या ठिकाणीं थोडीशी सुधारणा केली तर

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

बरें होईल. संशयाचीं स्थलें असतील तेथें नक्षत्राचें एकच अक्षर न लिहितां दोन दोन अक्षरें लिहावीं. जसें, अनुराधांबद्दल अनु. उत्तराषाढांबद्दल उ. षा., इत्यादि. सहाव्या व सातव्या कोष्टकांत अनुक्रमें नक्षत्रांच्या घटिका व पळें लिहितात. आठव्या कोष्टकांत योग दाखविलेला असतो. नवव्या व दहाव्या कोष्टकांत योगाच्या अनुक्रमें घटिका व पळें हीं दाखविलेलीं असतात. अकराव्या कोष्टकांत करण व बाराव्या कोष्टकांत करणाच्या घटिका असतात. करणाचीं पळें दाखविण्याचा बहुतकरून प्रचार नाहीं. तेराव्या कोष्टकांत दिनमान दाखवितात. ह्या कोष्टकाच्या शिरोभागीं दि. (दिनमान) असें लिहिलेलें असतें. पंध्रवड्याच्या पहिल्या व शेवटच्या दिवशीं मात्र दिनमानाच्या घटिका व पळें हीं दाखविलेलीं असतात. मधल्या दिवशीं फक्त पळेंच लिहिलेलीं असतात. म्हणून एकाद्या मधल्याच दिवसाचें दिनमान पाहिजे असल्यास प्रतिपदेच्या दिनमानाच्या घटिका पळांच्यामागें धराव्या. चवदा, पंधरा आणि सोळा ह्या कोष्टकांत अनुक्रमें पारशी, मुसलमानी, व इंग्रजी तारखा लिहितात. सतराव्या व अठराव्या कोष्टकांत अनुक्रमें रवीच्या उदयाचे व रवीच्या अस्ताचे तास व मिनिटें हीं दिलेलीं असतात. एकोणिसाव्या कोष्टकांत त्या दिवशीं कोणत्या राशीचा चंद्र असतो, तें लिहितात. कांहीं पंचांगकर्ते विषघटी व लग्नभोग्य दाखवितात.

हीं कोष्टकें संपल्यानंतर त्यांच्यापुढें बऱ्याच रुंदीचें एक कोष्टक असतें, त्यांत ज्या दिवशीं जें विशेष असेल तें त्या दिवसाच्या पुढें लिहितात. उदाहरणार्थ, 'संकष्ट ४' 'प्रदोषः' 'शिवरात्रिः' 'मिथुनेऽर्कः' इत्यादि. तसेंच, या पुस्तकाच्या प्रथमावृत्तींत सूचना केल्यावरून म्हणा किंवा कांहीं अन्य कारणांमुळें म्हणा पंचांगांत ज्ञानदेव, तुकाराम वगैरे साधुपुरुषांच्या, व शिवाजीसारख्या प्रसिद्ध कर्तृत्ववान् पुरुषांच्या पुण्यतिथींचे दिवस दाखविण्याचा प्रघात पंचांगकारांनीं पाडिला ही गोष्ट फार सोयीची झाली आहे. तसेंच, मुक्तेश्वर, श्रीधर, मोरोपंत आदिकरून कवींच्या पुण्यतिथींचे दिवस पंचांगांत लिहिले असतांही महाराष्ट्रीयांस सोयीचें होईल.

पंचांगाच्या उजव्या बाजूस वरच्या कोंपऱ्यांत एक कोष्टक असतें, त्यांत रवि, चंद्र वगैरे ग्रहांचीं नांवें संक्षेपानें देऊन प्रत्येक ग्रहाच्या खालीं कांहीं अंक लिहिलेले असतात. हे अंक पंध्रवड्याच्या शेवटच्या दिवशीं सूर्योदयसमयीं आकाशांत ते ते ग्रह कोणत्या ठिकाणीं आहेत, हें दाखवितात. उदाहरणार्थ, रवीच्या खालीं १।२३।३८।३२ असे आंकडे आहेत, अशी कल्पना करा. याचा अर्थ असा कीं, रवीनें पंध्रवड्याच्या शेवटच्या दिवशीं सूर्योदयीं एक राशी पूर्ण भोगून दुसऱ्या राशीपैकीं २३ अंश ३८ कला आणि ३२ विकला भोगिल्या आहेत, म्हणून कुंडलींत तो दुसऱ्या राशीस

---

१ ज्याप्रमाणें दिनमानाच्या कोष्टकाच्या शिरोभागीं दिनमान या शब्दाचें आद्याक्षर दि. हें सूचनार्थ लिहिलेलें असतें, त्याचप्रमाणें तिथिनक्षत्रादिकांच्या व त्यांच्या घटिकापळांच्या कोष्टकांवरही प्रत्येकाचें आद्याक्षर लिहिण्याची पद्धति सर्व पंचांगकार सुरू करतील तर सोयीचें होईल. ह्या सूचनेवरून कांहीं लोक तसें करूं लागले आहेत.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

दाखविलेला असेल. याचप्रमाणें इतर ग्रहांचें जाणावें. या आंकड्यांच्या खालीं दुसरे आंकडे दिलेले असतात. ते ग्रहांच्या गतीचें प्रमाण दाखविणारे आंकडे असतात. उदाहरणार्थ, रवीच्या खालीं ५७।१२ असे अंक आहेत, याचा अर्थ असा कीं, रवीची दैनिक गति ५७ कला व १२ विकला इतकी आहे. कित्येक ग्रहांच्या खालीं हे अंक देऊन शिवाय 'व' असें अक्षर लिहिलेलें असतें याचा अर्थ तो ग्रह वक्री आहे, असें समजावें. त्याचप्रमाणें गतीच्या कोष्टकांत ग्रह अस्तंगत असल्यास 'अ' असें सर्व पंचांगकार लिहितील तर सोयीचें होईल. तसेच 'उ' उदित व 'मा' मार्गी असें लिहावें.

पंचांगांत उजव्या बाजूस खालच्या कोंपऱ्यांत बारा गृहांचें एक चतुष्कोण चक्र असतें, त्यास कुंडली म्हणतात. ह्या कुंडलींत पंध्रवड्याच्या शेवटच्या दिवसाचे प्रातःकाळचे ग्रह दाखविलेले असतात. म्हणजे पूर्वींच्या चवदा दिवसांत ग्रहांत जो फेरफार होतो, तो कुंडलींत दाखवितात. उदाहरणार्थ, मिथुनराशीचा शुक्र नवमीला २२ घटिका २३ पळांनीं कर्कराशीस गेला आहे, म्हणून तो कुंडलींत कर्कराशीस दाखविलेला तुम्हांला आढळेल. परंतु त्याच पंध्रवड्यांत शुक्र कर्कराशीस गेला त्यापूर्वींच्या एकाद्या वेळेची कुंडली जर तयार करणें असेल, तर पंचांगांतील कुंडलीप्रमाणें कर्कराशीस न दाखवितां तो मिथुनराशीसच दाखविला पाहिजे. असो; जी चालू संक्रांत असेल म्हणजे सूर्य ज्या राशीस असेल त्या राशीचा अंक कुंडलींतल्या मध्यगृहांत लिहितात, व त्याच्यापुढील सारे अंक डाव्या हाताकडील गृहांत अनुक्रमानें लिहितात. पंचांगांतील कुंडली म्हणजे पंध्रवड्याच्या शेवटच्या दिवसाची सूर्योदयाच्या वेळेची लग्नकुंडली होय. कारण जी चालू संक्रांत असेल तेंच दिवसाचें पहिलें लग्न होय, व पंचांगांत मध्यगृहांत तेंच दाखवितात. कुंडलीसंबंधी ह्या पुस्तकाच्या तिसऱ्या प्रकरणांत अधिक विचार केलेला आहे, म्हणून त्याविषयीं येथें विशेष लिहीत नाहीं.

पंचांगांत आणखी अनेक गोष्टींचा समावेश केलेला असतो, त्यांपैकीं मुख्यमुख्य येथें लिहितों. पंचांगांत आरंभीं वर्षफलें दिलेलीं असतात. त्यांत त्या वर्षाचा राजा कोण, मंत्री कोण, वगैरे सांगितलेलें असतें. त्याचा नियम असा आहे कीं,—

चैत्रादौ मेषकर्कार्द्रातुलाकार्मुकवासराः।
नृपो मन्त्री धान्यतोयरससस्याधिपाः क्रमात्॥ १७६॥

म्हणजे चैत्रशुक्लप्रतिपदेस जो वार असेल तो त्या वर्षाचा राजा, मेषसंक्रांति ज्या वारीं होईल तो मंत्री, आर्द्राप्रवेश ज्या वारीं होईल तो मेघेश, कर्कसंक्रांति ज्या वारीं होईल तो अग्रधान्येश, धनसंक्रांति ज्या वारीं असेल तो पश्चाद्धान्येश, तूलसंक्रांति ज्या वारीं होईल तो रसेश, आणि सिंहसंक्रांति ज्या वारीं होईल तो सेनेश, याप्रमाणें जाणावें. अमक्याचा स्वामी अमुक असतां अमुक प्रकारची फलप्राप्ति होते, हें राजावलि आणि कल्पलतानामक ग्रंथांत दिलें आहे. त्यांत चंद्र, बुध, गुरु आणि शुक्र यांचीं फलें चांगलीं असतात, व बाकी ग्रहांचीं फलें वाईट असतात, असें लिहिलें आहे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

'अथ विंशोपकाः' या सदराखालीं पदार्थांचीं व विकारांचीं वगैरे १०५ नांवें देऊन त्यांच्या पुढें कांहीं आंकडे मांडलेले असतात. ते सर्व विसांच्या आंतले असतात. याचें कारण असें आहे कीं, प्रत्येक पदार्थाची किंवा विकाराची इयत्ता वीस विभाग कल्पून त्यांपैकीं निरनिराळ्या वर्षांत त्या पदार्थांची किंवा विकाराची किती उत्पत्ति असते, हें त्या अंकांवरून समजावें. उदाहरणार्थ, वृष्टि १५ याचा अर्थ असा कीं, पावसाची इयत्ता वीस विभाग ठरविलेले आहेत, परंतु त्या विसांतून १५ हिस्से वृष्टि होईल, म्हणजे पाऊस जितका पडणें योग्य आहे, त्याचा तीनचतुर्थांश पडेल. याचप्रमाणें इतर पदार्थांचें समजावें. प्रत्येक पदार्थ विसांनीं विभागला असल्यामुळें याला 'विंशोपक' असें म्हणतात. वाचतांना वृष्टि १५ विश्वे धान्य ११ विश्वे असें वाचण्याचा प्रचार आहे.

राशींचे आय–व्यय.

राशींचे आय आणि व्यय हे पंचांगांतून दिलेले असतात. आय म्हणजे लाभ आणि व्यय म्हणजे खर्च. कोणत्या राशीला किती लाभ आणि किती खर्च त्या संवत्सरांत होईल, हें सांगितलें असतें. त्यावरून आपल्याला वर्ष कसें जाईल ह्याचें अनुमान ज्याचें त्याला काढतां येतें. आय–व्यय काढण्याकरितां प्रथम सूर्यादिग्रहांच्या दशांची वर्षसंख्या समजली पाहिजे म्हणून त्याविषयीं संक्षेपतः लिहितों. दोन प्रकारच्या दशांवरून म्हणजे अष्टोत्तरी व विंशोत्तरी दशांच्या वर्षसंख्येवरून आय व्ययांचे अंक निघतात. अष्टोत्तरी म्हणजे १०८ व विंशोत्तरी म्हणजे १२० वर्षसंख्या जाणावी. ही वर्षसंख्या सर्व ग्रहांमध्यें विभागली गेली आहे ती अशीः—

अष्टोत्तरी दशेचीं वर्षें.

रवौ रसा विधौ तिथ्यो भौमेऽष्टा त्र्यंष्टयो बुधे ।
गुरौ एकोनविंशत्या शुक्रे वर्षैकविंशतिः ।
शनौ च दशवर्षाणि राहौ च द्वादशाब्दकम् ॥ १७७ ॥

विंशोत्तरी दशेचीं वर्षें.

षट् सूर्यो दशकश्चंद्रः सप्तसंख्यो धरासुतः ।
राहुरष्टादशश्चैव जीवे षोडश वत्सराः ।
एकोनविंशतिः सौरिर्बुधे सप्तदश स्मृताः ।
केतोश्च सप्तवर्षाणि शुक्रे विंशतिर्वत्सराः ॥ १७८ ॥

	र.	चं.	मं.	बु.	गु.	शु.	श.	रा.	के.	वर्षें.
अष्टो०	६	१५	८	१७	१९	२१	१०	१२	०	= १०८
विंशो०	६	१०	७	१७	१६	२०	१९	१८	७	= १२०

राशींचे आय व्यय काढण्याकरितां राशींचे स्वामी समजणें देखील अवश्य आहे, म्हणून तेही येथें सांगतों.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

राशींचे स्वामी.

भौमः शुक्रो बुधश्चंद्रः सूर्यः सौम्यो भृगुः कुजः।
गुरुः शनिः शनिर्जीवः क्रमान्मेषादि राशिपाः ॥ १७९ ॥

मेषराशीचा स्वामी मंगळ, वृषभ राशीचा शुक्र, मिथुन राशीचा बुध, कर्केचा चंद्र, सिंहेचा सूर्य, कन्येचा बुध, तूळेचा शुक्र, वृश्चिकेचा मंगळ, धनुराशीचा गुरु, मकर व कुंभ या २ राशींचा शनि व मीन राशीचा गुरु याप्रमाणें अनुक्रमेंकरून मेषादि बारा राशींचे स्वामी जाणावे.

आय-व्यय काढण्याची रीति.

स्वस्वामिवर्षाधिपवत्सरैक्यं त्रिघ्नं शराढ्यं तिथिभक्तशेषम्।
आयोथ लब्धं त्रिगुणेषु युक्तं तिथ्याप्तशेषं व्ययसंज्ञकं स्यात् ॥१८०॥

वर्षस्वामी (चैत्रशुक्लप्रतिपदेचा वार) आणि आपल्या राशीचा स्वामी यांच्या दशांच्या वर्षांची बेरीज करून त्या बेरजेस तिहींनीं गुणून जे अंक येतील त्यांत ५ मिळवावे. व त्या मिळवणीस १५ नीं भागावें. भागाकार करून जी बाकी राहील तो अंक त्या राशीचा आय जाणावा. तसेंच, भागाकाराचा जो अंक असेल त्याला पूर्वीप्रमाणेंच ३ नीं गुणून त्यांत ५ मिळवावे व १५ नीं भागावें. जी बाकी शेष राहील तो अंक त्या राशीचा व्यय जाणावा.

उदाहरण—एका मनुष्याची तूळ रास आहे. त्याचे शके १८५७ संवत्सरांतील आय-व्यय काढावयाचे आहेत. वर्षस्वामी गुरु आहे व राशिस्वामी शुक्र आहे. म्हणून रीतीप्रमाणें वर्षस्वामीच्या दशेचीं वर्षें १९ + राशिस्वामीचीं वर्षें २१=४०× ३=१२०+५=१२५÷१५=८ हा भागाकार. बाकी ५ अंक राहिले. म्हणून ५ हा आय समजावा. आतां व्ययाचे अंक काढूं. भागाकार ८×३=२४+५=२९÷१५=१ हा भागाकार व बाकी १४ राहिली म्हणून १४ हा व्यय समजावा. चैत्रापासून भाद्रपदा-पर्यंत ६ महिन्याचे अष्टोत्तरीमानानें व आश्विनापासून फाल्गुनापर्यंत ६ महिन्यांचे विंशोत्तरी मानानें आय-व्यय काढितात. येथें दिलेलें उदाहरण अष्टोत्तरी मानाचें आहे.

यस्मिन्वर्षे दीर्घ आयः प्रदिष्टस्तस्मिन्वर्षे लाभदश्चातिसौख्यम्।
क्लेशो हानिश्चार्थनाशो व्ययश्चेत्येतंत्सर्वं चिंतयेदब्दमूले ॥ १८१ ॥

आय आणि व्यय ह्या दोहोंचे अंक सारखे असल्यास त्या वर्षांत प्राप्ति व खर्च ह्या दोहोंचें प्रमाण सारखें असेल असें समजावें. आयस्थानाचा अंक जास्त असून व्ययस्थानाचा जितका कमी असेल, तितक्या प्रमाणानें खर्च कमी होऊन त्या संवत्सरांत सुख होऊन कांहीं तरी संग्रह होईल असें समजावें. लाभस्थानापेक्षां व्ययस्थानांतील अंक जास्त असेल तर त्या संवत्सरांत लाभापेक्षां खर्च जास्त होईल, आणि क्लेश होतील असें समजावें. याशिवाय बारीकसारीक गोष्टी पंचांगांत पुष्कळ असतात. परंतु स्थलसंकोचास्तव त्या सर्व येथें देतां येत नाहींत. त्यांपैकीं कांहीं गोष्टी या पुस्तकांत अन्यत्र आल्याच आहेत.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

वेळामुहूर्त.

दिवसाचे ८ व रात्रीचे ८ असे अहोरात्राचे १६ विभाग कल्पून प्रत्येक विभागाला निरनिराळी संज्ञा दिलेली आहे. प्रत्येक विभाग किंवा वेळ ३॥। घटिकांची म्हणजे १॥ तासाची असते. खालीं जे वेळा–मुहूर्त दिले आहेत त्यांपैकीं काळ व रोग हे मुहूर्त अशुभ आहेत. ते सर्व कार्यांस वर्ज करावे. बाकीच्यांच्या वेळांचीं त्यांच्या नांवाप्रमाणें फळें समजावीं. ही माहिती पंचांगांत असते.

तास.[1]	घटिका.	दिवसाच्या वेळा.						
		रवि.	चंद्र.	मंगळ.	बुध.	गुरु.	शुक्र.	शनि.
६–७॥	३॥।	उद्योग.	अमृत.	रोग.	लाभ.	शुभ.	चंचल.	काळ.
७॥–९	३॥।	चंचल.	काळ.	उद्योग.	अमृत.	रोग.	लाभ.	शुभ.
९–१०॥	३॥।	लाभ.	शुभ.	चंचल.	काळ.	उद्योग.	अमृत.	रोग.
१०॥–१२	३॥।	अमृत.	रोग.	लाभ.	शुभ.	चंचल.	काळ.	उद्योग.
१२–१॥	३॥।	काळ.	उद्योग.	अमृत.	रोग.	लाभ.	शुभ.	चंचल.
१॥–३	३॥।	शुभ.	चंचल.	काळ.	उद्योग.	अमृत.	रोग.	लाभ.
३–४॥	३॥।	रोग.	लाभ.	शुभ.	चंचल.	लाभ.	उद्योग.	अमृत.
४॥–६	३॥।	उद्योग.	अमृत.	रोग.	लाभ.	शुभ.	चंचल.	काळ.

तास.	घटिका.	रात्रीच्या वेळा.						
		रवि.	चंद्र.	मंगळ.	बुध.	गुरु.	शुक्र.	शनि.
६–७॥	३॥।	शुभ.	चंचल.	काळ.	उद्योग.	अमृत.	रोग.	लाभ.
७॥–९	३॥।	अमृत.	रोग.	लाभ.	शुभ.	चंचल.	काळ.	उद्योग.
९–१०॥	३॥।	चंचल.	काळ.	शुभ.	अमृत.	रोग.	लाभ.	शुभ.
१०॥–१२	३॥।	रोग.	लाभ.	उद्योग.	चंचल.	काळ.	उद्योग.	अमृत.
१२–१॥	३॥।	काळ.	उद्योग.	अमृत.	रोग.	लाभ.	शुभ.	चंचल.
१॥–३	३॥।	लाभ.	शुभ.	चंचल.	काळ.	उद्योग.	अमृत.	रोग.
३–४॥	३॥।	उद्योग.	अमृत.	रोग.	लाभ.	शुभ.	चंचल.	काळ.
४॥–६	३॥।	शुभ.	चंचल.	काळ.	उद्योग.	अमृत.	रोग.	लाभ.

१ सूर्योदय सहा वाजतां होतो असें साधारण मान धरून वर तास (कलाक) दिले असल्यामुळें सर्व काळीं ते बरोबर असणार नाहींत, थोडा फरक पडेल. कारण, दिनमान सर्वकाळ तीस घटिकांचें असत नाहीं हें मागें सांगितलेंच आहे. म्हणून सूर्योदय ज्या वेळेस जितकीं मिनिटें सहाच्या पूर्वीं असेल त्या वेळेस तितकीं मिनिटें प्रत्येक वेळ वर दिलेल्या तासांच्या पूर्वीं सुरु होईल व बदलेल, व सूर्योदय जितकीं मिनिटें सहांच्या नंतर असेल तितकीं मिनिटें प्रत्येक वेळ नंतर सुरू होईल व नंतर बदलेल. असें समजावें. याचप्रमाणें रात्रीच्याही वेळा समजाव्या.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कालमानाचें कोष्टक.

मराठी.	
६० विपळें............	१ पळ.
६० पळें............	१ घटिका.
२ घटिका.........	१ मुहूर्त.
३० मुहूर्त किंवा ६० घ.	१ अहोरात्र.
१५ अहोरात्र.........	१ पक्ष.
२ पक्ष किं. पंध्रवडे	१ मास.
२ मास............	१ ऋतु.
३ ऋतु............	१ अयन.
२ अयनें...........	१ वर्ष.

इंग्रजी.	
१ पळ...........	२४ सेकंद.
६० सेकंद किं. २॥ पळें	१ मिनिट.
२४ मिनिटें...........	१ घटिका.
२॥ घटिका...........	१ तास.
३ तास किंवा ७॥ घटिका	१ प्रहर.
८ प्रहर किंवा २४ तास	१ दिवस. (अहोरात्र)

दिवस किती आला तें पहाणें.

छाया पादै रसोपेतैश्चैकविंशशतं भजेत् ।
लब्धांके घटिका ज्ञेया शेषांके च पलानि च ॥ १८२ ॥

अलीकडे सर्वत्र घड्याळें झाल्यामुळें वेळ समजण्याला सुलभ मार्ग झाला आहे. परंतु पूर्वीं जेव्हां हीं घड्याळें नव्हतीं तेव्हां कधींही बंद न पडणारें व शीघ्र-मंद न चालतां नियमित गतीनें चालणारें असें अखिल जगताचें एक अत्यंत विश्वसनीय अनादिसिद्ध जें घड्याळ त्यावरूनच लोक वेळ मोजीत असत. तें घड्याळ म्हणजे आकाशांत असलेला देदीप्यमान भगवान् सविता होय. त्याच्या साह्यानें कालमापन करितां येतें. तें असें कीं, उन्हांत उभें राहून आपली छाया आपल्या पावलांनीं मोजावी. जितकीं पावलें होतील, त्यांत सहा मिळवावे व त्या बेरजेनें १२१ या संख्येस भागावें. जो भागाकार येईल, त्या घटिका, व जी बाकी राहील तीं पळें समजावीं. सकाळची वेळ असल्यास तितक्या घटिका दिवस आला, व संध्याकाळची वेळ असल्यास तितक्या घटिका दिवस राहिला असें समजावें. आपली छाया आपल्या पावलांखालींच असली म्हणजे बरोबर मध्यान्ह झाला असें समजावें.

---

१ मुंबईस लोहचुंबकधर्म समजण्याकरितां वेधशाळा आहे. त्याचप्रमाणें मद्रास येथें एक ज्योतिषवेधशाळा आहे. या ठिकाणीं आकाशस्थ ज्योतींच्या वेधावरून घड्याळें लावितात आणि त्यावरून मग सर्वत्र खरा वेळ समजतो. पण वास्तविक हाही खरा वेळ नव्हे. कारण सर्व ठिकाणीं सूर्योदय व सूर्यास्त एकाच वेळीं होत नाहींत, म्हणून प्रत्येक ठिकाणचें घड्याळ तेथील उदयास्तावरून लाविल्याशिवाय किंवा अक्षांशरेखांशावरून स्थानिक वेळ सिद्ध केल्याशिवाय जन्मपत्रिकेंतील लग्नसाधन बिनचूक होणार नाहीं. उदाहरणार्थ, मुंबईस सूर्य मध्यान्हीं येतो, त्याच्या पूर्वीं पुण्यास चार मिनिटें मध्यान्हीं येतो, म्हणून पुण्याचें घड्याळ मुंबईच्या घड्याळापेक्षां चार मिनिटें पुढें पाहिजे. याप्रमाणें इतर ठिकाणांविषयीं समजावें.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

इंग्रजी तारखेचा वार काढणें.

जानेवार्यादिमास प्रतिउदयदिनीं वार पाहे क्रमानें ।
इस्वी अंकांत जोडा त्रिविसें गुण नेखें शून्यं चोवीसें मानें ॥
चारी शून्यार्थं सोळा रवि विसें ऋतुभू घालुनीयां सवाई ।
कीजे रेषेविना त्या नगहृत करुनी शेष वारांक येई ॥ १८३ ॥

कोणत्याही तारखेचा वार काढण्याकरितां प्रथम प्रत्येक महिन्याचे क्षेपक अंक सांगतों:—जानुआरी २३, फेब्रुआरी ३, मार्च २०, एप्रिल ०, मे २४, जून ४, जुलई ०, आगष्ट ८, सप्टेंबर १६, अक्टोबर १२, नोवेंबर २०, डिसेंबर १६. पुढील रीतीप्रमाणें उदाहरण करून प्रथम पहिल्या तारखेचा वार काढावा म्हणजे नंतर पाहिजे त्या तारखेचा वार काढतां येईल. ज्या महिन्याच्या पहिल्या तारखेचा वार पाहिजे असेल त्या महिन्याचा वर दिलेला क्षेपक अंक सनांत मिळवावा. त्यास चोहोंनीं भागावें, आणि भागाकाराचे अंकही त्यांतच मिळवून त्या मिळवणींत एक वजा करावा. (भागाकाराची बाकी सोडून द्यावी.) जी वजाबाकी येईल त्या संख्येस सातांनीं भागावें. येथें जो अंक बाकी राहील तो त्या महिन्याच्या पहिल्या तारखेचा वार होय. बाकी १ असली म्ह० रवि, २ म्ह० सोम, ३ म्ह० मंगळ, ४ म्ह० बुध, ५ म्ह० गुरु, ६ म्ह० शुक्र आणि शून्य म्ह० शनि असें जाणावें. पहिल्या तारखेस जो वार तोच ८, १५, २२, २९ या तारखांस असतो. त्यावरून इष्ट तारखेचा वार काढावा.

उदा०—सन १९१० मे ता० १२ रोजींचा वार पाहिजे आहे म्हणून १९१०+ महिन्याचा क्षेपक अंक २४=१९३४÷४=४८३ हा भागाकार, सन आणि क्षेपक अंक यांच्या बेरजेंत मिळवा. म्हणून १९३४+४८३=२४१७−१=२४१६÷७=३४५ हा भागाकार आला. बाकी १ राहिली. (येथें भागाकाराच्या अंकाचें आपणाला कारण नाहीं) १ हा अंक रविवारचा दर्शक असल्यामुळें पहिल्या तारखेस रविवार होता व तोच आठव्या तारखेस असेल. आणि बाराव्या तारखेस गुरुवार येईल.

दुसरी रीति—सनांतून १८७६ वजा करून बाकी रीति वरच्याप्रमाणें.

उदा०—सन १९१० मेच्या १२ तारखेचा वार काढावयाचा आहे. म्हणून १९१०−१८७६=३४+क्षेपक अंक २४=५८÷४=१४ बाकी २ सोडा. आतां ५८+१४=७२−१=७१÷७=१० हा भागाकार आला. (याचें आपणाला कारण नाहीं.) बाकी राहिली १; म्हणून रविवार हा पहिल्या तारखेचा आणि गुरुवार हा बाराव्या तारखेचा वार होय.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

विवाहादिसंस्कारप्रकरणम् २

षोडश संस्कारांचीं नांवें.

गर्भाधानं पुंसवनं सीमंतोन्नयनं तथा ।
जातकं नामसंस्कारो निष्क्रमश्चान्नभोजनं ॥ १ ॥
चौलकर्मोपनयनं वेदव्रतचतुष्टयम् ।
केशांतः स्नानमुद्वाहः संस्काराः षोडशा स्मृताः ॥ २ ॥
प्रथमं स्यान्महानाम्नी द्वितीयं च महाव्रतम् ।
तृतीयं स्यादुपनिषत् गोदानं च ततः परम् ॥ ३ ॥

संस्कार सोळा आहेत त्यांचीं नांवें—१ गर्भाधान, २ पुंसवन, ३ सीमंतोन्नयन, ४ जातकर्म, ५ नामकर्म, ६ निष्क्रमण, ७ अन्नप्राशन, ८ चौल, ९ उपनयन, १०–१३ वेदव्रतचतुष्टय ४ (१० महानाम्नीव्रत, ११ महाव्रत, १२ उपनिषत् व्रत; १३ गोदान), १४ केशांत, १५ समावर्तन, १६ विवाह इत्यादि. प्रत्येक ब्राह्मणानें स्वशाखेचें वेदाध्ययन करून नंतर इतर तीन्ही वेदांचें अध्ययन करावें, हेंच मुख्य वेदव्रतचतुष्टय जाणावें. ऋक्शाखेंत केशांतालाच गोदान म्हणतात. केशान्त म्हणजे केशखंडन होय. तैत्तिरीय कृष्ण यजुर्वेद्यांचे १ प्राजापत्य, २ सौम्य, ३ आग्नेय, ४ वैश्वदेव असे चार संस्कार आहेत. त्यांस निष्क्रमण संस्कार नाहीं. आपल्या शाखेस सांगितलेले संस्कार तेवढेच ब्राह्मणांनीं करावे. इतर शाखांचे करूं नयेत. ऋग्वेद्यांस पुंसवनानंतर अनवलोभन संस्कार सांगितला आहे.

विवाहसंस्काराचें पावित्र्य.

हेतुर्धर्मार्थकामानां भार्या सच्छीलगामिनी ।
विवाहकालशुद्ध्या तत् शीलं तस्माद्ब्रवीमि ताम् ॥ ४ ॥

वैदिक मंत्रांनीं युक्त असलेला ब्राह्मविवाहविधि हाच ब्राह्मणांना लग्नाचा मुख्य विधि सांगितला आहे. ब्राह्मविवाहामध्यें कालाची शुद्धता पाहून विवाहसंस्कार केल्यानें भार्या धर्मपरायण व सच्छील होऊन तिच्या सहवासानें पतीला धर्म, अर्थ व काम असे त्रिविध पुरुषार्थ साधितां येतात. म्हणून विवाहसमयीं सर्व प्रकारची शुद्धता पाहून नंतर वैदिकसंस्कारपूर्वक पतिपत्नींचा प्रेमळ, पवित्र व पुण्यप्रद संबंध जोडावा, म्हणजे दंपत्य चांगल्या प्रकारें नांदतें.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

विवाहसंबंधास बंधनें.

सापिंड्यगोत्रप्रवरान्वयानां शुद्धिं बुधेन प्रथमं विचिंत्य ।
चिंत्यानि वैवाहिकसाधनानि तदन्यथात्वं यदनर्थहेतुः ॥ ५ ॥

विचारी पुरुषानें विवाहाच्या पूर्वीं, ज्या कुलांतील वधूवरांचा संबंध जोडावयाचा असेल त्यांचें परस्परांतील सापिंड्य (मूळ पुरुषापासून पिढ्यांचा संबंध), गोत्र, प्रवर आणि कुळ यांची शुद्धता पाहून नंतर अष्टविध मैत्री, वधूवरांचे परस्पर अनिष्ट योग, इत्यादि विवाहसाधनांचा विचार करावा.

सापिंड्यनिर्णय.

वध्वा वरस्य वा तातः कूटस्थाद्यदि सप्तमः ।
पंचमी चेत्तयोर्माता तत्सापिंड्यं निवर्तते ॥ ६ ॥

'सपिंड' या शब्दापासून सापिंड्य शब्द झाला आहे. स म्हणजे समान आणि पिंड म्हणजे मूळ पुरुष; अर्थात् मूळपुरुष ज्यांचा एक असेल, अशा सापिंड्यांतील वधूवरांचा विवाह करणें निषिद्ध मानिलें आहे, पण हा सापिंड्याचा नियम कांहीं नियमित पिढ्यांपर्यंतच प्रतिबंधक ठरविला आहे, ही येथें शास्त्रकारांची व्यवहारदक्षता दिसून येते. वधूवरांचा पिता मूळ पुरुषापासून सातवा असेल आणि त्यांची माता मूळ पुरुषापासून पांचवी असेल, तर पुढील पिढीला सापिंड्याची निवृत्ति होते. म्हणजे अनुक्रमें आठव्या व सहाव्या पिढींतील वधूवरांचा विवाह करणें शास्त्रविहित आहे. वधूवरांच्या पित्याकडून जो सापिंड्यसंबंध मूळपुरुषाकडे पोंचतो, त्यास पितृद्वारक सापिंड्य म्हणतात, व त्यांच्या मातेकडून पोंचतो त्यास मातृद्वारक सापिंड्य म्हणतात. ह्या सापिंड्याचा सविस्तर विचार स्थलसंकोचामुळें येथें करितां येत नाहीं. या विषयाचें विशेष विवरण धर्मसिंधु, निर्णयसिंधु इत्यादि ग्रंथांतरीं आहे.

सापिंड्यसंकोच.

वर जें पितृद्वारक आणि मातृद्वारक सापिंड्य सांगितलें आहे, त्याचा संकोच करून, अगदीं संकटावस्था प्राप्त झाली तर तिसऱ्या पिढीपासूनही विवाह करावा असें कांहीं ऋषींचें मत आहे. आणि तदनुसार कांहीं कुलांमध्यें मूळ पुरुषापासून तिसऱ्या पुरुषानें तिसऱ्या कन्येशीं म्हणजे बहिणीच्या मुलानें भावाच्या मुलीशींच म्हणजे मातुलकन्येशींच (किंवा मुलीनें पित्याच्या बहिणीच्या मुलाशींच) विवाह करण्याची पद्धति आहे. पण ज्यांच्या कुलामध्यें हा सांप्रदाय शिष्टसंमत समजला जात असेल, व परंपरेनें तो चालत आला असेल, त्यांनींच मातुलकन्या वरावी. कारण असा संबंध करणें हा गौण पक्ष आहे, असें पुष्कळ लोक समजतात, व अनेक शास्त्रकारांचेंही तसेंच मत आहे. तथापि, संकटसमयीं मात्र असा संबंध करावा असें

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कांहीं ऋषि म्हणतात. पण याहीपेक्षां विचित्र संप्रदाय कर्नाटकांत शिष्टसंमत समजला जाऊन भाऊ, बहिणीच्या कन्येशीं म्हणजे भाचीशीं प्रतिबंधरहित उघड रीतीनें विवाह करितो. कांहीं देशस्थांत, म्हणजे तैत्तिरीय शाखेच्या यजुर्वेदी ब्राह्मणांतही दारिद्र्यामुळें केवळ अतिसंकटकालीं असा विवाह करण्याची क्वचित् रूढि आहे. पण हा प्रचार शास्त्रनिषिद्ध आहे. कारण बहिणीची कन्या ही भावाला नात्यानें स्वतांच्या कन्येप्रमाणेंच होते; म्हणून हा संबंध वर्ज्य करावा. असो. सांप्रत, एका मूळपुरुषाच्या पिढीपासून मातृपक्षाकडून चतुर्थ कन्येचा किंवा चतुर्थ पुरुषाचा पितृपक्षाकडील चतुर्थ कन्येशीं किंवा चतुर्थ पुरुषाशीं विवाह करण्याचा प्रचार सर्वत्र रूढ होत चाललेला आढळतो. पण यांत एक मुख्य गोष्ट अत्यंत आवश्यक आहे ती ही कीं, विवाहनीय वधूवरांचें समान गोत्र व समान प्रवर असूं नयेत. म्हणून या नियमाचें उल्लंघन द्विजांनीं कदापि करूं नये.

विरुद्धसंबंध.

वधूवरयोः परस्परं पितृमातृसाम्ये विरुद्धसंबंधः ।
अविरुद्धसंबंधामुपयच्छेत ॥ (स्मृति)

वधूवरांमध्यें परस्परांत नात्यानें मातृपितृतुल्य संबंध जर येत असेल, तर तो विरुद्धसंबंध होतो, म्हणून अशा वधूवरांचा विवाह करूं नये; कारण अविरुद्ध संबंध असेल, तेथेंच कन्या द्यावी असें सर्वसामान्य स्मृतिवचन आहे. विरुद्धसंबंध म्हणजे उदाहरणार्थ, सावत्र आईची बहीण व तिची कन्या, भगिनीची कन्या (मामाभाची) चुलत्याच्या बायकोची बहीण, बायकोच्या बहिणीची मुलगी इत्यादिकांशीं विवाह करूं नये. सारांश, सापिंड्यसंबंध नसूनही जर विरुद्धसंबंधाचें नातें असेल तर विवाह होत नाहीं.

दत्तक सापिंड्य.

भाऊबंदांपैकीं स्वगोत्रांतील मुलगा दत्तक घेतला असेल, तर तो सगोत्र व सपिंडच आहे म्हणून त्याच्याबद्दल सापिंड्यसंबंधाचा विचार करण्याचें कारणच नाहीं. आतां परगोत्रांतील मुलगा दत्तक घेतला असेल तर त्यानें जनक (जन्मदात्या) पित्याचें गोत्र व दत्तक घेणाऱ्या पालक पित्याचें गोत्र अशीं दोन्ही गोत्रें पाळलीं पाहिजेत. म्हणजे जनक गोत्रांतील कन्येबरोबर व पालक गोत्रांतील कन्येबरोबर त्याला विवाह करितां येत नाहीं. हा दोन गोत्रांचा संबंध कितीही पिढ्या लोटल्या तरी कधींच तुटत नाहीं. इतकेंच नव्हे, तर स्वतः दत्तक, त्याची पुत्रपौत्रप्रपौत्रादि सर्व संतति व उभयकुलांतील त्याचे सर्व सपिंड ह्या सर्वांनीं हें दोन गोत्रांचें नियमबंधन पाळलेंच पाहिजे. जर उपनयन झालेला परगोत्रांतील मुलगा दत्तक घेतला असेल, तर त्या मुलानें जनक मातापितरांचें (जन्मदात्या माता-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पित्यानें उपनयन केल्यामुळें) अनुक्रमें पांच व सात पिढ्या सापिंड्य पाळावें आणि पालक मातापितरांचें तीन पिढ्या पाळावें. पण परगोत्रांतील दत्तकाच्या पालक-पित्यानें जर मुलाचे उपनयनादि संस्कार केले असतील, तर पालक मातापितरांचें अनुक्रमें पांच व सात पिढ्या व जनक मातापितरांचें तीन पिढ्याच सापिंड्य पाळावें. ह्याचप्रमाणें परगोत्रांतील कन्या दत्तक घेतली असतां जनक व पालक अशा दोन्ही पित्यांचीं गोत्रें विवाहाला वर्ज्य करावीं.

ग्रहांचे अस्तोदय आणि बाल्यवृद्धत्व.

रविणा सन्निकर्षेण्येषां ग्रहाणामस्त उच्यते ।
ततोऽर्वाग्वार्धकं प्रोक्तमूर्ध्वं बाल्यं प्रकीर्तितम् ॥ ७ ॥

प्रथम दिसत असलेला कोणताही ग्रह सूर्यासन्निध येऊन सूर्याच्या तेजोमय किरणांत लुप्त होऊन दिसेनासा झाला, म्हणजे त्या ग्रहाचा अस्त झाला असें म्हणतात. आणि सूर्यापासून फार अंतरावर गेल्यामुळें पुनः दिसूं लागला म्हणजे त्याचा उदय झाला असें म्हणतात. तसेंच, कोणत्याही ग्रहाच्या अस्तापूर्वीच्या कांहीं नियमित दिवसांना त्या ग्रहाचे वार्धक्याचे दिवस म्हणतात. आणि उदयानंतरच्या कांहीं दिवसांना शिशुत्वाचे किंवा बालत्वाचे दिवस असें म्हणतात. सर्व ग्रहनक्षत्रादिकांना उदयास्त आहेतच; परंतु गुरु-शुक्रांच्या अस्तोदयांचा मात्र आपल्या विवाहादि संस्कारांशीं व इतर धर्मकृत्यांशीं संबंध आहे, म्हणून त्याविषयीं येथें माहिती देतों. मंगळ, बुध आणि शनि यांचे अस्त कोणत्याही कृत्याला प्रतिकूल मानिलेले नाहींत.

गुरुशुक्रांच्या अस्तोदयाचा काल.

मासमेकं गुरोरस्तं प्रायशो न भवेत् पुनः ।
[३५]खौंध्यग्निदिनपर्यंतमुदयात्, कथ्यते बुधैः ॥ ८ ॥
प्राच्यामस्तंगतः शुक्रः प्रतीच्यां [७२]द्विखैर्दिनैः ।
दृश्यते, नोदयाच्चास्तं [२५०]खेषुद्वौ दिवसान् खलु ॥ ९ ॥
पश्चिमस्यां यदाऽस्तं चेत् प्राच्यामुदयते भृगुः ।
प्रायो दशदिनादूर्ध्वमेवं ज्ञेयो विचक्षणैः ॥ १० ॥

गुरूचा अस्त २५ पासून ३०-३२ दिवसांपर्यंत असतो, आणि एकदां उदय झाला म्हणजे पुनः सुमारें ३७० ते ३७६ दिवसपर्यंत अस्त होत नाहीं. शुक्राचा पूर्वेस अस्त झाला म्हणजे ७२ दिवसांनीं पश्चिमेस उदय होतो. पण कधीं कधीं हा अस्त ५८ पासून ७५ दिवसपर्यंतही असतो. आणि शुक्राचा एकदां उदय झाला म्हणजे पुनः २४८ ते २५२ दिवसपर्यंत अस्त होत नाहीं. तसेंच, पश्चिमेस अस्त

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

झाला म्हणजे सुमारें ८ पासून १० दिवसांनीं पूर्वेस उदय होतो. पूर्वेस अस्त झाला म्हणजे पश्चिमेस उदय, आणि पश्चिमेस अस्त झाला म्हणजे पूर्वेस उदय, असें नेहमीं असतें. पश्चिमेस अस्त असतो तेव्हां नेहमीं शुक्र वक्री असतो व उलट प्रसंगीं मार्गी असतो. पूर्वेस उदय किंवा पूर्वेस अस्त होतो म्हणजे तो ग्रह पूर्वदिशेकडे दिसतो किंवा दिसेनासा होतो. याचप्रमाणें पश्चिमेच्या उदयास्तांविषयीं जाणावें.

शुक्र वक्री झाल्या दिवसापासून पुनः त्याला मार्गी होण्यास ४० पासून ४५ दिवस लागतात आणि एकदां मार्गी झाला म्हणजे पुनः ५४० ते ५४५ दिवस प्रायः तो वक्री होत नाहीं. शुक्र सर्व ग्रहांत अत्यंत तेजस्वी असूनही, तो मंगळखेरीजकरून इतर सर्व ग्रहांहून आकारानें लहान आहे. मंगळ मात्र शुक्रापेक्षांही लहान आहे. गुरु वक्री झाला म्हणजे पुनः मार्गी होण्यास त्याला सुमारें ११६ ते १२५ दिवस लागतात. ५८४ दिवसांत शुक्राचा २ वेळां उदय व २ वेळां अस्त होतो; तसेंच ३९९ दिवसांत गुरूचा एकदां उदय व एकदां अस्त होतो.

बाल्यवृद्धत्वाचे त्याज्य दिवस.

त्यजेद्दशाहं शिशुवृद्धयोश्च सितेज्ययोश्चेति वदंति गर्गाः ॥
कालांशतुल्यानि दिनानि चैके सप्ताहमन्ये त्वपरे त्रिरात्रम् ॥११॥

गुरुशुक्रांच्या अस्तांत गर्भाधानादि संस्कार करणें जसें वर्ज्य आहे, तसेंच अस्तापूर्वीं कांहीं दिवस, म्हणजे त्या ग्रहाच्या वृद्धावस्थेंत आणि उदयानंतर कांहीं दिवस, म्हणजे त्या ग्रहाच्या बाल्यावस्थेंत तीं कृत्यें करूं नयेत असा नियम केलेला आहे. या नियमाविषयीं बराच मतभेद आढळतो. गुरुशुक्रांच्या उदयास्तसमयीं बाल्याचे आणि वृद्धत्वाचे उभयपक्षीं दहा दहा दिवस सोडावे असें गर्गपुत्रांचें मत आहे. कित्येकांच्या मतें कालांशतुल्य दिवस म्हणजे गुरूचे अकरा आणि शुक्राचे नऊ दिवस सोडावे असें आहे; कित्येकांच्या मतें बालवृद्धत्वाचे सात सात दिवस सोडावे असें आहे; आणि तीन तीन दिवस सोडावे असेंही पुष्कळांचें मत आहे. तेव्हां संकटकालीं गुरुशुक्रांच्या उदयास्तसमयीं पूर्वपश्चात् निदान तीन दिवस तरी सोडून शुभकृत्य करावें; परंतु सात दिवस सोडणें असा सर्वसाधारण नियम आहे.

---

१ जेव्हां एकाद्या ग्रहाची गति उलट दिसते (म्हणजे कृत्तिकांतून भरणींत, भरणींतून अश्विनींत इ०) तेव्हां तो ग्रह वक्री आहे असें म्हणतात. आणि वक्रगति संपून ग्रह पुनः सरळ चाललेला दिसूं लागल्यावर (म्हणजे अश्विनींतून भरणींत, भरणींतून कृत्तिकांत इ०) तो ग्रह मार्गी झाला असें म्हणतात. मंगळ, बुध, गुरु, शुक्र, शनि ह्या पांच ग्रहांच्या गतींत हा प्रकार असतो.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

गुरुशुक्रांच्या अस्तांत वर्ज्य कृत्यें.

वापीकूपतडागयज्ञगमनं चौलं प्रतिष्ठाव्रतम् ।
विद्यामंदिरकर्णवेधनमहादानं गुरोः सेवनम् ॥
तीर्थस्नानविवाहकाम्यहवनं मंत्रोपदेशं शुभम् ।
दूरेणैव जिजीविषुः परिहरेदस्तं गुरोर्वै भृगोः ॥ १२ ॥

विहीर–तलाव इत्यादि खणणें, यज्ञ करणें, यात्रेला जाणें, चौल करणें, देव-प्रतिष्ठा, विद्यारंभ, नवें घर बांधणें किंवा नव्या घरांत रहावयास जाणें, मुलांचा कान टोंचणें, प्रथम गुरूपदेश घेणें, तीर्थस्नान, विवाह, कामनिक हवन, मंत्रतंत्र शिकणें, इत्यादि कृत्यें गुरुशुक्रांच्या अस्तांत करूं नयेत, असें सांगितलें आहे.

सिंहस्थ गुरूचा दोष.

उद्यानचूडाव्रतवन्धदीक्षा विवाहयात्रा च वधूप्रवेशः ।
तडागकूपत्रिदशप्रतिष्ठा वृहस्पतौ सिंहगते न कुर्यात् ॥ १३ ॥

गुरुशुक्रांच्या अस्तांत जीं कृत्यें करूं नयेत म्हणून वर लिहिलें आहे, तीं कृत्यें सिंहराशीस गुरु असतांनाही करूं नयेत.

सिंहस्थ गुरूविषयीं अपवाद.

सिंहे गुरौ सिंहलवे विवाहो नेष्टोथ गोदोत्तरतश्च यावत् ।
भागीरथीयाम्यतटे हि दोषो नान्यत्र देशे तपनेऽपि मेषे ॥ १४ ॥
गोदावर्युत्तरतो यावद्भागीरथं तटं याम्यम् ।
तत्र विवाहो नेष्टः सिंहस्थे देवपतिपूज्ये ॥ १५ ॥ (गीति)
भागीरथ्युत्तरे कूले गौतम्या दक्षिणे तटे ।
विवाहो व्रतवन्धो वा सिंहस्थेज्ये न दुष्यति ॥ १६ ॥

सिंहराशीला गुरु असून सिंहराशीच्या नवांशीं असेल त्या वेळीं मात्र विवाह करूं नये, म्हणजे सिंह राशीच्या इतर नवांशांत गुरु असतां गोदावरीच्या दक्षिणभागांत विवाह केला असतां सिंहस्थाचा दोष नाहीं. गोदावरी आणि भागीरथी ह्या दोन नद्यांमधील प्रदेशांत मात्र विवाहादि शुभकार्यांना सिंहस्थाचा दोष आहे. इतर देशांत नाहीं. तसेंच, सिंहस्थांत मेषराशीला सूर्य असतां सिंहस्थाचा दोष नाहीं. किंवा गंगा–गोदावरीच्या मध्यवर्ती प्रदेशांत मात्र सिंहस्थ गुरूचा दोष मानावा अर्थात् गोदावरीच्या दक्षिण भागांत व भागीरथीच्या उत्तरभागांत सिंहस्थ गुरूचा दोष मानूं नये. असे सिंहस्थाचे तीन अपवाद आहेत. परंतु देशाचारप्रमाणें आचरण करावें. देशाचाराची म्हणजे समाजाची संमति असेल तर शास्त्राची हरकत नाहीं, इतकेंच येथें सांगितलें आहे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

गुरुशुक्रास्त व मलमासादिकांचा अपवाद.

गर्भाधानादिका अन्नप्राशनांता मलिम्लुचे ।
आकर्णवेधाः कर्तव्या नान्या इत्याह भास्करः ॥ १७ ॥
सीमंतजातकादीनि प्राशनांतानि च क्रमात् ।
कर्तव्यानि न दोषोऽस्ति पंचाननगते गुरौ ॥ १८ ॥
मासप्रयुक्तकार्येषु मूढत्वं गुरुशुक्रयोः ।
न दोषकृन्मलो मासो गुर्वादित्यादिकं तथा ॥ १९ ॥

गर्भाधानापासून अन्नप्राशनापर्यंत जे अष्टविध संस्कार आहेत ते, अधिक मासांत, गुरुशुक्रादिकांच्या अस्तांत किंवा सिंहस्थांत करण्यास प्रत्यवाय नाहीं. त्याचप्रमाणें प्रति मासांत केलीं पाहिजेत अशीं आवश्यक धर्मकृत्येंही गुरुशुक्राच्या अस्तांत व मलमासांत करणें दोषावह नाहीं.

पुरुषविवाहकाल.

पुरुषाचा विवाह अमक्याच वर्षी करावा असा शास्त्राचा फारसा निर्बंध नाहीं. तरी वीस वर्षेंपर्यंत मुलाचें लग्न करूं नये असा शास्त्रकारांचा हेतु दिसतो. कारण आश्वलायनगृह्यसूत्रांत 'अष्टमे वर्षे ब्राह्मणमुपनयेत् । आषोडशाद्ब्राह्मणस्यानतीतः कालः' । म्हणजे ब्राह्मणाच्या उपनयनाचा मुख्य काल आठवें वर्ष व गौणकाल सोळा वर्षेंपर्यंत असतो, असें सांगितलें आहे. उपनयन झाल्यानंतर बारा वर्षें किंवा अध्ययन पूर्ण होईपर्यंत ब्रह्मचर्य राखावें व नंतर इष्ट वाटल्यास गृहस्थाश्रम घ्यावा, असें मनुस्मृतींत तिसऱ्या अध्यायांत आरंभींच दिलें आहे. शिवाय, इतर स्मृतिग्रंथांतून वराचें वय अठरांपासून वीसपर्यंत असलें तरी चालेल असा उल्लेख आढळतो. यावरून पुरुषाचें लग्न लहानपणीं म्हणजे विद्यार्थिदशेंत करणें ही गोष्ट शास्त्रविरुद्ध नसली तरी शास्त्रोक्तही नाहीं, असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. सांप्रत, मुलाचें अल्पवयांत लग्न करणें इष्ट नाहीं, ही समजूत अनेक कारणांमुळें दिवसेंदिवस अधिक रूढ होऊन अमर्याद होत चालली आहे. विवाहसंबंधीं सध्यां जो कायदा झाला आहे, त्यांत सुद्धां लग्नसमयीं वराचें वय १८ व वधूचें वय १४ पेक्षां कमी नसावें असे आहे. ही वयाची मर्यादा सयुक्तिक दिसली, तरी धार्मिक बाबतींत कायद्याचें बंधन असणें हें श्रेयस्कर नसून बाधक आहे.

कन्याविवाहकाल.

कन्येच्या विवाहकालाविषयीं दोन प्रकारचीं मतें आढळतात. धर्मसिंधुकर्ते, मरीचि, दक्ष, इत्यादि ग्रंथकारांचें मत आठ वर्षांपुढें आणि दहा वर्षांचे आंत कन्येचा विवाह करावा असें आहे. आणि त्यावरून कित्येकांची अशी दृढ समजूत झालेली दिसते कीं, दहा वर्षांपुढें कन्येचा विवाह करणें ही गोष्ट अगदीं शास्त्रविरुद्ध

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आहे; पण ती यथार्थ नाहीं. दहा वर्षांनंतर आणि ऋतुकालापूर्वीं किंवा त्या सुमारास कन्येचा विवाह केला असतां सर्वथैव धर्मशास्त्रसंमत आहे, हें खालीं दिलेल्या निरनिराळ्या श्रुति, सूत्र, स्मृति व पुराण ग्रंथांतील वचनांवरून ध्यानीं येईल. जर उत्कृष्ट (वय, विद्या, वैभव वगैरे गुणांनीं युक्त असा) वर मिळत असेल तर मात्र आठव्या वर्षींही मुलीचें लग्न उरकून द्यावें, असा मन्वादि स्मृतिकारांचा अभिप्राय आहे. तथापि सांप्रत पुरुषांचे विवाह वीसपासून पंचवीस वर्षें वयाच्या पुढें होऊं लागल्यामुळें, साहजिकच त्यांना प्रौढवधूची अपेक्षा असते, आणि त्यामुळें आसन्नार्तवा किंवा ऋतुमती कन्यांचे विवाह ब्राह्मणसमाजांत सुरू झाले आहेत. ही गोष्ट अभिनंदनीय असली तरी कित्येक लोक त्याचा अतिरेक करून समाजांत अनर्थ उत्पन्न करीत आहेत, ही फारच खेदाची गोष्ट आहे. कारण, सांप्रत २५ वर्षें वयाच्या देखील प्रौढ कुमारिका ब्राह्मण समाजांत दृष्टीस पडूं लागल्या आहेत ही स्थिति फारच भयावह आहे. असो; आतां प्रौढविवाहाच्या समर्थनार्थ प्रथम एक दोन श्रुतिवचनें देतों. कोणतीही गोष्ट करण्याविषयीं किंवा न करण्याविषयीं वेदांमध्यें स्पष्ट आज्ञा कोठेंच आढळत नाहीं; तथापि अमक्यानें अमुक प्रसंगीं अमुक केलें, अशा अर्थाचीं वचनें मात्र पुष्कळ आढळतात; त्यांवरून वेदकालीन रीतीभातींचा निर्णय ठरविणें अयुक्त होणार नाहीं. खालीं दिलेला वैदिक मंत्र ऋग्वेदसंहितेंतील आठव्या अष्टकाच्या तिसऱ्या अध्यायांतील "सत्येनोत्तभिता" नामक सूक्तांतील आहे. हें पंचवर्गात्मक सूक्त विवाहविधीच्या प्रसंगीं वधू गौरीहराची पूजा करीत असतां ब्राह्मणांनीं पठन करावें व नंतर वधूवरांमध्यें अंतःपट धरून मंगलाष्टकें म्हणावीं, असा प्रयोग आहे.

सोमो वधूयुरभवदश्विनास्तामुभा वरा ।
सूर्यां यत्पत्ये शंसंतीं मनसा सविताऽददात् ॥ अ० ३ व० २१

या मंत्रावरील सायणाचार्यांचें भाष्य आहे तें असें:—

सोमः वधूयुः वधूकामः वरः अभवत् । तस्मिन् समये अश्विनाऽश्विनौ उभा उभौ वरा वरौ आस्ताम् । यत् यदा सूर्यां पत्ये शंसंतीं पतिं कामयमानां पर्याप्तयौवनामित्यर्थः । मनसा सहिताय सोमाय वराय सविता तत्पिता अददात् दित्सांचकार ॥

अर्थ—आपणाला स्त्री असावी अशी इच्छा सोमाच्या मनांत उत्पन्न झाली. त्या समयीं अश्विनीकुमारही लग्नासाठीं वर तयार होते; परंतु आपल्या सूर्यानामक कन्येवर सोमाचें मन बसलें आहे असें पाहून, पतीविषयीं वासना उत्पन्न झाली आहे जिला, अशी जी पर्याप्तयौवना म्हणजे यौवनपूर्ण झालेली कन्या सूर्या, तिला तिच्या बापानें सोमास देण्याचें ठरविलें. यावरून सूर्या विवाहापूर्वी ऋतुमती असली पाहिजे, हें स्पष्ट दिसतें. याच अर्थाचा दुसराही मंत्र आहे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कामद्युवं विमदायोहथुर्युवम् । ऋग्वे० अष्ट० ८ अ० व० ११

भाष्य—कामद्युवं कामस्य दीपनीं वेनपुत्रीं विमदायर्षये युवं ऊहथुः प्रापयथ ।

अर्थ—कामजागृति करणारी वेनराजाची कन्या तुम्हीं विमदऋषीला दिली. येथें कामस्य दीपनीं या पदानें वेनकन्या विवाहसमर्थी ऋतुमती असली पाहिजे हेंच सिद्ध होतें. ब्राह्मविवाहविधि करितांना सप्तपदीच्या प्रसंगीं जे मंत्र म्हटले जातात, ते देखील प्रौढ वधूलाच उद्देशून आहेत. त्यांपैकीं एकच मुख्य येथें देतों.

अमोहमस्मि सा त्वं सा त्वमस्यमोहम् ।
सामाहमस्मि ऋक्त्वं द्यौरहं पृथिवी त्वम् ।
तावेह विवहावहै सह रेतो दधावहै ।
प्रजां प्रजनयावहै पुत्रान् विंदावहै बहून् ॥

या मंत्रांत "प्रजां प्रजनयावहै०" म्हणजे आपण प्रजा निर्माण करूं वगैरे जें आहे तें आठदहा वर्षांच्या मुलीला समजणें खास कठीण आहे. तसेंच, जवळ-जवळ त्याच अर्थाचे "प्रजाभ्यः पंचपदी भव" वगैरे मंत्र आहेत, त्या मंत्रांवरून प्राप्तयौवना वधूचाच विवाह करावा, असें ध्वनित होतें. याशिवाय आणखी एक महत्त्वाचा वैदिक मंत्र प्रौढविवाहाच्या पुष्ट्यर्थ देतों; त्यावरून पहातां ऋतुकालोत्तर-विवाह जरी वैदिक काळीं मान्य होता तरी ऋतुकालानंतर फार दिवस वधू अविवाहित ठेवूं नये, असाही त्यांत सध्या येणारा अनिष्ट अनुभव व्यक्त होतो. तो मंत्र असा—

सोमः प्रथमो विविदे, गंधर्वो विविद उत्तरः ।
तृतीयो अग्निष्टे पतिः, तुरीयस्ते मनुष्यजाः ॥

या मंत्रामध्यें विवाहनीय वधूचा पहिला पति सोम, दुसरा गंधर्व, तिसरा अग्नि व चवथा पति मनुष्य, असें म्हटलें आहे. आतां मनुष्य पति होण्यापूर्वी या तीन पतींचा स्त्रीदेहभोक्तृत्वावर कसा अधिकार पोंचतो, आणि ह्या तीन मूर्ति कोण असा साहजिक प्रश्न उद्भवतो. त्याचें स्पष्टीकरण असें आहे कीं, प्राचीन वैदिक ऋषींनीं देहाच्या प्रत्येक अवयवाच्या क्रियेची एक एक देवता मानिलेली आहे. जसें बाहूंच्या क्रियेची देवता इंद्र, उपस्थक्रियेची देवता प्रजापति, इत्यादि प्रत्येक अवयवाची अधिष्ठात्री देवता जशी वेगळी कल्पिली आहे, त्याचप्रमाणें स्त्रीदेहांतील अवयवांच्या ठिकाणीं, जसजशी तिच्या देहाची अवस्था बदलेल, तसतशा भिन्न देवता प्रत्येक अवस्थेला योजिलेल्या आहेत. त्या देवता म्हणजे सोम, गंधर्व आणि अग्नि ह्या होत. या तीन देवतांनीं स्त्रीदेहावर आपला अधिकार चालविल्याशिवाय म्हणजे तिच्या अवयवांना पूर्णता आणून दिल्याशिवाय मनुष्याला स्त्रीदेहाचा उपभोग

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

येणें शक्यच नसतें. याला गृह्यसंग्रहांत असा आधार आहे कीं,

व्यंजनैस्तु समुत्पन्नैः, सोमो भुंजीत कन्यकाम् ।
पयोधरैस्तु गंधर्वैः, रजसाग्निः प्रकीर्तितः ॥ २० ॥

स्त्रीच्या ठिकाणीं अगदीं प्रथमावस्थेपासून कुचदर्शन होईपर्यंत सोमाचा भुक्तिकाळ असतो. कुचोत्पत्तीपासून रजोदर्शनापर्यंत गंधर्वांचा भुक्तिकाळ व रजोदर्शन झाल्यानंतर पुढें विवाहकालापर्यंत अग्नीचा भुक्तिकाळ असतो. आयुर्वेदही हेंच सांगतो. 'अग्नीषोमात्मकमिदं शरीरं' येथें अग्नि शब्द हा रजाच्या अर्थीं व सोम शब्द हा वीर्याच्या अर्थीं आहे. आतां सोमादिकांचा भुक्तिकाळ इत्यादि जें लिहिलें आहे, त्याचा अर्थ त्या त्या देवता प्रत्येक अवस्थेमध्यें त्या त्या अवयवांना (अवयवांमध्यें राहून) पूर्णता आणतात. अशी पूर्णता आणण्याची जी क्रिया, तिचाच अर्थ स्त्री जाति तिन्ही देवतांनीं पूर्ण भुक्त असली पाहिजे. म्हणजे तिच्या अवयवांत पूर्णता आली पाहिजे. कन्यादानाला वधू त्रिभुक्ता पाहिजे असें विवाहप्रयोगांत आहे. त्याचा अर्थ 'तीन वेळां जेऊं घातलेली' नव्हे, तर सोम, अग्नि व गंधर्व या तीन देवतांनीं उपभोगिलेली असावी, असा आहे. सारांश, लग्नाचे वेळीं वधूचे अवयव पूर्णत्वाला पोंचल्याशिवाय ती मनुष्य पति करण्याला पात्र नाहीं. पण कन्या ऋतुमती झाल्यानंतरचा जो काळ, तो अग्नीचा भुक्तिकाळ आहे. आणि अग्नि ही जाळणारी वस्तु आहे, हें ध्यानांत ठेवून प्रतिमासीं रजस्वला होणाऱ्या वधूला फार दिवस अविवाहित ठेवणें अनेक दृष्टींनीं भयावह आहे. असो; आतां सूत्रकार लग्नसमयीं कन्येच्या वयाची काय इयत्ता ठरवितात तें पाहूं. आश्वलायनगृह्यसूत्रांत वधू अमुक वयाची असावी, असें जरी विधिरूप वचन नाहीं, तरी पुढील वाक्यांवरून ती प्रौढच असली पाहिजे, असा गर्भितार्थ निघतो.

अत ऊर्ध्वमक्षारालवणाशिनौ ब्रह्मचारिणावलंकुर्वाणावधःशायिनौ-स्याताम् त्रिरात्रं द्वादशरात्रम् । संवत्सरं वैकऋषिर्जायत इति ।

विवाहविधि झाल्यानंतर वधूवरांनीं त्रिरात्र किंवा द्वादशरात्रपर्यंत ब्रह्मचर्य राखावें; तथापि दृढ मनोनिग्रह असेल तर एक वर्षपर्यंतही ब्रह्मचर्यवृत्तीनें त्यांनीं रहावें. म्हणजे ऋषीप्रमाणें तेजस्वी पुत्र होईल. येथें विवाह झाल्यावर तीन रात्रींनंतर स्त्रीसमागम करण्याविषयीं सूत्रकारांनीं मोकळीक ठेविली आहे. ह्यावरून विवाहसमयीं वधू उपभोगार्ह म्हणजे ऋतुमतीच असली पाहिजे, असें सिद्ध होतें. ती आठ किंवा दहा वर्षांची असून युक्त होणार नाहीं. आणि तशी असेल तर मग निदान चार पांच वर्षें तरी वधूवरांना ब्रह्मचर्य पाळावें लागेल. ऋग्वेदाच्या सांख्यायनसूत्रांत देखील अशाच अर्थाचा उल्लेख आहे, तो असाः—

त्रिरात्रं ब्रह्मचर्यं चरेयाताम् । अथ चतुर्थीकर्म त्रिरात्रे निवृत्ते स्थालीपाकस्य जुहोति। (त्रिरात्र ब्रह्मचर्य पाळून होम करून चतुर्थीकर्म करावें.) चतुर्थीकर्म

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

म्हणजे पतिपत्नीसमागम होय. ऋतुकालापूर्वीं पतिपत्नीसमागम शास्त्रांत निषिद्ध सांगितला आहे; व ज्या अर्थीं चतुर्थीकर्म करावें असें सांख्यायनमत आहे, आणि विवाहानंतर चवथ्याच रात्रीं चतुर्थीकर्म करावयाचें असतें, त्या अर्थीं विवाहकालीं वधू ऋतुमती असल्याशिवाय गत्यंतरच नाहीं. हिरण्यकेशी सूत्रांतही असेंच आहे.

सजातानग्निकां ब्रह्मचारिणीं भार्यामुपयच्छेत् ।

येथें अनग्निका म्हणजे ऋतुमती भार्येशीं संभोग करावा असें म्हटलें आहे. हिरण्यकेशीयांनाही त्यांच्या सूत्रांत चतुर्थीकर्म सांगितलें असल्यामुळें तो विधि विवाहोत्तर चवथ्या रात्रींच होणार हें उघड आहे. पाराशरसूत्रांतही हेंच सांगितलें आहे.

संवत्सरं न मिथुनमुपयाताम् । द्वादशरात्रं षड्रात्रं त्रिरात्रमन्ततः ।

पाराशराच्या मताप्रमाणें विवाहानंतर निदान एक संवत्सरपर्यंत तरी वधूवरांनीं अवश्य ब्रह्मचर्य राखावें असें आहे. पण हें शक्य नसेल तर बारा, सहा किंवा निदान तीन रात्रींपर्यंत तरी ब्रह्मचर्यवृत्तीनें रहावें, असेंही तो स्पष्ट म्हणतो. पण येथें तीन रात्रींचा नियम हा गौणपक्ष आहे, अशी जरी कोणी शंका घेतली, तरीही वधू विवाहसमयीं आसन्नार्तवा असावी, आठ किंवा दहा वर्षांची असूं नये, असेंच ठरतें. आतां या विषयासंबंधीं स्मृतिवचनें काय आहेत हें पाहूं.

उत्कृष्टायाभिरूपाय वराय सदृशाय च ।
अप्राप्तामपि तां तस्मै कन्यां दद्याद्यथाविधि ॥ २१ ॥ मनु० अ० ९ श्लो० ८८

सर्व प्रकारें उत्कृष्ट व रूपवान् असा वर मिळत असेल तर अप्राप्ता म्हणजे लग्नाला योग्य न झालेल्या अशा १० वर्षांच्या कन्येचें देखील दान करावें. येथें "अपि" म्हणजे देखील या पदानें बालविवाहाचें गौणत्व दिसतें. मेधातिथीनें अप्राप्ता या पदाचा अर्थ 'कामस्पृहा यस्या नोत्पन्ना' म्हणजे जिला कामेच्छा उत्पन्न झाली नाहीं, असा केला आहे, यावरून प्रौढ कन्येचाच विवाह करावा असा अर्थ ध्वनित होतो.

त्रिंशद्वर्षोद्वहेत्कन्यां हृद्यां द्वादशवार्षिकीम् । मनु० अ० ९ श्लो० ९४.

तीस वर्षांच्या मनुष्यानें स्वतःला योग्य अशी निदान बारा वर्षांची कन्या वरावी. म्हणजे याहून कमी वयाची असूं नये. व पुरुषानेंही तीस वर्षांपुढें विवाह करूं नये असा अर्थ ध्वनित होतो.

अतो रजोदर्शनं विवाहात्पूर्वं यथा न भवति तथा कुर्यादित्युक्तं भवति ॥ संस्कारमयूखकार.

विवाहापूर्वीं रजोदर्शन होणार नाहीं अशी तजवीज (पित्यानें किंवा पालकानें) ठेवावी म्हणजे रजोदर्शनापूर्वीं लग्न होईल अशी व्यवस्था ठेवावी.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

एवं च यावद्रजोदर्शनं न भवति तावत्कन्योद्वाहो न विरुद्ध इत्युक्तं भवति ॥ स्मृतिचंद्रिकाकार.

कोणीकडून तरी रजोदर्शनापूर्वीं कन्येचा विवाह केला असतां शास्त्रविरुद्ध होत नाहीं. म्हणजे विवाहापूर्वीं रजोदर्शन न होईल अशी काळजी घ्यावी.

प्रयच्छेन्नग्निकां कन्यामृतुकालभयात्पिता ।
ऋतुमत्यां हि तिष्ठन्त्यां दोषः पितरमृच्छति ॥ २२ ॥ वसिष्ठ.

कन्येला ऋतुप्राप्ति होईल ह्या भीतीनें रजोदर्शनापूर्वीं तिचें दान करावें. कारण ऋतुमती कन्या अविवाहित ठेविली असतां तिच्या बापाला दोष लागतो. नग्निकां तु वदेत् कन्या यावन्नर्तुमती भवेत्—जोंपर्यंत कन्येला ऋतु प्राप्त झाला नाहीं तोंपर्यंत तिला नग्निका म्हणतात.

तस्मादुद्वाहयेत्कन्यां यावन्नर्तुमती भवेत्—यम.

म्हणून कन्येला ऋतुप्राप्ति होण्यापूर्वीं तिचा विवाह करावा.

ऊर्ध्वं दशाब्दाद्या कन्या प्राग्रजोदर्शनात्तु सा ।
गांधारी सा समुद्वाह्या चिरंजीवितुमिच्छता ॥ २३ ॥ प्रयोगपारिजात.

दहा वर्षांनंतर व रजोदर्शन होण्यापूर्वीं कन्येला गांधारी अशी संज्ञा आहे. ज्याला चिरंजीव व्हावें अशी इच्छा असेल, त्यानें अशा कन्येशींच विवाह करावा.

वर दिलेल्या वचनांवर कदाचित् एक शंका निघण्यासारखी आहे ती अशी कीं, 'दशवर्षा भवेत्कन्या अत ऊर्ध्वं रजस्वला' या पराशरवचनाप्रमाणें दहा वर्षांनंतर कन्येला रजस्वला अशी संज्ञा प्राप्त होते, आणि म्हणूनच दहावर्षांपुढें कन्येचा विवाह अयुक्त मानिला आहे; परंतु या वाक्याचा अर्थ स्मृतिचंद्रिका व संस्कारमयूख या ग्रंथांत असा दिला आहे कीं, दहा वर्षांपासून कन्येला रजस्वला ही संज्ञा प्राप्त न होतां दहा वर्षांनंतर कांहीं कालानें प्राप्त होते. कारण 'अत ऊर्ध्वं रजस्वला' असें म्हणून नंतर लागलेंच 'प्राप्ते तु द्वादशे वर्षे यः कन्यां न प्रयच्छति' असें वचन पराशरानें ग्रथित केलें आहे, व अकराव्या वर्षाचा कांहींच उल्लेख त्यानें केला नाहीं, त्यावरून अकराव्या वर्षीं रजस्वलात्वदोष नाहीं हें सहज ध्वनित होतें, आणि तेंच प्रायः सर्वत्र अनुभवाशीं जुळतें.

विवाहे वितते तंत्रे होमकाल उपस्थिते ।
कन्यामृतुमतीं दृष्ट्वा कथं कुर्वंति याज्ञिकाः ॥ २४ ॥
स्नापयित्वा तु तां कन्यामर्चयित्वा यथाविधि ।
युंज़ानामाहुतिं दत्वा ततस्तन्त्रं प्रवर्तयेत् ॥ २५ ॥ यज्ञपार्श्व. नि० सि०

विवाहविधि चालला असतां कन्या ऋतुमती होईल तर तिला हविष्मतीनें स्नान घालून व दुसरे वस्त्रालंकार देऊन 'युंजानानेति' मंत्रानें होमांत आहुति देऊन

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

नंतर पुढील विवाहविधि करावा. यावरून लग्नांत आसन्नार्तवा किंवा नहाण आलेली वधू असली तरी चालेल असा अर्थ निघतो. येथें कन्येच्या पित्याला प्रायश्चित्त वगैरे कांहीं सांगितलेलें नाहीं. वरील दोन श्लोक किंचित् पाठभेदानें आपस्तंबस्मृतींत पठण केले आहेत, त्यावरून आपस्तंबाचेंही मत, लग्नांत आसन्नार्तवा वधू असली तरी चालेल, असें दिसतें. रजोदर्शनानंतर कन्येचा विवाह केला असतां पित्यानें प्रायश्चित्त घ्यावें असें आश्वलायनस्मृतींत सांगितलें आहे; तथापि कांहीं ग्रंथांतून प्रायश्चित्त न सांगतां संकटकालीं ऋतुदर्शन झाल्यावर देखील कन्येचा विवाह केला तरी चालेल, अशीं वचनें आढळतात, तीं खालीं दिलीं आहेत.

काममामरणात्तिष्ठेद्गृहे कन्यर्तुमत्यपि।
न चैवैनां प्रयच्छेत्तु गुणहीनाय कर्हिचित् ॥ २६ ॥ मनु० अ० ९ श्लो० ८९.

ऋतु प्राप्त झाल्यावर देखील कन्या पित्याच्या घरीं अविवाहित राहिली तरी चिंता नाहीं; परंतु गुणहीन म्हणजे वय, विद्या, वपु, वैभव इत्यादि गोष्टींमध्यें वधूच्या तुलनेला अयोग्य अशा वराला ती कधींही देऊं नये.

ऋतुदर्शनेपि न दद्याद्यावद्गुणवान्वरो न प्राप्तः। मेधातिथि.

वर दिलेल्या मनुवचनावर मेधातिथीची ही टीका आहे. त्याचा अर्थ वरच्याचप्रमाणें आहे. स्मृतिकारांचा यासंबंधानें असा स्पष्ट आशय दिसतो कीं, सुस्थळ न मिळाल्यामुळें कन्या ऋतुमती झाली तरी चालेल; परंतु रजस्वलात्वदोषाच्या भयानें भलत्याच अयोग्य वराला ती देऊन टाकूं नये. तथापि उदासपणानें मात्र ऋतुदर्शनानंतर कन्या अविवाहित ठेवणें दोषास्पद आहे.

दद्याद्गुणवते कन्यां नग्निकां ब्रह्मचारिणे।
अपि वा गुणहीनाय नोपरुंध्याद्रजस्वलाम् ॥ २७ ॥ बौधायन.

नग्निका म्हणजे जिला ऋतुदर्शन झालें नाहीं अशी कन्या सद्गुणी वराला द्यावी. तसा वर न मिळाल्यामुळें तिला ऋतुदर्शन झालें तरी हरकत नाहीं. परंतु मूर्ख वराला ती कदापि देऊं नये.

दशवर्षादूर्ध्वं विवाहो निषिद्धः। तथापि दातुरभावे द्वादशषोडशाब्दे ज्ञेये रजोभावे इदम् ॥ निर्णयसिंधु.

कन्येचा विवाह दहा वर्षांनंतर निषिद्ध होय; तथापि योग्य दात्याचा अभाव असेल तर रजोदर्शन झालें तरीही बाराव्या किंवा सोळाव्या वर्षीं कन्येचा विवाह करावा. तथापि, ही १६ वर्षांची सवड शास्त्रकारांनीं अडचणीपुरतीच ठेविली आहे, हें विसरूं नये. याशिवाय ऋतुप्राप्ति झाल्यानंतर तीन वर्षेपर्यंत पित्राज्ञेची वाट पाहून चवथ्या वर्षीं कन्येनें स्वतः योग्य वर वरावा, अशाविषयीं मनु, बौधायन इत्यादिकांचीं वचनें आहेत, त्यांतून कांहीं येथें देतो.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

त्रीणि वर्षाण्युदीक्षेत कुमार्यृतुमती सती ।
ऊर्ध्वं तु कालादेतस्माद्विन्देत सदृशं पतिम् ॥ २८ ॥

ऋतु प्राप्त झाल्यानंतर बाप आपलें दान करितो किंवा नाहीं याची तीन वर्षें वाट पाहून, नंतर कन्येनें आपल्याला योग्य पति शोधून त्याच्याशीं विवाह करावा.

त्रीणि वर्षाण्यृतुमतीं यः कन्यां न प्रयच्छति ।
स तुल्यं भ्रूणहत्यायै दोषमृच्छत्यसंशयम् ॥ २९ ॥
न याचते चेदेवं स्याद्याच्यते च पृथक् पृथक् ।
ततश्चतुर्थे वर्षे तु विन्देत सदृशं पतिम् ॥ ३० ॥ बौधायन.

कन्या ऋतुमती झाल्यानंतर तीन वर्षांचे आंत मुलगी मागण्याकरितां कोणी आला असून जर बाप तिचें दान करणार नाहीं, तर प्रत्येक ऋतूला त्याला भ्रूणहत्येचें पातक लागतें. परंतु कोणी याचमानच नसेल तर मात्र पित्याला मुलींच दोष नाहीं. कन्येच्या घरीं जाऊन वरानें किंवा त्याच्या पित्यानें मुलगी मागावी, असा प्रघात शास्त्राला अनुसरून पूर्वीं असे. मुलीनें ऋतुदर्शनानंतर तीन वर्षें-पर्यंत बाप आपलें दान करितो कीं नाहीं हें पाहून नंतर स्वतः वर शोधावा. असो; याप्रमाणें अनेक स्मृतिकारांचीं प्रौढ विवाहाविषयीं अनुकूल मतें आहेत. आतां, प्राचीन कालीं प्रौढ वधूंचेच विवाह होत असत, अशाविषयीं पुराणांतील कांहीं आधार देतोः—

मथुरायां यदुश्रेष्ठो दाशार्ह इति विश्रुतः ।
कृतोद्वाहः स राजेन्द्रः संप्राप्य निजमंदिरम् ।
रात्रौ तां शयनारूढः संगमाय समाह्वयत् ॥ ३१ ॥ स्कन्दपु० ब्रह्मो०
आसीदियं पूर्वभवे काचिद्ब्राह्मणकन्यका ।
सा भर्तारमनुप्राप्य नवयौवनशालिनी ।
कंचित्कालं शुभाचारा रेमे बंधुभिरावृता ॥ ३२ ॥ स्कंदपु० ब्रह्मो०
स शीलयन् देवयानीं कन्यां संप्राप्तयौवनाम् ।
पुष्पैः फलैः प्रेषणैश्च तोषयामास भारत ॥ ३३ ॥ महाभारत.

अशीं हीं तीन पौराणिक उदाहरणें दिलीं आहेत. त्यांत पहिल्या उदाहरणांत विवाहकालीं वधू प्रौढ असून पतिसमागमाला योग्य होती. दुसऱ्यांत नवयौवन-शालिनी म्हणजे नुकतीच यौवनदशेनें युक्त झालेली होती. तिसऱ्या उदाहरणांत शुक्राची कन्या देवयानी ही प्राप्तयौवनाच होती. याशिवाय पुराणकालीं प्रौढ वधूंचेच विवाह होत असत, अशीं वर्णनें पुराणांत सर्वत्र आहेत. सारांश, प्रौढ वधूंचे विवाह शास्त्रविरुद्ध नाहींत, हें वर दिलेल्या श्रुतिस्मृतिपुराणोक्त वचनांवरून सिद्ध होतें. आतां ज्या स्मृतिकारांनीं आठव्या वर्षापासून दहाव्या वर्षापर्यंत कन्येचा विवाह करावा असें लिहिलें आहे, त्यांचा आशय इतकाच असला पाहिजे कीं,

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कांहीं झालें तरी कन्येला विवाहापूर्वीं ऋतुदर्शनाचा दोष लागूं नये. म्हणून ऋतुदर्शनाचा जो सामान्य काल पंधरावें किंवा सोळावें वर्ष त्यापूर्वीं निदान चार पांच वर्षें तरी मुलीचें लग्न करावें, असें त्यांनीं ठरविलें असावें. आणि त्यामुळें कन्याविवाहाच्या वयाची इयत्ता आंत आंत येत जाऊन शेवटीं दहावें वर्ष हा लग्नाचा अतीत काल त्यांनीं ठरविला असावा. पण ही बालविवाहाची रूढी अस्तित्वांत येत गेली, त्याच्याबरोबर आपत्तिही उत्पन्न झाल्या आहेत, असा सध्यां अनुभव आहे. तसेंच स्त्री पुष्पवती झाल्यानंतर तिला अविवाहित ठेविल्यामुळेंही भलतेच अनर्थ उत्पन्न झाल्याचीं उदाहरणें वाढत आहेत. यासाठीं समंजस आईबापांनीं ऋतुदर्शनकालाचे सुमारास निदान १६ व्या वर्षी तरी कन्येचा विवाह करावा हेंच युक्त आहे. सूत्रकारांच्या किंवा बौधायनाच्या अनुशासनाप्रमाणें संकटकाळीं आसन्नार्तवा किंवा ऋतुमती वधूंचे विवाह केले असतां, निदान आठपासून चवदा वर्षांचे आंतील बालविधवा आपल्या समाजांत दृष्टीस पडणार नाहींत. धर्मशास्त्र म्हणजे धार्मिक कायदे, हे विद्वान्, तेजस्वी व नीतिमान् पुरुषांनीं पण मनुष्यांनींच केलेले असल्यामुळें ते ईश्वरीकृतीप्रमाणें सर्वथैव निर्दोष व सर्वकालीं अबाधित असणें शक्य नाहीं, व या कारणामुळेंच समकालीन नसणाऱ्या स्मृतिकारांची या विषयासंबंधीं एकवाक्यताही नाहीं. तस्मात् कालानुरोधाप्रमाणें समाजाच्या सोयीकरितां धार्मिक नियमांतही अत्यंत विचारपूर्वक फेरफार होणें अगत्याचें असतें. परंतु अतिरेक न होऊं देण्याविषयीं जपलें पाहिजे. 'पूर्णषोडशवर्षा स्त्री पंचविंशेन संयुता' म्हणजे पत्नी सोळा वर्षांची व पति पंचवीस वर्षांचा असावा. कारण, अशा दंपत्यापासून होणारी प्रजा सतेज व सुदृढ होते, असें आयुर्वेदाचें मत आहे. पण सोळा व पंचवीस वर्षांची इयत्ता ही परमावधीची आहे, म्हणून सोळाव्या वर्षांपूर्वींच कन्येचा विवाह करावा.

वधूलक्षणपरीक्षा.

कुलमग्रे परीक्षेत ये मातृतः पितृतश्चेति यथोक्तं
पुरस्तात् वुद्धिमते कन्यां प्रयच्छेत् । वुद्धिरूपशील-
लक्षणसंपन्नामरोगामुपयच्छेत ॥ आश्व० गृह्यसूत्र.
उद्वहेत्तु द्विजो भार्यां सवर्णां लक्षणैर्युताम् ।
अव्यंगांगीं सौम्यनाम्नीं मृद्वंगीं च मनोहराम् ॥ ३४ ॥
अनन्यपूर्विकां कान्तामसपिंडां यवीयसीं ।
अरोगिणीं भ्रातृमतीमसमानार्षगोत्रजाम् ॥ ३५ ॥

वधूवरांचा विवाह निश्चित करण्यापूर्वीं, एक गोत्र, सप्रवर, सापिंड्य याचा तर विचार अवश्यच आहे, आणि त्याविषयीं पूर्वीं लिहिलेंच आहे, परंतु याशिवाय मातापितरांचीं कुळें शुद्ध आहेत कीं नाहींत याचा शोध करावा. शुद्ध म्हणजे क्षय, अपस्मार, कुष्ठ, अशा आनुवंशिक व अपरिहार्य व्याधि ज्यांच्या कुलामध्यें पूर्वीं

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कोणाही स्त्रीपुरुषाला झालेल्या नाहींत अशा कुळाशीं संबंध जोडावा. तशींच उभय कुळें सदाचारसंपन्न असावीं. बुद्धिमान्, विद्वान्, धर्मशील, सुशील व निरोगी असा वर असावा. तशीच, वधू देखील बुद्धिमती, रूपवती, सुशील आणि लक्षणसंपन्न म्हणजे वंध्यत्व, पतिघातित्व इत्यादि दुर्लक्षणरहित असावी. अशी स्वजातीची, जिच्या देहाच्या अवयवांत कांहीं न्यूनता नाहीं, दिसण्यांत मनोहर व कोमलांगी वधू असावी. सारांश, कन्येच्या मातृवंशाची व पितृवंशाची परीक्षा करून नंतर त्या कन्येशीं विवाह करावा, म्हणजे सुकुलांतील कन्या वरावी. तसेंच, दान किंवा उपभोग यासंबंधीं जिचें ग्रहण दुसऱ्यानें केलें नाहीं, आपल्याशीं जिचें सापिंड्य नाहीं, आपल्यापेक्षां वयानें व शरीरानें कमी, निरोगी, सोदर भ्राते असलेली, आपल्या गोत्राहून भिन्न गोत्रांत उत्पन्न झालेली आणि आपल्याशीं सप्रवर नाहीं अशा कुलांतील कन्येशीं विवाह करावा. त्याप्रमाणेंच 'जनपदधर्मा ग्रामधर्माश्च तान् विवाहे प्रतीयात्' या आश्वलायनसूत्रोक्तीप्रमाणें देशाचार, ग्रामाचार व कुलाचार यांचाही विवाहकालीं अवश्य विचार करावा.

वराचें लक्षण.

कुलं च शीलं च वयश्च रूपं विद्यां च वित्तं च सनाथतां च ।
एतान् गुणान् सप्त परीक्ष्य देया कन्या बुधैः शेषमचिंतनीयम् ॥ ३६ ॥

सत्कुलांत जन्म, सुशीलता, वयानें व रूपानें कन्येला योग्य, सुविद्य, सधन म्हणजे हुंड्याच्या द्रव्याची अपेक्षा व याचना न करणारा आणि सनाथ म्हणजे कुटुंबवत्सल अशा सात गुणांनीं युक्त असलेल्या वराला कन्या द्यावी. सुविद्य म्हणजे विद्याविनयसंपन्न, सदाचरणी, धर्मशील व सुविचारी असें समजावें.

सप्रवराचीं गोत्रें.

भारद्वाजाश्च गार्ग्याः कपिकुलमिलिता जामदग्न्याश्च वत्साः ।
बाभ्रव्याः कौशिकाः स्युः प्रवरसमयुता विष्णुवृद्धानितुंदाः ॥
वासिष्ठाः कौंडिण्येयाः पुनरपि मिलिताः काश्यपाः शांडिलेयाः ।
ज्ञेया विद्वद्भिरेते परिणयसमये वर्जनीयाः प्रयत्नात् ॥ ३७ ॥

स्वगोत्रोत्पन्न कन्येशीं विवाह होत नाहीं हें वर सांगितलेंच आहे. परंतु ज्या गोत्रांचा परस्पर शरीरसंबंध होत नाहीं अशीं कांहीं गोत्रें आहेत. कारण, त्यांचे प्रवर सारखे असतात. म्हणून तसा संबंध घडल्यास तो दोषार्ह असून त्यास सप्रवर म्हणतात. तीं गोत्रें कोणतीं हें त्यांच्या प्रवरांसह सांगतों.

पुढें जीं कोष्टकें दिलीं आहेत, त्या प्रत्येकांत असलेल्या गोत्रांचा परस्परांशीं विवाहसंबंध होत नाहीं असें समजावें. गोत्रभूत जो पुरुष त्याचा बाप, आजा, पणजा हेच प्रवर होत. वृक्षाला फांटे फुटून जशा निरनिराळ्या शाखा होतात, तसे,

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ज्यांच्यापासून वंशाचे अनेक पोटभेद उत्पन्न होतात, असे जे ऋषि, तेच प्रवर होत. म्हणून वधूवरांचें एक गोत्र असतां जसा विवाह होत नाहीं, त्याप्रमाणेंच दोघांचे समान प्रवर असतील तरीही विवाह करूं नये. कारण 'असमानप्रवरैर्विवाहः' असें वचन आहे. इतकेंच नव्हे तरः—

एक एव ऋषिर्यावत्प्रवरेष्वनुवर्तते ।
तावत्समानगोत्रत्वं विवाहप्रतिबंधकम् ॥ ३८ ॥

जेथपर्यंत प्रवरांमध्यें एकाच ऋषीचें नांव उच्चारिलें जात आहे, तेथपर्यंत तें एक गोत्रच आहे असें समजावें. आणि त्यांमध्यें परस्पर विवाहसंबंध करूं नये. याला एक अपवाद असा आहे कीं, भृगुगण आणि अंगिरोगण यांच्यामध्यें पांच प्रवरांत तीन प्रवर जर सारखे असतील, किंवा तीन प्रवरांत दोन प्रवर जर सारखे असतील, तरच भृगुगण व अंगिरोगण यांच्यांत विवाह करूं नये. अन्यत्र करावा. इतर कोणत्याही गोत्रांत मात्र एक ऋषि जरी समान असेल, तरी देखील तो विवाहाला प्रतिबंधक आहे. मुख्य मुख्य गोत्रांचे प्रवर कोष्टकानुक्रम १ मध्यें व परस्परांशीं न जमणारीं कांहीं गोत्रें कोष्टकानुक्रम २ यांमध्यें खालीं देतों.

कोष्टक १.

	गोत्रें	प्रवर
१	भारद्वाज. गार्ग्य. कपि.	आंगिरस बार्हस्पत्य भारद्वाजेति. आंगिरस सैन्य गार्ग्येति. आंगिरस आमैह्य वौरुक्षेति.
२	जामदग्न्य. वत्स.	भार्गव च्यावनाप्नवान और्व जामदग्न्येति.
३	बाभ्रव्य. कौशिक.	विश्वामित्र अवदल बाभ्रव्येति. वैश्वामित्राघमर्षण कौशिकेति.
४	विष्णुवर्धन. नित्युंदन.	आंगिरस पौरुकुत्सत्रासदस्येति.
५	वासिष्ठ. कौंडिण्य.	वासिष्ठेंद्र प्रमदा भरद्वस्विति. वासिष्ठ कौंडिण्य मैत्रावरुणेति.
६	काश्यप. शांडिल्य.	काश्यपावत्सारासितेति, किंवा, काश्यपावत्सार नैध्रुवेति. शांडिलासितदेवलेति.
७	अत्रि.	आत्रेयार्चनानस श्यावाश्वेति. (अत्रिगोत्राचें कोणत्याही अन्य गोत्राशीं जमतें म्हणून "अत्रीची सर्वत्र मैत्री" अशी म्हण आहे.)

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

वरील कोष्टकांत जीं गोत्रें लिहिलीं नाहींत आणि प्रवर सारखे असल्यामुळें ज्या गोत्रांचें परस्परांशीं पटत नाहीं, तीं गोत्रें पुढील कोष्टकांत दिलीं आहेत. याशिवायही आणखी अनेक गोत्रें आहेत, त्या सर्वांचा समावेश स्थलसंकोचास्तव येथें केला नाहीं. त्याविषयीं सिंध्वादि ग्रंथांत पहावें.

कोष्टक २.

८ आंगिरस कुत्स मुद्गल	११ कौशिक पार्थिव लोहिताक्ष वैश्वामित्र शालाक्ष	१४ जामदग्नि भार्गव वत्स
९ उपमन्यु कौंडिण्य वासिष्ठ	१२ गार्ग्य भारद्वाज	१५ बादरायण सर्वांशीं पटतें
१० काश्यप नैध्रुव शांडिल्य	१३ गौतम पार्थिव	१६ वैन्य सर्व गोत्रांशीं पटतें

विषकन्यायोग.

सूर्यभौमार्किवारेषु तिथिर्भद्रा शताभिधा ।
आश्लेषा कृत्तिका चेत्स्यात्तत्र जाता विषांगना ॥ ३९ ॥
जनोर्लग्ने रिपुक्षेत्रसंस्थितः पापखेचरः ।
द्वौ सौम्यावपि योगेऽस्मिन्संजाता विषकन्यका ॥ ४० ॥
लग्ने शनैश्चरो यस्याः सुतेऽर्कों नवमे कुजः ।
विषाख्या सापि नोद्वाह्या विविधा विषकन्यका ॥ ४१ ॥

(१) रवि, मंगळ किंवा शनि यांपैकीं एकाद्या वारीं भद्रातिथि म्हणजे द्वितीया, सप्तमी किंवा द्वादशी यांपैकीं एकादी तिथि असून त्याच दिवशीं शततारका, आश्लेषा कृत्तिका यांपैकीं एकादें नक्षत्र असतां, अशा तिथिवारनक्षत्रयोगावर जन्मलेली कन्या विषकन्या म्हणावी. (२) जिच्या जन्मलग्नीं पापग्रह असेल व तो शत्रुक्षेत्रींचा असेल, तीही विषकन्या जाणावी. (३) किंवा जन्मलग्नीं दोन शुभग्रह असून जर ते शत्रुक्षेत्रीं असतील तर तीही विषकन्या होय. (४) वराच्या शत्रुगृहीं असणारा पापग्रह वधूच्या जन्मलग्नीं असतां विषकन्या योग होतो. अथवा (५) जन्मलग्नीं शनि, पंचमस्थानीं रवि आणि नवमस्थानीं मंगळ असा ग्रहयोग असतां ती विषकन्या म्हणावी. असे विषकन्यायोगाचे चार पांच प्रकार आहेत.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

विषकन्यायोगाचा अपवाद.

जन्मभाज्जन्मलग्नाद्वा द्युनपः स्वगृहे शुभः ।
केंद्रे कोणेऽथवा चंद्रो लग्नाधीशः शुभग्रहः ॥ ४२ ॥
बृहस्पतिर्भृगुः स्वोच्चे मित्रस्थे वलिनस्तथा ।
एषु योगेषु या जाता न भवेत् विषकन्यका ॥ ४३ ॥

जन्मराशीपासून (म्हणजे चंद्रापासून) किंवा जन्मलग्नापासून सप्तमेश शुभग्रह असून स्वक्षेत्रीं असेल अथवा लग्नस्वामी शुभग्रह असून केंद्रांत १।४।७।१० किंवा त्रिकोणांत ५।९ या स्थानीं असेल किंवा तेथेंच (केंद्रांत किंवा त्रिकोणांत) चंद्र, गुरु किंवा शुक्र बलवान् म्हणजे स्वगृहीं, उच्चीचे, मित्रक्षेत्रीं, अथवा शुभ ग्रहांनीं दृष्ट असतील, तर विषकन्यात्वदोष नष्ट होतो. असे योग असतां कुजदोषाचाही परिहार होतो.

विषकन्यायोगाचा परिहार.

जन्मोत्थं च विलोक्य बालविधवायोगं विधाय व्रतम्
सावित्र्या उत पैप्पलं हि सुतया दद्यादिमां वा रहः ।
सल्लग्नेऽच्युतमूर्तिपिप्पलघटैः कृत्वा विवाहं स्फुटं
दद्यात्तां चिरजीविनेऽत्र न भवेद्दोषः पुनर्भूभवः ॥ ४४ ॥

कन्येच्या जन्मकुंडलींत वैधव्यसूचक दुष्ट ग्रहांचा योग दिसल्यास त्या कन्येकडून सावित्रीचें किंवा अश्वत्थाचें व्रत करवावें. किंवा गुप्त रीतीनें विष्णुमूर्ति, अश्वत्थ किंवा कुंभ यांचेबरोबर त्या कन्येचा विवाह करून नंतर ती कन्या शुभ मुहूर्तावर दीर्घायुषी, योग्य व सुलक्षणी वराला द्यावी. असा कुंभादिविवाह केल्यामुळें त्या वधूला पुनर्विवाहाचा दोष लागत नाहीं.

कन्याक्रयविक्रयदोष.

न कन्यायाः पिता विद्वान् गृह्णीयाच्छुल्कमण्वपि ।
गृह्णन् शुल्कं हि लोभेन स्यान्नरोऽपत्यविक्रयी ॥ ४५ ॥
स्त्रीधनानि तु ये मोहादुपजीवन्ति बांधवाः ।
नारीयानानि वस्त्रं वा ते पापा यान्त्यधोगतिम् ॥ ४६ ॥
यः कन्यापालनं कृत्वा करोति यदि विक्रयम् ।
विपदा धनलोभेन कुंभीपाकं स गच्छति ॥ ४७ ॥

अपत्यविक्रय करून त्याचें द्रव्य घेणें ह्यास मनूनें शुल्क असें म्हटलें आहे. आणि जो बाप कन्याविक्रय करून द्रव्य घेईल किंवा उपजीविकेकरितां स्त्रीधनाचा अपहार करील, तो अधोगतीस जाईल असेंही सांगितलें आहे. मुलाचा हुंडा घेणें हा देखील मनूच्या मताप्रमाणें अपत्यविक्रयच होय. परंतु हुंडा घेणें ही गोष्ट लोकांत वाईट

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

समजली जात नाहीं! आणि कन्याविक्रय मात्र लोक निंद्य समजतात! तथापि शास्त्रदृष्ट्या शुल्क किंवा हुंडा घेणारे दोघेही सारखेच दोषी आहेत. सांप्रत हुंड्याचें प्रमाण अमर्याद वाढत चाललें आहे हें बव्हंशीं दारिद्र्याचेंच द्योतक आहे. असो; कोणत्याही पुरुषानें वधू विकत घेऊन तिचें पाणिग्रहण करूं नये. कारण मनूनें असें सांगितलें आहे कीं, "क्रयक्रीता च या कन्या पत्नी सा न विधीयते"। वधू विकत घेऊन तिचें पाणिग्रहण केलें असतां ती वधू, पत्नी या पवित्र संज्ञेला पात्र होत नसून दासी होते. आणि धर्मकृत्यांना दासी वर्ज्य मानिलेली आहे. यासाठीं विचारी पुरुषानें वधू विकत घेऊन तिच्याशीं विवाह करूं नये. म्हणजे त्या योगानें कन्याविक्रयाच्या पातकाला उत्तेजन दिल्याचा दोष लागणार नाहीं; व दासीच्या पाणिग्रहणापासून घडणारें पातकही टळेल. असे दोन अर्थ साधितां येतील.

विवाहास निषिद्ध कन्या.

मातुः सपत्न्या भगिनीं तत्सुतां च विवर्जयेत्।
पितृव्यपत्नीभगिनीं तत्सुतां च विवर्जयेत् ॥ ४८ ॥
पैतृष्वसेयीं भगिनीं स्वस्रीयां मातुरेव च।
एतास्तिस्रस्तु भार्यार्थे नोपयच्छेत बुद्धिमान् ॥ ४९ ॥
मातुलस्य सुतामूढ्वा मातृगोत्रां तथैव च।
समानप्रवरां चैव त्यक्त्वा चांद्रायणं चरेत् ॥ ५० ॥

वधूचें लक्षण पूर्वीं सांगितलें आहे तें ध्यानांत ठेवून, त्याशिवाय आतेबहीण, मावसबहीण व मामेबहीण यांच्याशीं विवाह करूं नये. कित्येक ठिकाणीं मामेबहिणीशीं लग्न करण्याचा परिपाठ आहे; पण तो गौण पक्ष होय. आपल्या बायकोच्या बहिणीची कन्या; चुलत्याच्या बायकोची बहीण, व तिची कन्या; सापत्न मातेची बहीण व त्या बहिणीच्या कन्या; ह्यांबरोबर विवाह करूं नये. तसेंच, 'ज्येष्ठो भ्राता पितुः समः'। म्हणजे वडील भाऊ बापाप्रमाणें होय, असें वचन असल्यामुळें, ज्येष्ठ भ्रात्याच्या पत्नीची बहीण ती आपणांला मावशीप्रमाणें होते, म्हणून तीही वर्ज्य करावी, असें कित्येक म्हणतात. माध्यंदिनशाखेच्या ब्राह्मणांनीं मामाचें गोत्र वर्ज्य करावें असें सांगितलें आहे; म्हणजे त्या गोत्रांतील किंवा त्या गोत्राच्या समान प्रवरांतील कन्येशीं विवाह करूं नये किंवा त्या गोत्रांत कन्या देऊं नये. तथापि अडचणींच्या वेळीं मामाचें केवळ गोत्र मात्र पाळावें, परंतु प्रवरांचा विचार करण्याची जरूरी नाहीं, असें शास्त्रमत आहे. यजुःशाखेच्या कित्येक ब्राह्मणांत भाचीबरोबर मामाचें लग्न करण्याचा क्वचित् अडचणीच्या प्रसंगीं प्रघात आहे, पण ही गोष्ट शास्त्रदृष्ट्या निंद्य आहे. पूर्वीं विरुद्धसंबंध या विषयांत हें विवेचन झालें आहेच.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

विवाहाचें प्रकार.

ब्राह्मो दैवस्तथैवार्षः प्राजापत्यस्तथासुरः ।
गांधर्वो राक्षसश्चैव पैशाचश्चाष्टमोऽधमः ॥ ५१ ॥

१ ब्राह्म, २ दैव, ३ आर्ष, ४ प्राजापत्य, ५ आसुर, ६ गांधर्व, ७ राक्षस, आणि ८ पैशाच असे आठ प्रकारचे विवाह आहेत. त्यांपैकीं सांप्रत ब्राह्म आणि गांधर्व, असे दोन प्रकारचे विवाह मात्र प्रचारांत आहेत. त्यांचीं लक्षणें येथें सांगतों.

ब्राह्मविवाहाचें लक्षण.

आच्छाद्य चार्चयित्वा च श्रुतिशीलवते स्वयम् ।
आहूय दानं कन्याया ब्राह्मो धर्मः प्रकीर्तितः ॥ ५२ ॥

विद्वान् आणि गुणवान् असा वर आपल्या घरीं आपण बोलावून आणून, वस्त्रांनीं आच्छादित आणि अलंकारांनीं यथाशक्ति विभूषित केलेली आपली कन्या त्यास विधियुक्त देणें, अशा प्रकारच्या विवाहाला ब्राह्मविवाह म्हणतात.

गांधर्वविवाहाचें लक्षण.

इच्छयान्योन्यसंयोगः कन्यायाश्च वरस्य च ।
गांधर्वः स तु विज्ञेयो मैथुन्यः कामसंभवः ॥ ५३ ॥

कन्या आणि वर यांच्या परस्परप्रेमानें व विषयाच्या लालसेनें होणारा जो विवाह, त्यास गांधर्व किंवा प्रीतिविवाह म्हणतात. सर्व विवाहांत विषयाचा उद्देश आहेच आहे, तेव्हां वरील श्लोकांत 'कामसंभवः' हें पद विशेषेंकरून घालण्यांत ग्रंथकाराचा इतकाच उद्देश दिसतो कीं, कामेच्छा उत्पन्न होऊन विवाहाची आवश्यकता भासण्याइतकें प्रौढ दंपत्य असावें; म्हणजे परस्परांच्या संमतीनें हा विवाह व्हावा. तथापि दात्याची म्हणजे पिता किंवा पालक यांचीही संमति त्याला अवश्य पाहिजे. कारण, त्यावांचून विवाह सशास्त्र होत नाहीं; असो. हा प्रीतिविवाह असल्यामुळें अर्थात् पत्रिका पाहून घटित जमविण्याची आवश्यकता नाहीं. ब्राह्मणांवांचून इतर वर्णांना मात्र गांधर्वविवाहाची मोकळीक शास्त्रकारांनीं ठेविली आहे.

जन्मराशीवरून घटित पहावें.

विवाहे सर्वमांगल्ये यात्रादौ ग्रहगोचरे ।
जन्मराशेः प्रधानत्वं नामराशिं न चिंतयेत् ॥ ५४ ॥
जन्मभं जन्मधिष्ण्येन नामधिष्ण्येन नामभम् ।
व्यत्ययेन यदा योज्यं दंपत्योरशुभप्रदम् ॥ ५५ ॥

म्हणजे विवाहकालीं, इतर मंगलकार्यांत, यात्रादिप्रयाणसमयीं, मुहूर्त व चालू

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ग्रह हे जन्मराशीवरूनच पहावे. व्यावहारिक नांवाचा उपयोग करूं नये. किंवा जन्मनक्षत्राचें जन्मनक्षत्राशीं आणि नामनक्षत्राचें नामनक्षत्राशींच घटित पहावें. जन्मराशी व व्यावहारिक नामराशी यांचें घटित पाहूं नये. कारण तसें करणें शुभ-सूचक नाहीं; असो. ही आठ प्रकारची मैत्री जमविण्यापूर्वी वधूवरांस अनिष्ट मंगळ, किंवा दुष्टनक्षत्रांवर त्यांचा जन्म, इत्यादि दोष आहेत कीं काय, हें पुढें सांगितल्याप्रमाणें प्रथम पहावें.

जन्मपत्रिका नसतां शास्त्रार्थ.

अज्ञातजन्मभानां तु व्यावहारिकनामभात् ।
विचारयेदिदं सर्वं संकरः क्लेशदायकः ॥ ५६ ॥

ज्याचें जन्मनक्षत्र ठाऊक नसेल म्हणजे ज्याची पत्रिका नसेल त्याचें व्यावहारिक नांवावरून घटित जमवावें. परंतु एकाचें जन्मनक्षत्र आणि दुसऱ्याचें व्यावहारिक नांव असें मिश्रघटित पाहून विवाह जमविणें क्लेशदायक आहे.

वधूवरांचें पत्रिकामेलन.

घटितं प्रथमं ज्ञात्वा शुभदं वरकन्ययोः ।
उद्वाहस्तु विधातव्यस्तेनादौ वच्मि तत् शिवम् ॥ ५७ ॥
वर्णो वश्यं तथा तारा योनिर्ग्रहगणस्तथा ।
भकूटं नाडिमैत्री च इत्येवं चाष्टमैत्रिका ॥ ५८ ॥
एकैकवृद्धितो ज्ञेया वर्णादीनां गुणाः क्रमात् ।
विवाहे शुभदास्तेषां गुणे त्वष्टादशाधिके ॥ ५९ ॥

वधूवरांचें टिप्पण जमविणें ह्याला ज्योतिषांत घटित किंवा मैत्री जमविणें असें म्हणतात. ही मैत्री जन्मनक्षत्र आणि जन्मराशि ह्यांवरून जमवितात. ती जमविल्याशिवाय वधूवरांचा विवाह करूं नये, असें धर्मशास्त्रकारांनीं लिहिलें आहे. तिचे आठ प्रकार आहेत ते असे:— १ वर्ण, २ वश्य, ३ ताराबल, ४ योनि, ५ ग्रहमैत्री, ६ गणमैत्री, ७ राशिकूट, आणि ८ नाडी. ह्या आठ भेदांचे अनुक्रमेंकरून एक, दोन, तीन इत्यादि पूर्ण गुण धरावे. म्हणजे शुभवर्णाचा गुण १, वश्याचे गुण २, शुभताराबलाचे ३, योनीचे ४, ग्रहमैत्रीचे ५, गणाचे ६, राशिकूटाचे ७, आणि नाडीचे ८, ह्याप्रमाणें सर्व शुभ असतां एकंदर छत्तीस गुण येतात. ह्या छत्तीस गुणांपैकीं अठरांपेक्षां अधिक गुण आले म्हणजे ती मैत्री ग्राह्य आहे, असें समजावें. ही मैत्री जन्मपत्रिकेवरूनच जमविली पाहिजे. जन्मपत्रिका नसली म्हणजे कित्येक लोक वधूवरांच्या व्यावहारिक नांवांवरूनच घटित जमवितात, परंतु तो गौणपक्ष आहे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

अनिष्ट मंगळ.

लग्ने तुर्येऽष्टमे भौमे सप्तमेऽन्त्ये च जन्मनि ।
भर्तुर्योषिद्विनाशः स्यात् स्त्रिया भर्तृविनाशनम् ॥ ६० ॥
एवंविधे कुजे संख्ये विवाहो न कदाचन ।
कार्यो वा गुणबाहुल्ये कुजे वा तादृशे द्वयोः ॥ ६१ ॥

जन्मलग्नीं किंवा लग्नापासून चवथा, सातवा, आठवा आणि बारावा असा पांच स्थानीं मंगळ असेल तर तो अनिष्ट मंगळ होय. वधूवरांतून एकाला अनिष्ट मंगळ असून दुसऱ्याला तसा नसेल तर तें ग्राह्य नाहीं. वधूवरांपैकीं एकाला ज्या स्थानांतील मंगळ असेल त्याच स्थानीं दुसऱ्याला असला पाहिजे असें नाहीं. फक्त पांच स्थानांपैकीं कोणत्या तरी एका स्थानांतील असावा. तसेंच एकाच्या सप्तमस्थानांत मंगळ असून दुसऱ्याच्या सप्तमस्थानांत शनि किंवा सप्तमस्थानावर शनीची दृष्टि असेल तर तेंही ग्राह्य धरून विवाह करावा असें कित्येकांचें मत आहे. तसेंच, कित्येक ज्योतिष्यांच्या मतें, सप्तमेश जेथें असेल त्या स्थानापासून जर १।४।७।८।१२ या स्थानीं मंगळ असेल, तर मात्र तो अनिष्ट मंगळ समजावा, असें आहे. तथापि दोन्ही नियम अपवादात्मक आहेत असा अनुभव आहे. गुणांची संख्या पूर्ण असतां कुजदोष नष्ट होतो. येथें एवढें अवश्य सांगितलें पाहिजे कीं, मंगळ वगैरे पाहणें असेल तर जन्मपत्रिका मात्र अत्यंत विश्वसनीय, म्हणजे जन्मकाळ बरोबर साधून केलेली असली पाहिजे. घड्याळाशिवाय अनुमानानें वेळ ठरवून त्याप्रमाणें कुंडली तयार केलेली असेल तर ती व्यर्थ होय. कारण पांच दहा मिनिटांचा फरक पडला तरी देखील सर्व कुंडली बदलते. अशा वेळेस आपण चवथा मंगळ म्हणून जो ठरवावा, तो तिसरा किंवा पांचवा देखील असूं शकेल; याकरितां आपण केलेली कुंडली विश्वसनीय आहे, अशी आपली पक्की खात्री असेल तरच कुंडलींत अनिष्ट मंगळ असल्यास, त्याचा विचार करावा. विश्वसनीय कुंडली म्हणजे जन्मकाल गणितानें सिद्ध करून त्या वेळचें लग्न, द्वादश भाव व स्पष्टग्रह साधून व ग्रहांच्या बलाचा विचार करून नंतर घटिताचा व मंगळाचा विचार करावा. कारण ग्रह हीनबली असतील तर निष्फल होतात, अथवा विरुद्ध फलही देतात. वेधामुळेंही ग्रहांपासून विरुद्ध फल मिळतें. म्हणून ग्रहांचीं फलें पाहतांना वेधाचाही अवश्य विचार करावा. स्पष्टग्रह सिद्ध करावयाचे ते जन्मस्थानाच्या स्थानिक पंचांगावरून करावे.

शनि आदिकरून इतर पापग्रह विशेष दोषास्पद न मानितां विवाहकालीं मंगळच मुख्यत्वेंकरून कां अमंगळ मानिला आहे हें कळत नाहीं. लग्नीं, चतुर्थस्थानीं व द्वादशस्थानीं असलेल्या मंगळाची दृष्टि सप्तमस्थानावर असते ती अशुभ होय, किंवा अष्टमस्थानीं मंगळ असल्यास कुटुंब (द्वितीय) स्थानावर दृष्टि पडते म्हणून ती अशुभ, आणि सप्तमस्थान हें तर वधूकुंडलींत पतीचें स्थान आणि वरकुंडलींत

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

जायास्थान म्हणून तेथें असणारा मंगळ तर अर्थातच अशुभ होय. अशा कल्पनेनें मंगळाचें स्तोम विवाहसमयीं घटित जमवितांना कोणीतरी प्रचारांत आणिलें आहे; पण याला प्राचीन जातकग्रंथांत आधार सांपडत नाहीं. मुहूर्तचिंतामणि, मुहूर्तमार्तंड, बृहज्जातक, सारावली वगैरे ग्रंथांतून विवाहघटिताचा विस्तृत विचार केलेला आहे, परंतु त्यांत मंगळाविषयीं कांहीं उल्लेख नाहीं. वधूचें सप्तम व अष्टम स्थान खलग्रहानें दूषित नसावें इतकेंच त्यांत सांगितलेलें आहे. यावरून असें दिसतें कीं, ही कुजदोषाची कल्पना अर्वाचीन म्हणजे शेंदोनशें वर्षांची असावी. आधाराकरितां घेतलेले उपरिनिर्दिष्ट दोन श्लोक मुहूर्तगणपतिनामक ग्रंथांतील असून तो ग्रंथ गुर्जरप्रांतस्थ ज्योतिर्विदानें रचिलेला आहे, त्यावरून गुजराथ प्रांतांतून ही कुजदोषाची कल्पना आली असावी असें कित्येकांचें मत आहे. शिवाय हा भौमदोष पाहण्याचे दोन तीन प्रकार आढळतात. कोणी चंद्रापासून म्हणजे जन्मलग्नकुंडलींत जेथें चंद्र असेल तेथपासून मंगळ मोजतात; कित्येक सप्तमेश जेथें असेल तेथून मंगळ मोजतात; आणि कोणी जन्मलग्नापासून मोजतात. यांपैकीं अधिक विश्वसनीय प्रकार कोणता हें निश्चितपणें कोणी ठरविलेलें नाहीं. सारांश खलग्रहांचा विचार कर्तव्य असेल तर पत्रिका सूक्ष्मगणितानें सिद्ध केलेली व विश्वसनीय तरी असावी. जन्मापासून १५।१६ वर्षें लोटल्यानंतर विवाहसमयीं पत्रिका करवितात हें खूळ किंवा फसवणूक आहे.

मंगळाचा दोषपरिहार.

जामित्रे च यदा सौरिर्लग्ने वा पंचमेऽथवा ।
अष्टमे दशमे चैव भौमदोषो न विद्यते ॥ ६२ ॥
अजे लग्ने व्यये चापे पाताले वृश्चिके कुजे ।
द्युने मृगे कर्किचाष्टौ भौमदोषो न विद्यते ॥ ६३ ॥
सबले गुरौ भृगौ वा, लग्नाद्द्युनगेपि वाथवा भौमे ।
वक्रिणि नीचारिगृहस्थेवार्कस्थेपि वा न कुजदोषः ॥ ६४ ॥
राशिमैत्रिं यदा याति गणैक्यं वा यदा भवेत् ।
अथवा गुणबाहुल्ये भौमदोषो न विद्यते ॥ ६५ ॥
अस्तगे नीचगे भौमे शत्रुक्षेत्रगतेऽपि वा ।
कुजाष्टमोद्भवो दोषो न किंचिदपि विद्यते ॥ ६६ ॥

कुंडलींत सप्तमस्थानीं, लग्नीं, पंचमस्थानीं, अष्टमस्थानीं किंवा दशमस्थानीं शनि असतां भौमदोष मानूं नये. कारण तेथून शनीची दृष्टि सप्तमस्थानावर व कुटुंब स्थानावर पडते. तसेंच, मेषराशीचा मंगळ लग्नीं, धनुराशीचा व्ययस्थानीं, वृश्चिकराशीचा चतुर्थस्थानीं, मकरराशीचा सप्तमस्थानीं व कर्कराशीचा अष्टमस्थानीं असलेला मंगळ दोषावह होत नाहीं. तसेंच, तो मंगळ वक्री, नीचीचा,

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

शत्रुगृहींचा, अस्तंगत अथवा शुभग्रहानें पूर्ण दृष्ट असल्यास किंवा बलवान् गुरु शुक्र लग्नीं अथवा सप्तमस्थानीं असतां कुजदोष रहात नाहीं. अथवा वधूवरांच्या राशींच्या स्वामींची मैत्री असल्यास, एक गण असल्यास, किंवा गुणबाहुल्य असतां म्हणजे २४ गुणांहून अधिक गुण असतां मंगळाचा दोष नष्ट होतो.

आश्लेषादि जन्मनक्षत्रांचीं फळें.

आश्लेषाख्यसमुत्पन्नौ श्वश्रूं कन्यासुतौ हतः।
मूलजौ श्वशुरं हंति ज्येष्ठोत्था स्वधवाग्रजम् ॥ ६७ ॥

खालीं लिहिलेले अपवाद खेरीज करून आश्लेषानक्षत्रावर जन्मलेली कन्या अथवा पुत्र हीं आपल्या विवाहानंतर आपल्या सासूला वाईट असतात. मूलनक्षत्रीं जन्मलेली कन्या किंवा पुत्र सासऱ्याला वाईट असतात. ज्येष्ठानक्षत्रोत्पन्न कन्या आपल्या वडील दीराला वाईट आणि विशाखानक्षत्रीं जन्मलेली कन्या धाकट्या दीराला वाईट असते, असें मानिलेलें आहे. वाईट म्हणजे क्लेश देणारीं असें समजावें.

आश्लेषादि नक्षत्रांचे अपवाद.

आश्लेषाप्रथमः पादः पादो मूलांतिमस्तथा।
विशाखाज्येष्ठयोराद्यास्त्रयः पादाः शुभावहाः ॥ ६८ ॥

आश्लेषांचा पहिला चरण, मूलनक्षत्राचा शेवटचा चरण आणि विशाखा व ज्येष्ठा या दोन नक्षत्रांचे पहिले तीन चरण यांवर कन्या किंवा पुत्र यांचा जन्म झाला असतां शुभ होय; म्हणजे त्यांच्या ठिकाणीं वर लिहिलेले दोष नसतात असें समजावें. अनिष्ट मंगळ व दुष्टनक्षत्रीं जन्म हें प्रथम पाहून नंतर अष्टमैत्री पहावी. ती पाहण्याची रीति आतां सांगतों.

वर्णविचार.

कर्कवृश्चिकमीनाख्या ब्राह्मणा अथ बाहुजाः।
मेषसिंहधनुष्काख्या वृषकन्यामृगा विशः ॥ ६९ ॥
तुलाद्वंद्वघटाः शूद्राश्चैते वर्णाश्च राशिजाः।
वर्णाधिक्ये वरः श्रेष्ठो न कन्या वर्णतोधिका ॥ ७० ॥
एको गुणः सदृक् वर्णे तथा वर्णोत्तमे वरे।
हीनवर्णे वरे शून्यं केप्याहुः सदृशे दलम् ॥ ७१ ॥

कर्क, वृश्चिक आणि मीन या राशींचा ब्राह्मणवर्ण होय. मेष, सिंह आणि धन या राशींचा क्षत्रिय; वृषभ, कन्या आणि मकर यांचा वैश्य; आणि तूळ, मिथुन व कुंभ यांचा शूद्र; याप्रमाणें राशींचे वर्ण जाणावे. हे वर्ण ध्यानांत ठेवण्याची सोपी रीति अशी आहे कीं, मीनापासून कुंभापर्यंत बारा राशींचे अनुक्रमानें ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र हेच वर्ण पुनः पुनः जाणावे. जसें, मीनराशीचा विप्रवर्ण, मेष-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

राशीचा क्षत्रिय, वृषभराशीचा वैश्य, आणि मिथुनराशीचा शूद्र; पुनः कर्कराशीचा विप्र याप्रमाणें पुढें कुंभराशीपर्यंत वर्ण मोजावे. वधूवरांचा एक वर्ण किंवा वराचा उच्चवर्ण असेल तर गुण एक. वधूचा उच्चवर्ण असतां गुण शून्य. वर्णांच्या उच्चतेसंबंधानें ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र हा क्रम जाणावा.

वश्य विचार.

द्वंद्व[3]चाप[9]घट[11]कन्यका[6]तुला[7] मानवा अज[1]वृषौ[2] चतुष्पदौ ।
कर्क[4]मीन[12]मकरौ[10] जलोद्भवाः केसरी[5]वनचरोऽलि[8]कीटकाः ॥ ७२ ॥
वैरभक्ष्ये गुणाभावो द्वयोः साम्ये गुणद्वयम् ।
वश्यवैरे गुणश्चैको वश्यभक्ष्ये गुणार्धकम् ॥ ७३ ॥

वरील श्लोकामध्यें शब्दांवर जे अंक दिले आहेत ते राशींचे अनुक्रमांक आहेत. मिथुन, धन, कुंभ, कन्या आणि तूळ ह्या मनुष्यराशी होत. मेष, वृषभ ह्या चतुष्पादराशी होत. कर्क, मीन आणि मकर ह्या जलचरराशी होत. सिंह ही वनचरराशि आणि वृश्चिक ही कीटकराशि आहे असें जाणावें. ह्या परस्पर राशींचें मित्रत्व किंवा वैर वगैरे व्यवहारावरून ठरवावें. तथापि बाजूस गुणांचें कोष्टक दिलें आहे, त्यावरूनही ठरवितां येईल. ज्या परस्पर राशींचें साम्य म्हणजे मैत्री आहे, त्याचे २ गुण दिले आहेत. ज्यांचें परस्पर वश्यवैर आहे, त्याचा १ गुण आहे. ज्यांचा परस्पर वश्यभक्ष्य संबंध आहे त्याचा ·॥· गुण आहे. ज्यांचा वैरभक्ष्यसंबंध आहे त्याचा शून्य गुण आहे. परस्पर वैरभक्ष्यसंबंध म्हणजे, उदाहरणार्थ, जलचरराशी ह्या मानवराशींचें भक्ष्य आहेत, व मानवराशींचें जलचरांशीं वैर आहे, म्हणून हा परस्पर वैरभक्ष्यसंबंध होय. याचप्रमाणें वश्यवैर, वश्यभक्ष्य इत्यादि जाणावें. स्पष्टीकरणार्थ, चतुष्पादराशींचें आडवें कोष्टक पहा. वधूवरांच्या समान प्रकृतीच्या राशी असतां २ गुण; दोघांतून एकाची चतुष्पाद व दुसऱ्याची मानव असतां ·॥· गुण; जलचर किंवा कीटक असतां १ गुण; वनचर असतां शून्य गुण याप्रमाणें सर्व कोष्टक पहावें.

	च.	मा.	ज.	व.	की.
चतु.	२	·॥·	१	०	१
मान.	·॥·	२	०	०	०
जल.	१	०	२	२	२
वन.	०	०	२	२	०
कीट.	१	०	१	०	२

ताराबल.

कन्याभं वरभाद्गण्यं वधूभाद्वरभं तथा ।
नवहृच्छेषभे नेष्टे सप्तमं च त्रिसंख्यके ॥ ७४ ॥
शुभा चेदेकतस्तारा तदा सार्धगुणोदयः ।
शुभा चेत्स्युस्त्रयः शून्यं चोभयोश्चेत्त्रयोऽशुभाः ॥ ७५ ॥

वराच्या जन्मनक्षत्रापासून वधूच्या जन्मनक्षत्रापर्यंत नक्षत्रें मोजावीं; त्यांस नवांनीं भागावें; बाकी ३।५।७ राहिली तर अशुभ आणि १।२।४।६।८।० म्हणजे

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

९ राहिली तर शुभताराबल आहे, असें समजावें. तसेंच, वधूनक्षत्रापासून वरनक्षत्रापर्यंत नक्षत्रें मोजून नवांनीं भागावें आणि वरच्याप्रमाणेंच शुभाशुभ समजावें. दोघांची शुभ तारा आली तर गुण तीन. एक शुभ व दुसरी अशुभ असतां, गुण दीड व दोन्ही ठिकाणीं बाकी ३।५।७ असतां शून्य गुण धरावा.

तारागुणाचें कोष्टक.

	कन्या								
वर	१	२	३	४	५	६	७	८	९
१	३	३	१॥	३	१॥	३	१॥	३	३
२	३	३	१॥	३	१॥	३	१॥	३	३
३	१॥	१॥	०	१॥	०	१॥	०	१॥	१॥
४	३	३	१॥	३	१॥	३	१॥	३	३
५	१॥	१॥	०	१॥	०	१॥	०	१॥	१॥
६	३	३	१॥	३	१॥	३	१॥	३	३
७	१॥	१॥	०	१॥	०	१॥	०	१॥	१॥
८	३	३	१॥	३	१॥	३	१॥	३	३
९	३	३	१॥	३	१॥	३	१॥	३	३

नक्षत्रांच्या योनि.

अश्वो गजो मेषसर्पौ सर्पः श्वानो विडालकः ।
मेषो विडालकश्चैव मूषको मूषकश्च गौः ॥ ७६ ॥
महिषी च ततो व्याघ्रो महिषी व्याघ्र एव च ।
मृगो मृगः सारमेयो वानरो नकुलस्तथा ॥ ७७ ॥
नकुलश्च कपिः सिंहस्तुरगः केसरी च गौः ।
मतंगजः क्रमादेवं भानां प्रोक्तास्तु योनयः ॥ ७८ ॥

वरील श्लोकांत अश्विनीपासून रेवतीपर्यंत अभिजित् नक्षत्रासहित २८ नक्षत्रांच्या अनुक्रमें २८ योनि सांगितल्या आहेत, त्या खालील कोष्टकांत पहा.

अश्वि०	अश्व	पुष्य	मेष	स्वाती	म्हैस	अभि०	नकुल
भर०	गज	आश्ले०	मांजर	विशा०	व्याघ्र	श्रव०	वानर
कृत्ति०	मेष	मघा	उंदीर	अनु०	हरिण	धनि०	सिंह
रोहि०	सर्प	पूर्वा	उंदीर	ज्येष्ठा	हरिण	शत०	अश्व
मृग	सर्प	उत्तरा	गाय	मूल	श्वान	पू. भा.	सिंह
आर्द्रा	श्वान	हस्त	म्हैस	पू. षा.	वानर	उ. भा.	गौ
पुनर्व०	मार्जार	चित्रा	व्याघ्र	उ. षा.	नकुल	रेव०	गज

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

महावैरयोनि व योनिमैत्रीचे गुण.

गोव्याघ्रं महिषाश्वं च श्वैणं मार्जारमूषकम् ।
सिंहेभं कपिमेषं च वैरं तु नकुलोरगम् ॥ ७९ ॥
एकयोन्यां शुभं विद्याद्भिन्नयोन्यां तु मध्यमम् ।
अधमं शत्रुयोन्यां स्यान्महावैरे न कर्हिचित् ॥ ८० ॥
अतिमैत्रे तु चत्वारो योन्योमैत्रे त्रयो गुणाः ।
औदासीन्ये द्वयं चैकं वैरं खं चातिशात्रवे ॥ ८१ ॥

गाय आणि वाघ, म्हैस आणि घोडा, कुत्रा आणि हरिण, मार्जार आणि उंदीर सिंह आणि हत्ती, वानर आणि मेष व मुंगूस आणि सर्प ह्या परस्पर योनींचें महावैर आहे असें समजावें. कोणत्या जन्मनक्षत्राची कोणती योनि असते हें वर दिलेंच आहे. वधूवरांची एक योनि असेल तर गुण चार, उभयतांच्या योनीचें मित्रत्व असतां गुण ३, एकस्वभाव असतां गुण २, शत्रुत्व असेल तर गुण १ आणि महावैर असतां शून्य गुण जाणावा. वधूवरांच्या परस्पर योनिमैत्रींचे किती गुण धरावे हें खालील गुणांच्या कोष्टकावरून ध्यानीं येईल.

योनि	अश्व	गज	मेष	सर्प	श्वा.	मा.	मू.	गौ	म०	व्या	मृग	वा.	नकु	सिं.
अश्व	४	२	२	३	२	२	२	१	०	१	३	३	२	१
गज	२	४	३	३	२	२	२	२	३	१	२	३	२	०
मेष	२	३	४	२	१	२	१	३	३	१	२	०	३	१
सर्प	३	३	२	४	२	१	१	१	१	२	२	२	०	२
श्वान	२	२	१	२	४	२	१	२	२	१	०	२	१	१
मार्जार	२	२	२	१	२	४	०	२	२	१	३	३	२	१
मूषक	२	२	१	१	१	०	४	२	२	२	२	२	१	२
गौ	१	२	३	१	२	२	२	४	३	०	३	२	२	१
महिष	०	३	३	१	२	२	२	३	४	१	२	२	२	१
व्याघ्र	१	१	१	२	१	१	२	०	१	४	१	१	२	१
मृग	३	२	२	२	०	३	२	३	२	१	४	२	२	१
वानर	३	३	०	२	२	३	२	२	२	१	२	४	३	२
नकुल	२	२	३	०	१	२	१	२	२	२	२	३	४	२
सिंह	१	०	१	२	१	१	२	१	१	१	१	२	२	४

स्पष्टीकरण—वरील कोष्टकांतील पहिली ओळ पहा. वधूवरांतून एकाची अश्वयोनि व दुसऱ्याचीही अश्वयोनीच असेल तर ४ गुण धरावे. परस्परांची अश्व व श्वान अथवा श्वान व सर्प किंवा परस्पर गज मृग असतां २ गुण धरावे. परस्पर गौ मेष असतां ३ व गो व्याघ्र असतां ० गुण धरावा. याप्रमाणें सर्व कोष्टक पहावें.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

वैरयोनिदोषापवाद.

योनेरभावे नोद्वाहः स तु कार्यो वियोगदः ।
राशिवैश्यं च यद्यस्ति कारयेन्न तु दोषभाक् ॥ ८२ ॥

शुभयोनि नसतां अथवा योनिकूटांत वैर महावैर असतां विवाह करूं नये असें जरी सांगितलें आहे, तरी राशिकूट आणि वश्यकूट हीं इष्ट असतां योनिकूटाचा दोष मानूं नये.

राशींचे स्वामी.

सिंहस्याधिपतिः सूर्यो कर्कटस्य तु चंद्रमाः ।
मेषवृश्चिकयोर्भौमः कन्यामिथुनयोर्बुधः ॥ ८३ ॥
मीनधन्वोर्गुरुश्चैव शुक्रो वृषतुलाधिपः ।
शनिर्नक्रस्य कुंभस्य राशीनामधिपाः स्मृताः ॥ ८४ ॥

वरील श्लोकांत मेषापासून मीनापर्यंत बारा राशींचे बारा स्वामी सांगितले आहेत, त्यांचें कोष्टक खालीं दिलें आहे त्यावरून स्पष्ट कळेल.

राशी स्वामी.	राशी स्वामी.	राशी स्वामी.	राशी स्वामी.
मेष—मंगळ.	कर्क—चंद्र.	तूळ—शुक्र.	मकर—शनि.
वृषभ—शुक्र.	सिंह—रवि.	वृश्चिक—मंगळ.	कुंभ—शनि.
मिथुन—बुध.	कन्या—बुध.	धन—गुरु.	मीन—गुरु.

ग्रहांचा शत्रुमित्रविचार.

चंगुमं रविमित्राणि, बुसमो, शशु वैरिणौ ।
चंद्रमित्रे रबु, समाः शगुशमंगु, न वैरिणः ॥ ८५ ॥
भौममित्राणि रगुचं, समौ शुश, रिपुर्बुधः ।
बुधमित्रे रशु, समा गुशमं, चंद्रमा रिपुः ॥ ८६ ॥
रचमं गुरुमित्राणि, समः श, बुशु वैरिणौ ।
भार्गवस्य बुशं मित्रे, समौ मंगू, रचं रिपू ॥
शनेर्मित्रे बुशु, समो गुरु, मंचर शत्रवः ॥ ८७ ॥

वरील प्रत्येक श्लोकार्धांत अनुक्रमानें सूर्यादि प्रत्येक ग्रहाचें कोणत्या ग्रहाशीं मित्रत्व, समत्व आणि शत्रुत्व असतें हें दिलें आहे. त्यांत ग्रहांचीं सबंध नांवें न देतां फक्त आद्याक्षरेंच दिलीं आहेत. उदाहरणार्थ, पहिला श्लोकार्ध पहा. चंगुमं म्हणजे चंद्र, गुरु व मंगळ हे रवीचे मित्र, बु. म्ह० बुध सम आणि शशु म्ह० शनि, शुक्र हे शत्रु होत. याचप्रमाणें इतर चंद्रादि सहा ग्रहांचें समजावें.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ग्रहांचें शत्रुमित्र कोष्टक.

	रवि	चंद्र	मंगळ	बुध	गुरु	शुक्र	शनि
मित्र	चंद्र गुरु मंगळ	रवि बुध	रवि चंद्र गुरु	रवि शुक्र	रवि चंद्र मंगळ	बुध शनि	बुध शुक्र
सम	बुध	मंगळ गुरु शुक्र शनि	शुक्र शनि	मंगळ गुरु शनि	शनि	मंगळ गुरु	गुरु
शत्रु	शुक्र शनि	०	बुध	चंद्र	बुध शुक्र	रवि चंद्र	रवि चंद्र मंगळ

ग्रहमैत्रीचे गुण.

मिथो वैरे तु शून्यं स्यात् समवैरे गुणार्धकम् ।
एकं शात्रवमैत्रे च द्वयोः साम्ये त्रयो गुणाः ॥ ८८ ॥
समं मैत्रे तु चत्वारः मित्रत्वे गुणपंचकम् ।
मित्रत्वे चोभयोस्तद्वद्राश्योश्च वरकन्ययोः ॥ ८९ ॥

कोणत्या राशीचा कोणता स्वामी हें वर सांगितलेंच आहे. उभयतांच्या राशींचा स्वामी एक असेल किंवा त्या स्वामींचें परस्पर मित्रत्व असेल तर गुण पांच, सम-मित्रत्वाचे गुण चार, समत्वाचे गुण तीन, शत्रुमित्रत्वाचा गुण एक, शत्रुसमत्वाचा गुण अर्धा, आणि दोघांच्या राशिस्वामींचें परस्पर शत्रुत्व असेल तर गुण शून्य याप्रमाणें समजावें. उदाहरणार्थ, रवि आणि मंगळ हे परस्पर मित्र आहेत म्हणून हें परस्पर मित्रत्व झालें. बुधाचें शनीबरोबर समत्व, परंतु शनीचें बुधाबरोबर मित्रत्व आहे म्हणून हें सममित्रत्व झालें. मंगळ शुक्राबरोबर सम व शुक्र मंगळा-बरोबर सम आहे म्हणून हें परस्पर समत्व झालें. बुधाचें चंद्राबरोबर शत्रुत्व परंतु चंद्राचें बुधाबरोबर मित्रत्व आहे म्हणून हें शत्रुमित्रत्व झालें. मंगळाचें बुधाबरोबर शत्रुत्व व बुधाचें मंगळाबरोबर समत्व आहे म्हणून हें शत्रुसमत्व झालें. रविशुक्र हे परस्पर शत्रु होत म्हणून हें परस्पर शत्रुत्व झालें. वर दिलेल्या ग्रहमैत्रीच्या कोष्टकाची स्पष्ट समजूत व्हावी म्हणून हीं उदाहरणें येथें दिलीं आहेत. याचप्रमाणें इतर ग्रहांची मैत्री पहावी. आतां याचे गुण कसे पहावे हें सांगतों.

उदाहरण—वराची मकर रास आहे आणि वधूची कन्या रास आहे. या परस्पर राशींचे ग्रहमैत्रीचे किती गुण येतात तें ठरविण्याकरितां प्रथम राशींचे स्वामी पहा आणि नंतर त्या परस्परांचें शत्रुमित्रत्वादि नातें पाहून गुण ठरवा. प्रस्तुत

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

उदाहरणांत मकरराशीचा स्वामी शनि आणि कन्याराशीचा स्वामी बुध आहे. शनीचें बुधाशीं मित्रत्व आणि बुधाचें शनीशीं समत्व म्हणून हें मित्रसमत्व किंवा सममित्रत्व होय. म्हणून येथें ग्रहमैत्रीचे चार गुण आले. किंवा सिंह कर्क राशींचे स्वामी रवि चंद्र हे परस्पर मित्र म्हणून परस्पर मित्रत्वाचे गुण पांच आले. इत्यादि.

ग्रहमैत्रीगुणांचें कोष्टक.

		वराचे						
		र.	चं.	मं.	बु.	गु.	शु.	श.
वधूचे	र.	५	५	५	३	५	०	०
	चं.	५	५	४	१	४	·॥·	·॥·
	मं.	५	४	५	·॥·	५	३	·॥·
	बु.	३	१	·॥·	५	·॥·	५	४
	गु.	५	४	५	·॥·	५	·॥·	३
	शु.	५	·॥·	३	५	·॥·	५	५
	श.	०	·॥·	·॥·	४	३	५	५

गणविचार.

अश्विनी रेवती हस्तो मृगः पुष्यः पुनर्वसुः ।
अनुराधा श्रुतिः स्वाती नव देवगणाः स्मृताः ॥ ९० ॥
पूर्वात्रयं रोहिणी च उत्तरात्रयमेव च ।
आर्द्रा च भरणी चैव नवैते मानुषा गणाः ॥ ९१ ॥
कृत्तिका च मघाश्लेषा विशाखा शततारका ।
चित्रा ज्येष्ठा धनिष्ठा च मूलं रक्षोगणः स्मृतः ॥ ९२ ॥

कोणत्या जन्मनक्षत्राचा कोणता गण असतो हें खालील कोष्टकावरून समजेल.

नक्ष.	गण	नक्ष.	गण	नक्ष.	गण	नक्ष.	गण
अश्वि.	देव	पुष्य	देव	स्वाती	देव	अभि.	मनु.
भर.	मनु.	आश्ले.	राक्ष.	विशा.	राक्ष.	श्रव.	देव
कृत्ति.	राक्ष.	मघा	राक्ष.	अनु.	देव	धनि.	राक्ष.
रोहि.	मनु.	पूर्वा	मनु.	ज्येष्ठा	राक्ष.	शत.	राक्ष.
मृग.	देव	उत्त.	मनु.	मूळ	राक्ष.	पू. भा.	मनु.
आर्द्रा	मनु.	हस्त	देव	पूर्वाषा.	मनु.	उ. भा.	मनु.
पुन.	देव	चित्रा	राक्ष.	उ. षा.	मनु.	रेव.	देव

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ह्याशिवाय गण ध्यानांत ठेवण्याची एक सुलभ रीति पुढील एका श्लोकांत दिली आहे. त्यांत अश्विनी नक्षत्रापासून अनुक्रमानें सर्व नक्षत्रांच्या गणांचीं आद्याक्षरें दिलीं आहेत. दकार म्हणजे देवगण, मकार म्हणजे मनुष्यगण आणि रा म्हणजे राक्षसगण; या परिभाषेनें सत्तावीस नक्षत्रांचे गण समजावे. या दोनी श्लोकांत अभिजित् नक्षत्र सोडिलें आहे, त्याचा व त्याच्या मागील नक्षत्राचा एकच गण जाणावा.

देमरामदमंदेदे राराममदरादरा ।
देराराममदेरारा ममदेति गणाः स्मृताः ॥ ९३ ॥

गणाचे गुण.

मानुष्यां च स्त्रियं देवे वरे तुल्यं गुणेपि षट् ।
पंचान्यथा स्त्रियं दिव्यामेको रक्षोगणे वरे ॥ ९४ ॥
यदि रक्षोगणा कन्या वरश्चेन्नृगणो भवेत् ।
तदोद्वाहो गुणाधिक्ये कार्यस्त्वावश्यके सति ॥ ९५ ॥
प्रीतिर्गणैक्ये दंपत्योर्मध्या देवमनुष्ययोः ।
देवराक्षसयोर्वैरं भयंमानवरक्षसोः ॥ ९६ ॥
मैत्र्यां राशीशयोरंशस्वामिनोर्वरकन्ययोः ।
न तत्र गणदोषः स्याद्विवाहः शुभदो मतः ॥ ९७ ॥

गणाचे पूर्ण गुण सहा. वधूवरांचा एकच गण असेल किंवा वराचा देवगण व वधूचा मनुष्यगण असेल तर पूर्ण म्हणजे सहा गुण धरावे. वधूचा देवगण व वराचा मनुष्यगण असल्यास पांच गुण धरावे, दोघांपैकीं एकाचा राक्षस व दुसऱ्याचा देवगण असेल तर एक गुण धरावा. राक्षस आणि मनुष्य गणांचा शून्य गुण होय. दोघांचा एक गण असेल तर परस्परांचें परस्परांवर उत्तम प्रेम राहील. मनुष्य आणि देवगण यांची मध्यम प्रीति राहील. देवगण आणि राक्षसगण यांचा नित्य कलह होईल. मनुष्य आणि राक्षसगण असल्यास त्याज्य होय. तथापि वराचा राक्षसगण असून वधूचा मनुष्यगण असेल तर संकटकालीं ग्राह्य धरून विवाह करावा असें वचन आहे. तसेंच, वराचा मनुष्यगण आणि वधूचा राक्षसगण असून पुष्कळ गुण येत असतील तरीही विवाह करावा. तसेंच, कन्येच्या आणि वराच्या राशिस्वामींचें किंवा राशीच्या नवांशस्वामींचें मित्रत्व असतां दुष्टगणांचा दोष मानूं नये. नवांशाची माहिती पुढील प्रकरणांत सांगितली आहे.

गणदोषाचा अपवाद.

राशीशयोः सुहृद्भावे मित्रत्वे वांशनाथयोः ।
गणादिदौष्ट्येऽप्युद्वाहः पुत्रपौत्रप्रवर्धनः ॥ ९८ ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मनुष्य व राक्षसगण यांचा परस्पर विवाह अनिष्ट मानिला आहे, तथापि वधूवरांच्या राशींचे मित्रत्व असेल किंवा राशींच्या नवांशस्वामींचें मित्रत्व असेल तर दुष्ट गणांचा दोष न मानितां विवाह करावा. असा विवाह केला असतां पुत्रपौत्रांची वृद्धि होते. मुख्यत्वेंकरून शुभराशिकूट व राशिस्वामींचें परस्पर मित्रत्व असावें.

[गणांचें गुणकोष्टक.]

वर / कन्या	देव	मनु.	राक्ष.
देव	६	५	१
मनु.	६	६	०
राक्ष.	१	०	६

राशिकूटमैत्री.

चतुर्थो दशमश्चैव तृतीयैकादशः शुभः ।
उभयः सप्तमः साम्यमेकर्क्षं शुभमुच्यते ॥ ९९ ॥
स्त्रीराशेः पतिराशिश्चेद्वादशः पंचमोष्टमः ।
निर्धनत्वमपुत्रत्वं विवाहे च भयं क्रमात् ॥ १०० ॥

वधूवरांच्या राशींमधील जें अंतर, त्यास राशिकूट म्हणतात. हें अंतर किती असलें म्हणजे शुभ किंवा अशुभ आहे, हें समजण्याची रीति अशी आहे कीं, वधूचे राशीपासून वराची राशी किंवा वराचे राशीपासून वधूची राशी मोजून परस्पर चवथी किंवा दहावी, तिसरी किंवा अकरावी, किंवा परस्पर सातवी असतां शुभ होय. याला अनुक्रमें चतुर्थदशम, तृतीयएकादश किंवा उभयसप्तम म्हणतात. नववी किंवा पांचवी असतां नवपंचक, दुसरी किंवा बारावी असतां द्विर्द्वादशक, आणि सहावी किंवा आठवी असतां षडष्टक म्हणतात. हें षडष्टक दोन प्रकारचें आहे. १ प्रीतिषडष्टक आणि २ दुष्टषडष्टक. यांतून पहिलें शुभ आणि दुसरें अशुभ आहे. तसेंच नवपंचक आणि द्विर्द्वादशक यांचेही शुभ आणि अशुभ असे दोन प्रकार आहेत. त्यांपैकीं अशुभषडष्टक असतां विपत्ति, अशुभनवपंचकामुळें अनपत्यत्व व अशुभद्विर्द्वादशकामुळें निर्धनत्व घडतें असें कल्पिलेलें आहे; तथापि दानेंकरून हे दोष परिहार होतात, असेंही सांगितलें आहे. म्हणजे दानशांतीनें हे दुष्टकूटाचे प्रकार संकटकाळीं ग्राह्य धरण्यास हरकत नाहीं असें समजावें. वधूवरांच्या राशींमधील जें परस्पर अंतर असतें, त्या दोन्ही अंकांची बेरीज नेहमीं १४ असते. ह्या षडष्टकादि राशींचें कोष्टक खालीं दिलें आहे त्यावरून शुभाशुभ राशिकूट कोणतें हें कळेल.

शुभ षडष्टकाच्या राशी.

मित्रषट्काष्टकं कीटमेषयोर्वृषजूकयोः ।
कर्किचापभयोर्मीनसिंहयोर्मृगयुग्मयोः ॥
कन्यकाकुंभयोरन्यत्प्रयत्नाद्धि विवर्जयेत् ॥ १०१ ॥

---

१ याच प्रकरणांत दुष्ट नाडीकूटादिकांची शांति हा विषय पहा.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

अशुभ षडष्टकाच्या राशी.

वैरषट्काष्टकं मेषकन्ययोर्घटमीनयोः ।
चापोक्षयोर्नृयुक्कीटोभयोः कुंभकुलीरयोः ।
पंचास्यमृगयोर्जन्म राशेः प्रोक्तोऽशुभप्रदः ॥ १०२ ॥

शुभ नवपंचक.

मेषसिंहौ वृषःकन्या द्वंद्वजूकौ हरिर्धनुः ।
तुलाकुंभौ कर्कमीनौ धनुर्मेषो मृगोवृषः ।
इमे प्रोक्ताः शुभाः सर्वे नवपंचकराशयः ॥ १०३ ॥

अशुभ नवपंचक.

मीनालिभ्यां युते कीटे कुंभे मिथुनसंयुते ।
मकरे कन्यका युक्ते न कुर्यान्नवपंचके ॥ १०४ ॥

द्विर्द्वादशक.

द्विर्द्वादशं शुभं प्रोक्तं मीनादौ युग्मराशिषु ।
मेषादौ युग्मराशौ तु निर्धनत्वं न संशयः ॥ १०५ ॥

सूचना—समराशींपासून म्हणजे मीनराशीपासून ज्या दोनदोन राशी तें शुभ द्विर्द्वादशक जाणावें. यांमध्यें सिंहकन्या हा अपवाद आहे. आतां विषम म्हणजे मेषादिराशीपासून होणारें जें द्विर्द्वादशक तें अशुभ व निर्धनत्वकारक आहे. इतर सर्व माहिती खालील कोष्टकांत आहे.

षडष्टक.		नवपंचक.		द्विर्द्वादशक.	
शुभ	अशुभ	शुभ	अशुभ	शुभ	अशुभ
मेष, वृश्चिक	मेष, कन्या	मेष, सिंह	कर्क, वृश्चिक	मीन, मेष	कुंभ, मीन
मिथुन, मकर	तूळ, मीन	वृषभ, कन्या	कन्या, मकर	सिंह, कन्या	मेष, वृषभ
सिंह, मीन	मिथुन,वृश्चिक	मिथुन, तूळ	कुंभ, मिथुन	कर्क, सिंह	मिथुन,कर्क
तूळ, वृषभ	मकर, सिंह	सिंह, धन	मीन, कर्क	मकर, कुंभ	तूळ,वृश्चिक
धन, कर्क	कुंभ, कर्क	तूळ, कुंभ		कन्या, तूळ	मकर, धन
कुंभ, कन्या	धन, वृषभ	वृश्चिक, मीन		वृश्चिक, धन	
		धन, मेष		वृषभ, मिथुन	
		मकर, वृषभ			

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

स्त्रीदूरत्व आणि वरदूरत्व.

कन्याया वरभं दूरे कन्यादूरं हि तच्छुभम् ।
वरभाद्गीरुदूरं तद्विवाहे न शुभप्रदम् ॥ १०६ ॥
वरराशेर्वधूराशिर्दूरस्तद्वरदूरकम् ।
अशुभं तद्विजानीयात् ग्रहमैत्र्याशुभावहम् ॥ १०७ ॥

कन्येच्या राशीपासून वराचा राशी दूर असतां तें स्त्रीदूरत्व होतें आणि वरराशीपासून कन्येचा राशी दूर असतां तें वरदूरत्व होय. स्त्रीदूरत्व शुभ आणि वरदूरत्व विवाहाला अशुभ मानिलेलें आहे. तथापि उभयतांच्या राशींच्या स्वामींची मैत्री असतां, व राशिकूट शुभ असतां वरदूरत्वाचा दोष नाहीं.

राशिकूटाचे गुण.

राश्यैक्ये भिन्नभे पंच सप्तान्यत्र भकूटके ।
सत्कूटे योनिवैरत्वे नरदूरे षडीरिताः ॥ १०८ ॥
कन्या दूरेपि चत्वारो गुणा ग्राह्या न चाधिकाः ॥
अनयोर्योनिमैत्रस्त्री दूरयोर्भूर्गुणः सदा ॥ १०९ ॥

आतां राशिकूटाचे गुण सांगतों. उभयतांचें जन्मनक्षत्र भिन्न व राशि एक असून नक्षत्राचा चरण भिन्न असतां ५ गुण धरावे. वधूच्या राशीपासून वराची राशी सातवी आणि वराच्या राशीपासून वधूची राशी सातवी झाला उभयसप्तम म्हणतात. याचप्रमाणें परस्परांच्या राशींचें अंतर ४।१० किंवा ३।११ असतां चतुर्थदशम व तृतीयएकादश जाणावें. याला सत्कूट म्हणतात. असें उभयसप्तम, चतुर्थदशम अथवा तृतीयएकादश असेल तर ७ गुण धरावे. परंतु अशा प्रकारचें सत्कूट असूनही परस्परांच्या योनीचें वैर असेल किंवा वरदूरत्व असेल तर ६ च गुण धरावे. योनिमैत्री असून स्त्रीदूरत्व असतां शुभ षडष्टक, नवपंचक किंवा शुभ द्विर्द्वादशादि कूटाचे गुण ४, परंतु वरदूरत्व असतां ५ धरावे. योनिमैत्री किंवा स्त्रीदूरत्व यांतून एक असतां दुष्टकूटाचा १ गुण धरावा. उभयतांचें एकच जन्मनक्षत्र व एकच चरण असेल तर शून्य गुण धरावा.

अशुभ समसप्तक.

कर्कटे मकरे चैव सिंहे कुंभे तथैव च ।
परस्परं सप्तमे च विवाहे वर्जयेत्सदा ॥ ११० ॥

वधूवरांच्या राशींचें परस्पर समसप्तक असतां शुभ असतें, तथापि कर्क व मकर आणि सिंह व कुंभ या परस्पर राशींचें समसप्तक विवाहास वर्ज्य मानिलें आहे.

षडष्टकाचे दोन दोषापवाद.

कन्यकायाः समो राशिर्नृराशिर्विषमो भवेत् ।
द्वयो राशेः शुभं षष्ठं विपरीतमसत्स्मृतम् ॥ १११ ॥

१.–षडष्टकामध्यें कन्येची सम राशी म्हणजे वृषभ, कर्क, कन्या, वृश्चिक, मकर

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

व मीन असून वराची विषम राशी म्हणजे मेष, मिथुन, सिंह, तूळ, धन आणि कुंभ या राशींपासून येणारी परस्परांची जी सहावी राशी तिचा षडष्टक दोष मानूं नये. याचा स्पष्टार्थ असा कीं, षडष्टकांत वराची विषमराशी व कन्येची समराशी असतां षडष्टक दोष मानूं नये. परंतु याच्या उलट स्थिति असतां म्हणजे कन्येची विषमराशी आणि वराची समराशी असतां येणारें षडष्टक मात्र त्याज्य होय. तसेंच शुभषडष्टक असेल तेथें हा अपवाद विचारांत घेण्याचें कारणच नाहीं.

ग्रहमैत्र्यं शुभा तारा राशिवश्यं त्रिभिः शुभम् ।
षडष्टकं बुधाः प्राहुर्द्वाभ्यां द्व्यर्के त्रिकोणकम् ॥ ११२ ॥

२–ग्रहमैत्री, ताराबळ आणि राशींचें परस्पर वश्य हीं तीन कूटें जर पूर्ण शुभ असतील तर षडष्टकाचा दोष मानूं नये. या तीन कूटांपैकीं दोन शुभ असतां द्विर्द्वादश आणि नवपंचक हीं दोन कूटें निर्दोष होतात. म्हणून संकटकाळीं हीं ग्राह्य धरून विवाह करण्यास हरकत नाहीं.

शुभ राशिकूटाचें महत्व.

भेशारिभावे गणवृत्यभावे नाडी समाजेऽपि कृतो विवाहः ।
भवेत्सुतप्रीतिसुखायुराप्त्यै सद्राशिकूटे जगुरेव मन्ये ॥ ११३ ॥

वधूवरांच्या राशिस्वामींचें शत्रुत्व असो, गणदोष असो, किंवा एकनाडीचा दोष असो, पण राशिकूट उत्तम असेल तर इतर सर्व दोष लुप्त होतात, म्हणून सत्कूट असतां इतर सामान्य दोषांचा विचार न करितां विवाह करावा. उत्तम राशिकूटापासून परस्परांची प्रीति, सुख, दीर्घायुष्य व पुत्रसंतति हीं प्राप्त होतात.

नाडी.

पूभा शतभिषा मूलं ज्येष्ठा हस्तः पुनर्वसुः ।
आर्द्राऽश्विनी चोत्तरा च आद्यनाडीयमीरिता ॥ ११४ ॥
चित्रा पुष्योऽनुराधा च धनिष्ठा भरणी मृगः ।
पूर्वाषाढा उभा पूर्वा मध्यनाडी प्रकीर्तिता ॥ ११५ ॥
रोहिणी कृत्तिकाऽऽश्लेषा मघास्वातीद्वयं तथा ।
रेवती चोत्तराषाढा श्रवणश्चांत्यनाडिका ॥ ११६ ॥
नाडीभेदे गुणाश्चाष्टौ तदैवान्येपि सार्थकाः ।
अजागलस्तनायंते नाड्यैक्ये सकला गुणाः ॥ ११७ ॥
एकराशौ पृथक् धिष्ण्ये पृथग्राशौ तथैकभे ।
गणनाडीनृदूरत्वं ग्रहवैरं न चिंतयेत् ॥ ११८ ॥

आद्यनाडी–अश्वि०, आर्द्रा, पुन०, उत्त०, हस्त, ज्येष्ठा, मूळ, शत०, पू०भा०.
मध्यनाडी–भर०, मृग, पुष्य, पूर्वा, चित्रा, अनु०, पू० षा०, धनि०, उ०भा०
अंत्यनाडी–कृत्ति०, रोहि०, आश्ले० मघा०, स्वाती, विशा०, उ०षा०, श्रव०, रेव०

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कोणत्या नक्षत्राची कोणती नाडी असते हें वर दिलें आहे. त्यावरून वधूवरांची नाडीमैत्री पाहून खालीं लिहिल्याप्रमाणें शुभाशुभ जाणावें. दोघांची भिन्न नाडी असेल तर तें ग्राह्य असून त्याचे पूर्ण म्हणजे आठ गुण धरावे. पण दोघांची एक नाडी असेल तर तें त्याज्य समजून त्यांचा विवाह करूं नये. परंतु त्यास एक असा अपवाद आहे कीं, जर वधूवरांच्या राशी एक असून जन्मनक्षत्र भिन्न असेल किंवा दोघांचें जन्मनक्षत्र एकच असून राशी भिन्न असतील किंवा जन्मनक्षत्राचा भिन्न चरण असेल तर अशा वेळीं एक नाडीचा, वरदूरत्वाचा, किंवा उभयतांच्या राशिस्वामींच्या शत्रुत्वाचा दोष न मानितां त्यांचा विवाह करावा. दुसरा एक अपवाद असा आहे कीं,

"आद्यांशेन चतुर्थांशं चतुर्थांशेन चादिमं ।
द्वितीयेन तृतीयं तु तृतीयेन द्वितीयकं ॥ ११९ ॥
एवं भांशव्यधो येषां जायते वरकन्ययोः ।
तेषां मृत्युर्न संदेहः शेषांशा अल्पदोषदाः ॥ १२० ॥

म्हणजे वधूवरांचीं नक्षत्रें एकनाडीचीं असून त्या दोन नक्षत्रांपैकीं वराच्या नक्षत्राचा प्रथम चरण आणि वधूच्या नक्षत्राचा चतुर्थ चरण असेल तरच किंवा एका नक्षत्राचा द्वितीय चरण व दुसऱ्या नक्षत्राचा तृतीय चरण असेल तरच एकनाडीचा दोष मानावा. याचा स्पष्टार्थ असा कीं, वधूवरांच्या नक्षत्रांपैकीं एका नक्षत्राचा प्रथम चरण असून दुसऱ्या नक्षत्राचा द्वितीय किंवा तृतीय चरण असेल तर एकनाडीचा दोष मानूं नये. तसेंच, वधूवरांच्या नक्षत्रांतून एका नक्षत्राचा द्वितीय चरण असून दुसऱ्या नक्षत्राचा प्रथम किंवा चतुर्थ चरण असतां एकनाडीचा दोष नाहीं. खालील कोष्टक पहा. याशिवाय येणारी जी एकनाडी ती मात्र सर्वथा वर्ज्य करावी. कारण एकनाडी असून कितीही गुण आले तरी ते अजागलस्तनाप्रमाणें निष्फळ होत. तथापि एकनाडी आली असतां अत्यंत संकटकाळीं चरणभेदाचा नियम स्वीकारून विवाह केला असतां ग्राह्य आहे. परंतु दुष्टकूट मात्र नसावें व राशीस्वामीचें मित्रत्व असावें.

वरनक्षत्राचे चरण

वधू नक्षत्राचे चरण	१	२	३	४
१	ग्राह्य	ग्राह्य	ग्राह्य	वर्ज
२	ग्राह्य	ग्राह्य	वर्ज	ग्राह्य
३	ग्राह्य	वर्ज	ग्राह्य	ग्राह्य
४	वर्ज	ग्राह्य	ग्राह्य	ग्राह्य

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कन्या. (वरः) **नक्षत्रपरत्वें वधूवरांच्या गुणांचें कोष्टक.**

रा. न.	४ मे.अ.	४ मे.भ.	१ मे.कृ.	३ वृ.कृ.	४ वृ.रो.	२ वृ.मृ.	२ मि.मृ.	४ मि.आ.	३ मि.पु.	१ क.पु	४ क.पु.	४ क.श्ले.	४ सिं.म.	४ सिं.पू.	१ सिं.उ.	३ क.उ.	४ क.ह.
मे. अ. ४	२८	३३	२७॥	१७॥	२३॥	२२॥	२५॥	१६॥	१७॥	२२॥	३०॥	२७	२०	२४	१४॥	९॥	१०॥
मे. भ. ४	३३	२८	२८	१८	२६॥	१४॥	१७॥	२५॥	२५॥	३०॥	२२॥	२४॥	१९	१७	२४	१९	१८॥
मे. कृ. १	२६॥	२८	२८	१८	१०	१६॥	१९॥	१९॥	१९॥	२४॥	२६॥	२२॥	१५॥	१९	२०	१५	१४
वृ. कृ. ३	१९॥	१९	१९	२८	१८॥	२६॥	१७	१७	१७	२१	२३	१९	१९	२१	२२	२०	१८
वृ. रो. ४	२३॥	२३॥	११	२०	२८	३६	२६॥	२३	२२	२६	२७	१२	१०॥	२४॥	२७	२५॥	२५॥
वृ. मृ. २	२३॥	१४॥	१८॥	२७॥	३५	२८	१८॥	२३॥	२२॥	२६	१९	२१	१९॥	१५॥	२४॥	२३	२५॥
मि.मृ. २	२६॥	१७॥	२१॥	१९	२६॥	१९॥	२८	३३	३१॥	१८॥	११॥	१३॥	२२॥	१८॥	२७॥	३१॥	३४
म.आ.४	१८॥	२६॥	२१॥	१९	२४	२५॥	३४	२८	२५	१२	२०॥	१२॥	२१॥	२७॥	२०॥	२४॥	२४॥
मि. पु. ३	१८॥	२५॥	२१॥	१९	२२	२३	३१॥	२४	२८	१४	२१	१५॥	२१॥	२५॥	१९॥	२३॥	२४॥
क. पु. १	२१॥	२८॥	२४॥	२१	२४	२५	१७॥	१०	१३	२८	३४	२८॥	१६॥	२०॥	१४॥	१६॥	१७॥
क. पु. ४	२९॥	२०॥	२६॥	२३	२५	१८	१०॥	१८॥	२४	३४	२८	२९	१८॥	१४॥	२३॥	१५॥	२५॥
क. श्ले.४	२५	२३	२१॥	१८	११	१९	११॥	११॥	१३	२७॥	२८	२८	१५	१५॥	१७॥	१९॥	१९॥
सिं. म. ४	१९	१९	१५॥	१६॥	९॥	१७॥	२०॥	२०॥	१९॥	१६॥	१८॥	१६	२८	३०	२६॥	१४॥	१४॥
सिं. पू. ४	२५	१७	१९	२०	२३॥	१५॥	१८॥	२६॥	२५॥	२२॥	१६॥	१६॥	३०	२८	३४	२४	२०॥
सिं. उ. १	१५॥	२५	२०	२१	२६	२४॥	२७॥	१९॥	१७॥	१४॥	२५॥	१८॥	२६॥	३४	२८	१६	१५
क. उ. ३	११	२१	१६	२०॥	२५॥	२४	३१॥	३१॥	२३॥	१७॥	२७॥	२०॥	१५॥	२३	१७	२८	२७
क. ह. ४	११	१८॥	१६	२०॥	२३॥	२४॥	३२	१८॥	२३॥	१८॥	२६॥	२१॥	१६	२०॥	१५	२६	२८
क. चि.२	१२॥	४॥	१८॥	२३	१८॥	१०॥	१८	२२	२४॥	२१॥	११॥	२५॥	२०॥	६॥	१३॥	२४॥	२७
तु. चि. २	२२	१४	२८	२३	१८॥	१०॥	१२	२०	१८॥	१९	११	२५	२४॥	१०॥	१७॥	२७॥	२०
तु. स्वा.४	२९	२८	१६	११	१४	२४	२६	२६	२७	२७॥	२६	१३	१२॥	२४	२५॥	२५॥	२७॥
तु. वि. ३	२१	२२	२०	१५	९	१७	१८॥	२०	२०	२०॥	२०॥	१७	१६॥	१८॥	१७॥	१७॥	१८॥
वृ. वि. १	१६॥	१६॥	१४॥	१९॥	१३॥	२१॥	११	१२॥	१२॥	१८	१८	१४॥	२४॥	२२॥	२१॥	१७	१८
वृ. ऽनु.४	२३॥	१४॥	१८॥	२३॥	२७॥	२०॥	१०	१५	१९॥	२५	१७	२०	२४॥	२०॥	२८॥	२४	२५
वृ. ज्ये.४	१०	१७॥	२३॥	२८॥	२२॥	२९॥	१२	२	४	९॥	१९	२५	३१	२३॥	१५॥	११	११
ध. मू. ४	११॥	१९	२५	१९॥	१२॥	१२॥	२१	१४	१२	७॥	१७॥	२३	२४	१८	९॥	१३	१३
ध. पू. ४	२५॥	१७॥	१९॥	१४	१८॥	१०॥	१९	२६	२७	२२॥	१४॥	१६॥	१९	१७	२५	२८॥	२७
ध. उ. १	२४	२५॥	११॥	६	१०	१६॥	२५	२६	२७	२२॥	२२॥	८॥	८॥	२४	२५	२८॥	२८॥
म. उ ३	२७	२८॥	१४॥	१२	१६	२२॥	१९॥	२४॥	२१॥	२८	२८	१४	४॥	२०	२१	२४	२४
म. श्र. ४	२८	२७	१४॥	१२	१७	२६	२३	१९॥	२१॥	२८	२८	१४	५॥	१८॥	२०	२३	२४
म. ध. २	२०	११	२६	२३॥	१९	११	८	१६	१४॥	२१	१३	२७	१८॥	४॥	१०॥	१५॥	१७
कुं. ध. २	१९॥	१०॥	२५॥	३०	२५॥	१७॥	११	१८	१७	१२	४	१८	२४॥	१०॥	१८॥	१७॥	१९
कुं. श ४	१४॥	२०॥	२६॥	३१	२५	२६॥	२०	१२	१२	६॥	१३	१९	२५॥	१९॥	११॥	१०॥	१०॥
कुं. पू. ३	१७॥	२४॥	१९॥	२४	३०	३०	२३॥	१७	१७	११॥	१९॥	१२	१८॥	२४॥	१६॥	१५॥	१५॥
मी. पू. १	१४॥	२१॥	१६॥	१९	२५	२५	२४	१७॥	१७॥	१७	२५	१७॥	१६॥	२२॥	१४॥	१६	१६
मी. उ. ४	२३॥	१५॥	१८॥	२१	२६	१८	१७	२५	२६॥	२६	१९	२०	१७॥	१५	२५॥	२७	२६
मी. रे.४	२५	२३॥	१०॥	१३	१७	२६	२५	२४	२५	२४॥	२६	१३	१२	२२॥	२२॥	२४	२५

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

नक्षत्रपरत्वें वधूवरांच्या गुणांचें कोष्टक.

२ क.चि.	२ तु.चि.	४ तु.स्वा.	३ तु.वि.	१ वृ वि.	४ वृ.ऽनु.	४ वृ.ज्ये.	४ ध.मू.	४ ध.पू.	१ ध.उ.	३ म.उ.	४ म.श्र.	२ म.ध.	२ कुं.ध.	४ कुं.श.	३ कुं.पू.	१ मी.पू.	४ मी.उ.	४ मी.रे.
१२॥	२२	२८	२२	१८॥	२४॥	१३	१२॥	२४॥	२३	२५	२६	२०	१९॥	१४॥	१५॥	१४॥	२३॥	२६॥
३॥	१३	२८	२१	१८॥	१७॥	१९॥	१९॥	१७॥	२५॥	२७॥	२६	१०	९॥	१९॥	२३	२२॥	१६॥	२५॥
१७॥	२७	१४	१९	१६॥	१९॥	२५॥	२५	१९॥	११॥	१३॥	१३॥	२५	२४॥	२५॥	१८॥	१७॥	१९॥	१०॥
२३	२२	९	१४	२१॥	२४॥	३०॥	२२	१५	७	१२	१०॥	२४॥	२९	३०	२३	२०	२२	१३
१८॥	१७॥	१५	८	१४॥	२९॥	२३॥	१३॥	१९॥	११	१६	१८	१९	२४॥	२४	२९	२६	२७	१९
११॥	१०॥	२४॥	१७	२३॥	२१॥	२४॥	१४॥	१०॥	१६॥	२१॥	२६	१२	१७॥	२६॥	२८	२५	१८	२७
२०	१३	२७	१९॥	१३	१३	१४	२३	१९	२५	१९॥	२४	१०	१२	२१	२२॥	२४	१७	२६
२७	२०	२७	२०	१३॥	१९	५	१५	२८	२७	२१॥	२२॥	१७	१९	१२	१७	१८॥	२६	२६
२६॥	१९॥	२७	२१	१४॥	२०॥	६	१४	२७	२७	२१॥	२२॥	१६॥	१८॥	१३	१६	१७॥	२६॥	२६
१९॥	१९	२६॥	२०॥	१९	२५	१०॥	७॥	२०॥	२०॥	२६	२७	२१	१२	५॥	९॥	१६	२५	२४॥
११॥	११	२५	२०॥	१९	१७	२०	१७॥	१२॥	२०॥	२६	२७	१३	४॥	१३	१७॥	२६	१८	२६
२४॥	२४	११	१६	१४॥	१९	२५	२२॥	१५॥	७॥	१३	१३	२६	१७	१८	११	१७॥	२०	१२
१९॥	२३॥	१०॥	१५॥	२४॥	२४॥	३२	२४	१९	८॥	३॥	४॥	१७॥	२३॥	२४॥	१७॥	१७॥	१८॥	१२
५॥	९॥	२४॥	१७॥	२३॥	२२॥	२४॥	२०	१७	२४	१९	१८॥	५॥	९॥	१८॥	२३॥	२३॥	१६॥	२४॥
१२॥	१६॥	२५॥	१६॥	२२॥	३०॥	१६॥	९॥	२५	२५	२०	२०	११॥	१७॥	१०॥	१५॥	१५॥	२६॥	२४॥
२४॥	१६॥	२५॥	१६॥	१८	२६	१२	१४	२९॥	२९॥	२४	२४	१५॥	१६॥	९॥	१४॥	१७	२८	२६
२८	२०	२६॥	१८॥	२०	२६	१३॥	१५	२७	२८॥	२३	२४	१८	१९	१०॥	१३॥	१६	२६	२६
२८	१९	१९	२५॥	२७	११	२५	२७	१३	२१	१५॥	१७	१५	१६	२४	१६॥	१९	१०	१९
२०	२८	२७	३३॥	२२॥	६॥	२०॥	२७	१३	२१	२३॥	२५	२३	१८	२६	१८॥	१२	३	१२
२१	२८	२८	२०	९	२१॥	१६॥	२३	२७	१९	२१॥	२२॥	२६	२१	२२	२५	१८॥	१९	११
२६	३३॥	१९	२८	१६	१६	२१॥	२७	३१	१३	१५॥	१५॥	२९॥	२४	२६	२०	१३॥	१२॥	४
२६	२१॥	७	१५	२८	२७	३१॥	२१॥	१५॥	७॥	११	११	२५	२४	२५॥	१९॥	१९	१८	९॥
११	६॥	२०॥	१६	२८	२८	३१	१५॥	१३॥	२१॥	२५	२६	१२	११	२०	२४॥	२४	१७	२६
२४	१९॥	१४॥	१९	३१॥	३०	२८	१४	१६॥	१६॥	२०	२०	२५	२४	१७	१०	९॥	२०	२०
२६	२६	२१	२६	२२॥	१६॥	१६	२८	२८	१५॥	१३॥	१४॥	१९॥	२८॥	२१॥	१४॥	१६॥	२४॥	२६
१२	१२	२७	२०	१६	१५॥	१७॥	२७	२८	३४	२२	२२॥	५॥	१४॥	२३॥	२८॥	२९॥	२२॥	३०॥
२०	२०	१९	१२	८॥	२३॥	१७॥	२५	३५	२८	१६	१५	१३॥	२२॥	२३॥	२८॥	२९॥	३०॥	२२॥
१५॥	२२॥	२१॥	१४॥	१२	२७	२१	१४॥	२४	१७	२८	२७	२५॥	१५॥	१६॥	२१॥	२९॥	३०॥	२२॥
१७	२४	२१॥	१४॥	१२	२७	२१	१४	२२॥	१५	२६	२८	२७	१७	१७॥	२०॥	२८॥	२९॥	२३॥
१५	२९	२४	२८॥	२६	१२	२६	२०॥	६॥	१४॥	२५॥	२७	२८	१७	२३	१७॥	२४॥	१५	२२।
१७	१८	२०	२४॥	२५	११	२५	२९॥	१५॥	२३॥	१६॥	१८	१८	२८	३३	२७॥	१६॥	६॥	१३॥
२५	२६	२१	२६	२६॥	२०	१८	२२॥	२४॥	२४॥	१७	१७॥	२४	३३	२८	२९	८॥	२४।	१५॥
१७॥	१८॥	२६	२०	२०॥	२६॥	११	१५	२९॥	२९॥	२२॥	२२॥	२८॥	२७	१९	२८	१६	२२	१९॥
१८	११	१८॥	१२॥	१९	२५	९॥	१४	२८॥	२८॥	२८॥	२८॥	२४॥	१५॥	७	१५	२८	३३	३०॥
९	३	१९	११॥	१८	१८	२०	२३॥	२१॥	२९॥	२९॥	२९॥	१४॥	५॥	२४॥	२१	३३	२८	३३
१९	१२	१०	४	१०॥	२६	२१	२६	२८।	२०।	२३॥	२१॥	२२।	१३॥	१५।	१७॥	२९॥	३३	२८

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

वधूवरमैत्रीच्या गुणकोष्टकांचा विचार.

वधूवरांच्या अष्टविध मैत्रींच्या गुणांची माहिती पूर्वीं त्या त्या विषयाखालीं दिलीच आहे. परंतु वधूवराचें जन्मनक्षत्र चरणभेदानें समजल्यावरोबर अनायासें गुणसंख्येचा बोध व्हावा, म्हणून तत्संबंधीं कोष्टक वर दिलें आहे; आतां तें कसें पहावें हें सांगतों. उदाहरणार्थ, वराचें जन्मनक्षत्र हस्त आहे आणि वधूचें उत्तरा असून चरण चवथा व रास कन्या आहे. याचे गुण काढावयाचे असतां, उत्तरानक्षत्राच्या कन्याराशीच्या उभ्या कोष्टकांत ज्या कोष्टकासमोर आडव्या रांगेंतील कोष्टकांत हस्तनक्षत्र असेल तेथें पहावें. म्हणजे गुणांचा अंक सांपडेल. या उदाहरणांत २७ गुण येतात. याच-प्रमाणें इतर कोष्टकें पहावीं.

तसेंच, आडव्या उभ्या कोष्टकांच्या आरंभीं प्रत्येक गृहांत अनुक्रमानें, मे.अ. ४, मे.भ. ४, मे.कृ. १ इत्यादि जें संक्षिप्त लिहिलें आहे त्याचा अर्थ, मेषराशींतील अश्विनी नक्षत्राचे चार चरण, मेषराशींतील भरणी नक्षत्राचे चार चरण, व मेषराशींतील कृत्तिका नक्षत्राचा १ चरण, असा समजावा. (प्रत्येक राशीमध्यें सवादोन नक्षत्रें म्हणजे नऊ चरण असतात हें पूर्वीं सांगितलेंच आहे.) वृ.कृ. ३, वृ.रो. ४, वृ.मृ.२ याचा अर्थ वृषभराशींतील कृत्तिका रोहिणी व मृग या सवादोन नक्षत्रांचे अनुक्रमें ३+४+२ असे नऊ चरण समजावें. हीच पद्धति कोष्टकामध्यें सर्वत्र स्वीकारिली आहे.

तसेंच १८ गुणांहून अधिक गुण ग्राह्य धरावे, असें पूर्वीं सांगितलेंच आहे. तथापि केवळ गुणसंख्येवरून देखील वधूवरांची मैत्री ग्राह्य किंवा त्याज्य ठरवून चालावयाचें नाहीं, हेंही ध्यानांत ठेवावें. कारण, एकनाडी, मनुष्य-राक्षसगण अथवा वैरयोनि इत्यादि दोष असले तरी त्यांसही अपवादक नियम आहेत, आणि येथें दिलेल्या गुणकोष्टकांत त्या सर्व अपवादक नियमांचा विचार करणें शक्य नाहीं. याकरितां नाडीगणादि अष्टविध मैत्री जमवितांना, यथास्थलीं जे जे अपवाद सांगितले आहेत, त्या सर्वांचा साधक बाधक अवश्य विचार करावा.

कित्येक ठिकाणीं केवळ गणगोत्रच पाहण्याचा प्रघात आहे, व कित्येक ठिकाणीं तर गोत्रप्रवर मात्र पाहतात. तेव्हां यासंबंधानें देशाचाराप्रमाणें व्यवस्था करावी. मुख्यत्वें जन्मलग्नकुंडलींतील इष्टानिष्ट ग्रह प्रथम पाहून नंतर एकनाडीचा वगैरे विचार करावा. कांहीं लोक अनिष्ट ग्रहांकडे दुर्लक्ष्य करितात व गुणसंख्या १८ हून अधिक असली म्हणजे टिप्पण जमलें असें मानितात. पण हा एकदेशीय विचार होय. तसेंच, पूर्वीं लिहिल्याप्रमाणें पत्रिका अत्यंत विश्वसनीय असावी म्हणजे बरोबर फल येईल व शास्त्राकडे दोष येणार नाहीं.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

जन्मनक्षत्रावरून नाडीगणादिकांचें कोष्टक.

घटित चक्र.

नक्षत्रपरत्वें.					राशिपरत्वें.			
नक्षत्र.	योनि.	वैरयो.	गण.	नाडी.	राशी.	स्वामी.	वर्ण.	वश्य.
अश्विनी	अश्व	म्हैस	देव	आद्य	मेष	मंग०	क्षत्रि०	चतु०
भरणी	गज	सिंह	मनुष्य	मध्य				
कृत्तिका	मेष	वानर	राक्षस	अन्त्य				
रोहिणी	सर्प	नकुल	मनुष्य	अन्त्य	वृष०	शुक्र	वैश्य	चतु०
मृग	सर्प	नकुल	देव	मध्य	मिथु०	बुध	शूद्र	मानव
आर्द्रा	श्वान	हरिण	मनुष्य	आद्य				
पुनर्वसु	मार्जार	उन्दिर	देव	आद्य				
पुष्य	मेष	वानर	देव	मध्य	कर्क	चंद्र	विप्र	जलचर
आश्लेषा	मार्जार	उन्दिर	राक्षस	अन्त्य				
मघा	उन्दिर	मार्जार	राक्षस	अन्त्य				
पूर्वा. फाल्गु.	उन्दिर	मार्जार	मनुष्य	मध्य	सिंह	रवि	क्षत्रि०	वनच०
उत्त. फाल्गु.	गाय	व्याघ्र	मनुष्य	आद्य				
हस्त	म्हैस	अश्व	देव	आद्य	कन्या	बुध	वैश्य	मान०
चित्रा	व्याघ्र	गाय	राक्षस	मध्य				
स्वाती	म्हैस	अश्व	देव	अन्त्य	तूळ	शुक्र	शूद्र	मान०
विशाखा	व्याघ्र	गाय	राक्षस	अन्त्य				
अनुराधा	हरिण	श्वान	देव	मध्य				
ज्येष्ठा	मृग	श्वान	राक्षस	आद्य	वृश्चि०	मंग०	विप्र	कीट०
मूल	श्वान	हरिण	राक्षस	आद्य				
पूर्वाषाढा	वानर	मेष	मनुष्य	मध्य	धन	गुरु	क्षत्रि०	मान०
उत्तराषाढा	नकुल	सर्प	मनुष्य	अन्त्य	मकर	शनि	वैश्य	जल०
अभिजित्	नकुल	सर्प	मनुष्य	अन्त्य				
श्रवण	कपि	मेष	देव	अन्त्य				
धनिष्ठा	सिंह	गज	राक्षस	मध्य	कुंभ	शनि	शूद्र	मान०
शततारका	अश्व	म्हैस	राक्षस	आद्य				
पूर्वाभाद्रप.	सिंह	गज	मनुष्य	आद्य				
उत्तराभाद्रप.	गौ	व्याघ्र	मनुष्य	मध्य	मीन	गुरु	विप्र	जल०
रेवती	गज	सिंह	देव	अन्त्य				

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

अष्टविधमैत्रीचे अपवाद.

द्वितीयं वरनक्षत्रं वधूनक्षत्रतो यदि ।
वरस्य तदनिष्टं चेद्विवाहे वर्जयेच्च तत् ॥ १२१ ॥

वधूवरांची राशी एक असो अथवा भिन्न असो परंतु वधूच्या जन्मनक्षत्रापासून वराचें जन्मनक्षत्र दुसरें असेल तर तें विवाहाला वर्ज्य करावें.

एकराशौ द्विनक्षत्रे कृत्तिकायाम्यतारके ।
धनिष्ठा शततारे च पुष्याश्लेषे च वर्जयेत् ॥ १२२ ॥

वधूवरांची एक राशी असून, नक्षत्र भिन्न असतां एकनाडीचा वगैरे दोष मानूं नये असें पूर्वी सांगितलें आहे, परंतु तीं भिन्न नक्षत्रें कृत्तिका, भरणी, धनिष्ठा, शततारका, पुष्य आणि आश्लेषा या सहा नक्षत्रांहून भिन्न असतील तरच एकनाडीचा दोष नाहीं, अर्थात् या सहा नक्षत्रांमुळें येणारा एकनाडीचा दोष अवश्य मानावा.

विशाखार्द्राश्रवः पुष्यो रोहिण्युत्तरभाद्रपात् ।
रेवती च मघा श्रेष्ठा नेतरश्चैकभद्वयोः ॥ १२३ ॥

विशाखा, आर्द्रा, श्रवण, पुष्य, रोहिणी, उत्तराभाद्रपदा, रेवती आणि मघा या आठ नक्षत्रांपैकीं एकाद्या नक्षत्रावर परस्पर वधूवरांचा जन्म असतां तो योग श्रेष्ठ जाणावा. म्हणजे गण, नाडी, योनि व राशिकूट इत्यादि दोष त्यामुळें नष्ट होतात.

अश्विनी कृत्तिका ज्येष्ठा मृगमूलपुनर्वसु ।
पूर्वा पूषा उषा चित्रा शततारा तथैव च ।
विवाहे दशऋक्षाणि पादे भिन्नेपि वर्जयेत् ॥ १२४ ॥

एक नक्षत्र असून भिन्न चरण असतां नाडीदोष मानूं नये असें पूर्वी सांगितलें आहे. तरी पुढील नक्षत्रांतून वधूवरांचें एकादें नक्षत्र असतां जर नाडीदोष येत असेल तर तो निंद्य मानून विवाह करूं नये. तीं नक्षत्रें म्हणजे अश्विनी, कृत्तिका ज्येष्ठा, मृग, मूळ, पुनर्वसु, पूर्वाफाल्गुनी, पूर्वाषाढा, उत्तराषाढा, चित्रा आणि शततारका ह्या दहा नक्षत्रांमुळें येणारी एकनाडी भिन्न चरण असतांही वर्ज करावी.

भवनद्वययुक्तर्क्षे पूर्वं पुंसां शुभावहम् ।
पश्चाद्भागे तथा स्त्रीणां तत्कूटं दोषकृत्स्मृतं ॥ १२५ ॥

वधूवरांचें एक नक्षत्र असून भिन्न राशी असेल आणि वराची राशी वधूराशीच्या पूर्वी असेल तर शुभ होय. परंतु वधूची राशी वरराशीच्या पूर्वी असतां तें निंद्य समजावें.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

राश्यैक्ये भिन्नमृक्षं चेद्दक्षैक्ये राशिभिन्नता।
न नाडीगणयोर्दोषो द्वयोरैक्येंघ्रिभेदतः।
एकर्क्षैत्वेकराशौ च विवाहो वर्जयेत्सदा॥ १२६॥

वधूवरांची एक राशी व भिन्न नक्षत्र असतां किंवा एक नक्षत्र व भिन्न राशी असतां व भिन्न चरण असतां नाडी, गण, इत्यादिकांचे दोष दूर होतात. एक नक्षत्र व एक राशी मात्र सर्वदा वर्ज्य सांगितली आहे.

जातक किंवा वर्गमैत्री.

गणनाडी आदिकरून वर आठ प्रकारची मैत्री सांगून कोणत्या मैत्रीचे किती गुण असतात हें जरी सांगितलें आहे, तरी याशिवाय वधूवरांच्या विवाहसमयीं त्यांच्या जन्मनक्षत्रांच्या आद्याक्षरांवरून वर्गमैत्री पाहतात, त्याविषयीं येथें माहिती सांगतों. पूर्वोक्त अष्टविध मैत्रीचे जसे कमी-अधिक गुण ठरविलेले आहेत, तसे वर्गमैत्रीला गुण वगैरे मात्र कांहीं नाहींत. वर्गमैत्रीला कित्येक लोक व्यवहारांत जातक असेंही म्हणतात. याचा दोष विशेष मानीत नाहींत.

अवर्गो गरुडः प्रोक्तो मार्जारस्तु कवर्गकः।
चवर्गः केसरी ज्ञेयो टवर्गः श्वा प्रकीर्तितः॥ १२७॥
तवर्गः सर्पसंज्ञः स्यात्पवर्गो मूषको मतः।
यवर्गः कुंजराख्यश्च शवर्गो मृग उच्यते॥ १२८॥
गरुडोरगयोर्वैरं मिथ आखुविडालयोः।
शार्दूलमृगयोर्वैरं तथा मेषशुनोरपि॥ १२९॥
स्ववर्गात्पंचमो वैरी अकादीनामनुक्रमात्।
वर्गैक्ये प्रेम दंपत्योर्वैरे वैरं समेसमम्।
प्राग्भिर्नामादिवर्णाभ्यां वर्गकूटकमीरितम्॥ १३०॥

अ पासून अः पर्यंत (ऋ, ॠ, ऌ, ॡ, खेरीज करून) जीं १२ अक्षरें तो अवर्ग; क ख ग घ ङ, हा कवर्ग; च छ ज झ ञ, हा चवर्ग; ट ठ ड ढ ण, हा टवर्ग; त थ द ध न, हा तवर्ग; प फ ब भ म, हा पवर्ग; य र ल व, हा यवर्ग; आणि श ष स ह, हा शवर्ग; याप्रमाणें ८ वर्ग आहेत. या प्रत्येक वर्गाचा स्वामी निराळा कल्पिलेला आहे. जसें, अवर्गाचा स्वामी गरुड, कवर्गाचा मार्जार, चवर्गाचा सिंह; टवर्गाचा श्वान, तवर्गाचा सर्प, पवर्गाचा मूषक, यवर्गाचा हत्ती आणि शवर्गाचा हरिण याप्रमाणें जाणावें. कित्येकांच्या मतें यवर्गाचा स्वामी मृग व शवर्गाचा मेष आहे. कोणत्याही वर्गाच्या स्वामीचें त्याच्यापासून पांचव्या वर्गाच्या स्वामीबरोबर वैर, व चवथ्याबरोबर मित्रत्व असतें. जसें, अवर्गाचा स्वामी गरुड आणि अवर्गापासून

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पांचवा तवर्ग, त्याचा स्वामी सर्प; म्हणून गरुड आणि सर्प या परस्परांचें वैर समजावें. या नियमानुसार गरुड आणि सर्प, मार्जार आणि उंदीर, सिंह आणि गज, मृग आणि श्वान, या परस्परांचें वैर आहे असें जाणावें. वधूवरांच्या राशींचें परस्पर वैर असतां कलहोत्पादक आहे, असें मानिलेलें आहे. नांवाच्या आद्याक्षरावरून हें वैर ठरवितात. उदाहरणार्थ, गौरी आणि पद्मनाभ यांचें परस्पर वैरजातक येतें, कारण, गौरी ह्या नांवांतील आद्याक्षर कवर्गांतील असून त्याचा स्वामी मार्जार आहे व पद्मनाभ हें पवर्गांतील असून त्याचा स्वामी मूषक आहे, आणि मार्जार व मूषक या परस्परांचें शत्रुत्व आहे म्हणून हें वैरजातक होय. म्हणून गौरी व पद्मनाभ यांची परस्पर मैत्री नाहीं. जातकमैत्री जमविणें ती जन्मनक्षत्रांवरूनच जमवावी. व्यावहारीक नांवांचा उपयोग करूं नये.

नामाक्षरावरून जातकाचें कोष्टक.

अ इ उ ए	क ख ग घ ङ	च छ ज झ ञ	ट ठ ड ढ ण
गरुड	मांजर	सिंह	कुत्रा
त थ द ध न	प फ ब भ म	य र ल व	श ष स ह
सर्प	उंदीर	गज	हरिण

अवकहडाचक्रानुसार नक्षत्रांचीं चरणाक्षरें.

प्रत्येक नक्षत्राचीं निरनिराळीं चरणाक्षरें आहेत, त्यांविषयीं आतां माहिती सांगतों. एकाद्या नक्षत्राच्या आरंभापासून, तें नक्षत्र संपेपर्यंत, जितक्या घटिका असतील त्यांचे चार भाग करावे; प्रत्येक भाग हाच त्या नक्षत्राचा चरण होय.

चूचेचोलाऽश्विनी प्रोक्ता लीलूलेलो भरण्यथ।
आईऊए कृत्तिका स्यात् ओवावीवू तु रोहिणी ॥ १३१ ॥
वेवोकाकी मृगशिरः कूघंङछ तथाऽऽर्द्रका।
केकोहाही पुनर्भं स्यात् हूहेहोडा च पुष्यभम् ॥ १३२ ॥
डीडूडेडो तथाऽऽश्लेषा मामीमूमे मघा स्मृता।
मोटाटीटू तु पूर्वाख्या टेटोपापी तथोत्तरा ॥ १३३ ॥
पूषाणाठा तथा हस्तः पेपोरारी तु चित्रिका।
रूरेरोता भवेत् स्वाती तीतूतेतो विशाखिका ॥ १३४ ॥
नानीनूने चानुराधा ज्येष्ठा नोयायियू मता।
येयोभाभी तथा मूलं पूर्वाषाढा भुधाफढा ॥ १३५ ॥
भेमोजाजी उत्तराषा जूजेजोखस्तथाऽभिजित्।
खीखूखेखो च श्रवणं गागीगूगे धनिष्ठिका ॥ १३६ ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

गोसासीसू शतभिषा सेसोदादी तु पूर्वभा ।
दूथंझञोत्तराभाद्रा देदोचाची तु रेवती ॥ १३७ ॥

वरील श्लोकांचा अर्थ कोष्टक रूपानें खालीं लिहितों.

चूचेचोला, अश्विनी	हूहेहोडा, पुष्य	रूरेरोता, स्वाती	जूजेजोखा, अभि०
लीलूलेलो, भरणी	डीडूडेडो, आश्ले०	तीतूतेतो, विशा०	खीखूखेखो, श्रवण
आईऊए, कृत्तिका	मामीमूमे, मघा	नानीनूने, अनुरा०	गागीगूगे, धनि०
ओवावीवू, रोहिणी	मोटाटीटू, पूर्वा	नोनायीयू, ज्येष्ठा	गोसासी सू, शतता०
वेवोकाकी, मृगशी०	टेटोपापी, उत्तरा	येयोभाभी, मूळ	सेसोदादी, पूर्वाभा०
कूघङछ, आर्द्रा	पूषाणाठा, हस्त	भूधाफढा, पूर्वाषा०	दूथझञ, उ०भा०
केकोहाही, पूनर्व०	पेपोरारी, चित्रा	भेभोजाजी, उ०षा०	देदोचाची, रेवती

नक्षत्रावरून नामनिर्देश.

नक्षत्रमित्थं चतुरंघ्रिकं भवेत्
नामाक्षरं जन्मनि तस्य युज्यते ।
राशिस्तथैको नवभिस्तदंघ्रिभि-
र्नवांशसंज्ञै रजतो विनाभिजित् ॥ १३८ ॥

वरील कोष्टकांत लिहिल्याप्रमाणें प्रत्येक नक्षत्राचे चार चरण असतात आणि प्रत्येक चरणाचें भिन्न अक्षर ठरविलेलें आहे. नऊ चरणांची म्हणजे सवादोन नक्षत्रांची एक राशि होते. नांवाचें जें आद्याक्षर असेल त्यावरून जन्मनक्षत्र कोणतें असावें किंवा जन्मनक्षत्राचा अमुक चरण असतां काय नांव येईल हें वर दिलेल्या कोष्टकाच्या साह्यानें सहज ठरवितां येतें. उदाहरणार्थ, कृत्तिका नक्षत्राचा प्रथम चरण असतां आत्माराम, द्वितीय चरण असतां ईश्वरचंद्र, तृतीय चरण असतां उद्धव व चतुर्थ चरण असतां एकनाथ अशीं नांवें ठेवावीं. आतां कोणत्या कोणत्या सवादोन नक्षत्रांनीं मेषादि बारा राशींपैकीं कोणती कोणती रास होते हें पहिल्या प्रकरणांत नक्षत्रावरून चंद्र किंवा राशी पाहण्याची रीति, पृष्ठ ३८ मध्यें लिहिलें आहे, त्यावरून कळेल.

बवौ खषौ शसौ चैव ज्ञेयाविति परस्परम् ।
न प्रोक्ता ङञणा वर्णा नामादौ संति ते न हि ।
चेद्भवंति तथा ज्ञेया गजडू ते यथाक्रमम् ॥ १३९ ॥

वरील कोष्टकांत जे वर्ण आले नाहींत त्याविषयीं असें सांगितलें आहे कीं, 'ब' च्या जागीं व, 'ष' च्या जागीं ख, आणि 'श' च्या जागीं स हे वर्ण घ्यावे. उदाहरणार्थ, एकाद्याचें रोहिणी जन्मनक्षत्र असून द्वितीय चरण असेल तर ज्याप्रमाणें वासुदेव

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

नांव ठेवितां येतें त्याचप्रमाणें बाळकृष्णही ठेवितां येईल. तसेंच, ङ, ञ, ण, ह्या आद्याक्षरांचीं व्यावहारिक नांवें प्रचारांत नाहींत, म्हणून त्या जागीं अनुक्रमें घ, पू, दू, या आद्याक्षरांचीं नांवें घ्यावीं. हीं आद्याक्षरें त्या त्या नक्षत्राच्या चरणांपैकींच आहेत. म्हणून हे वर्ण घेतल्यानें नक्षत्रभेद होत नाहीं व त्या त्या आद्याक्षरांनीं युक्त असलेलीं नांवेंही प्रचारांत आढळतात. म्हणून ही योजना ग्राह्य दिसते. कित्येक ग्रंथकार स्वरशास्त्राला अनुसरून ङ ञ ण बद्दल ग ज ड हे वर्ण घ्यावे असें म्हणतात. पण तसें केल्यानें नक्षत्रभेद होऊन रासही बदलते, म्हणून तसें करणें युक्त दिसत नाहीं.

दुष्टनाडीकूटादिकांची शांति.

षडष्टके गोमिथुनं प्रदद्यात्कांस्यं सरौप्यं नवपंचमे च ।
नाड्यां सुधेन्वन्नसुवर्णवस्त्रं द्विर्द्वादशे ब्राह्मणतर्पणं च ॥ १४० ॥

दुष्टराशिकूट किंवा एकनाडी इत्यादि दोषांच्या परिहारार्थ कांहीं दानें सांगितलीं आहेत, तीं अशीः—दुष्टषडष्टक असतां दोन गोप्रदानें, दुष्टनवपंचक असतां कांस्य व रौप्य ह्यांचें दान, एकनाडी असतां सुवर्ण, वस्त्र व गो ह्यांचें दान आणि दुष्टद्विर्द्वादशक असतां ब्राह्मणसंतर्पण करावें. असें राजमार्तंड ग्रंथांत आहे. प्रत्यक्ष गोप्रदान करणें शक्य नसेल तर यथाशक्ति हिरण्यद्वारा करावें.

विवाहसंबंधीं ज्येष्ठमासाचा दोष.

ज्येष्ठस्य ज्येष्ठकन्याया विवाहो न प्रशस्यते ।
तयोरन्यतरे ज्येष्ठे ज्येष्ठो मासः प्रशस्यते ॥ १४१ ॥
द्वौ ज्येष्ठौ मध्यमौ प्रोक्तावेकं ज्येष्ठं शुभावहम् ।
ज्येष्ठत्रयं न कुर्वीत विवाहे सर्वसंमतम् ॥ १४२ ॥

ज्येष्ठ कन्या आणि ज्येष्ठ वर यांचा ज्येष्ठ मासांत विवाह करूं नये. परंतु कन्या किंवा वर यांतून एक ज्येष्ठ असतां ज्येष्ठमासांत विवाह केला तरी चालतो; कारण हा द्विज्येष्ठ योग होतो; ज्येष्ठवर, ज्येष्ठकन्या आणि ज्येष्ठमास असा त्रिज्येष्ठ योग विवाहाला निषिद्ध मानिलेला आहे.

विवाहाला जन्ममासाचा निषेध.

जन्मर्क्षे जन्मदिवसे जन्ममासे शुभं त्यजेत् ।
आद्यगर्भस्य, नो दोषो द्वितीयजनुषोः शुभे ॥ १४३ ॥

प्रथमगर्भोत्पन्न कन्या किंवा पुत्र यांचा विवाह मात्र जन्मनक्षत्रांवर जन्मदिवशीं आणि जन्ममासांत करूं नये. द्वितीयादि गर्भोत्पन्न कन्या किंवा पुत्र यांचा विवाह त्यांच्या जन्ममासांत किंवा जन्मवारादिकांवर केला तरी त्याचा दोष नाहीं.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

जन्ममासाचा अपवाद.

जन्ममासे तिथौ भे च विपरीतदले सति ।
कार्यं मंगलमित्याहुर्गर्गभार्गवशौनकाः ॥ १४४ ॥

व्यावहारिक अडचणीमुळें जन्ममासांत किंवा जन्मनक्षत्रादिकांवर वडील कन्या-पुत्रांचा विवाह कर्तव्य असेल तर त्या नक्षत्रादिकांच्या विपरीतार्धांत करावा. म्हणजे पूर्वार्धांत जन्म असेल तर उत्तरार्धांत आणि उत्तरार्धांत जन्म असतां पूर्वार्धांत मंगल कार्य करणें दोषयुक्त नाहीं. असें गर्ग, भार्गव आणि शौनक ऋषींचें मत आहे.

प्रवेशनिर्गम व गुरुलघुमंगल.

पुत्रोद्वाहः प्रवेशाख्यः कन्योद्वाहस्तु निर्गमः ।
मुण्डनं चौलमित्युक्तं व्रतोद्वाहौ तु मंगलं ॥ १४५ ॥
चूडा केशान्तसीमन्तविवाहोपनयान् बुधाः ।
गुरुमंगलमित्याहुस्तदन्यल्लघुमंगलम् ॥ १४६ ॥
मातृयज्ञक्रियापूर्वं ज्येष्ठं कृत्वा तु मंगलम् ।
ऋतुत्रयं पुनर्यावन्न कुर्याल्लघुमंगलम् ।
गर्भाधानादि संस्काराः कुर्यात्कालेन रुद्धताः ॥ १४७ ॥

पुत्राचें लग्न करून नवीन वधू घरांत आणणें याला प्रवेश म्हणतात. कन्येचें लग्न करून तिला पतिगृहीं पाठविणें याला निर्गम म्हणतात. चूडाकर्माला मुण्डन म्हणतात. उपनयन, विवाह यांना मंगल म्हणतात. चूडाकर्म, केशान्तसंस्कार, सीमंतोन्नयन, विवाह, उपनयन हीं गुरुमंगल कृत्यें जाणावीं. याहून इतर कृत्यें असतील त्यांना लघुमंगल म्हणावें. मातृकापूजन व नांदीश्राद्धयुक्त जें गुरुमंगल तें केल्यानंतर तीन ऋतु म्हणजे षण्मासपर्यंत लघुमंगल करूं नये. किंवा तीन मंगल कार्यें एका वेळीं करूं नयेत. परंतु कालबद्ध असलेले गर्भाधानादि नैमित्तिक संस्कार मात्र अवश्य करावे. कारण त्यांचे काल नियमित ठरलेले आहेत. तथापि गर्भाधान संस्काराची गणना गुरुमंगलांत केलेली नाहीं, म्हणून तीन मंगल कार्यें केल्यानंतर गर्भाधान हें चवथें मंगल होऊं शकत नाहीं. गर्भाधान हा वैयक्तिक विधि आहे.

विवाहसंबंधीं शास्त्रार्थ.

पुत्रोद्वाहात्परं पुत्रीविवाहो न ऋतुत्रये ।
भेदादब्दस्य कुर्वीत न ऋतुत्रयलंघनम् ॥ १४८ ॥
कुले ऋतुत्रयादर्वाक् मंडनान्नतु मुंडनम् ।
प्रवेशान्निर्गमो नेष्टो न कुर्यान्मंगलत्रयम् ॥ १४९ ॥

एका अविभक्त कुटुंबांत (विभक्त असतां दोष नाहीं) मुलाच्या विवाहानंतर सहा महिन्यांचे आंत मुलीचा विवाह करूं नये. कारण, वधूप्रवेश झाल्यानंतर म्हणजे

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

नवीन सून प्रथम आपल्या घरीं आणिल्यानंतर निर्गम म्हणजे आपल्या घरांतून कन्येला प्रथम सासरीं पाठविणें अनिष्ट मानिलेलें आहे. परंतु संवत्सर बदलत असेल तर मात्र सहा महिन्यांचा नियम बाधक नाहीं. उदारणार्थ, फाल्गुनांत एका मुलाचा विवाह झाला असतां चैत्रांत कनिष्ठ मुलाची मुंज किंवा वैशाखांत कन्येचा विवाह करणें दोषास्पद नाहीं. तसेंच, तीन मंगलकार्यें एकदम करूं नयेत. एका अविभक्त कुटुंबांत मंडनानंतर म्हणजे विवाहादि संस्कार केल्यानंतर सहा महिने-पर्यंत अनैमित्तिक मुंडन म्हणजे चौल, उपनयन, नागबली, तीर्थयात्रा इत्यादि संस्कार करूं नयेत, असें बहुमत आहे; तथापि विवाहानंतर उपनयन पाहिजे तेव्हां करावें असें कात्यायनाचें मत आढळतें.

सहोदराचे संस्कार.

भ्रातृयुगे स्वसृयुगे भ्रातृस्वसृयुगे तथा ।
न कुर्यान्मंगलं किंचिदेकस्मिन्मंडपेऽहनि ॥ १५० ॥
चतुर्दिनांतरे वापि संकटे तु दिनांतरे ।
एकाहेपि प्रकुर्वीत सरिद्गिरिगृहांतरे ॥ १५१ ॥
पृथङ्मातृजयोः कार्यो विवाहस्त्वेकवासरे ।
एकस्मिन्वत्सरे चैव वासरे मण्डपे तथा ।
कर्तव्यं मंगलं स्वस्रोर्भ्रात्रोर्यमलजातयोः ॥ १५२ ॥

सख्ख्या भावांचे, सख्ख्या बहिणींचे किंवा सख्ख्या बहीणभावांचे सारखे संस्कार म्हणजे मुंजी अथवा विवाह हीं एकाच वेळीं करूं नयेत. चार दिवसांच्या, निदान एका दिवसाच्या अंतरानें तरी करावे. फार अडचण असतां एकाच दिवशीं कर्तव्य असतील तर भिन्न स्थळीं किंवा भिन्न मंडपांत किंवा भिन्न लग्नावर म्हणजे भिन्न वेळीं करावे. सावत्र बहीणभावांचे व जुळया भावंडांचे संस्कार एकाच वेळीं केले असतां दोष नाहीं.

विवाहसंबंधीं अन्य निषेध.

प्रत्युद्वाहो नैव कार्यो नैकस्मै दुहितृद्वयम् ।
नैवैकजन्ययोः पुंसोरेकजन्ये तु कन्यके ॥ १५३ ॥
सपिंडा नैव कुर्वीरन्मंडपोत्थापनावधिः ।
नैकस्मिन्वत्सरे कार्यो गृहोद्वाहो कदाचन ॥ १५४ ॥
विवाहव्रतचूडासु वर्षमर्धं तदर्धकं ।
अतिलं तर्पणं कुर्याच्छ्राद्धं कुर्यादपिंडकम् ॥ १५५ ॥
महालये गयाश्राद्धे माता पित्रोर्मृते हनि ।
कृतोद्वाहोऽपि कुर्वीत पिण्डदानं यथाविधि ॥ १५६ ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आपली कन्या ज्याचे पुत्रास दिली त्याची कन्या आपल्या मुलास करूं नये. ह्याला प्रत्युद्वाह म्हणजे 'बदलवणें' किंवा 'साटेंलोटें' म्हणतात. दारिद्र्य वगैरे संकट असतां मात्र प्रत्युद्वाह करावा असें शास्त्रकारांचें मत आहे. यावरून व्यावहारीक संकटांचा विचार करून धर्मशास्त्राचे नियम बांधले गेले आहेत हें स्पष्ट दिसतें. असो. तसेंच, एक कन्या दिलेली जीवंत असतां त्याच वराला दुसरी कन्या देऊं नये. सख्ख्या भावांना सख्ख्या बहिणी देऊं नयेत. ज्येष्ठ कन्या अथवा ज्येष्ठ पुत्र यांस अविवाहित ठेवून कनिष्ठ अपत्यांचे संस्कार करूं नयेत. शुभकार्यांमध्यें श्राद्धादि पितृक्रिया करूं नयेत. लग्न व घर बांधणें हीं एकाच वर्षी करूं नयेत. विवाह, व्रतबंध व चौल हीं केल्यानंतर १ वर्ष किंवा ६ महिने, निदान ३ महिने होत तोंपर्यंत तिलतर्पण व सपिंडश्राद्ध हीं करूं नयेत. तथापि महालयश्राद्ध, गयाश्राद्ध, व मातापिता मृत असतां तत्संबंधीं सर्व श्राद्धें मात्र सपिंड केलीं पाहिजेत.

वराचे दश दोष.

उन्मत्तावृत्तिहीनाश्च तथापस्मारदूषिताः ।
दूरस्थाः कुष्ठिनो मूर्खा मोक्षमार्गानुसारिणः ॥ १५७ ॥
शूरा अवेद्या निवृत्ता दशदोषयुता वराः ।
तथा षंढाश्च पतिताश्चक्षुःश्रोत्रविवर्जिताः ।
वर्जनीयाः प्रयत्नेन कन्यादाने, न संशयः ॥ १५८ ॥

वाग्दानाचे वेळीं 'अव्यंगेऽपतितेऽक्लीबे' इत्यादि दशदोषविवर्जित वराला मी कन्या देतों असें कन्येचा पिता म्हणत असतो, ते दशदोष येणेंप्रमाणें:—१ उन्मत्त २ उपजीविकेचें कांहीं साधन नसलेला; ३ अपस्मार म्हणजे फेंपरें येणारा, ४ दूर देशीं वास करणारा, ५ कुष्ठ (कोड) असलेला, ६ मूर्ख, ७ मोक्षमार्गाला अनुसरलेला, ८ शूर, ९ अवेद्य म्हणजे अक्षरशून्य, १० विवाहाला परावृत्त असलेला अशा दशदोषयुक्त वराला कन्या देऊं नये. तसेंच, षंढ, पतित (जातिभ्रष्ट), आंधळा, बहिरा, मुका असा वर असतां कन्या देऊं नये. 'वरावलोकनविधौ' अथवा 'कन्यावलोकनविधौ' या पदांचा सरळ अर्थ असाच आहे कीं, वराच्या व कन्येच्या व्यंगत्वादि किंवा पातित्यादि लक्षणांची परीक्षा करून नंतर वधूवरनिश्चय करावा.

प्रतिकूलाचा निर्णय.

वाग्दानानंतरं यत्र कुलयोः कस्यचिन्मृतिः ।
तदोद्वाहो नैव कार्यः प्रतिकूलमिदं भवेत् ॥ १५९ ॥
प्रतिकूलेपि कर्तव्यो विवाहो मासतः परः ।
शांतिं विधाय गां दत्वा प्रतिकूलं स्वगोत्रिणाम् ॥ १६० ॥

वाग्निश्चय झाल्यानंतर वधूच्या किंवा वराच्या कुटुंबांत तीन पुरुषांपर्यंत कोणी मनुष्य मृत झालें असतां त्यास प्रतिकूल किंवा परतकूल म्हणतात. असें परतकूल

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

होणें हें अनिष्ट मानिलेलें आहे. म्हणून परतकूळ झालें तर मरणदिवसापासून एक महिनापर्यंत त्या वधूवरांचा विवाह करूं नये. एक महिन्यानंतर विनायकशांति करून विवाह करावा. फारच अडचण असेल तर आशौच संपल्यानंतर शांति करून करावा, असें कित्येक ऋषींचें मत आहे. तीन पिढ्यांपर्यंतच्या अविभक्त कुटुंबांत कोणी मृत होईल तर मात्र प्रतिकूलाचा दोष मानावा. कारण, "विभक्तानां न दोषकृत्" म्हणजे विभक्त कुटुंब असतां प्रतिकूलाचा दोष नाहीं, अशी कश्यपोक्ति आहे. तसेंच, "प्रौढायामपि कन्यायां नानुकूलं प्रतीक्षते" म्हणजे कन्येच्या लग्नाचा योग्य काळ टळून गेला असतां, किंवा "दीर्घरोगाभिभूतस्य प्रतिकूलं न विद्यते" म्हणजे कोणी फार दिवस आजारी असून मृत झाला असतां, प्रतिकूलाचा दोष मानूं नये, अशीं परतकुळासंबंधीं अनेक मतें आहेत.

प्रतिकूल कोणाचें मानावें.

वरवध्वोः पितामाता तथा भ्राता पितामहः ।
पितामही पितृव्यश्च भगिनी चाविवाहिता ॥ १६१ ॥
भ्रातुर्जाया सुतश्चाथ स्नुषापुत्रो वरस्य च ।
एतेषां प्रतिकूलं चेच्छांतिः कृत्वा विधानतः ।
वाग्दानादि पुनः कृत्वा ततो लग्नं विधीयते ॥ १६२ ॥

विधिपूर्वक वाग्दान झालें असेल किंवा विवाहतिथीचा निश्चय झाला असेल व नंतर वधूवरांपैकीं एकाद्याच्या अविभक्त कुटुंबांत पिता, माता, आजा, आजी, मुलगा, भाऊ व अविवाहित कन्या, भावाची स्त्री व पुत्र, द्वितीय संबंधाचे वेळीं वराची सून व पुत्र, यांतून कोणी मृत असतां प्रतिकूल झालें असें समजून, गणेशशांति करून नंतर पुनः वाग्निश्चय करून विवाह करावा.

बलात्कारानें केलेल्या विवाहाचा निर्णय.

महादोषे सुविज्ञाते पूर्वं सप्तपदीविधेः ।
मरणादौ समुत्पन्ने देयाऽन्यस्मै न दोषभाक् ॥
बलादुद्वाहिता कन्या दातव्याऽन्यवराय च ॥ १६३ ॥
अंधो मूकः क्रियाहीनश्चापस्मारी नपुंसकः ।
दूरस्थः पतितः कुष्ठी दीर्घरोगी वरो न सत् ॥ १६४ ॥

सप्तपदी होण्यापूर्वीं वराच्या ठायीं कांहीं दोष दृष्टीस पडतील, अथवा वर मृत होईल, किंवा बलात्कारानें कोणी कन्येचा विवाह लावील, तर तो विवाह यथाशास्त्र न मानितां त्या मुलीचा दुसऱ्या वराबरोबर विवाह करावा. वराच्या ठिकाणीं कांहीं दोष असतील असें जें वर म्हटलें आहे, त्याचा अर्थ आंधळा, मुका, भ्रष्ट, अपस्मारी,

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

नपुंसक, कुष्ठी, महारोगी, इत्यादि दोषांनीं युक्त असें समजावें. मुहूर्तमार्तंडकार याविषयीं असें म्हणतात कीं, "देयान्यत्र विवाहिताऽपि च बलाद्या विद्धयोनिर्न चेत्"। जी कन्या अक्षतयोनि असेल तिचा मात्र बलात्कारादि पूर्वोक्त दोषांचा संभव घडला असतां पुनः विवाह करावा, म्हणजे अन्य वराला ती द्यावी. मार्तंडवल्लभा टीकेंत "विद्धयोनिर्न चेत्" याची व्याख्या "विद्धा योनिर्यस्याः सा तथा न चेत्, पुरुषाभुक्तेत्यर्थः"। अशी केली आहे. तात्पर्य, अक्षतयोनि कन्या असून सप्तपदी होण्यापूर्वी वरमरणादि अनिष्ट प्रकार घडला असतां तिचा पुनर्विवाह करावा.

उपनयनविवाहादिपूर्वींचीं तैलहरिद्रादि कृत्यें.

(पृथ्वी छंद.)

विधोर्वलमवेक्ष्य वा दलनकंडनं वारकं।
गृहांगणविभूषणान्यथ च वेदिकामंडपान्॥
विवाहविहितोडुभिर्विरचयेत्तथोद्वाहतो।
न पूर्वमिदमाचरेत्त्रिनवषण्मिते वासरे॥ १६५॥

विवाहसंबंधीं मंगलकृत्यें म्हणजे दळण, कांडण, वारक म्हणजे मंगलकलश तयार करणें, गृह विभूषित करणें, आंगण करणें, मंडप घालणें, मुलीला बांगड्या भरणें, बहुलें इत्यादि सर्व कृत्यें शुभ मुहूर्तावर म्हणजे विवाहोक्त नक्षत्रांवर करावी. म्हणजे अश्विनी, भरणी, आर्द्रा, पुनर्वसु, पुष्य, आश्लेषा, चित्रा, विशाखा, ज्येष्ठा आणि शततारका हीं नक्षत्रें वर्ज्य करून इतर नक्षत्रांवर करावीं. तसेंच, अमावास्यावैधृतिव्यतीपातादि दुष्ट योगांवर करूं नयेत. त्यांत वधूवरांना चंद्रबल असेल तर उत्तम. नसेल तर निदान शुभ नक्षत्र असावें. त्याप्रमाणेंच विवाहाचा दिवस धरून त्याच्यापूर्वीं तिसऱ्या, सहाव्या व नवव्या दिवशीं वरील कृत्यें करूं नयेत. हाच नियम उपनयनाविषयीं जाणावा. मात्र त्या ठिकाणीं उपनयनाला जीं नक्षत्रें सांगितलीं आहेत ती घ्यावीं.

विवाहास रविचंद्रगुरुबल.

वरस्य भास्करबलं कन्यायाश्च गुरोर्बलं।
द्वयोश्चंद्रबलं ग्राह्यं विवाहो नान्यथा भवेत्॥ १६६॥
जन्मत्रिदशमारिस्थः पूजया शुभदो गुरुः।
विवाहेऽथ चतुर्थाष्टद्वादशस्थो न शोभनः॥ १६७॥
झषचापकुलीरस्थो जीवोप्यशुभगोचरः।
अति शोभनतां दद्याद्विवाहोपनयादिषु॥ १६८॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

रजस्वला यदा कन्या गुरुशुद्धिं न चिंतयेत् ।
अष्टमेऽपि प्रकर्तव्यो विवाहस्त्रिगुणार्चनात् ॥ १६९ ॥

वराला रविबल, वधूला गुरुबल व उभयतांना चंद्रबल अवश्य पाहिजे. जन्मराशी-पासून ९।५।११।२।७ या स्थानीं गुरु असतां, विवाहास उत्तम गुरुबल आहे, असें समजावें. १०।६।३।१ या स्थानीं असतां गुरु मध्यम होय. आणि ४।८।१२ या स्थानीं गुरु असतां विवाहास वर्ज्य होय. तथापि अडचण असतां अशा समयीं एक वेळ पूजा करून गुरुबल लाभतें, असें कित्येक ग्रंथकार म्हणतात; व तसें करण्याचा सांप्रदायही आहे. मीन व धनु या राशींचा म्हणजे स्वगृहींचा गुरु असतां किंवा कर्क राशीचा उच्चीचा गुरु असतां अनिष्ट गुरूचा दोष मानूं नये. त्याचप्रमाणें ऋतुमती कन्येचा विवाह करणें असेल तर गुरुबलाचा विचार करण्याचें कारण नाहीं. आठवा गुरु हा अत्यंत अनिष्ट मानिलेला आहे, परंतु तोही पूजा केली असतां शुभप्रद होतो म्हणून दोन किंवा तीन वेळ निदान एक वेळ तरी पूजा करून विवाह करावा. पण कार्याचा अतीत काल झाला नसेल तरच विशेषेंकरून गुरूचा दोष सांगितला आहे. म्हणून रजस्वला होणाऱ्या स्त्रीचा विवाह अनिष्ट गुरु असतांही करावा.

मंडपाचें प्रमाण.

मंडपो गृहमानेन षोडशद्वादशाष्टभिः ।
हस्तैर्मितश्चतुर्द्वारस्तोरणाढ्योऽत्र वेदिका ॥ १७० ॥

घर लहान मोठें असेल त्याप्रमाणें मंगलकार्याकरितां मंडप करणें तो समसंख्या-युक्त म्हणजे सोळा, बारा किंवा आठ हात असून समचौरस असावा. त्याला चार द्वारें असावीं. व तो मंडप तोरणांनीं विभूषित करून त्यांत बहुलें करावें. विवाहा-पूर्वींचे ३।६।९ हे दिवस वर्ज्य करून शुभ नक्षत्रीं मंडप घालावा.

बहुल्याचें प्रमाण.

हस्तोच्छ्रितां चतुर्हस्तैश्चतुरस्रां सुवेदिकाम् ।
स्तंभैश्चतुर्भिः सुश्लक्ष्णां वामभागे तु सद्मतः ॥ १७१ ॥

विवाहांत वराच्या हातानें व उपनयनांत आचार्यांच्या म्हणजे बटूच्या पित्याच्या हातानें एक हात उंच, चार हात लांब व चार हात रुंद अशी समचौरस वेदी म्हणजे बहुलें असावें. तें घराच्या डाव्या बाजूस म्हणजे घरांत जातांना उजव्या हाताकडे असून पूर्वाभिमुख किंवा उत्तराभिमुख असावें. कित्येक ग्रंथकार विवाहास कन्येच्या व मौंजीस बटूच्या हाताचें प्रमाण घेऊन वेदी करावी असें म्हणतात, पण ती वेदी फार संकुचित होते. मुहूर्तमार्तंडकारांनीं “वेदीप्राक्प्रवणा चतुर्वेरकरा” असें वेदीसंबंधानें स्पष्ट म्हटलें आहे, तेंच युक्त आहे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कन्यामातृरजोदोषनिर्णय.

नांदीश्राद्धोत्तरं कन्यामाता यदि रजस्वला ।
कन्यादानं पिता कुर्यादित्यांगिरसभाषितम् ॥ १७२ ॥
अलाभे सुमुहूर्तस्य रजोदोषेह्युपस्थिते ।
श्रियं संपूज्य विधिवत्ततो मंगलमाप्नुयात् ॥ १७३ ॥

विवाहांत नांदीश्राद्ध होऊन गेल्यानंतर जर कन्येची माता रजस्वला झाली, तर बापानेंच कन्यादान करून विवाहकृत्य समाप्त करावें, असें आंगिरसऋषीचें वचन आहे. कित्येक ऋषींचें मत, माता शुद्ध झाल्यानंतर पुढील कृत्य करावें किंवा पुढें सुमुहूर्तांची वगैरे अडचणच असेल, तर शास्त्रोक्त श्रीशांति करून नंतर तत्काळ मंगलकृत्य करावें, असें आहे.

विवाहांत कन्यारजोदोष व रजःकालदोषाची मर्यादा.

विवाहे वितते तंत्रे होमकाल उपस्थिते ।
कन्यामृतुमतीं दृष्ट्वा कथं कुर्वन्ति याज्ञिकाः ॥ १७४ ॥
स्नापयित्वा तु तां कन्यामर्चयित्वा यथाविधि ।
युंजानामाहुतिं हुत्वा ततः कर्मणि योजयेत् ॥ १७५ ॥

विवाहविधीचा आरंभ झाला आहे, अशा समयीं होमकालाचे आरंभीं किंवा मध्यें वधू रजस्वला झाली तर तिला स्नान घालून नवीन वस्त्रें देऊन 'युंजानाना' या ऋग्वेदोक्त मंत्रानें होमांत आहुती देऊन पुढील विधि करावा.

धर्मसिंधूंत रजोदर्शनासंबंधीं असा शास्त्रार्थ आहे कीं, प्रायः जी स्त्री पूर्णमासानें रजस्वला होते, ती सतरा दिवसापर्यंत पुनः रजस्वला होईल, तर तत्काळ स्नानानें तिची शुद्धि होते. अठराव्या दिवशीं झाल्यास एक रात्र विटाळ, एकोणिसाव्या दिवशीं दोन रात्रि विटाळ, व विसाव्या दिवशीं झाल्यास तीन रात्रि विटाळ धरावा. तसेंच, पंधरा दिवसांनीं रजस्वला होणारी स्त्री पुनः दहा दिवसांनीं रजस्वला झाल्यास तिची स्नानानें शुद्धि होते. अकराव्या दिवशीं झाल्यास एक दिवस विटाळ, बाराव्या दिवशीं दोन दिवस विटाळ, व तेराव्या दिवशीं झाल्यास तीन दिवस विटाळ धरावा. शरीर-रोगामुळें प्रति दिवशीं होणाऱ्या रजोदर्शनाचा विटाळ धरूं नये. तथापि स्राव बंद होईपर्यंत देवपितृकर्मे व पाकसिद्धि तिनें करूं नये.

कार्यांत सूतकप्राप्तिशास्त्रार्थ.

चेत्स्यात्सूतकमुक्तपूर्वसमयेऽनारब्ध कार्येबुधः ।
कूष्मांडी घृतहोमतोऽपि जननाशौचे क्वचित्कारयेत् ॥ १७६ ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

संकटे समनुप्राप्ते सूतके समुपागते ।
कूष्मांडीभिर्घृतं हुत्वा गां दत्वा च पयस्विनीं ।
चूडोपनयनोद्वाहौ प्रतिष्ठादिकमाचरेत् ॥ १७७ ॥

चूडाकर्म, उपनयन, विवाह, देवप्रतिष्ठा, इत्यादि कार्यांना आरंभ करण्यापूर्वीं जर जननाशौच (सूवेर) प्राप्त होईल, व अतिसंकटकाल प्राप्त झाला असेल म्हणजे दुसरा मुहूर्त नसेल किंवा समारंभाची सर्व सिद्धता झाली असेल, तर 'यद्देवा देव हेडनं' इत्यादि ऋग्वेदोक्त तीन ऋचांनीं कूष्मांडी घृतहोम करून गोदान करून कार्यास आरंभ करावा. प्रत्यक्ष गोप्रदान करणें अशक्य असेल तर हिरण्यद्वारा करावें. त्याचप्रमाणें मृताचें सूतक असतांही करावें, त्याविषयीं वचनः—

विवाहोत्सव यज्ञेषु त्वंतरामृतसूतके ।
परैरन्नं प्रदातव्यं भोक्तव्यं च द्विजोत्तमैः ॥ १७८ ॥
व्रतयज्ञविवाहेषु श्राद्धे होमेऽर्चने जपे ।
प्रारब्धे सूतके न स्यादनारब्धे तु सूतकम् ॥ १७९ ॥

नांदीश्राद्ध केल्यानंतर विवाहोत्सवांत, मौंजी बंधनांत, यज्ञांत व व्रतादिकांत मृताशौच प्राप्त होईल तर आरंभिलेलें कार्य समाप्त करावें. तसेंच, वर लिहिल्याप्रमाणें मुहूर्तांची अडचण असेल किंवा उपकल्पित मंडपादि सर्व साहित्यांचा नाश होत असेल, अशा महासंकटकाळीं कार्यारंभ होण्यापूर्वीं मृताशौच आलें, व दूर संबंध असल्यामुळें कार्यसिद्धि करणें शक्य असेल तर गोदानसहित कूष्मांडी होम करून पंचगव्य प्राशन करून कार्य करावें. अन्नपाकसिद्धि दुसऱ्याकडून करवून ब्राह्मणांनीं भोजन करावें. तथापि देशाचाराविरुद्ध व लोकाचाराविरुद्ध असें मात्र कोणतेंही कार्य करूं नये, अर्थात् बहुजनसमाजाची व पंडितांची संमति असावी.

नांदीश्राद्धानंतर वर्ज्य कृत्यें.

नांदीश्राद्धे कृते पश्चाद्यावन्मातृविसर्जनम् ।
दर्शश्राद्धं क्षयश्राद्धं स्नानं शीतोदकेन च ॥ १८० ॥
अपसव्यं स्वधाकारं नित्यश्राद्धं तथैव च ।
ब्रह्मयज्ञं चाध्ययनं नदीसीमान्तलंघनम् ॥
उपवासव्रतं चैव श्राद्धभोजनमेव च ।
नैव कुर्युः सपिंडाश्च मंडपोद्वासनावधि ॥ १८१ ॥

विवाहउपनयनादि मंगल कार्यांत नांदीश्राद्ध झाल्यानंतर मंडपदेवतांचें म्हणजे मातृकांचें विसर्जन होईपर्यंत अविभक्त कुटुंबांतील स्त्री–पुरुष–सपिंडांनीं दर्शश्राद्ध मातापितरांचें सांवत्सरिक श्राद्ध, शीतोदकानें स्नान, अपसव्य, स्वधाकारयुक्त वैश्वदेवादि सर्व कृत्यें, नित्यश्राद्ध, ब्रह्मयज्ञ, तिलतर्पण, वेदाध्ययन, नदी व सीमा यांचें उल्लंघन, उपवास, व्रत, श्राद्धभोजन, हीं कृत्यें करूं नयेत.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

भस्म गोपीचंदन धारण.

अभ्यंगे सूतके चैव विवाहे पुत्रजन्मनि ।
मांगल्येषु च सर्वेषु न धार्यं गोपिचंदनम् ॥ १८२ ॥

अभ्यंग, आशौच, विवाह, पुत्रजन्म आणि सर्व मांगलिक कार्यें व जननाशौच (सूवेर) यांमध्यें भस्म व गोपीचंदन लावूं नये.

विवाहमुहूर्त.

उदगयन आपूर्यमाणे पक्षे कल्याणे नक्षत्रे चौलकर्मोपन-
यनगोदानविवाहाः । सार्वकालमेके विवाहं ॥ आ. गृ. सूत्र अ. १

उत्तरायण, शुक्लपक्ष व कल्याणकारक नक्षत्रें, तिथि, योग व करण अशा शुभ समयीं चौलकर्म, उपनयन, गोदान आणि विवाह हे संस्कार करावे. 'सार्वकालमेके विवाहं' याचा अर्थ द्वादशमासांपैकीं कोणत्याही महिन्यांत शुभ दिवशीं विवाह करावा असा होतो. विशेषतः उदगयनांतील सर्व महिन्यांत विवाह करणें अधिक श्रेयस्कर आहे, हें सांगण्याचा येथें मुख्य उद्देश आहे. सार्वकालं याचा अर्थ पाहिजे त्या वेळीं असा जर कोणी केला तर अमावास्या, ग्रहण, संक्रांति, वैधृति, व्यतीपातादि दुष्टयोगांवर देखील विवाह केला असतां सदोष होणार नाहीं. म्हणून, तसा अर्थ करूं नये. व्यंकटेशाच्या गिरीवर पाहिजे त्या वेळीं, किंबहुना, सिंहस्थ संवत्सरांत सुद्धां मध्व-मतानुयायी लोक विवाह करितात, तो सार्वकालं या सूत्राच्या आधारानेंच कदाचित् करीत असतील. असो. उपनयनसंस्कार मात्र सार्वकाल होत नाहींत. त्याला उद-गयनच अवश्य पाहिजे असल्यामुळें माघादि पंच मासांतच मौंजी कराव्या. विवाह-संस्कार मात्र मार्गशीर्षमासांतही करितात.

विवाहास मास, वार व नक्षत्रें.

वैशाखः फाल्गुनो माघो ज्येष्ठश्चैते शुभप्रदाः ।
मासा उद्वहने मार्गो मध्योन्येत्वशुभा मताः ॥ १८३ ॥
मिथुनस्थे यदा भानौ आषाढेपि शुभप्रदः ।
षष्ठी दर्शोष्टमी रिक्ता कृष्णपक्षांत्यपंचके ॥ १८४ ॥
शुक्ला च प्रतिपन्नेष्टास्तिथयोन्ये तु शोभनाः ।
सौम्यवाराः शुभा मध्यौ सूर्यमन्दौ कुजोऽधमः ॥ १८५ ॥
त्र्युत्तरा रोहिणी हस्तोऽनुराधा रेवती मघा ।
स्वाती मूलमृगर्क्षेषु शोभनं करपीडनम् ॥ १८६ ॥
धनिष्ठा श्रवणं चित्रा अश्विनी पाणिपीडने ।
नक्षत्राणि शुभान्याह हरदत्तोऽधिकानि तु ॥ १८७ ॥

माघ, फाल्गुन, वैशाख आणि ज्येष्ठ हे महिने विवाहाकरितां शुभ धरिलेले आहेत.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मार्गशीर्ष मध्यम आहे. मिथुनसंक्रांत असेल तेथपर्यंत आषाढांतही विवाह करणें शुभ आहे. कित्येक ठिकाणीं वृश्चिकराशीस सूर्य आल्यानंतर कार्तिकमासांत देखील विवाह होतात. षष्ठी, अमावास्या, अष्टमी, रिक्तातिथि म्हणजे चतुर्थी, नवमी, चतुर्दशी, कृष्णपक्षांतील शेवटच्या पांच तिथि, आणि शुक्लप्रतिपदा या तिथि विवाहास वर्ज्य कराव्या असें मुहूर्तगणपति ग्रंथांत सांगितलें आहे. तथापि षष्ठी, अष्टमी व शुक्ल चतुर्दशी ह्या तिथींवर विवाह करणें अशुभ नाहीं, असें कित्येक ग्रंथकार म्हणतात. अमावास्या मात्र सर्वथा निंद्य आहे. वारांपैकीं, मताधिक्यानें सर्व वार विवाहास शुभ आहेत. तिन्ही उत्तरा, रोहिणी, हस्त, अनुराधा, रेवती, मघा, स्वाती, मूल आणि मृग अशीं अकरा नक्षत्रें विवाहास प्रशस्त मानिलेलीं आहेत. यांशिवाय धनिष्ठा, श्रवण, चित्रा आणि अश्विनी हीं आणखी चार नक्षत्रें हरदत्ताच्या मतानें विवाहास शुभ आहेत.

पंचकविचार. (मालिनी)

गततिथियुतलग्नं नंदहृच्छेषकं च ।
वसुयमयुगषट्क्षोणिसंख्या क्रमेण ॥
रुगनलनृपचौरं मृत्युदं पंचकं स्यात् ।
व्रतगृहनृपमार्गोद्वाहके वर्जनीयम् ॥ १८८ ॥

ज्या मुहूर्तावर विवाह करावयाचा त्या वेळीं पंचक नसावें. म्हणून हें वेळापंचक पाहण्याची रीति येथें सांगतों. ज्या वेळीं पंचक पहावयाचें असेल, त्या वेळेपर्यंत शुक्लपक्षाच्या प्रतिपदेपासून गततिथि मोजून त्यांत त्या वेळीं जें लग्न असेल त्या लग्नाचे अंक मिळवावे. त्या बेरजेस नवांनीं भागावें. बाकी ८।२।४।६।१ असे अंक असतां क्रमानें रोगपंचक, अग्निपंचक, राजपंचक, चोरपंचक आणि मृत्युपंचक आहे असें समजावें. म्हणजे १ बाकी असतां मृत्युपंचक, तें विवाहास वर्ज्य करावें; २ बाकी असतां अग्निपंचक, तें गृहारंभास वर्ज्य; ४ उरले तर राजपंचक, तें राजकार्यांस वर्ज्य; ६ उरले तर चोरपंचक, तें प्रयाणास वर्ज्य, आणि ८ उरले तर रोगपंचक, तें व्रतबंधास वर्ज्य करावें. यांवाचून कोणताही अंक शेष असतां निष्पंचक आहे असें जाणावें. तें सर्व कार्यांस प्रशस्त मानिलेलें आहे. लग्न पूर्ण बलवान् असतां पंचकाचा दोष नाहीं. प्रयाणकाळीं पंचकाचा दोष असतां गमन करूं नये.

उदयास्तशुद्धि. (शिखरिणी)

यदा लग्नांशेशो लवमथतनुं पश्यति युतो ।
भवेद्वाऽयं वोढुः शुभफलमनल्पं रचयति ॥
लवद्यूनस्वामी लवमदनभं लग्नमदनं ।
प्रपश्येद्वा वध्वाः शुभमितरथा ज्ञेयमशुभम् ॥ १८९ ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

उदय म्हणजे लग्न आणि अस्त म्हणजे लग्नापासून सप्तमस्थान, यांची जी शुद्धि ती उदयास्तशुद्धि होय. विवाहाला जें लग्न घ्यावयाचें तें लग्न किंवा त्याचा इष्ट नवांश हे स्वस्वामींनीं इष्ट किंवा युक्त असणें याला उदयशुद्धि म्हणतात. तसेंच लग्न किंवा इष्ट नवांश यापासून सातवें लग्न किंवा सातवा नवांश हे स्वस्वामींनीं इष्ट किंवा युक्त असणें याला अस्तशुद्धि म्हणतात. उदयास्तशुद्धि विवाहाला अवश्य असावी. निदानपक्षीं दोहोंतून एक तरी असावी. उदयशुद्धि वराला आणि अस्तशुद्धि कन्येला सुखकारिणी आहे.

क्रांतिसाम्यनामक महापातदोष.

मेषसिंहौ तुलाकुंभौ गोनक्रौ कर्कवृश्चिकौ ।
कन्यामीनौ धनुर्युग्मौ तत्रान्योन्यं स्थितावुभौ ।
रविचंद्रौ तथा ज्ञेयः क्रांतिसाम्यस्य संभवः ॥ १९० ॥

१ सिंह आणि मेष; २ तूळ आणि कुंभ; ३ वृषभ आणि मकर; ४ कर्क आणि वृश्चिक; ५ कन्या आणि मीन; व ६ धन आणि मिथुन; या परस्पर राशींतून एकीला चंद्र व दुसरीला सूर्य असतां क्रांतिसाम्य नांवाचा महापात होतो. उदाहरणार्थ; सिंहराशीस सूर्य व मेषराशीस चंद्र किंवा मेषराशीस सूर्य व सिंहराशीस चंद्र असणें. याचप्रमाणें इतर राशींचें जाणावें. हा महापातदोष कोणत्याही मंगलकृत्यास वर्ज्य सांगितलेला आहे.

नक्षत्रांच्या विषघटी व त्यांचा अपवाद.

पंचाशज्जिनखाग्नयश्च खकृता आखंडला मूर्च्छना ।
त्रिंशद्विशरदाः खरामं नखं धृत्येकाश्विनौ विंशतिः ॥
शक्रेंद्रौ दश वासवा रसशराः सिद्धा नखाशा दिशो ।
धृत्यष्टी जिनं खाग्नयोऽश्वित इमाभ्योऽग्रेऽब्धिनाड्यो विषम् ॥ १९१ ॥

चंद्रो विषघटीदोषं हंति केंद्रत्रिकोणगः ।
लग्नं विना शुभैर्दृष्टः केंद्रे वा लग्नपे तथा ॥ १९२ ॥

अश्वि. ५०	मृग १४	आश्ले. ३२	हस्त २१	अनु. १०	उ.षा. २०	पू.भा. १६
भर. २४	आर्द्रा २१	मघा ३०	चित्रा २०	ज्येष्ठा १४	श्रवण १०	उ.भा. २४
कृत्ति. ३०	पुन. ३०	पूर्वा २०	स्वाती १४	मूल ५६	धनि. १०	रेव. ३०
रोहि. ४०	पुष्य २०	उत्त. १८	विशा. १४	पू.षा. २४	शत. १८	अभि. ०

वरील श्लोकांत अश्विनीपासून रेवतीपर्यंत २७ नक्षत्रांचे अनुक्रमानें घटिकात्मक ध्रुवांक सांगितले आहेत. त्याचा अर्थ असा कीं, त्या त्या नक्षत्रांच्या तितक्या घटिका गेल्यानंतर पुढील चार घटिका विषघटी असतात, त्या सर्व शुभकार्यांना वर्ज्य कराव्या.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कोणत्या नक्षत्राच्या किती घटिका गेल्यानंतर विषघटी धराव्या हें वरील कोष्टकाव-रून स्पष्ट समजेल. दिवसनक्षत्र पूर्ण ६० घटिका असतां मात्र वरील नियमाप्रमाणें विषघटी धराव्या. परंतु तें ६० घटिकांहून कमी किंवा अधिक असेल तर त्रैराशिक-रीतीनें पुढें लिहिल्याप्रमाणें विषघटी काढाव्या. रीतिः—ज्या नक्षत्राच्या विषघटी काढावयाच्या असतील त्या नक्षत्राच्या ध्रुवांकांनीं त्याच नक्षत्राच्या एकंदर भुक्तभोग्य घटिकांना गुणून साठांनीं भागावें. जो भागाकार येईल तितक्या घटिका गेल्यानंतर विषघटींना आरंभ होईल असें समजावें. तसेंच, नक्षत्राच्या भुक्तभोग्य घटिकांना चोहोंनीं गुणून साठांनीं भागावें; जो भागाकार येईल तितक्या घटिका विषघटी होत. उदाहरण–मघानक्षत्र बुधवारीं ४८ घटिका आहे, आणि पूर्वदिवशीं आश्लेषा नक्षत्र ४४ घटिका होतें. म्हणजे ४४ घटिकांनंतर मघानक्षत्राला आरंभ झाला. म्हणून ६०–४४=१६ ह्या मघा नक्षत्राच्या मंगळवारच्या घटिका होत; त्यांत बुधवा-रच्या ४८ घटिका मिळविल्या म्हणजे एकंदर ६४ घटिका झाल्या; ह्या मघानक्षत्राच्या भुक्तभोग्य घटिका होत. रीतीप्रमाणें, ६४×ध्रुवांक ३०=१९२०÷६०=३२ इतक्या घटिका गेल्यानंतर विषघटी धराव्या. आतां त्या किती धरिल्या पाहिजेत हें पाहूं. रीतीप्रमाणें, ६४×४=२५६÷६०=४ घटि १६ पळें इतक्या स्पष्ट विषघटी झाल्या. म्हणून या उदाहरणांत मघा नक्षत्राच्या ३२ घटिका झाल्यानंतर ४ घटी १६ पळें ह्या काळाला विषघटी म्हणावें. या विषघटींच्या दोषाविषयीं एक अपवाद आहे तो असा कीं, ज्या राशींचे स्वामी शुभग्रह आहेत त्या राशींना चंद्र असतां किंवा शुभ ग्रहाची त्या चंद्रावर दृष्टि असतां किंवा १।५।७।१०।४।१ या स्थानीं चंद्र किंवा लग्न-स्वामी असतां विषघटींचा दोष रहात नाहीं.

वर्गोत्तम-नवांश.

आद्यश्चरे नवांशःस्यात्स्थिरे राशौ तु पंचमः ।
नवमो द्विस्वभावाख्ये शुभो वर्गोत्तमो ह्ययम् ॥ १९३ ॥

जें लग्न असेल त्याच राशीचा नवांश असला म्हणजे त्यास वर्गोत्तम म्हणतात. चरलग्नीं म्हणजे मेष, कर्क, तूळ, आणि मकर या लग्नीं पहिला नवांश वर्गोत्तम असतो. स्थिरलग्नीं म्हणजे वृषभ, सिंह, वृश्चिक आणि कुंभ या लग्नीं पांचवा नवांश वर्गोत्तम असतो. आणि मिथुन, कन्या, धन, आणि मीन या लग्नीं नववा नवांश वर्गोत्तम असतो. नवांशांची माहिती तिसऱ्या प्रकरणांत दिली आहे.

विवाहास वर्ज्य एकवीस महादोषः

दुःपंचाङ्गाष्टमोस्रक् सविधुखलतनुः षण्मृतींदुः सितोरौ ।
संक्रांतिर्गण्डदोषः सखलभदिनजौ चक्रचक्रार्धपातौ ॥
रन्ध्रं लग्नं कुवर्गोस्तगखलउदयास्ताशुचिःक्रूरवेधः ।
कर्तर्येकार्गलांघ्रिर्ग्रहणभकुलवौ दुःक्षणोत्पातभे च ॥ १९४ ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ज्या दिवशीं विवाह करावयाचा त्या दिवशीं पुढें लिहिलेले एकवीस प्रकारचे दोष नसावे. १ दुःपंचांगी म्हणजे दुष्ट तिथि वार नक्षत्र योग इत्यादिं दोषांनीं युक्त दिवस असणें म्हणजे पंचांगशुद्धि ज्या दिवशीं नाहीं असा दिवस; २ अष्टमोसृक् म्ह० मेष, वृषभ आदिकरून ज्या लग्नीं विवाह करणें असेल त्या लग्नापासून अष्टम स्थानीं मंगल असणें; ३ सविधुखलतनुः म्ह० लग्नीं चंद्र व पापग्रह असणें; ४ षण्मृतींदुः म्ह० लग्नापासून सहावा किंवा आठवा चंद्र असणें; ५ सितोरौ म्ह० लग्नापासून सहावा शुक्र असणें; ६ संक्रांति म्ह० एका राशींतून दुसऱ्या राशींत सूर्याचें संक्रमण होतें तो दिवस; ७ गंडदोष म्ह० तिथिगंडांत, नक्षत्रगंडांत व लग्नगंडांत असणें; ८ सखलभ म्ह० लग्ननक्षत्र पापग्रहानें युक्त असणें; ९ दिनज म्ह० कुलिक—काळवेळादि दुर्मुहूर्त असणें; १० चक्रचक्रार्धपातौ म्ह० क्रांतिसाम्यनामक महापातदोष असणें; ११ रंध्रलग्नं म्ह० वधूवरांच्या राशीपासून आठव्या लग्नीं विवाह करणें; १२ कुवर्गे म्हणजे होरा, द्रेष्काण, सप्तांश, नवमांश, द्वादशांश आणि त्रिंशांश या षड्वर्गांपैकीं दोहोंतून अधिक वर्ग पापग्रहांनीं युक्त असणें; १३ अस्त्रगखल म्हणजे लग्नापासून किंवा चंद्रापासून किंवा इष्टलग्नाच्या इष्ट नवांशापासून सप्तमस्थानीं पापग्रह असणें यालाच जामित्रदोष म्हणतात; १४ उदयास्ताशुचिः म्ह० उदयास्ताची शुद्धता नसणें; १५ क्रूरवेध म्ह० नक्षत्राला पापग्रहांचा वेध असणें; १६ कर्तरीदोष म्ह० लग्नापासून किंवा चंद्रापासून दुसऱ्या स्थानांत पापग्रह असून तो वक्री असणें व द्वादशस्थानींही पापग्रह असणें; १७ एकार्गलांघ्रि म्ह० विष्कंभादि सत्तावीस योगांतून जे दुष्टयोग आहेत, ते ज्या नक्षत्रीं असतील, त्या नक्षत्रापासून अभिजित्‌नक्षत्रसुद्धां मोजिलें असतां सूर्यनक्षत्र विषम अंकीं येणें; १८ ग्रहणभ म्ह० ज्या नक्षत्रीं पूर्वीं सहा महिन्यांत ग्रहण झालें तें नक्षत्र; १९ कुलत्र म्ह० लग्नीं पापग्रहाचा नवांश असणें; २० दुःक्षण म्ह० यामार्ध दोष असणें; २१ उत्पातभ म्ह० पूर्वीं षण्मासांत धरणीकंप झाला असल्यास ज्या नक्षत्रीं तो झाला असेल तें नक्षत्र; असे एकवीस प्रकारचे दोष नसतील तो दिवस विवाहास शुभ होय. पंचांगांत जे विवाहमुहूर्त दिलेले असतात ते प्रायः वरील दोषांनीं विवर्जित असतील असेच दिवस असतात; म्हणून ज्या मेषादि लग्नीं विवाह करावयाचा त्या लग्नास शुभग्रह आहेत कीं नाहींत, ह्यावांचून इतर गोष्टी पहाव्या लागत नाहींत. परंतु विवाहाला दिवस ठरवितांना किती गोष्टींचा विचार करावा लागतो याची थोडी तरी कल्पना वाचकांना असावी ह्यासाठीं वरील माहिती दिली आहे. याशिवाय विवाहमुहूर्त निश्चित करतांना आणखी पुष्कळ गोष्टी पहावयाच्या असतात; परंतु ग्रंथविस्तरभयास्तव त्या सर्व येथें देतां येत नाहींत.

---

१ होरा इत्यादि षड्वर्गांची अधिक माहिती पुढील तिसऱ्या प्रकरणांत दिली आहे.

२ खग्रासग्रहण असतां सहा महिने, अर्धग्रास असतां तीन महिने व एक चतुर्थांश ग्रास असतां एक महिनापर्यंत तें नक्षत्र वर्ज्य करावें.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

विवाहास लग्नीं शुभाशुभग्रह. (शिखरिणी)

त्रिषष्ठाऽष्टस्वर्कस्त्रिजलधनगोऽब्जः क्षितिसुत-
स्त्रिषष्ठास्थो ज्ञेज्यौ व्ययनिधनवर्ज्यौ भृगुसुतः ॥
द्वितीयाब्धिष्वंकाभ्रतनुषु रिपुत्र्यष्टसु शनि-
स्तमः केतुश्चाये भवति सुखहेतुश्च सकलः ॥ १९५ ॥

रविर्लग्ने चंद्रस्तनुरिपुमृतिस्थः क्षितिसुतो-
ऽष्टलग्नामे ज्ञेज्यौ निधन उशना त्र्यष्टरिपुषु ॥
शनिः शेषौ लग्ने तनुपतिरथार्यष्टमगृहे
विवाहे स्युः सर्वे मदनसदने नैव शुभदाः ॥ १९६ ॥

शुभग्रह—मेषादिकरून द्वादश लग्नांपैकीं ज्या लग्नीं विवाह करावयाचा असेल त्या लग्नापासून ३।६ किंवा ८ या स्थानीं रवि असावा. ३।४ किंवा २ या स्थानीं चंद्र असावा. ३।६ या स्थानीं मंगळ असावा. १२।८ हीं स्थानें खेरीज करून अन्य स्थानीं बुध–गुरु असावे. २।४।५।९।१०।१ या स्थानीं शुक्र असावा. ६।३।८ या स्थानीं शनि, राहु व केतु असावे. आणि एकादशस्थानीं असणारे सर्वच ग्रह विवाहास शुभ जाणावे.

अशुभग्रह—लग्नीं रवि, १।६।८ या स्थानीं चंद्र, ८।१।१० या स्थानीं मंगळ, बुध-गुरु अष्टमस्थानीं, ३।६।८ या स्थानीं शुक्र, लग्नीं शनि, राहु व केतु, लग्नाधिपति ६।८ या स्थानीं, आणि सप्तमांत असणारे सर्व ग्रह विवाहास वर्ज्य करावे.

दोषपरिहारक ग्रह. (शिखरिणी)

त्रिकोणे केंद्रे वा मदनरहिते दोषशतकं ।
हरेत्सौम्यः शुक्रो द्विगुणमपि लक्षं सुरगुरुः ॥
भवेदाये केंद्रेंगपउतलवेशो यदि तदा ।
समूहं दोषाणां दहन इव तूलं शमयति ॥ १९७ ॥

विवाहास इष्टलग्नापासून त्रिकोणांत म्हणजे ९।५ या स्थानीं, आणि सप्तमस्थान खेरीज करून केंद्रांत म्हणजे १।४।१० या स्थानीं, बुध असतां तो इतर शंभर दोषांचा नाश करतो. त्याच स्थानीं शुक्र असतां तो दोनशें दोषांचा आणि गुरु असतां तो लक्ष दोषांचा नाश करितो. इष्टलग्नापासून ११।१।४।१० या स्थानीं लग्नस्वामी किंवा लग्नाच्या इष्टनवांशाचा स्वामी असतां, ज्याप्रमाणें अग्नि कापसाचा नाश करितो, त्याप्रमाणें तो अनंत दोषांचा नाश करितो.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मुहूर्त शब्दाची व्याख्या.

मुहूर्तमहो रात्रेश्च प्रोचुर्पंचदशं लवम् ।
केचिच्छुभक्रियायोग्यकालं केचिद्घटीद्वयम् ॥ १९८ ॥

दिवसाचे पंधरा व रात्रीचे पंधरा मिळून अहोरात्राचे म्हणजे साठ घटिकांचे तीस मुहूर्त होतात. अर्थात् दोन घटिकांचा जो काल त्यास मुहूर्त म्हणावें. अथवा शुभकृत्यांसाठीं ज्या शुभ नक्षत्रतिथिवारादि योग्य वेळा ठरविल्या आहेत, त्या ज्योतिःशास्त्रोक्त घटिकापलादिकांना मुहूर्त अशी संज्ञा आहे.

घटिकास्थापनम्.

ताम्रपात्रे जलैः पूर्णे गंधपुष्पैरलंकृते ।
तंडुलस्थे रत्नयुते शुचिभूमावहर्पतेः ॥
मंडलार्धोदयं वीक्ष्य जलयंत्रं विनिक्षिपेत् ॥ १९९ ॥

प्रातःकाळीं घटिका स्थापन करणें असेल तर पूर्वक्षितिजावर सूर्याचें अर्धबिंब दिसूं लागलें म्हणजे घटिका घालावी. तसेंच, सायंकाळीं पश्चिमक्षितिजावर सूर्याचें अर्धबिंब अदृश्य झालें म्हणजे घटिका घालावी. सामान्यतः सूर्योदयापूर्वीं किंवा सूर्यास्तसमयापूर्वीं तीस पळें (१२ मिन्युटें) घटिकास्थापन करावें. ज्या स्थानीं घटिकास्थापन करावयाचें असेल ती जागा गोमयानें सारवून व कणारांगोळी घालून तेथें स्वच्छ पत्रावळीवर तांदूळ पसरून रुंद तोंडाच्या तांब्याच्या पात्रांत परिपूर्ण पाणी भरून तें जलपात्र पूर्वाभिमुख व उत्तराभिमुख ठेवावें. त्यांत हिरण्य टाकून व तें गंधपुष्पांनीं अलंकृत करून त्यांत घटिकायंत्र घालावें. घटिकापात्राजवळ स्वतंत्र मनुष्य बसवावा. कारण, घटिकायंत्र उदकांत बुडाल्याबरोबर तत्क्षणींच तें अवधानपूर्वक काढून पुनः पाण्यावर ठेविलें तरच घटिकास्थापनेचें श्रेय आहे.

यंत्राणां मुख्यरूपासि ब्रह्मणा निर्मिते घटि ।
दंपत्योः शुभकालासिहेतवे भव शोभने ॥

घटिकेची पूजा झाल्यानंतर या मंत्रानें प्रार्थना करावी.

गोरज मुहूर्ताची वेळा.

अर्धास्तात्पूर्वमप्यूर्ध्वं घटिकार्धं तु गोरजः ।
अर्धबिंबात्परं केचिद् घटिद्वयसितं जगुः ।
स कालो मंगलः श्रेयान् विवाहादौ शुभप्रदः ॥ २०० ॥

सायंकाळीं सूर्याचा अर्ध अस्त झाल्यानंतर अस्तापूर्वीचीं १५ पळें व अस्तानंतर १५ पळें मिळून अर्ध घटिका, म्हणजे १२ मिनिटें इतक्या काळाला गोरज मुहूर्त म्हणतात. कित्येकांच्या मतें सूर्याचें अर्धबिंब अस्तंगत झाल्यानंतर पुढें २ घटिका म्हणजे ४८ मिनिटेंपर्यंत गोरजमुहूर्त असतो. हा विवाहास शुभ आहे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

गोधूलिमुहूर्तांची प्रशंसा. (मंदाक्रांता)

नास्यामृक्षं न तिथिकरणं नैव लग्नस्य चिंता ।
नो वा वारो न च लवविधिर्नो मुहूर्तस्य चर्चा ॥
नैवायोगो न मृतिभवनं नैव जामित्रदोषो ।
गोधूलिः सा मुनिभिरुदिता सर्वकार्येषु शस्ता ॥ २०१ ॥

गो म्हणजे गाई आणि धूलि म्हणजे धूळ. वासरें पाजण्याकरितां सायंकाळीं रानांतून गाई चरून उत्कंठेनें परत धांवत येत असतां त्यांच्या पायांनीं धुरळा उडत असतो, ह्मणून अशा समयाला गोधूलि किंवा गोरजमुहूर्त म्हणतात. ह्या मुहूर्ताला नक्षत्र, तिथि, लग्न, वार, नवांश, कुयोग, जामित्रादिदोष इत्यादि दोषांचा विचार करण्याचें मुळींच कारण नाहीं. म्हणून ही गोरज वेळा सर्व कार्यांना शुभ मानलेली आहे. येथें गोधूलिमुहूर्तांची प्रशंसा केली आहे, तथापि अमावास्यादि महादोष असतां किंवा विवाहोक्त नक्षत्रादिकांवांचून गोरजमुहूर्त शुभ आहे असें मात्र समजूं नये.

गोधूलिमुहूर्तांचा अपवाद.

अस्तात्प्राग्वर्जयेन्नित्यं गुरौ यामार्धदोषतः ।
अस्तादूर्ध्वं च कुलिकं शनौ, गोधूलिकं न सत् ॥ २०२ ॥
इंदुं षष्ठाष्टगं जह्यात् सोग्रांगं कुजमष्टमम् ।
लाभे धने च सहजे चंद्रे सौख्यं विवर्धनम् ॥ २०३ ॥

विवाहास गोरज मुहूर्त सर्व प्रकारें शुभ असल्यामुळें इतर कांहींच योग पहाण्याचें कारण नाहीं असें जरी वर लिहिलें आहे, तथापि गुरुवारीं सूर्यास्तापूर्वी असलेला गोरज मुहूर्त घेऊं नये. कारण त्या वारीं त्या वेळीं यामार्धदोष असतो; म्हणून गुरुवारचा गोरज मुहूर्त सूर्यास्तानंतर घ्यावा. तसेंच, शनिवारीं सूर्यास्तानंतर कुलिकयोग असतो, म्हणून त्या दिवशीं अस्तापूर्वींच गोरज मुहूर्त घ्यावा. याचमताप्रमाणें मुहूर्तचिंतामणीमध्येंही शास्त्रार्थ सांगितला आहे. परंतु मुहूर्तमार्तंडकार आपल्या मार्तंडवल्लभा टीकेंत असें म्हणतात कीं—

गुरुदिने सूर्यास्तात्प्राक् यामार्धं, परतो यमघंटः ।
शनिदिनेऽस्तमयात्प्राक् परतश्च कुलिकौ ॥
इति हेतोर्गुरुशनिवारौ निंदितौ ॥

गुरुवारीं सूर्यास्तापूर्वी यामार्धदोष व अस्तानंतर यमघंटदोष असतो. तसेंच, शनिवारीं सूर्यास्तापूर्वी आणि नंतर कुलिकयोग असतो म्हणून गुरुवारीं व शनिवारीं असलेले गोरजांश निंद्य होत, ते वर्ज्य करावे. ब्राह्मणादिक उच्च वर्गांना देखील गोरजमुहूर्त संकटकाळीं घेण्यास प्रत्यवाय नाहीं, असें सांगितलें आहे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

गोरजमुहूर्त असला तरी लग्नीं सहावा किंवा आठवा चंद्र नसावा. किंवा लग्नीं क्रूरग्रह किंवा अष्टमांत मंगळ नसावा. १।२।३ या स्थानीं विवाहलग्नीं चंद्र असतां वधूला व वराला सौख्यप्राप्ति होते.

वधूवरांचे राशीपासून आठवें लग्न.

वरवध्वोर्वटोश्चापि जन्मराशेश्च लग्नतः ।
त्याज्यमष्टमलग्नं स्याद्विवाहव्रतबंधयोः ॥ २०४ ॥

ज्या लग्नीं विवाह अथवा उपनयन करावयाचें असेल तें लग्न वर, वधू व बटु यांच्या जन्मराशीपासून किंवा जन्मलग्नापासून आठवें नसावें; कारण तें शुभकार्यांस वर्ज्य आहे. उदाहरणार्थ, मेषराशि किंवा मेष जन्मलग्न असेल तर त्यापासून वृश्चिकलग्न आठवें म्हणून विवाहास किंवा मौंजीस तें घेऊं नये.

सर्व शुभकृत्यांस त्याज्य काळ.

यामार्धं कुलिकं दिनर्द्धिमवमं पूर्वं दलं पारिघं ।
विष्टिं वैधृतिपातसंक्रमगणं गंडांतमेकार्गलम् ॥
कृष्णानंगचतुर्दिनं रविशशिक्रांत्योः समत्वं खलां ।
होरां रात्रिदिनार्धके क्षयदिनं पित्रोर्जनन्यार्तवम् ॥ २०५ ॥
मासाद्यं जनिसंभवं ग्रहणभं चंडायुधं दुःक्षणं ।
ज्येष्ठं पूर्वभवस्य पापयुगितैष्यर्क्षाणि विद्धं च भम् ॥
ऊनाख्याधिकमासकौ युतिषु विंव्याशूवगंडातिषु ।
व्यंकार्थांकरसर्तुपूर्वघटिका भानां विषाख्याघटीः ॥ २०६ ॥
लत्तापंचकपापवर्गमशुभं चंद्रं दशारिष्टकं ।
जन्मेशेज्यसितास्तमंगशशिनोः क्रूरोद्भवां कर्तरीम् ॥
रिष्टं गोचरसंभवं ग्रहजनिप्रांतोद्भवं सूतकं ।
दुश्चिह्वानि मनोविभंगमपि च व्याधिं शुभे संत्यजेत् ॥ २०७ ॥

यामार्ध, कुलिक, तिथींची क्षयवृद्धि, परिघयोगाचा पूर्वार्ध, भद्रा, वैधृति, व्यतीपात, संक्रांतीचा दिवस, तीन प्रकारचें गंडांत, एकार्गल, कृष्णत्रयोदशीपासून शुक्लप्रतिपदेपर्यंत चार दिवस चंद्र व सूर्य यांच्या क्रांतींचें साम्य, पापग्रहांचे होरे,

---

१ वि० म्हणजे विष्कंभ, व्या० म्हणजे व्याघात, व शू० म्हणजे शूल इ०. २ या प्रकरणांत मागें सांगितलें आहे. ३ पहिल्या प्रकरणांत पहा. ४ विवाहास वर्ज्य २१ महादोष सांगितले आहेत त्यांत पहा.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मध्यरात्र व मध्यान्हसमयाच्या पूर्वीचीं दहा व नंतरचीं दहा मिळून वीस पळें, मातापितरांचे श्राद्धदिवस, संस्कारसमयीं मातेच्या अस्पृश्यत्वाचे दिवस, जन्ममास, जन्मतिथी, जन्मनक्षत्र, पूर्वी षण्मासांत ग्रहण झालें असेल तर ग्रहणदिवशींचें नक्षत्र, चंडायुध, दुर्मुहूर्त, प्रथम अपत्याला ज्येष्ठमास, पापग्रहयुक्त नक्षत्र व त्याच-प्रमाणें त्याच्या मागील व पुढील एक एक नक्षत्र, मिळून एकंदर तीन नक्षत्रें, पाप-ग्रहानें विद्धनक्षत्र, अधिकमास, व क्षयमास, विष्कंभाच्या ३, व्याघाताच्या ९, शूलाच्या ५, वज्राच्या ९, गंडाच्या ६, आणि अतिगंडाच्या ६, याप्रमाणें प्रत्येक योगाच्या आरंभींच्या घटिका, अश्विन्यादि नक्षत्राच्या विषघटी, लत्ता, पंचक, पाप-वर्ग, अशुभ चंद्र, जन्मराशीच्या स्वामीचा व गुरु-शुक्र यांचा अस्त, लग्नापासून किंवा चंद्रापासून द्वितीय अथवा द्वादशस्थानीं क्रूर ग्रह असणें, (ह्याला कर्तरी-दोष म्हणतात.) जन्मराशीला दुष्ट ग्रहांची संख्या अधिक असणें, ग्रहणवेध, सुवेर, सुतक, कार्यारंभसमयीं अपशकुनादि दुश्चिन्हें, मनाला उल्हास नसणें, अंगांत ज्वरादि विकार असणें ह्या सर्व गोष्टी कोणत्याही शुभकृत्याला वर्ज्य कराव्या.

वधूप्रवेशास (वरातीस) मुहूर्त.

विवाहमारभ्यं वधूप्रवेशो युग्मे तिथौ षोडशवासरान्तात्।
ऊर्ध्वं ततोऽब्दे युजि पंचमान्तादतःपरस्तान्नियमश्च नास्ति ॥२०८॥
हस्तद्वयब्रह्मयुगे मघायां पुष्ये धनिष्ठाश्रवणोत्तरेषु ।
मूलानुराधाह्यरेवतीषु स्थिरेषु लग्नेषु वधूप्रवेशः ॥ २०९ ॥

सांप्रत विवाहाच्या रात्रींच बहुतेक ठिकाणीं वधूप्रवेश करितात, म्हणून त्यास निराळा मुहूर्त पाहण्याचें कारण नाहीं. तथापि उत्तररात्रीं वधूप्रवेश करावा व त्या समयीं निष्पंचक असून स्थिर म्हणजे वृषभ, सिंह, वृश्चिक व कुंभ यांपैकींच एकादें लग्न असावें. पंचकासंबंधीं माहिती याच प्रकरणांत १२० पृष्ठामध्यें पूर्वीं सांगितली आहे, त्यांत निष्पंचक म्हणजे काय हें सांगितलें आहे. कित्येक ठिकाणीं विवाहापासून चवथ्या रात्रीं वरात नेण्याचा प्रचार आहे. त्यासही उत्तररात्र स्थिरलग्न व निष्पंचक असावें, व त्या समयीं वैधृतिव्यतीपातादि कुयोग नसावे. अडचणीमुळें विवाहाच्या रात्रीं वधूप्रवेश झाला नाहीं तर विवाहापासून सोळा दिवसपर्यंत सम म्हणजे २।४।६।८ इत्यादि दिवशीं किंवा विषम दिवसांपैकीं फक्त ५।७।९ ह्या दिवशीं रात्रीं सुमुहूर्तीं वरात न्यावी. वधूप्रवेशास हस्त, चित्रा, रोहिणी, मृग, मघा, पुष्य, धनिष्ठा, श्रवण, तिन्ही उत्तरा, मूळ, अनुराधा, अश्विनी आणि रेवती हीं नक्षत्रें उक्त आहेत. सोळा दिवसांनंतर वधूप्रवेश करणें असल्यास विषमदिवशीं व विषममासीं वरील नक्षत्रांवर तो करावा; परंतु रिक्तातिथि, रवि व मंगळवार व इतर कुयोग वर्ज्य करून अन्य दिवशीं करावा.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

प्रथमवर्षीं वधूनें पतिगृहीं राहण्याचे मास.

उद्वाहात्प्रथमे शुचौ यदि वसेद्भर्तुर्गृहे कन्यका ।
हन्यात्तज्जननीं क्षये निजतनुं ज्येष्ठे पतिज्येष्ठकं ॥
पौषे च श्वशुरं पतिं च मलिने चैत्रे स्वपित्रालये ।
तिष्ठंती पितरं निहंत्ति न भयं तेषामभावे भवेत् ॥ २१० ॥

विवाहानंतर कन्येनें पहिल्या वर्षीं कांहीं महिन्यांत सासरीं व कांहीं महिन्यांत माहेरीं राहूं नये असा शास्त्रकारांनीं निर्बंध ठरविला आहे, तो असाः—आषाढमहिन्यांत कन्या सासरीं राहील तर तें तिच्या सासूला अनिष्ट, ज्येष्ठमासांत राहिली तर तें वडील दिराला अनिष्ट, पौषांत राहील तर सासऱ्याला अनिष्ट आणि अधिकमासांत राहील तर पतीला अनिष्ट जाणावें. तसेंच विवाहानंतर प्रथमवर्षीं चैत्रमासांत कन्येनें पितृगृहींही राहूं नये. सासू, सासरा वगैरे नसतील तर मात्र त्या त्या महिन्यांत सासरीं किंवा माहेरीं राहिलें असतां दोष नाहीं.

द्विरागमनास मुहूर्त. (पंचचामर)

चरेदथौजहायने घटालिमेषगे रवौ ।
रवीज्यशुद्धियोगतः शुभग्रहस्य वासरे ॥
नृयुग्ममीनकन्यकातुलावृषे विलग्नके ।
द्विरागमं लघुध्रुवे चरेऽस्रपे मृदूडुभिः ॥ २११ ॥

विवाह झाल्यानंतर एक वेळ सासरीं राहून कन्या माहेरीं आल्यावर दुसऱ्या खेपेस तिनें सासरीं जाणें ह्याला द्विरागमन म्हणतात. तें मुहूर्तावांचून करूं नये असें सांगितलें आहे, म्हणून खालीं लिहिलेल्या मुहूर्तांवर द्विरागमन करावें. विषम म्हणजे प्रथम वर्षीं किंवा तिसऱ्या वर्षीं; कुंभ, वृश्चिक किंवा मेष ह्या राशींना सूर्य असतां; वराला रवि आणि गुरु शुभस्थानीं असतां; शुभ वारीं; मिथुन, मीन, कन्या आणि तूळ ह्या लग्नीं; व अश्विनी, हस्त, पुष्य, रोहिणी, तिन्ही उत्तरा, श्रवण, धनिष्ठा, शततारका, पुनर्वसु, स्वाती, मूळ, अनुराधा, रेवती, मृग आणि चित्रा ह्या नक्षत्रीं; वधूचें द्विरागमन शुभ मानिलेलें आहे. वर लिहिलेले मुहूर्तांचे सर्वच योग इष्टकाळीं साध्य नसतील तर निदान शुभवारीं, शुभनक्षत्रावर, शुभलग्नीं द्विरागमन करावें. विवाहापासून १६ दिवसांच्या आंत समदिवशीं द्विरागमन केलें असतां शुभ जाणावें. १६ दिवसांनंतर मात्र विषमदिवशीं किंवा विषममासीं करावें. बुधवारीं द्विरागमन करूं नये, असें कित्येक ग्रंथकार म्हणतात.

सन्मुख शुक्राचा विचार.

संमुखे दक्षिणे शुक्रे नो गच्छेत्तु कदाचन ।
गर्भिणी तु विगर्भा स्यान्नवोढा वंध्यतामियात् ॥ २१२ ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पित्रागारे यदि स्त्रीणां स्तनपुष्पोद्गमो भवेत् ।
गमनं प्रतिशुक्रेऽपि प्रशस्तं पतिवेश्मनि ॥ २१३ ॥
काश्यपेषु वसिष्ठेषु भृग्वत्र्यांगिरसेषु च ।
भारद्वाजेषु वात्स्येषु प्रतिशुक्रो न विद्यते ॥ २१४ ॥
पौष्णादि वह्निभार्धांघ्रौ यावत्तिष्ठति चंद्रमाः ।
तावदंधो भवेच्छुक्रः प्रवेशे निर्गमे शुभे ॥ २१५ ॥

सन्मुख किंवा उजवीकडे शुक्र असतां गर्भिणी किंवा नवीन विवाहित वधू ह्यांनीं गमन करूं नये असें सांगितलेलें आहे. कारण, त्यामुळें गर्भिणीला गर्भस्त्रावाचें व नववधूला वंध्यत्व येण्याचें भय असतें. पूर्वेकडे किंवा पश्चिमेकडे मात्र, (उदित असतां) शुक्र आकाशांत दिसत असतो. जेव्हां पूर्वेकडे तो दिसत असेल तेव्हां पूर्वेकडे गेलें असतां तो जाणाराला सन्मुख होतो व उत्तरेकडे गेलें असतां उजवा होतो; व जेव्हां पश्चिमेकडे दिसत असेल तेव्हां पश्चिमेकडे जाणाराला सन्मुख व दक्षिणेस जाणाराला उजवा होतो. अशा समयीं उलट दिशेनें गेलें असतां मात्र दोष नाहीं. याविषयीं आणखी अपवाद आहे तो असा कीं, ऋतुमती कन्या असतां तिला पतिगृहीं जाण्यास अथवा कोणालाही स्वगृहीं प्रवेश करण्यास, किंवा भृगु, अंगिरा, वत्स, वसिष्ठ, कश्यप, अत्रि आणि भारद्वाज या गोत्रांतील मनुष्यास सन्मुख शुक्राचा कधींही दोष नाहीं. तसेंच, रेवतीपासून कृत्तिका नक्षत्राच्या प्रथम चरणांत चंद्र असेपर्यंत शुक्राचा दोष मानूं नये.

कन्येच्या घरीं भोजनाचा निषेध.

अप्रजायां तु कन्यायां न भुंजीत कदाचन ।
दौहित्रस्य मुखं दृष्ट्वा किमर्थमनु शोचति ॥ २१६ ॥

विवाह झाल्यानंतर कन्येच्या घरीं, तिला अपत्य होईपर्यंत, आईबापांनीं भोजन करूं नये, असें सांगितलें आहे व प्रायः लोकव्यवहारही सांप्रत तसाच आहे.

प्रथम रजोदर्शनसमयीं अशुभ.

आद्यर्तौ पौषशुक्रोर्जमधुशुचिनभस्याः कुयुक्पापवारा ।
रिक्तामार्काष्टषष्ठ्यः परगृहकुपदे रात्रिसंध्यापराह्णः ॥
मिश्रोग्रामूलतीक्ष्णं विवरमनरुणाल्पाधिकास्रंगराष्ट्रो-
त्पातः पापस्य लग्नं न सदरुणजरन्नीलचित्रांबरं च ॥ २१७ ॥

आद्यर्तौ म्हणजे पहिल्या रजोदर्शनाच्या वेळीं पुढें लिहिलेले सर्व योग अशुभ समजावे. जसें—पौष, शुक्र म्हणजे ज्येष्ठ, ऊर्ज म्हणजे कार्तिक, मधु म्हणजे चैत्र, शुचि म्हणजे आषाढ आणि नभ म्हणजे भाद्रपद हे सहा महिने; कुयुक् म्हणजे विष्कंभ, शूल, गंड, अतिगंड, व्याघात, वज्र, व्यतीपात, परिघ आणि वैधृति हे नऊ

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

दुष्ट योग; पापवाराः म्हणजे रवि, मंगळ, शनि हे वार (१ रोगी, २ पतिव्रता, ३ दुःखी, ४ पुत्रिणी, ५ भोगभागिनी । ६ अतिप्रिया, ७ क्लेशभागी, सूर्यवारादिषु क्रमात् ॥ अशीं रविवारादि सात वारांचीं अनुक्रमें सात फळें आहेत); रिक्तामार्काष्टषष्ठ्यः रिक्ता म्हणजे चतुर्थी, नवमी, चतुर्दशी; अमावास्या, द्वादशी, अष्टमी आणि षष्ठी ह्या तिथि; दुसऱ्याच्या घरीं आणि कुपदे म्हणजे वाईट जागेंत; रात्रीं; दिवस आणि रात्र यांच्या संधिसमयीं; तसेंच, अपराह्णकाळीं म्हणजे दुपारीं १ पासून तीन वाजेपर्यंत; मिश्र, उग्र तीक्ष्ण इत्यादि नक्षत्रीं म्हणजे कृत्तिका, विशाखा, तिन्ही पूर्वा, भरणी, मघा, आश्लेषा, ज्येष्ठा, आर्द्रा, अशा दहा नक्षत्रांवर; विवर म्ह० तिथि किंवा नक्षत्र यांचा संधि; अनरुण म्हणजे आरक्त रंगाहून भिन्न रजोरंग; तसेंच, विशेष अल्प किंवा विशेष अधिक रज; गांवामध्यें कांहीं अद्भुत घडणें; उत्पात; ज्यांचे स्वामी पापग्रह आहेत अशीं लग्नें; म्ह० मेष, सिंह, वृश्चिक, मकर, आणि कुंभ; तसेंच, अरुण म्हणजे तांबडें, जरत् म्हणजे फाटकें, नील म्हणजे निळें आणि चित्र म्हणजे अनेक रंगांचें, अशीं वस्त्रें अंगावर असणें हातांत केरसुणी, सूप, अग्नि, तृण, काष्ठ असणें; इत्यादि सर्व योग प्रथमरजोदर्शनसमयीं अशुभ होत. प्रथमरजोदर्शन खेरीज करून रजस्वलेनें तांबूलभक्षण, तैलाभ्यंग, डोळ्यांत काजळ घालणें इत्यादि वर्ज्य करावीं.

रजोदर्शनाची शुद्धि.

रजस्युपरते साध्वी स्नानेन स्त्री रजस्वला ।
शुद्धा, भर्तुश्चतुर्थेऽहि केवला, नान्यकर्मणि ।
दैवे कर्मणि पित्र्ये च पंचमेऽहनि शुध्यति ॥ २१८ ॥

रजोदर्शनानंतर चवथ्या दिवशीं स्नानानें स्त्री शुद्ध होते. परंतु देवांसंबंधीं व पितरांसंबंधीं कार्यें करण्यास ती चवथ्या दिवशीं शुद्ध नसून पांचव्या दिवशींच्या स्नानानेंच शुद्ध होते. चवथ्या दिवशीं स्नान केल्यानंतर ती केवळ पतिसेवेपुरतीच शुद्ध होते. अर्थात् स्वयंपाकादि दुसऱ्या सोंवळ्यांतील गृहकार्याला तिनें स्पर्श करूं नये असें समजावें.

गर्भाधानास मुहूर्त.

गंडांतं त्रिविधं त्यजेन्निधनजन्मर्क्षे च मूलांतकं ।
दास्रं पौष्णमघोपरागदिवसान्पातं तथा वैधृतिम् ॥
पित्रोः श्राद्धदिनं दिवा च परिघाद्यर्धं स्वपत्नीगमे ।
भान्युत्पातहतानि मृत्युभवनं जन्मर्क्षतः पापभम् ॥ २१९ ॥
भद्राषष्ठीपर्वरिक्ताश्च संध्या भौमार्कार्की नाद्यरात्रीश्चतस्रः ।
गर्भाधानं त्र्युत्तरेंद्वर्कमैत्रब्राह्मस्वातीविष्णुवस्वंबुपे सत् ॥ २२० ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

षोडशर्तुनिशाः स्त्रीणां तस्मिन्युग्मासु संविशेत् ।
ब्रह्मचर्यैव पर्वाण्याद्याश्चतस्रस्तु वर्जयेत् ॥ २२१ ॥
युग्मासु पुत्रा जायंते स्त्रियोऽयुग्मासु रात्रिषु ।
तस्माद्युग्मासु पुत्रार्थी संविशेदार्तवे स्त्रियम् ॥ २२२ ॥

पुढें लिहिलेले सर्व दिवस वर्ज्य करून गर्भाधानसंस्कार करावा. जसें, तीन प्रकारचें गंडांत, (प्रकरण पहिलें पान ४६ पहा) निधनर्क्ष म्हणजे जन्मनक्षत्रापासून सप्तमनक्षत्र, जन्मनक्षत्र, मूळ, भरणी, अश्विनी, रेवती आणि मघा हीं नक्षत्रें, ग्रहणदिवस, व्यतीपात, वैधृति, मातापितरांचे श्राद्धदिवस, परिघयोगाचा पूर्वार्ध, पूर्वी षण्मासांत उत्पात झाला असतां तीं नक्षत्रें, जन्मलग्नापासून व जन्मराशीपासून अष्टमलग्न, पापग्रहानें युक्त नक्षत्रें; तसेंच, कल्याणी ज्या तिथींना असते अशा तिथी, षष्ठी, पर्वतिथी म्हणजे चतुर्दशी, अष्टमी, अमावास्या, पूर्णिमा; संक्रांति; रिक्ता म्ह० ४।९।१४ ह्या तिथी; मंगळ, रवि, शनि हे वार; रजोदर्शनापासून पहिल्या चार रात्री; हे सर्व दिवस पत्नीगमनास म्हणजे गर्भाधानास वर्ज्य करावे. तिन्ही उत्तरा, मृगशीर्ष, हस्त, अनुराधा, रोहिणी, स्वाती, श्रवण, धनिष्ठा, शततारका हीं नक्षत्रें गर्भाधानास उत्तम होत. चित्रा, पुनर्वसु, पुष्य, अश्विनी हीं नक्षत्रें देखील सामान्यतः शुभ आहेत. गर्भाधानदिवशीं उभयतांना चंद्रबल असावें. ऋतुदर्शनापासून १६ रात्रींचे आंत गर्भाधान करावें. त्यांत कित्येकांच्या मतें ११ व १३ ह्या रात्री निंद्य आहेत. शुभकालीं प्रथम ऋतुदर्शन होणें हें कोणाच्याही स्वाधीन नाहीं. म्हणून एकादा अशुभ योग असतां तद्दोषपरिहारार्थ गर्भाधानसंस्कारसमयीं प्रथम भुवनेश्वरीनामक शांति करण्याचा सर्वत्र प्रचार आहे. ज्या दिवशीं ती शांति करावयाची असेल त्या दिवशीं अग्नि व आहुती असावी. अग्निआहुतीची माहिती पुढें मुहूर्तप्रकरणांत सांगितली आहे.

सामान्यतः रजोदर्शनानंतर स्त्रीच्या ठिकाणीं सोळा रात्रीपर्यंत गर्भसंभवाचा काल असतो. त्यांत पहिल्या चार रात्री निंद्य समजाव्या. त्यापुढील सम दिवशीं (६।८।१०।१२।१४।१६) संयोग झाला असतां पुत्रोत्पत्ति आणि विषमरात्रीं कन्याजन्म संभवतो. 'समेच कन्या विषमेच पुत्रः' असेंही कित्येकांचें मत आहे.

पुंसवन आणि सीमंतोन्नयन.

द्वितीये वा तृतीये वा मासि पुंसवनं स्मृतम् ।
मासे षष्ठेऽष्टमे वाद्यं गर्भे सीमंतकं विदुः ॥ २२३ ॥
पुनर्वसुद्वये मूलश्रवणे मृगहस्तयोः ।
रेवतीरोहिणी राधात्र्युत्तरा चाश्विनी तथा ।
गुरुभौमार्कवारेषु प्रोक्तं पुंसवनादिकम् ॥ २२४ ॥

प्रथमसमयीं स्त्री गर्भवती असतां दुसऱ्या किंवा तिसऱ्या महिन्यांत पुंसवन

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आणि सहाव्या किंवा आठव्या महिन्यांत सीमंतोन्नयन हे संस्कार करावे असें सांगितलेलें आहे. हे संस्कार प्रतिगर्भसमयीं करावे, असें कित्येक ग्रंथकार म्हणतात. पुनर्वसु, पुष्य, मूळ, श्रवण, मृग, हस्त, रेवती, रोहिणी, अनुराधा, तिन्ही उत्तरा, अश्विनी ह्या नक्षत्रांवर व गुरु, भौम आणि रवि ह्या वारीं हे संस्कार करावे. अष्टमी, द्वादशी, षष्ठी, चतुर्थी, चतुर्दशी ह्या तिथि सोडून इतर तिथींवर संस्कार करावा.

जन्मकाळीं अशुभयोग.

गंडांतः परिघः शूलं व्यतीपातोऽथ वैधृतिः ।
मूलाश्लेषा तथा ज्येष्ठा यमघंटोर्कसंक्रमः ॥ २२५ ॥
वज्रगंडौ मृतिर्भद्रा व्याघातो दग्धवासरः ।
अमा चतुर्दशी कृष्णा तातसोदरजन्मभे ॥ २२६ ॥
अवमं ग्रहणं निंद्यं जन्मकाले शिशोस्त्रिकम् ।
तद्दोषपरिहाराय शांतिं कुर्याद्यथाविधि ॥ २२७ ॥

तीन प्रकारचें गंडांत; परिघ, शूल, व्यतीपात, वैधृति हे योग; मूळ, आश्लेषा आणि ज्येष्ठा हीं नक्षत्रें; यमघंटयोग, सूर्यसंक्रमणाची वेळ, वज्रयोग, गंडयोग, अतिगंडयोग, मृत्युयोग, कल्याणी, व्याघातयोग, दग्धयोग, अमावास्या, कृष्णचतुर्दशी, पिता भ्राता यांचें जन्मनक्षत्र, क्षयतिथि व ग्रहण हे सर्व योग जन्मकाळीं अशुभ मानिलेले आहेत. तसेंच, तीन पुत्रांनंतर कन्येचें जनन किंवा तीन कन्यांच्या पाठीवर चवथा पुत्र होणें हेंही अशुभ होय. तथापि शांतीनें ह्या सर्वांचा संपूर्ण दोष परिहार होतो असेंही सांगितलें आहे.

जातकर्म व नामकरण.

जातमात्रकुमारस्य जातकर्म विधीयते ।
स्तनप्राशनतः पूर्वं नाभिकर्तनतोपि वा ॥ २२८ ॥
द्वादशैकादशे वापि जन्मतोऽपि त्रयोदशे ।
पुनर्वसुद्वये हस्तत्रये मैत्रद्वये मृगे ॥ २२९ ॥
मूलोत्तराधनिष्ठासु शिशोर्नाम कृतं शुभम् ।
स्थिरे लग्ने शुभे वारे कालातिक्रमणे विदुः ॥ २३० ॥

पुत्रजन्म झाल्याबरोबर नालछेदनापूर्वीं जातकर्मसंस्कार करावा. नामकरण अकराव्या, बाराव्या किंवा तेराव्या दिवशीं करावें. ह्या दिवशीं नक्षत्र वगैरे पाहण्याची गरज नाहीं. तथापि अमावास्या, ग्रहण, वैधृति, व्यतीपात वगैरे कुयोग नसावे. कारणपरत्वें १२।१३ या दिवशीं तें न घडेल तर पुनर्वसु, पुष्य, हस्त, चित्रा, स्वाती, अनुराधा, ज्येष्ठा, मृग, मूळ, तिन्ही उत्तरा, धनिष्ठा, या नक्षत्रीं व शनि–मंगळ खेरीज करून इतर वारीं, स्थिरलग्नावर बालकाचें नांव ठेवावें.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

बालकाचें नांव ठेवणें.

ज्या नक्षत्रावर बालकाचा जन्म झाला असेल, त्या नक्षत्राच्या आरंभापासून समाप्तीपर्यंत घटिका मोजून त्यांचे चार भाग करावे. प्रत्येक भागाला चरण अशी संज्ञा आहे. ज्या चरणावर जन्म झाला असेल त्या जन्मनक्षत्राच्या चरणाचें जें अक्षर असेल (मागें पृष्ठ १०८ मध्यें नक्षत्राचें अवकहडाचक्र दिलें आहे तें पहा.) तें नांवाचें आद्याक्षर असावें. उदाहरणार्थ, शततारका नक्षत्र एकंदर ६४ घटिका आहे व त्या नक्षत्राच्या ५ घटिका गेल्यानंतर म्हणजे पहिल्या चरणावर बालकाचा जन्म झाला आहे असें समजा. शततारका नक्षत्राच्या प्रथम चरणाचें अक्षर "गो" असें आहे म्हणून मुलगा असल्यास "गोपाळ" व मुलगी असल्यास "गोदावरी" वगैरे नांवें ठेवावीं. जन्मकाळीं ज्या राशीला चंद्र असतो तीच त्या मनुष्याची रास जाणावी.

जन्मनक्षत्र कोठें पडलें तें पहाणें.

शीर्षे त्रीणि मुखे त्रयं च रविभादेकैकभं स्कंधयो-
रेकैकं भुजयोस्तथा करतले धिष्ण्यानि पंचोदरे ॥
नाभौ गुह्यतले च जानुयुगले चेकैकमृक्षं क्षिपे-
ज्जंतोः केचिदिति ब्रुवंति गणकाः शेषाणि पादद्वये ॥ २३१ ॥
त्रिभं मूर्ध्नि मुखे सप्त स्तनयोरष्टमं हृदि ।
त्रिभं नाभौ त्रिभं नारीचक्रे गुह्ये त्रिभं न्यसेत् ॥ २३२ ॥

सूर्यनक्षत्रापासून जन्मनक्षत्रापर्यंत (जन्मनक्षत्रसुद्धां) नक्षत्रें मोजून पुढें लिहिल्याप्रमाणें त्यांचीं स्थानें जाणावीं. पहिलीं ३ नक्षत्रें मस्तकावर, दुसरीं ३ मुखावर, प्रत्येक खांद्यावर १।१, बाहूंवर १।१, तळहातांवर १।१, हृदयावर ५, नाभीवर १, गुह्यावर १, प्रत्येक जानूवर १।१ व प्रत्येक पावलावर ३।३ याप्रमाणें २७ नक्षत्रांची व्यवस्था जाणावी. उदाहरणार्थ, सूर्यनक्षत्रापासून जन्मनक्षत्रापर्यंत ७ नक्षत्रें झालीं, अशी कल्पना करा. यांतून ३ मस्तकावर, ३ मुखावर, अशीं ६ नक्षत्रें गेलीं. सातवें नक्षत्र स्कंधावर आलें म्हणून जन्मनक्षत्र स्कंधावर पडलें असें जाणावें. स्त्रियांची नक्षत्रविभागणी निराळी आहे, ती अशी. ३ मस्तकावर, ७ मुखावर, ८ स्तनांवर, ३ हृदयावर, ३ नाभीवर व ३ गुह्यावर. जन्मनक्षत्र तळहस्तावर, गुह्यावर व पावलांवर पडलें असतां अशुभ व अन्यस्थानीं पडलें असतां शुभ मानिलेलें आहे.

पाळण्यांत घालण्यास दिवस.

आंदोलाशयने पुंसो द्वादशो दिवसः शुभः ।
त्रयोदशस्तु कन्याया न नक्षत्रविचारणा ॥ २३३ ॥
षोडशे दिवसे वापि द्वात्रिंशे दिवसेपि वा ।
मैत्रक्षिप्रस्थिरर्क्षेषु कुर्यादान्दोलनं शिशोः ॥ २३४ ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

रविभात्पंचमे सौख्यं ततः पंचदशस्वपि ।
अशुभं च ततः शेषे शुभं दोलाधिरोहणम् ॥ २३५ ॥

पाळण्यांत घालण्यास मुलाला बारावा दिवस व मुलीला तेरावा दिवस प्रशस्त मानिला आहे. ह्या दिवशीं अडचण असेल तर किंवा अमावास्यादि विशेष कुयोग असतील तर सोळावा, अठरावा, बाविसावा किंवा बत्तिसावा हे दिवस व मृग, चित्रा, अनुराधा, रेवती, पुनर्वसु, पुष्य, अश्विनी, हस्त, रोहिणी आणि तिन्ही उत्तरा हीं नक्षत्रें सांगितलेलीं आहेत. तसेंच, सूर्यनक्षत्रापासून पहिलीं पांच आणि शेवटचीं सात नक्षत्रें शुभ होत व बाकी राहिलेलीं १५ नक्षत्रें दोलारोहणास वर्ज्य करावीं असें कित्येक ग्रंथकार म्हणतात. पूर्वेकडे मस्तक करून शिशूस प्रथम पाळण्यांत घालावें.

दुग्धपान, भूम्युपवेशन व जलपूजा.

एकत्रिंशद्दिने चैव पयः शंखेन पाययेत् ।
अन्नप्राशननक्षत्रे दिवसोदयरात्रिषु ॥ २३६ ॥
शुभाहे पंचमे मासि भौमोऽप्यत्र विशेषतः ।
दोलारोहणनक्षत्रे बालकं चोपवेशयेत् ॥ २३७ ॥
पुनर्वसुद्वये हस्ते मृगे मूलानुराधयोः ।
श्रवे गुरौ बुधे चंद्रे सतिथौ जलपूजनम् ॥ २३८ ॥
गुरौ शुक्रेऽस्तगे चैत्रे पौषे वा मलमासके ।
मासपूर्तौ विरुद्धाहे न कुर्याच्च जलार्चनम् ॥ २३९ ॥

अन्नप्राशनाला जीं नक्षत्रें पुढें सांगितलीं आहेत त्या नक्षत्रांवर, जन्मापासून एकतिसाव्या दिवशीं शंखामध्यें दूध घालून तें बालकाला प्रथम पाजावें. या मुहूर्ताचा अर्थात् स्तनपानाशीं संबंध नाहीं. तसेंच शिशूला पाळण्यांत घालण्यास जीं नक्षत्रें वर सांगितलीं आहेत त्या नक्षत्रांवर, शुभदिवशीं, विशेषतः मंगळवारीं, पांचव्या महिन्यांत कटिसूत्र बांधून, पृथ्वीची व वराहाची पूजा करून बालकाला प्रथम भूमीवर बसवावें. प्रसूत झालेल्या स्त्रीनें जलपूजा करण्याचा कित्येक ठिकाणीं प्रचार आहे. ही जलपूजा प्रसूतीला एक महिना झाल्यानंतर चैत्र, पौष व मलमास वर्ज्य करून कोणत्याही महिन्यांत, गुरु, बुध, किंवा सोमवारीं गुरु-शुक्रास्त नसेल तेव्हां रिक्तातिथि वर्ज्य करून इतर तिथींना पुनर्वसु, पुष्य, हस्त, मृग, मूल, अनुराधा, श्रवण ह्या सात नक्षत्रांवर, शुभ आहे असें जाणावें.

कान व नाक टोंचणें.

शुभे वारेहि जन्माहाद्वादशे षोडशे दिने ।
कर्णवेधोऽथवा मासे षष्ठे सप्ताष्टमेपि वा ॥ २४० ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

रेवतीद्वितये पुष्ये पुनर्वस्वनुराधयोः ।
श्रवणद्वितये चित्रामृगे हस्ते शुभे तिथौ ॥ २४१ ॥
युग्माब्दं जन्ममासं च पौषं चैत्रं हरेः शयम् ।
जन्मतारां विहायाथ त्र्युत्तरेपि च केचन ॥ २४२ ॥

जन्मदिवसापासून १२ व १६ ह्या दिवशीं किंवा ६।७।८ ह्या महिन्यांत, बुध, गुरु, शुक्र व सोम या वारीं, रेवती, अश्विनी, पुनर्वसु, अनुराधा, श्रवण, धनिष्ठा, चित्रा, मृग आणि हस्त या नक्षत्रीं बालकाचे कान टोंचावे. हेच दिवस कन्येचें नाक टोंचण्यास विषम वर्षीं म्हणजे ३।५।७ या वर्षीं शुभ होत. समवर्ष, जन्ममास, पौष, चैत्र, क्षयतिथि, चातुर्मास्य, जन्मनक्षत्र हीं कान व नाक टोंचण्यास वर्ज्य करावीं. कित्येकांच्या मतें तिन्ही उत्तरा या कार्यास वर्ज्य कराव्या.

अन्नप्राशन.

रेवतीद्वितये पुष्ये पुनर्वस्वनुराधयोः ।
श्रवणादित्रये हस्तत्रितये रोहिणीमृगे ॥ २४३ ॥
उत्तरायां शुभे लग्ने मीनमेषालिभिन्नगे ।
षष्ठान्मासि समे पुंसः पंचमाद्विषमे स्त्रियः ॥ २४४ ॥
त्यक्त्वा रिक्तां क्षयं नंदां द्वादशीमष्टमीममाम् ।
शनिभौमार्कवारांश्च, प्रथमान्नाशनं शुभम् ॥ २४५ ॥

रेवती, अश्विनी, पुष्य, पुनर्वसु, अनुराधा, श्रवण, धनिष्ठा, शततारका, हस्त, चित्रा, स्वाती, रोहिणी, मृग, आणि तिन्ही उत्तरा या नक्षत्रांवर, मीन, मेष आणि वृश्चिक हीं लग्नें वर्ज्य करून मुलाला सहाव्या महिन्यापासून सम म्हणजे ६।८।१०।१२ ह्या महिन्यांत व कन्येला पांचव्या महिन्यापासून विषम म्हणजे ५।७।९।११ ह्या महिन्यांत अन्नप्राशन म्हणजे उष्टावण करावी. क्षयतिथि, रिक्तातिथि, म्हणजे ४।९।१४, नंदातिथि म्हणजे १।६।११ अष्टमी, अमावास्या, द्वादशी ह्या तिथि वर्ज्य करून व रवि, मंगळ व शनिवार खेरीजकरून इतर दिवशीं अन्नप्राशनाचा संस्कार करावा.

अब्दपूर्ति. (वाढदिवस.)

सर्वैश्च जन्मदिवसे स्नातैर्मङ्गलवारिभिः ।
प्रतिसंवत्सरं यत्नात्कर्तव्यश्च महोत्सवः ॥ २४६ ॥

ज्या दिवशीं जन्म झाला असेल तो दिवस पुनः दुसऱ्या वर्षीं आला म्हणजे त्याला वाढदिवस म्हणतात. दर वर्षास जन्मतिथीचे दिवशीं वाढदिवस करावा. वर्षपर्यंत प्रतिमासीं करावा. जन्मतिथीचा दोन दिवस योग असतां जन्मनक्षत्रयुक्त जी तिथि असेल ती घ्यावी. जन्मनक्षत्राचाही दोन दिवस योग असेल तर जी तिथि सूर्योदयाला असून सहा घटिकांहून अधिक असेल ती घ्यावी. असा योग नसेल तर प्रथम

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

दिवसाची तिथि घ्यावी. व्यवहारांत सामान्य लोक फक्त लहान मुलांचाच वाढदिवस करितात. फार श्रीमंत लोक मोठ्याचाही वाढदिवस करितात. वाढदिवसाचे दिवशीं अंगाला सुवासिक तेल वगैरे लावून उष्णोदकानें मंगलस्नान करावें. धर्मसिंधूमध्यें याविषयीं असें सांगितलें आहे कीं, वाढदिवसाचे दिवशीं स्नान झाल्यानंतर एका लहानशा तंदुलराशीवर सुपारी ठेवून ती मार्कंडेयरूपी देवता आहे असें कल्पून प्रथम कुलदेवतेचें व तसेंच, अश्वत्थामा, बली, व्यास, हनूमान, बिभीषण, परशुराम इत्यादि चिरंजीवांचें स्मरण करून नंतर मार्कंडेयरूपी देवतेची पूजा करावी; आणि शेवटीं पुढील मंत्रानें प्रार्थना करावी. मार्कंडेय नमस्तेऽस्तु सप्तकल्पांतजीवन। आयुरारोग्यसिद्ध्यर्थं प्रसीद भगवन्मुने ॥ चिरंजीवी यथा त्वं तु मुनीनां प्रवर द्विज। कुरुष्व मुनिशार्दूल तथा मां चिरजीविनम् ॥ असो; वाढदिवसाचे दिवशीं श्मश्रु, कलह, मांसभक्षण वगैरे करूं नयेत.

जावळास मुहूर्त.

पुनर्वसुद्वये पूषा हस्तत्रयश्रवत्रये।
मृगाश्विनीः समे मासे पूर्वाह्णे उत्तरायणे ॥ २४७ ॥
द्वितीयाऽथ तृतीया च पंचमी सप्तमी शुभा।
दशम्येकादशी वापि त्रयोदश्यपि शस्यते।
गुरुशुक्रबुधे वारे कारयेत् केशखंडनम् ॥ २४८ ॥

मुलाचें जायवळ करणें तें, जन्मापासून सम म्हणजे ६।८।१० इत्यादि महिन्यांत, उत्तरायणांत, दोनप्रहर दिवस येण्यापूर्वीं पुनर्वसु, पुष्य, रेवती, हस्त, चित्रा, स्वाती, श्रवण, धनिष्ठा, शततारका, मृग, अश्विनी ह्या नक्षत्रांवर व २।३।५।७।१०।११।१३ ह्या तिथींना गुरु शुक्र बुध या वारीं जावळ करावें. त्या दिवशीं मुलाला सुगंधयुक्त तेलांनीं अभ्यंगस्नान घालून आरती करून मिष्टान्नभोजन करवावें.

चौलसंस्कार.

जन्मतो गर्भतो वाऽब्दे प्रथमेऽथ द्वितीयके।
तृतीये पंचमे वापि चौलकर्म प्रशस्यते ॥ २४९ ॥
माघफाल्गुनवैशाखज्येष्ठे मासि शुभं स्मृतम्।
जन्ममासेऽधिमासे न ज्येष्ठे ज्येष्ठस्य नो भवेत् ॥ २५० ॥
द्वितीयाऽथ तृतीया च पंचमी सप्तमी शुभा।
दशम्येकादशी वापि त्रयोदश्यपि शस्यते ॥ २५१ ॥
श्रवणादित्रये हस्तत्रितये रेवतीमृगे।
पुनर्वसुद्वयेऽश्विन्यां चूडाकर्म शुभावहम् ॥ २५२ ॥
सूनोर्मातरि गर्भिण्यां चूडाकर्म न कारयेत्।
पंचाब्दात् प्रागथोर्ध्वं तु गर्भिण्यामपि कारयेत् ॥ २५३ ॥

जन्मकालापासून किंवा गर्भधारणापासून विषम म्हणजे १।३।५।७ या वर्षीं, व

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

केचिन्मतेंकरून दुसऱ्या वर्षी; माघ, फाल्गुन, वैशाख व ज्येष्ठ या महिन्यांत व कित्येकांच्या मतें मार्गशीर्ष महिन्यांत बुध, गुरु, शुक्र, चंद्र ह्या वारीं, २।३।५।७।१० ११।१३ ह्या तिथींना श्रवण, धनिष्ठा, शततारका, हस्त, चित्रा, स्वाती, रेवती, मृग, पुष्य, अश्विनी, पुनर्वसु या नक्षत्रांवर मुलाला चंद्रबल पाहून चूडाकर्म म्हणजे जावळ करणें शुभ मानिलें आहे. माता रजस्वला असतां मुलाचें चौल करूं नये. सख्ख्या भावांचें चौल एकाच दिवशीं करूं नये. तसेंच, माता गर्भवती असून पांच महिन्यांहून अधिक महिने झाले असतील तर चौलसंस्कार करूं नये. परंतु मुलाचें वय पांच वर्षांहून अधिक असेल तर मात्र मातेला पांचांहून अधिक महिने गेले असतांही चौल करणें दोषास्पद नाहीं. माता ऋतुमती असतां तिच्या पुत्राचें चौल किंवा कोणताही अन्य संस्कार करूं नये. ज्येष्ठ अपत्याचें ज्येष्ठ मासांत कोणतेंही मंगलकृत्य करूं नये.

विद्यारंभ.

सौम्यायने शुभे मासि स्वाध्यायदिवसे शुभे ।
स्वस्थे जीवबुधे शुक्रे लग्ने खेटबलान्विते ॥ २५४ ॥
रेवतीद्वितये पुष्ये पुनर्वस्वनुराधयोः ।
आर्द्राख्ये श्रवणे हस्ते स्वातौ चित्राभिधे तथा ॥ २५५ ॥
हेरंबविष्णुवाग्देवीं तथाभ्यर्च्येष्टदेवताः ।
पंचमाब्दे नरः कुर्याद्विद्यारंभं सदा बुधः ॥ २५६ ॥

उत्तरायणांत, शुभ मासांत म्हणजे माघापासून पुढें पांच महिन्यांत, स्वाध्यायदिवशीं म्हणजे १।८।१४।१५।३० या तिथि वर्ज्य करून, गुरु, बुध, शुक्र, या वारीं, २।३।५।१०।११।१२।१३ ह्या तिथींना, व रेवती, अश्विनी, पुष्य, पुनर्वसु, अनुराधा, आर्द्रा, श्रवण, हस्त, चित्रा, स्वाती हीं नक्षत्रें व शिवाय मुहूर्तचिंतामणिकारांच्या मतें धनिष्ठा, शततारका, तिन्ही पूर्वा, तिन्ही उत्तरा, मूळ, आश्लेषा हीं नक्षत्रें देखील विद्यारंभास प्रशस्त आहेत. वृषभ, मिथुन, कन्या, धन, मीन या शुभग्रहांच्या लग्नीं त्रिकोणीं म्हणजे ५।९ व केंद्रीं १।४।७।१० या स्थानीं शुभग्रह असतां, मुलाच्या पांचव्या वर्षी गणपति, सरस्वती, विष्णु व कुलदेवता इत्यादि देवतांची पूजा करून बालकाकडून प्रातःकालीं विद्यारंभ करवावा.

उपनयनास शुभाशुभ.

गर्भाष्टमेऽब्दे कुर्वीत ब्राह्मणस्योपनायनम् ।
गर्भादेकादशे राज्ञो गर्भाच्च द्वादशे विशः ॥ २५७ ॥
आषोडशाद्द्वाविंशाच्च चतुर्विंशाच्च वत्सरात् ।
ब्रह्मक्षत्रविशां कालो ह्यौपनायनिकश्च सः ॥ २५८ ॥
माघादिपंचमासेषु मेखलाबंधनं शुभम् ।
द्वित्र्येकादशदिक्पंचद्वादशीप्रमिते तिथौ ।
मौञ्जीबन्धः शुभः सोमे भृगुजीवज्ञभास्करे ॥ २५९ ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मघा च भरणी ज्येष्ठा विशाखा चैव कृत्तिका ।
नक्षत्रपंचकं प्राशैर्न ग्राह्यं व्रतबंधने ॥ २६० ॥
कृष्णे प्रदोषेऽनध्याये शनौ निश्यपराह्णके ।
प्राक्संध्यागर्जिते नेष्टो व्रतबंधो गलग्रहे ॥ २६१ ॥

गर्भापासून किंवा जन्मापासून आठव्या वर्षी ब्राह्मणांचा, अकराव्या वर्षी क्षत्रियांचा व बाराव्या वर्षी वैश्यांचा व्रतबंध करावा. तथापि अडचणीच्या प्रसंगीं ब्राह्मणांना १६ वर्षेपर्यंत, क्षत्रियांना २२ वर्षेपर्यंत, व वैश्यांना २४ वर्षेपर्यंत मुंजीचा गौणकाल सांगितलेला आहे. परंतु तो कालातिक्रमानें हीन होत जातो. तसेंच, ब्राह्मणांना पांचवें किंवा सातवें वर्षेही उपनयनास उक्त आहे. माघापासून ज्येष्ठापर्यंत पांच महिन्यांत उपनयन करावें. द्वितीया, तृतीया, पंचमी, दशमी, एकादशी, द्वादशी ह्या तिथींना व कृष्णपक्षांतील पंचमीपर्यंत सर्व तिथींवर आणि सोम, बुध, गुरु, शुक्र आणि रवि या वारीं व्रतबंध करावा. मघा, भरणी, ज्येष्ठा, विशाखा आणि कृत्तिका हीं पांच नक्षत्रें वर्ज्य करून, इतर २२ नक्षत्रांवर, उपनयन करणें शुभ जाणावें. कृष्णपक्षांत षष्ठीपासून पुढील तिथींवर, प्रदोषाचे दिवशीं, अनध्यायदिवशीं, शनिवारीं, रात्रीस अपराण्हकाळीं प्रातःकाळीं मेघगर्जना झाली असतां त्या दिवशीं, आणि गलग्रह तिथींवर उपनयनसंस्कार करूं नये. तथापि संकटकालीं 'कृष्णश्चांत्यत्रिकं विना' या बृहस्पतीच्या वचनाप्रमाणें कृष्णपक्षांत शेवटचे पांच दिवस सोडून म्हणजे कृष्ण दशमीपर्यंत मौंजी करावी. मौंजीला पूर्वाण्हकाल म्हणजे सूर्योदयापासून दहा घटिका उत्तम व पुढील आठ मध्यम. अपराण्हकाल मात्र वर्ज आहे.

गलग्रहतिथि.

त्रयोदश्यादि चत्वारि सप्तम्यादिदिनत्रयम् ।
चतुर्थ्येकतः प्रोक्ता अष्टावेते गलग्रहाः ॥ २६२ ॥
विद्यारंभो व्रतोद्देशः क्षौरं चैव विशेषतः ।
गलग्रहे न कर्तव्यं यदीच्छेत्पुत्रजीवितम् ॥ २६३ ॥

त्रयोदशीपासून पुढील चार तिथि, सप्तमी, अष्टमी, नवमी व कृष्णपक्षांतील चतुर्थी अशा आठ तिथींना गलग्रह तिथि म्हणतात. ह्या गलग्रह तिथींवर विशेषतः विद्यारंभ, व्रतबंध, चौलकर्म हीं कृत्यें करूं नयेत.

सोपपदातिथि.

सिता ज्येष्ठे द्वितीया च, आश्विने दशमी सिता ।
चतुर्थी द्वादशी माघे एताः सोपपदाः स्मृताः ॥
अनध्यायं प्रकुर्वीत व्रते सोपपदासु च ॥ २६४ ॥

ज्येष्ठमासांतील शुक्ल द्वितीया, आश्विनमासांतील शुक्ल पक्षींची दशमी आणि माघमासांतील चतुर्थी व द्वादशी ह्या तिथींना सोपपदा तिथि म्हणतात. ह्या तिथि अनध्याय समजून मौंजीस वर्ज कराव्या.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

अनध्यायतिथि.

अनध्यायाः पौर्णमासी चतुर्दश्यष्टमी अमा ।
प्रतिपत्सूर्यसंक्रांतिर्मन्वाद्याश्च युगादयः ॥ २६५ ॥
कृष्णपक्षे द्वितीयाश्च कार्तिकाषाढफाल्गुने ।
विषुवायनसंक्रांत्योरनध्याय इति व्रते ॥ २६६ ॥

पौर्णिमा, चतुर्दशी, अष्टमी, अमावास्या, प्रतिपदा, सूर्यसंक्रांतीचा दिवस, मन्वादि तिथि, युगादि तिथि, आणि कार्तिक, आषाढ व फाल्गुन या महिन्यांतील कृष्णपक्षांतील द्वितीया ह्या तिथि अनध्याय होत. तुला, मेष व अयन (कर्क व मकर) संक्रांतींचे दिवस हेही अनध्याय होत. अनध्यायाचे दिवस मौंजीबंधनास वर्ज्य सांगितले आहेत. मन्वादि व युगादि तिथी पुढें तिथिप्रकरणांत दिल्या आहेत.

वर्णस्वामी व शाखास्वामी.

जीवशुक्रौ तु विप्रेशौ भूभुजां रविमंगलौ ।
विशोऽब्जो ज्ञश्च शूद्राणामंत्यजानां पतिः शनिः ॥ २६७ ॥
ऋग्वेदेशो गुरुः प्रोक्तो यजुषां भार्गवः पतिः ।
सामवेदेश्वरो भौमः पतिश्चाथर्वणे बुधः ॥ २६८ ॥
शाखाधिपतिवारश्च शाखाधिपबलं तथा ।
शाखाधिपतिलग्नं च दुर्लभं त्रितयं व्रते ॥ २६९ ॥

ब्राह्मणवर्णाचे शुक्र व गुरु हे दोन स्वामी आहेत. क्षत्रियांचे मंगळ व रवि, वैश्यांचा चंद्र, शूद्रांचा बुध आणि अंत्यजांचा शनि असे भिन्न वर्णांचे भिन्न स्वामी कल्पिलेले आहेत. तसेंच ऋग्वेदाचा स्वामी गुरु, यजुर्वेदाचा शुक्र, सामवेदाचा मंगळ आणि अथर्ववेदाचा बुध असे निरनिराळ्या शाखांचेही निरनिराळे स्वामी आहेत. आपल्या वर्णाचा व शाखेचा जो स्वामी असेल त्याचा वार, तो ज्याचा स्वामी आहे असें लग्न, किंवा तो शुभस्थानीं असणें हे योग व्रतबंधाला अत्यंत शुभ मानिलेले आहेत. म्हणून ज्याप्रमाणें रवि, चंद्र व गुरु यांचें बल बटूला पाहिजे, त्याचप्रमाणें वर्ण व शाखा यांच्या स्वामींचेंही बल असणें शुभकारक आहे.

मौंजीस गुरुबल व ग्रहबल.

वटुकन्याजन्मराशेस्त्रिकोणायद्विसप्तगः ।
श्रेष्ठो गुरुः खषट्‌त्र्याद्ये पूजयान्यत्र निन्दितः ॥ २७० ॥
शुभोतिकाले तुर्याष्टव्ययस्थो द्विगुणार्चनात् ।
चैत्रे मीनगते भानौ अनिष्टोपि गुरुः शुभः ॥ २७१ ॥
स्वोच्चे स्वभे स्वमैत्रे वा स्वांशे वर्गोत्तमे गुरुः ।
रिःफाष्टतुर्यगोपीष्टो नीचारिस्थः शुभोप्यसन् ॥ २७२ ॥
पितुः सूर्यबलं श्रेष्ठं शाखा वर्णेशयोर्वटोः ।
पितुर्वटोश्च सर्वेषां बलं वाक्पतिचंद्रयोः ॥ २७३ ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

बटूच्या जन्मराशीपासून ज्या राशीला गुरु असेल त्या राशीपर्यंत मोजावें. आणि नववा, पांचवा, अकरावा, दुसरा व सातवा या स्थानीं गुरु असला म्हणजे गुरुबल उत्तम आहे असें समजून बटूचा व्रतबंध करावा. १०।६।३।१ या स्थानीं असतां गुरुबल मध्यम समजून गुरूची पूजा करावी, नंतर व्रतबंध करावा. ४।८।१२ या स्थानीं असणारा गुरु निंद्य आहे; तथापि उपनयनाचा काल होऊन गेला असेल तर दोन वेळां गुरूची पूजा करून बटूची मुंज करावी; परंतु मुंजीचा कालातिक्रम होऊं देऊं नये. ह्याशिवाय आणखी गुरुबलाविषयीं दुसरे अपवाद आहेत ते असे कीं, चैत्र महिन्यांत मीनराशीस सूर्य असेल तर अनिष्ट गुरूचा दोष मानूं नये; किंवा उच्चीचा म्हणजे कर्क राशीस असतां, स्वक्षेत्रींचा म्हणजे धन किंवा मीन या राशींना असतां, मित्रगृहींचा म्हणजे मेष किंवा वृश्चिक राशींना असतां, स्वांशीं म्हणजे कोणत्याही राशीस असून धन किंवा मीन राशीच्या नवांशीं असतां, वर्गोत्तम म्हणजे ज्या राशीला गुरु असेल त्याच राशीच्या नवांशामध्यें म्हणजे मेष राशीस असतां मेषाच्या नवांशीं, वृषभ राशीस असतां वृषभाच्या नवांशीं इत्यादि कोणताही प्रकार असतां, जरी अनिष्ट म्हणजे जन्मराशीपासून १२।८।४ या स्थानीं गुरु असेल तरीही तो शुभ मानावा. तसेंच नीचस्थानीं म्हणजे मकर राशीला व शत्रुक्षेत्रीं म्हणजे मिथुन, कन्या, तूळ, व वृषभ या राशींस असून जरी बटूला शुभस्थानीं गुरु असेल तरीही तो निंद्य होय. असेंही कांहीं ग्रंथकार म्हणतात. पित्याला सूर्यबल व बटूला शाखाधिपति व वर्णाधिपति यांचें बल श्रेष्ठ होय. तसेंच, गुरु-चंद्रबल दोघांनाही असावें. निदान बटूला तरी अवश्य असावें.

उपनयनास जन्ममासाचा विचार.

जन्मर्क्षमासलग्नादौ व्रते विद्याधिको व्रती ।
आद्यगर्भेपि विप्राणां क्षत्रादीनामनादिमे ॥ २७४ ॥

जन्मनक्षत्र, जन्ममास, जन्मलग्न, आणि जन्मतिथि इत्यादि योगांवर व्रतबंधसंस्कार केला असतां तो बटु अधिक विद्वान् होतो. यास्तव ब्राह्मणांनीं प्रथमगर्भोत्पन्न किंवा इतर मुलांचा व्रतबंधसंस्कार अवश्य जन्मनक्षत्रादिकांवरच करावा. क्षत्रिय आणि वैश्य ह्यांनीं प्रथमगर्भोत्पन्न पुत्राचा व्रतबंध जन्मनक्षत्रादिकांवर करूं नये; परंतु इतरांचा मात्र अवश्य करावा.

उपनयनास शुभाशुभ ग्रह.

व्रतबंधेऽष्टषड्रिःफैर्वर्जिताः शोभनाः शुभाः ।
त्रिषडाये खलाः पूर्णो गोकर्कस्थो विधुस्तनौ ॥ २७५ ॥
जीवेंदुभृगुलग्नेशा व्रते नेष्टाः षडष्टगाः ।
शुक्रेंदुव्ययगाविष्टौ खला लग्नाष्टपंचगाः ॥ २७६ ॥

ज्या मेषादि लग्नीं उपनयन करावयाचें असेल त्या इष्टलग्नापासून ६।८।१२ ह्या स्थानीं शुभग्रह नसावे. यावांचून इतर सर्व स्थानीं शुभग्रह व्रतबंधाला इष्ट मानि-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

लेले आहेत. ३।६।११ या स्थानीं पापग्रह असावे. वृषभ किंवा कर्क राशीला शुक्ल पक्षांतील चंद्र असून तो लग्नीं असावा. गुरु, चंद्र, शुक्र आणि लग्नस्वामी हे ६।८ या स्थानीं असतां अनिष्ट होत. तसेंच शुक्र, चंद्र हे द्वादशस्थानीं नसावे; आणि लग्नीं, अष्टमस्थानीं व पंचमस्थानीं पापग्रह असणें अनिष्ट मानिलेलें आहे.

मातृरजोदोषनिर्णय.

मातू रजस्वलादोषे नांदीश्राद्धोत्तरं तदा ।
आवश्यके व्रतं चौलं शांतिं कुर्याद्व्रते गृही ॥ २७७ ॥
अलाभे सुमुहूर्तस्य रजोदोषे तु संस्थिते ।
श्रियं संपूज्य तत्कुर्यात्पाणिग्राहादि मंगलम् ॥ २७८ ॥

नांदीश्राद्ध म्हणजे पुण्याहवाचनादि देवकप्रतिष्ठा झाल्यानंतर बटूची माता किंवा ज्यानें नांदीश्राद्ध केलें असेल त्याची पत्नी रजस्वला झाली तर धर्मशास्त्रांत सांगितल्याप्रमाणें श्रीशांति करून त्याच मुहूर्तावर चौलव्रतबंधादि संस्कार केले असतां दोष नाहीं. शांतीवांचून संस्कार करणें मात्र अशुभ मानिलेलें आहे.

देवकोत्थापनाचा काल.

समे च दिवसे कुर्याद्देवकोत्थापनं बुधैः ।
षष्ठं च विषमं नेष्टं मुक्त्वा पंचमसप्तमौ ॥ २७९ ॥

देवकोत्थापन सम दिवशीं करावें. तिसरा, सहावा किंवा नववा हे दिवस निंद्य होत. विशेषतः विषम दिवस देवकोत्थापनास वर्ज्य सांगितले आहेत, तथापि पांचव्या व सातव्या दिवशीं देवकोत्थापन करणें उक्त आहे.

सोडमुंजीस मुहूर्त.

व्रतोक्तदिवसादौ हि समावर्तनमिष्यते ।
विभौमभानुजे वारे नक्षत्रे च व्रतोदिते ।
चंद्रताराविशुद्धौ च स्यात्समावर्तनक्रिया ॥ २८० ॥

मौंजीस जो मुहूर्त मागें लिहिला आहे, त्याच मुहूर्तावर समावर्तन म्हणजे सोडमुंज करावी. मंगळवार व शनिवार खेरीज करून व्रतबंधास जीं नक्षत्रें सांगितलीं आहेत, त्या नक्षत्रांवर चंद्रबल पाहून समावर्तन करावें. हल्लीं मौंजीबंधन झाल्या दिवसापासून चार किंवा आठ दिवसांच्या आंतच समावर्तन म्हणजे सोडमुंज करितात. परंतु विद्यार्जनाकरितां बारा वर्षेंपर्यंत ब्रह्मचर्य पाळून नंतर समावर्तनविधि करावा अशी शास्त्राज्ञा आहे. ब्रह्मचर्य पाळणें म्हणजे सर्वथा शुचिर्भूत राहणें. शुचिर्भूत राहून विद्यार्जन केलें असतां तेज, बल आणि मनोनिग्रह हीं वृद्धिंगत होतात. ब्रह्मचर्यवृत्ति राखण्याचा लोप झाल्यामुळेंच प्रस्तुतकाळीं विद्यार्थ्यांची तेजोबलविवेकविहीन अशी शोचनीय स्थिति दृष्टीस पडते.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

जातकप्रकरण ३.

ह्या प्रकरणांत जन्मपत्रिकेंत येणाऱ्या विषयांसंबंधीं संक्षिप्त विचार केला आहे. म्हणजे स्पष्टग्रह, स्पष्टलग्न, लग्नकुंडली, भावचलितकुंडली, दशा, ग्रहांचीं फलें इत्यादिकांविषयीं लिहिलें आहे. पत्रिकेंत गणिताचा भाग पुष्कळ असतो; त्याचा ह्या लहानशा पुस्तकांत स्थलसंकोचास्तव सविस्तर विचार करितां येत नाहीं. तथापि विषयप्रवेश होण्यापुरती आवश्यक तेवढी माहितीं येथें दिली आहे. गणितविषय स्वभावतःच मनोरंजक नसल्यामुळें सकृद्दर्शनीं पुष्कळांस तो कठीण वाटेल हें खरें; परंतु वास्तविक तो तितका कठीण आहे असें नाहीं. पुनः पुनः वाचला असतां इतर विषयांप्रमाणें हाही सहज समजण्यासारखा आहे. असो. आतां प्रथम ग्रह कसे स्पष्ट करावे हें सांगतों.

स्पष्टग्रह करण्याची रीति.

कोणताही ग्रह स्पष्ट करणें म्हणजे तो इष्टकालीं आकाशांत किती अंशादिकांवर आहे हें गणिताच्या साहाय्यानें सिद्ध करणें. ह्या कृत्यास ग्रहांस चालन देणें असेंही म्हणतात. मागें 'पंचांग पहाण्याची रीति' या विषयाखालीं सांगितलेंच आहे कीं, पंचांगांत उजव्या बाजूच्या कोंपऱ्यांत कुंडलीच्या वरच्या बाजूस प्रत्येक पूर्णिमेचे आणि अमावास्येचे सूर्योदयींचे स्पष्टग्रह दिलेले असतात; व त्या अंकांखालीं त्या त्या ग्रहांच्या गतींचे अंक दिलेले असतात. त्या गतींवरून खालीं लिहिलेल्या रीतीप्रमाणें पाहिजे त्या वेळेचे स्पष्टग्रह तयार करितां येतात. तथापि ही रीति स्थूलमानाची आहे. यापेक्षां ग्रहलाघवावरून तयार केलेले ग्रह अधिक सूक्ष्म असतात. परंतु तें गणित बरेंच कठिण आहे. असो. चंद्र खेरीजकरून इतर सर्व ग्रह स्पष्ट करण्याची रीति एकच आहे. अलीकडे कांहीं पंचांगांतून रोजचे सूर्योदयींचे स्पष्टग्रह दिलेले असतात, त्यावरून इष्टकाळचे स्पष्टग्रह तयार करणें हें कमी श्रमाचें झालें आहे.

रीतिः—ज्या गांवचे स्पष्टग्रह तयार करावयाचे असतील त्या ठिकाणीं जें पंचांग चालत असेल त्याचाच उपयोग करावा. आपणास ज्या वेळेचे स्पष्टग्रह करावयाचे असतील त्या वेळेपासून पूर्णिमेच्या किंवा अमावास्येच्या सूर्योदयापर्यंत दिवस मोजावे. अंक वाढूं नयेत म्हणून पूर्णिमा किंवा अमावास्या यांपैकीं जो दिवस जवळ असेल तो घ्यावा. जितके दिवस, घटी आणि पळें होतील त्यांना ग्रहांच्या गतींच्या अंकांनीं गुणावें. हे गतींचे अंक कला आणि विकला असतात, म्हणून त्यांच्या विकला करून नंतर गुणावें. जो गुणाकार येईल त्याला एका दिवसाचीं पळें ३६०० यांनीं भागावें. नंतर त्याचे अंश, घटी, पळें इत्यादि करावीं. जर मागील पंधरवड्याच्या कोष्टकांतील ग्रहगति घेऊन उदाहरण केलें असेल तर त्या त्या ग्रहांच्या अंकांत हे

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

अंक मिळवावे; आणि चालू पंधरवड्याच्या कोष्टकावरून गणित केलें असेल तर त्या अंकांतून वजा करावे. पंचांगांतील ग्रह राश्यात्मक असतात; म्हणजे राशी, अंश, कला आणि विकला असतात आणि आपला गुणाकार फक्त अंशात्मक आहे; म्हणजे अंश, कला आणि विकला आहेत; म्हणून ह्या परस्परांची बेरीज किंवा वजाबाकी करितेवेळीं राशीखालीं शून्य व अंशाखालीं अंश वगैरे मांडावे. एकाद्याचा जन्म पूर्णिमेच्या किंवा अमावास्येच्या सूर्योदयावरोबर झाला असेल तर पंचांगस्थ स्पष्टग्रह हेच त्याच्या जन्मकाळचे स्पष्टग्रह होत. खालीं उदाहरणादाखल एक दोन ग्रहच स्पष्ट करून दाखविले आहेत, त्याप्रमाणें इतर सर्व ग्रह स्पष्ट करावे. चंद्र स्पष्ट करण्याची रीति निराळी आहे, तीही पुढें दिलीच आहे. राहूची गति नेहमीं ऋण म्हणजे उलट असते, म्हणून पंचांगस्थ स्पष्टग्रहांत मिळवणीच्या ठिकाणीं राहूचें चालन नेहमीं वजा द्यावें, आणि वजाबाकीच्या ठिकाणीं मिळवावें. तसेंच, कोणताही ग्रह वक्री असतां त्याची गति देखील उलट असते; म्हणून वक्री ग्रहाचें उदाहरण राहूप्रमाणेंच करावें.

उदाहरण पहिलें—शके १८३२ वैशाख कृष्ण ३ शुक्रवार ता० २७ मे १९१० या दिवशीं दुपारीं १ वाजून ३७ मिनिटांनीं एकाचा जन्म झाला आहे, त्या वेळेचा स्पष्टसूर्य करा. या दिवशीं रवीचा उदय ५ वाजून २५ मिनिटांनीं आहे. म्हणजे सूर्योदयापासून ८ तास व १२ मिनिटांनीं जन्म झाला आहे. आतां प्रथम ८ तास व १२ मिनिटें यांच्या घटिका व पळें केलीं पाहिजेत. म्हणून, ८×२॥=२० घटिका व १२×२॥=३० पळें. म्हणजे शुक्रवारीं सूर्योदयापासून २० घटिका ३० पळांनीं जन्म झाला. या ठिकाणीं पूर्णिमा जवळ आहे, म्हणून मागील पंधरवड्याच्या कोष्टकांतील गतीवरून उदाहरण करूं. प्रथम दिवस मोजा. पूर्णिमेचा सर्व दिवस, प्रतिपदेचा सर्व दिवस, द्वितीयेचा सर्व दिवस आणि तृतीयेला २० घटिका ३० पळांनीं जन्म झाला आहे. म्हणून एकंदर ३ दिवस २० घटिका आणि ३० पळें इतका काळ झाला. याला सूर्याच्या गतीनें गुणावयाचें आहे. सूर्याची गति ५७ कला आणि २० विकला आहे. या सर्वांच्या विकला करा. ५७×६०=३४२०+२० ३४४० ही विकलात्मक एका दिवसाची सूर्याची गति झाली. आतां ३ दिवस २० घटिका आणि ३० पळें या सर्वांचीं पळें करावयाचीं आहेत, म्हणून ३×६०=१८० घटी +२०

---

१ ज्या वेळीं मागील पंधरवड्याच्या कोष्टकांतील ग्रहगतींवरून पुढील दिवसाचा ग्रह तयार करावयाचा असेल, त्या वेळीं तो पंधरवड्याचा शेवटचा सर्व दिवस हिशेबांत धरावा. परंतु पुढील दिवसाच्या ग्रहगतीवरून मागील दिवसाचा ग्रह तयार करितांना त्या पंधरवड्याचा दिवस हिशेबांत धरूं नये. कारण पंचांगस्थ ग्रहगति त्या त्या दिवसांच्या सूर्योदयाच्या वेळेच्या असतात. म्हणून दिवस मोजणें ते एका ठिकाणीं सूर्योदयापासून व दुसऱ्या ठिकाणीं सूर्योदयापर्यंत मोजले पाहिजेत हें ध्यानांत ठेवावें.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

घटी =२०० घ० ×६०=१२००० पळें +३०=१२०३० पळें झालीं. यांना ३४४० यांनीं गुणा; व एका दिवसाचीं म्ह० ६० घटिकांचीं पळें ६०×६०=३६०० यांनीं भागून भागाकार पलात्मक येईल त्याचे राशी, अंश वगैरे करून ते अंक पंचांगांतील राश्यादि अंकांत मिळवा, म्हणजे इष्ट काळचा स्पष्ट रवि येईल. खालीं उदाहरण करून दाखविलें आहे तें पहा.

१२०३०
×३४४०
÷३६००) ४१३८३२००
११४९५
बाकी १२०० प्रतिविकला सोडा.

÷६०) ११४९५
भागा० १९१ बाकी ३५ वि०
÷६०)अं० ३ बा० ११ कला.
उत्तर ३ अं. ११ क. ३५ वि०

पौर्णि० पंचा० स्पष्ट सूर्य			
रा०	अं०	क०	वि०
१	९	२६	३१
+०	३	११	३५
१	१२	३८	६

उत्तर १ रा. १२ अं. ३८ क. ६ वि.

हा वैशाख कृष्ण तृतीयेचा इष्टकाळचा स्पष्ट सूर्य झाला. त्रैराशिक रीतीनेंही हें उदाहरण करितां येईल. जसें:—एका दिवसास म्हणजे ३६०० पळांस जर ३४४० विकला गति, तर ३ दिवस २० घ० व ३० प०=१२०३० पळांस किती? वस्तुतः याच रीतीनें वरील उदाहरण केलें आहे.

मागील पंधरवड्याच्या कोष्टकांतील गतीवरून पुढील दिवसाच्या ग्रहांस चालन देण्याचें हें एक उदाहरण झालें. आतां चालू पंधरवड्याच्या कोष्टकांतील गतीवरून मागील दिवसाचा ग्रह तयार करण्याचें आणखी एक उदाहरण करून दाखवितों.

उदाहरण दुसरें:—शके १८३२ वैशाखकृष्ण १२ शनिवारीं दुपारीं ११ वाजून ३५ मिनिटांनीं एकाचा जन्म झाला आहे. त्या वेळचा स्पष्ट सूर्य करा. या दिवशीं ५ वाजून २५ मिनिटांनीं सूर्योदय आहे. म्हणजे सूर्योदयापासून ६ तास १० मिनिटांनीं म्हणजे (६×२॥ व १०×२॥) १५ घटिका २५ पळांनीं जन्म झाला आहे. म्हणून, त्या वेळेपासून अमावास्येपर्यंत दिवस मोजा. अमावास्या मंगळवारीं आहे. अहोरात्राच्या घटी ६० यांतून उणे जन्मापूर्वीच्या शनिवारच्या १५ घटिका व २५ पळें=४४ घटिका ३५ पळें. ह्या शनिवारच्या जन्मानंतरच्या शेष घटिका झाल्या. आतां रवि आणि सोमवार हे संपूर्ण दोन दिवस व शनिवारच्या ४४ घटिका व ३५ पळें मिळून २ दिवस ४४ घटिका व ३५ पळें हा जन्मवेळेपासून अमावास्येचा सूर्योदयापर्यंत इष्टकाळ झाला. ह्या वेळीं सूर्य किती अंशावर होता हें सिद्ध करावयाचें आहे. एका दिवसाची सूर्याची गति ५७ कला आणि ११ विकला आहे. या सर्वांच्या विकला करा. जसें, ५७×६०=३४२०+११=३४३१ विकला झाल्या. या अंकांनीं, २ दिवस ४४ घटिका आणि ३५ पळें म्हणजे (२×६०=१२०+४४=१६४× ६०=९८४०+३५) एकंदर ९८७५ पळें, याला गुणून एका दिवसाचीं पळें ३६००

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

यांनीं भागा. उत्तर पलात्मक येईल त्याला ६० नीं भागून त्याचे अंश वगैरे करून पंचांगस्थ रवीच्या अंकांत वजा द्या. म्हणजे इष्टकाळचा स्पष्ट सूर्य झाला. खालीं उदाहरण करून दाखविलें आहे तें पहा. अमावा० पंचा० सूर्य.

९८७५
×३४३१
÷३६००) ३३८८११२५
९४११ बा. १५२५
१५२५ प्रतिविकला सोडा.

÷६०) ९४११
भागा० १५६ बा० ५१ वि०
÷६०)अं०२बा०३६ कला.

	रा.	अं.	क.	वि.
	१	२२	४८	८
−	०	२	३६	५१
	१	२०	११	१७

उत्तर १ रा. २० अं. ११ क. १७ वि.

हा वैशाखकृष्ण १२ शनिवारचा दुपारचा स्पष्ट सूर्य झाला. आतां कांहीं पंचांगांतून प्रत्येक दिवसाचे प्रातःकाळचे ग्रह दिलेले असतात, त्यांवरून इष्टकाळचे ग्रह कसे सिद्ध करावे, तें सांगतों.

ज्या पंचांगांतून रोजचे सूर्योदयींचे स्पष्टग्रह दिलेले असतील तेथें आजचा सूर्योदयींचा ग्रह व उद्यांचा सूर्योदयींचा ग्रह या दोघांची वजाबाकी करावी. म्हणजे ग्रहाची एका दिवसाची गति येते. वरील उदाहरणांतील जन्मवेळ घेऊन मंगळ तयार करा. प्रथम मंगळाच्या गतीचें प्रमाण आपल्याला काढलें पाहिजे. म्हणूनः—

	रा.	अं.	क.	वि.
वैशाखकृष्ण चतुर्दशीचा मंगळः—	२	२७	४९	४८
वैशाखकृष्ण त्रयोदशीचा मंगळः—	२	२७	१३	२६
ही मंगळाची एका दिवसाची गति होयः—	०	०	३६	२२

या सर्वांच्या विकला करा. जसेंः—३६×६० =२१६०+२२ =२१८२ विकला झाल्या. आतां सूर्योदयापासून १५ घटिका २५ पळांनीं जन्म झाला आहे. म्हणून या सर्वांचीं पळें करून (१५×६०=९००+२५=९२५) त्या पळांनीं मंगळाच्या गतीला म्हणजे वर दाखविल्याप्रमाणें २१८२ यांना गुणा, व त्या गुणाकाराला एका दिवसाचीं पळें ३६०० यांनीं भागून, भागाकार पलात्मक येईल, त्याच्या घटी, अंश वगैरे करून ते अंक दुसऱ्या दिवसाच्या स्पष्ट ग्रहांत वजा द्या किंवा आदल्या दिवसाच्या स्पष्टग्रहांत मिळवा. पुढील उदाहरण पहा. दुसऱ्या दिवसाचा मंगळ.

२१८२
×९२५
३६७०) २०१८३५०
५६० बा. २३५०

६०) ५६०
९—बा. २०
क. वि.

	रा.	अं.	क.	वि.
	२	२७	४९	४८
उणें−	०	०	९	२०
उत्तर	२	२७	४०	२८

हा वैशाखकृष्ण त्रयोदशीच्या दुपारीं १५ घ० २५ पळांचा स्पष्ट मंगळ होय, याचप्रमाणें चंद्र खेरीज करून इतर सर्व ग्रह स्पष्ट करावे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

चंद्र स्पष्ट करण्याची रीति.

ज्या वेळेचा आपणास स्पष्ट चंद्र करावयाचा असेल त्या वेळेपर्यंत, त्या दिवसाचें जें नक्षत्र असेल, त्या नक्षत्राच्या आरंभापासून जितक्या घटिका व पळें गेलीं असतील त्या सर्वांचीं पळें करून त्यास साठांनीं गुणावें. आणि त्या गुणाकारास त्याच नक्षत्राच्या आरंभापासून समाप्तीपर्यंतच्या एकंदर घटिकापळांचीं पळें करून त्यांनीं भागावें. जो भागाकार येईल ते अंश होत. बाकी राहील त्याच्या कला आणि विकला कराव्या. नंतर हे अंशाचे अंक, त्या दिवसाच्या नक्षत्रापूर्वींचीं जितकीं नक्षत्रें गत झालीं असतील, त्या गत नक्षत्रांच्या अनुक्रमांकाला साठांनीं गुणून, जो अंशात्मक गुणाकार येईल, त्यांत मिळवावे. जी बेरीज येईल त्या बेरजेला दोहोंनीं गुणून नवांनीं भागावें, जें उत्तर येईल तें अंशकलात्मक येईल, हे अंश तिसांपेक्षां अधिक असतील तर तिसांनीं भागून त्याच्या राशि कराव्या म्हणजे स्पष्ट चंद्र झाला. तसेंच, ४८००० या संख्येला नक्षत्राच्या घटिकांनीं भागिलें म्हणजे चंद्राची गति काढितां येते. उदाहरणः—शके १८३२ वैशाख कृष्ण १३ रविवारीं प्रातःकाळीं ६ वाजून १३ मिनिटांनीं जन्म झाला आहे. त्या दिवशीं सूर्योदय ५ वाजून १३ मिनिटांनीं आहे. म्हणजे सूर्योदयापासून ४८ मिनिटांनीं म्ह० २ घटिकांनीं जन्म झाला आहे, त्या वेळचा स्पष्ट चंद्र करा. शनिवारीं अश्विनी नक्षत्र ४४ घटिका ७ पळें होतें. नंतर भरणीनक्षत्र लागलें. अहोरात्रीच्या घटिका ६० यांतून उणें अश्विनीनक्षत्र ४४ घ० ७ प०=१५ घ० ५३ प० ह्या शनिवारच्या भरणीनक्षत्राच्या घटिका झाल्या. रविवारीं २ घटिकांनीं जन्म झाला आहे, म्हणून त्यांत २ घटिका मिळवा म्हणजे भरणीनक्षत्राच्या आरंभापासून इष्ट कालापर्यंत १७ घ० ५३ प० गेलीं. या सर्वांचीं पळें करा. १७× ६०=१०२०+५३=१०७३ पळें झालीं. रीतीप्रमाणें याला ६० नीं गुणा. १०७३× ६०=६४३८०. आतां या गुणाकारास भरणीनक्षत्राच्या एकंदर घटिकापळांनीं भागावयाचें आहे. म्हणून शनिवारच्या भरणीनक्षत्राच्या १५ घ० ५३ प० व रविवारीं भरणीनक्षत्र ३९ घ० ५९ पळें आहे. म्हणजे आरंभापासून समाप्तीपर्यंत एकंदर ५५ घ० ५२ पळें भरणीनक्षत्र आहे. याचीं पळें करा. ५५×६०=३३००+५२= ३३५२ पळें भरणी नक्षत्रांत चंद्र होता. आतां ६४३८० या संख्येला ३३५२ या संख्येनें भागा. खालीं भागाकार आहे तो पहा.

३३५२)६४३८०(१९ अं.	३३५२)४१५२०(१२ क.	३३५२)७७७६०(२३ वि.
६९२×६०=४१५२०	१२९६×६०=७७७६०	६६४

आतां भरणीनक्षत्रापूर्वीं एकच नक्षत्र गत झालें होतें म्हणून रीतीप्रमाणें

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

१×६०=६० अंश यांत वरील भागाकाराचे अंक मिळवून त्या बेरजेला दोहोंनीं गुणून नवांनीं भागावयाचें आहे म्हणून

अं.	क.	वि.
६०	०	०
+१९	१२	२३
७९	१२	२३
		×२
÷९)१५८	२४	४६=
अं. १७	क. ३६	वि. ५

येथें तिसांपेक्षां अंश कमी आहेत म्हणून ० राशी १७ अंश ३६ कला ५ विकला इतका स्पष्ट चंद्र झाला. राशि शून्य असल्यामुळें पहिल्याच म्हणजे मेषराशींत चंद्र आहे असा अर्थ झाला. या रीतीप्रमाणें स्पष्टचंद्र करावा. येथें १७ अंशांचे ठिकाणीं ४७ अंश असते तर ४७−३०=१ रा. १७ अं. ३६ क. ५ वि. इतका स्पष्टचंद्र झाला असता.

स्पष्टजन्मलग्नसाधन.

जन्मलग्न सिद्ध करण्याकरितां अयनांश, सायनग्रह, पलभा, चरखंडें, लंकोदयावरून स्वदेशीय मेषादिलग्नांचे उदय तयार करणें, इत्यादि साधनें लागतात; म्हणून हीं कृत्यें कशीं करावीं, त्याविषयीं प्रथम माहिती सांगतों.

अयनांश.

शालिवाहन शकांतून ४४४ वजा करावे. बाकी जे अंक राहतील तितक्या कला समजून त्यांस साठांनीं भागावें. जो भागाकार येईल ते अंश आणि बाकी राहील त्या कला होत. ह्यासच अयनांश म्हणतात. उदाहरण—शके १८३२ या वर्षाचे अयनांश काढावयाचे आहेत. म्हणून रीतीप्रमाणें १८३२−४४४=१३८८÷६०=२३ अंश ८ कला हे १८३२ या वर्षाचे अयनांश झाले. वास्तविक हे मेषसंक्रांतीच्या वेळेचे अयनांश होत; म्हणून मेषसंक्रांतीपासून जन्मदिवसापर्यंत दिवस मोजून त्रैराशिक रीतीनें अयनांश काढावे. निरयन मेषसंक्रांति एप्रील महिन्याच्या सुमारें १२ तारखेस होते. उदाहरणार्थ, एकाचा जन्म मेच्या ३० तारखेस आहे. म्हणजे मेषसंक्रांतीपासून ४९ दिवसांनीं आहे अशी कल्पना करा. या वेळचे अयनांश काढावयाचे आहेत म्हणून ३६५ : दि. ४९ : दि. : : ६० वि. =८ विकला. हे विकलात्मक अयनांश मेषसंक्रांतीच्या वेळेच्या वरील अयनांशांत मिळविले म्हणजे एकंदर २३ अंश ८ कला आणि ८ विकला हे जन्मकाळचे अयनांश झाले.

ग्रह सायन करण्याची रीति.

स+अयन=सायन. निर्+अयन=निरयन. अयनांशांसहित जे ग्रह ते सायन ग्रह होत. आणि ज्यांत अयनांश नाहींत ते निरयन ग्रह होत. मागें रवि, चंद्र स्पष्ट करून दाखविले आहेत ते निरयन ग्रह आहेत म्हणून त्यांत अयनांश मिळविले असतां तेच सायन स्पष्टग्रह होतील. मागील उदाहरणांपैकीं रवीचें पहिलें उदाहरण घ्या.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

	रा.	अं.	क.	वि.
निरयन स्पष्ट रवि.	१	१२	३८	६
+अयनांश	०	२३	८	८
=सायन स्पष्ट रवि	२	५	४६	१४

ह्याच रीतीनें सर्व ग्रह सायन करितात.

पलभा आणि चरखंडें.

मेषादिगे सायनभागसूर्यें दिनार्धजा भा पलभा भवेत्सा ।
त्रिस्था हतास्युर्दशभिर्भुजंगैर्दिग्भिश्चरार्धानि गुणोद्धृतांत्या ॥ १ ॥

ज्या दिवशीं सायन रवि, ० राशि ० अंश ० कला होऊन सायन मेषसंक्रांतीला आरंभ होतो, त्या दिवशीं (एप्रील तारीख २१) मध्याह्नीं सूर्य असतां सपाट जागेवर बारा अंगुळें उंचीचा शंकु (मेख) ठेवून त्याची जी छाया पडते तिला पलभा अशी संज्ञा आहे. मुंबईची पलभा ४।७ म्हणजे ४ अंगुळें आणि ७ व्यंगुळें आहे. पुण्याची बरोबर ४ अंगुळें आहे. ह्याप्रमाणें प्रत्येक ठिकाणची पलभा निराळी असते म्हणून कांहीं प्रसिद्ध शहरांच्या पलभा येथें देतों. आपल्या गांवची पलभा ठाऊक नसल्यास आपल्या गांवानजीक असलेल्या एकाद्या गांवाची घ्यावी. तसें केल्यानें दोन चार व्यंगुळांचाच फरक पडेल.

शहराचें नांव	पलभा अं. व्यं.	शहराचें नांव	पलभा अं. व्यं.	शहराचें नांव	पलभा अं. व्यं.
अमदाबाद	५– ५	जबलपूर	५– ८	मिरज	३–३७
अयोध्या	६– ३	तंजावर	२–१७	मुंबई	४– ७
अहमदनगर	४– ९	द्वारका	४–५५	रत्नागिरी	३–४०
आग्रा	६–१०	दिल्ली	६–३३	रामेश्वर	१–५७
इंदूर	५– १	नागपूर	४–३९	रायपूर	४–३९
उज्जयनी	५– ८	नासिक	४–२१	लंडन	१५– ५
उमरावती	४–३४	पंढरपूर	३–४८	लाहोर	७–२३
औरंगाबाद	४–२१	प्रयाग	५–४१	श्रीरंगपट्टण	२–३९
कलकत्ता	४–५८	पुणें	४– ०	सागर	५–१८
काशी	५–४३	बडोदा	४–५५	सातारा	३–४९
काश्मीर	८– ६	बेळगांव	३–२५	सुरत	४–४०
कोल्हापूर	३–३६	भुसावळ	४–३०	सोलापूर	३–५०
गया	५–३२	भोपाळ	५–१०	हरदा	४–५९
ग्वालेर	५–५४	मथुरा	६–१५	हैदराबाद नि.	३–४५
गोवें	३–२०	मद्रास	२–४७	हैदराबादसिंध	५–४१

१ प्रत्येक स्थलाचे जे पलभांक येथें दिले आहेत, त्यांत दोन चार व्यंगुळांचा फरक असण्याचा संभव आहे. परंतु त्यामुळें शेवटीं फारसा फरक पडणार नाहीं.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

चरखंडें—आपल्या गांवची पलभा तीन ठिकाणीं मांडून तिला अनुक्रमें १०, ८ आणि १० ह्या अंकांनीं गुणावें. जे तीन गुणाकार येतील त्यांस अनुक्रमें पहिलें दुसरें व तिसरें चरखंड म्हणावें. तिसऱ्या चरखंडास मात्र तिहींनीं भागावें लागतें. खालील उदाहरणें पहा.

मुंबईचीं चरखंडें.

पहि०	दुस०	तिस०
४।७	४।७	४।७
×१०	×८	×१०
४१।१०	३२।५६	३)४१-१०
		१३।४३

पुण्याचीं चरखंडें.

पहि०	दुस०	तिस०
४	४	४
×१०	×८	×१०
४०	३२	÷३)४०
		१३।२०

६० व्यंगुलें म्हणजे १ अंगुल होतें. ५० व्यंगुलांपेक्षां अधिक व्यंगुलें असल्यास त्याबद्दल एक संपूर्ण अंगुल धरावें. पण त्यापेक्षां कमी व्यंगुलें असतील तर तीं हिशेबांत धरूं नयेत. कारण तीं सोडल्यामुळें शेवटीं म्हणण्यासारखा फरक पडत नाहीं.

लंकोदयावरून स्वदेशीय राशींचे उदय.

मेषापासून मीनापर्यंत १२ राशींचे लंकेंतील उदय खालीं दिले आहेत, तीं पळें आहेत. मेष, वृषभ आणि मिथुन या तीन राशींच्या उदयाचीं जीं पळें तींच उलट क्रमानें कर्क, सिंह, कन्या या राशींच्या उदयाचीं पळें होत. तसेंच, कन्याराशी-पासून उलट मेषराशीपर्यंत अनुक्रमानें जीं पळें, तींच तूळ राशीपासून मीनराशीपर्यंत सहा राशींच्या उदयांचीं पळें समजावीं. याचा अर्थ असा, कीं मेष, तूळ, कन्या व मीन; वृषभ, सिंह, वृश्चिक व कुंभ; आणि मिथुन, कर्क, धन व मकर या राशींचे पलात्मक अंक सारखे असतात. पुढील राश्यंक पहा.

लंकेंतील राशींचे पलात्मक उदय.

मेष	२७८	कर्क	३२३	तूळ	२७८	मकर	३२३
वृषभ	२९९	सिंह	२९९	वृश्चिक	२९९	कुंभ	२९९
मिथुन	३२३	कन्या	२७८	धन	३२३	मीन	२७८

आतां लंकोदयावरून बरा राशींचे स्वदेशीय किंवा स्थानिक उदय कसे तयार करावे हें सांगतों. ज्या गांवचे उदय तयार करावयाचे असतील त्या गांवचीं चरखंडें मागें लिहिलेल्या रीतीप्रमाणें तयार करून, तीं अनुक्रमानें मेष, वृषभ आणि मिथुन या राशींच्या लंकोदयाच्या पळांतून वजा करावीं; आणि तींच चरखंडें उलट क्रमानें कर्क, सिंह, कन्या या तीन राशींच्या पळांत मिळवावीं. म्हणजे मेषापासून कन्या-राशीपर्यंतचे उदय तयार झाले. आणि हेच उदय उलट क्रमानें तूळराशीपासून

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मीनराशीपर्यंतचे उदयकाल समजावे. उदाहरणाकरितां पलभा ४।० धरून त्यावरून येणारीं चरखंडें घेऊन खालीं उदय तयार करून दाखविले आहेत, ते पहा म्हणजे ध्यानांत येईल.

लंकोदयपळें.		चरखंडें.		स्वोदय किंवा स्थानिक पळें.						
मेष	२७८ −	४०	=	२३८ ,,	=	३ घ०	५८ पळें.	मेष.
वृषभ	२९९ −	३२	=	२६७ ,,	=	४ घ०	२७ पळें.	वृषभ.
मिथुन	३२३ −	१३	=	३१० ,,	=	५ घ०	१० पळें.	मिथुन.
कर्क	३२३ +	१३	=	३३६ ,,	=	५ घ०	३६ पळें.	कर्क.
सिंह	२९९ +	३२	=	३३१ ,,	=	५ घ०	३१ पळें.	सिंह.
कन्या	२७८ +	४०	=	३१८ ,,	=	५ घ०	१८ पळें.	कन्या.

आतां उलट क्रमानें म्हणजे कन्येपासून मेषराशीपर्यंत जे पलात्मक उदय, तेच अनुक्रमानें तूळराशीपासून मीनराशीपर्यंत होतात, असें वर लिहिलें आहे; म्हणून तूळ ३१८ वृश्चिक ३३१ धन ३३६ मकर ३१० कुंभ २६७ मीन २३८. आतां बारा राशींचे स्वोदय, किंवा स्थानिक उदय तयार झाले ते असे:—

मेष	२३८	कर्क	३३६	तूळ	३१८	मकर	३१०
वृषभ	२६७	सिंह	३३१	वृश्चिक	३३१	कुंभ	२६७
मिथुन	३१०	कन्या	३१८	धन	३३६	मीन	२३८

लग्नसाधनाची रीति.

ज्या वेळेचें स्पष्टजन्मलग्न सिद्ध करावयाचें असेल त्या वेळेचा स्पष्टरवि करून त्यांत अयनांश मिळवावे. जी बेरीज येईल तींतून राशीचा अंक बाजूस ठेवावा. बाकी जे अंशकलादि अंक राहतील, ते बाजूस ठेविलेल्या राशीच्या पुढील राशीचे भुक्तांश होत. तीस अंश म्हणजे एक राशि होतो; म्हणून हे भुक्तांश तिसांतून वजा करावे म्हणजे त्याच राशीचे भोग्यांश येतील. ज्या राशीचे हे भोग्यांश असतील त्या राशीच्या (स्थानिक) उदयाच्या पळांनीं त्यांस गुणून तिसांनीं भागावें. जें उत्तर येईल तें त्या राशीचीं भोग्य पळें होत. हीं भोग्य पळें, सूर्योदयापासून जन्मकालपर्यंत जितक्या घटिका व पळें गेलीं असतील त्या सर्वांचीं पळें करून, वजा द्यावीं. जी बाकी राहील तींतून, ज्या राशीच्या उदयानें गुणलें असेल, त्याच्या पुढील राशींचे जितके उदय अनुक्रमें वजा जातील तितके द्यावे. आणि नंतर जी पलात्मक बाकी राहील तिला तिसांनीं गुणावें व त्या गुणाकारास अशुद्धोदयानें म्हणजे ज्या राशीचा उदय वजा गेला नसेल त्या उदयानें भागावें. उत्तर अंशकलाविकलात्मक आणावें, आणि मेष राशीपासून जितक्या राशींचे उदय वजा गेले असतील तितके राश्यंक त्यांत मिळवावे. नंतर त्या बेरजेंतून अयनांश वजा करावे, म्हणजे निरयन स्पष्टलग्न झालें.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

उदाहरण—शके १८३२ वैशाखकृष्ण ३ शुक्रवारीं २० घटिका ३० पळांनीं एकाचा जन्म झाला आहे. या वेळेचें स्पष्टलग्न सिद्ध करावयाचें आहे. या वेळेचा स्पष्टरवि मागें दिला आहे तो (उदाहरण पहिलें) पहा आणि त्यांत अयनांश मिळवा. येथें राशीचा अंक २, म्हणजे वृषभराशि आहे, तो बाजूस ठेवा.

रा०	अं०	क०	वि०	
१	१२	३८	६	स्पष्टरवि.
+०	२३	८	८	अयनांश.
२	५	४६	१४	सायन स्पष्टसूर्य.

बाकी ५ अंश ४६ कला आणि १४ विकला हे वृषभ राशीच्या पुढील राशी जी मिथुन तिचे भुक्तांश होत.

हे अंक ३० अंशांतून वजा द्या म्हणजे मिथुनराशीचे भोग्यांश निघतील.

अं०	क०	वि०
३०	०	०
– ५	४६	१४
२४	१३	४६

आतां हे भोग्यांश २४ अंश १३ कला आणि ४६ विकला इतके आहेत. याला मिथुनराशीच्या स्थानिक उदयाच्या पळांनीं गुणा. मिथुनराशीच्या स्थानिक उदयाचे पलांक ३१० आहेत. म्हणून

४६	१३	२४
×३१०	×३१०	×३१०
६०)१४२६०	४०३०	७४४०
२३७–४० बाकी	+२३७	+७१
	६०)४२६७	७५११ अं.
	७१–७ बाकी	

७५११ अंश ७ कला आणि ४० विकला उत्तर आलें. येथें कला व विकला सोडून द्या आणि अंशांना ३० नीं भागा. ७५११÷३०=२५० भागाकार आला. हे मिथुन लग्नाचे भोग्यांश होत. आतां इष्टकाल २० घटिका ३० पळें आहे, यांचीं पळें करा २०×६०=१२००+३०=१२३० पळें झालीं. वर मिथुनराशीच्या पळांनीं गुणिलें आहे. म्हणून मिथुनराशीचे भोग्यांश व त्याच्या पुढील राशी जी कर्क त्यापासून जितक्या राशींचे उदय १२३० पळांतून वजा जातील तितके द्या.

१२३०	
–२५०	मिथुन राशीचे भोग्यांश
९८०	
–३३६	कर्कोदय पळें
६४४	
–३३१	सिंहोदय पळें
३१३	

बाजूस वजाबाकी करून दाखविली आहे ती पहा. बाकी ३१३ राहिली. तींतून कन्या राशीच्या उदयाचीं पळें ३१८ वजा जात नाहींत म्हणून कन्यालग्न जन्मकालीं होतें, हें सिद्ध झालें. आतां सिंहोदय वजा जाऊन बाकी ३१३ राहिली;

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

तिला रीतीप्रमाणें तिसांनीं गुणा. आणि अशुद्धोदयाच्या म्हणजे ज्या लग्नाचीं पळें वजा जात नाहींत त्याच्या (कन्योदयाच्या) पळांनीं भागा. जसें, ३१३×३०=९३९०÷३१८=२९ अंश ३१ कला आणि ४१ विकला इतके कन्यालग्नाचे अंश उदित होते,

अं०	क०	वि०
२९	३१	४१
अय०—२३	८	८
६	२३	३३

यांतून अयनांश वजा द्या. आणि मेषराशीपासून कन्याराशीचा अनुक्रमांक ६ हा अंशाचे अंकामागें मांडा. म्हणजे ६ राशि ६ अंश २३ कला आणि ३३ विकला इतकें निरयन स्पष्टलग्न आलें.

आतां भोग्यकालाहून इष्टकाल कमी असतां स्पष्टलग्न कसें साधावें हें सांगतों. जन्मकालाचे पलात्मक अंक कमी असून भोग्यकालाचे अंक अधिक असतील तेव्हां जन्मकालाच्या पलात्मक अंकाला ३० नीं गुणून सायनसूर्य ज्या राशीस असेल त्या राशीच्या स्थानिक उदयात्मक पलांनीं भागावें. जो अंशात्मक भागाकार येईल तो त्या वेळेच्या स्पष्टसूर्यामध्यें मिळवावा. म्हणजे तात्कालिक स्पष्टलग्न होतें. व त्यांतून अयनांश वजा केले म्हणजे निरयन स्पष्ट लग्न होतें. वरचेंच उदाहरण घ्या. सायन स्पष्ट रवि २ रा० ५ अं० ४६ क० १४ विकला येथपासून मागील उदाहरणांत तयार केलेला भोग्यकाल २५० पळें आहे. आतां जन्मकाल सूर्योदयापासून १ घटिका १५ पळांनीं आहे असें समजा. यांचीं पळें ७५ झालीं. या इष्टकालांतून भोग्यकाल २५० पळें वजा होत नाहीं, म्हणून रीतीप्रमाणें ७५×३०=२२५० याला मिथुनराशीच्या उदयाच्या पळांनीं भागा. कारण सायनसूर्य मिथुनराशीला आहे. २२५०÷३१०=७ अंश १५ कला २९ विकला इतका भागाकार आला. हे अंशादि अंक सायन स्पष्टसूर्यांत मिळवा. सायन स्पष्टसूर्य २ रा०, ५ अं०, ४६ क०, १४ वि०;+० रा०, ७ अं०, १५ क०, २९ वि०;=२ रा०, १३ अं०, १ क०, ४३ वि०; इतकें स्पष्टलग्न झालें. यांतून अयनांश २३ अं० ८ क० ८ वि० वजा करा. म्हणजे १ रा० १९ अं० ५३ क० ३५ वि० इतकें इष्टकालचें निरयन स्पष्टलग्न झालें.

लग्नसाधनाची स्थूल रीति.

मेषे मीने चतुर्नाड्यः सार्धाश्च वृषकुंभयोः ।
मिथुने मकरे पंच शेषाः सार्धाः प्रकीर्तिताः ॥ २ ॥
मेषे मीने पलान्यष्टौ नवकं वृषकुंभयोः ।
मिथुने मकरे दिक्च शेषा रुद्राः प्रकीर्तिताः ॥ ३ ॥

इष्टकाळचें लग्न कसें साधावें याची सूक्ष्म रीति वर दिलीच आहे. आतां लग्नसाधनाची स्थूल रीति सांगतों. प्रश्न वगैरे पहावयाचे असतील म्हणजे ज्या वेळेस

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

लग्नाचे भुक्तभोग्यांश वगैरे कळण्याची विशेष आवश्यकता नसेल अशा वेळीं स्थूल रीतीनें लग्न साधावें. म्हणजे थोड्या वेळांत काम होईल. स्थूल रीतीनें लग्न सिद्ध करण्याकरितां मेषादि प्रत्येक लग्नाचा किती घटिका भोग्यकाल असतो, व प्रत्येक दिवशीं त्याचीं किती पळें भुक्त होतात हें समजलें पाहिजे, म्हणून त्याविषयीं प्रथम लिहितों. मेष व मीन हीं दोन लग्नें चार घटिका भोगतात. वृषभ व कुंभ साडेचार घटिका भोगतात. मिथुन व मकर हीं पांच घटिका व बाकीचीं म्हणजे कर्क, सिंह, कन्या, तूळ, वृश्चिक आणि धन हीं साडेपांच घटिका भोगतात. एकाद्या लग्नाच्या जितक्या एकंदर भोग्य घटिका असतील, त्या घटिकांच्या दुप्पट पळें रोज तें लग्न कमी होत जातें. जसें, मेष व मीन रोज ८ पळें; वृषभ व कुंभ रोज ९ पळें; मिथुन व मकर रोज १० पळें व बाकीचीं म्हणजे कर्क, सिंह, कन्या, तूळ, वृश्चिक आणि धन हीं रोज ११ पळें भोगतात. रीति—ज्या वेळेचें लग्न पाहिजे असेल त्या वेळेपर्यंत त्या दिवसाच्या सूर्योदयापासून किती घटिका व पळें गत झालीं आहेत हें प्रथम काढावें. ह्यास इष्टकाल म्हणतात. नंतर जी चालू संक्रांत असेल तिला आरंभ होऊन जितके दिवस झाले असतील तितक्या दिवसांना त्या संक्रांतीचीं प्रतिदिवशीं भोगण्याचीं जीं पळें असतील त्यांनीं गुणावें. जो गुणाकार येईल तीं पळें होत. त्याला ६० नीं भागून घटिका कराव्या. त्या घटिका त्या संक्रांतीच्या एकंदर घटिकांतून वजा कराव्या. बाकी जी राहील तितकी संक्रांत भोगावयाची राहिली असें समजावें. जी चालू संक्रांत असेल तेंच दिवसाचें प्रथम लग्न होय. तें जितकें भोगावयाचें राहिलें असेल तितकें मांडून त्याच्या खालीं अनुक्रमानें त्याच्या पुढील लग्नांच्या घटिका मांडीत जाव्या. ज्या लग्नाच्या घटिकांत आपला इष्टकाल येईल तें त्या वेळचें लग्न होय. उदाहरणार्थ, सहाव्या तारखेस सायंकाळीं साडेपांच वाजतां कोणतें लग्न आहे तें काढावयाचें आहे. त्या दिवशीं सूर्योदय बरोबर साडेसहा वाजतां झाला आहे. म्हणजे सूर्योदयापासून एकंदर ११ तास म्हणजे २७ घटिका ३० पळें झालीं. हा इष्टकाल झाला. आतां चालू संक्रांत कन्या आहे असें समजा. तिला पहिल्या तारखेस सकाळीं साडेसहा वाजतां आरंभ झाला आहे. पहिल्या तारखेपासून इष्टकालपर्यंत म्हणजे सहाव्या तारखेच्या दिवशीं सायंकाळीं साडेपांच वाजेपर्यंत एकंदर ५॥ दिवस झाले. म्हणून रीतीप्रमाणें ५॥×११ (कन्यालग्नाचीं प्रतिदिवशीं भोगण्याचीं पळें) = ६०॥ = १ घटिका ०॥ पळ. अर्धें पळ सोडावें = १ घटिका कन्यालग्न इष्टकालपर्यंत भुक्त झालें. कन्यालग्नाच्या एकंदर घटिका ५॥ − १ भुक्त घटिका = ४॥ घटिका म्हणजे ४ घटिका ३० पळें

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

		घ०	प०
	कन्या	४	३०
	तूळ	५	३०
	वृश्चिक	५	३०
	धन	५	३०
	मकर	५	३०
		२६	०

इतकें कन्यालग्न भोगावयाचें राहिलें. आतां आपल्याला २७॥ घटिका दिवसास कोण लग्न आहे तें पहावयाचें आहे; म्हणून बाजूस दाखविल्याप्रमाणें मकरलग्न २६ घटिका दिवसास संपून नंतर पुढें कुंभलग्न ४॥ घटिका म्हणजें ३०॥ घटिका दिवसापर्यंत आहे व आपला इष्टकाल २७॥ घटिका आहे, म्हणजे २६ घटिकांपुढें व ३०॥ घटिकांच्या आंत आहे म्हणून इष्टकालीं कुंभलग्न आहे असें जाणावें.

तासमिन्युटांनीं लग्न काढण्याची रीति.

ज्या वेळेचें लग्न काढावयाचें असेल त्या वेळेपर्यंत (इष्टकालापर्यंत) त्या दिवसाच्या सूर्योदयापासून किती तास व मिन्युटें झालीं, हें काढून ते अंक बाजूस मांडून ठेवावे. नंतर जी चालू संक्रांति असेल, (म्हणजे ज्या राशीस रवि असेल) त्या संक्रांतीच्या आरंभापासून इष्टकालापर्यंत किती अंश किंवा किती दिवस गेले हें पाहून त्या गतदिवसांच्या अंकांनीं त्या चालू संक्रांतीच्या ध्रुवांकांना गुणावें (प्रत्येक राशीचा भोग्यकाल व ध्रुवांक खालीं दिले आहेत) जो गुणाकार येईल त्याला ६० नीं भागावें; कारण हे ध्रुवांक सेकंदांचे अंक आहेत. म्हणून भागाकार येईल तीं मिन्युटें होत. बाकी ४० हून अधिक असेल तर त्याचें एक मिन्युट धरून भागाकारांत मिळवावें. ४० हून कमी बाकी असतां ते अंक सोडून द्यावे. भागाकाराचे अंक ६० हून अधिक असतील तर त्याचे ६० नीं भागून तास करावे व बाकी अंक रहातील तीं मिन्युटें समजावीं. हे तास मिन्युटांचे अंक चालू संक्रांतीच्या राशीच्या तासमिन्युटांच्या अंकांतून वजा देऊन जे अंक राहतील त्यांत पुढील राशींचीं तास मिन्युटें इष्टकालापर्यंत मिळवीत जावीं. ज्या राशीच्यामध्यें इष्टकाल येईल तोच राशी इष्टकालचें लग्न समजावें. आतां प्रत्येक राशीचा भोग्यकाल किती असतो व ध्रुवांक किती असतात हें सांगतों.

राशी	भोग्यकाल तास मिन्यु०	ध्रुवांक सेकंद	राशी	भोग्यकाल तास मिन्यु०	ध्रुवांक सेकंद
मेष	१—३६	१९२	तूळ	२—१२	२६४
वृषभ	१—४८	२१६	वृश्चिक	२—१२	२६४
मिथुन	२— ०	२४०	धनु	२—१२	२६४
कर्क	२—१२	२६४	मकर	२— ०	२४०
सिंह	२—१२	२६४	कुंभ	१—४८	२१६
कन्या	२—१२	२६४	मीन	१—३६	१९२

आतां या रीतीच्या स्पष्टीकरणार्थ एक उदाहरण करून दाखवितों. असें समजा

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कीं, मिथुन राशीचे (चालू संक्रांतीचे) वीस अंश किंवा वीस दिवस भुक्त झाले आहेत त्या दिवशीं दुपारीं दोन वाजून चोवीस मिन्युटांनीं कोणतें लग्न आहे तें काढावयाचें आहे. सूर्योदय ६ तास ४ मिन्युटांनीं आहे. म्हणजे इष्टकालपर्यंत आठ तास वीस मिन्युटें झालीं. रीतीप्रमाणें मिथुन राशीच्या ध्रुवांकांना मिथुन-राशीच्या भुक्त अंशांनीं गुणा. म्हणून ध्रुवांक २४० × भुक्तांश २०=४८०० सेकंद ÷ ६० = ८० मिन्युटें ÷ ६० = १ तास २० मिन्युटें हे अंक मिथुनराशीच्या एकंदर भोग्यकालांतून वजा द्या. मिथुनराशीचा भोग्यकाल २ तास ० मिन्युटें – १ ता० २० मि० = ० ता० ४० मि० यांत कर्कादि पुढील राशींचे अंक मिळवा + कर्क २ ता. १२ मि. = २ ता. ५२ मि. + सिंह २ ता. १२ मि. = ५ ता. ० मि. + कन्या २ ता. १२ मि. = ७ ता. १२ मि. + तूळ २ ता. १२ मि. = ९ ता. २४ मि. आपला इष्टकाल ८ तास २० मि. आहे, तो ९ ता. २४ मिन्युटांचे आंत आहे म्हणून इष्टकालचें तूळ लग्न आहे असें समजावें.

द्वादशभावसाधन.

ज्या इष्टकालचे भाव साधावयाचे असतील त्या वेळेचें लग्न पूर्वीं सांगितल्या-प्रमाणें साधावें म्हणजे तोच प्रथमभाव होतो. दशमभावांतून सप्तमभाव उणें करून बाकी राहील तिला तिहींनीं भागून भागाकाराचे राश्यादि अंक प्रथमभावांत मिळवावे म्हणजे द्वितीयभाव होतो. दशमभावांतून सप्तमभाव वजा करून जी वजाबाकी येईल तिला तिहींनीं भागावें. जो भागाकार येईल त्याची दुप्पट करून ती प्रथमभावांत मिळवावी म्हणजे तृतीयभाव होतो. दशमभावांत ६ राशी मिळविल्या म्हणजे चतुर्थभाव होतो. दशमभावांतून सप्तमभाव वजा करून त्या वजाबाकीस तिहींनीं भागावें. जो भागाकार येईल तो दोन राशी ० अंश ० कला यांतून उणें करावा. जे शेषांक राहतील ते चतुर्थभावांत मिळवावे म्हणजे पंचमभाव होतो, व त्या शेषांकांची दुप्पट करून चतुर्थभावांत मिळवावी म्हणजे षष्ठभाव होतो. प्रथमभाव, द्वितीयभाव आणि तृतीयभाव यांत सहा सहा राशी मिळविल्या म्हणजे अनुक्रमें सप्तमभाव, अष्टमभाव आणि नवमभाव तयार होतात. तसेंच, पंचमभावांत सहा राशी व षष्ठभावांत सहा राशी मिळविल्या म्हणजे अनुक्रमें एकादशभाव आणि द्वादशभाव तयार होतात. आतां दशमभाव साधण्याची रीति सांगतों. तन्वादि द्वादशभावसाधनाचा प्रकार किंचित् कठिण आहे. त्यांतल्या-त्यांत दशमभाव साधणें थोडें अधिक कठिण आहे. दशमभाव तयार झाल्यानंतर इतर भाव तयार करणें मात्र बरेंच सोपें आहे. असो. दशमभाव साधण्याकरितां नतोन्नत कढावें लागतें, म्हणून तत्संबंधीं आतां लिहितों. पण नतोन्नत म्हणजे काय हें येथें प्रथम सांगितलें पाहिजे. नतांश खस्वस्तिकापासून मोजितात. आपल्या डोकीवर समोरासमोर आकाशांतील जो बिंदु त्याला खस्वस्तिक म्हणतात. खस्वस्तिक-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

बिंदु हाच कुंडलींतील दशमभाव होय. खस्वस्तिक बिंदूंत मध्याह्नीं सूर्य असतो. अर्थात् त्याच्यापूर्वी तो खालीं असेल हें उघड आहे. परंतु तो किती खालीं आहे म्हणजे नतांश किती आहेत, हें, दिनार्धांतून इष्टकाल उणें करावा म्हणजे समजतें. तात्पर्य, मध्याह्नींचा सूर्य आणि इष्टकाल या दोहोंमधील जें आकाशांतील अंतर किंवा जो कोन त्यासच नतांश अशी संज्ञा आहे. खस्वस्तिकबिंदूच्या समोरासमोर (लग्नापासून चतुर्थस्थान) म्हणजे आपल्या पायांखालचा आकाशांतील जो बिंदु तें अधःस्वस्तिक होय. या बिंदूंत मध्यरात्रीं पाताळांत सूर्य असतो. आकाशस्थ इष्ट वस्तु व ग्रहांची क्षितिजावरील उंची या दोहोंमधील जो कोन त्यास उन्नतांश म्हणतात.

दिवसा मध्याह्नापूर्वी जन्म असल्यास सूर्योदयापासून जितक्या घटिकांनीं जन्म असेल तितक्या घटिका दिनमानाचें अर्ध करून त्यांतून वजा केल्या म्हणजे दिवसपूर्वनत होतें. दिवसा मध्याह्नानंतर जन्म असल्यास सूर्योदयापासून जितक्या घटिकांनीं जन्म असेल तितक्या घटिका दिनमानांतून वजा घ्याव्या व बाकी राहील ती दिनार्धांतून वजा करावी म्हणजे दिवसपश्चिमनत होतें. मध्यरात्रीनंतर जन्म असल्यास जन्मकालापासून पुढें जी शेष रात्र राहिली असेल तिच्यांत दिनार्ध मिळविलें म्हणजे रात्रिपूर्वनत होतें. मध्यरात्रीपूर्वी इष्टकालपर्यंत जी गतरात्र असेल तिच्यांत दिनार्ध मिळविलें म्हणजे रात्रिपश्चिमनत होतें. नतकाल ३० घटिकांतून वजा केला म्हणजे उन्नतकाल होतो. पूर्वनत वजा केलें असल्यास त्यास पूर्वोन्नतकाल म्हणतात, व पश्चिमनत वजा केलें असल्यास पश्चिमोन्नतकाल म्हणतात. पूर्वनत असेल तर पूर्वोन्नतकाल करून त्यासच इष्टकाल कल्पून तात्कालिक स्पष्ट सूर्य करून त्यांत ६ राशी मिळवून लंकोदयांनीं पूर्वोक्तरीतीप्रमाणें लग्न साधावें, म्हणजे तोच दशमभाव होतो. आणि पश्चिमनत असेल तर नतकाल हाच इष्टकाल कल्पून तात्कालिक स्पष्ट सूर्य करून लंकोदयांनीं पूर्वी सांगितल्याप्रमाणें लग्न साधावें, म्हणजे तोच दशमभाव होतो. बरोबर मध्याह्नीं जन्म असतां तात्कालिक स्पष्ट सूर्यच दशमभाव होतो. आणि बरोबर मध्यरात्रीं जन्म झाला तर तात्कालिक सूर्य हाच चतुर्थभाव होतो.

उदाहरण—वैशाख शुक्ल ८ सोमवार जन्मकाल ५ घटिका ३० पळें. दिनमान ३२ घटिका १६ पळें याचें दिवसपूर्वनत काढा. दिनमानाचें अर्ध १६ घटिका ८ पळें. त्यांतून उणें जन्मकाल ५ घटिका ३० पळें=१० घ० ३८ पळें हें दिवसपूर्वनत होय. जर मध्याह्नानंतर जन्मकाल असेल तर दिवसपश्चिमनत काढून दशमभावसाधन केलें पाहिजे. उदाहरणार्थ, जन्मकाल २४ घ० १२ पळांनीं आहे. ह्या घटिका दिनमानांतून म्हणजे ३२ घटिका १६ पळांतून वजा करितां बाकी ८ घटिका ४ पळें राहतात. हीं घटिका पळें दिनार्धांतून म्हणजे १६ घटिका ८ पळांतून वजा जातां बाकी ८ घटिका ४ पळें राहतात. हें दिनपश्चिमनत झालें. एकाचा जन्म रात्रीं सूर्योदयापासून ५५ घ० ५ पळांनीं आहे, म्हणून दशमभावसाधनार्थ येथें रात्रिपूर्व-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

नत काढलें पाहिजे. रीतीप्रमाणें इष्टकाल ५५ घटिका ५ पलें हे अंक अहोरात्रीच्या घटिका ६० यांतून वजा करितां शेष ४ घ० ५५ प० राहतात. यांत दिनमानार्ध घ० १६ प० ८ मिळवितां घ० २१ प० ३ इतकी बेरीज आली. हें रात्रिपूर्वनत होय. गतरात्र घ० १० प० १२ या वेळीं म्हणजे मध्यरात्रीपूर्वीं एकाचा जन्म आहे म्हणून दशमभाव साधण्याकरितां येथें रात्रिपश्चिमनत काढलें पाहिजे. म्हणून गतरात्र घ० १० प० १२ + दिनार्ध घ० १६ प० ८ = घ० २६ प० २० हें रात्रिपश्चिमनत होय. आतां द्वादशभाव तयार करून दाखवितों.

उदाहरण—शके १८३२ वैशाख शुक्ल ८ सोमवार तारीख १६ मे १९१० ह्या दिवशीं ७ वाजून ४० मिनिटांनीं एकाचा जन्म झाला आहे त्या वेळेचे भाव साधावयाचे आहेत. या दिवशीं सूर्योदय ५ वाजून २८ मिनिटांनीं आहे; म्हणून इष्टकालपर्यंत २ तास आणि १२ मिनिटें म्हणजे ५ घटिका ३० पलें झालीं. या वेळेचा स्पष्टसूर्य १ रा० १ अं० ५० क० २६ विकला आहे. यांत २३ अंश ८ क० ८ वि० इतके अयनांश मिळवा. बेरीज १ रा० २४ अं० ५८ क० ३४ वि० इतकी आली. हा इष्टकालचा स्पष्टसूर्य झाला. याचे अंशादि अंक ३० अंशांतून वजा करा. बाकी ५ अं० १ क० २६ वि० इतकी आली. इष्टकालचा रवि वृषभ राशीस आहे म्हणून या बाकीला वृषभोदय पलें २६७ यांनीं गुणा. गुणाकार १३४१ अंश २६ क० ४२ वि० इतका आला. येथें कला व विकला सोडून द्या आणि अंशांना ३० नीं भागा. १३४१ ÷ ३० = ४४ हा भागाकार आला. हा रविभोग्यकाल झाला. इष्टकाल घ० ५ प० ३० = ३३० पलें आहे, यांतून रविभोग्यकाल वजा करा. ३३० उणें ४४ बाकी २८६ पलें राहिलीं. ह्यांतून मिथुनोदय पलें ३१० वजा जात नाहींत म्हणून मिथुनोदय हा अशुद्धोदय झाला. आतां २८६ × ३० = ८५८० यास अशुद्धोदय जो मिथुनोदय याचीं पलें ३१० यांनीं भागा. भागाकार २७ अं० ४० क० ३८ वि० इतका आला. येथें अशुद्धोदय मिथुन आहे म्हणून त्याच्या पूर्वीचा वृषभ राशीचा अंक २ हा अंशांच्या मागें राशिस्थानीं मिळविला तेव्हां २ रा० २७ अं० ४० क० ३८ वि० हें सायन लग्न झालें. यांतून अयनांश ० रा० २३ अं० ८ क० ८ वि० वजा केले म्हणजे २ रा० ४ अं० ३२ क० ३० वि० हें इष्टकालचें निरयन स्पष्टलग्न झालें. हा प्रथमभाव झाला. यांत ६ राशी मिळविल्या म्हणजे ८ रा० ४ अं० ३२ क० ३० विकला हा सप्तमभाव झाला.

आतां दशमभावसाधनाचें उदाहरण करून दाखवितों. जन्मकाल सूर्योदयापासून ५ घटिका ३० पळांनीं आहे. या वेळचा दशमभाव सिद्ध करावयाचा आहे. जन्मकाल मध्याह्नापूर्वीं आहे म्हणून येथें दिनपूर्वनत केलें पाहिजे. दिनमान ३२ घटिका १६ पलें आहे. याचें अर्ध १६ घटिका ८ पलें यांतून उणें ५ घटिका ३०

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पळें=१० घ० ३८ प० हें दिनपूर्वनत झालें. हें ३० तून वजा केलें म्हणजे १९।२२ हें दिनपूर्वोन्नत झालें. आतां १९ घ० २२ प० इष्टकाल कल्पून लग्नाप्रमाणें दशमभाव साधितों. इष्टकालचा सायन स्पष्टसूर्य राशि १ अंश २४ क० ५८ वि० ५४ इतका आहे त्यांत ६ राशी मिळवा म्हणजे राशि ७ अंश २४ क० ५८ वि० ५४ इतकी बेरीज होते. याचे भोग्य अंश काढावयाचे आहेत म्हणून राशीचा अंश ७ हा बाजूस ठेवून बाकीचे अंशकलादि अंक अंश ३० यांतून वजा करा. अं० ३० क० ० वि० ० यांतून उणें अं० २४ क० ५८ वि० ३४=५ अं० १ क० २६ वि० इतकी वजाबाकी आली. हिला २९९ अंकांनीं गुणा; कारण, बाजूस ठेविलेला अंक ७ हा तूळ राशीचा दर्शक आहे व याच्या पुढील राशि वृश्चिक आहे व लंकावृश्चिकोदय पळें २९९ आहेत. गुणाकार १५०२ अं० ८ क० ३४ वि० इतका आला. येथें कला व विकला यांचे अंक सोडून द्या किंवा याबद्दल १ अंश धरूं म्हणजे १५०३ अंश झाले. ह्याला ३० नीं भागा. भागाकार ५० आला. हा भोग्यकाल झाला. आतां हा भोग्यकाल उन्नतकालरूप इष्ट घ० १९ पळें २२ याचीं पळें करून त्यांतून वजा करा. १९×६०=११४०+२२=११६२ यांतून उणें भोग्यकाल पळें ५० बाकी १११२ राहिली. यांतून वजा लंका धनोदय पळें ३२३ बाकी ७८९ राहिली. यांतून वजा लंकामकरोदय पळें ३२३ बाकी ४६६ राहिली. यांतून लंकाकुंभोदय पळें २९९ वजा जातां बाकी १६७ राहिली. यांतून लंकामीनोदय पळें २७८ वजा जात नाहींत म्हणून हा अशुद्धोदय होय. बाकी १६७ राहील तिला ३० नीं गुणिलें. १६७×३० गुणाकार ५०१० आला. यास अशुद्धोदय जो मीन त्याच्या उदयपळांनीं म्हणजे २७८ नीं भागिलें. तेव्हां भागाकार १८ अं० १ क० १७ वि० इतका आला. यांत अशुद्धोदयाच्या पूर्वींचा राशि ११ मिळविला तेव्हां ११ राशि १८ अंश १ क० १७ वि० इतकी बेरीज झाली. यांतून अयनांश २३ अं० ८ क० उणे केले तेव्हां वजाबाकी १० रा० २४ अं० ५३ क० ९ वि० इतकी आली. हा दशमभाव झाला.

अं०	क०	वि०
५	१	२६
		×२९९
१५०२	८	३४

आतां दशमभावामध्यें सप्तमभाव वजा करा. दशमभाव १० रा० २४ अं० ५३ क० ९ वि० यांतून उणें सप्तमभाव ८ रा० ४ अं० ३२ कला ३० वि० बाकी २ रा० २० अं० २० क० ३९ वि० इतकी आली. या बाकीचा तृतीयांश ० रा० २६ अं० ४६ क० ५३ वि० इतका आहे. (येथें राशीचा अंक २ याचा तृतीयांश काढितांना तिहींनीं भाग जात नाहीं म्हणून तिसांनीं गुणून राशीचे अंश करून नंतर भागिलें आहे. जसें २×३०=६०+२०=८०÷३=२६ इत्यादि) हा प्रथम म्हणजे तनुभावामध्यें मिळवा. प्रथमभाव २ रा० ४ अंश० ३२ क० ३० वि० + ० रा०

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

२६ अं० ४६ क० ५३ वि० या दोहोंची बेरीज ३।१।१९।२३ इतकी आली. हा द्वितीयभाव झाला. पूर्वीं आणिलेल्या तृतीयांशाची दुप्पट अं० २६।४६।५३ × २ = रा० १।२३।३३।४६ हे अंक तनुभावांत मिळविले म्हणजे रा० ३।२८।६।१६ इतकी बेरीज आली. हा तृतीयभाव झाला. वर दिलेल्या दशमभावांत ६ राशि मिळविल्या तेव्हां ४।२४।५३।९ हा चतुर्थभाव झाला. आतां पूर्वीं आणिलेला तृतीयांश दोन राशींत वजा करा. जसें, २ रा० ० अं० ० क० ० वि० यांतून वजा ० रा० २६ अं० ४६ क० ५३ विकला. बाकी १ रा० ३ अं० १३ क० ७ वि० इतकी राहिली. ही चतुर्थभावांत मिळविली तेव्हां ५।२८।६।१६ इतकी बेरीज आली, हा पंचमभाव झाला. आतां २ राशींतून तृतीयांश वजा करून जी बाकी म्हणजे १।३।१३।७ राहिली हिची दुप्पट २।६।२६।१४ ही चतुर्थभावांत ह्मणजे ४।२४।५३।९ या अंकांत मिळविली ह्मणजे ७।१।१९।२३ इतकी बेरीज आली. हा षष्ठभाव झाला. सप्तमभाव वर उदाहरण करून दाखविलाच आहे. द्वितीयभावांत म्हणजे ३।१।१९।२३ या अंकांत ६ राशी मिळविल्या म्हणजे ९।१।१९।२३ हा अष्टमभाव झाला. तसेंच, तृतीयभावांत ६ राशी मिळविल्या ह्मणजे ९।२८।६।१६ इतकी बेरीज आली, हा नवमभाव झाला. दशमभाव वर उदाहरण करून आणिलाच आहे. पंचमभावांत ६ राशी मिळविल्या तेव्हां ११।२८।६।१६ इतका एकादशभाव झाला. आणि षष्ठभावांत म्हणजे ७।१।१९।२३ या अंकांत ६ राशी मिळविल्या तेव्हां १।१।१९।२३ हा द्वादशभाव म्हणजे व्ययभाव झाला. ह्याप्रमाणें द्वादश भाव तयार करितात.

आतां भावसंधिप्रकार सांगतों. तनुभाव ह्मणजे प्रथमभाव आणि धनभाव ह्मणजे द्वितीयभाव या दोहोंची बेरीज करून अर्ध केलें ह्मणजे तनुभावाचा विरामसंधि आणि द्वितीयभावाचा आरंभसंधि होतो. द्वितीयभाव आणि तृतीयभाव या दोहोंची बेरीज करून अर्ध केलें ह्मणजे द्वितीयभावाचा विरामसंधि आणि तृतीयभावाचा आरंभसंधि होतो. याचा अर्थ असा कीं, पूर्वींच्या भावाचे आणि त्याच्या पुढील भावाचे जे राश्यादि अंक, त्या दोहोंची बेरीज करून त्या बेरजेस दोहोंनीं भागिलें म्हणजे जें लब्ध येईल तें पूर्वींच्या भावाचा विरामसंधि व पुढील भावाचा आरंभसंधि होतो. याचप्रमाणें द्वादशभावांचे संधि तयार करावे. शेवटचा ह्मणजे व्ययभाव आणि प्रथमभाव या दोहोंची बेरीज करून तिचें अर्ध केलें ह्मणजे व्ययभावाचा विरामसंधि व तनुभावाचा आरंभसंधि होतो. आतां पूर्वीं तयार केलेले द्वादशभाव घेऊन भावसंधींचें उदाहरण करून दाखवितों.

प्रथमभाव २ रा० ४ अं० ३२ क० ३० वि० आणि द्वितीयभाव ३ रा० १ अं०

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

१९ क० २३ वि० या दोहोंची बेरीज ५ रा० ५ अं० ५१ क० ५३ वि० इतकी झाली. या बेरजेचें अर्ध केलें तेव्हां २ रा० १७ अं० ५५ क० ५७ वि० हा तनुभावाचा विरामसंधि व द्वितीयभावाचा आरंभसंधि झाला. द्वितीयभाव ३ रा० १ अं० १९ क० २३ वि० आणि तृतीयभाव ३ रा० २८ अं० ६ क० १६ वि० यांची बेरीज ६ रा० २९ अं० २५ क० ३९ वि० इतकी झाली. हिचें अर्ध केलें तेव्हां ३ रा० १४ अं० ४२ क० ४९ वि० हा द्वितीयभावाचा विरामसंधि व तृतीयभावाचा आरंभसंधि झाला. तृतीयभाव ३ रा० २८ अं० ६ क० १६ वि० आणि चतुर्थभाव ४ रा० २४ अं० ५३ क० ९ वि० यांची बेरीज ८ रा० २२ अं० ५९ क० २५ वि० इतकी झाली. हिचें अर्ध केलें तेव्हां ४ रा० ११ अं० २९ क० ४२ वि० हा तृतीयभावाचा विरामसंधि आणि चतुर्थभावाचा आरंभसंधि झाला. चतुर्थभाव ४ रा० २४ अं० ५३ क० ९ वि० आणि पंचमभाव ५ रा० २८ अं० ६ क० १६ वि० यांची बेरीज १० रा० २२ अं० ५९ क० २५ वि० इतकी झाली. हिचें अर्ध ५ रा० ११ अं० २९ क० ४२ वि० हा चतुर्थभावाचा विरामसंधि व पंचमभावाचा आरंभसंधि झाला. पंचमभाव ५ रा० २८ अं० ६ क० १६ वि० आणि षष्ठभाव ७ रा० १ अं० १९ क० २३ वि० या दोहोंची बेरीज १२ रा० २९ अं० २५ क० ३९ वि० इतकी झाली. या बेरजेचें अर्ध केलें म्हणजे ६ रा० १४ अं० ४२ क० ४९ वि० हा पंचमभावाचा विरामसंधि व षष्ठभावाचा आरंभसंधि झाला. आतां षष्ठभाव ७ रा० १ अं० १९ क० २३ वि० आणि सप्तमभाव ८ रा० ४ अं० ३२ क० ३० वि० यांची बेरीज १५ रा० ५ अं० ५१ क० ५३ वि० इतकी झाली. हिचें अर्ध केलें तेव्हां ७ रा० १७ अं० ५५ क० ५६ वि० हा षष्ठभावाचा विरामसंधि व सप्तमभावाचा आरंभसंधि झाला. सप्तमभाव ८ रा० ४ अं० ३२ क० ३० वि० आणि अष्टमभाव ९ रा० १ अं० १९ क० २३ वि० यांची बेरीज १७ रा० ५ अं० ५१ क० ५३ वि० इतकी झाली. हिचें अर्ध केलें तेव्हां ८ रा० १७ अं० ५५ क० ५७ वि० हा सप्तमभावाचा विरामसंधि आणि अष्टमभावाचा आरंभसंधि झाला. अष्टमभाव ९ रा० १ अं० १९ क० २३ वि० आणि नवमभाव ९ रा० २८ अं० ६ क० १६ वि० या दोहोंची बेरीज १८ रा० २९ अं० २५ क० ३९ वि० इतकी झाली. हिचें अर्ध केलें तेव्हां ९ रा० १४ अं० ४२ क० ४९ वि० हा अष्टमभावाचा विरामसंधि व नवमभावाचा आरंभसंधि झाला. नवमभाव ९ रा० २८ अं० ६ क० १६ वि० आणि दशमभाव १० रा० २४ अं० ५३ क० ९ वि० यांची बेरीज २० रा० २२ अं० ५९ क० २५ वि० इतकी झाली. हिचें अर्ध केलें तेव्हां १० रा० ११ अं० २९ क० ४२ वि० हा नवमभावाचा विरामसंधि व दशमभावाचा आरंभसंधि झाला. दशमभाव १० रा० २४ अं० ५३ क० ९ वि० आणि एकादशभाव ११ रा० २८ अं० ६ क० १६ वि० यांची बेरीज २२ रा० २२ अं० ५९ क० २५ वि० इतकी झाली.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

हिचें अर्ध केलें तेव्हां ११ रा० ११ अं० २९ क० ४२ वि० हा दशम भावाचा विरामसंधि आणि एकादशभावाचा आरंभसंधि झाला. एकादशभाव ११ रा० २८ अं० ६ क० १६ वि० आणि द्वादशभाव १ रा० १ अं० १९ क० २३ वि० या दोहोंची वेरीज ० रा० २९ अं० २४ क० ४९ वि० इतकी झाली. हिचें अर्ध केलें तेव्हां ० रा० १४ अं० ४२ क० ४९ वि० हा एकादशभावाचा विरामसंधि व द्वादशभावाचा आरंभसंधि झाला. आतां द्वादशभाव १ रा० १ अं० १९ क० २३ वि० आणि प्रथमभाव २ रा० ४ अं० ३२ क० ३० वि० यांची वेरीज ३ रा० ५ अं० ५१ क० ५३ वि० इतकी झाली. हिचें अर्ध केलें तेव्हां १ रा० १७ अं० ५५ क० ५६ वि० हा द्वादशभाव म्हणजे व्ययभावाचा विरामसंधि व प्रथम म्हणजे तनुभावाचा आरंभसंधि झाला.

येथें जे तन्वादिद्वादशभाव तयार करून दाखविले आहेत, त्यांचें कोष्टक पुढें भावचलितकुंडली या विषयाखालीं आहे. त्या कोष्टकांत द्वादशभावाचे राश्यादि अंक मांडण्याची रीति अशी आहे कीं, पहिल्या कोष्टकांत तनुभावाचे अंक मांडून त्याच्या बाजूच्या दुसऱ्या कोष्टकांत तनुभावाच्या विरामसंधीचे अंक मांडावे. तसेंच, तिसऱ्या कोष्टकांत धनभावाचे व शेजारच्या म्हणजे चवथ्या कोष्टकांत धनभावाच्या विरामसंधीचे अंक मांडावे. याचप्रमाणें सर्व कोष्टकांत द्वादशभावांचे अंक लिहावे. या अंकांचा उपयोग भावचलित कुंडलींत ग्रह मांडितांना होतो. आतां लग्नकुंडलींत ग्रह कसे मांडावे हें प्रथम सांगतों; म्हणजे भावचलित कुंडलींत ग्रह मांडण्याची पद्धति सुलभतेनें समजेल.

लग्नकुंडलींत ग्रह मांडणें.

बाजूस द्वादशगृहात्मक जी चतुष्कोण आकृति दाखविली आहे, तिला कुंडली म्हणतात. कुंडली वर्तुलाकृतीनेंही दाखवितात. कुंडलींत बारा कोष्टकें किंवा घरें असावीं ही मुख्य गोष्ट आहे. कुंडलींतील प्रत्येक गृहास स्थान, क्षेत्र, भुवन किंवा भाव अशा संज्ञा आहेत. अमुक वेळीं अमुक ग्रह आकाशांत कोणत्या ठिकाणीं आहे हें तात्कालिक कुंडलीवरून समजतें. कुंडलींतील मध्यगृहांत लग्नाचा किंवा राशीचा दर्शक अंक प्रथम मांडून डाव्या बाजूकडील कोष्टकांत त्याच्या पुढील अंक मांडितात. कुंडलींत राशींचीं नांवें लिहीत नाहींत. फक्त राशीचा अनुक्रमांक लिहितात. जसें, मेषराशीबद्दल १, वृषभराशीबद्दल २ इत्यादि. वर जी उदाहरणार्थ कुंडली दाखविली आहे,



Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

तींत मध्यगृहांत पांच हा अंक लिहिला आहे, आणि मेषराशीपासून पांचवी राशि सिंह आहे, म्हणून ही कुंडली सिंह लग्नाची किंवा सिंह राशीची आहे, म्हणजे जन्मकालीं सिंहराशि क्षितिजांत उदित होती असें समजावें. तेंच कुंडलींतील मध्यगृह किंवा प्रथमस्थान होय. उदाहरणार्थ, वरील पांच हा अंक ज्या कोष्टकांत आहे तें प्रथमस्थान, सहा आहे तें द्वितीयस्थान, सात आहे तें तृतीयस्थान इत्यादि; आणि चार हा अंक जेथें आहे तें द्वादशस्थान होय. म्हणजे जन्मलग्नाचा किंवा जन्मराशीचा अंक वरील त्रिकोणाच्या मध्यगृहांत लिहिल्यानंतर त्याच्या डाव्या बाजूच्या कोष्टकांत पुढील अंक अनुक्रमानें लिहिले आहेत. आतां कुंडलींत ग्रह मांडण्याची रीति सांगतों.

ज्या पंधरवड्यांतील जन्मलग्नकुंडली आपणाला तयार करावयाची असेल त्याच पंधरवड्याच्या पंचांगांतील कुंडलींत जे ग्रह दाखविलेले असतात, तेच ग्रह त्या त्या राश्यंकस्थानीं आपण आंखलेल्या कुंडलीमध्यें लिहावे. इतकें मात्र अवश्य लक्ष्यांत ठेवावें कीं पंचांगस्थ कुंडलींत जे ग्रह दाखविलेले असतात, ते पंधरवड्याच्या शेवटच्या दिवशींचे प्रातःकाळचे ग्रह असतात. म्हणून जन्मकालानंतर व पंधरवड्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत मध्यें एकाद्या ग्रहांत जर फेरबदल झाला असेल तर त्याप्रमाणें आपल्या कुंडलींत मागील किंवा पुढील स्थानीं तो लिहावा. उदाहरणार्थ, सप्तमीस सायंकालीं एकाचें जन्म झालें अशी कल्पना करा. त्या वेळीं वृश्चिकराशीस बुधशुक्र आहेत; नंतर दोन दिवसांनीं म्हणजे नवमीस ते धनु राशीस गेले; या उदाहरणांत पंचांगांतील कुंडलींत ते धनुराशीस दाखविलेले असतील, परंतु आपल्याला ते वृश्चिक म्हणजे ८ राशीसच दाखविले पाहिजेत. तसेंच, चंद्रही २। दिवसांनीं बदलणारा असल्यामुळें तो पंचांगस्थ कुंडलीप्रमाणें दाखवूं नये. ज्या दिवशीं जन्म झाला असेल त्या वेळीं ज्या राशीस चंद्र असेल त्या राशीस तो लिहावा. चंद्र कोणत्या राशीस असतो किंवा एका राशींतून दुसऱ्या राशींत तो केव्हां जातो हें पंचांगांतील शेवटल्या कोष्टकांत दाखविलेलें असतें. याप्रमाणें कुंडलींत ग्रह मांडून जन्मकुंडली तयार करावी. पत्रिकेंत लग्नकुंडलीच्या शेजारीं राशिकुंडली मांडितात. राशिकुंडलींत व लग्नकुंडलींत ग्रहांचीं राशिस्थानें एकच असतात. परंतु लग्नकुंडलींत जसा मध्यगृहांत म्हणजे प्रथमस्थानीं लग्नाचा दर्शक अंक लिहितात, त्याप्रमाणें राशिकुंडलींत, ज्या राशीस चंद्र असेल त्या राशीचा दर्शक अंक, प्रथमस्थानीं लिहितात. व त्यापुढील राश्यंक अनुक्रमानें डाव्या बाजूकडील गृहांत मांडितात. उदाहरणार्थ खालीं दिलेल्या कुंडल्या पहा.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

जन्मलग्नकुंडली.



राशिकुंडली.



वरील पहिली कुंडली जन्मलग्नाची असून तींत मध्यगृहांत प्रथमस्थानीं ३ हा अंक आहे, म्हणून मिथुनलग्नावर जन्म झालेल्या मनुष्याची ती कुंडली आहे असें समजावें. त्याच्या बाजूची दुसरी कुंडली जन्मराशीची असून तींत प्रथमस्थानीं ५ हा अंक आहे म्हणून त्या मनुष्याची सिंह रास आहे असें समजावें. दोन्ही कुंडल्यांत ग्रहांचीं राशिस्थानें एकच आहेत. जसें, वृषभ राशीला म्हणजे २ अंक आहे त्यां स्थानीं रवि आहे. ५ अंक आहे तेथें चंद्र आहे. ३ अंक आहे तेथें म्हणजे मिथुन-राशीला मंगळ आहे. याचप्रमाणें सर्व ग्रह आहेत. परंतु लग्नकुंडलींत मंगळ पहिला आहे व राशिकुंडलींत तोच अकरावा आहे. याचें कारण उघड आहे कीं, एका ठिकाणीं मिथुनराशीपासून व दुसऱ्या ठिकाणीं सिंहराशीपासून प्रथमस्थान धरून मोजावयाचें आहे. म्हणजे दोन्ही कुंडल्यांत प्रथमस्थानाचा राश्यंक भिन्न आहे, म्हणून ग्रहांचीं अनुक्रमस्थानें भिन्न झालीं. राशिकुंडली वारंवार वदलते.

जन्मकाळचे स्पष्टग्रह.

र.	चं.	मं.	बु.	गु.	शु.	श.	रा.	के.
१	४	२	१	५	११	०	१	७
१	०.	१५	१६	१५	१७	६	६	६
५०	१९	४३	१२	४७	३१	३०	४	४
४६	१८	७	३६	१२	२	३१	३३	३३
			व	व				

बाजूच्या कोष्टकांत सूर्यादि नवग्रहांचे राशि—अंशकलादि अंक दिले आहेत त्यांव-रून ग्रहांची स्पष्टस्थिति समजते; म्हणजे इष्टकाळीं आकाशांत ते ते ग्रह कोणत्या रा-शीस किती अंशांवर आहेत हें कळतें आणि त्याप्रमाणेंच कुंडलींत ग्रह मांडितात. ह्या-वरून कुंडली म्हणजे आकाशस्थ उदित ग्रहांचीं स्थानें दाखविणारा एक नकाशाच होय असें झालें. आतां वरील लग्नकुंडली-मध्यें जे ग्रह लिहिले आहेत त्यांचें स्पष्टीकरण करितों. त्यांत रवि वृषभराशीस म्हणजे जेथें २ हा अंक आहे, तेथें लिहिला आहे. कारण, रवि १ राशि भोगून दुसऱ्या राशीच्या १ अंश ५० कलांवर आकाशांत तो जन्मकाळीं आहे, म्हणून तो दुसऱ्या म्हणजे वृषभराशीस मांडिला आहे. २ हा अंक लग्नस्थानापासून द्वादश-स्थानीं आहे म्हणून जन्मलग्नीं रवि बारावा आहे असें समजावें. चंद्र ४ राशी भोगून पांचव्या, म्हणजे सिंहराशीच्या १९ कलांवर तो जन्मकाळीं आहे म्हणून ५ हा अंक जेथें आहे तेथें चंद्र लिहिला. कुंडलीचें तृतीय स्थान पहा. मंगळानें २

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

राशी भोगून तिसऱ्या म्हणजे मिथुनराशीचे १५ अंश ४३ कला भोगिल्या आहेत म्हणून लग्नकुंडलींत मिथुनराशीस मंगळ लिहिला आहे. ह्याच रीतीनें बाकीचे सर्व ग्रह म्हणजे बुध वृषभराशीस, गुरु कन्याराशीस, शुक्र मीनराशीस, शनि मेषराशीस व राहु वृषभराशीस, लिहिले आहेत. राहु व केतु हे नेहमीं परस्पर समोरासमोर म्हणजे १८० अंशांवर आकाशांत सातव्या स्थानीं असतात, म्हणून राहूपासून सातव्या स्थानीं केतु लिहिला आहे.

भावचलितकुंडली.

ससंधि द्वादशभावचक्र.

१		२		३		४		५		६	
त.	सं.	ध.	सं.	स.	सं.	सु.	सं.	सु.	सं.	रि.	सं.
२	२	३	३	३	४	४	५	५	६	७	७
४	१७	१	१४	२८	११	२४	११	२८	१४	१	१७
३२	५५	१९	४२	६	२९	५३	२९	६	४२	१९	५५
३०	५७	२३	४९	१६	४२	९	४२	१६	४९	२३	५६
७		८		९		१०		११		१२	
जा.	सं.	मृ.	सं.	ध.	सं.	क.	सं.	आ.	सं.	व्य.	सं.
८	८	९	९	९	१०	१०	११	११	०	१	१
४	१७	१	१४	२८	११	२४	११	२८	१४	१	१७
३२	५५	१९	४२	६	२९	५३	२९	६	४२	१९	५५
३०	५७	२३	४९	१६	४२	९	४२	१६	४९	२३	५६

भावचलित कुंडलींत ग्रह मांडण्याची रीति लग्नकुंडलीपेक्षां निराळी आहे, ती अशी. कोणताही ग्रह आपल्या स्थानाच्या आरंभसंधीपेक्षां जेव्हां अंशकलादिकांनीं कमी असेल तेव्हां त्या ग्रहाची स्थापना मागील स्थानीं करितात. व जेव्हां तोच ग्रह विरामसंधीपेक्षां अंशकलादिकांनीं अधिक असेल तेव्हां तो पुढील स्थानीं मांडितात. तसेंच जेव्हां कोणताही ग्रह आपल्या भावाच्या आरंभसंधीपेक्षां अधिक व विरामसंधीपेक्षां कमी असेल तेव्हां तो ग्रह त्याच स्थानीं मांडितात. ह्या पद्धतीनें आतां भावचलित कुंडलींमध्यें ग्रह मांडून दाखवितों. मागें जी जन्मलग्नकुंडली मांडली आहे त्याचप्रमाणें प्रथम कुंडली मांडावी. म्हणजे मध्यमगृहांत प्रथमस्थानीं ३ हा राश्यंक लिहून त्याच्या पुढील म्हणजे डाव्या बाजूच्या सर्व कोष्टकांत अनुक्रमानें तिहींच्या पुढील अंक लिहावे. आणि नंतर पुढें सांगितलेल्या रीतीप्रमाणें त्यांत ग्रह मांडावे. जसें, रवि लग्नकुंडलींत १।१।५०।४६ इतक्या अंशादिकांवर म्हणजे वृषभराशीच्या दुसऱ्या अंशांत आहे. वृषभराशि व्ययस्थानांत आहे. व्ययस्थानचा आरंभसंधि ०।१४।४२।४९ आहे आणि विरामसंधि १।१७।५५।५६ आहे; मागील ससंधि द्वादशभावचक्र पहा. येथें रवीचे राशि-अंश-कलादि अंक, ज्या स्थानीं तो आहे, त्या व्ययभावाच्या आरंभसंधीपेक्षां अधिक असून व्ययभावाच्या विरामसंधीपेक्षां कमी आहेत म्हणून येथें रवि मागील किंवा पुढील भावांत जाऊं शकत नाहीं; याकरितां रवीचें स्थापन व्ययभवनींच केलें. चंद्र ४।०।१९।१८ राशि भोगून पांचव्या म्हणजे सिंहराशीच्या पहिल्या अंशांत आहे. जन्मलग्नकुंडलीमध्यें सिंहराशि तृतीय स्थानीं आहे. तृतीय-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

स्थानाचा आरंभसंधि ३।१४।४२।४९ आहे आणि विरामसंधि ४।११।२९।४२ आहे. म्हणजे चंद्राचे राशि-अंश-कलादि अंक, आरंभसंधीपेक्षां अधिक असून विरामसंधीपेक्षां कमी आहेत. म्हणून चंद्र त्याच म्हणजे तृतीयस्थानांत मांडिला. मंगळ २।१५।४३।७ असून तनुस्थानीं म्हणजे प्रथमभावांत मिथुन राशीस आहे. प्रथमभावाचा आरंभसंधि १।१७।५५।५६ आहे आणि विरामसंधि २।१७।५५।५७ आहे. म्हणजे मंगळ हा प्रथमभावाच्या आरंभसंधीपेक्षां अधिक असून प्रथमभावाच्या विरामसंधीपेक्षां कमी आहे म्हणून मंगळ प्रथमस्थानींच मांडिला. बुध १।१६।१२।३६ असून वृषभराशीला व्ययस्थानीं आहे. व्ययभावाचा आरंभसंधि ०।१४।४२।४९ आहे आणि विरामसंधि १।१७।५५।५६ आहे. म्हणजे बुध हा व्ययस्थानाच्या आरंभसंधीपेक्षां अधिक आहे व विरामसंधीपेक्षां कमी आहे म्हणून बुध मागें किंवा पुढें जाऊं शकत नाहीं; याकरितां बुधाचें स्थापन व्ययभवनींच केलें. गुरु ५।१५।४७।१२ आहे. म्हणजे कन्याराशीच्या १६ व्या अंशांत असून लग्नकुंडलींत चतुर्थस्थानांत आहे. चतुर्थस्थानाचा आरंभसंधि ४।११।२९।४२ आहे आणि विरामसंधि ५।११।२९।४२ इतका आहे. म्हणजे गुरु हा चतुर्थस्थानाच्या आरंभसंधीपेक्षां अधिक असून चतुर्थभावाच्या विरामसंधीपेक्षां कमी आहे म्हणून गुरु तेथेंच म्हणजे चतुर्थस्थानीं मांडिला. शुक्र ११।१७।३१।२ आहे, म्हणजे मीनराशीच्या १८ व्या अंशांत आहे. मीनराशि कर्मस्थानीं म्हणजे लग्नापासून दशमस्थानीं आहे. दशमस्थानाचा आरंभसंधि १०।११।२९।४२ आहे व विरामसंधि ११।११।२९।४२ इतका आहे, म्हणजे शुक्र हा कर्मभावाच्या आरंभसंधीपेक्षां अधिक असून कर्मभावाच्या विरामसंधीपेक्षांही अधिक आहे; म्हणून तो पुढील म्हणजे एकादश भावांत मांडिला. शनि ०।६।३०।३१ इतका म्हणजे मेषराशींत ७ व्या अंशावर आहे. मेषराशि एकादशस्थानीं आहे. एकादशस्थानाचा आरंभसंधि ११।११।२९।४२ इतका असून विरामसंधि ०।१४।४२।४९ इतका आहे. म्हणजे शनीचे राश्यादि अंक एकादशभावाच्या आरंभसंधीपेक्षां अधिक असून विरामसंधीपेक्षां कमी आहेत; म्हणून शनीचें स्थापन लाभस्थानींच केलें. राहु १।६।४।३३ इतका आहे म्हणजे वृषभराशीच्या सातव्या अंशांत आहे. लग्नकुंडलींत वृषभराशि द्वादशस्थानांत आहे. द्वादशस्थानाचा आरंभसंधि ०।१४।४२।४९ आहे आणि विरामसंधि १।१७।५५।५६ आहे, म्हणजे राहूचे राश्यादि अंक, ज्या स्थानीं तो आहे, त्या द्वादशस्थानच्या आरंभसंधीपेक्षां अधिक असून विरामसंधीपेक्षां कमी आहेत, म्हणून राहु द्वादशस्थानीं मांडिला. राहूचे समोर ७ व्या राशीस नेहमीं केतु असतो, म्हणून केतूचें

भावचलितकुंडली.



Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

स्थापन वृश्चिकराशीस रिपुभावांत केलें. या रीतीनें सर्व ग्रह कुंडलींत मांडावे. वर भावचलितकुंडली मांडली आहे ती पहा, म्हणजे स्पष्ट कळेल.

भावचलित कुंडलींत लग्नकुंडलीप्रमाणेंच राशिदर्शक अंक घातले असतां, जर एकादा ग्रह भावचलितपद्धतीनें पुढील अथवा मागील भावांत बसेल, तर तो स्वराशीहून पुढील किंवा मागील राशीमध्यें गेलेला दिसतो. आणि त्यामुळें फलादेश वर्तवितांना घोंटाळे होतात. यासाठीं भावचलितांत राशिदर्शक अंक न घालतां केवळ भावदर्शक अंक घालावे, अथवा भावस्थानानुसार नुसतेच ग्रह मांडावे, असें कांहीं विद्वान् सायनमतवादी ज्योतिष्यांचें मत आहे, तेंही विचारणीय आहे.

षड्वर्गविचार.

गृहं होरा च द्रेष्काणो नवांशो द्वादशांशकः ।
त्रिंशांशश्चेति षड्वर्गास्ते सौम्यग्रहजाः शुभाः ॥ ४ ॥
त्रिंशद्भागात्मकं लग्नं होरा तस्यार्धमुच्यते ।
लग्नात्त्रिभागो द्रेष्काणो नवांशो नवमांशकः ।
द्वादशांशो द्वादशांशस्त्रिंशांशस्त्रिंशदंशकः ॥ ५ ॥

१ लग्नस्वामी, २ होरा, ३ द्रेष्काण, ४ नवांश, ५ द्वादशांश, आणि ६ त्रिंशांश अशा सहा प्रकारच्या राशींच्या भागांच्या समुदायास षड्वर्ग म्हणतात. अर्थात् प्रत्येक भागास वर्ग अशी संज्ञा आहे. शुभग्रहाचा वर्ग म्हणजे चंद्र, बुध, गुरु आणि शुक्र यांपैकीं कोणत्याही ग्रहाचा वर्ग शुभ, आणि यावांचून इतर म्हणजे पापग्रहाचा वर्ग अशुभ होय. लग्नाचे किंवा राशीचे अंश ३० असतात. ज्या ग्रहाची जी राशि तें त्याचें क्षेत्र होय. उदाहरणार्थ, धन राशीचा किंवा मीन राशीचा स्वामी गुरु आहे; म्हणून धन किंवा मीन यांतून कोणतेंही लग्न इष्टकालीं असून तेथें गुरु असतां तो स्वक्षेत्रीं असून लग्नाला स्वामीचें बल आहे असें समजावें. राशीच्या अर्धभागाला होरा म्हणावें. पुढें होराकुंडली मांडून दाखविली आहे तेथें होऱ्या-संबंधीं अधिक माहिती दिली आहे. राशीचे तीन भाग करून प्रत्येक भागाला द्रेष्काण म्हणतात. राशीचे अंश ३० असतात म्हणून प्रत्येक द्रेष्काण १० अंशांचा होतो. राशीचा जो स्वामी तो प्रथम द्रेष्काणाचा स्वामी होय. त्याच राशीपासून पांचव्या राशीचा जो स्वामी तो द्वितीय द्रेष्काणाचा स्वामी होय. आणि नवव्या राशीचा स्वामी तोच तृतीय द्रेष्काणाचा स्वामी होय. उदाहरणार्थ, इष्टलग्न सिंह असून त्याचे १८ अंश भुक्त आहेत अशी कल्पना करा. म्हणजे येथें सिंहलग्न १० अंशांपुढें व २० अंशांचे आंत असल्यामुळें सिंह लग्नाचा द्वितीय द्रेष्काण येतो. सिंहराशीपासून पांचवी राशि धन आहे व धनराशीचा स्वामी गुरु आहे म्हणून हा गुरूचा द्रेष्काण येतो. येथें सिंह लग्न १० अंशांचे आंत असतें तर राशिस्वामी जो रवि त्या रवीचा द्रेष्काण असता, आणि २० अंशांपुढें असतें तर सिंहापासून नवव्या म्हणजे मेषराशीचा जो स्वामी मंगळ तो तृतीय द्रेष्काणाचा

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

स्वामी असता. याचप्रमाणें सर्व राशींचे द्रेष्काण जाणावे. खालीं द्रेष्काणस्वामींचें कोष्टक दिलें आहे; त्यावरून स्पष्ट कळेल. सूर्य, मंगळ, आणि शनि यांचे द्रेष्काण अशुभ व इतर ग्रहांचे शुभ होत, असें जाणावें.

द्रेष्काणकोष्टक.

अंश	मे.	वृ.	मि.	कर्क	सिं.	कन्या	तू.	वृ.	ध.	म.	कुं.	मी.
१०	मं.	शु.	बु.	चं.	र.	बु.	शु.	मं.	गु.	श.	श.	गु.
२०	र.	बु.	शु.	मं.	गु.	श.	श.	गु.	मं.	शु.	बु.	चं.
३०	गु.	श.	श.	गु.	मं.	शु.	बु.	चं.	र.	बु.	शु.	मं.

नवांश म्हणजे राशीचा नववा भाग होय. राशीचे अंश ३० असतात, म्हणून प्रत्येक नवांश ३ अंश २० कलांचा होतो. नवांशाची अधिक माहिती पुढें नवांशकुंडलीविषयीं लिहिलें आहे, तेथें सांगितली आहे. द्वादशांश म्हणजे लग्नाचा बारावा भाग होय. म्हणजे २ अंश ३० कलांचा एक द्वादशांश होतो. तसेंच, त्रिंशांश म्हणजे राशीचा तिसावा भाग होय. अर्थात् प्रत्येक त्रिंशांश एक अंशाचा असतो. याचे समत्रिंशांश आणि विषमत्रिंशांश असे दोन भेद आहेत, ते पुढें सांगितले आहेत. याप्रमाणें षड्वर्ग जाणावे.

होराकुंडली.

राशीच्या अर्धभागाला होरा म्हणतात हें वर सांगितलेंच आहे. राशीचे अंश तीस असतात म्हणून १५ अंशांचा एक होरा होतो, व दोन होऱ्यांची एक राशि होते. विषमराशींचा म्हणजे १ मेष ३ मिथुन ५ सिंह ७ तूळ ९ धन व ११ कुंभ या राशींचा पहिला होरा सूर्याचा असतो, व दुसरा होरा चंद्राचा असतो. सम राशींचा, म्हणजे २ वृषभ ४ कर्क ६ कन्या ८ वृश्चिक १० मकर व १२ मीन या राशींचा, विषमराशीच्या उलट प्रकार असतो. म्हणजे पहिल्या होऱ्याचा स्वामी चंद्र व दुसऱ्या होऱ्याचा स्वामी रवि असतो. १५ अंशांचे आंत कोणतेंही लग्न असतां तें राशीच्या पहिल्या होऱ्यांत आहे व १५ अंशांपुढें असतां राशीच्या दुसऱ्या होऱ्यांत आहे असें समजावें. खालीं होरासाधन कोष्टक दिलें आहे त्यावरून होराकुंडली सुलभतेनें मांडितां येईल.

होरासाधन कोष्टक.

अंश	१ मे.	२ वृ.	३ मि.	४ क.	५ सिं.	६ क.	७ तु.	८ वृ.	९ ध.	१० म.	११ कुं.	१२ मी.
१–१५ पूर्वार्ध	५ सिं.	४ क.	५ सिं.	४ क.	५ सिं.	४ क.	५ सिं.	४ क.	५ सिं.	४ क.	५ सिं.	४ क.
१५–३० उत्तरार्ध	४ क.	५ सिं.	४ क.	५ सिं.	४ क.	५ सिं.	४ क.	५ सिं.	४ क.	५ सिं.	४ क.	५ सिं.

आतां होराकुंडलींत ग्रह मांडण्याची रीति सांगतों: पूर्वीं जी लग्नकुंडली

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मांडिली आहे त्याच वेळेची होराकुंडली मांडून दाखवितों. त्या वेळचें स्पष्टलग्न २ रा. ४ अं. ३२ क. ३० वि. इतकें आहे. म्हणजे वृषभलग्न संपून मिथुन लग्नाचे ४ अंश भुक्त होऊन पांचव्या अंशांत मिथुन लग्न आहे. हें विषमलग्न असून १५ अंशांचे आंत आहे म्हणजे पहिल्या होऱ्यांत आहे. विषमलग्नीं पहिला होरा रवीचा असतो, हें वर सांगितलेंच आहे. रवीची राशि सिंह आहे म्हणून लग्नस्थानीं म्हणजे प्रथमस्थानीं सिंहराशीचा दर्शक अंक ५ हा मांडिला. व पुढील अंक कुंडलींतील डाव्या बाजूकडील कोष्टकांत अनुक्रमानें मांडिले. प्रथम रवि कोणत्या स्थानीं मांडिला पाहिजे हें पाहूं. मागें स्पष्टग्रहांचें कोष्टक दिलें आहे, त्यांत रवि वृषभराशीच्या दुसऱ्या अंशांत म्हणजे पूर्वार्धांत आहे. वृषभ राशीचा पूर्वार्ध किंवा पहिला होरा चंद्राचा असतो व चंद्राची राशि कर्क आहे म्हणून रवि कर्क राशीला म्हणजे बाराव्या स्थानीं मांडिला. चंद्र सिंहराशीच्या पहिल्या अंशांत म्हणजे १५ अंशांचे आंत असल्यामुळें पहिल्या होऱ्यांत आहे. सिंहराशीचा पहिला होरा रवीचा आहे व रवीची राशि सिंह आहे म्हणून चंद्र सिंहराशीस प्रथमस्थानीं मांडिला. मंगळ मिथुनराशीस सोळाव्या अंशांत म्हणजे दुसऱ्या होऱ्यांत आहे. मिथुनराशीचा दुसरा होरा चंद्राचा असतो. चंद्राची राशि-कर्क आहे म्हणून कर्कराशीस मंगळ लिहिला. बुध वृषभराशीस १७ व्या अंशांत म्हणजे दुसऱ्या होऱ्यांत आहे. वरील कोष्टकांत वृषभराशीचा दुसरा होरा सिंह आहे म्हणून सिंहराशीस बुध लिहिला. गुरु-शुक्र हे समराशीस म्हणजे अनुक्रमें कन्या व मीन राशीस १५ अंशांपुढें म्हणजे दुसऱ्या होऱ्यांत आहेत. वरील होरासाधन कोष्टकांत समराशींचा दुसरा होरा सिंह आहे म्हणून सिंहराशीस गुरु-शुक्र मांडिले. शनि विषम राशीच्या पहिल्या होऱ्यांत आहे म्हणून तोही सिंहराशीस मांडिला. राहु समराशीस दुसऱ्या होऱ्यांत आहे म्हणून तो सिंहराशीसच मांडिला. होराकुंडलींत प्रायः केतु मांडीत नाहींत, कारण त्याचें विशेष महत्व नाहीं. होराकुंडलींत नेहमीं सर्व ग्रह कर्क किंवा सिंह या दोन राशींसच असतात.

होराकुंडली.



नवमांशकुंडली.

नवमांशा मेषसिंहचापमेषादयः क्रमात् ।
क्रमाद्वोमृगकन्यासु ज्ञेयाः स्युर्मकरादयः ॥ ६ ॥
तुलामिथुनकुंभेषु स्युः क्रमेण तुलादयः ।
अलिकर्कटमीनेषु क्रमात्स्युः कर्कटादयः ॥ ७ ॥

नवांश म्हणजे राशीचा नववा भाग होय. राशीचे अंश ३० म्हणून

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

(३०÷९=३ अं. २० क.) प्रत्येक भाग ३ अंश २० कलांचा असतो. मेषादि बारा राशींचे नवांश मोजावयाचे असतां अनुक्रमेंकरून मेष, मकर, तूळ आणि कर्क ह्या राशीपासून पुनःपुनः मोजण्याची पद्धति आहे. म्हणजे मेषास मेषापासून, वृषभास मकरापासून, मिथुनराशीस तूळापासून व कर्कास कर्कापासून मोजितात. तसेंच, पुनः सिंहराशीस मेषापासून, कन्याराशीस मकरापासून इत्यादि. याचें कारण असें आहे कीं, मेषराशीचे ९ भाग पूर्ण झाल्यानंतर १० वा भाग (म्हणजे दहावी राशि) मकर हा दुसऱ्या म्हणजे वृषभराशीचा पहिला नवांश होतो. म्हणून वृषभास मकरापासून मोजतात. तसेंच, ही बारा राशींची पहिली आवृत्ति पुरी झाली व पहिल्या राशीपासून मोजण्यास पुनः आरंभ केला म्हणजे मिथुनराशीचा पहिला नवांश तुळाचा व कर्कराशीस कर्काचा येतो. या रीतीनें पुनः सिंहराशीस मेषराशीचा, कन्याराशीस मकराचा, इत्यादि बारा राशींचे प्रथम नवांश पुनःपुनः अनुक्रमानें मेष, मकर, तूळ आणि कर्क असतात. खालीं नवमांशसाधन कोष्टक दिलें आहे त्यावरून हें स्पष्ट ध्यानांत येईल.

नवमांशसाधन कोष्टक.

	१	२	३	४	५	६	७	८	९
राशि	३ अं. २० क.	६ अं. ४० क.	१० अं.	१३ अं. २० क.	१६ अं. ४० क.	२० अं.	२३ अं. २० क.	२६ अं. ४० क.	३० अं.
मेष.	१ मं.	२ शु.	३ बु.	४ चं.	५ र.	६ बु.	७ शु.	८ मं.	९ गु.
वृष.	१० श.	११ श.	१२ गु.	१ मं.	२ शु.	३ बु.	४ चं.	५ र.	६ बु.
मिथु.	७ शु.	८ मं.	९ गु.	१० श.	११ श.	१२ गु.	१ मं.	२ शु.	३ बु.
कर्क.	४ चं.	५ र.	६ बु.	७ शु.	८ मं.	९ गु.	१० श.	११ श.	१२ गु.
सिंह.	१ मं.	२ शु.	३ बु.	४ चं.	५ र.	६ बु.	७ शु.	८ मं.	९ गु.
कन्या.	१० श.	११ श.	१२ गु.	१ मं.	२ शु.	३ बु.	४ चं.	५ र.	६ बु.
तूळ.	७ शु.	८ मं.	९ गु.	१० श.	११ श.	१२ गु.	१ मं.	२ शु.	३ बु.
वृश्चि.	४ चं.	५ र.	६ बु.	७ शु.	८ मं.	९ गु.	१० श.	११ श.	१२ गु.
धन.	१ मं.	२ शु.	३ बु.	४ चं.	५ र.	६ बु.	७ शु.	८ मं.	९ गु.
मक.	१० श.	११ श.	१२ गु.	१ मं.	२ शु.	३ बु.	४ चं.	५ र.	६ बु.
कुंभ.	७ शु.	८ मं.	९ गु.	१० श.	११ श.	१२ गु.	१ मं.	२ शु.	३ बु.
मीन.	४ चं.	५ र.	६ बु.	७ शु.	८ मं.	९ गु.	१० श.	११ श.	१२ गु.

वरील कोष्टकांत पहिल्या आडव्या ओळीस १ पासून ९ पर्यंत जे अनुक्रमांक आहेत ते राशीचा पहिला नवांश, दुसरा नवांश, तिसरा नवांश इत्यादि दर्शविणारे आहेत. कोणत्याही राशीचा पहिला नवांश ३ अंश २० कलांपर्यंत असतो, दुसरा नवांश ६ अंश ४० कलांपर्यंत असतो, तिसरा नवांश १० अंशांपर्यंत असतो, इत्यादि दर्शविणारें दुसरें कोष्टक आहे. मेषराशीसमोर आडव्या ओळीस पहिल्या

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सदरांत १ मं. असें लिहिलें आहे, त्याचा अर्थ मेषराशीचा पहिला नवांश १ राशीचा म्हणजे मेषराशीचा असून त्याचा स्वामी मंगळ. दुसऱ्या आडव्या ओळीस २ शु. आहे, त्याचा अर्थ मेषराशीचा दुसरा नवांश २ म्हणजे वृषभराशीचा असून त्याचा स्वामी शुक्र आहे असें जाणावें. याप्रमाणें सर्व कोष्टक पहावें. आतां नवमांशकुंडलींत लग्न व ग्रह कसे मांडावे हें सांगतों. आपलें इष्टकाळचें लग्न मिथुन असून तें पांचव्या अंशांत आहे म्हणजे दुसऱ्या नवांशांत आहे. मिथुन राशीसमोर दुसरा नवमांश वृश्चिकराशीचा आहे म्हणून येथें नवमांशकुंडलीचें लग्न वृश्चिक होय असें समजावें. याच रीतीनें सर्व नवांशकुंडली मांडितात. जसें, रवि १ राशि भोगून दुसऱ्या राशींत १ अं. ५० कला आहे म्हणजे वृषभराशीच्या दुसऱ्या अंशांत आहे. (मागील स्पष्टग्रहांचें कोष्टक पहा.) राशीचा पहिला नवांश ३ अं० २० क० पर्यंत असतो. म्हणून रवि वृषभराशीच्या पहिल्याच नवांशांत आहे असें झालें. वरील नवमांश कोष्टकांत वृषभराशीचा पहिला नवांश मकर राशीचा आहे म्हणून रवि मकरराशीस मांडिला. चंद्र सिंहराशीच्या पहिल्याच अंशांत आहे म्हणून तो पहिल्या नवमांशांत आहे. सिंहराशीचा पहिला नवांश मेषराशीचा आहे. मेषराशीचा दर्शक अंक १ आहे म्हणून नवमांश कुंडलींत तेथें चंद्र मांडिला. मंगळ मिथुनराशीच्या १६ व्या अंशांत आहे म्हणजे चवथ्या नवमांशापुढें व पांचव्या नवमांशाचे आंत आहे. मिथुन राशीचा पांचवा नवमांश कुंभ आहे म्हणून कुंभराशीस मंगळ मांडिला. बुध वृषभराशीच्या १७ व्या अंशांत म्हणजे ६ व्या नवमांशांत आहे. वृषभराशीचा ६ वा नवमांश मिथुन आहे. म्हणून मिथुनराशीचा दर्शक अंक जो ३ तेथें बुध मांडिला. गुरु कन्याराशीच्या १६ व्या अंशांत म्हणजे पांचव्या नवमांशांत आहे. कन्याराशीचा पांचवा नवांश वृषभ आहे म्हणून वृषभराशीचा दर्शक अंक जो २ तेथें गुरु मांडिला. शुक्र मीनराशीच्या १८ व्या अंशांत म्हणजे ६ व्या नवांशांत आहे. मीनराशीचा ६ वा नवांश धन आहे म्हणून तेथें शुक्र मांडिला. शनि मेषराशीच्या ६।३० अंशांत आहे. दुसरा नवांश ३।२० पासून ६।४० अंशांपर्यंत असतो. म्हणून मेषराशीच्या दुसऱ्या नवांशांत शनि आहे असें झालें. मेषराशीचा दुसरा नवांश वृषभ आहे म्हणून तेथें शनि लिहिला. राहु वृषभराशीच्या दुसऱ्या नवांशांत आहे. वृषभराशीचा दुसरा नवांश कुंभ आहे म्हणून तेथें राहु लिहिला. राहूपासून सप्तमस्थानांत नेहमीं केतु असतो, म्हणून राहूच्या सप्तमस्थानीं केतु मांडिला. याप्रमाणें नवमांशकुंडलींत ग्रह मांडावे.

नवमांशकुंडली.



Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

द्वादशांशसाधन कोष्टक.

द्वादशांश म्हणजे लग्नाचा बारावा भाग होय. एका राशीचे अंश ३० म्हणून २ अंश ३० कलांचा म्हणजे अडीज अंशांचा (२॥×१२=३०) एक द्वादशांश होतो. खालीं द्वादशांशकोष्टक दिलें आहे, त्यावरून हें ध्यानीं येईल. ह्या कोष्टकांत प्रत्येक

अंश.	मेप.	वृप.	मिथु.	कर्क.	सिंह.	कन्या.	तूळ.	वृश्चि.	धन.	मकर.	कुंभ.	मीन.
२॥	१मं	२शु	३बु	४चं	५र	६बु	७शु	८मं	९गु	१०श	११श	१२गु
५	२शु	३बु	४चं	५र	६बु	७शु	८मं	९गु	१०श	११श	१२गु	१मं
७॥	३बु	४चं	५र	६बु	७शु	८मं	९गु	१०श	११श	१२गु	१मं	२शु
१०	४चं	५र	६बु	७शु	८मं	९गु	१०श	११श	१२गु	१मं	२शु	३बु
१२॥	५र	६बु	७शु	८मं	९गु	१०श	११श	१२गु	१मं	२शु	३बु	४चं
१५	६बु	७शु	८मं	९गु	१०श	११श	१२गु	१मं	२शु	३बु	४चं	५र
१७॥	७शु	८मं	९गु	१०श	११श	१२गु	१मं	२शु	३बु	४चं	५र	६बु
२०	८मं	९गु	१०श	११श	१२गु	१मं	२शु	३बु	४चं	५र	६बु	७शु
२२॥	९गु	१०श	११श	१२गु	१मं	२शु	३बु	४चं	५र	६बु	७शु	८मं
२५	१०श	११श	१२गु	१मं	२शु	३बु	४चं	५र	६बु	७शु	८मं	९गु
२७॥	११श	१२गु	१मं	२शु	३बु	४चं	५र	६बु	७शु	८मं	९गु	१०श
३०	१२गु	१मं	२शु	३बु	४चं	५र	६बु	७शु	८मं	९गु	१०श	११श

राशीसमोर उभ्या ओळीस १।२।३ असे अंक आहेत. ते राशीचे दर्शक अंक आहेत. प्रत्येक राशीचा पहिला द्वादशांश अमुक राशीचा व त्याचा स्वामी अमुक हें ह्यावरून कळतें. उदाहरणार्थ, इष्टकालीं मेपलग्न असून त्याचे १७ अंश भुक्त झाले आहेत अशी कल्पना करा. त्या वेळीं कोणत्या राशीचा किंवा ग्रहाचा द्वादशांश आहे हें पहावयाचें असेल तर वरील कोष्टकांत १५ अंशांपासून १७॥ अंशांपर्यंत ७ ऱ्या म्हणजे तुळराशीचा स्वामी शुक्र त्याचा द्वादशांश आहे असें लिहिलें आहे. म्हणून इष्टकालीं शुक्राचा द्वादशांश आहे असें समजावें. आतां द्वादशांशकुंडली कशी मांडावी हें सांगतों. आपलें इष्टकालचें लग्न मिथुन असून त्याचे अंश ४।३२ आहेत. म्हणजे २॥ अंशांपुढें व ५ अंशांचे आंत आहे. म्हणजे मिथुनराशीच्या दुसऱ्या द्वादशांशांत आहे. वरील कोष्टकांत मिथुन-राशीचा दुसरा द्वादशांश ४ म्हणजे कर्क आहे, म्हणून द्वादशांश कुंडलीचें लग्न कर्क होय. रवि वृपभराशींत २॥ अंशांचे आंत आहे. म्हणजे वृपभराशीच्या पहिल्या द्वादशांशांत आहे. वृपभराशीचा पहिला द्वादशांश वृपभराशीचाच आहे. म्हणून २ राशीस रवि मांडिला. याच पद्धतीनें द्वादशांशकुंडलींत सर्व ग्रह मांडावे.

द्वादशांशकुंडली.



Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

त्रिंशांशसाधन.

त्रिंशांश म्हणजे राशीचा तिसावा भाग होय. म्हणजे १ अंशाचा १ त्रिंशांश होतो. त्रिंशांश दोन प्रकारचे आहेत. समत्रिंशांश आणि विषमत्रिंशांश. सहा समराशींचे त्रिंशांश, ते समत्रिंशांश आणि सहा विषमराशींचे त्रिंशांश, ते विषम त्रिंशांश होत. अंश ३० आणि प्रत्येक भागांत राशी ६ म्हणून प्रत्येक राशीचा पांचपांच अंशांचा त्रिंशांश असावा असें वाटणें साहजिक आहे, परंतु तसें नाहीं. विषमराशींतील त्रिंशांशांचा क्रम असा आहे कीं, पहिले ५ अंश मंगळाचे त्याच्या पुढील ५ अंश शनीचे, त्याच्या पुढील ८ गुरूचे, त्याच्या पुढील ७ बुधाचे व शेवटचे ५ अंश शुक्राचे जाणावे. विषमराशि म्हणजे मेष, मिथुन, सिंह, तूळ, धन व कुंभ ह्या होत. समराशींचा क्रम ह्याच्या उलट आहे. म्हणजे पहिले ५ अंश शुक्राचे, त्याच्या पुढील ७ अंश बुधाचे, त्याच्या पुढील ८ अंश गुरूचे, त्याच्या पुढील ५ अंश शनीचे व शेवटचे ५ मंगळाचे असतात. वृषभ, कर्क, कन्या, वृश्चिक, मकर व मीन ह्या समराशि होत. बाजूच्या कोष्टकांवरून विषमत्रिंशांश व समत्रिंशांश यांचे स्वामी व राशि स्पष्ट कळतील.

विषमत्रिंशांश कोष्टक.

अंश	मेष	मिथु	सिंह	तूल	धन	कुंभ
५.०	१ मं	१ मं	१ मं	१ मं	१ मं	१ मं
१०.०	११ श	११ श	११ श	११ श	११ श	११ श
१८.०	९ गु	९ गु	९ गु	९ गु	९ गु	९ गु
२५.०	३ बु	३ बु	३ बु	३ बु	३ बु	३ बु
३०.०	७ शु	७ शु	७ शु	७ शु	७ शु	७ शु

समत्रिंशांश कोष्टक.

अंश	वृष	कर्क	कन्या	वृश्चि	मकर	मीन
५.०	२ शु	२ शु	२ शु	२ शु	२ शु	२ शु
१२.०	६ बु	६ बु	६ बु	६ बु	६ बु	६ बु
२०.०	१२ गु	१२ गु	१२ गु	१२ गु	१२ गु	१२ गु
२५.०	१० श	१० श	१० श	१० श	१० श	१० श
३०.०	८ मं	८ मं	८ मं	८ मं	८ मं	८ मं

त्रिंशांशकुंडली मांडण्याची पद्धति नवांश किंवा द्वादशांशकुंडलीप्रमाणेंच आहे. उदाहरणार्थ, इष्टकाळीं मिथुन लग्न ४।३२ आहे म्हणजे ५ अंशांचे आंत आहे. मिथुन ही विषमराशि आहे म्हणून विषमत्रिंशांशकोष्टकांत पहा. मिथुनराशीच्या सदरांत ५ अंशांसमोर मेषराशि आहे म्हणून त्रिंशांशकुंडलीचें मेषलग्न होय. तसेंच रवि वृषभ राशीच्या ५ अंशांत आहे. समत्रिंशांशकोष्टकांत वृषभराशीच्या सदरांत ५ अंशांसमोर वृषभ आहे, म्हणून रवि वृषभराशीस मांडिला. याच पद्धतीनें बाकीचे ग्रह मांडावे.

त्रिंशांशकुंडली.



Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

षड्वर्गबलाचें उदाहरण.

इष्टकालीं मकरलग्न १४ अं० ३ क० ११ विकला आहे अशी कल्पना करा, आणि त्या वेळेचे षड्वर्ग काढा. (१) मकरलग्नाचा स्वामी शनि आहे म्हणून गृहेश शनि होय. (२) समलग्नीं १५ अंशांचे आंत चंद्राचा होरा असतो, म्हणून इष्टकालीं चंद्राचा होरा येतो. (३) मकरलग्न १० अंशांपुढें आणि २० अंशांचे आंत आहे म्हणून दुसरा द्रेष्काण शुक्राचा येतो. (४) नवमांशसाधनकोष्टकांत १३।२० पुढें व १६।४० पर्यंत मकरलग्नासमोर पांचव्या सदरांत वृषभराशीचा नवांश आहे. वृषभराशीचा स्वामी शुक्र आहे म्हणून इष्टकालीं शुक्राचा नवांश आहे. त्याचप्रमाणें (५) बुधाचा द्वादशांश आणि (६) गुरूचा त्रिंशांश येतो. यांत गृहेश म्हणजे लग्नस्वामी शनि खेरीजकरून इतर पांच वर्ग शुभ आहेत असें जाणावें. लग्नास षड्वर्गांतून शुभग्रहांचे ४ वर्ग असावे; निदान ३ तरी असावे म्हणजे तें लग्न बलिष्ठ असून ग्राह्य होय. तथापि तीन शुभवर्ग असणें हा अगदींच कनिष्ठ पक्ष आहे.

लग्नमौंजींस उक्तांश.

मेषे षष्ठघटौ वृषे त्रिद्दगिना द्वंद्वेद्रिगोर्कांग्नयः ।
कीटेऽब्ध्यंगनवाद्रयोऽर्कभवनेंगाश्वाख्रियां त्र्यर्कषट्र् ॥
जूकेर्काद्रिखगा अलौ गवगषट्र् चापे त्रिषट्रगोद्रयो ।
नक्रेशाख्यरुणा घटे झषवृषौ मीनेद्रिगोषट्रशुभा ॥ ८ ॥

अमुक दिवशीं उपनयन किंवा विवाहमुहूर्त आहे हें पंचांगांत सांगितलेलें असतें, परंतु अमुकच वेळीं तीं कृत्यें करावीं हें सर्वच पंचांगांतून दिलेलें नसतें. याकरितां तत्संबंधीं थोडीशी माहिती येथें सांगतों. लग्नमुहूर्त साधारणपणें दिवसा मध्याह्नकालापर्यंत म्हणजे सूर्योदयापासून अठरा घटिकांपर्यंत, गोरज किंवा रात्रीं प्रथम प्रहरापर्यंत असावा, असें मताधिक्य आहे व व्यवहारदृष्ट्याही तेंच सोयीचें आहे. मुंजीचा मुहूर्त पूर्वाह्णकालीं म्हणजे सूर्योदयापासून सात घटिकांपर्यंत शुभ व पुढें मध्याह्नकालापर्यंत मध्यम मानिलेला आहे. हे शुभाशुभ मुहूर्त मेषादिलग्नीं जसे शुभाशुभ षड्वर्ग असतील त्यावरून ठरवितात; म्हणजे ज्या लग्नीं षड्वर्गांपैकीं अधिक शुभवर्ग असतील तो मुहूर्त उत्तम असें मानिलेलें आहे. म्हणून तो लग्नांश ज्या घटिकेला असेल ती घटिका विवाहादि शुभकृत्यांस घ्यावी. मेषादि द्वादश लग्नांना अमुक अमुक राशींचे नवमांश असतील त्या वेळीं शुभकृत्य केलें म्हणजे षड्वर्गांतून निदान चार शुभवर्गांचें बल येतें. ते राशीचे उक्तांश येणेंप्रमाणें.

लग्न	उक्तांश	लग्न	उक्तांश	लग्न	उक्तांश
मेष ...	कन्या, तूळ	सिंह...	तूळ, कन्या	धन...	मिथु० कन्या, तूळ, धन.
वृष० ...	वृष० मिथु० मीन	कन्या...	मिथु० कन्या, मीन	मकर...	मिथु०, मीन.
मिथु...	मि० तूळ, धन, मीन	तूळ...	तूळ, धन, मीन	कुंभ...	वृषभ, मीन.
कर्क...	कर्क, कन्या, तूळ, धन	वृश्चि० ...	धन, तूळ, कन्या.	मीन...	कन्या, तूळ, धन.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

विवाहास शुभ नवांश.

वृषं च मिथुनं कन्या तुला धन्वी झषस्तथा ।
एते शुभा नवांशास्तु ततोऽन्ये कुनवांशकाः ॥ ९ ॥

वृषभ, मिथुन, कन्या, तूळ, धनु व मीन हे अंश मेषादि द्वादश लग्नांस उत्तम आहेत. अर्थात् बाकीचे राहिले ते मध्यम समजावे.

मेषादि राशींमध्यें सूर्याची स्पष्टगति.

मेषादिगेकैंघ्रशरा नगाक्षाः सप्तेषवः सप्तशरा गजाक्षाः ।
गोक्षाः खतर्काः कुरसाः कुतर्काः कङ्गानि षष्टिर्नवपंच भुक्तिः ॥१०॥

स्थूलमानानें स्पष्टसूर्य करण्याकरितां मेषादि बारा राशींमध्यें सूर्याची गति किती असते, हें समजलें पाहिजे म्हणून त्याच्या गतीचे अंक सांगतों. हे अंक पलात्मक आहेत.

मेष ५८	कर्क ५७	तूळ ६०	मकर ६१
वृषभ ५७	सिंह ५८	वृश्चिक ६१	कुंभ ६०
मिथुन ५७	कन्या ५९	धन ६१	मीन ५९

विवाहादिमुहूर्तास स्पष्टसूर्य.

संक्रांतियातघस्राद्यैर्गतिर्निघ्नी खषंट्र्हृता ।
लब्धेनांशादिना योज्यं यातर्क्षे स्पष्टभास्करः ॥ ११ ॥

विवाहादिमुहूर्तसाधनास स्पष्टसूर्य स्थूलमानानें तयार करावा. त्याची रीति अशी. ज्या घटिकेचा स्पष्टसूर्य करावयाचा असेल त्या वेळेपर्यंत, चालू संक्रांतीच्या आरंभापासून जितके दिवस, घटिका व पळें होतील त्यांना वर दाखविल्याप्रमाणें त्या राशीच्या गतीच्या अंकांनीं गुणावें व ६० नीं भागावें. भागाकार अंशकलात्मक येईल, त्याच्या मागें चालू संक्रांतीच्या मागील राश्यंक मांडावे. म्हणजे स्पष्टसूर्य झाला. उदाहरणः— वैशाख शुक्ल १० बुधवारीं सूर्योदयापासून ७ घटिकांचे वेळेचा स्पष्टसूर्य करावयाचा आहे. वृषभसंक्रांत त्याच पंध्रवड्यांत शुद्धषष्ठीस ९ घ० १४ पळांनीं शनिवारीं झाली आहे. अहोरात्राच्या घटी ६० यांतून उणें ९ घ० १४ प० = ५० घ० ४६ प० ह्या शनिवारच्या घटिका झाल्या, आतां रविवारपासून बुधवारापर्यंत मधले दिवस ३ व बुधवारच्या इष्टघटिका ७ व संक्रांत झाली त्या दिवसाच्या घ० ५० प० ४६ मिळून ३ दिवस ५७ घ० ४६ प० इतका येथें गतकाल झाला. याला वृषभाची स्पष्टगति ५७ ह्यांनीं गुणून गुणाकार २२५ कला ५२ वि० ४२ प्रतिविकला आला. येथें विकला व प्रतिविकला सोडा. आणि २२५ ह्या अंकाला ६० नीं भागा. भागाकार ३ अं० ४५ क० इतका आला. इष्टकालीं वृषभराशीला सूर्य आहे म्हणून त्याच्या

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पूर्वींची राशि जी मेष, तिचा दर्शक अंक १ हा अंशांचे मागें मांडिला; म्हणजे १ रा० ३ अं० ४५ क० इतका उद्दिष्ट समयींचा स्पष्टसूर्य झाला.

नवांशावरून लग्न व इष्टघटी यांचें साधन.

तनोरिष्टांशकात्पूर्वनवांशा दशसंगुणाः ।
रामाप्ता लब्धमंशाद्यं तनोर्वर्गादि साधनम् ॥ १२ ॥

ज्या नवांशावर उपनयनास किंवा विवाहास मुहूर्त द्यावयाचा असेल, त्या अंशाच्या पूर्वींचे जितके अंश गत असतील त्या अंकांस दहांनीं गुणून तिहींनीं भागावें. उत्तर येईल तें अंशादि लग्न होय. उदाहरणार्थ, मेषलग्नीं कन्याराशीच्या नवांशावर मुहूर्त द्यावयाचा आहे अशी कल्पना करा. मेषास मेषापासून मोजण्याची प्रवृत्ति असल्यामुळें इष्टांश जो कन्यांश तो मेषापासून सहावा आहे म्हणून त्यापूर्वींचे अंश ५ याला १० नीं गुणिलें. गुणाकार ५० आला. त्याला तिहींनीं भागिलें. भागाकार १६ अंश ४० कला इतका आला. त्यांत गतराशी मिळविले असतां ० राशी १६ अं० ४० क० इतकें स्पष्ट मेष लग्न झालें. आतां इष्टकाल, म्हणजे ज्या घटिकेला उपनयन किंवा विवाह करावयाचा असेल, तो कसा सिद्ध करावा हें सांगतों.

अर्कांल्लग्नात्सायनाद्भोग्यभुक्तै-
र्भागैर्निघ्नात्स्वोदयात्खाग्निभक्तान् ॥
भोग्यं भुक्तं चांतरालोदयाढ्यं
षष्ठ्या भक्तं खेष्टनाड्यो भवेयुः ॥ १३ ॥

प्रथम वर लिहिल्याप्रमाणें उद्दिष्टकाळचा स्पष्टसूर्य करून त्यांत अयनांश मिळवावे. तसेंच, नवांशावरून स्पष्टलग्न आलें असेल त्यांतही अयनांश मिळवावे. म्हणजे सूर्य व लग्न हीं सायन झालीं. नंतर सायन केलेला सूर्य ज्या राशीस असेल त्याचे भोग्यांश काढावे. राशीचा अंक बाजूस ठेवून अंशकलादि अंक ३० तून वजा करावे. म्हणजे भोग्यांश येतील. राशीचा जो अंक बाजूस ठेविला असेल त्याच्या पुढील राशीचे हे भोग्यांश झाले. ज्या राशीचे हे भोग्यांश असतील, त्याच राशीच्या उदयाच्या पळांनीं त्यांना गुणावें व तिसांनीं भागावें. उत्तर येईल तें सूर्याच्या भोग्यांशांची पळें होत. आतां अयनांश मिळवून जे सायन लग्नाचे अंक आले असतील त्यांतून राशीचा अंक बाजूस ठेवून अंशकलादि अंकांना बाजूस ठेविलेल्या राशीच्या पुढील राशीच्या पळांनीं गुणावें व ३० नीं भागावें. उत्तर येईल ते त्या लग्नाचे भुक्तांश होत. नंतर सूर्याच्या भोग्यांशांचीं पळें, लग्नाच्या भुक्तांशांचीं पळें आणि सूर्य व लग्न हीं ज्या राशींस असतील त्या दोन राशींच्या मध्यें जितक्या राशि असतील त्यांचीं पळें, ह्या सर्व अंकांची बेरीज करून तिला ६० नीं भागावें; जें उत्तर येईल तो इष्टकाल होय. उदाहरण—शके १८१७ फाल्गुन शुक्ल ३ रविवारीं मेषलग्नीं

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कन्येचा नवांश मुंजीस द्यावयाचा आहे तर कोणत्या घटिकेस मुंज लावितां येईल? इष्टकाळचा स्पष्टसूर्य १० रा० ४ अं० ३७ क० इतका आहे असें समजा. यांत अयनांश २२ अं० ५३ क० मिळविले म्हणजे १० रा० २७ अं० ३० क० इतकी बेरीज आली. राशीचा अंक १० हा बाजूस ठेवून २७ अं० ३० क० हे ३० अंशांतून वजा केले. बाकी २ अं० ३० क० इतकी राहिली. बाजूस ठेविलेला राश्यंक १० हा मकर राशीचा दर्शक आहे व त्याच्या पुढील राशि कुंभ आहे. आणि कुंभराशीच्या उदयाचीं पळें २६७ आहेत; म्हणून रीतीप्रमाणें २६७ × २ अं० ३० क० ÷ ३० (२६७ × ३० = ८०१० ÷ ६० = १३३; पुनः २६७ × २ = ५३४ + १३३ = ६६७ ÷ ३०) = २२ पळें हा सूर्याचा भोग्यकाल झाला. आतां नवांशावरून वर सिद्ध केलेलें स्पष्ट मेष लग्न ० रा० १६ अं० ४० क० आहे. यांत अयनांश २२ अं० ५३ क० मिळवा. बेरीज १ रा० ९ अं० ३३ क० इतकी आली. राश्यंक १ (मेष) बाजूस ठेवा व त्याच्यापुढील राशि जी वृषभ तिच्या उदयाचीं पळें २६७ या अंकांनीं ९ अंश ३३ कला यांना गुणून ३० नीं भागा. (२६७ × ३३ = ८८११ ÷ ६० = १४६; पुनः = २६७ × ९ = २४०३ + १४६ = २५४९ ÷ ३० = ८४ पळें, व २९ विप० = ८५ पळें) उत्तर ८५ पळें आलें. हे वृषभलग्नाचे भुक्तांश झाले. आतां सूर्यांचा भोग्यकाल, लग्नाचे भुक्तांश, आणि सूर्याची राशि (कुंभ) व लग्नाची राशि (वृषभ) या दोन राशींमधील राशींचीं पळें, ह्या सर्वांची बेरीज बाजूस दाखविल्याप्रमाणें करून तिला ६० नीं भागा. उत्तर ९ घ० ४३ पळें आलें. ह्या मेषलग्नीं कन्यांशाचा इष्टकाल झाला. ह्या वेळीं मुंज लावावी.

सूर्यांचा भोग्यकाल	२२ पळें.
लग्नाचे भुक्तांश	८५ ,,
मीनोदय	२३८ ,,
मेषोदय	२३८ ,,
	६०)५८३
	घ. ९ प. ४३

ग्रहांच्या दशा. (अष्टोत्तरी)

दशा म्हणजे अवस्था किंवा स्थिति. प्रत्येक मनुष्याला जन्मतः जन्मनक्षत्रानुसार कोणत्या तरी ग्रहाची दशा असतेच. पत्रिकेंत ग्रहांच्या दशा लिहिण्याची पद्धति आहे. ह्या ग्रहदशांचे अनेक प्रकार निरनिराळ्या जातकग्रंथांतून सांगितलेले आहेत, परंतु त्याविषयीं कोणाचेंही एकमत नाहीं. ज्योतिषी लोक मुख्यतः अष्टोत्तरीदशा आणि विंशोत्तरीदशा या दोहोंतून एकाद्या प्रकारची दशा पत्रिकेंत लिहितात. ह्या महादशा जन्मनक्षत्रावरून ठरवितात, त्याची रीति पुढें लिहिली आहे. ह्या दोन प्रकारच्या महादशांपैकीं कोणत्या दशांचीं फळें अधिक अनुभवास येतात, हें निश्चितपणें सांगतां येत नाहीं. कित्येक अष्टोत्तरी दशांवर विश्वास ठेवितात व कित्येक विंशोत्तरी दशांचा अधिक अनुभव येतो, असें म्हणतात. परंतु दोन्ही प्रकार जरी अपवादात्मकच आहेत, तरी अष्टोत्तरी दशांचीं फळें अधिक अनुभवाला येणारीं आहेत असें मला वाटतें. मानससागरी ग्रंथामध्यें दशाप्रकरणांत असें लिहिलें आहे कीं, 'दशाप्य-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ष्टोत्तरी शुक्ले कृष्णे विंशोत्तरी मता' म्हणजे शुक्लपक्षांत जन्म असतां अष्टोत्तरीदशा घ्यावी आणि कृष्णपक्षामध्यें जन्म असतां विंशोत्तरी दशा घ्यावी. 'कृष्णपक्षे दिवा जातः शुक्लपक्षे यदा निशि। विंशोत्तरी दशा प्रोक्ता अन्यत्राष्टोत्तरी स्मृता ॥' म्हणजे कृष्णपक्षीं दिवसा व शुक्लपक्षीं रात्रीं जन्म असतां विंशोत्तरी दशा आणि याच्या उलट स्थिति असतां अष्टोत्तरी दशा घ्यावी. केशवीप्रकाशांत असा एक स्फुट श्लोक आहे कीं, 'गुर्जरे कच्छसौराष्ट्रे पांचाले सिंधुपर्वते। एतेष्वष्टोत्तरी श्रेष्ठाऽन्यत्र विंशोत्तरी स्मृता ॥' म्हणजे गुर्जर, कच्छ, सौराष्ट्र, पांचाल, सिंधुपर्वत, ह्या देशांत अष्टोत्तरीदशा घ्यावी आणि याहून अन्य देशांत विंशोत्तरीदशा घ्यावी. अशीं दशेच्या प्रकाराविषयीं भिन्न भिन्न मतें आढळतात. याशिवाय योगिनी दशाही पत्रिकेंत लिहितात. असो. अष्टोत्तरी दशांची एक आवृत्ति १०८ वर्षांनीं पूर्ण होते व विंशोत्तरी दशांची १२० वर्षांनीं पुरी होते. आतां प्रथम अष्टोत्तरी दशांची माहिती सांगतों. सूर्यापासून राहूपर्यंत आठ ग्रहांच्या जशा महादशा असतात तशाच त्यांच्या अंतर्दशाही असतात. परंतु ह्या महादशा व अंतर्दशा ग्रहांच्या नित्य अनुक्रमाप्रमाणें मात्र नसतात. उदाहरणार्थ, बुधाची दशा झाल्यानंतर गुरूची दशा न येतां शनीची दशा असते. तसेंच, गुरूच्या दशेनंतर [1]शुक्राची न येतां राहूची दशा येते. यांचा अनुक्रम पुढील कोष्टकावरून कळेल. ह्या दशांना आर्द्रानक्षत्रापासून आरंभ होतो. म्हणजे आर्द्रा, पुनर्वसु, पुष्य, किंवा आश्लेषा या चार नक्षत्रांतून एकादें जन्मनक्षत्र असेल तर आरंभीं रवीची दशा आहे असें समजावें. मघा, पूर्वा किंवा उत्तरा या तीन नक्षत्रांतून एकादें जन्मनक्षत्र असतां चंद्राची दशा आहे असें जाणावें. जे सौम्य ग्रह आहेत त्यांना प्रत्येकीं तीनच नक्षत्रें आहेत, व क्रूर ग्रह आहेत त्यांना प्रत्येकीं चार आहेत. रवि, भौम, शनि आणि राहु हे क्रूर व अशुभ फल उत्पन्न करणारे ग्रह आहेत; आणि चंद्र, बुध, गुरु व शुक्र हे सौम्य ग्रह असून शुभ फल देणारे आहेत. आतां जन्मनक्षत्रावरून दशेचा भोग्यकाल व भुक्तकाल कसा काढावा हें सांगतों. ज्या नक्षत्रावर जन्म झाला असेल तें नक्षत्र कोणत्या ग्रहाचें आहे, तें पुढील कोष्टकांत पाहून त्याच कोष्टकांत खालीं एका नक्षत्राची वर्षसंख्या पहावी. जी वर्षसंख्या असेल तिनें नक्षत्राचे आरंभापासून जन्मकालापर्यंत ज्या घटिका गत असतील त्यांना गुणावें. आणि त्याच नक्षत्राच्या एकंदर घटिकांनीं भागावें. जो भागाकार येईल तो त्या नक्षत्राचे वर्षसंख्येंतून वजा करावा. जी वजाबाकी येईल तितकी त्या नक्षत्राची दशा जन्मानंतर भोगावयाची राहिली असें समजावें. नंतर जन्मनक्षत्राच्या पुढील जितकीं नक्षत्रें कोष्टकांत शेष असतील त्यांच्या संख्येला त्यांतील एका नक्षत्राच्या वर्षसंख्येनें गुणावें, व जीं वर्षें येतील तीं मागील वजा-

---

१. पृष्ठ ६० पहा. राशींचे आयव्यय ह्या विषय लिहितांना अष्टोत्तरी व विंशोत्तरी दशांच्या ग्रहांचीं वर्षें लिहिलीं आहेत.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

बाकींत मिळवावीं, म्हणजे ती त्या ग्रहाची जन्मानंतर भोगावयाची भोग्यदशा होय. हीं भोग्यवर्षें त्या ग्रहाच्या एकंदर वर्षसंख्येंतून वजा केलीं म्हणजे त्या ग्रहाच्या दशेचीं भुक्तवर्षें म्हणजे जन्मापूर्वीं गेलेलीं वर्षें निघतात. उदाहरण—एकाचा जन्म पुनर्वसु नक्षत्रावर त्या नक्षत्राच्या आरंभापासून २० घटिकांनीं झाला आहे, तर त्याची भुक्तभोग्यदशा काढा. पुनर्वसु नक्षत्र आरंभापासून समाप्तीपर्यंत एकंदर ५८ घटिका आहे. वरील दशाकोष्टकांत पुनर्वसु नक्षत्र सूर्याच्या दशेच्या कोष्टकांत आहे. त्याच्याच खालीं एका नक्षत्रास १॥ वर्ष म्हणून लिहिलें आहे. म्हणून रीतीप्रमाणें पुनर्वसु नक्षत्राच्या आरंभापासून जन्मकालापर्यंत गतघटी २० × १॥ = ३० ÷ ५८; येथें तिसांना ५८ या अंकांनीं भाग जात नाहीं, म्हणून तिसांना बारांनीं गुणून महिने करून नंतर भागिलें आहे. जसें, ३० × १२ = ३६० ÷ ५८ = ६ मास १२ दिवस ही भुक्तदशा होय. हे अंक त्या नक्षत्राची दशा वर्ष १॥ त्यांतून वजा करा. जसें, १॥ वर्ष = १८ महिने, यांतून उणे ६ म० १२ दि० = ११ म० १८ दि० हा पुनर्वसु नक्षत्राचा भोग्यकाल होय. एका नक्षत्रास एकंदर भोग्यकाल वर्ष १॥ म्हणून कोष्टकांतील पुनर्वसु नक्षत्राच्या पुढील नक्षत्रें २ × १॥ = ३ वर्षें + पुनर्वसूचा भोग्यकाल ११ म० १८ दि० = ३ वर्षें ११ म० १८ दि० इतकी सूर्याची दशा जन्मणारास भोगावयाची आहे. म्हणजे जन्मकालापासून तितकें वय होईपर्यंत ती दशा राहील. हीं वर्षें सूर्याच्या एकंदर वर्षसंख्येंतून वजा करा. सूर्यमहादशा एकंदर वर्षें ६ यांतून वजा भोग्यदशा ३ व. ११ म. १८ दि. ० घ. = २ व. ० म. १२ दि. ० घ. इतकी सूर्याची एकंदर दशा भुक्त झाली. याचप्रमाणें नक्षत्रांवरून सर्व ग्रहांच्या भुक्तभोग्य दशा काढाव्या. जन्मकालीं जी दशा असेल ती संपल्यानंतर त्याच्या पुढील ग्रहाची दशा मागील कोष्टकांत दाखविल्याप्रमाणें सुरू होते. असो, ही स्थूलमानाची रीति आहे. परंतु सुलभ आहे म्हणून तीच येथें दिली आहे. स्पष्टचंद्र करून म्ह० त्याच्या कला करून, एका नक्षत्राला म्ह० ८०० कलांना जर अमुक वर्षें तर स्पष्टचंद्राच्या जितक्या कला होतील तितक्या कलांना किती? इत्यादि त्रैराशिक पद्धतीनें भुक्तभोग्यदशा काढणें अधिक सूक्ष्म आहे. विंशोत्तरीच्या देखील भुक्तदशा वरील रीतीनेंच काढाव्या.

ग्रहांच्या अंतर्दशा.

ज्या एकाद्या ग्रहाच्या महादशेंतील ज्या दुसऱ्या ग्रहाची अंतर्दशा काढावयाची असेल त्या दोहोंच्याही महादशेच्या वर्षसंख्यांचा गुणाकार करावा, व त्यास १०८ नीं भागावें. जें उत्तर येईल तितकी वर्षमासादि अंतर्दशा जाणावी. उदाहरण—रवीच्या महादशेंत चंद्राची अंतर्दशा काढावयाची आहे, म्हणून रवीची महादशा वर्षें ६ × चंद्रमहादशावर्षें १५ = ९० (९० × १२ = १०८०) ÷ १०८ = १० महिने. ही रवीच्या महादशेंतील चंद्राची अंतर्दशा झाली. चंद्राच्या महादशेंत रवीची अंतर्दशा इतकीच असणार हें उघड आहे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

अष्टोत्तरी महादशा व अंतर्दशा.

सूर्यमहादशावर्षें ६ मध्यें अन्तर्दशा
आर्द्रा, पुनर्वसु, पुष्य, आश्लेपा.

सू.	चं.	मं	बु.	श.	गु.	रा.	शु.	
०	०	०	०	०	१	०	१	वर्ष
४	१०	५	११	६	०	८	२	मास
०	०	१०	१०	२०	२०	०	०	दिवस
०	०	०	०	०	०	०	०	घ०

स्थूलमानानें आर्द्रादि सर्व नक्षत्रांस एका घटिकेस दिवस ९ व एका नक्षत्रास वर्ष १॥ एकंदर वर्षें ६.

चंद्रमहादशावर्षें १५ मध्यें अन्तर्दशा
मघा, पूर्वा फा०, उत्तरा फा०.

चं.	मं.	बु.	श.	गु.	रा.	शु.	सू.	
२	१	२	१	२	१	२	०	व०
१	१	४	४	७	८	११	१०	मा०
०	१०	१०	२०	२०	०	०	०	दि०
०	०	०	०	०	०	०	०	घ०

स्थूलमानानें मघादि ३ नक्षत्रांस एका घटिकेस दिवस ३० व एका नक्षत्रास वर्षें ५ एकंदर वर्षें १५.

भौममहादशावर्षें ८ मध्यें अन्तर्दशा
हस्त, चित्रा, स्वाती, विशाखा.

मं.	बु.	श.	गु.	रा.	शु.	सू.	चं.	
०	१	०	१	०	१	०	१	व०
७	३	८	४	१०	६	५	१	मा०
३	३	२६	२६	२०	२०	१०	१०	दि०
२०	२०	४०	४०	०	०	०	०	घ०

स्थूलमानानें हस्तादि सर्व नक्षत्रांस एका घटिकेस १२ दिवस व एका नक्षत्रास वर्षें २ एकंदर वर्षें ८.

बुधमहादशावर्षें १७ मध्यें अन्तर्दशा
अनुराधा, ज्येष्ठा, मूळ.

बु.	श.	गु.	रा.	शु.	सू.	चं.	मं.	
२	१	२	१	३	०	२	१	व०
८	६	११	१०	३	११	४	३	मा०
३	२६	२६	२०	२०	१०	१०	३	दि०
२०	४०	४०	०	०	०	०	२०	घ०

स्थूलमानानें सर्व नक्षत्रांस एक घटिकेस ३४ दिवस व एका नक्षत्रास ५ वर्षें ८ मास एकंदर वर्षें १७.

शनिमहादशावर्षें १० मध्यें अन्तर्दशा
पूर्वाषाढा, उत्तराषाढा, अभिजित्, श्रवण.

श.	गु.	रा.	शु.	सू.	चं.	मं.	बु.	
०	१	१	१	०	१	०	१	व०
११	९	१	११	६	४	८	६	मा०
३	३	१०	१०	२०	२०	२६	२६	दि०
२०	२०	०	०	०	०	४०	४०	घ०

पू०षाढा एका घटिकेस दि० १५, उ०षा० १ घ० दि० २०, अभि० १ घ० दि० ४७ घ० २२, श्रव० १ घ० दि० १६ घ० ४ एका नक्षत्रास वर्षें २॥ एकंदर वर्षें १०.

गुरुमहादशावर्षें १९ मध्यें अन्तर्दशा
धनिष्ठा, शततारका, पूर्वाभाद्रपदा.

गु.	रा.	शु.	सू.	चं.	मं.	बु.	श.	
३	२	३	१	२	१	२	१	व०
४	१	८	०	७	४	११	९	मा०
३	१०	१०	२०	२०	२६	२६	३	दि०
२०	०	०	०	०	४०	४०	२०	घ०

स्थूलमानानें सर्व नक्षत्रांस १ घटिकेस दि० २८ एका नक्षत्रास वर्षें ६ म० ४ एकंदर वर्षें १९.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

राहुमहादशावर्षें १२ मध्यें अन्तर्दशा उत्तराभाद्रपदा, रेवती, अश्विनी, भरणी.

रा.	शु.	सू.	चं.	मं	बु.	श.	गु.	
१	२	०	१	०	१	१	२	व०
४	४	८	८	१०	१०	१	१	मा०
०	०	०	०	२०	२०	१०	१०	दि०
०	०	०	०	०	०	०	०	घ०

स्थूलमानानें सर्व नक्षत्रांस एक घटिकेस दि० १० एका नक्षत्रास वर्षें ३ एकंदर वर्षें १२.

शुक्रमहादशावर्षें २१ मध्यें अन्तर्दशा कृत्तिका, रोहिणी मृगशीर्ष.

शु.	सू.	चं.	मं.	बु.	श.	गु.	रा.	
४	१	२	१	३	१	३	२	व०
१	२	११	६	३	११	८	४	मा०
०	०	०	२०	२०	१०	१०	०	दि०
०	०	०	०	०	०	०	०	घ०

स्थूलमानानें सर्व नक्षत्रांस एका घ० ४२ दिवस, एका नक्षत्रास वर्षें ७ एकंदर वर्षें २१.

विंशोत्तरी दशा.

कृत्तिकादिक्रमेणैव ज्ञेया विंशोत्तरी दशा ।
अंतर्दशायुतावर्षमासवासरवर्तिनी ॥ १४ ॥
विहीनं जनुर्भक्रमादंकहृत्स्यात् रवींदू कुजो राहुवाचस्पती च ।
शनिश्चंद्रजश्चाग्रतः केतुशुक्रौ दशाधीश्वराः प्रोचतुर्गर्गमुख्याः ॥१५

कृत्तिका नक्षत्रापासून भरणी नक्षत्रापर्यंत सत्तावीस नक्षत्रांमध्यें महादशांची संख्या १२० वर्षें विभागली आहे ती वर्षसंख्या यथानुक्रम अंतर्दशांचीं वर्षें, मास व दिवस यांसह कोष्टकरूपानें दिली आहे.

आपलें जन्मनक्षत्र जें असेल त्या नक्षत्राच्या अनुक्रमांकांतून दोन वजा करावे, आणि ९ नीं भागावें. शेष १ उरला तर रवीची दशा, २ उरले तर चंद्राची दशा, ३ उरले तर मंगळाची, ४ उरले तर राहूची, ५ उरले तर गुरूची, ६ उरले तर शनीची, ७ उरले तर बुधाचीं, ८ उरले तर केतूची, व ० शेष असतां शुक्राची महादशा जाणावी. या नियमाला अश्विनी नक्षत्र अपवाद आहे. अष्टोत्तरी आणि विंशोत्तरी दशांमध्यें कोणत्या ग्रहाला किती वर्षें असतात हें पूर्वीं ६० व्या पृष्ठांत दिलें आहे.

कोणत्या जन्मनक्षत्राला कोणत्या ग्रहाची दशा असते व ती किती वर्षें असते हें पुढील कोष्टकावरून ध्यानीं येईल. त्या कोष्टकांत मुख्यत्वेंकरून प्रत्येक ग्रहाच्या महादशेंतील प्रत्येक ग्रहाचा अंतर्दशाकाल दाखविला आहे. ह्या अंतर्दशा काढण्याची रीति अष्टोत्तरीप्रमाणेंच आहे. परंतु तेथें लिहिल्याप्रमाणें येथें १०८ नीं न भागितां १२० नीं भागावें. तथापि नवीन विद्यार्थ्यांसाठीं यासंबंधानें थोडें अधिक स्पष्टीकरण करणें अवश्य आहे. प्रत्येक ग्रहाच्या महादशेच्या वर्षसंख्येमध्यें सर्व ग्रहांच्या अंतर्दशा असतात, हें अष्टोत्तरी दशेंतील वर्णनावरून आपणांस कळलेंच आहे. पण विंशोत्तरी दशांची रीति थोडी भिन्न आहे, म्हणून तत्संबंधीं येथें स्पष्टीकरण करितों.

स्पष्टीकरण—रवीच्या महादशेचीं नक्षत्रें तीन आहेत, व महादशेंतील प्रत्येक

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ग्रहालाही तीनतीनच नक्षत्रें दिलेलीं आहेत. जसें, कृत्तिका, उत्तरा व उत्तराषाढा हीं रवीचीं नक्षत्रें होत. म्हणजे या तीन नक्षत्रांचा दशास्वामी रवि असून, रवीच्या महादशेचीं जीं पूर्ण सहा वर्षें, तीं या तीन नक्षत्रांतून कोणत्याही एका नक्षत्रामध्यें जन्म असतां त्या नक्षत्राला मानावीं. अष्टोत्तरी दशेच्या रीतीप्रमाणें घेऊं नये. येथें महादशेचें एक उदाहरण करून दाखवितों. असें समजा कीं, जन्मकाळीं चंद्र आर्द्रा नक्षत्रामध्यें, म्हणजे राहूच्या दशेंत आहे. राहूची एकंदर महादशा वर्षें १८, त्यांपैकीं जन्मकालानंतर आर्द्रानक्षत्राच्या उरलेल्या भोग्यकालास येणारीं वर्षें पूर्ण झाल्यावर पुढील म्हणजे गुरूची दशा १६ वर्षें घ्यावी. जसें, आर्द्रा नक्षत्रावर एकाचें जन्म झालें असून आर्द्रा नक्षत्र आरंभापासून एकंदर ६४ घटिका आहे. त्यांपैकीं जन्मापूर्वीं ४८ घटिका भुक्त आहेत, अर्थात् जन्मानंतर आर्द्रांच्या १६ घटिका शेष राहिल्या, म्हणून तेवढ्याच घटिकांचा दशाकाल घ्यावा. जसें ६४ घटिकांना जर १८ वर्षें, तर १६ घटिकांना किती? त्रैराशिकाच्या रीतीनें उदाहरण करावें. उत्तर ४ वर्षें ६ मास ० दिवस येतें. हीं साडेचार वर्षें जन्मतः भुक्त झाल्यानंतर जन्मणाऱ्या मनुष्याला वयाच्या साडेचार वर्षांपासून पुढें गुरूची महादशा १६ वर्षें-पर्यंत आहे; म्हणजे त्याच्या वयाच्या साडेवीस वर्षेंपर्यंत गुरूची दशा, नंतर १९ वर्षें शनीची, नंतर १७ वर्षें बुधाची, नंतर ७ वर्षें केतूची, नंतर २० वर्षें शुक्राची, नंतर ६ वर्षें रवीची इत्यादि क्रम जाणावा. एकाद्या ग्रहाची महादशा जेव्हां सुरू होते, त्या वेळीं पहिली अंतर्दशा त्याच ग्रहाची असते. जसें, गुरूच्या महादशेंत पहिली अंतर्दशा गुरूची, रवीच्या महादशेंत रवीची, इत्यादि. प्रत्येक ग्रहाच्या महादशेमध्यें सर्व ग्रहांच्या जरी अंतर्दशा असतात, तरी त्यांचा भोग्यकाल मात्र सारखा नसतो.

विंशोत्तरी महादशेंतील अंतर्दशांचें कोष्टक.

सूर्यमहादशा वर्षें ६ कृत्ति. उत्तराफा. उत्तराषा.				चंद्रमहादशा वर्षें १० रोहिणी, हस्त, श्रवण.				भौममहादशा वर्षें ७ मृग, चित्रा, धनिष्ठा.			
अंतर्दशा.				अंतर्दशा.				अंतर्दशा.			
	व०	मा०	दि०		व०	मा०	दि०		व०	मा०	दि०
र.	०	३	१८	चं.	०	१०	०	मं.	०	४	२७
चं.	०	६	०	मं.	०	७	०	रा.	१	०	१८
मं.	०	४	६	रा.	१	६	०	गु.	०	११	६
रा.	०	१०	२४	गु.	१	४	०	श.	१	१	९
गु.	०	९	१८	श.	१	७	०	बु.	०	११	२७
श.	०	११	१२	बु.	१	५	०	के.	०	४	२७
बु.	०	१०	६	के.	०	७	०	शु.	१	२	०
के.	०	४	६	शु.	१	८	०	र.	०	४	६
शु.	१	०	०	र.	०	६	०	चं.	०	७	०

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

राहुमहादशा वर्षें १८ आर्द्रा, स्वाती, शतता०.				गुरुमहादशा वर्षें १६ पुनर्व०, विशा०, पू०भा०.				शनिमहादशा वर्षें १९ पुष्य, अनु०, उ० भा०.			
अंतर्दशा.				अंतर्दशा.				अंतर्दशा.			
	व०	मा०	दि०		व०	मा०	दि०		व०	मा०	दि०
रा.	२	८	१२	गु.	२	१	१८	श.	३	०	३
गु.	२	४	२४	श.	२	६	१२	बु.	२	८	९
श.	२	१०	६	बु.	२	३	६	के.	१	१	९
बु.	२	६	१८	के.	०	११	६	शु.	३	२	०
के.	१	०	१८	शु.	२	८	०	र.	०	११	१२
शु.	३	०	०	र.	०	९	१८	चं.	१	७	०
र.	०	१०	२४	चं.	१	४	०	मं.	१	१	९
चं.	१	६	०	मं.	०	११	६	रा.	२	१०	६
मं.	१	०	१८	रा.	२	४	२४	गु.	२	६	१२

बुधमहादशा वर्षें १७ आश्ले०, ज्येष्ठा, रेवती.				केतुमहादशा वर्षें ७ मघा, मूळ, अश्विनी.				शुक्रमहादशा वर्षें २० पू० फा०, पू० षा०, भर०.			
अंतर्दशा.				अंतर्दशा.				अंतर्दशा.			
	व०	मा०	दि०		व०	मा०	दि०		व०	मा०	दि०
बु.	२	४	२७	के.	०	४	२७	शु.	३	४	०
के.	०	११	२७	शु.	१	२	०	र.	१	०	०
शु.	२	१०	०	र.	०	४	६	चं.	१	८	०
र.	०	१०	६	चं.	०	७	०	मं.	१	२	०
चं.	१	५	०	मं.	०	४	२७	रा.	३	०	०
मं.	०	११	२७	रा.	१	०	१८	गु.	२	८	०
रा.	२	६	१८	गु.	०	११	६	श.	३	२	०
गु.	२	३	६	श.	१	१	९	बु.	२	१०	०
श.	२	८	९	बु.	०	११	२७	के.	१	२	०

विंशोत्तरी दशेचें स्थूल कालमानकोष्टक.

नक्षत्रांचे विभाग.	र.	चं.	मं.	रा.	गु.	श.	बु.	के.	शु.	
¼ नक्षत्र	१॥	२॥	१।॥	४॥	४	४।॥	४।	१।॥	५	वर्षें.
½ नक्षत्र	३	५	३॥	९	८	९॥	८॥	३॥	१०	वर्षें.
¾ नक्षत्र	४॥	७॥	५।	१३॥	१२	१४।	१२।॥	५।	१५	वर्षें.
पूर्ण नक्षत्र	६	१०	७	१८	१६	१९	१७	७	२०	वर्षें.

महादशेची जितकी पूर्ण वर्षसंख्या असेल, त्याच्या सहापट दिवस स्थूलमानानें

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

एका घटिकेस येतात. उदाहरणार्थ, रवीचीं एकंदर वर्षें सहा, याची सहापट म्हणजे ३६ दिवस, किंवा १ महिना ६ दिवस एका घटिकेस जाणावे.

योगिनीदशा.

मंगला पिंगला धन्या भ्रामरी भद्रिका तथा ।
उल्का सिद्धा संकटा च फलमासां स्वनाम चेत् ।
स्वस्वसंख्यागुणं कालं मंगलांतं स्वभोग्यकम् ॥ १६ ॥

योगिनी ८ आहेत, त्यांचीं नांवें—मंगला, पिंगला, धन्या, भ्रामरी, भद्रिका, उल्का, सिद्धा व संकटा अशीं आहेत. त्यांच्या दशा काढण्याची रीति अशी आहे कीं, जें जन्मनक्षत्र असेल त्यांत तीन अंक मिळवावे आणि त्या वेरजेस आठांनीं भागावें; बाकी १ अंक उरला तर मंगलेची दशा जाणावी, २ उरले तर पिंगलेची, ३ उरले तर धन्येची, ४ उरले तर भ्रामरीची, ५ उरले तर भद्रिकेची, ६ उरले तर उल्केची, ७ उरले तर सिद्धेची, व ८ उरले तर संकटेची, याप्रमाणें योगिनीदशा जाणाव्या. ज्या योगिनीचा जो अनुक्रमांक असेल तितकीं वर्षें त्या योगिनीची दशा जाणावी. जसें, मंगलेचें १ वर्ष, पिंगलेचीं २ वर्षें, धन्येचीं ३ वर्षें इत्यादि. ह्या योगिनीदशेचीं एका फेऱ्याचीं ३६ वर्षें होतात, व पुनः पुनः अनुक्रमानें त्याच दशा येतात. उदाहरण, एकाचें जन्मनक्षत्र विशाखा म्हणजे १६ वें आहे. यांत ३ मिळवा, वेरीज १९ झाली. त्याला आठांनीं भागिलें. बाकी ३ राहिली. तिसरी योगिनी धन्या आहे म्हणून धन्यायोगिनीची दशा जन्मकाळीं आहे असें जाणावें. पूर्वीं अष्टोत्तरी दशेंत सांगितल्याप्रमाणेंच योगिनीदशेचीं जन्मकाळचीं भुक्तभोग्य वर्षें काढावीं. अंतर्दशाही त्याच रीतीनें काढाव्या. उदाहरण, पिंगलेच्या महादशेंत धन्येची अंतर्दशा किती तें सांगा. पिंगलेची वर्षसंख्या २, धन्या दशेची वर्षसंख्या ३ व एकंदर योगिनीदशांची वर्षसंख्या ३६; आतां त्रैराशिक रीतीनें उदाहरण मांडा. ३६ ला जर ३ वर्षें, तर २ वर्षांना किती दिवस येतील? ३ × २ = ६ वर्षें ÷ ३६ = $\frac{६}{३६}$ वर्षें. याचे महिने करा. ६ × १२ = ७२ ÷ ३६ = २ महिने. हा पिंगलामहादशेंतील धन्याअंतर्दशेचा काल झाला. पुढें मंगलादि ८ योगिनींच्या अंतर्दशांचें कोष्टक दिलें आहे, त्यावरून स्पष्ट कळेल.

योगिनींच्या अंतर्दशा.

	मंगलांतर्दशा वर्ष १								पिंगलांतर्दशा वर्षें २							
	मं.	पिं.	ध.	भ्रा.	भ.	उ.	सि.	सं.	पिं.	ध.	भ्रा.	भ.	उ.	सि.	सं.	मं.
व.	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०
म.	०	०	१	१	१	२	२	२	१	२	२	३	४	४	५	०
दि.	१०	२०	०	१०	२०	०	१०	२०	१०	०	२०	१०	०	२०	१०	२०

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

धन्यांतर्दशा वर्षें ३								
	ध.	भ्रा.	भ.	उ.	सि.	सं.	मं.	पिं.
व.	०	०	०	०	०	०	०	०
म.	३	४	५	६	७	८	१	२
दि.	०	०	०	०	०	०	०	०

भ्रामरी अंतर्दशा वर्षें ४								
	भ्रा.	भ.	उ.	सि.	सं.	मं.	पिं.	ध.
व.	०	०	०	०	०	०	०	०
म.	५	६	८	९	१०	१	२	४
दि.	१०	२०	०	१०	२०	१०	२०	०

भद्रिकांतर्दशा वर्षें ५								
	भ.	उ.	सि.	सं.	मं.	पिं.	ध.	भ्रा.
च.	०	०	०	१	०	०	०	०
म.	८	१०	११	१	१	३	५	६
दि.	१०	०	२०	१०	२०	१०	०	२०

उल्कांतर्दशा वर्षें ६								
	उ.	सि	सं.	मं.	पिं.	ध.	भ्रा.	भ.
व.	१	१	१	०	०	०	०	०
म.	०	२	४	२	४	६	८	१०
दि.	०	०	०	०	०	०	०	०

सिद्धांतर्दशा वर्षें ७								
	सि.	सं.	मं.	पिं.	ध.	भ्रा.	भ.	उ.
व.	१	१	०	०	०	०	०	१
म.	४	६	२	४	७	९	११	२
दि.	१०	२०	१०	२०	०	१०	२०	०

संकटांतर्दशा वर्षें ८								
	सं.	मं.	पिं.	ध.	भ्रा.	भ.	उ.	सि.
व.	१	०	०	०	०	१	१	१
म.	९	२	५	८	१०	१	४	६
दि.	१०	२०	१०	०	२०	१०	०	२०

वरील कोष्टकांपैकीं डाव्या हाताकडील उभ्या कोष्टकांतील दशा म्हणजे मंगला, धन्या, भद्रिका व सिद्धा ह्या शुभफलदायक आहेत व बाकीच्या म्हणजे पिंगला, भ्रामरी, उल्का व संकटा ह्या अशुभफलदायक आहेत असें जाणावें.

कुंडलीविचार.

कुंडली पाहून ग्रहांचीं फलें सांगणें ही गोष्ट फलज्योतिषशास्त्रांत विशेष महत्त्वाची आहे. व हल्लीं बऱ्याच लोकांचें इकडे लक्ष्य लागलें आहे म्हणून त्याविषयीं संक्षेपें-करून येथें लिहितों. कुंडली पाहणारास ज्या कांहीं गोष्टी अगदीं बिनचूक माहिती असल्या पाहिजेत, त्या यथानुक्रम खालीं लिहिल्या आहेत. गद्यापेक्षां पद्यें ध्यानांत ठेवण्यास सोयीचीं असल्यामुळें कुंडली पाहणाऱ्यांनीं यथास्थलीं दिलेले कांहीं महत्त्वाचे सुलभ श्लोक तोंडपाठ करावे, म्हणजे त्यामुळें कुंडली पाहण्यास पुष्कळ मदत होईल. कुंडली पाहून फलें सांगणें ही गोष्ट केवळ अनुभवाची असल्यामुळें त्याविषयीं येथें सविस्तर लिहिणें शक्य नाहीं. म्हणून मी येथें फक्त मूलतत्त्वेंच लिहिणार आहें. जसजशा अधिक कुंडल्या दृष्टीखालून जातील, तसतशीं बरोबर फलें सांगण्याची अधिक पात्रता अंगीं येत जाईल. असो. कुंडली म्हणजे जन्मकालीं आकाशांतील ग्रहांची स्थिति दाखविणारा एक नकाशा आहे हें पूर्वीं सांगितलेंच आहे. कुंडलींत बारा स्थानें असतात, त्यांचीं निरनिराळीं नांवें आहेत व प्रत्येक स्थानावर किंवा ग्रहावर निरनिराळ्या गोष्टींचा विचार करितात. हीं स्थानें, जन्मलग्न हें प्रथम

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

स्थान धरून तेथून मोजितात. जन्मकाळीं जी राशि क्षितिजांत उदय पावत असेल तें जन्मलग्न होय. इष्टकाळची आकाशांतील ग्रहस्थिति समजण्याकरितां लग्नकुंडली जमिनीवर क्रांतिवृत्ताच्या पातळींत लंबसंस्थ धरावी, म्हणजे पूर्वदिशेकडे लग्नाचें स्थान व पश्चिम दिशेकडे सप्तमस्थान होईल; कुंडलीचें दशमस्थान हा डोकीवरचा आकाशांतील मध्यबिंदु, व चतुर्थस्थान हा पायांखालील पाताळांतील मध्यबिंदु होय. कुंडली आपल्यासमोर धरिली म्हणजे उजव्या बाजूचें कुंडलीचें अर्ध हें दिवसाची आकाशस्थ ग्रहांची उदित स्थिति दाखवील व डावीकडील अर्ध हें रात्रीची अस्तस्थिति दाखवील. बाजूची कुंडली पहा.



लग्नकुंडलीचीं द्वादशस्थानें (गीति).

तनुधनसहजसुहृत्सुतरिपुजायामृत्युधर्मकर्मायाः ।
व्यय इति भावा द्वादश तेषां गणनं प्रसव्यतो लग्नात् ॥ १७ ॥

वरील गीतीमध्यें जन्मलग्नापासून म्हणजे प्रथमस्थानापासून द्वादशभावांच्या संज्ञा अनुक्रमानें सांगितल्या आहेत. जसें, प्रथमभावाला तनुस्थान म्हणतात. दुसरें धनस्थान, तिसरें सहज किंवा पराक्रमस्थान, चवथें सुहृत्स्थान आणि मातृस्थान, पांचवें सुतस्थान आणि विद्यास्थान, सहावें रिपुस्थान, सातवें जायास्थान, आठवें मृत्युस्थान, नववें धर्मस्थान किंवा भाग्यस्थान, दहावें कर्मस्थान, पितृस्थान किंवा राज्यपदस्थान, अकरावें आयस्थान किंवा लाभस्थान, आणि बारावें व्ययस्थान. ह्याप्रमाणें द्वादशभावांचीं निरनिराळीं नांवें आहेत. तीं लग्नस्थानापासून अप्रदक्षिण म्हणजे डावीकडून उजवीकडे मोजावीं. हीं बारा स्थानांचीं बारा नांवें कोणत्या तत्त्वावर ठेवण्यांत आलीं आहेत याविषयीं हल्लीं उपलब्ध असलेल्या ज्योतिषग्रंथांत कोठें कांहीं लिहिलेलें निदान माझ्या तरी पाहण्यांत नाहीं. तिसऱ्याच स्थानाला पराक्रमस्थान कां म्हणावें किंवा एकादशस्थानालाच लाभस्थान ही संज्ञा कां असावी, याची सयुक्तिक उपपत्ति लागल्यास या शास्त्राचें महत्त्व अधिक वाढेल. तथापि कुंडलीचा वेदान्त आणि व्यवहार अशा उभय दृष्टींनीं विचार केला तर यासंबंधीं एक विशेष गोष्ट दृष्टोत्पत्तीस येते ती अशी कीं, कुंडलींतल्या कोणत्याही स्थानापासून त्याचें सप्तमस्थान, हें त्या स्थानाचें परिणामदर्शक किंवा कारणदर्शक असतें. मग ती कार्यकारणस्थिति स्वतःच्या कल्पनेप्रमाणें श्रेयस्कर किंवा अश्रेयस्कर भासूं शकेल. उदाहरणार्थ—पहिलें तनुस्थान, त्यापासून जें सप्तमस्थान त्याला जायास्थान असें नांव दिलेलें आहे. सूक्ष्म दृष्टीनें विचार केला तर जाया ही तनूच्या तेजोबलाला क्षयकारक

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

नाहीं किंवा संसारांत जाया ही गृहस्थाश्रमाला भूषण नाहीं असें कोण म्हणेल? तसेंच, द्वितीयस्थानाला धनस्थान म्हणतात. धनस्थानापासून सप्तमस्थान हें मृत्यु-स्थान. धनापासून तनूचा नाश झाल्याचीं उदाहरणें वारंवार घडतात, हें अनेक प्रसंगीं जगांत दृष्टीस पडतें. आतां याचें कारण तेथें अशुभग्रहाची दृष्टि असेल किंवा तें अशुभग्रहाचें स्थान असेल इत्यादि कांहीं असो. अथवा पारमार्थिक दृष्ट्या जरी विचार केला, तरीही धन हें घातकच आहे; आणि याचसाठीं मुमुक्षुजन त्याचा तिरस्कार करितात. तृतीयस्थान हें पराक्रमस्थान आहे. तेथपासून सप्तमस्थान हें भाग्यस्थान. पराक्रम अंगीं असेल तरच मनुष्य भाग्य काढील, किंवा इष्ट वस्तु साध्य करून घेईल हें निश्चित आहे. चतुर्थस्थानाला मातृस्थान म्हणतात. हें पितृस्थानाचें म्हणजे दशमस्थानाचें जायास्थान झालें. जायास्थानाचे परिणाम वर लिहिलेच आहेत. किंवा दशमस्थान हें राज्यपदस्थान धरून चतुर्थस्थानाचा म्हणजे सुखाचा विचार केला, तर राज्यामागें म्हणजे मोठेपणामागें खऱ्या सुखाची हानि झालीच असें सम-जावें. तसेंच, पंचमस्थानापासून म्हणजे विद्यास्थानापासून सातव्या स्थानाला लाभ-स्थान म्हणतात. विद्या म्हणजे ज्ञान, तें असेल तरच इष्ट वस्तूचा लाभ होईल हें अगदीं उघड आहे. रिपुस्थानाचें जें सप्तमस्थान तें व्ययस्थान. शत्रूपासून तनु, मन व धन यांना कसा क्षय लागतो, हें कोर्टांत ज्यांचे भाऊबंदकीचे तंटे चाललेले असतात त्यांना विचारावें म्हणजे समजेल. किंवा रिपु म्हणजे षड्रिपु धरिले तरी त्यांपासूनही सर्व प्रकारें व्यय म्हणजे क्षयच होणार हें उघड आहे. याप्रमाणें प्रत्येक स्थानाचा त्याच्या सातव्या स्थानाशीं कांहींतरी परिणामसंबंध किंवा कारणसंबंध आहे असें दिसतें. अशाच प्रकारच्या कांहीं तत्त्वांवर हीं द्वादशस्थानांचीं नांवें पडलीं असतील असें वाटतें. असो. आतां ह्या बारा स्थानांवर काय काय विचार करावा हें सांगतों.

तनुस्थानावर शरीरसंबंधी विचार म्हणजे शरीर पुष्ट किंवा कृश; देहसुख कित-पत मिळेल; वर्णसंबंधीं विचार म्हणजे गौरवर्ण, कृष्णवर्ण, मिश्रवर्ण किंवा श्वेतवर्ण यांचा विचार; अंगावर तीळ-मषकादिक अमुक स्थानीं असतील याचा विचार; सदाचरणी किंवा दुराचरणी याचा विचार; व आयुर्दायाचा विचार इत्यादि गोष्टी पहाव्या. याचा अधिकार शिरावर असतो.

धनस्थानावर सुवर्णरत्नादिकांची प्राप्ति, द्रव्यसंग्रही किंवा खर्चिक, कुटुंबसौख्य, वाणींत दोष आहे कीं काय म्हणजे तोतरें वगैरे बोलणें याचा विचार, वडिलो-पार्जित द्रव्यलाभ इत्यादिकांचा विचार करितात. याचा अधिकार वाणी व नेत्र यांच्यावर असतो.

तृतीयस्थानावर भाऊ किती आहेत, बहिणी किती आहेत, त्यांपासून सुख-दुःख, स्वतःचा पराक्रम, साहस, चाकरांचें सौख्य, प्रवासयोग, हस्ताक्षर इत्यादि गोष्टींचा विचार करितात. या स्थानाचा अधिकार कान व गळा यांच्यावर असतो.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

चतुर्थस्थानावर मातृसंबंधीं सुखाचा विचार, चतुष्पदांपासून सुखदुःख, घर बांधणें होईल किंवा नाहीं, मित्रसुख, भूमिलाभ, वडिलार्जित द्रव्यलाभ, अंतकाळची स्थिति इत्यादि गोष्टी पहाव्या. याचें स्वामित्व हृदयावर आहे.

पंचमस्थानावर बुद्धि, विद्याप्राप्ति, शास्त्रज्ञान, ग्रंथकर्तृत्व, मंत्रतंत्र जाणणें, स्त्रीचे ठायीं गर्भधारणसंबंधीं विचार, पुत्रकन्या यांची संख्या व त्यापासून सुखदुःख इत्यादिकांविषयीं विचार करावा. याचें स्वामित्व उदर व कुशी यांच्यावर आहे.

षष्ठस्थानावर शत्रु उत्पन्न होतील कीं काय, त्यांची वृद्धि किंवा नाश, रोगोत्पत्ति, व्रणादिकांचा उद्भव, मातुलपक्षाचें सुखदुःख इत्यादि गोष्टींचा विचार करावा. याचा अंमल कटिभागावर आहे.

सप्तमस्थानावर विवाहयोग, भार्या सुन्दर किंवा कुरूप, तिजपासून सुखदुःख, तिची शरीरप्रकृति व स्वभाव, महायात्रादि योग इत्यादि गोष्टी पहाव्या. यांचा अंमल ओटीपोटावर आहे.

अष्टमस्थानावर आयुर्दायविचार, मनोव्यथा, अपमृत्यु, आत्महत्यादि अनिष्ट मरण, ज्वरादि रोगोद्भव इत्यादि गोष्टी पहाव्या. याचें स्वामित्व गुह्येंद्रियावर आहे.

नवमस्थानावर यात्रादिकांचा विचार, स्वधर्मावर निष्ठा, सत्कर्में म्हणजे लोकोपयोगी कृत्यें, योग्यस्थानीं दानधर्म, जलप्रवास, भाग्योदयाचा काळ व तो कोणत्या प्रकारचा आहे इत्यादि पहावें. याचा अधिकार मांडीवर आहे.

दशमस्थानावर राजाश्रय, राजापासून विशेष अधिकारप्राप्ति, व्यापारांत यश किंवा अपयश, पुण्यसंवृद्धि, पितृसंबंधीं सुखदुःख, पित्याचा मृत्यु इत्यादि गोष्टी पहाव्या. याचा अधिकार गुडघ्यांवर आहे.

एकादशस्थानावर धनधान्य, पशु आदिकरून सर्व वस्तूंचा लाभ, कुटुंबसुख इत्यादि विचार करावा. याचा अंमल पोटऱ्यांवर आहे.

द्वादशस्थानावर आयुष्यांत होणाऱ्या खर्चाविषयीं म्हणजे फार खर्च होऊन पैशाची उणीव भासेल कीं काय, सद्व्यय किंवा अपव्यय म्हणजे आवश्यक गोष्टींत किंवा व्यसनांत द्रव्य खर्च होईल इत्यादि गोष्टी पहाव्या. याचें स्वामित्व पावलांवर असतें.

तन्वादि द्वादशभावांत बलिष्ठ ग्रह.

तनुस्थानीं—सूर्य.	जायास्थानीं—शुक्र.
धनस्थानीं—शुक्र.	मृत्युस्थानीं—शनि.
सहजस्थानीं—मंगळ.	भाग्यस्थानीं—रवि, गुरु.
सुहृत्स्थानीं—चंद्र, बुध.	कर्मस्थानीं—रवि, बुध, गुरु, शनि.
सुतस्थानीं—गुरु.	आयस्थानीं—शुक्र.
रिपुस्थानीं—शनि, मंगळ.	व्ययस्थानीं—शनि.

याप्रमाणें द्वादशभावांत ग्रह असतां ते त्या त्या भावांपासून होणारीं फळें विशेष प्रकारें प्राप्त करून देतात.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

द्वादशराशींचा विचार.

मेषो[१] वृषो[२]ऽथ मिथुनं[३] कर्कः[४] सिंहो[५]ऽथ कन्यका[६]
तुला[७]ऽथ वृश्चिको[८] धन्वी[९] मकरः[१०] कुंभ[११]मीनकौ[१२]।
राशयस्तु क्रमादेते पुंस्त्रियौ क्रूरसौम्यकौ ॥ १८॥

मेषवृषभादिकरून बारा राशी आहेत हें पूर्वी सांगितलेंच आहे. वरील श्लोकांत प्रत्येक राशीच्या नांवावर अंक घातले आहेत ते राशींचे अनुक्रमांक आहेत. ते कुंडली पाहणारास पाठ पाहिजेत. कारण कुंडलींत राशींचीं नांवें न लिहितां राशींचे अनुक्रमांक लिहितात. जन्मकुंडलीच्या मध्यगृहांत २ हा अंक असतां वृषभलग्नावर जन्म आहे, ७ असतां तूळलग्नावर आहे, ९ असतां धनलग्नावर आहे इत्यादि एकदम ध्यानांत आलें पाहिजे.

राशींचे देह—मेष, वृषभ व कुंभ ह्या ऱ्हस्वदेही राशी; मिथुन, कर्क, धनु, मकर व मीन ह्या मध्यमदेही राशी; आणि सिंह, कन्या, तूळ व वृश्चिक ह्या दीर्घदेही राशी होत.

राशींचे स्वभाव—विषमराशी क्रूर आणि समराशी सौम्य होत. मेष, मिथुन, सिंह, तूळ, धनु व कुंभ ह्या विषमराशी होत. आणि बाकीच्या म्हणजे वृषभ, कर्क, कन्या, वृश्चिक, मकर व मीन ह्या समराशी जाणाव्या.

राशींच्या जाति—विषमराशी ह्या पुरुषजाति व समराशी ह्या स्त्रीजाति होत.

राशींचीं तत्त्वें—मेष, सिंह, धनु ह्या अग्निराशी होत. वृषभ, कन्या, मकर ह्या भूमिराशी होत. मिथुन, तूळ, कुंभ ह्या वायुराशी होत. आणि कर्क, वृश्चिक व मीन ह्या जलराशी होत.

राशींचे कालावयव—मेष–शिर, वृषभ–मुख, मिथुन–वक्षःस्थल, कर्क–हृदय, सिंह–कुक्षि व उदर, कन्या–कटी, तूळ–ओटीपोट, वृश्चिक–गुह्य, धनु–मांड्या, मकर–गुडघे, कुंभ–पोटऱ्या, मीन–पाय.

राशींच्या अवस्था—मेष, कर्क, तूळ, मकर ह्या चर किंवा चंचल राशी होत. वृषभ, सिंह, वृश्चिक, कुंभ ह्या स्थिर किंवा शांत राशी होत. मिथुन, कन्या, धनु व मीन ह्या द्विस्वभाव म्हणजे शांत व चंचल राशी होत. द्विस्वभावराशींत पूर्वार्ध स्थिर व उत्तरार्ध चर असतें.

राशींचें बलाबल—सिंह, कन्या, तूळ, वृश्चिक, कुंभ, मीन ह्या राशी दिवसास बलवान् असतात. मेष, वृषभ, मिथुन, कर्क, धनु, मकर ह्या रात्रीस बलवान् असतात.

राशींच्या दिशा—मेष, सिंह, धनु यांची पूर्वदिशा; वृषभ, कन्या, मकर यांची दक्षिण दिशा; मिथुन, तूळ, कुंभ यांची पश्चिमदिशा; व कर्क, वृश्चिक, व मीन यांची उत्तर दिशा जाणावी.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

राशींचे रंग—मेष-आरक्त, वृषभ-शुभ्र गोरा, मिथुन-पोपटी हिरवा, कर्क-फिका तांबूस, सिंह-पांडुरका पीतवर्ण, कन्या-मिश्र पांडुरवर्ण, तूळ-निळा, वृश्चिक-सोनेरी तांबडा, धनु-पिंगट, मकर-कवरा, कुंभ-मुंगुसवर्ण, मीन-फिकट पिंगल.

राशींचें स्थानवल—मिथुन, कन्या, तूळ, कुंभ आणि धनुराशीचा पूर्वार्ध ह्या राशी लग्नीं बलवान् असतात. कर्क, मीन आणि मकर राशीचा उत्तरार्ध ह्या राशी चतुर्थस्थानीं बलवान् असतात. मेष, वृषभ, सिंह आणि धनुराशीचा उत्तरार्ध व मकरराशीचा पूर्वार्ध ह्या दशमस्थानीं बलवान् असतात. वृश्चिकराशी सप्तमस्थानीं बलवान् असते.

राशींचें स्वरूप—मेष-मेंढा. वृषभ-बैल. मिथुन-हास्यमुख व हातीं वीणा असलेलें स्त्रीपुरुषांचें जोडपें. कर्क-खेंकडा. सिंह-सिंहस्वरूप. कन्या-धान्य व अग्नि घेऊन नौकेंत बसलेल्या कन्येचें स्वरूप. तूळ-तराजू घेतलेला पुरुष. वृश्चिक-विंचूचें स्वरूप. धनु-कटिप्रदेशाखालीं अश्वाकृति असा धनुर्धारी पुरुष. मकर-मृगासारखें मुख असलेला मगर. कुंभ-हातांत कुंभ घेतलेला पुरुष. मीन-उलट सुलट दोन मत्स्यांची आकृति.

द्वादश जन्मलग्नांचीं लक्षणें.

जन्मकालीं ज्या राशींत सूर्य असतो तें जन्मणाऱ्याचें जन्मलग्न, व चंद्र असतो ती जन्मराशि होय. कोणत्या लग्नीं जन्म असतां कशीं लक्षणें असतात तें आतां सांगतों.

१ मेषलग्न—रक्तवर्ण, बांधा मध्यम परंतु हाडांपेरांनीं मजबूत, लांबट तोंड, तापट स्वभाव, चंचलवृत्ति, पित्तवातप्रकृति, अल्पस्त्रीसंग करणारा, अल्पाहारी, भ्रमण करणारा, शूर, स्त्रीप्रिय, नोकरी करणारा, आर्जवी, मस्तकावर फोड किंवा तीळ, गर्विष्ठ, श्रेष्ठ, पाण्यापासून भय, अल्पसंतति, निर्द्रव्य वगैरे.

२ वृषभलग्न—शुभ्रवर्ण, ठेंगणा, गर्विष्ठ, अविचारी, पराक्रमहीन, व्यर्थ रागावणारा परंतु भित्रा, शरीरानें मजबूत, मान व ओंठ जाड, मध्यम स्त्रीसंग, मध्यम संतति, वातप्रकृति, रुंदट नाक व तोंड, बालपणीं व वृद्धपणीं कष्टी, बंधु, वडिलोपार्जित धन व कुटुंबरहित, कंटक, विषयी, नेहमीं संचारी, खादाड, बहुकन्यक वगैरे.

३ मिथुनलग्न—बांधा उंच, सरळ वृत्ति, हिरवट वर्ण, शरीरानें मजबूत, साधारण मांसल शरीर, उष्णप्रकृति, मध्यम स्त्रीसंग व मध्यम संतति, विद्याव्यासंगी, नाक तोंड लांबट व अरुंद, धारणाशक्ति उत्तम; जर स्त्री असेल तर नेत्र उत्तम, बोलणें चालणें डौलदार, जबरदस्त धोरणी, सुबुद्ध, कुरळकेश, चतुर, शास्त्रज्ञ, सुंदर, गीतप्रिय वगैरे.

४ कर्कलग्न—वर्ण फिकट गोरा, बांधा कृश, दिसण्यांत अशक्त व कफप्रकृति, दांतांची कवळी जरा पुढें, गुप्त कारस्थानी, विद्येची अभिरुचि परंतु अपुरें विद्यार्जन, स्त्रीलंपट, ज्योतिष जाणणारा, मधुरभाषणी भित्रा वगैरे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

५ सिंहलग्न—वातपित्तप्रकृति, भव्य शरीर, धट्टाकट्टा, छाती दंड वगैरे मजबूत, शूर व मानी स्वभाव, वर्ण तांबूस, उग्र चेहरा, मोकळया मनाचा व निधड्या छातीचा, गर्विष्ठ, बोलण्यांत दुसऱ्यावर छाप बसविणारा, क्रोधी, अल्पवीर्य, यश कमी, दयाळू, स्थिरबुद्धि वगैरे.

६ कन्यालग्न—शीतप्रकृति, बांधा साधारण उंच व नीटसर, काळे केश, वर्ण निमगोरा, स्वभाव लाजाळू व मायावी, चालणें हत्तीप्रमाणें मंद व डुलत, पुढेंपुढें करण्याची हौस परंतु पराक्रम बेताचा, बुद्धि चांगली, हळू व अडखळत बोलणारा, क्षणिक चित्ताचा, गंभीर व सौम्य दृष्टि, धर्मशील, कलाकुशल, विद्याभिलाषी इत्यादि.

७ तूळलग्न—उष्णप्रकृति, सत्यप्रिय, न्यायी, बांधा नीटनेटका, उंच, लांबट तोंड, वर्ण साधारण गोरा परंतु पुढें वृद्धापकाळीं तांबुस दिसणारा, डोळे काळसर व सुंदर, आपलें खरें करणारा, अल्पसंतति, संत ब्राह्मण यांचा सन्मान करणारा, विषयी, पदवीधर, स्वधर्मी, सभ्य, वृद्धापकाळीं असुखी, निर्भीड वगैरे.

८ वृश्चिकलग्न—कफप्रकृति, मध्यम बांधा, शरीरानें मजबूत, नाक फुगीर, हट्टी स्वभावाचा, खव्याळ, बडबड करणारा, स्वतःविषयीं फाजील गर्व, फाजील बोलणारा, वर्ण तांबूस, फेंकडे पाय, बहुसंतति, विशालनेत्र, विशाल वक्षःस्थल इत्यादि. वृश्चिक किंवा मकर लग्नांवर जन्मलेलीं बहुतेक मनुष्यें लोकप्रिय नसतात.

९ धनुलग्न–उंच व शरीरानें दांडगा, गौरवर्ण, छाती रुंद, लांबट चेहरा, उत्तरवयांत टक्कल पडणें, उष्णपित्तप्रकृति, अतिस्त्रीसंग, शिकार, घोडे यांची हौस, आहार मोठा, दिसण्यांत प्रौढ, उद्योगी, धार्मिक, मनमिळाऊ, वगैरे.

१० मकरलग्न—वातप्रकृति, पिंगटवर्ण, उंच शरीर, चेहरा, मान व हनुवटी हीं लांबट व ओबडधोबड, स्वभावानें आपमतलवी, स्वल्पस्त्रीसंग, स्वल्पसंतति, आळशी, भटकणारा, मितभाषणी, निर्भीड, लोभी, दयाहीन वगैरे.

११ कुंभलग्न—शरीरानें उंच, मजबूत, देखणा, उष्णप्रकृति, निरोगी, लांबट तोंडवळा, शास्त्रज्ञ परंतु वक्तृत्व बेताचें, समय पाहून तापट, स्वकार्यसाधक, कुटुंबसौख्य अल्प, शहाणा, गुणवान्, आपमतलबी, परधनाभिलाषी, अदूरदर्शी, सर्वांचें मन तुष्ट करणारा, सर्वप्रिय, परोपकारी वगैरे.

१२ मीनलग्न—ठेंगणा बांधा, हातपाय आंखूड, फिक्ट, मांसल व बसका चेहरा, वर्ण गोरा, पाय फेंकडे, अतिसंग, अतिसंतति, सौम्यस्वभाव, खालीं मान करून चालणारा, प्रवाही पदार्थांची आवड, छानशोकी, सुंदर, भव्य मस्तक, मोत्यांचा व्यवहार करणारा, कांतिमान् वगैरे.

याप्रमाणें द्वादश लग्नांचें हें स्थूल वर्णन आहे. परंतु तें तंतोतंत मिळेलच असें मात्र समजूं नये. कारण इतर ग्रहयोग जसे असतील त्याप्रमाणें फलयोगही बदलतात. उदाहरणार्थ, तनुस्थानीं सिंहलग्न आहे परंतु त्यावर शनि, मंगळ, राहु इत्यादि पापग्रहांची दृष्टि असेल किंवा त्याचा स्वामी अनिष्ट स्थानीं किंवा पापग्रहयुक्त

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

असेल तर वर दिल्याप्रमाणें फळ असणार नाहीं. तात्पर्य, तीं तीं स्थानें ज्याप्रमाणें शुभाशुभ ग्रहांनीं युक्त किंवा दृष्ट असतील त्याप्रमाणें फळें समजावीं.

लग्नकुंडलीच्या केंद्रादिसंज्ञा. (स्रग्धरा.)

आद्यं तुर्यं कलत्रं दशममिह बुधैः केंद्रमुक्तं, त्रिकोणं ।
पुत्रं धर्माख्यमुक्तं, पणफरमुदितं मृत्युलाभात्मजार्थं ॥
धर्मं चापोक्लिमाख्यं व्ययरिपुसहजं, कंटकाख्यं हि केंद्रं ।
चैतचातुष्टयं स्यात्त्रिकमिह गदितं वैरिरिःफांतकाख्यम् ॥ १९ ॥

लग्नकुंडलींतील १।४।७।१० या चार स्थानांना केंद्र स्थानें म्हणतात. २।५।८।११ ह्यांना पणफर स्थानें म्हणतात. ३।६।९।१२ ह्यांना आपोक्लिम स्थानें म्हणतात. हीं केंद्रादि स्थानें ध्यानांत ठेवण्याची सोपी युक्ति अशी आहे कीं, लग्नापासून शेवट-पर्यंत केंद्र, पणफर, आपोक्लिम, ह्या अनुक्रमानें पुनः पुनः तीं मोजावीं. प्रत्येक केंद्रस्थानापासून दुसरें स्थान तें पणफर व तिसरें स्थान तें आपोक्लिम होय. केंद्र-स्थानांना कंटकस्थानें असेंही म्हणतात. प्रथमस्थानापासून ९ आणि ५ या स्थानांना त्रिकोण असें म्हणतात. ६।८।१२ यांना त्रिकस्थानें म्हणतात. ३।६।१०।११ या स्थानांना उपचयस्थानें म्हणतात. २।७ ह्या स्थानांना मारकस्थानें म्हणतात. ४।८ यांना चतुरस्र म्हणतात. यांतून केंद्र व त्रिकोण हीं स्थानें विशेष शुभ आणि त्रिक-स्थानें अशुभ जाणावीं.

द्वादशस्थानांच्या पर्यायसंज्ञा.

कुंडलींतील द्वादशस्थानांना तनु, धन, सहज इत्यादि संज्ञांशिवाय ज्या आणखी अधिक संज्ञा आहेत त्याही येथें सांगतों. लग्न, मूर्ति, अंग, तनु, उदय, वपु, आद्य आणि कल्प अशीं ८ नांवें प्रथमस्थानाला आहेत. स्व, कोश, अर्थ, कुटुंब आणि धन अशीं ५ नांवें द्वितीयस्थानाला आहेत. सहज, भ्रातृ व दुश्चिक्य अशीं ३ नांवें तृतीयस्थानाला आहेत. अंबा, पाताल, तुर्य, हिबुक, गृह, सुहृत, वाहन, यान, बंधु, अंबु, नीर आणि जल हीं १२ नांवें चतुर्थस्थानाला आहेत. तनय, बुद्धि, विद्या, आत्मज, पंचम, वाक्स्थान व तनुज हीं ७ नांवें पंचमस्थानाला नांवें आहेत. रिपु, द्वेष, वैरी, क्षत व षष्ठ हीं ५ नांवें षष्ठस्थानाला आहेत. जामित्र, अस्त, स्मर, मदन, मद, द्यून व काम हीं ७ नांवें जायास्थानाला आहेत. रंध्र, आयु, छिद्र, याम्य, निधन, लयपद, अष्टम आणि मृत्यु हीं ८ नांवें अष्टमस्थानाला आहेत. गुरु, धर्म, शुभ, नवम, तप व मार्ग हीं ६ नांवें भाग्यस्थानाला आहेत. तात, आज्ञा, मान, कर्म, आस्पद, गगन, नभ, व्योम, मेपूरण, मध्य, व्यापार आणि दशम अशीं १२ नांवें दशमस्थानाला आहेत. भाव, आय, आगम आणि प्राप्ति हीं ४ नांवें लाभस्थानाला आहेत. भांत्य, अंतिम, द्वादश आणि रिःफ हीं ४ नांवें व्ययस्थानाला आहेत. नांवांप्रमाणें ते ते योग त्या त्या स्थानीं पहावे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मेषादिराशींच्या पर्यायसंज्ञा.

मेष, वृषभ आदिकरून बारा राशींना दुसऱ्याही संज्ञा आहेत, त्या माहितीकरितां येथें सांगतों. १ मेष—अज, विश्व, तुंबर, आद्य, (क्रिय). २ वृषभ—वृप, उक्ष, गोकुळ, (तावुरी). ३ मिथुन—द्वंद्व, नृयुग्म, युग, तृतीय, (जितुम). ४ कर्क—कर्कट, कर्कटक, (कुलीर). ५ सिंह—कंठीरव, मृगेंद्र, हरि, (लेय). ६ कन्या—रमणी, योषिता, (पाथोन). ७ तूळ—तौलि, वणिक्, (जूक). ८ वृश्चिक—अलि, कीट, (कौर्प्य). ९ धनु—चाप, धन्वी, शर, कार्मुक, (तौक्षिक). १० मकर—मृग, नक्र, मृगास्य (आकोकेर). ११ कुंभ—घट, तोयधर, हृद्रोग. १२ मीन—मत्स्य, पृथुरोम, झष, अंत्यम याप्रमाणें राशींच्या संज्ञा जाणाव्या. वर कंसांत जीं राशिनांवें दिलीं आहेत, तीं ग्रीक भाषेंतील आहेत असें वाटतें. उदाहरणार्थ—१ क्रिय, २ तावुरी इत्यादि. याशिवाय ज्योतिषग्रंथांत कांहीं ग्रीक शब्द आलेले आहेत. उदाहरणार्थ—होरा, द्रेष्काण, सुनफा, अनफा, दुरुधर, केमद्रुम इत्यादि. हे शब्द आमच्या प्राचीन ज्योतिर्विदांनीं ग्रीक ग्रंथांतून घेतले असतील. ह्यावरून असें दिसतें कीं, हे शब्द ज्या विशिष्ट योगांचे दर्शक आहेत त्या योगांचा त्यांस पूर्ण अनुभव आला असला पाहिजे, आणि म्हणूनच ते योग त्यांनीं ग्रथित केले असावे.

राशींचे स्वामी.

कुजः शुक्रो बुधश्चंद्रो रविर्बुधसितौ कुजः ।
गुरुः शनिः शनिगुरू इमे मेषादिराशिपाः ॥ २० ॥

वरील पद्यांत लिहिलेले ग्रह अनुक्रमानें मेषादि राशींचे स्वामी आहेत. कोणता ग्रह कोणत्या राशीचा स्वामी आहे, हें पूर्वीं पान ९३ मध्यें सांगितलेंच आहे, परंतु वाचकांचे सोयीसाठीं द्विरुक्तिदोष पत्करून पुनः येथें सांगतों.

रवि	चंद्र	मंगळ	बुध	गुरु	शुक्र	शनि
सिंह	कर्क	मेष	मिथुन	धनु	वृषभ	मकर
		वृश्चिक	कन्या	मीन	तूळ	कुंभ

राहु हा कन्या राशीचा स्वामी आणि केतु हा मीनराशीचा स्वामी होय. जो ग्रह ज्या राशीचा स्वामी, तें त्याचें स्वगृह किंवा स्वक्षेत्र होय. कांहीं ग्रहांना एक व कांहींना दोन क्षेत्रें आहेत. जसें, सिंहराशीचा स्वामी रवि, कर्कराशीचा चंद्र, मेष व वृश्चिक या दोन राशींचा मंगळ, याप्रमाणें इतर राशींचे स्वामी जाणावे. यावरून वाचकांचे ध्यानांत हें सहज येईल कीं, सूर्याला व चंद्राला एक एक राशिस्थान असून इतर ग्रहांना मात्र दोन दोन राशिस्थानें आहेत. व तीं स्थानें सूर्यमालेंत ज्याप्रमाणें ग्रहांचा अनुक्रम दृश्यमान आहे, त्याप्रमाणें वांटलीं गेलीं आहेत. उदाहरणार्थ, सर्व

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

राशींत पराक्रमानें श्रेष्ठ अशी जी सिंह रास तिचें स्वामित्व देदीप्यमान व जगाचें उत्पत्तिस्थान असा मुख्य ग्रह जो सूर्य त्याच्याकडे आलें, हें ठीकच आहे. सूर्याच्या खालोखाल चंद्राचें तेज असल्यामुळें सूर्यराशीच्या पूर्वीची जी कर्करास तिचें आधिपत्य चंद्राकडे आलें. नंतर इतर ग्रहांचीं स्थानें अशा तत्त्वावर ठरलीं आहेत कीं, चंद्राच्या राशीमागची अनुक्रमानें एकेक रास व सूर्याच्या राशीपुढची अनुक्रमानें एकेक रास अशा दोन दोन राशी इतर ग्रहांना त्यांच्या (ग्रहांच्या) अनुक्रमस्थानाप्रमाणें प्राप्त झाल्या आहेत. उदाहरणार्थ, बाजूच्या आकृतींत सूर्याजवळ बुध आहे, म्हणून कर्क राशीच्या मागील एक रास म्हणजे मिथुन, व सिंहाच्या पुढील एक रास म्हणजे कन्या, अशा दोन राशी प्रथम बुधाच्या झाल्या. बुधाच्या नंतर शुक्र आहे, म्हणून बुधाच्या ज्या दोन राशि मिथुन व कन्या त्यांच्या मागील एक व पुढील एक म्हणजे वृषभ व तूळ अशा दोन राशींवर, वरील न्यायानें शुक्राचें स्वामित्व ठरलें. शुक्राच्या नंतर मंगळ आहे. म्हणून शुक्राच्या मागील व पुढील एक एक रास म्हणजे मेष व वृश्चिक अशा दोन राशी मंगळाच्या झाल्या. मंगळानंतर गुरु आहे, म्हणून मेषाच्या मागील एक व वृश्चिकाच्या पुढील एक म्हणजे मीन व धन अशा दोन राशी गुरूच्या झाल्या. शेवटीं शनि आहे म्हणून मीनाच्या मागील रास कुंभ व धन राशीच्या पुढील रास मकर अशा दोन राशींवर शनीचें स्वामित्व ठरलें. खरोखर ही रचना पाहून मनास अत्यानंद वाटतो. ज्योतिषांत अशा तऱ्हेचे सयुक्तिक व चमत्कारीक प्रकार अनेक असतील; किंबहुना प्रत्येक गोष्टीविषयीं असें मौजेचें कांहींतरी असेल. परंतु आपल्या अल्प बुद्धीस तें गम्य नाहीं इतकेंच. शिवाय आमच्या प्राचीन विद्वान् ज्योतिर्विदांनीं जरी अनेक शोध करून मूल्यवान् विचार ग्रथित करून ठेविले आहेत, तरी ते असावे तितके सोपपत्तिक नाहींत व हल्लींच्या काळांत तशा प्रकारचे कोणी शोधक विद्वान् निपजत नाहींत, म्हणून इतर शास्त्रांप्रमाणें फलज्योतिषशास्त्राची आज प्रगति नाहीं. असो. वर दिलेल्या सूर्यमालेच्या आकृतीवरून हें सहज समजण्यासारखें आहे कीं, सूर्य

सूर्यमालेची दृश्यमान आकृति.



Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

हा मध्यवर्ती असून त्याच्या सभोंवतीं बुध व शुक्र फिरत आहेत. आपली पृथ्वी ज्या कक्षेतून परिभ्रमण करिते, तिच्या अंतर्भागीं शुक्राची कक्षा आहे, व तिच्या आंत बुधाची कक्षा आहे. पृथ्वीच्या बहिर्भागीं अनुक्रमानें मंगळ, गुरु, शनि, युरानस आणि नेपच्यून यांच्या कक्षा आहेत. बुध, शुक्र हे भूकक्षेच्या अंतर्भागीं असलेल्या आपआपल्या कक्षांतून सूर्यासभोंवतीं फिरतात म्हणून त्यांना अंतर्वर्ती ग्रह म्हणतात. आणि पृथ्वीच्या कक्षेच्या बाहेर मंगळ, गुरु, शनि युरानस व नेपच्यून यांच्या कक्षा असल्यामुळें त्यांस बहिर्वर्ती ग्रह असें म्हणतात.

ग्रहांचा विचार.

सूर्यः सोमो महीपुत्रः सोमपुत्रो बृहस्पतिः।
शुक्रः शनैश्चरो राहुः केतुश्चैते ग्रहाः स्मृताः ॥ २१ ॥

ग्रह या धातूचा अर्थ 'घेणें' असा आहे. त्यामुळें सूर्यापासून प्रकाश घेणारे जे मुख्य (तारे) गोल त्यांस ग्रह अशी संज्ञा प्राप्त झाली. हे ग्रह नऊ आहेत. त्यांचीं नांवें—सूर्य, चंद्र, मंगळ (महीपुत्र), बुध (सोमपुत्र), गुरु (बृहस्पति), शुक्र, शनि, राहु आणि केतु. राहु व केतु हे वस्तुतः ग्रह नाहींत. ज्या वर्तुलमार्गानें पृथ्वीसभोंवतीं चंद्र फिरतो तो मार्ग, आणि ज्या मार्गानें पृथ्वीची प्रदक्षिणा सूर्यासभोंवतीं होते तो मार्ग, हे दोन्ही मार्ग परस्परांस आकाशांत ज्या दोन भिन्न स्थळीं छेदितात, त्यांपैकीं एका छेदनबिंदूस राहु व त्याच्या समोरील छेदनबिंदूस केतु असें म्हणतात. हे बिंदु समोरासमोर असल्यामुळें अर्थात् कुंडलींतही नेहमीं परस्परांच्या सप्तमस्थानींच म्हणजे समोरासमोर असतात. ह्याशिवाय हर्शल (युरानस) व नेपच्यून असे आणखी दोन ग्रह इंग्रजी ज्योतिष्यांनीं शोधून काढिले आहेत. त्यांस आमच्या अर्वाचीन ज्योतिर्विदांनीं अनुक्रमें प्रजापति आणि वरुण अशीं नांवें दिलीं आहेत. प्रजापति हा ग्रह हर्शल-नामक ज्योतिष्यानें शोधून काढिल्यामुळें त्यास त्याचेंच नांव दिलें गेलें आहे. हर्शल हा सूर्यापासून फार दूर आहे. त्याला युरानस असेंही म्हणतात. या हर्शलापासूनही नेपच्यून फार दूर म्हणजे सूर्यापासून सुमारें २७७ कोटी मैल आहे. हे दोन्ही ग्रह इंग्रजी ज्योतिष्यांनीं अलीकडेच (इ० स० १७८१ मध्यें हर्शल व नंतर कांहीं वर्षांनीं नेपच्यून) शोधून काढिले असल्यामुळें आमच्या ज्योतिषग्रंथांत त्यांविषयीं कांहीं नसणारच, हें उघड आहे. नेपच्यूनसंबंधीं इंग्रजी ग्रंथांतही फारसें कांहीं नाहीं. कारण तो अति दूर असल्यामुळें सामान्य दुर्बिणीनेंही दृश्य नाहीं. हर्शलाविषयीं मात्र लिहिलेलें आहे. हर्शल हा ग्रह सुमारें ८४ वर्षांत १२ राशींतून एकदां फिरतो. म्हणजे एका राशींतून दुसऱ्या राशींत जाण्यास त्याला सुमारें ७ वर्षें लागतात, इतका तो मंदगति आहे. तो प्रतिलोमगति म्हणजे आकाशांत मागें मागें चालतो आहे असें दिसतें. त्याचें फळ शनीप्रमाणेंच वाईट आहे असें लिहिलेलें आहे. ज्याच्या जन्मलग्नीं हर्शल असतो तो मनुष्य हेकेखोर, तऱ्हेवाईक, स्वच्छंदी, जुन्या गोष्टींना नवीन

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कल्पनेचें वळण देण्याविषयीं यत्न करणारा, व सर्वांचे विरुद्ध वागणारा असा असतो. नेपच्यूनही अशुभ ग्रह असून एका राशींत सुमारें १३॥ वर्षं असतो. असो. चंद्र, बुध, गुरु, शुक्र हे शुभग्रह आहेत. रवि, मंगळ, शनि, राहु व केतु हे पापग्रह आहेत. शुभ ग्रहांचीं शुभ फलें व अशुभ ग्रहांचीं अशुभ फलें समजावीं. शिवाय रवि, मंगळ हे क्रूर ग्रह मानिलेले आहेत. हे अनिष्ट असतील तेव्हां मनुष्याची हानि करितात. बुध शुभग्रहाबरोबर असतां शुभ फल देतो आणि अशुभ ग्रहाबरोबर असतां अशुभ फल देतो. पापग्रह उच्चीचे किंवा स्वक्षेत्रीं असतां सौम्य होतात व शुभ फल देतात. चंद्र कृष्णपंचमीपासून शुक्लपंचमीपर्यंत हीनबली असतो.

ग्रहांच्या प्रकृति—सूर्य, मंगळ, गुरु हे पुरुषप्रकृति ग्रह; शुक्र, चंद्र हे स्त्री-प्रकृति ग्रह; आणि बुध, शनि हे नपुंसक ग्रह होत.

ग्रहांचे कालावयव—रवि आत्मा, चंद्र मन, मंगळ सत्त्व, बुध वाचा, गुरु जीव, शुक्र काम, आणि शनि दुःख याप्रमाणें बृहज्जातकांत सांगितलेलें आहे. वेदामध्येंही अशीच कल्पना केलेली आहे. ऋग्वेद सौरसूक्तांत 'सूर्य आत्मा जगतः' असें सूर्याविषयीं आणि पुरुषसूक्तांत 'चंद्रमा मनसो जातः' असें चंद्रा-विषयीं म्हटलेलें पुष्कळांस माहीत आहेच.

ग्रहांचे स्वभाव—रवि स्थिर, चंद्र चंचल, मंगळ उग्र, बुध मिश्र, गुरु क्षिप्र, शुक्र मृदु, शनि दारुण, याप्रमाणें ग्रहांचे स्वभाव आहेत. हे ग्रहांचे स्वभाव वर जे अवयवरूप ग्रह कल्पिले आहेत त्यांच्या स्थितीला अनुरूप आहेत.

ग्रहांच्या जाति—गुरु शुक्र ब्राह्मण, रवि मंगळ क्षत्रिय, चंद्र बुध वैश्य, शनि अंत्यज आणि राहु केतु मातंग याप्रमाणें ग्रहांच्या जाती आहेत.

ग्रहांचीं तत्त्वें—रवि मंगळ अग्नितत्त्व, चंद्र शुक्र जलतत्त्व; बुध भूमितत्त्व; गुरु आकाशतत्त्व आणि शनि वायुतत्त्व, याप्रमाणें ग्रहांचीं तत्त्वें ठरविलेलीं आहेत.

ग्रहांचे वर्ण—सूर्याचा आरक्त किंवा काळसर वर्ण, मंगळाचा तांबूस, बुधाचा सांवळा, गुरूचा गोरा, शुक्राचा शुभ्र किंवा सांवळा, आणि शनीचा काळा, याप्रमाणें ग्रहांचे रंग समजावे.

ग्रहांचे गुण—सूर्य, चंद्र, गुरु हे सत्त्वगुणी; बुध, शुक्र रजोगुणी; मंगळ, शनि तमोगुणी याप्रमाणें ग्रहांचे गुण जाणावे.

ग्रहांचे अधिकार—रवि चंद्र–राजे, मंगळ–सेनापति, बुध–युवराज, गुरु शुक्र–मंत्री, शनि–सेवक असें जाणावें.

उदितग्रह—सूर्यप्रकाशांत लुप्त न झाल्यामुळें जेव्हां कोणताही ग्रह आपणांस दिसत असेल तेव्हां तो ग्रह उदित आहे असें म्हणावें.

अस्तंगत—सूर्याच्या जवळ जाऊन सूर्यप्रकाशांत आच्छादित झाल्यामुळें जेव्हां एकादा ग्रह आपणांस दिसेनासा होतो तेव्हां तो ग्रह अस्तंगत आहे असें म्हणावें.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

वक्रीग्रह—जेव्हां एकादा ग्रह राशींच्या अनुक्रमाच्या उलटगतीनें फिरत आहे असें भासतें, तेव्हां तो ग्रह वक्री आहे असें समजावें. जसें कुंभराशींतून ग्रहाचें मकरराशींत जाणें इत्यादि. राहु व केतु नेहमींच उलट गतीनें फिरतात.

मार्गीग्रह—जेव्हां वक्री झालेला कोणताही ग्रह पुनः यथानुक्रम फिरतो, म्हणजे मेषराशींतून वृषभराशीमध्यें इत्यादि, तेव्हां तो मार्गी झाला असें म्हणतात.

स्तंभीग्रह—जेव्हां एकाच राशीमध्यें नियमित कालापेक्षां अधिक कालपर्यंत एकादा ग्रह राहतो, तेव्हां तो ग्रह स्तंभी आहे असें म्हणतात. वास्तविक ग्रह स्तंभी अथवा वक्री कधींच नसतात; पण पृथ्वी आणि ग्रह नेहमीं सूर्याभोंवतीं फिरत असल्यामुळें दोन गतींच्या विशिष्ट संयोगाच्या योगानें आपणाला दृष्टिभ्रम होऊन ते तसे वाटतात इतकेंच.

कुजःस्तंभ—ग्रह वक्री असतां त्याची गति अत्यंत मंद झाली, म्हणजे तो ग्रह एकाच राशीमध्यें फार दिवस रहातो; त्याला कुजःस्तंभ म्हणतात. परंतु अशा प्रकारें मंगळ स्तंभी झाला म्हणजे त्यालाच कुजःस्तंभ म्हणतात. मंगळ स्तंभी झाला असतां देवी, गोंवर, महामारी इत्यादि उपद्रव उत्पन्न होतात; राजेलोकांत परस्पर विग्रह होतो.

ग्रहांचीं लक्षणें—वाटोळा व मध्यम बांधा, अस्पष्ट वाचा, पित्तप्रकृति, पिंगट नेत्र व अल्पकेश हीं सूर्याचीं लक्षणें. ठेंगणा व देखणा बांधा, मधुर वाचा, समंजस, सौम्यदृष्टि, वातकफप्रकृति हीं चंद्राचीं लक्षणें. दूरदृष्टि, पित्तप्रकृति, उदार, गुप्त रीतीनें कार्य करणारा, चपळ, पराक्रमी व तामसी हीं मंगळाचीं लक्षणें. सदा हंसतमुख, वातपित्तकफ हीं सारखीं, बुद्धिवान्, सांद्रभाषण हीं बुधाचीं लक्षणें. जड शरीर, पिंगट केश, घारे व पिंगट डोळे, विद्वान्, ग्रंथकर्ता व वाचण्याची हौस हीं गुरूचीं लक्षणें. सुखी, तेजस्वी, उत्तम नेत्र, कफप्रकृति, कुरळे व काळे केश हीं शुक्राचीं लक्षणें. आळशी, घारे डोळे, कृश, उंच, राठ व लांब केश, मोठे दांत, वातप्रकृति, दीर्घ अवयव हीं शनीचीं लक्षणें. याप्रमाणें हीं ग्रहांचीं लक्षणें आहेत. हीं लक्षणें विशेषतः ते ते ग्रह लग्नीं किंवा लग्नस्वामीनें युक्त किंवा नवांशीं असतां अनुभवास येतात. शरीरसंबंधीं ग्रहांचे परिणाम पुढें लिहिले आहेत. तेही कुंडली पाहतांना ध्यानांत ठेवावे.

ग्रहांचीं उच्चनीचस्थानें.

मेषो वृषस्तथा नक्रः कन्याकर्कझषास्तुला ।
सूर्यादीनां क्रमादेते कथिता उच्चराशयः ॥ २२ ॥
सूर्यादीनां क्रमान्नीचं स्वोच्चभाद्यं च सप्तमम् ।
राहोस्तु कन्यका गेहं मिथुनं स्वोच्चभं स्मृतम् ॥ २३ ॥

मेषराशीला रवि असला, म्हणजे तो उच्चीचा आहे असें म्हणतात. तसेंच,

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

वृषभेचा चंद्र, मकरेचा मंगळ, कन्येचा बुध, कर्केचा गुरु, मीनेचा शुक्र, व तूळेचा शनि. याप्रमाणें ग्रहांचीं उच्चस्थानें जाणावीं. कोणत्याही ग्रहाच्या उच्च राशी-पासून सातवी रास ती त्या ग्रहाचें नीचस्थान होय. उदाहरणार्थ, मेषराशीचा रवि असतां तो उच्चीचा असें वर लिहिलें आहे, आणि मेषापासून सातवी रास तूळ आहे म्हणून तूळेचा रवि असतां तो नीचीचा आहे असें समजावें. याचप्रमाणें, वृश्चिकेचा चंद्र, कर्केचा मंगळ, मीनेचा बुध, मकरेचा गुरु, कन्येचा शुक्र, आणि मेषेचा शनि हीं ग्रहांचीं नीच स्थानें जाणावीं. राहूचें स्वगृह कन्या, उच्चस्थान मिथुन व नीचस्थान धन आहे. तसेंच, केतूचें स्वगृह मीन, उच्चस्थान धन व नीचस्थान मिथुन आहे. रवि मेष राशीच्या १० अंशांत असला म्हणजे तो परम उच्च व तूळ राशीच्या १० अंशांत असतां परम नीच समजावा. याप्रमाणें कोणता ग्रह कोणत्या राशीस किती अंशांत असतां परम उच्च व परम नीच समजावा हें खालील कोष्टकावरून ध्यानीं येईल. उच्चीचे ग्रह शुभफलदायक असतात, व परमोच्च ग्रह त्याहून अधिक शुभफल देणारे असतात; तथापि ते स्वगृहींच्या ग्रहांहून विशेष शुभ आहेत असें मात्र समजूं नये. नीच ग्रह असतां निर्बली व परम नीच असतां निष्फल जाणावे.

ग्रह	रवि	चंद्र	मंगळ	बुध	गुरु	शुक्र	शनि
उच्च	मेष	वृषभ	मकर	कन्या	कर्क	मीन	तूळ
परमोच्चांश	१०	३	२८	१५	५	२७	२०
नीच	तूळ	वृश्चिक	कर्क	मीन	मकर	कन्या	मेष
परमनीचांश	१०	३	२८	१५	५	२७	२०

हीं ग्रहांचीं उच्चनीचस्थानें (राशि) कोणत्या तत्त्वावर ठरलीं आहेत; हें साधार समजत नाहीं. तथापि अनुमानानें असें वाटतें कीं, कोणताही ग्रह पृथ्वीजवळ आल्यामुळें किंवा सूर्याच्या दूरत्वामुळें त्याचें तेज पृथ्वीवर अधिक पडूं लागलें, आणि त्यामुळें पृथ्वीवरील मनुष्यादिकांशीं त्याचा अधिक संबंध पोंचूं लागला म्हणजे तो ग्रह उच्चीचा असें कल्पिलेलें असावें. आणि त्याच्या उलट स्थिति असली, म्हणजे कोणत्याही कारणानें ग्रह तेजोहीन होऊन पृथ्वीवरील वस्तुमात्रावर त्याचा कमी प्रभाव असला, म्हणजे तो ग्रह नीचावस्थेचा अशी समजूत झाली असावी.

ग्रहांचीं मूलत्रिकोणस्थानें. (गीति)

सिंहवृषमेषकन्या कार्मुकभृत् तौलिकुंभधराः ।
सूर्यादीनामेते त्रिकोणभवनानि कथ्यन्ते ॥ २४ ॥

रवीचें सिंह, चंद्राचें वृषभ, मंगळाचें मेष, बुधाचें कन्या, गुरूचें धनु, शुक्राचें तूळ आणि शनीचें कुंभ. याप्रमाणें सूर्यादि ग्रहांचीं मूलत्रिकोणस्थानें जाणावीं. ज्याप्रमाणें उच्च राशीचे ग्रह विशेष शुभफलदायक असतात, त्याचप्रमाणें आपल्या मूलत्रिकोणस्थानीं असलेला ग्रह शुभफल देणारा असतो.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ग्रहांच्या अवस्था—कोणताही ग्रह उच्चीचा असतां त्यास दीप्त म्हणतात. नीचीचा असतां दीन म्हणतात. ग्रह स्वक्षेत्रीं असतां स्वस्थ म्हणतात. मित्रक्षेत्रीं असतां मुदित किंवा हर्षित म्हणतात. पूर्ण उदित ग्रह असतां शक्त म्हणतात. अस्तंगत असतां विकल म्हणतात. तसेंच, शुभग्रह पापग्रहानें युक्त असतां खल म्हणतात, आणि पापग्रहानें विद्ध (वेधलेला) असतां पीडित म्हणतात. शुभग्रहाचे षड्वर्गांत ग्रह असतां त्याला शांत म्हणतात. तसेंच, समराशीच्या पहिल्या सहा अंशांत कोणताही ग्रह असतां त्याला बाल म्हणावें. ६ अंशांपासून १२ अंशांपर्यंत कुमार, १२ अंशांपासून १८ अंशांपर्यंत युवा, १८ अंशांपासून २४ अंशांपर्यंत वृद्ध, आणि २४ अंशांपासून ३० अंशांपर्यंत असतां मृत म्हणावें. विषमराशींत याच्या उलट स्थिति असते. म्हणजे पहिल्या ६ अंशांत मृत, ६ पासून १२ पर्यंत वृद्ध, १२ पासून १८ पर्यंत युवा, १८ पासून २४ पर्यंत कुमार, आणि २४ अंशांपासून ३० अंशांपर्यंत बाल म्हणावें.

ग्रहांचें कर्तृत्व—ज्याप्रमाणें ग्रह इष्ट किंवा अनिष्ट असेल त्याप्रमाणें त्याचीं पुढील इष्टानिष्ट फळें अनुभवास येतील, असें जाणावें. **रवि**—पितृसुखदुःख, शरीरसुख, पुण्याई, मनाची रुचि, वैद्यशास्त्रज्ञान इत्यादि गोष्टी रवीच्या योगानें प्राप्त होतात. **चंद्र**—मातृसुखदुःख, यशःप्राप्ति, शरीरकांति, सौंदर्य व ज्योतिष इत्यादि गोष्टी चंद्राच्या योगानें प्राप्त होतात. **मंगळ**—मित्रसुख, पराक्रम, कीर्ति, साहसी स्वभाव, धनुर्विद्या, शस्त्रक्रिया इत्यादि गोष्टी मंगळापासून प्राप्त होतात. **बुध**—पुत्रसुखदुःख, मातुलसुख, गणित, वेदांत, शिल्पशास्त्र, ग्रंथलेखन, वक्तृत्व हीं बुधापासून प्राप्त होतात. **गुरु**—भ्रातृसुख, संतति, बहुविध विद्वत्ता, कारस्थान, व्याकरण ह्या गोष्टी गुरूपासून प्राप्त होतात. **शुक्र**—स्त्रीसुख, गायन, कवित्व, कांति, कलाकौशल्य व विषयसुख हीं शुक्रापासून प्राप्त होतात. **शनि**—नीचविद्या, नोकर-चाकरांचें सुखदुःख, निर्दयी व घातकी स्वभाव, दारिद्र्य, मृत्यु, कारागृहवास हीं शनीपासून प्राप्त होतात. राहूपासून गारुडीविद्या व केतूपासून गुप्त मंत्र-तंत्र हीं प्राप्त होतात.

स्थानबली, दिग्बली व कर्तरी ग्रह—स्वक्षेत्रीं, उच्चराशींत, मित्रक्षेत्रीं, किंवा त्रिकोणांत ग्रह असतां तो स्थानबली म्हणावा. बुध, गुरु पूर्वेस म्हणजे कुंडलींत प्रथमस्थानीं; सूर्य, मंगळ दक्षिणेस म्हणजे दशमस्थानीं; शनि पश्चिमेस म्हणजे सप्तमस्थानीं; व चंद्र, शुक्र उत्तरेस म्हणजे कुंडलींत चतुर्थस्थानीं; याप्रमाणें ग्रह असतां ते दिग्बली ग्रह म्हणावे. एका ग्रहाच्या मागचा ग्रह मार्गी व पुढील ग्रह वक्री असतां त्या मागच्या व पुढच्या ग्रहांची गति मधल्या ग्रहाकडे असते. अशा वेळीं तो मधला ग्रह कातरींत सांपडल्याप्रमाणें होतो, म्हणून तो कर्तरींत आहे असें म्हणतात. किंवा कोणत्याही ग्रहाच्या मागें व पुढें पापग्रह असतां तो मधला ग्रह मागील व पुढील अशा दोन ग्रहांच्या कर्तरींत आहे असेंही म्हणतात.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ग्रहांचें नैसर्गिक शत्रुत्व, मित्रत्व व समत्व.

रवेः सखायो गुरुभौमचंद्राः, शत्रू सितार्कौ, च बुधः समः स्यात् ।
विधोर्न शत्रुः, सुहृदौ रविज्ञौ, शनीज्यभौमोशनसः समाः स्युः ॥२५॥
ज्ञोऽरिः, कुजस्यार्कहिमांशुजीवा मित्राणि, मंदोशनसौ समौ च ।
ज्ञस्यार्कशुक्रौ सुहृदौ, कुजेज्यमंदाः समाः स्युस्तु, रिपुर्हिमांशुः ॥ २६ ॥
गुरोर्रिपू शुक्रबुधौ, सखायो रवींदुभौमास्तु, शनिः समः स्यात् ।
भृगोः सखायौ शनिचंद्रपुत्रौ, शत्रू रवींदू, च समौ कुजेज्यौ ॥२७॥
मंदस्य शुक्रेंदुसुतौ सखायौ, गुरुः समोर्केंदुकुजास्तु नेष्टाः ।
राहोः सखायो बुधमंदशुक्रा, गुरुः समोर्केंदुकुजास्तु नेष्टाः ॥ २८ ॥

मागें दुसऱ्या प्रकरणांत ग्रहांचें शत्रुमित्रत्वाचें कोष्टक जरी दिलें आहे, तरी सौकर्यास्तव तें पुनः येथें देतों. शिवाय राहूच्या शत्रुमित्रत्वासंबंधीं तेथें कांहींच सांगितलें नाहीं, तेंही येथें सांगतों. ह्याखेरीज येथें आधारभूत घेतलेलीं पद्येंही भिन्न आहेत. प्रत्येक श्लोकार्धामध्यें एकेका ग्रहाचे शत्रु-मित्र-सम सांगितले आहेत.

मित्र.	शत्रु.	सम.
रवि...गुरु, मंगळ, चंद्र.	शनि, शुक्र.	बुध.
चंद्र...सूर्य, बुध.	राहु.	मंगळ, गुरु, शुक्र, शनि.
मंगळ...रवि, चंद्र, गुरु.	बुध.	शुक्र, शनि.
बुध...रवि, शुक्र.	चंद्र.	मंगळ, गुरु, शनि.
गुरु...रवि, चंद्र, मंगळ.	बुध, शुक्र.	शनि.
शुक्र...शनि, बुध.	रवि, चंद्र.	मंगळ, गुरु.
शनि...शुक्र, बुध.	रवि, चंद्र, मंगळ.	गुरु.
राहु...शनि, बुध, शुक्र.	रवि, चंद्र, मंगळ.	गुरु.

केतूचे शत्रुमित्र राहूप्रमाणेंच समजावे.

शत्रुत्व किंवा मित्रत्व यांचा व्यावहारीक अर्थ उघडच आहे. तेव्हां त्याविषयीं लिहिण्याचें कांहीं कारण नाहीं. समत्व याचा अर्थ औदासीन्य. अर्थात् शत्रुत्वही नव्हे आणि मित्रत्वही नव्हे. अशी स्थिति असण्याचें कारण असें आहे कीं, चंद्र-सूर्य खेरीज करून जे इतर ग्रह दोन दोन राशींचे स्वामी आहेत, ते एका राशीच्या स्वामित्वाचे वेळीं कधीं मित्र असतात आणि दुसऱ्या राशीच्या स्वामित्वाचे वेळीं तेच शत्रु असतात. परंतु अशा वेळीं कधीं पहिला ग्रह दुसऱ्याशीं शत्रुभाव किंवा मित्र-भाव न दाखवितां केवळ उदासीन राहतो असें मानिलेलें आहे. यालाच समत्व म्हण-तात. ग्रहांचें शत्रुमित्रत्व कसें पहावें यांविषयीं अधिक स्पष्टीकरण मागें दिलेंच आहे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ग्रहांचें तात्कालिक मित्रत्व.

कुंडलीमध्यें परस्परांच्या द्वितीय किंवा द्वादशस्थानीं असणारे, तृतीय किंवा एकादशस्थानीं असणारे, आणि चतुर्थ किंवा दशमस्थानीं असणारे ग्रह तेवढ्या वेळेपुरते परस्परांचे तात्कालिक मित्र होतात.

ग्रहांच्या दृष्टि.

पादैकदृष्टिर्दशमे तृतीये द्विपाददृष्टिर्नवपंचमे वा ।
त्रिपाददृष्टिश्चतुरष्टमे च संपूर्णदृष्टिः समसप्तमे च ।
त्रिं कैर्स, धीधर्स, चतुर्गजेषु पश्यंति पूर्णं शनिजीवभौमाः ॥ २९ ॥

शनीवांचून इतर कोणताही ग्रह स्वस्थानापासून तिसऱ्या व दहाव्या स्थानांवर १/४ दृष्टीनें पाहतो. गुरूवांचून इतर कोणताही ग्रह स्वस्थानापासून पांचव्या व नवव्या स्थानांवर १/२ दृष्टीनें पाहतो. मंगळावांचून इतर कोणताही ग्रह स्वस्थानापासून चवथ्या व आठव्या स्थानांवर ३/४ दृष्टीनें पहातो. आणि सर्व ग्रह स्वस्थानापासून सातव्या स्थानावर संपूर्ण दृष्टीनें पाहतात. ह्याशिवाय जे बहिर्वर्ती ग्रह आहेत, त्यांचीं विशेष दृष्टिस्थानें आहेत. जसें, शनि स्वस्थानापासून तिसऱ्या व दहाव्या स्थानांवर, गुरु पांचव्या व नवव्या स्थानांवर, आणि मंगळ चवथ्या व आठव्या स्थानांवर संपूर्ण दृष्टीनें पाहतात. म्हणून शनीला ३।१० या स्थानांवर एकपाद १/४ दृष्टि नाहीं, गुरुला ९।५ या स्थानांवर, द्विपाद १/२ दृष्टि नाहीं, आणि मंगळाला ४।८ या स्थानांवर त्रिपाद ३/४ दृष्टि नाहीं, असें बहुमत आहे. तथापि बृहत्पाराशरी ग्रंथामध्यें शनि, गुरु व मंगळ या तीन्ही ग्रहांना सप्तमस्थानीं पूर्ण दृष्टि नसून केवळ चरणदृष्ट्या सांगितल्या आहेत, त्या अशाः—

शनिः पादं त्रिकोणे च चतुरस्रे द्विपादकम् ।
त्रिपादं सप्तमे ज्ञेयात् त्रिदशे पूर्ण एव हि ॥ ३० ॥
चतुरस्रे गुरुः पादे सप्तमे च द्विपादकम् ।
त्रिपादं त्रिदशे चैव पूर्णं पश्यति कोणगे ॥ ३१ ॥
सप्तमे पादमेकं च द्विपादं त्रिदशे तथा ।
त्रिपादं च त्रिकोणेषु भौमः पूर्णं चतुस्रगे ।
एवं रीत्या निरीक्षेत सर्वे सूर्यादयो ग्रहाः ॥ ३२ ॥

याचा भावार्थ कोष्टकरूपानें खालीं देतों.

	एकपाद	द्विपाद	त्रिपाद	पूर्णदृष्टि
शनि—	९।५	४।८	७	३।१०
गुरु—	४।८	७	३।१०	९।५
मंगळ—	७	३।१०	९।५	४।८

सर्व ग्रहांची सप्तमस्थानावर संपूर्ण दृष्टि असते असें बहुमत आहे, परंतु बृह-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

त्पाराशरीय्या ग्रंथकाराला हें मत मान्य नाहीं. त्याच्या मताप्रमाणें सप्तमस्थानावर शनि, गुरु व मंगळ या ग्रहांना अनुक्रमें त्रिपाद, द्विपाद व एकपाद दृष्टीच आहेत; परंतु हें मत चिंतनीय दिसतें. वस्तुतः चरणदृष्ट्या ह्या विशेष परिणामकारक नसतात असा अनुभव येतो. फारच सूक्ष्म रीतीनें दृष्टिबलाचा विचार केला तर $\frac{1}{4}$ दृष्टीचें चतुर्थांशच फळ मिळणार, अर्थात् $\frac{1}{2}$ दृष्टीचें अर्धें व $\frac{3}{4}$ दृष्टीचें पाऊण हें उघड आहे.

ग्रहांचें राशींमध्यें वास्तव्य.

मासं शुक्रबुधादित्याः, सार्धमासं तु मंगलः।
त्रयोदशान् गुरुश्चैव, सपादद्विदिने शशी ॥ ३३ ॥
राहुरष्टादशान्मासान्, त्रिंशन्मासान् शनैश्चरः।
राहुवत्केतुरुक्तस्तु राशिभोगाः प्रकीर्तिताः ॥ ३४ ॥

प्रत्येक राशींत रवि, बुध व शुक्र हे सुमारें एक महिनापर्यंत, चंद्र सवादोन दिवस, मंगळ दीडमासपर्यंत, गुरु तेरा महिने, शनि ३० महिने म्हणजे अडीज वर्षें, आणि राहु व केतु अठरा महिनेपर्यंत राहतात. हर्शल ७ वर्षें व नेपच्यून १३॥ वर्षें प्रत्येक राशीवर असतो.

रवि ज्या राशीमध्यें असेल त्याच स्थानीं प्रायः बुध असतो, किंवा मागें पुढें एक राशी असतो. त्याचप्रमाणें शुक्र, रवीच्या राशीमध्यें किंवा रवीच्या मागील किंवा पुढील एकदोन राशींमध्यें असतो. राहुकेतु परस्परांच्या समोर म्हणजे परस्परांच्या सातव्या स्थानीं असतात व त्यांची गति नेहमीं पुढील राशींतून मागील राशींत असते; म्हणजे मिथुन राशींतून वृषभराशींत, वृषभ राशींतून मेषराशींत इत्यादि जाणावें.

देहसंबंधीं ग्रहांचे परिणाम.

रवि—हृदय व त्यांतील धमन्या, तसेंच पुरुषाचा उजवा व स्त्रियांचा डावा डोळा यांवर रवीची सत्ता असते. सर्व प्रकारचे नेत्ररोग, मूर्च्छा, पायांत पेटके येणें, ज्वरपीडा, हे रोग अनिष्ट रवीमुळें होतात. पितृसुख, वैद्यशास्त्राची आवड हीं रवीपासून प्राप्त होतात. लग्नीं किंवा सप्तमांत रवि असतां डोकें व डोळे मोठे असतात.

चंद्र—चंद्राचा अधिकार मेंदूवर असून अनिष्ट चंद्रामुळें स्वभाव चंचल असतो. मिथुन, तूळ, मकर, कुंभ या राशींमध्यें जन्मकाळीं चंद्र असतां मनुष्य दूरदर्शी, दृढनिश्चयी, विचारी, शोधक, एकांतवासप्रिय, अत्यंत मेहनती, परंतु संशयी असतो. वृषभराशीच्या चंद्रामुळें मनुष्य हट्टी होतो. शुभचंद्र असतां मनुष्य विश्वासु, सभ्य व सदय हृदय असतो. कृष्ण अष्टमीपासून शुक्ल प्रतिपदेपर्यंत जन्मलेले लोक मनाचे भित्रे, चंचलमतीचे, उतावळे व पश्चात्ताप पावणारे असतात. क्षीण चंद्रामुळें दुखणें येणें, वाढणें व चढउतार होणें हे प्रकार घडतात.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मंगळ—मंगळाची सत्ता मांसावर असते. शुभस्थानीं व तृतीयस्थानीं मंगळ असतां मनुष्य मर्दानी गुणांचा व धाडशी स्वभावाचा असतो. शरीर धिप्पाड, नाकपुड्या मोठ्या, डोळे रोगी व लाल, स्वभाव तामसी, आपमतलबी व सूड घेण्याची वृत्ति हीं अनिष्ट किंवा रवियुक्त मंगळामुळें होतात. नीच गृहीं मंगळ असतां मनुष्य अधर्मी, अन्यायी व निर्दय असतो. ३।९ या स्थानीं, मित्रक्षेत्रीं, उच्चीचा व शुभग्रहयुक्त मंगळ असतां मनुष्य धनाढ्य होतो.

बुध—बुद्धीचा मालक बुध असल्यामुळें तो पापग्रहानें युक्त असतां, शत्रुक्षेत्रीं एकटा असतां किंवा ४।८।१२ या स्थानीं असतां बुद्धिभ्रम, वेड, अस्थिर मन हे विकार उत्पन्न होतात. लग्नीं स्वगृहीं बुध असतां सुंदर शरीर असून भाषण धोरणी व विनोदी असतें. गणित, ग्रंथलेखन, वक्तृत्व व वेदान्त हे गुण बुधापासून मिळतात.

गुरु—गुरूचा अंमल ज्ञानशक्तीवर आहे. शुभस्थानीं गुरु असतां मनुष्य निःस्पृह, उदार, सदाचरणी, धार्मिक व न्यायी असतो. शरीर गौरवर्ण असून देह पुष्ट, नीटनेटके अवयव व काळेभोर पाणीदार डोळे असतात. गुरु पापग्रहानें पूर्ण दृष्ट असतां ज्या स्थानीं तो असेल त्या स्थानाचें अर्धवट फळ देतो. ३।६।८।१२ या स्थानीं अथवा पापग्रहानें युक्त किंवा दृष्ट गुरु असतां अपुरी विद्या प्राप्त होऊन गर्विष्ठपणा वाढतो व असलेल्या विद्येचें तेज पडत नाहीं. सप्तमस्थानचा गुरु अंधश्रद्धा उत्पन्न करितो. नवमस्थानीं मीनराशीचा व पंचमस्थानीं धनुराशीचा गुरु असतां मनुष्य ग्रंथकर्ता होतो.

शुक्र—शुक्राचा अधिकार वीर्य, रेत, गर्भाशय, जननेन्द्रिय, कोठा, स्तन, कंठ इत्यादिकांवर असून तत्संबंधीं रोग शुक्रापासून उद्भवतात. शुक्र नीचीचा, शत्रुक्षेत्रींचा पापग्रहानें दृष्ट किंवा युक्त असतां मनुष्य भित्रा, दुष्कृत्यें करणारा, स्त्रीवश, सर्वज्ञतेचा डौल मिरविणारा व अविचारी असतो. शुभस्थानीं शुक्र असतां तेजःपुंज नाजूक देह, डोळे पाणीदार, चैनी व क्षमाशील स्वभाव, व औषधि जाणणारा मनुष्य असतो. आवाज मधुर व गायनाचा शोकी असतो. लहानशा संकटांनीं घाबरणारा व कुत्सित असतो. धनस्थानीं नीचीचा शुक्र नेत्रपीडा करितो.

शनि—शनीचा अंमल मांड्या कमर व स्त्रियांचा गर्भाशय यांवर असतो. शनि षष्ठस्थानीं, अष्टमस्थानीं किंवा पापग्रहानें युक्त असतां काळपुळी, जलोदर, अर्धांगवात, अंतर्गळ, क्षय, दंतविकार, हे रोग उत्पन्न होतात. स्त्रियांचे कुंडलींत शनि पंचमांत अनिष्ट असतां गर्भपात, वांझपणा, अल्पायु प्रजा होणें, हे दोष संभवतात. पण तोच पंचमांतील शनि पापग्रहानें युक्त किंवा दृष्ट नसतां अनेक पुत्रांची प्राप्ति करून देतो. मंगळाचे दृष्टींत शनि फार वाईट परिणाम करितो. पापक्षेत्रीं, लग्नीं किंवा २।५।६ या स्थानीं शनि असतां मनुष्य मुखदुर्बल, एकलकोंडा, परोत्कर्षासहिष्णु व नित्य उदास असतो. नीचींचा शनि नेहमीं आपत्ति आणतो.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

फलें पहाण्याचे स्थूल नियम.

कुंडलींतील ग्रहांचीं फलें सांगतांना पुढें सांगितलेले साधारण नियम ध्यानांत ठेवावे. कोणत्याही स्थानाचा स्वामी शुभग्रह असेल, किंवा स्वक्षेत्रीं, मित्रक्षेत्रीं, आपल्या उच्चराशींत, केंद्रांत अथवा त्रिकोणांत असेल आणि पापग्रहाची त्याजवर दृष्टि नसेल किंवा पापग्रहांनीं युक्त नसेल तर ज्या स्थानाचा तो स्वामी असेल त्या स्थानासंबंधीं तो शुभफल देईल असें समजावें. कोणत्याही स्थानाचे स्वामी परस्परांस पहात असतील किंवा परस्परांच्या घरांत असतील तर त्या भावासंबंधींही शुभफल मिळेल असें जाणावें. कोणताही पापग्रह जर स्वस्थानीं, मित्रगृहांत, आपल्या उच्चराशीस किंवा शुभग्रहाच्या राशीस असेल तर तो शुभफलदायक होतो. कोणत्याही स्थानाचा स्वामी जर स्वस्थानापासून १।४।७।१०।५।९ या स्थानीं असेल तरीही, ज्या स्थानाचा तो स्वामी असेल, त्या स्थानासंबंधीं शुभफल मिळेल. कोणत्याही स्थानाचा स्वामी पापग्रह असेल, पापग्रहानें युक्त असेल किंवा दृष्ट असेल, किंवा शुभग्रह असूनही नीचस्थानीं असेल, शत्रुक्षेत्रांत असेल, किंवा लग्नापासून अथवा स्वस्थानापासून ६।८।१२ या स्थानीं असेल तर त्या स्थानासंबंधीं अशुभफल मिळेल. तात्पर्य, ह्या रीतीनें सारासार विचार करून फलनिर्णय करावा. गुरु ज्या स्थानीं असतो त्या स्थानाची हानि करितो, परंतु तोच स्वगृहींचा असेल तर मात्र नाश करीत नाहीं. ज्या स्थानांवर गुरूची दृष्टि असेल त्या स्थानांची तो वृद्धि करितो. तसेंच, शनि ज्या स्थानीं असतो त्याची वृद्धि करितो, आणि ज्या स्थानांवर पहातो त्यांचा नाश करितो; परंतु स्वगृहावर पहात असेल तर मात्र अशुभफल देत नाहीं. मंगळही याचप्रमाणें शुभाशुभ जाणावा. पापग्रह उपचयस्थानीं असतां बलवान् जाणावे. तिसऱ्या किंवा अकराव्या स्थानीं असणारा कोणताही ग्रह बलिष्ठ समजावा. कोणताही ग्रह त्रिकस्थानीं निर्बल होय. बलवान् ग्रह आपल्या महादशेंत शुभफल देतात. सारांश, कोणत्याही भावाचें फल सांगतांना, त्या भावाच्या सप्तमांत कोणते ग्रह आहेत, त्या भावाचा स्वामी शत्रुक्षेत्रीं किंवा मित्रक्षेत्रीं आहे, उच्चीचा आहे कीं नीचीचा आहे, शुभग्रहांनीं किंवा पापग्रहांनीं युक्त आहे, किंवा दोन पापग्रहांच्या कर्तरींत आहे, किंवा अन्योन्य क्षेत्रसंबंध आहे कीं काय, म्हणजे मेषराशीचा स्वामी सिंहराशींत व सिंहराशीचा स्वामी मेषराशींत (हा योग शुभ आहे) इत्यादि गोष्टींचा विचार करून फलें सांगावीं. फलें सांगतां येणें ही गोष्ट केवळ अनुभवाची आहे हें मागें लिहिलेंच आहे. म्हणून सर्व योगांचीं फलें कोणत्याही मोठ्या ग्रंथांत सुद्धां लिहिलेलीं असतील असें समजूं नये. तीं केवळ आपल्या बुद्धिबलानेंच ठरविलीं पाहिजेत. तथापि विषयाची दिशा समजून तत्संबंधीं कांहीं विचार ठरवितां यावे म्हणून तन्वादि द्वादशभावांचीं आतां सामान्य फलें सांगतों.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

द्वादशभावांचीं फलें.

१ तनुस्थान—लग्नस्वामी शुभग्रह असून केंद्रीं, मित्रक्षेत्रीं, उच्चीचा, शुभग्रहांनीं युक्त किंवा दृष्ट असेल व त्यावर पापग्रहाची दृष्टि नसेल किंवा तो पापग्रहाचे राशीस नसेल तर मनुष्य सत्त्वगुणी, सुरूप, विद्वान्, धनी व निरोगी होईल. लग्नस्वामी कुंडलींत कोठेंही नीचीचा, पापग्रहयुक्त किंवा शत्रुक्षेत्रीं असतां अंतर्गळादि गुह्यविकार उद्भवतात. लग्नीं चंद्र असतां मनुष्य विषयी व रोगट असतो. जन्मकुंडलीमध्यें कोणताही क्रूर किंवा पापग्रह आपल्या शत्रुगृहीं असेल तर व्रण उत्पन्न होतात. रवियुक्त मंगळ, पापग्रहयुक्त मंगळ किंवा समोरासमोर परस्परांच्या सप्तमांत रविमंगळ निर्बल असतां तोंडावर देवीचे व्रण असतात, व अनेक तील अंगावर असतात. लग्नस्वामीवर दोन किंवा तीन शुभग्रहांची दृष्टि असतां मनुष्य शत्रुहीन आणि दीर्घायु होतो. रविमंगळांच्या योगापासून किंवा लग्नीं राहु, चंद्रावर शनिमंगळांची दृष्टि यापासून रक्तदोष उद्भवतात. जन्मलग्नीं बुधचंद्रयोग असतां मनुष्य शास्त्रप्रवीण असतो. तसेंच, चंद्र शुभस्थानीं व शुभग्रहांनीं दृष्ट असतां मनुष्य शांतस्वभावाचा निपजतो. रविचंद्र एकत्र असतां किंवा शनिमंगळ समोरासमोर असतां पाण्यांत बुडण्याचा अपघात होतो. मिथुन, सिंह, धन आणि कुंभ या लग्नीं जन्म असून २।६।८।१२ या स्थानीं शनि चंद्र असतां उदराचे विकार उद्भवतात. रविमंगळ समोरासमोर सप्तमांत असतां वातरोग उद्भवतात. जन्मलग्नावर गुरुशुक्रांची पूर्ण दृष्टि असतां मनुष्य वाटोळया तोंडाचा, सुरूप, पुण्यशील व दुसऱ्यावर आपली छाप बसविणारा होतो. लग्नीं उच्चीचा बुध, गुरु किंवा शुक्र असतां अतुल विद्या आणि धन हीं प्राप्त होतात. लग्नाचा स्वामी षष्ठ, अष्टम व द्वादशस्थानीं असेल तर मनुष्य अंतीं निर्धन होतो. लग्नावर मंगळाची दृष्टि असेल तर मनुष्य अत्यंत मत्सरी होतो. लग्नीं शनि राहु (उच्चीचे, मित्रक्षेत्रींचे व स्वगृहींचे खेरीज करून) असतां किंवा लग्नावर त्यांची दृष्टि असतां मनुष्य व्यंग असतो. लग्नाधिपति अथवा चंद्र ज्या स्थानीं असेल त्या स्थानचा स्वामी त्रिक म्हणजे ६।८।१२ या स्थानीं असतां मनुष्य वातुलदेही असतो. लग्नेश लग्नीं असतां मनुष्य निरोगी, स्वेच्छाचारी व पराक्रमी होऊन त्याला द्विभार्यायोग उडतो. लग्नस्वामी द्वितीयस्थानीं असतां धनाची चिंता; तृतीयस्थानीं असतां अत्यंत पराक्रमी, सुसंपन्न, व नीचीचा असतां अनेक स्त्रियांशीं रत असणारा; चतुर्थस्थानीं असतां मातृसुख व गुणरूपयुक्त; पंचमस्थानीं असतां मध्यम पुत्रसुख व प्रथम अपत्याला भय; षष्ठांत असतां रोगी; सप्तमांत असतां स्त्रीला क्लेश, विरक्त, प्रवासी व निर्धन; अष्टमांत असतां कुकर्मी; नवमस्थानीं असतां भाग्यवंत; दशमस्थानीं असतां पितृसुख व राजमान; एकादशस्थानीं असतां सुखी, मानी व धर्मशास्त्रवेत्ता; आणि द्वादशस्थानीं असतां जुगारी व कुमार्गी होईल असें जाणावें. वृषभ, कर्क, किंवा

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मीन लग्नीं जन्म असून कुंडलींत शनि चंद्र पापग्रहयुक्त असतां मनुष्य खुजा होतो. कुंडलींत कोठेंही शनि व मंगळ या दोन ग्रहांनीं युक्त निर्बली रवि असेल तर कुष्ठ उत्पन्न होतें. लग्नेश, बुध, मंगळ किंवा चंद्र हे कोठेंही राहुकेतुयुक्त असतां श्वेतकुष्ठ होतें. लग्नाधिपति व सूर्य ६।८।१२ या स्थानीं असतां गंडरोग होतो. लग्नीं चंद्र असतां विलासी व उधळया होतो. सप्तमांत निर्बली शनि असतां मूर्ख निपजतो. लग्नीं बुध व सप्तमांत गुरु असतां सदा हंसत बोलणारा होतो. मेपेचा चंद्र लग्नीं असतां मुखरोगानें तोंडास दुर्गंधी येते. उच्चीचे ग्रह केंद्रीं म्हणजे १।४।७।१० या स्थानीं असतां दीप्तनामक योग होऊन मनुष्य अति श्रीमान् होतो. लग्नस्वामी चतुर्थस्थानीं असतां विद्वान्, व षष्ठस्थानीं असतां हतवीर्य होतो. लग्नेश शुभग्रह असून त्याची चंद्रावर पूर्ण दृष्टि असेल तर धन व कीर्ति हीं मिळतात. लग्नावर लग्नेश पूर्ण दृष्टीनें पाहील, अथवा लग्नेश परमोच्चांशामध्यें असून सप्तमेशाची त्याजवर दृष्टि असेल, किंवा सप्तमेशानें युक्त असेल किंवा सप्तमेश स्वगृहीं, उच्चीचा किंवा स्वगृहाला पाहात असेल किंवा केंद्रीं सर्व शुभग्रह असतील तर सौभाग्ययोग होतो. हा योग सर्वप्रकारें मनुष्याला सुखी ठेवितो. लग्नीं चंद्र असून पापग्रहांनीं दृष्ट असेल तर मनुष्य रोगी होतो. लग्नीं शनिराहु असतां मनुष्य भांग, गांजा इत्यादि व्यसनांनीं युक्त असतो. जुळया भावंडांच्या कुंडलींत धन, कन्या, मिथुन किंवा मीन लग्न असून लग्नीं बहुधा राहु असतो. तनुस्थानीं बुधगुरुशुक्र हे तीन ग्रह रवियुक्त असतां महान् भगवद्भक्त होतो. आतां तनुस्थानस्थित सूर्यादि ग्रहांचीं फलें सांगतों. हीं फलें ते ते ग्रह त्या स्थानीं किंवा त्या स्थानाचे स्वामी असतां प्रायः सारखींच अनुभवास येतात. तनुस्थानीं म्हणजे लग्नीं सूर्य असतां आळशी, रागीट, शरीरानें धिप्पाड, विषयी व निर्दय असतो. लग्नीं चंद्र असतां उन्मत्त, कृशांग, विलासी व रोगी असतो. मेष, वृषभ व कर्क या लग्नीं जन्म असून लग्नीं चंद्र असतां सुंदर व गुणी असतो. लग्नीं मंगळ असतां शरीरावर व्रण, अमिष्ट, भटकणारा व साहसी असतो. लग्नीं बुध असतां शांत, नम्र, उदार, सदाचरणी, विद्वान् व पुत्रवान् असतो. लग्नीं गुरु असतां बुद्धिमान्, लोकप्रिय, उपकारी व सुंदर असतो. लग्नीं शुक्र असतां कलाकुशल, सुंदर, लोकमान्य व विषयी असतो. लग्नीं स्वगृहींचा किंवा बलवान् शनि असतां तो पुरुष उंच, सदृढ व धार्मिक असून फार श्रीमंत असतो. परंतु ह्याव्यतिरिक्त तेथें शनि असतां मनुष्याला निर्धन, अमंगळ व रोगी करितो. लग्नीं राहु असतां तो पुरुष दुष्टबुद्धि, लोकांना फसविणारा, मस्तकशूल असलेला व विषयी असतो. लग्नीं केतु असतां रोगी, भित्रा, उद्वेगी व स्त्रीचिंता असणारा असतो. वर जीं सूर्यादि ग्रहांचीं फलें सांगितलीं आहेत, तीं ते ते ग्रह उच्चीचे व बलवान् असतां मात्र पूर्ण अनुभवास येतात. स्वक्षेत्रीं व मित्रक्षेत्रीं असतां अर्धीं फलें व शत्रुक्षेत्रीं असतां चतुर्थांश फलें मिळतात. आणि ग्रह अस्तंगत असतां निष्फल होत असें जाणावें.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

२ धनस्थान—जन्मकालीं धनस्थानीं सूर्य, मंगळ, शनि किंवा क्षीणचंद्र हे ग्रह असतील तर तो मनुष्य धनहीन होतो. धनस्थानीं सूर्य असतां संपत्ति मिळते, परंतु त्यावर शनीची दृष्टि नसावी. धनस्थानीं गुरु किंवा शुक्र असणें, हा श्रीमंतीचा योग आहे. धनस्थानीं बुध किंवा चंद्र असवां संपत्तिनाश होतो. परंतु चंद्राची दृष्टि बुधावर किंवा बुधाची दृष्टि चंद्रावर असतां संपत्तिलाभ होतो. धनस्थानीं शुक्र, चंद्र किंवा मंगळ असून तेथें शनीची दृष्टि असेल तर त्या मनुष्याला नेत्रविकार होतो. चंद्रानें युक्त किंवा सूर्यानें युक्त शुक्र व लग्नेश किंवा चंद्रमंगळ-शनि हे ६।८।१२ या स्थानीं असतील तरीही नेत्रविकार होतो. धनस्थानीं शनि असून त्यावर बुधाची दृष्टि असणें हा योग धनदायक आहे. धनस्थानीं चंद्र किंवा शुक्र पापग्रहानें युक्त किंवा दृष्ट असतां तो पुरुष बहुत कामी व परस्त्रीरत होतो. मकर किंवा कुंभ लग्नीं मंगळबुध असून त्यावर सूर्याची दृष्टि असतां तो पुरुष विनोदी होतो व मोठमोठ्या लोकांस हंसवून खूष करितो. धनभवनीं राहुशुक्र असतां मनुष्य द्रव्यसंग्रही होतो. परंतु त्याच ठिकाणीं केतु कोणत्याही पापग्रहानें युक्त असतां खर्चिक होतो. धनस्थानीं रवि, बुध, गुरु किंवा शुक्र असतां वक्ता होतो, परंतु तेथेंच मंगळ, शनि, राहु इत्यादि पापग्रह शत्रुक्षेत्रींचे किंवा नीचीचे असतां मनुष्य तोतरा होतो किंवा वाणीमध्यें दुसरा कांहीं दोष असतो. धनेश पापग्रह असून ६।८।१२ या स्थानीं असतां वाणीमध्यें मोठाच दोष असतो. द्वितीयस्थानाचा स्वामी शुभग्रह असून लग्नीं असतां धनवान्; द्वितीयस्थानीं असतां द्विभार्यायोग; तृतीयस्थानीं असतां स्वपराक्रमानें द्रव्यार्जन करणारा; चतुर्थस्थानीं असतां परस्त्रीरत, लोभी व नास्तिक; पंचमस्थानीं असतां विद्वान् व संततिवान्; षष्ठांत असतां गुह्यरोगी, शत्रूची पीडा; सप्तमांत असतां स्त्रीसुखाचा नाश; अष्टमस्थानीं असतां भूमिलाभ व ज्येष्ठ सहोदरांचें व स्त्रीचें सुख अल्प; नवमांत असतां उद्योगी व श्रीमंत; दशमस्थानीं असतां पंडित, अभिमानी, कामी व अल्पसंततिवान्; एकादशस्थानीं असतां श्रीमंत आणि द्वादशस्थानीं असतां निर्धन होईल असें जाणावें. राहु किंवा सूर्य यांनीं युक्त द्वितीयस्थानीं नीचीचा शुक्र असेल तर मनुष्यास कुटुंबापासून सुख मिळत नाहीं. धनस्थानाचा किंवा भाग्याचा अधिपति भाग्यांत, केंद्रांत किंवा त्रिकोणांत, किंवा भाग्येश शुभग्रह असून लाभस्थानीं व तसाच लाभेश भाग्यस्थानीं किंवा केंद्राधिपति भाग्यांत किंवा लाभांत असणें हे सर्व योग श्रीमंतीचे आहेत. धनस्थानीं रवि असतां मनुष्य निर्धन व बुद्धिहीन होतो. धनस्थानीं चंद्र असतां सुखी, नम्र व पुत्रवान् होतो. मंगळ असतां धनहीन, कुसंगतिप्रिय, व नास्तिक होतो. धनस्थानीं बुध असतां सुशील, चतुर, सुखी व कांतिमान् होतो. धनस्थानीं गुरु असतां सुंदर, विद्यागुणकीर्तियुक्त, वैर न करणारा, सुशील व संपत्तिमान् होतो. धनस्थानीं शुक्र असतां अनेकविद्यापरिपूर्ण, वक्ता व निरंतर पशुवाहनादिकांचा उपभोग घेणारा होतो. शनि असतां परगृहीं

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

वास करणारा, व्यसनयुक्त, देशांतर करणारा व राजमान्य होतो. राहु असतां गुसगोष्टींचा स्फोट करणारा व भटकणारा होतो. द्वितीयस्थानीं स्वगृहींचा, शुभग्रहाचे क्षेत्रीं किंवा बलवान् केतु असतां अत्यंत सौख्य मिळतें. तशी स्थिति नसतां केतूच्या योगानें कुटुंबविरोध, धननाश किंवा मुखरोग होतो.

३ सहजस्थान—तृतीयस्थानाला पराक्रमस्थान म्हणतात. तृतीयस्थानीं जितके अधिक शुभग्रह असतील तितका मनुष्य अधिक पराक्रमी, दैवशाली व परोपकारी होतो. तृतीयस्थानीं चंद्र असतां श्रीमंत, व मंगळ असतां पराक्रमी, युक्तिप्रयुक्तीनें द्रव्य संपादन करणारा, परंतु शीघ्रकोपी होतो. चंद्रमंगळाची जोडी ३।५।९।११ या स्थानीं असतां तो पुरुष बहुगुणी असतो. तृतीयस्थानीं मंगळ, शनि आदिकरून पापग्रह असतील किंवा त्या स्थानाचा स्वामी पापग्रहानें युक्त किंवा दृष्ट असेल किंवा त्या स्थानापासून ६।८।१२ या स्थानीं असेल तर बंधुभगिनींचें सौख्य फारच अल्प असतें. परंतु तृतीयस्थानाचा स्वामी स्वगृहीं, मित्रक्षेत्रीं, किंवा गुरुशुक्रानें दृष्ट किंवा युक्त किंवा उच्चीचा असतां बंधुसौख्य होईल. तृतीयाधिपति धनभवनीं आणि धनाधिपति तृतीयस्थानीं असा अन्योन्य क्षेत्रसंबंध किंवा तृतीय आणि दशमस्थान यांचा स्वामी एकच असून धनस्थानीं असेल तर तो मनुष्य स्वपराक्रमानें बहुत संपत्ति मिळवील. तृतीयस्थानीं उच्चीचा सौम्य ग्रह असेल तर तो मनुष्य युक्तीनें दुसऱ्या मनुष्यावर आपलें वर्चस्व ठेवील. परंतु तोच उच्चीचा क्रूर ग्रह असेल तर करारी स्वभावानें वर्चस्व राखील व तोंडपुजेपणा करणें निंद्य मानील. तृतीयस्थानीं शनि, षष्ठस्थानीं राहु व दशमांत उच्चीचा मंगळ किंवा तृतीयस्थानीं रविमंगळ किंवा शनि हे बलवान् असतील तर मरेन किंवा मारीन असा पुरुष निपजतो. तृतीयस्थानाधिपति शुभग्रह असेल किंवा शुभग्रहानें दृष्ट असेल तर त्या मनुष्याला उपजीविकेचें उत्तम साधन अनायासेंकरून मिळेल. तृतीयस्थानीं तीन पापग्रहांनीं युक्त चंद्र असेल व त्याला कोणताही पापग्रह पाहात नसेल तर भावंडांना अनिष्ट होय. नवमस्थानीं रवि स्वगृहींचा असतांही भावंडांना अनिष्ट होय. तृतीयस्थानाचा मालक स्त्रीग्रह असेल किंवा तृतीयस्थानीं शुक्र किंवा चंद्र हे स्त्रीग्रह असतील तर जन्मणाराला पाठीवर बहिणी अधिक व पुरुषग्रह विषमराशींत असतां भाऊ अधिक असतात. तृतीयस्थानीं जो राशि असेल तत्परिमित, किंवा तृतीयेश ज्या राशींत असेल तत्परिमित, किंवा मंगळ ज्या राशींत असेल तत्परिमित, भावंडांची संख्या सांगावी. तथापि हा अनुभव अपवादात्मक आहे. तृतीयाधिपति केंद्रीं, उच्चीचा, गुरुयुक्त असेल किंवा तृतीयेशापासून पांचव्या किंवा नवव्या स्थानीं मंगळ असेल तर पुष्कळच भावंडें होतील. तृतीयस्थानाचा स्वामी लग्नीं असतां पराक्रमी, साहसी व स्वच्छंदी, दुसऱ्या स्थानीं असतां क्लेशवान्, तिसऱ्या स्थानीं असतां पराक्रमी व द्रव्यवान्, चवथ्या स्थानीं असतां सुखी, पांचव्यांत असतां सुबुद्ध, सहाव्यांत असतां भावंडांपासून त्रास व मातुलसुखाचा

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

अभाव, सातव्यांत असतां दुःखी, आठव्यांत असतां कुकर्मी, नवव्यांत असतां स्त्रियांपासून द्रव्यलाभ, पिता कुकर्मी व दैन्य दाखविणारा, दहाव्यांत व अकराव्यांत असतां धनवान् व पराक्रमी आणि बाराव्यांत असतां निर्धन होईल असें जाणावें. ज्या पुरुषाच्या तृतीयस्थानीं रवि अथवा मंगळ असेल अथवा उच्चीचा शनि असेल त्याच्याकडे वडीलपणाचा मान येतो व तो इतर भावंडांपासून विभक्त असतो. शिवाय त्याचीं भावंडें अल्पायुषी असतात. लग्नापासून तृतीयस्थानीं रवि असतां तो मनुष्य प्रियभाषण करणारा, उत्तम मनाचा, संपत्तियुक्त, बंधुसौख्यरहित, कर्णरोगी व बलवान् असतो. तृतीयस्थानीं चंद्र असतां मनुष्य गर्विष्ठ, कृपण, निर्भय व निर्दय होतो. तृतीयस्थानीं मंगळ असतां पराक्रमी, उदार, धनवान् व बंधुसौख्यरहित असतो. तृतीयस्थानीं बुध असतां चतुर, इच्छित कार्य शेवटास नेणारा, साहसी, सुखरहित व कुड्या मनाचा होतो. तृतीयस्थानीं गुरु असतां कृपण, कृतघ्न, स्त्रीपुत्र यांची प्रीति नसलेला व अग्निमांद्यानें दुर्बळ असतो. तृतीयस्थानीं शुक्र असतां शरीरानें कृश, कृपण, अत्यंत विषयासक्त, पाषाणहृदयी व खोड्या करणारा होतो. तृतीयस्थानीं शनि असतां पराक्रमी, लोकप्रिय व त्याच्या कनिष्ठ भावंडांचा नाश होतो. तृतीयस्थानीं राहु असतां यशस्वी, सुखविलास भोगणारा, पराक्रमी, शत्रूपासून कार्यसाधक व बंधुबांधवांना मारक होतो. तृतीयस्थानीं केतु असतां शत्रुनाश, कलह, बंधुनाश, व बाहुपीडा होते. ३।९ ह्या स्थानीं समोरासमोर रविमंगळशनि असतां कर्णरोग होतो.

४ **सुहृत्स्थान**—चतुर्थस्थानाचा स्वामी केंद्रांत, त्रिकोणांत, धनभवनीं किंवा एकादशांत असतां मनुष्य संपत्तिमान् होतो. चतुर्थस्थानेश लग्नस्वामीनें किंवा गुरुशुक्रांनीं युक्त किंवा दृष्ट स्वगृहीं, मित्रक्षेत्रीं, उच्चीचा किंवा पराक्रमस्थानीं असेल किंवा भाग्येश व लग्नस्वामी शुभग्रह असून एकत्र असतील परंतु ६।८।१२ या स्थानीं मात्र नसावे किंवा भाग्यभवनावर म्हणजे नवमस्थानावर भाग्येश किंवा गुरु पूर्ण दृष्टीनें पाहात असेल तर तो मनुष्य स्वपराक्रमानें गृह संपादन करील. चतुर्थस्थानेश नवमाधिपतीनें युक्त असतां किंवा चतुर्थस्थानाधिपति लग्नीं किंवा एकादशस्थानीं असून गुरूनें दृष्ट असतां किंवा गुरूची चतुर्थस्थानावर पूर्ण दृष्टि असून चतुर्थस्थानाच्या स्वामीचें व गुरूचें मित्रत्व असतां अथवा चंद्र नवव्या स्थानीं व मंगळ एकादशस्थानीं असतां तो मनुष्य राजपूज्य होऊन त्याला जन्मभर इच्छित वाहनादिकांचें सौख्य मिळतें. मंगळ उच्चीचा, शुभग्रहांनीं अवलोकित, किंवा चतुर्थस्थानाचा मालक असतां त्या मनुष्यास गृहप्राप्तीचा योग घडतो. चतुर्थस्थानीं चंद्र किंवा चतुर्थस्थानाधिपति गुरुशुक्रांनीं युक्त किंवा अवलोकित असेल तर गाड्याघोडे वगैरे प्राप्त होतात. चतुर्थस्थानाचा स्वामी पूर्णचंद्रानें युक्त असून नवमस्थानाचे स्वामीवर गुरूची दृष्टि असेल तर त्या मनुष्याचे हातून लोकोपयुक्त कृत्यें घडतात. चतुर्थस्थानीं कोणताही निर्बल पापग्रह असेल किंवा चतुर्थस्थानेश

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

शनि, मंगळ किंवा राहु यांनीं युक्त असेल तर त्याच्या मातेला अंतकालीं क्लेश होतील. चतुर्थस्थानीं शुभग्रह असेल अथवा चतुर्थस्थानेश शुभग्रहानें युक्त असेल तर त्याला पुष्कळ मातृसुख मिळेल. चतुर्थेश चतुर्थस्थानापासून ६।८।१२ या स्थानीं असतां पितृसुखापेक्षां मातृसुख कमी असतें. चतुर्थ किंवा अष्टमस्थानीं मंगळ असतां मनुष्याला शेतवाडी इत्यादिकांचें वतन असतें. चतुर्थस्थानीं शनि किंवा शनीची दृष्टि असतां प्रायः सापत्नमातेचा योग घडतो. चतुर्थस्थानाचा स्वामी लग्नीं असतां फार विद्वान् होऊनही अंगीं सभाधीटपणा नसतो. चतुर्थेश द्वितीयस्थानीं असतां कुटुंबी व संपत्तिमान्, तृतीयस्थानीं असतां अपयशी व चिंतातुर, चतुर्थस्थानीं असतां सुखी, पंचमांत असतां देवभक्त आणि सर्वांस प्रिय, सहाव्यांत असतां सापत्नमातेचा योग व कुकर्में करणारा, सातव्यांत असतां विद्वान् व दानशूर, आठव्यांत असतां दुःखी, पंढ आणि स्त्री दुःशील, नवव्यांत असतां स्वपराक्रमानें द्रव्यार्जन करून सुख भोगणारा, दहाव्यांत असतां राजपूज्य व अनेक सुखांचा भोक्ता, अकराव्यांत असतां रोगी, आणि बाराव्यांत असतां क्लेश भोगणारा होईल. लग्नकुंडलींत चतुर्थस्थानीं एकाहून अधिक शुभग्रह असल्यास भाऊबंद सोयरेधायरे इत्यादि बहुत असतात. पण त्यांवर पापग्रहाची दृष्टि असल्यास त्यांच्याशीं पटत नाहीं. लग्नापासून चतुर्थस्थानीं रवि असतां पोटदुखीचा विकार असून त्यास पश्वादिकांचें सुख मिळत नाहीं. चतुर्थस्थानीं चंद्र किंवा चतुर्थेश चंद्र असतां जलाशयापासून धन संपादन करणारा, शेतवाडी, भार्या व पुत्र यांनीं युक्त व श्रद्धावान् होतो चतुर्थस्थानीं किंवा चतुर्थेश मंगळ असतां प्रवासी, आप्तजनांपासून त्रास पावणारा व बलहीन होतो. बुध असतां धनधान्यसंपन्न, नृत्यगायनाची आवड असणारा, सुविद्य व देशांतर करणारा होतो. चतुर्थस्थानीं गुरु असतां लोकमान्य, धनवाहनयुक्त व राजानुग्रहानें संपत्ति संपादणारा होतो. शुक्र असतां तो पुरुष सर्वांचा स्नेही, उत्तम घरदार असलेला, ईश्वरोपासक व नित्यानंदी असतो. चतुर्थस्थानीं शनि असतां आळशी, बलहीन, तकॅटी व मलीन असतो. राहु असतां सुखरहित, आप्तांपासून अपयश व नित्य भटकणारा असतो. चतुर्थस्थानीं केतु असतां आप्तइष्टांचें व मातेचें सुख नसून पित्तविकारानें जर्जर होतो.

५ सुत-विद्या-स्थान—जन्मकाळीं पंचमस्थानीं किंवा केंद्रीं सर्व ग्रह असतां पताका नामक योग होऊन मनुष्य धनी, पुत्रवान् व धार्मिक होतो. पंचमस्थानावर शनिराहूची दृष्टि असतां कन्या पुष्कळ होऊन दत्तकपुत्र घेण्याचा योग असतो. पंचमेश केंद्रीं किंवा त्रिकोणीं असून पापग्रहानें दृष्ट नसेल तर पुत्रसंतति अधिक होईल. पंचमस्थानीं निर्बळी ग्रह असून तेथें शनीची पूर्ण दृष्टि असतां मनुष्य पुत्रहीन होतो व मंगळाची दृष्टि किंवा मंगळ तेथें असतां पुत्रशोक होतो. पंचमस्थानीं गुरु असून तेथें पापग्रहाची दृष्टी नसेल तर तीस वर्षांपुढें पुत्र होईल; आणि पूर्ववयांत पुत्र झालाच तर निर्विद्य, रोगी किंवा घरांत तंटे करणारा होईल. जर लग्नेश लग्नीं,

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

द्वितीय किंवा तृतीयस्थानीं असेल तर त्या पुरुषाला प्रथम पुत्र होईल व जर लग्नेश किंवा पंचमेश चतुर्थस्थानीं असेल तर प्रथम कन्या होईल. लग्नीं किंवा धनस्थानीं चंद्र, मंगळ राहु किंवा शुक्र यांतून कोणताही ग्रह असतां निश्चयेंकरून प्रथम पुत्र होईल. कित्येक ग्रंथकार असें म्हणतात कीं, पंचमस्थानावर जितक्या शुभग्रहांची दृष्टि असेल त्याच्या दुप्पट संतति होईल. तसेंच जितक्या अधिक पुरुषग्रहांची दृष्टि असेल तितकी पुत्रसंख्या अधिक व अधिक स्त्रीग्रहांची दृष्टि असतां कन्याधिक्य असेल. सुतस्थान हें पापग्रहाची एकादी राशी असेल व तेथें शुभग्रहांची दृष्टि नसेल तर तो पुरुष संततिहीन अथवा अल्पसंतानयुक्त होतो. सुतस्थानीं बुधशुक्राचा किंवा चंद्राचा नवांश असेल अथवा तेथें शुक्रचंद्राची दृष्टि असेल तर कन्या पुष्कळ होतील. पंचमस्थानापासून सातव्या म्हणजे एकादशस्थानीं पापग्रह असतां गर्भपात, उपजत मुलें मरणें इत्यादि प्रकार घडतात. पंचमस्थानीं स्वगृहींचा बलिष्ठ शनि असेल तर पांच मुलगे होतील. मकरराशीचा मंगळ असतां कन्या अधिक होतात. स्वगृहींचा गुरु असून पापग्रहांनीं युक्त किंवा दृष्ट नसतां पांच पुत्र होतात. संततिस्थानीं सिंह, कुंभ व मेष हे राशि असतां अल्पसंतति होते. मुख्यत्वेंकरून संततिस्थानावर पापग्रहांची दृष्टि नसेल तरच संततिसौख्य होतें. संतति अमुकच होईल हें सांगणें वस्तुतः कठीण आहे, तथापि सारासार विचारानें कांहीं सांगतां येतें. विद्येचाही विचार पंचमस्थानावर करितात. पंचमस्थानीं गुरु स्वक्षेत्रींचा असतां विद्वान व ग्रंथकर्ता होतो. पंचमस्थानीं लग्नेश असून तो शुभग्रह असेल किंवा स्वगृहींचा शुभग्रह असेल तर विद्वान् होतो. धनस्थानांत बुधगुरु असतां भाषाभिज्ञ आणि वक्ता होतो. मित्रक्षेत्रीं, स्वगृहीं किंवा उच्चीचा शुक्र असतां कवि, गायक किंवा वाद्यें वाजविणारा होतो. शुक्राचा संबंध गारुडविद्या, यंत्रें व चित्रें यांच्याशीं आहे. पंचमेश चंद्रयुक्त किंवा पंचम अथवा नवमस्थानीं बुध व शनि असतो उत्तम गायक होतो. शनि केंद्रांत, उच्चीचा, स्वगृहींचा, मित्रक्षेत्रींचा किंवा एकादशस्थानीं बलिष्ठ असून पापग्रहांनीं युक्त नसून शुभग्रहांनीं दृष्ट असेल तर मनुष्य वकील व कायदे-पंडित होतो. शनीचा संबंध कायद्यांशीं असतो. मकरराशीचा शनि किंवा वृश्चिकेचा शनि केंद्रीं व विशेषतः १।२।११।३।९ या स्थानीं स्वगृहींचा शनि किंवा भाग्यस्थानीं चंद्रगुरूची जोडी बलवान् असतां तो मनुष्य वकील होतो. त्रिकोणांत, एकादशस्थानीं किंवा धनस्थानीं बुधशुक्र असतां मनुष्य वेदांती होतो. पंचमस्थानीं व लाभस्थानीं पुष्कळ ग्रह असतील तर मनुष्य कारस्थानी होतो. बुध व मंगळ समोरासमोर सप्तमांत असतां मनुष्य इंजीनिअर होतो. दुसऱ्या किंवा तिसऱ्या स्थानीं रवि, बुध किंवा चंद्र असतां मनुष्य गणिती होतो. सिंहलग्नावर जन्म असतां व चंद्र मंगळ समोरासमोर म्हणजे परस्परांच्या सप्तमांत विशेषतः ३ व ९ या स्थानीं असतां मनुष्य उत्तम गणिती होतो. कुंभराशींत किंवा मिथुनराशींत रविशनींच्या योगानें निरंतर शास्त्राचा व्यासंग घडतो. पंचमेश पापग्रहांनीं दृष्ट, तिवंळी, नीचीचा,

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

शत्रुक्षेत्रीं असतां मनुष्य निर्विघ्न होतो. मिथुनलग्नीं किंवा मिथुन राशींत शुभग्रह असतां मनुष्य शास्त्री व पंडित होतो. पंचमेश लग्नीं असतां कपटी व लोभी, दुसऱ्या स्थानीं असतां श्रीमंत, तृतीयस्थानीं असतां लोभी, चतुर्थस्थानीं असतां मातृसुख, पंचमांत असतां संततिसौख्य घेताचें, सहाव्यांत असतां संततीचा नाश व दत्तक पुत्राचा योग, सातव्यांत असतां पराक्रमी व धनवान्, अष्टमांत असतां छातींत रोग, नवमांत असतां ग्रंथकर्ता, दशमांत असतां स्वतः सुविद्य व सुविद्य संतति, अकराव्यांत असतां पंडित, ग्रंथकर्ता, आणि पंचमेश बाराव्यांत असतां संततिनाश याप्रमाणें जाणावें. ज्यांच्या पंचमस्थानीं रवि किंवा पंचमेश रवि असेल तो मनुष्य अल्पसंततिमान्, दांभिकपणाची आवड धरणारा, सदाचरणापासून पराङ्मुख व अस्थिर मनाचा असतो. तोच रवि सिंहराशीचा असेल तर मनुष्य बुद्धिमान् परंतु गर्विष्ठ होतो. पंचमस्थानीं चंद्र किंवा पंचमेश चंद्र असतां जितेंद्रिय, सत्यवक्ता, प्रसन्नचित्त, सुखी व सुशील असतो. मंगळ असतां कफरक्तदोषपीडित, स्त्रीपुत्रांचें सुख नसणारा व व्यवहारज्ञ असतो. पंचमस्थानीं किंवा पंचमेश बुध असतां पुत्र व मित्र यांपासून सुख पावणारा, सुशील, कुशल व मंत्री असतो. गुरु असतां सन्मित्र व सुसंगति असणारा, श्रीमंत, वक्ता व विद्वान् निपजतो. पंचमस्थानीं किंवा पंचमेश शुक्र असतां कवि, राजमान्य व संपत्तियुक्त असतो. पंचमस्थानीं शनि असतां दुर्बल, दीन व दुष्टशील असतो. राहु असतां मित्रसुख नसणारा, पोटशूळाच्या व्यथेनें पीडित व अमिष्ट असतो. केतु असतां बंधु, संतति व स्त्रीसुखविरहित व वीर्ययुक्त असतो. गुरुशुक्र परस्पर नवपंचमांत असतां पूर्णज्ञानी होतो.

६ रिपुस्थान—षष्ठस्थानाचा स्वामी पापग्रहांनीं युक्त असून लग्नीं अथवा अष्टमस्थानीं असेल तर शरीरावर व्रण किंवा फोड होतात. जर षष्ठाधिपति रवि असून तो लग्नीं किंवा अष्टमांत असेल तर मस्तकावर, चंद्र असतां मुखामध्यें, मंगळ असतां कंठाचे ठायीं, बुध असेल तर हृदयावर, गुरु असतां नाभीवर, शुक्र असतां नेत्रावर, शनि असतां पायांवर आणि राहुकेतु असतां ओष्ठावर व्रणादिकांचा उद्भव होतो. मंगळाच्या किंवा बुधाच्या गृहांत लग्नाधिपति असून त्यावर बुध-मंगळाची दृष्टि असेल तर तो मनुष्य नेत्ररोगी होईल. षष्ठेश लग्नीं अथवा तृतीय-स्थानीं असतां तो मनुष्य शत्रूचा पाडाव करणारा होतो. षष्ठेश द्वितीयस्थानीं असतां कठोरहृदयी असून वक्ता असतो व त्याला पुत्रांपासून द्रव्याचें साहाय्य मिळतें. लग्नेश व अष्टमेश षष्ठस्थानीं असेल तर वामनेत्राला आणि एकटा शुक्र षष्ठांत किंवा अष्टमांत असेल तर दक्षिणनेत्राला पीडा होते. राहु केतु षष्ठांत असतां दंतरोगी व शनि मंगळ षष्ठांत असतां नानाप्रकारचे वातरोग होतात. षष्ठस्थानीं पापग्रहयुक्त चंद्र असतां मनुष्य रोगी होऊन त्याच्या हातून शत्रूचें निवारण होत नाहीं. लग्न पुरुषराशीचें असून षष्ठेश उच्चीचा, पापग्रहांनीं युक्त किंवा दृष्ट असेल तर गुह्यरोग होईल. सिंहराशीचा रवि षष्ठांत असतांही गुप्तरोग होतात. षष्ठेश

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सूर्यानें किंवा राहूनें युक्त द्वादशस्थानीं असतां नीचवृत्ति करणारा होईल. षष्ठस्थानावर मातुलसुखाचा विचार करितात, तो असा. आपला जो लग्नेश असेल त्यापासून किंवा चंद्रापासून किंवा बुधापासून जें षष्ठस्थान त्याचा स्वामी शुभग्रह असेल किंवा तें शुभग्रहयुक्त असेल तर मातुलसुख होतें. बुध व चंद्र हे मातृसुखाचे कारक ग्रह आहेत म्हणून मातुलसुख पाहतांना त्यांचा विचार करितात. लग्नापासून रवि षष्ठस्थानीं असतां किंवा षष्ठेश रवि असतां तो मनुष्य निरंतर सुखी, बलवान्, पूज्य, पराक्रमी व शत्रुहीन होतो. षष्ठस्थानीं किंवा षष्ठेश चंद्र असतां तो मनुष्य आळशी, रोगी, निर्दय व शत्रुयुक्त होतो. मंगळ असतां शत्रुनाश करणारा, सत्संगति धरणारा व विषयी होतो. बुध असतां कलहप्रिय, रोगी, निष्ठुर, शत्रु-पीडायुक्त व आळशी असतो. षष्ठस्थानीं किंवा षष्ठेश गुरु असतां संगीतशास्त्रांत प्रवीण, कीर्तिप्रिय, आरंभशूर व शत्रुनाश करणारा होतो. शुक्र असतां निर्बळ, स्त्रियांना अप्रिय व क्षीणवीर्य होतो. षष्ठस्थानीं शनि असतां किंवा षष्ठेश शनि असतां तो पुरुष शत्रुनाश करणारा, गुणी, सुज्ञ, पुष्टांग व मत्सरी असतो. षष्ठस्थानीं राहु असतां कटिशूलाची पीडा असलेला, म्लेंच्छांशीं स्नेह ठेवणारा, शत्रुनाश करणारा, बलवान् व धनिक होतो. षष्ठस्थानीं केतु असतां मातुलसुख नसलेला, निरोगी व सदा द्रव्यलाभ असणारा असतो. षष्ठेश २।३।९।१० या स्थानीं असतां शुभ व अन्यत्र असतां मनाला त्रास, व संसारांत दुःख होतें. ६।१२ ह्या स्थानीं शनिसमोर रविमंगळ असतां अपस्मार होतो.

७ जायास्थान—सप्तमस्थानीं पुष्कळ शुभग्रह असणें हें सुदैवाचें लक्षण आहे. सप्तमेश मित्रगृहीं, उच्चीचा किंवा चांगल्या स्थानीं असतां मनुष्य पराक्रमी होतो. सप्तमेश उच्चीचा असतां पराक्रमी व संसारदक्ष भार्या मिळते; परंतु सप्तमेश शनि किंवा चंद्र असतां ती मानी आणि वरचढ असेल व इतर शुभग्रह असतां मनमिळाऊ-पणानें संसारांत वागेल. सप्तमांत शुभग्रह असतां मनुष्य वीर्यवान् होतो. सप्तमेश रवि-मंगळांनीं युक्त, किंवा चंद्र आणि शुक्र हे शनि, मंगळ किंवा राहुयुक्त असतां नीच व विधवा स्त्रियांचा संग घडतो व प्रमेह जडतो. सप्तमस्थानीं चंद्र, गुरु, शुक्र किंवा सप्तमस्थानावर त्यांची पूर्ण दृष्टि असतां सुशील व पतीच्या अनुमतानें वाग-णारी भार्या मिळते. सप्तमस्थानीं शुक्र, मंगळ किंवा सप्तमेश शनि असतां मनुष्याला परस्त्रीसंग घडतो. सप्तमस्थानीं शत्रुक्षेत्रींचे पापग्रह असतां हीन स्त्रियांशीं आणि स्वगृहींचे असतां उच्च किंवा स्ववर्ण स्त्रीशीं समागम घडतो. सप्तमस्थानाचा स्वामी एकादशस्थानीं असतां किंवा सप्तमांत शनिचंद्र असतां किंवा त्यांची दृष्टि तेथें असतां मनुष्य परस्त्रीरत होतो. चंद्रानें दृष्ट असा लग्नेश सप्तमांत व सप्तमेश लग्नीं असतांही मनुष्याला परस्त्रीसंग घडतो. मिथुनराशीचा शुक्र असतां मनुष्य अतिकामी होतो. कोणत्याही बलिष्ठ पापग्रहानें युक्त असा शुक्र असतां मनुष्य व्यभिचारी होतो. बुधशुक्राचा योग तसाच आहे. शुक्राच्या अथवा सप्तमस्थानाच्या दोन्ही बाजूंस

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पापग्रह पडले तर नपुंसकत्व प्राप्त होतें. जन्मकालीं विषमराशीला मंगळ आणि समराशीला चंद्र रवियुक्त असून परस्परांस पाहात असतील किंवा समराशीला शनि आणि विषम राशीला बुध असून परस्पर दृष्ट असतील तर त्या मनुष्याला निश्चयेंकरून पंढत्व प्राप्त होतें. रवि, चंद्र, बुध, यांवर मंगळाची दृष्टि असतां नपुंसकत्व प्राप्त होतें. सप्तमस्थानीं पापग्रहयुक्त राहु, मंगळ किंवा शनि असतां किंवा त्या ग्रहांची तेथें दृष्टि असतां मनुष्याला द्विभार्यायोग घडतो व स्त्रीचें वर्तन पतीच्या मताप्रमाणें नसतें. सप्तमेश नीच किंवा पापग्रहाच्या राशीस असतां किंवा लग्नेश अष्टमांत असतांही द्विभार्यायोग होतो. लग्नापासून षष्ठ किंवा द्वादशस्थानीं रवि किंवा चंद्र असतां तो मनुष्य एकच विवाह करितो. लग्नीं, सप्तमांत किंवा द्वादशस्थानीं पापग्रह असतां किंवा पंचमांत चंद्र असतां विवाहयोग उशिरां घडतो किंवा विवाहसमयीं अडचणी उत्पन्न होतात. सप्तमस्थानाचा स्वामी लग्नीं असतां क्रूर व मेदोरोगी; द्वितीयस्थानीं असतां परस्त्रीसंभोग; तृतीयस्थानीं असतां संततीचें सुख कमी; चतुर्थस्थानीं असतां सुशील भार्येचा लाभ; पंचमांत असतां शांत, मानी व धनी; षष्ठांत असतां भार्या रोगी, सप्तमेश सप्तमांतच असेल तर परदारलंपट; अष्टमांत असतां स्त्रीसंबंधीं दुःख; नवमांत असतां पत्नीविषयीं आदर; दशमांत धार्मिक व सत्यवक्ता; अकराव्या स्थानीं असतां संततीला अपाय व द्वादशस्थानीं असेल तर निर्धन व कृपण होईल. सप्तमेश जेथें असेल तेथपासून १।४।७।८।१२ ह्या स्थानीं कोणताही पापग्रह, विशेषतः मंगळ असतां बहुभार्यायोग घडतो. सप्तमेश शत्रुक्षेत्रीं, नीचीचा अथवा अस्तंगत असेल तरीही त्या पुरुषाचे अनेक विवाह होतात. सप्तमेश पंचमस्थानीं असतां मनुष्य निपुत्रिक व विधुर होतो. लग्नावर मंगळाची दृष्टि आणि सप्तमस्थानावर गुरूची दृष्टि असतां मनुष्य परस्त्रीविषयीं पराङ्मुख होतो. तसेंच सप्तमस्थानावर रवि, चंद्र, बुध व गुरु यांची दृष्टि असेल किंवा हेच ग्रह सप्तमस्थानीं असतील तर मनुष्य अधिक कामी असूनही परस्त्रीविषयीं पराङ्मुख असतो. द्विस्वभावराशींत रवि, चंद्र, शुक्र असतां तो पत्नीचा त्याग करितो. सप्तमेश उच्चस्थानीं असून सप्तमस्थानावर पापग्रहाची दृष्टि नसेल तर अनायासें सुंदर स्त्रियांची प्राप्ति होते. सप्तमस्थानीं वृषभ किंवा तूळ राशीस शुक्र किंवा शनि चंद्राची युति असतां बहुत स्त्रियांचा समागम होतो. २।७ या स्थानांचे स्वामी किंवा लग्नेश आणि षष्ठेश, हे पापग्रहानें युक्त असतां मनुष्य कामी होतो. ६।७ या स्थानांचे स्वामी पापग्रहयुक्त असून ६।७ या स्थानांपासून नवमांत असतां मनुष्य विषयी होतो. लग्नापासून सप्तमस्थानीं किंवा सप्तमेश रवि असतां तो पुरुष परद्रव्यापहारी, दुःशील व रोगी होतो. सप्तमस्थानीं किंवा सप्तमेश चंद्र असतां तो मनुष्य अभिमानी, कृशांग, कामी व धनविनयरहित असतो. मंगळ असतां तो पुरुष सदा चिंतायुक्त, व शत्रुयुक्त असून त्याला स्त्री आणि गृह यांचें सौख्य कमी असतें. सप्तमस्थानीं किंवा सप्तमेश बुध असतां तो पुरुष मोठा श्रीमंत,

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सुशील, सत्यवादी व नित्य पर्यटन करणारा असतो. गुरु असतां शास्त्राभ्यासासक्त, नम्र, संततिसंपत्तियुक्त मंत्री व कवि असतो. शुक्र असतां कलाकुशल, रतिकुशल, नित्य पर्यटन व स्त्रियांशीं स्नेह करणारा असतो. सप्तमस्थानीं किंवा सप्तमेश शनि असतां बलहीन, मेदोरोगी, अल्पवीर्य, नीचांशीं स्नेह ठेवणारा व आळशी असतो. राहु असतां त्या पुरुषाला चौर्ययोग, द्विभार्यायोग आणि कलहप्रिया स्त्रियेची प्राप्ति घडते. केतु असतां सदा प्रवासी, धनक्षय, व पाण्यापासून भय असा योग असतो. तोच केतु वृश्चिक राशीचा असतां निरंतर लाभदायक होतो; परंतु त्याच्या मनाला चिंता व भार्येला पीडा असते. सप्तमस्थानीं रवि, शनि किंवा द्वितीयस्थानीं राहु असतां स्त्रियांचा पगडा पतीवर असतो. हाच योग स्त्रीला असतां ती पतीला प्रिय असते.

८ मृत्युस्थान—अष्टमेश पापग्रह असून नीचीचा असेल व कोणत्याही शुभग्रहांनीं युक्त किंवा दृष्ट नसेल किंवा स्वक्षेत्रींचा नसेल तर तो मनुष्य अल्पायु होतो. अष्टमेश शुभग्रह असून शुभग्रहांनीं युक्त व दृष्ट असतां मनुष्य दीर्घायु होतो. अष्टमाधिपति एकादशस्थानीं अथवा त्रिकोणांत असतां बाल्यावस्थेंत मनुष्य दुःखी होऊन नंतर सुख भोगितो. अष्टमेश अष्टमस्थानीं असतां किंवा नुसता शनि अष्टमस्थानीं असतां मनुष्य दीर्घायु होतो. अष्टमेश षष्ठ किंवा द्वादशस्थानीं पापग्रहयुक्त असेल किंवा लग्नेशानें युक्त असेल अथवा लग्नीं किंवा अष्टमांत क्षीण चंद्र असेल तर मनुष्य अल्पायु होतो. लग्नापासून ५।७।९ या स्थानीं पूर्ण अंशांत गुरु असतां, लग्नेशानें युक्त केंद्रीं किंवा त्रिकोणीं शुक्र व बुध असतां व इतर ग्रह ३।६।११ या स्थानीं असतां मनुष्य दीर्घायु, गुणी व धनवान् होतो. नवमपंचमस्थानीं शुभग्रह असून लग्नीं कर्केचा गुरु असणें हा योग मनुष्याला दीर्घायु करितो. केंद्रीं गुरु शुक्र व एकादशस्थानीं चंद्र असतां मनुष्य पुष्कळ वर्षें वांचतो. लग्नाधिपति अष्टमस्थानीं असून लग्नावर पापग्रहाची दृष्टि असेल किंवा लग्नेश नीचीचा असेल तर मनुष्य मध्यमायु होतो. अष्टमेश भौमयुक्त असतां किंवा लग्नेशावर मंगळाची दृष्टि असतां किंवा राहु, सूर्य व चंद्र लग्नीं किंवा केंद्रीं असतां किंवा अष्टमस्थानीं राहु, बुध व मंगळ असतां किंवा पापग्रहांनीं युक्त चंद्र ६।८ या स्थानीं असतां, सप्तमस्थानीं शनि मंगळ असतां किंवा द्वादशस्थानीं गुरु राहु असतां मनुष्य क्वचितच दीर्घायु होतो. षष्ठेश व द्वादशेश हे स्वगृहीं, लग्नीं किंवा परस्परांच्या गृहीं असतां मनुष्य दीर्घायुषी होतो. लग्नाधिपति उच्चीचा, चंद्र एकादशस्थानीं व गुरु अष्टमांत असतां मनुष्य दीर्घायु होतो. अष्टमस्थानचा स्वामी लग्नीं असतां व्रण होऊन मनुष्य व्याधियुक्त होतो. अष्टमेश द्वितीयस्थानीं असतां निर्धन, तृतीयस्थानीं असतां अशक्त, चतुर्थस्थानीं असतां मातृपितृसुख अल्प, पंचमस्थानीं असतां पुत्रसंतति अल्प व स्थिरवृत्ति, षष्ठस्थानीं असतां पाणी व सर्प यांपासून भीति, सप्तमांत असतां द्विभार्यायोग, अष्टमांत असतां स्वतः कुकर्मी व स्त्री इच्छेविरुद्ध वागणारी, नवमांत असतां

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पातकी, परस्त्रीरत व अल्प संतति, दशमांत असतां दुःखी व क्रूर, एकादशांत असतां सर्वकाल द्रव्याचा व्यय आणि द्वादशस्थानीं असतां रोगी, दुःखी व अल्पायु होईल. अष्टमस्थानीं पापग्रह असून त्यावर मंगळाची दृष्टि असतां अपमृत्यु घडतो. ज्या बालकाला रवियुक्त बुध किंवा चंद्र व्ययस्थानीं असेल तें मूल अल्पायु होतें. अष्टमेशाची लग्नस्वामीवर दृष्टि असतां तें मूल अल्पायु होतें. अष्टमेश व चंद्रराहु हे लग्नीं असतां अपघातानें मृत्यु येतो. अष्टमस्थानीं रवि असतां किंवा अष्टमस्थानाचा स्वामी रवि असतां तो मनुष्य क्रोधी, बारीक नेत्रांचा, शत्रु वाढविणारा व कृश शरीराचा असतो. अष्टमेश किंवा अष्टमस्थानीं चंद्र असतां तो मनुष्य क्षीण, अति घाम येणारा, निर्धन, शत्रुपीडायुक्त व उद्विग्न असतो. मंगळ असतां नेत्रपीडा, रक्तदोष, नीचकर्मी, गुह्यरोगी व अत्यंत निंद्य असतो. बुध असतां राजानुग्रहानें धन मिळविणारा, गर्विष्ठ व सर्वांशीं विरोध करणारा असतो. अष्टमस्थानीं किंवा अष्टमेश गुरु असतां अतिशय मलीन, विनयरहित, आळशी व स्थूल, परंतु शक्तिहीन असतो. शुक्र असतां प्रसन्नचित्त, धूर्त, निःशंक, राजमान्य व स्त्रीपुत्रांची चिंता असणारा असतो. शनि असतां रक्तदोषांनीं पीडित, निर्भय, असंतुष्ट व आळशी असतो. राहु असतां गुह्येंद्रियाला पीडा होते व अष्टमस्थानीं केतु असतां गुह्यस्थानीं पीडा असते आणि त्याला निरंतर द्रव्यलाभ होतो.

९ भाग्यस्थान—भाग्येश भाग्यस्थानीं, केंद्रीं किंवा त्रिकोणांत असेल किंवा भाग्यस्थानावर भाग्येशाची दृष्टि असेल किंवा शुभग्रहानें युक्त किंवा दृष्ट असेल तर तो पुरुष फार भाग्यवान् होतो. लग्नीं, तृतीयस्थानीं व पंचमस्थानीं कोणताही ग्रह असून तो जर बलवान् असेल आणि भाग्यस्थानावर पहात असेल तर तो पुरुष मोठा भाग्यशाली, संपत्तिमान् व विलासी असा होतो. भाग्येश पापग्रह असून त्याची, विशेषतः मंगळाची, भाग्यस्थानावर दृष्टि असतां मनुष्य चौर्यकर्मांनें, अन्यायानें अथवा लांच खाऊन पुष्कळ द्रव्य मिळवितो; परंतु उत्तरवयांत धार्मिक होतो. पूर्णचंद्रानें युक्त असा शनि किंवा मंगळ भाग्यस्थानीं बलवान् असेल तर तो पुरुष मंत्री होतो व सल्लामसलत देऊन पुष्कळ द्रव्य संपादन करितो. एकादशस्थानचा स्वामी भाग्यभवनीं असतां मनुष्य विद्वान् होतो. परंतु तोच पापग्रहांनीं युक्त असतां मनुष्यास दुःखी करितो. नवमस्थानीं नीचीचा गुरु, राहुयुक्त असून त्यावर शनि व मंगळ यांची दृष्टि असतां मनुष्य दुष्कर्मं करितो. नवमेश व धनेश एकत्र केंद्रीं असून त्यावर लग्नेशाची दृष्टि असतां मनुष्याला मोठा धनलाभ होतो. भाग्यस्थानीं पांच ग्रह एकत्र असतां थोर अधिकार आणि अपार संपत्ति प्राप्त होते. गुरु नवमांत असून त्यावर रवि शनीची दृष्टि असतां मनुष्य अत्यंत गुणी व संपत्तिमान् होतो. भाग्यस्थानीं चंद्र, मंगळ व बुध यांची दृष्टि असतां कीर्तिमान्, सुखी व श्रीमंत होतो. शुक्राची दृष्टि असतां विद्वान् होतो. नवमस्थानीं चंद्र असून त्यावर शनि, बुध व मंगळ यांची दृष्टि असतां संपत्तिमान् व कर्तृत्ववान् होतो. नवमांत

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

शुक्रचंद्र असतां प्रतापी परंतु अनीतीचीं कर्में करणारा होतो, व शनिचंद्र असतां अभक्ष्याभक्ष्य करणारा होतो. नवमांत शुक्रमंगळ असतां द्विभार्यायोगही घडतो. नवमांत चंद्र, बुध व शुक्र असतां सापत्नमातेचा योग असतो. नवमांत अनेक पापग्रह असतां पापकर्मी होतो. नवमांत शनि असतां दीर्घायु व भांडखोर होतो. नवमांत गुरूनें युक्त पूर्णचंद्र असतां किंवा नवमेश दशमांत असतां किंवा राहु नवमांत असून नवमेश स्वनवांशीं असतां मनुष्य तीर्थयात्रादि पुण्यकर्में करितो. नवमेश नवमांत असतां यज्ञादि कृत्यें घडतात. नवव्या स्थानापासून दुसऱ्या किंवा चवथ्या स्थानांत मंगळ असून नवमेश नीचीचा किंवा पापग्रहानें युक्त असतां जन्मणाराचा पिता निर्धन असतो. नवमेश उच्चीचा, केंद्रीं शुक्र व नवमांत गुरु असतां पिता दीर्घायुषी व श्रीमंत असतो. नवमेश दशमांत व दशमेश नवमांत असा अन्योन्यक्षेत्रसंबंध असतां पिता कीर्तिमान् असतो. अष्टमेश नवमांत, द्वादशेश लग्नांत, षष्ठेश पंचमांत व ६।८।१२ या स्थानीं सूर्य असतां जन्मापूर्वी किंवा बालपणीं पिता मृत्यु पावतो. नवमेश लग्नीं असतां गुणी व यशस्वी, दुसऱ्या स्थानीं असतां भाग्योदयाची चिंता, तृतीयस्थानीं असतां धनी, गुणी, कामी व लोकप्रिय, चतुर्थस्थानीं असतां वक्ता व संतोषी, पंचमांत असतां गुरुभक्ति करणारा व बुद्धिमान्, सहाव्यांत असतां भाग्यहीन, सप्तमांत असतां अपयशी, अष्टमांत असतां भाग्यहीन, नवमांत असतां धनी, गुणी व कांतिमान्, दशमांत असतां मंत्री, यशस्वी व पुण्यकर्में आचरणारा, एकादशांत असतां सुदैवी व लोकप्रिय आणि बाराव्यांत असतां भाग्यहीन याप्रमाणें जाणावें. नवमस्थानीं एकटा रवि असतां किंवा नवमेश रवि असतां तो मनुष्य धार्मिक, सन्मतियुक्त, पुत्रमित्रांचें सुख असणारा व मातुलपक्षाशीं विरोध करणारा असतो. नवमस्थानीं किंवा नवमेश चंद्र असतां धन व कुटुंब यांच्या सुखानें युक्त, कथा पुराणें आवडणारा, सदाचरणी व तीर्थयात्रा करणारा होतो. मंगळ असतां भांडखोर, पापकर्मांची पर्वा न करणारा, राजमान्य आणि अन्यायानें द्रव्य मिळविणारा असतो. बुध असतां उपकारी, विद्याभिलाषी, धनपुत्रयुक्त, नित्य प्रवासी व दाता असतो. नवमस्थानीं गुरु किंवा नवमेश गुरु असतां तो पुरुष राजमंत्री, सत्कार्यकर्ता, वेदान्ती, ईश्वरभक्त व थोरांचा आदर करणारा होतो. शुक्र असतां ईश्वराविषयीं भाव, गुरु व अतिथि यांचा आदर करणारा, तीर्थयात्रा करणारा, व ऋषीप्रमाणें शांत स्वभावाचा होतो. शनि असतां शरीरानें सुदृढ, धार्मिक, मत्सरी व दुसऱ्यावर अंमल गाजविणारा असतो. राहु असतां धर्म व द्रव्य यांचा नाश, बंधुसौख्य, अल्प भ्रमण व शरीरपीडा होते. केतु असतां क्लेशनाश, म्लेंच्छापासून भाग्यवृद्धि होते. ३।९।१०।२।५ या स्थानीं रविशनिराहुमंगळ असतां लांचखाऊ होतो.

१० दशमभाव—दशमेश निर्बल असतां मनुष्य वाईट आचरणाचा व चंचल बुद्धीचा होतो. दशमांत रवि किंवा राहु असतां किंवा दशमेश शुक्रयुक्त केंद्रीं

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

असतां महायात्रा घडते. दशमांत पापग्रह निर्बली असतां मनुष्य साहसी व जुगाराचे व्यापार करितो. लग्नेश व दशमेश हे एकच असतील किंवा एकत्र असतील तर स्वकष्टानें द्रव्य संपादन करून मनुष्य पुण्यकर्मे करितो. बुध शुक्र हे ज्या राशीस असतील त्या राशींचे स्वामी बलहीन असतां मनुष्य आसुरी कृत्यें करितो. दशमेश चंद्रानें युक्त नवमांत असतां त्या मनुष्याचे हातून जीर्णोद्धार घडतात. दशमेश भाग्यस्थानीं, किंवा उच्चीचा, किंवा शुभ ग्रहांनीं युक्त केंद्रीं किंवा त्रिकोणीं असेल तर त्या मनुष्याला व्यापारांत यश येऊन तो सत्कर्मे करितो. दशमाधिपति ६।८।१२ या स्थानीं असतां सत्कृत्यांविषयीं नेहमीं पराङ्मुख होतो. आणि ५।९।१० या स्थानांचे स्वामी व लग्नेश हे शुभग्रह असून बलवान् असतील तर तो मनुष्य ज्ञानी व वेदांती होतो. बुधानें दृष्ट किंवा दशमाधिपतीनें युक्त असा शनि दशमांत असतां किंवा शनीची दृष्टि असलेले बुध व चंद्र दशमांत असतां हरिपदप्राप्तीसाठीं मनुष्य संन्यास घेतो. चंद्रापासून दशमस्थानीं बुध गुरु किंवा शुक्र असतांही संन्यासयोग घडतो. ५।९।१० किंवा १२ ह्या स्थानीं सूर्य, मंगळ, गुरु व शनि असे चार ग्रह असतां मनुष्य परब्रह्माचे ठायीं निमग्न होतो. तीन ग्रहांपेक्षां अधिक शुभग्रह केंद्रीं, त्रिकोणीं, स्वक्षेत्रीं, मित्रक्षेत्रीं, किंवा दशमांत एकत्र असतां प्रव्रज्या योग होऊन तो मनुष्य यति किंवा यतिस्वभावाचा होतो. दशमेश, द्वितीय अथवा सप्तमस्थानीं असेल किंवा त्यांच्या स्वामीनें युक्त असेल तर मनुष्य विषयी होतो. दशमेश किंवा दशमस्थानीं बुध असतां दुकान-दार होतो. दशमेश लग्नीं किंवा लग्नेशानें युक्त असतां कवि होऊन उत्तरवयांत सुखी होतो. दशमेश धनस्थानीं असतां वक्ता, तृतीयस्थानीं असतां स्वच्छंदी, चतुर्थस्थानीं असतां सुखी, पंचमांत असतां पुत्रवान्, सहाव्यांत असतां दुःखी व शत्रुतापानें पीडित, सप्तमांत असतां स्वच्छंदी, अष्टमांत असतां दुःखी, नवमांत असतां भाग्यवान्, दशमांत असतां सत्यवक्ता व ईश्वरभक्त, एकादशस्थानीं असतां संतोषी व धनवान् आणि द्वादशस्थानीं असतां दुःखी व अपयशी होईल. दशमस्थानीं मंगळ असतां त्या मनुष्याला वडिलार्जित भूमीचीं चिंता असते. नवम, पंचम व सप्तमस्थानीं गुरु असतां पुत्रसंबंधीं चिंता असते. दशमेश निर्बली असेल किंवा ६।८।१२ या स्थानीं असेल तर आयुष्यांत सुख होत नाहीं. दशमस्थानीं रवि किंवा दशमेश रवि असतां तो पुरुष बुद्धिमान्, पुत्रवान्, श्रीमान्, राजाश्रय असलेला, उपकारी असतो. दशमस्थानीं चंद्र किंवा दशमेश चंद्र असतां राजमान्य, कीर्तिमान्, बलवान्, संतोषी व सुशील असतो. मंगळ असतां असंत संतोषी, साहसी व धनसंचयी होतो. बुध असतां ज्ञानी, पराक्रमाचीं कामें करणारा, संप-त्तियुक्त व मधुरभाषणी असतो. ज्याच्या दशमस्थानीं गुरु किंवा दशमेश गुरु असेल तो पुरुष राजमान्य, मित्र, पुत्र, धन व स्त्रीसुख यांनीं संपन्न व यशस्वी असतो. शुक्र असतां सन्मान पावणारा, जपध्यान करणारा, धनसंपन्न व कुटुंबा-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

वर प्रीति करणारा असतो. शनि असतां राजप्रधान, चौर्ययोग, व कारस्थानी असतो. दशमस्थानीं किंवा दशमेश राहु किंवा केतु असतां त्याला पित्यापासून व मातेपासून सुख होत नाहीं व वातपीडा होते.

११ लाभस्थान—लाभेश लाभस्थानीं असतां पुष्कर नामक योग होऊन मनुष्य अत्यंत सुखी व सुशील होतो. लाभस्थान शुभग्रहांनीं युक्त असेल किंवा सौम्यग्रहाची त्यावर दृष्टि असेल तर मनुष्य ज्ञानी, काव्यकलाभिज्ञ असून साहसाचे व युक्तीचे उद्योग करून द्रव्यार्जन करितो. लाभस्थानीं गुरु अथवा गुरूची दृष्टि असतां तो पुरुष विद्वान्, सज्जनसंगति करणारा, अंतःकरणाचा दयाळु व संपत्तिमान् होतो. लाभस्थानीं शुक्र असतां देशांतर घडून स्त्रियांपासून द्रव्यप्राप्ति होते. एकादशस्थानीं, केंद्रांत किंवा त्रिकोणांत लग्नेश, अष्टमेश व लाभेश असतील तर तो मनुष्य दीर्घायु होतो. २।३।४।५।९।११ या स्थानीं पापग्रह असतां मध्यायु असतो. ६।८।१२ या स्थानीं निर्बली किंवा शत्रुक्षेत्रींचे पापग्रह असतां शरीराला वारंवार क्लेश होतात. चतुर्थेश षष्ठस्थानीं शनियुक्त असतां गाडीघोडा इत्यादिकां-वरून पडून अपघात होतो. लाभस्थानीं शुभग्रह असतां किंवा लाभेश शुभग्रहयुक्त असतां मनुष्य सत्कर्मानें द्रव्य संपादन करितो. तेच पापग्रह असतां असत्कर्मानें व शुभपापग्रहांचा संयोग असेल तर मिश्रमार्गानें द्रव्य मिळवील. लाभेश रविचंद्र असतां राजाश्रयानें, मंगळ असतां वरिष्ठाच्या साहाय्यानें, व शेतकीच्या योगानें, बुध, गुरु व शुक्र असतां विद्या व स्वपराक्रम यांपासून व शनि असतां कुमार्गानें द्रव्य मिळतें. लाभेश केंद्रीं किंवा त्रिकोणीं असतां मनुष्य श्रीमंत होतो. एकादश-स्थानचा स्वामी लग्नीं असतां वक्ता, आनंदी व सात्विक, द्वितीयस्थानीं असतां सुखी, तृतीयांत असतां बुद्धिमान् व पराक्रमी, चतुर्थस्थानीं असतां सुख भोगणारा, पंचमांत असतां पुत्रवान्, षष्ठस्थानीं असतां प्रवासी व रोगी, सप्तमांत असतां स्त्रीला अनिष्ट, अष्टमांत असतां अविद्वान्, नवम व दशमस्थानीं असतां भाग्यवान् व राजपूज्य, एकादशांत असतां वक्ता व कवि, आणि द्वादशांत असतां धर्मभ्रष्ट होईल. ज्याच्या एकादशस्थानीं रवि किंवा एकादशस्थानाधिपति रवि असेल तो मनुष्य गाण्याचा शोकी, सत्कर्मी, धनवान् आणि कीर्तिमान् होतो. चंद्र असतां प्रसन्न चित्ताचा, सद्गुणी व विलासी होतो. मंगळ असतां सुवर्ण, रौप्य, प्रवाळ इत्यादि वस्तूंचा संग्रह करणारा, अधिकारी व राजमान्य होतो. बुध असतां विद्याभ्यासंगी, भोगासक्त, सुशील व बलवान् असतो. लाभस्थानीं किंवा लाभेश गुरु असतां तो मनुष्य सामर्थ्यवान्, संपत्तियुक्त, विद्वान् व अधिकारी असतो. शुक्र असतां संगीत व नृत्य आवडणारा, व धर्मश्रद्धावान् होतो. शनि असतां काळ्या रंगाच्या वस्तु, घोडे व वाहनें यांची आवड व कायद्याचें ज्ञान असतें. राहु असतां चतुष्पदांचा लाभ व विजय प्राप्त होतात. केतु असतां नेत्रपीडा व गुह्यरोग होतात व तो मनुष्य खर्चिक असतो.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

१२ व्ययभाव—व्ययस्थानीं शुभग्रह असेल, शुभग्रहाच्या राशीस असेल किंवा शुभग्रहानें दृष्ट असेल अथवा व्ययस्थानाचा स्वामी शत्रुक्षेत्रीं निर्बली किंवा नीचीचा असेल तर तो मनुष्य फार खर्चिक नसतो. व्ययेश शुभ नवांशीं असतां योग्य खर्च करणारा व अशुभ नवांशीं असतां अयोग्य खर्च करणारा होतो. व्ययेश व्ययांत बलवान् असतां धननाश होतो. षष्ठेश किंवा अष्टमेश क्रूर ग्रह असून व्ययस्थानीं असतां किंवा व्ययस्थानीं राहु असतां भूमि व धन यांचा नाश होतो. व्ययेश बुध, गुरु किंवा शुक्र असून व्ययस्थानींच असेल किंवा त्यांची व्ययस्थानावर दृष्टि असेल तर शय्यादि सुखें मिळतात. व्ययस्थानावर भाग्येश पाहील तर मनुष्यास रत्नभूषित मंचकाचें सुख मिळतें. द्वादशस्थानाचा स्वामी लग्नीं असतां मधुर भाषण करणारा, सुंदर परंतु निर्धन असतो. द्वितीयस्थानीं असतां सत्यवक्ता व गुणी, तृतीयस्थानीं असतां आपलपोट्या, चतुर्थांत असतां निर्धन, पंचमांत असतां मंत्री, षष्ठस्थानीं असतां क्रोधी, पापी व संततीपासून दुःख, सप्तमांत असतां स्त्रीचें अल्प सुख, अष्टमांत व नवमांत असतां धार्मिक व तीर्थयात्रा करणारा, दशमांत असतां खाऊन-पिऊन सुखी, एकादशांत असतां अल्प पुत्रसुख, आणि द्वादशांत असतां परस्त्रीरत होईल. द्वादशस्थानीं किंवा द्वादशेश रवि असतां त्या पुरुषाचे नेत्र निस्तेज असून तो पितृविरोधी असतो. चंद्र असतां कुसंगति करणारा व नेत्ररोगी होतो. मंगळ असतां मित्रद्रोही, चौर्ययोग व रोगट असतो. बुध असतां मलिन, ज्ञानहीन परंतु स्वकार्यदक्ष व धूर्त असतो. व्ययस्थानीं गुरु असतां चिंतायुक्त, पापकर्मांकडे प्रवृत्ति व क्रोधयुक्त असतो. शुक्र असतां विषयासक्त, निष्ठुर, विरोधी व सत्यपराङ्मुख असतो. शनि असतां निर्दय, निर्धन, नित्य आळशी व सौख्यरहित असतो. राहु असतां नेत्ररोगी, पायाला विकार व मध्यम प्रतीची नोकरी करणारा असतो. केतु असतां डधळ्या, गुह्यरोगी व आनंदरहित असतो.

ग्रहांचा भाग्योदयकाल.

सूर्यादि सर्व ग्रह स्वगृहीं, उच्चराशीस, मित्रक्षेत्रीं, मूलत्रिकोणीं असून शत्रुक्षेत्रीं नसतील, किंवा ८।१२ या स्थानीं किंवा पापग्रहानें दृष्ट नसतील, तर पुढें लिहि-ल्याप्रमाणें त्या त्या ग्रहांचा मनुष्याच्या वयाच्या त्या त्या वर्षीं भाग्योदय होतो. जसें, रवीमुळें २२ वे वर्षापासून, चंद्रामुळें २४ वे वर्षापासून, मंगळामुळें २८ वे वर्षापासून, बुधामुळें ३२ व्या वर्षापासून, गुरूमुळें १६ व्या वर्षापासून, शुक्रामुळें २४ व्या वर्षापासून व शनीमुळें ३० वे वर्षापासून मनुष्याचा भाग्योदय होतो.

मेषादिलग्नीं शुभाशुभ ग्रह.

अमक्या लग्नीं अमुक ग्रह शुभ व अमुक अशुभ असें जरी पुढें लिहिलें आहे, तरी ग्रहांची स्थिति पाहून शुभाशुभ फलें सांगावीं. मेषलग्नीं जन्म असतां लग्नीं

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

बुध, शुक्र व शनि हे अनिष्ट असतात; कारण बुध हा षष्ठेश, शुक्र मारकेश व शनि लाभेश असतो. रवि व गुरु हे त्रिकोणाधिपति अतएव शुभ होत. परंतु व्ययेशही गुरूच आहे म्हणून गुरूचें स्थान पाहून शुभाशुभ फल ठरवावें. मेष लग्नीं जन्मस्थ रवि, चतुर्थस्थानीं गुरु, सप्तमांत शनि व दशमस्थानीं मंगळ असतां राजयोग होतो. कारण हे चार ग्रह केंद्रीं असून उच्चीचे असतात. वृषभलग्नीं जन्म असतां चंद्र, गुरु व शुक्र हे अशुभ होत. कारण चंद्र हा तृतीयेश म्हणून क्षीणपराक्रमी, गुरु अष्टमेश व तोच लाभेश, आणि शुक्र हा षष्ठेश असतो. भाग्येश तोच दशमेश शनि असल्यामुळें राजयोग करणारा आहे. मिथुनलग्नीं रवि, मंगळ व गुरु हे अनिष्ट होत. कारण रवि हा तृतीयेश, मंगळ षष्ठेश व गुरु हा मारकेश होय. येथें शनि गुरु यांचा योग मारक होय. कारण शनि अष्टमेश व गुरु मारकेश आहे. शुक्र पंचमेश असल्यामुळें शुभ होय. येथें बुधशुक्र एकत्र असतां राजयोग होतो. कारण बुध हा केंद्राधिपति व शुक्र त्रिकोणाधिपति आहे. कर्कलग्नीं जन्म असतां बुध, शुक्र व शनि अशुभ जाणावे. कारण बुध हा तृतीयेश व तोच व्ययेश असतो. शुक्र हा चतुर्थेश व तेथून अष्टमेश म्हणजे लाभेश तोच असतो. शनि हा मारकेश व अष्टमाधिप आहे. पापग्रह केंद्रांत असतां शुभ होत; म्हणून मंगळ शुभ जाणावा. शिवाय मंगळ हा त्रिकोणाचा व दशमाचा स्वामी असल्यामुळें राजयोगाचें फल देणारा आहे. कर्कलग्नीं जन्मस्थ गुरु, चवथा शनि, सातवा मंगळ व दशमांत रवि हा राजयोग होतो. सिंहलग्नीं जन्म असतां बुध, शुक्र हे अनिष्ट फलें देतात. कारण बुध हा मारकेश असून तोच लाभेश आहे. शुक्र हा तृतीयेश असून तृतीयस्थानाचें जें मृत्युस्थान म्हणजे दशमस्थान त्याचाही तोच स्वामी आहे. मंगळ हा फार शुभ आहे. कारण तो केंद्राचा व भाग्याचा अधिपति आहे. कन्यालग्नीं मंगळ व गुरु हे अनिष्ट होत. कारण मंगळ हा तृतीयेश असून तृतीयस्थानाचें जें रिपुस्थान म्हणजे जन्मलग्नाचें मृत्युस्थान त्याचाही तोच स्वामी आहे. गुरु मारकेश आहे. चंद्रही लाभेश असल्यामुळें अनिष्ट होय. बुधशुक्र यांचा योग राजयोग करणारा आहे. कारण बुध दशमेश व शुक्र भाग्याधीश आहे. तूळलग्नीं जन्म असतां रवि, मंगळ व गुरु हे अशुभ होत. कारण रवि हा लाभेश, मंगळ मारकेश, व गुरु हा तृतीयेश असून तोच षष्ठस्थानाचा स्वामी आहे. शनि व बुध हे त्रिकोणाधिपति असल्यामुळें शुभ होत. बुधचंद्रांचा योग राजयोग करणारा आहे. कारण बुध नवमेश व चंद्र दशमेश आहे. तूळलग्नीं जन्मस्थ शनि, चवथा मंगळ, सातवा रवि आणि दहावा गुरु हा राजयोग होतो. वृश्चिकलग्नीं जन्म असतां मंगळ व बुध हे अशुभ होत. कारण मंगळ त्रिकस्थानाचा अधिपति असून लग्नेशही तोच आहे. बुध हा लाभेश आहे, परंतु तोच मृत्युस्थानाचा स्वामी आहे. शनि मध्यम आहे. गुरु व चंद्र हे त्रिकोणाधिपति असल्यामुळें शुभ होत. रविचंद्रयोग हा येथें राजयोग होतो. गुरु शुक्र हे मारकेश आहेत. म्हणून त्यांच्या स्थितीप्रमाणें ते इष्टानिष्ट जाणावे. धनलग्नीं

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

शुक्र अनिष्ट होय. कारण तो लाभेश आहे. परंतु त्रिकस्थानाचा स्वामीही तोच आहे. रवि बुध हे शुभ होत. कारण रवि हा भाग्येश व बुध हा सप्तम व दशम या स्थानांचा स्वामी आहे. येथें रविबुधांचा योग हा राजयोग होतो. मकरलग्नीं चंद्र व गुरु हे अशुभ फल देणारे आहेत. कारण गुरु व्ययेश व चंद्र हा मारकेश आहे. शुक्र हा दशमाचा व त्रिकोणाचा व बुध त्रिकोणाचा अधिपति आहे, म्हणून बुध व शुक्र शुभ होत. मकरलग्नीं जन्म असतां जन्मस्थ मंगल, चवथा रवि, सप्तमांत गुरु व दशमस्थानीं शनि, अशी स्थिति असतां उत्तम राजयोग होतो. कारण हे चारही ग्रह केंद्रीं येऊन उच्चीचे असतात. कुंभलग्नीं गुरु चंद्र हे पापफलें देणारे आहेत. कारण चंद्र हा षष्ठेश व गुरु हा मारकेश आहे. शुक्र त्रिकोणाचा व केंद्राचा स्वामी असल्यामुळें शुभ होय. शुक्रमंगळांचा येथें राजयोग जाणावा. मीनलग्नीं जन्म असतां रवि, शुक्र व शनि हे अनिष्ट फलें देतात. कारण रवि षष्ठेश, शुक्र अष्टमेश व शनि व्ययेश आहे. मंगल नवमेश व गुरु दशमेश असल्यामुळें गुरुमंगळांचा संयोग राजयोग उत्पन्न करणारा आहे. तसेंच चंद्रमंगळ त्रिकोणाधिपति असल्यामुळें शुभ होत. याप्रमाणें द्वादशलग्नीं शुभाशुभ ग्रह जाणावे. सामान्यतः कर्क, सिंह, धन व तूळ ह्या लग्नीं जन्मणारे पुरुष पराक्रमी असतात. कन्या, मकर, वृषभ व वृश्चिक-लग्नीं जन्मणारे कृपण व कपटी असतात. लग्नीं, त्रिकोणांत किंवा दशमांत चंद्र, मंगळ किंवा गुरु असणें हा योग मोठा अधिकार व मोठी संपत्ति प्राप्त करून देणारा आहे. पराक्रमी पुरुषाचे कुंडलींत प्रायः तिसऱ्या किंवा सहाव्या स्थानीं मंगल असतो. पंचमस्थानीं किंवा लाभस्थानीं अनेक ग्रह असतां मनुष्य मुत्सद्दी असतो. कुंडलींतल्या कोणत्याही एका स्थानापासून, विशेषतः धनस्थानापासून, पुढील प्रत्येक स्थानीं कोणीतरी ग्रह असणें हा योग मनुष्याला गजान्तलक्ष्मी देणारा आहे. ३।६।११ या स्थानांचे स्वामी शुभग्रह असले तरी अशुभ फलें देतात.

द्विग्रहयोग.

जन्मलग्नकुंडलींत दोन ग्रह एकत्र असतां काय काय फलें उत्पन्न करितात हें आतां सांगतों. ग्रहांपैकीं जे द्विग्रह किंवा त्रिग्रह उच्चीचे, मित्रक्षेत्रीं व स्वगृहीं असतील त्यांचीं फलें नेहमीं चांगलीं असतात. रविचंद्र—कार्यकुशल, कपटी व यंत्रादिकांविषयीं आवड. रविमंगळ—पुरुषार्थी, उद्धट, साहसी व शीघ्रकोपी. रविबुध—प्रियवक्ता, दास्यवृत्ति करणारा, शास्त्रज्ञ व संपत्तिमान्. रविगुरु—मंत्री, संपन्न, चतुर व परोपकारी. रविशुक्र—गायनवादनपटु व शास्त्राभ्यासी. रविशनि—व्यापाराविषयीं प्रेम, गुणज्ञ, श्रद्धावान् व धनसंपन्न. चंद्रमंगळ—कुटिल, पराक्रमी, भांडखोर व मातृपितृविरोध करणारा. चंद्रबुध—वक्ता, सुंदर, दयाळु व नम्र. चंद्रगुरु—अत्यंत कारस्थानी, विद्वान्, निरंतर कार्यांत निमग्न व लोकोपकारी. चंद्रशुक्र—व्यापारांत चतुर, व्यसनी, अत्तरांचा शोकी. चंद्रशनि—अनेक स्त्रियांशीं संभोग करणारा,

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

दुर्वर्तनी, धोरणी व आळशी. मंगळबुध–व्यापारी, वैद्यकी करणारा, अनेक स्त्रियांची इच्छा करणारा. मंगळगुरु–मंत्रशास्त्रार्थज्ञ, कुशल व गांवांत श्रेष्ठ. मंगळशुक्र–स्त्रियांचा शोकी, सोडती व जुगार यांची आवड, गर्विष्ठ व सर्वांशीं विरोध करणारा. मंगळशनि–भांडखोर, अन्यायानें द्रव्य मिळविणारा व सुखरहित. बुधगुरु–संगीतज्ञ, नीतिमान्, प्रसन्नचित्त व उदार. बुधशुक्र–विवेकी, गुणी, कुटुंबपालक व बोलका. बुधशनि–चंचलवृत्ति, भांडखोर व दयाळु. गुरुशुक्र–विद्वान् व सर्वप्रकारें सुखी. गुरुशनि–शूर, संपत्तियुक्त, यशस्वी व गांवांत श्रेष्ठ. शुक्रशनि–कलाकुशल व मल्ल.

त्रिग्रहयोग.

रविचंद्रमंगळ–शूर, पापी, यंत्रविद्येंत कुशल. रविचंद्रबुध–धीट, तेजस्वी, मुत्सद्दी. रविचंद्रगुरु–सुबुद्ध, क्रोधी, मायावी, प्रवासी. रविचंद्रशुक्र–परधनाभिलापी, शास्त्रनिपुण. रविचंद्रशनि–कलहप्रिय, निर्धन, परतंत्री. रविमंगळबुध–धनपुत्रहीन, निष्ठुर, साहसी, मल्ल. रविमंगळगुरु–वक्ता, सत्यभाषणी, राजमंत्री. रविमंगळशुक्र–नेत्ररोगी, कुलीन, सुदैवी. रविमंगळशनि–निर्धन, रोगी, अविचारी, विकलांग. रविबुधगुरु–श्रीमंत, नेत्ररोगी, काव्यज्ञ, कुशल. रविबुधशुक्र–प्रवासी, वाचाळ, स्त्रीसंबंधीं त्रास. रविबुधशनि–दैवहीन, सर्वांकडून जित व त्यक्त. रविगुरुशुक्र–राजमंत्री, शूर, प्राज्ञ, द्रव्यहीन. रविगुरुशनि–पूज्य, स्वजनत्यक्त, निर्भय, स्त्रीपुत्रमित्र यांपासून सुखी. रविशुक्रशनि–दुराचारी, विकलांग, शत्रुभयत्रस्त. चंद्रमंगळबुध–नीचवृत्ति, मित्रहीन. चंद्रमंगळगुरु–स्त्रीलंपट, चौर्यवृत्ति. चंद्रमंगळशुक्र–स्त्रीसुख व मातृसुख बेताचें, प्रवासी. चंद्रमंगळशनि–तारुण्यापूर्वीं मातृनाश, स्वभाव तिरसट, लोकांना अप्रिय. चंद्रबुधगुरु–धनपुत्रकीर्तिवान्, तेजस्वी. चंद्रबुधशुक्र–विद्वान्, नीचवृत्ति, सौम्य स्वभाव, फाजील धनलोभ. चंद्रबुधशनि–प्राज्ञ, पूज्य, स्वतंत्र व अस्वस्थ. चंद्रगुरुशुक्र–प्राज्ञ, कलाकुशल, बहुश्रुत, सदाचरणी व सुशील माता. चंद्रगुरुशनि–शास्त्रज्ञ, निरोगी, ग्रामाध्यक्ष. चंद्रशुक्रशनि–लेखक, भाग्यवान्. मंगळबुधगुरु–कवि, धनाढ्य, सुशील पत्नी. मंगळबुधशुक्र–विकृतांग, दुष्ट, उत्साही. मंगळबुधशनि–चाकर, प्रवासी, मुखरोगी. मंगळगुरुशुक्र–राजप्रिय, सुविद्य पुत्र, स्त्रीपासून सुखी, जनांना आनंद देणारा. मंगळगुरुशनि–निर्दय, नीचवृत्ति, लोकांपासून अनादर. मंगळशुक्रशनि–सुखहीन, प्रवासी. बुधगुरुशुक्र–सत्पुत्रवान्, सुदैवी, सत्कीर्तिवान्, सदाचरणी. बुधगुरुशनि–धन व ऐश्वर्ययुक्त, प्राज्ञ, साधुवृत्ति. बुधशुक्रशनि–धूर्त, अनृतवादी, कुशल, स्वदेशभक्त. गुरुशुक्रशनि–कीर्तिमान्, सुशील, धनसंपन्न.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

राजयोग किंवा श्रीमंतीचे योग.

राजयोग अनेक आहेत. परंतु स्थलसंकोचास्तव सर्व देतां येत नाहींत, तथापि कांहीं देतों. सूर्य, मंगळ, गुरु व शनि हे ग्रह केंद्रांत उच्चीचे असतां उत्तमोत्तम राजयोग होतो. यांत चंद्र मात्र कर्कराशीचा असावा. शनि, सूर्य, मंगळ हे तीन ग्रह उच्चीचे असतां व चंद्र कर्केचा असतांही राजयोग होतो. एक दोन ग्रह उच्चीचे असतां मनुष्य राजमंत्री होतो. लग्न जर लग्नस्वामीच्या नवांशांत असेल, किंवा कर्कराशीचा चंद्र कर्कांच्या नवांशांत असेल, अथवा चंद्राशिवाय आणखी ४।५।६ ग्रह लग्नाला पाहत असतील तरीही राजयोग होतो. कुंभलग्न असून लग्नांत शनि, मेषलग्न असून लग्नीं मंगळ, आणि वृषभलग्न असून तेथें चंद्र असतां, किंवा मिथुनास बुध, सिंहराशीस गुरु व वृश्चिकास मंगळ असतां मनुष्य धनाढ्य होतो; किंवा न्यायाधीशासारखा अधिकारी होतो. लग्नीं तूळेचा शनि, वृषभलग्नीं वृषभेचा चंद्र, कन्याराशीस बुध व सूर्य, तूळराशीस मंगळ, मेषराशीस गुरु व कर्कास शुक्र असतांही मनुष्य सत्ताधीश व श्रीमंत होतो. मकर लग्न असून लग्नीं शनि, मंगळ, किंवा कुंभलग्नीं शनि असेल व चंद्रसूर्य धनराशीस असतां मनुष्य मुनसफ, वकील किंवा कारभारी होतो. मंगळ किंवा शनि उच्चीचे असून चंद्रानें युक्त असतील, व पंचमांत व सप्तमांत धनुराशीचा गुरु व लग्नीं उच्चीचा सूर्य असतां मनुष्य फारच पराक्रमी होतो. किंवा राजतुल्य सत्ताधारी होतो. मीनलग्नीं धनुराशीस गुरु, चंद्र, मकरास मंगळ, शुक्र बुध उच्चीचे असतां मनुष्य कारभारी होतो. किंवा मीनलग्नीं चंद्र, शनि कुंभराशीचा, मंगळ मकरेचा, सिंहेस सूर्य असतांही सत्ताधीश व संपत्तिमान् होतो. तसेंच फळ, मेषलग्नीं मंगळ, कर्केचा गुरु, किंवा कर्कलग्नीं गुरु व तृतीयस्थानीं मंगळ असतांही प्राप्त होतें. लग्नीं चंद्र, मंगळ, गुरु, किंवा बुध स्वक्षेत्रींचे, शनि उच्चीचा, शुभग्रह केंद्रीं असून स्वक्षेत्रींचे, सूर्य स्वक्षेत्रींचा किंवा उच्चीचा पंचमांत असणें, तसेंच नवमांत, दशमांत व एकादशांत शुभग्रह स्वगृहींचे असणें हे भाग्यसूचक योग आहेत. तूळलग्न किंवा तूळराशीचा चंद्र भाग्यदर्शक आहे. सिंहलग्नही तसेंच विक्रमशाली आहे. कन्यालग्नीं बुध, त्याच्या चतुर्थांत शनि, गुरु, चंद्र, पंचमांत शनि, मंगळ असणें हा योग भाग्याचा आहे. मकरलग्नीं शनि त्याच्या तृतीयांत चंद्र, व षष्ठांत बलवान् मंगळ दशमांत रवि, शुक्र हे योग सौख्यदर्शक आहेत. मीनलग्नीं चंद्र, पंचमांत व एकादशांत मंगळ किंवा सिंहलग्नीं जन्म असून तृतीयांत बलिष्ठ शनि, मंगळ, पंचमांत गुरु, द्वितीयस्थानीं राहु, नवमांत रवि, दशमांत शुक्र, चंद्र हे योग मनुष्याला श्रीमंत व सुखी करणारे आहेत. राजयोगाचीं लक्षणें अनेक आहेत, तीं सर्व स्थलसंकोचास्तव येथें ग्रथित करितां येत नाहींत. तथापि लग्नाधिपति, राशीचा स्वामी व चंद्र, सूर्य हे पापग्रहांमध्यें किंवा शत्रुक्षेत्रीं व पापग्रहानें युक्त अथवा दृष्ट नसावे. कोणताही पापग्रह नीचीचा नसावा. व एक ग्रह तरी उच्चीचा असावा म्हणजे जन्मसाफल्य होतें.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

निर्धनयोग.

केंद्रीं किंवा त्रिकोणांत शुभग्रह नसतील किंवा ३।६।१०।११ या स्थानांशिवाय अन्यस्थानीं पापग्रह असतील तर द्रव्याची नेहमीं न्यूनता असते. एकही ग्रह कुंडलींत उच्चीचा, मूलत्रिकोणांत, स्वगृहीं किंवा मित्रक्षेत्रीं नसतां तो दारिद्र्ययोग जाणावा. दोन किंवा तीन ग्रह नीचीचे, किंवा सर्व ग्रह मेष, कर्क, तूळ किंवा मकर या चर राशींस असतां, किंवा केंद्रीं पापग्रह असतां किंवा मंगळ ३।१० या स्थानीं नसेल तर तो निर्धनयोग समजावा. ओळीनें सारखे दोन किंवा तीन राशींना (राहुकेतूं-शिवाय) सर्वच ग्रह असतील तर, किंवा केंद्रांत सर्वच पापग्रह, अथवा वृषभ किंवा मकर राशींशिवाय इतर राशींना असलेले चंद्र-मंगळ परस्पर दृष्ट असतील तर तो मनुष्य द्रव्यहीन असतो. धनस्थानीं एकटा शनि असेल किंवा व्ययस्थानीं नीचीचे शनि-रवि असतील तर द्रव्य असून नाहींसें होतें.

बंधनयोग.

२।१२।५।६।९ या स्थानांतून कोणत्याही एका स्थानीं पापग्रह असतां बंधनयोग म्हणजे कारागृहवास घडतो. २ स्थानीं राहुशुक्रयोग, द्वादशांत किंवा षष्ठांत रवि-मंगळशनि, सप्तमांत शनि हे सर्व बंधनयोग आहेत. शुक्र नीचीचा असतां अपराध घडून देखील बंधनयोग बहुधा होत नाहीं.

वैराग्ययोग.

दशमाधिपतीनें युक्त दशमांत बुधानें दृष्ट शनि, किंवा चंद्रबुध (जर शनीनें दृष्ट) असतील तर, अथवा मेष, धनु किंवा मीन राशीस १२ व ८ ह्या स्थानीं केतु असतां मनुष्य विरक्त होतो. उच्च किंवा स्वगृहींचा बलिष्ठ गुरु केंद्रांत, त्रिकोणांत किंवा ६।८।११।१२ या स्थानीं असतां मनुष्य वेदान्ती किंवा ब्रह्मज्ञानी होतो.

नीचकर्मयोग.

षष्ठांत बुधमंगळ, मकरराशीस मंगळ व सप्तमांत शनि, लग्नीं नीचग्रह, लग्नेश नीचीचा व पापग्रहांनीं युक्त किंवा दृष्ट, अथवा व्ययांत असतां किंवा तृतीयस्थानचा स्वामी नीच असतां मनुष्य लांचखाऊ होतो. व अन्यायाच्या व चोरीच्या नीच मार्गानें द्रव्य संपादन करितो. कुंडलींत दोहोंहून अधिक नीच ग्रह असतां, विशेषतः पापग्रह नीचीचे असतां मनुष्याला नीचबुद्धि किंवा नीच संगति प्राप्त होते.

व्यभिचारयोग.

सप्तमांत मंगळ असून शुक्रानें दृष्ट असेल, किंवा शुक्रमंगळांची युति असेल, सप्तमांत किंवा द्वितीयांत पापग्रहांनीं युक्त किंवा दृष्ट शुक्र असेल, सप्तमांत नीचीचे

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

शनि, मंगळ, राहु किंवा केतु असतां, अथवा सप्तमेश शनि असतां किंवा तो शत्रु-गृहीं किंवा पापग्रहानें युक्त किंवा दृष्ट असतां मनुष्य व्यभिचारी होतो. तथापि केंद्रांत, त्रिकोणांत व द्वितीयांत शुभग्रह किंवा चंद्र-गुरु असून पापग्रहानें दृष्ट नसतील तर मनुष्य सात्विक होतो.

अनफा सुनफा व दुरुधर योग.

अनफा—लग्नकुंडलींत चंद्र ज्या स्थानीं असेल त्याच्या मागील गृहांत म्हणजे चंद्राच्या द्वादशस्थानीं रवीवांचून कोणताही ग्रह असतां अनफा योग होतो. अनफा योग असतां मनुष्य धनाढ्य, सुखी, कीर्तिमान् व सुप्रसिद्ध होतो.

सुनफा—चंद्राच्या पुढील गृहांत, म्हणजे द्वितीयस्थानीं रवीवांचून कोणताही ग्रह असतां सुनफा योग होतो. सुनफा योगामुळें मनुष्य राजश्रीनें विराजित, ऐश्वर्यवान्, सर्व साधनांनीं संपन्न आणि पराक्रमी होतो.

दुरुधर—चंद्राच्या द्वितीय व द्वादशस्थानीं सूर्यावांचून कोणीही ग्रह असतां दुरुधर योग होतो. या योगावर जन्म झाला असतां मनुष्य धन, धान्य, पशु, दास, दासी यांनीं संपन्न होऊन त्याला वडिलोपार्जित मिळकत प्राप्त होते.

नाभसयोग.

सारावली किंवा बृहज्जातक ग्रंथांत नाभसयोग पुष्कळच सांगितलेले आहेत. त्यांपैकीं मुख्यमुख्य येथें सांगतों. पुढें लिहिलेल्या सर्व योगांना नाभसयोग अशी संज्ञा आहे. हे योग कांहीं शुभ व कांहीं अशुभ असतात.

१ लग्न व सप्तम या दोन स्थानीं सर्व ग्रह असतील तर शकटयोग होतो. याचें फळ मनुष्य गाडीभाड्यावर उपजीवन करणारा असून रोगी असतो. त्याची स्त्री मानी, आंतल्या गांठीची, कृश व कृपण असते, व त्याला पोटदुखीचा विकार असतो.

२ जवळजवळच्या केंद्रांत म्हणजे लग्न आणि चतुर्थ, किंवा पुढील केंद्रस्थानीं म्ह० चतुर्थ आणि दशम किंवा सप्तम व दशम या चारही स्थानीं सर्व ग्रह असतां गदायोग होतो. याचें फळ मनुष्य यज्ञकर्ता, धनवान् परंतु द्रव्यलोभी होतो.

३ लग्नांत व त्रिकोणांत (५।९) अशा तीन स्थानींच सर्व ग्रह असतील तर शृंगाटक योग होतो. याचें फल मनुष्य निरंतर सुखी आणि वृद्धावस्थेंत फारच सुखी होतो. स्वभाव उदार व परोपकारी असतो.

४ चतुर्थ व दशम या दोन स्थानीं सर्व ग्रह असतां विहंगम योग होतो. याचें फळ वकिली, दलाली व कलह करणें असें असून वृत्ति निष्ठुर असते.

५ लग्नावांचून कोणत्याही एका स्थानीं व त्या स्थानापासून ९।५ या स्थानीं सर्व ग्रह असतां हलयोग होतो. याचें फळ शेतकी बगीचा इत्यादि कामें करणें.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

६ लग्न व पुढील तीन घरें यांत सर्व ग्रह असतां यूपयोग होतो. याचें फळ मनुष्य दाता, धार्मिक, वेदान्ती, कृतज्ञ, सहनशील व प्रबुद्ध असतो.

७ चतुर्थस्थानापासून सप्तमस्थानापर्यंत सर्व ग्रह असतां शरयोग होतो. या योगामुळें मनुष्य हीनवृत्ति, निर्धन व सुखहीन असतो.

८ दशम व त्यापुढील तीन स्थानें यांत सर्व ग्रह असतां दंडयोग होतो. या योगामुळें मनुष्य प्रियजनहीन व नीचवृत्ति करणारा होतो.

९ लग्नापासून सप्तमस्थानापर्यंत सर्व ग्रह असतां नौकायोग होतो. या योगामुळें मनुष्य कीर्तिमान्, कृपण व अस्थिरसुखी होतो.

१० चतुर्थ व त्यापुढील सहा स्थानें यांमध्यें सर्व ग्रह असतां कूट योग होतो. या योगानें मनुष्य असत्यभाषणी होतो व बंधन पावतो.

११ सप्तम व पुढील सहा स्थानीं सर्व ग्रह असतां छत्र योग होतो. हा योग मनुष्याला वृद्धपणीं सुखी करतो व त्यापासून स्वजनही सुखी होतात.

१२ दशम व पुढील सहा स्थानीं सर्व ग्रह असतां चापयोग घडून त्या मनुष्याला तारुण्यांत सुख होऊन वृद्धपणीं एका स्त्रीसुखाशिवाय इतर सर्व सुख मिळतें.

१३ समराशीलाच सर्व ग्रह असतील तर समुद्रयोग होतो, किंवा विषमराशीलाच सर्व ग्रह असतील तर चक्रयोग होतो. हे दोन्ही योग मनुष्याला राजाप्रमाणें ऐश्वर्य देणारे आहेत. त्यांमध्यें एकादा ग्रह तरी उच्चीचा असावा.

१४ सातही ग्रह अनुक्रमानें सात स्थानांमध्यें असतां मालायोग किंवा वीणायोग होतो. सातही ग्रह सहा स्थानांमध्यें असतां दामिनी योग, पांच स्थानांमध्यें असतां पाशयोग होतो, आणि चार स्थानांमध्यें असतां केदारयोग होतो. हे योग मनुष्याला वैभव, यश, परोपकारबुद्धि इत्यादि शुभफलें देणारे आहेत.

१५ सातही ग्रह तीन स्थानांत असतां शूलयोग, दोन स्थानांत असतां युगयोग व एकत्र सात ग्रह असतां गोलयोग होतो. हे सर्व योग अशुभ आहेत.

१६ चारही केंद्रांत सर्व ग्रह असतां कमलयोग होतो. या योगानें मनुष्य गुणवान्, विख्यात, कुशल, हंसतमुख व श्रीमंत होतो.

१७ केवळ पणफर (२।५।८।११) व केवळ आपोक्लिम (३।६।९।१२) या स्थानीं सर्व ग्रह असतां मनुष्याला सुखदुःख समान होतें.

१८ द्वितीय स्थानापासून अष्टमस्थानापर्यंत सर्व ग्रह असतां अर्धचंद्र योग होतो. या योगानें मनुष्य व्यवहारज्ञ व बहुजनांस मान्य होतो.

१९ लग्नीं शनि किंवा चंद्र, तृतीयांत उच्चीचा शनि किंवा तेथेंच मंगळ असतां, नवम आणि पंचम स्थानीं स्वक्षेत्रींचा गुरु, मीन लग्नीं गुरु किंवा शुक्र, मेषास सूर्य व मकरास मंगळ असतां मनुष्य लक्षाधीश होतो. किंबहुना राजासारखा वैभवसंपन्न होतो, व गोब्राह्मणांना पूज्य मानितो.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

स्त्रीजातक.

स्थलसंकोचास्तव येथें समग्र स्त्रीजातकाविषयीं लिहितां येत नाहीं; म्हणून स्त्रियांना विशेष इष्टानिष्ट योग कोणते इतकेंच मात्र येथें सांगतों. ज्या स्त्रीच्या सप्तमस्थानीं एकाहून अधिक शुभग्रह किंवा शुभग्रहांची दृष्टि असेल, तिचा पति श्रीमंत होईल. एकच शुभग्रह किंवा शुभग्रहाची तेथें दृष्टि असतां ती स्त्री पतीवर प्रेम करणारी होईल. सप्तमांत दोन किंवा अधिक पापग्रह किंवा त्यांची दृष्टि असतां ती स्त्री पतीला क्लेशदायक होते. सप्तमस्थानीं शनि, मंगळ, राहु किंवा नीचीचा एकादा पापग्रह असणें हा योग स्त्रियांना अनिष्टकारक आहे. सप्तमस्थानीं किंवा सिंहराशीस शनियुक्त मंगळ असणें हाही योग तसाच अनिष्ट आहे. जिच्या षष्ठ किंवा अष्टमस्थानीं चंद्र किंवा चंद्राची दृष्टि असते, तिचा विवाहयोग जमतांना फार प्रयास पडतात. ज्या स्त्रीच्या सप्तमांत उच्चीचा किंवा बलवान् बुध, गुरु किंवा शुक्र असेल ती पतिप्रिय होऊन पतीचें वैभव वृद्धिंगत करील. जन्मलग्नापासून किंवा चंद्रापासून २।७।१२ ह्या स्थानीं पापग्रह असणें हा योग स्त्रियांना निंद्य आहे. अष्टमस्थानीं गुरु शुक्र असतां ती मृतप्रजायुक्त व पापग्रह असतां पतिसुखहीन होईल. जन्मकाळीं अष्टम किंवा द्वादशस्थानीं पापग्रहयुक्त मंगळ व लग्नीं राहु, केतु किंवा सप्तमेश अष्टमस्थानीं व अष्टमेश सप्तमस्थानीं असतां ती कन्या जन्मभर दुःखी होईल. जिच्या सप्तमस्थानीं उच्चीचा मंगळ, बुध किंवा गुरु असेल ती अत्यंत लावण्यवती दिसेल. मंगळ व गुरु हे उच्चीचे किंवा पूर्णांशयुक्त स्वगृहींचे असतील, किंवा चतुर्थस्थानीं शुक्र किंवा बुधयुक्त शुक्र असेल तर ती स्त्री अत्यंत संपन्न अशा वराला वरील. लग्नीं चंद्र, बुध किंवा शुक्र असतां कन्येला सुखसौभाग्य प्राप्त होतें. तात्पर्य, लग्नीं, सप्तम व अष्टमस्थानीं स्त्रियांना पापग्रह नसावे; किंवा तेथें पापग्रहांची दृष्टि नसावी. तसेंच, पंचमस्थान शुभग्रहांनीं युक्त किंवा दृष्ट असावें. आतां विषकन्यायोग सांगतों. रविवारीं किंवा शनिवारीं द्वितीया तिथि व आश्लेषा नक्षत्र असणें, शनिवारीं सप्तमी तिथि व कृत्तिका नक्षत्र असणें, मंगळवारीं सप्तमी किंवा द्वादशी तिथि व शततारका नक्षत्र असणें, अथवा रविवारीं विशाखा नक्षत्र द्वादशीयुक्त असणें, अशा योगांवर ज्या कन्येचा जन्म होईल तिला विषकन्या म्हणावी. तसेंच लग्नीं शनि, पंचमस्थानीं रवि व नवमस्थानीं मंगळ असे ग्रह असतां किंवा लग्नीं एक पापग्रह व तेथेंच दोन शत्रुक्षेत्रींचे शुभग्रह असा योग असतां ती विषकन्या जाणावी. विषकन्या योग असतां ती स्त्री शोकसंतप्त, मृतसंततिवान् व भाग्यहीन होते असें मानिलेलें आहे. परंतु याला एक अपवाद आहे तो असा कीं, जन्मलग्नापासून किंवा जेथें चंद्र असेल त्या स्थानापासून सप्तमस्थानाचा स्वामी शुभग्रह असून सप्तमांत असेल किंवा स्वक्षेत्रींच असेल तर विषकन्यादोष, अनपत्यत्व किंवा

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

वैधव्यदोष या सर्वांचा तो परिहार करितो. जिचें जन्मलग्न समराशी असून तेथें बलिष्ठ चंद्र, बुध, गुरु व शुक्र हे ग्रह असतील ती स्त्री अत्यंत श्रद्धावान् व ब्रह्मज्ञानी होईल. हेच ग्रह कर्कलग्नीं असतील तर ती स्त्री निश्चयानें ब्रह्मवादिनी होईल. जिच्या सप्तमस्थानीं शुक्र असेल किंवा कर्कराशीचा मंगळ असेल किंवा शुक्र मंगळ हे परस्परांच्या अंशांत असतील, किंवा लग्नस्वामी शनि किंवा मंगळ असेल, किंवा लग्न अथवा चंद्र पापग्रहांच्या कर्तरींत असेल, किंवा लग्नेश व सप्तमेश हे पापवर्गांचे असतील, तर ती स्त्री अवश्य कुमार्गगामी होईल. ज्या स्त्रीला चतुर्थस्थानीं रवि किंवा शनि असतो, तिला दूध कमी असतें, व चंद्र किंवा बुध असतां पीनस्तन असतात. २।५।७।८ या स्थानीं पापग्रहाची दृष्टि नसावी.

ग्रहांच्या दशांचीं फलें.

सूर्याच्या दशेमध्यें प्रवास, बंधुयोग, उद्विग्नता, रोगभय व संचित धनाचा नाश होतो. चंद्राच्या दशेंत ऐश्वर्यलाभ, शत्रूचा नाश, बलाची वृद्धि आणि विविधभोगसौख्य प्राप्त होतें. मंगळाच्या दशेंत ज्वरभय, चिंता, कष्ट, अग्नीपासून पीडा, द्रव्यव्यय इत्यादि प्रकार घडतात. राहूच्या दशेंत दैन्य, चिंता, कष्ट व बंधन हीं प्राप्त होतात. गुरूच्या दशेंत स्थिरचित्तवृत्ति, धर्मश्रद्धा, सुसंगति, शास्त्राध्ययन, आरोग्य व धनधान्यसमृद्धि होते. शनीच्या दशेंत मिथ्यापवाद, आप्तइष्टांशीं कलह व धननाश होतो. बुधाच्या दशेंत सुंदरस्त्री, सौख्य, विलासभोग, धनप्राप्ति व ईश्वरध्यान घडतें. केतूच्या दशेंत स्त्रीवियोग, द्रव्यहानि, प्रवास व शरीरकष्ट होतात. शुक्राच्या दशेंत अधिकाराची प्राप्ति, धनसमृद्धि, पुत्रपौत्र व शरीरसौख्य हीं मिळतात. महादशा व अंतर्दशा यांचीं फलें सारखींच शुभाशुभ जाणावीं. कोणत्याही ग्रहाच्या महादशेंत त्याच्या शत्रुग्रहाची अंतर्दशा अनिष्ट फल देणारी असते.

लग्नकुंडलीवरून जन्मकाल सांगणें.

कुंडली पाहिल्याबरोबर गणिताच्या सहाय्यानें जन्मकालाचें अनुमान करितां येतें. ही गोष्ट फारशी कठीण आहे असें नाहीं. पुष्कळ लोक हें सहज सांगूं शकतात. परंतु ज्यांस तें सांगतां येत नाहीं त्यांच्यासाठीं पुढील माहिती देतों. जन्मकाल दिवसा आहे कीं रात्रीं आहे हें प्रथम ठरवावें. ही गोष्ट रवीवरून ठरवितां येते. ती रीति स्पष्ट करून येथें सांगतों.

सूर्याच्च लग्नं यदि षड्गृहान्तरे भवेत्तदा जन्म दिवा वदेद्बुधः ।
स्यात्सप्तमे यस्य च तस्य सायं तदन्यथा चेज्जननं निशायाम् ॥ ३५ ॥

लग्नकुंडलींत रवीपासून सहा घरांच्या आंत जन्मलग्न असेल तर दिवसा जन्म सांगावा. सप्तमस्थानीं असतां सायंकाळीं आणि सातव्या स्थानापासून बारा स्थानांपर्यंत जन्मलग्न असतां रात्रीचा जन्म सांगावा. हेंच अधिक स्पष्ट करून सांगतों.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कुंडलीच्या दशमस्थानांत मध्यान्हीं सूर्य असतो व चतुर्थस्थानांत मध्यरात्रीं पाताळांत असतो, हें पूर्वीं सांगितलेंच आहे. त्याच मानानें कुंडलीच्या प्रथमस्थानीं उजाडतांना रवि असेल, व सप्तमस्थानीं सूर्यास्तसमयीं असेल हें उघड आहे. ह्यावरून प्रथमस्थानीं सूर्य असतां सूर्योदयाचे सुमारास, द्वादशस्थानीं असतां सकाळीं आठाचे सुमारास, एकादशस्थानीं असतां दहाचे सुमारास, दशमस्थानीं असतां मध्यान्हाचे सुमारास, नवमस्थानीं असतां दुपारीं दोनचे सुमारास, अष्टमस्थानीं असतां चारचे सुमारास, सप्तमस्थानीं असतां सूर्यास्ताचे सुमारास, षष्ठस्थानीं असतां रात्रीं आठचे सुमारास, पंचमस्थानीं असतां रात्रीं दहाचे सुमारास, चतुर्थस्थानीं असतां मध्यरात्रीचे सुमारास, तृतीयस्थानीं असतां पहांटे दोनचे सुमारास व द्वितीयस्थानीं रवि असतां पहांटे चारच्या सुमारास जन्म सांगावा. परंतु हें स्थूलमान आहे एवढें मात्र ध्यानांत ठेवावें. तथापि या नियमानुरूप फार अंतर पडत नाहीं.

यत्र भानुः स्थितस्तत्र सार्धे द्वे तिथि गण्यते ।
चंद्रो यावत्समाख्यातं तिथिज्ञानं मनीषिभिः ॥ ३६ ॥

आतां जन्मतिथि कशी काढावी हें सांगतों. अमावास्येस चंद्र सूर्य एकत्र असतात व सूर्यापुढें चंद्र जात असतो हें पूर्वीं सांगितलेंच आहे. तसेंच, एका राशीस चंद्र सुमारें २॥ दिवस म्हणजे सुमारें २॥ तिथि असतो हेंही मागें सांगितलेंच आहे. म्हणून सूर्य व चंद्र यांच्यांत जितकीं स्थानें अंतर असेल त्याच्या सुमारें २॥ पट तिथि जन्मकाळीं होऊन गेल्या असल्या पाहिजेत हें स्पष्ट आहे. चंद्र सूर्य एकत्र असतील तर अमावास्येच्या सुमारास जन्मतिथि सांगावी. याप्रमाणें जन्मतिथि काढावी.

पक्ष—यत्र राशौ भवेत्सूर्यस्तस्मात्सप्तग्रहान्तरे ।
चंद्रे शुक्लो भवेत्पक्षश्चान्यथा कृष्णपक्षकः ॥ ३७ ॥

सूर्यापासून पुढें सहा राशी म्हणजे सातव्या राशीवर पौर्णिमेस चंद्र असतो. म्हणून कुंडलींत सूर्यापासून सातव्या स्थानाच्या आंत चंद्र असतां शुक्लपक्षांत व त्याच्यापुढें असतां कृष्णपक्षांत जन्म सांगावा.

महिना—आतां महिना कसा काढावा हें सांगतों.

वैशाखे स्थाप्यते मेषो यावद्भानुश्च गण्यते ।
तावन्मासे भवेज्जन्म गर्गस्य वचनं यथा ॥ ३८ ॥

मेष राशीला सूर्य असतां वैशाख जन्ममास सांगावा. वृषभ राशीला असतां ज्येष्ठ, मिथुन राशीला असतां आषाढ, कर्कराशीला असतां श्रावण, सिंह राशीला असतां भाद्रपद, कन्या राशीला असतां आश्विन, तूळ राशीला असतां कार्तिक, वृश्चिक राशीला असतां मार्गशीर्ष, धनु राशीला असतां पौष, मकर राशीला असतां माघ, कुंभ राशीला असतां फाल्गुन, व मीनराशीला असतां चैत्र जन्ममास आहे असें जाणावें. अधिकमास आला असतां यामध्यें प्रायः ११।१२ दिवसांचा फरक पडतो. अशा वेळीं पुढील महिना सांगावा. येथें कोणी अमांत मास घेतात.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

जन्मशक काढण्याची रीति.

यस्मिन् राशौ भवेत्सौरिस्तस्मात्साधें च चंद्रमाः ।
शनिर्यावद्भवेद्वर्षं तथेज्याश्रितराशितः ॥ ३९ ॥

जन्मकुंडलींत ज्या राशीला शनि असेल, त्या राशीपासून शनीच्या वर्तमान-राशीपर्यंत मोजून त्याची अडीचपट करावी व जी संख्या येईल तितकें वय सांगावें. तसेंच गुरु व राहु ह्यांवरून जन्मशक ठरवावा. गुरूला एका राशींतून दुसऱ्या राशींत जाण्यास सुमारें एक वर्ष व राहूला दीड वर्ष लागतें. ह्याप्रमाणें तीन ग्रहांचा प्रदक्षिणाकाल विचारांत घेऊन व चालू संवत्सराच्या पंचांगांत ते ते ग्रह कोणत्या राशीस आहेत हें पाहून जन्मशक सांगावा. एकाच ग्रहावरून मात्र जन्मशक ठरवूं नये. कारण तसें केल्यानें एकाद्या प्रसंगीं केलेलें अनुमान समूळ चुकण्याचा संभव आहे; म्हणून जन्मशक सांगतांना विशेष धोरण ठेवावें लागतें. ह्याप्रमाणें स्वतःच्या कुंडलीवरून आपली जन्मवेळ प्रथम ठरवावी; म्हणजे वरील रीति चांगली ध्यानांत राहून दुसऱ्याचा जन्मकाळ बिनचूक सांगतां येईल.

गोचरीचे (चालू) ग्रहांचा विचार.

गौरादित्यस्तस्य चारश्चंद्रादेरुपलक्षणात् ।
तत्फलं गोचरफलं ग्रहा यच्छंति जन्मभात् ॥ ४० ॥

गो म्हणजे सूर्य आणि चर म्हणजे संचार. म्हणून सूर्यादि नवग्रहांच्या संचारानें म्हणजे परिभ्रमणानें जें फल मिळतें, त्यास गोचरफल म्हणतात. गोचर या शब्दांत चंद्रादि ग्रहांच्याही उपलक्षणाचा अंतर्भाव होतो. गोचरीचे म्हणजे चालू ग्रह पाहाण्याची पद्धति अशी आहे कीं, आपली जी राशी असेल त्या राशीचा अनुक्रमांक हें प्रथमस्थान धरून चालू पंचांगांतील चालू पंध्रवड्याच्या कुंडलीवरून ग्रह मोजावे. ह्या ग्रहांचीं फलें पंचांगांत शेवटीं दिलेलीं असतात. त्यांत पहिला रवि असतां स्थाननाश म्हणजे गमन, दुसरा रवि असतां भय, इत्यादि लिहिलेलें असतें. कोणता ग्रह कोणत्या स्थानीं शुभफलदायक असतो हें सामान्यतः पुढें लिहिल्याप्रमाणें जाणावें.

गोचरीचे शुभाशुभग्रह.

सूर्यः षट्त्रिदशस्थितस्त्रिदशषट्सप्ताद्यगश्चंद्रमाः
जीवः सप्तनवद्विपंचमगतो वक्रार्कजौ षट्त्रिगौ ॥
सौम्यः षड्द्विचतुर्दशाष्टमगतः सर्वेप्युपान्त्ये शुभाः
शुक्रः सप्तमषड्दशर्क्षसहितः शार्दूलवत् त्रासकृत् ॥ ४१ ॥

जन्मराशीपासून ६।३।१० ह्या स्थानीं सूर्य असतां; ३।१०।६।७।१ ह्या स्थानीं चंद्र

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

असतां; ७।९।२।५ ह्या स्थानीं गुरु असतां; ६।३ ह्या स्थानीं मंगळ व शनि असतां व ६।२।४।१०।८ ह्या स्थानीं बुध असतां शुभफलदायक होय. कोणताही ग्रह जन्मराशीपासून अकराव्या स्थानीं असतां विशेष शुभ जाणावा. शुक्र ७।६।१० ह्या स्थानीं असतां सिंहाप्रमाणें भयजनक होतो, म्हणून तो अशुभ समजावा. त्यावांचून अन्यत्र असतां शुभफलप्रद होतो. ह्याप्रमाणें जरी ग्रहांचीं शुभस्थानें येथें सांगितलीं आहेत, तरी तीं तीं स्थानें पुढें लिहिल्याप्रमाणें दुसऱ्या ग्रहाच्या वेधानें विद्ध नसतील तरच शुभफल देतात असें समजावें. पितापुत्रांचा मात्र परस्परांस वेध नसतो. जसें सूर्याचा पुत्र शनि आणि चंद्राचा पुत्र बुध होय, म्हणून सूर्यशनीचा किंवा चंद्रबुधांचा परस्परांस वेध नाहीं. इतर सर्वांचा वेध परस्परांस होतो.

	शुभस्थान.	वेधस्थान.
रवि	६	१२
	१०	४
	३	९
	११	५
चंद्र	१०	४
	३	९
	११	८
	१	५
	६	१२
	७	२
बुध	८	१
	१०	८
	११	१२
बुध	२	५
	४	३
	६	९
मंगळ शनि राहु केतु	६	९
	११	५
	३	१२
गुरु	५	४
	२	१२
	९	१०
	७	३
	११	८
शुक्र	१	८
	२	७
	३	१
	४	१०
	५	९
	८	५
	९	११
	१२	६
	११	३

स्पष्टीकरण—६ वा रवि शुभस्थानाखालीं लिहून त्याच्या समोर त्याचें वेधस्थान १२ असें लिहिलें आहे. याचा अर्थ असा कीं, जन्मराशीपासून सहावा रवि जरी शुभ आहे, तरी बाराव्या स्थानीं कोणताही ग्रह (अर्थात् शनीवांचून) नसेल तरच तो रवि शुभफल देतो. शनीचा आणि रवीचा पितापुत्रसंबंध असल्यामुळें रवीला शनि कधींही वेधकारक होत नाहीं; म्हणून येथें 'अर्थात् शनीवांचून' असें म्हटलें आहे, तसेंच, वेधस्थानीं एकादा ग्रह असून शुभस्थानींही वेधकारक कोणी ग्रह असतां, वेधस्थानीं अशुभ ग्रह असला तरीही तो शुभ फल देतो. याला वामवेध असें म्हणतात. उदाहरणार्थ, बारावा रवि अशुभ आहे, तरी षष्ठस्थानीं वेधकारक ग्रह असतां तो वामवेधामुळें शुभफल देतो. याचप्रमाणें इतर सर्व ग्रहांविषयीं जाणावें. शुक्लपक्षांत २।५।९ ह्या स्थानीं चंद्र असतां शुभ होय. त्याला वेधस्थानें नाहींत.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ग्रहांचा फलदायक काल.

सूर्यः पंचदिनं शशी त्रिघटिकां भौमोष्ट वै वासरं ।
सप्ताहं ह्युशना बुधश्च सततं मासद्वयं वै गुरुः ॥
षण्मासान् रविजस्तथैव फलदः स्वर्भानु मासद्वयं ।
केतोश्चैव तथा फलं परिमितं ज्ञेयं ग्रहाणां फलम् ॥ ४२ ॥

रवि कोणत्याही राशींत गेल्यावर पहिल्या ५ दिवसांत फळ देतो. चंद्र शेवटच्या ३ घटिका फळ देतो. मंगळ पहिल्या ८ दिवसांत, बुध सर्व काल, गुरु मध्यभागीं दोन महिने, शुक्र मध्यभागीं ७ दिवस, शनि शेवटचे ६ महिने व राहु केतु अंतींचे २ महिने शुभ किंवा अशुभ फळें देतात.

शुभाशुभस्थानीं ग्रहांचें फळ.

स्वोच्चें पूर्णं स्वर्क्षकेऽर्धं सुहृद्भे पादं द्विड्भेऽल्पं शुभं खेचरेंद्रः ।
नीचस्थायी वाऽस्तगो वा न किंचित्पादन्यूनं स्वत्रिकोणे ददाति ॥४३॥

कोणताही ग्रह उच्च राशीस असतां पूर्ण फळ देतो. स्वगृहीं असतां अर्धं फळ देतो. मित्रगृहीं असतां चतुर्थांश फळ देतो. शत्रुगृहीं असतां चतुर्थांशापेक्षांही कमी म्हणजे सामान्यतः अष्टमांश फळ देतो. नीचराशीस किंवा अस्तंगत असतां शून्य फळ देतो. आणि स्वकीय त्रिकोणांत असतां तीनचतुर्थांश फळ देतो.

राहुकेतूंचें फळ.

राहुकेतुफलं सर्वं मंदवत्कथितं बुधैः ।
वेधोऽपि तद्वदेवोह्यो वामवेधस्तथैव च ॥ ४४ ॥

राहु आणि केतु यांचें सर्व फळ शनीप्रमाणेंच समजावें. व त्यांचें दक्षिण व वाम वेधही शनीप्रमाणेंच पहावे.

निर्बली ग्रह.

रिपुखले क्षितियुक् शुभदोऽशुभः शुभहिते क्षितियुङ् न फलप्रदः ।
अरिजितारिगृहास्तगनीचगानृजुगता विपरीतफला ग्रहाः ॥ ४५ ॥

सामान्यतः कोणताही ग्रह शुभस्थानीं असून जर पापग्रहानें युक्त किंवा दृष्ट असेल तर तो निर्बली समजावा. तसेंच, अशुभस्थानीं असलेला ग्रह शुभ ग्रहानें किंवा मित्र ग्रहानें युक्त अथवा दृष्ट असेल तरी तं ही निर्बली होतो. त्याचप्रमाणें शत्रुग्रहानें विद्ध अथवा शत्रूच्या स्थानीं असतां किंवा अस्तंगत, वक्री व आपल्या नीचस्थानीं असतां कोणताही ग्रह निर्बलीच होतो.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

विवलोऽर्कयुतो मंदश्चंद्रयुक्तो बुधस्तथा ।
यादृशेन ग्रहेणेंदुर्युतः सोऽपि तथा विधुः ॥ ४६ ॥

रवियुक्त शनि आणि चंद्रयुक्त बुध असतां निष्फल समजावे. चंद्र बलिष्ठ असून जर निर्बल व पापग्रहानें युक्त असेल तरीही निर्बली होतो.

पुढील राशींचें फल देणारे ग्रह.

आदित्याद्या ग्रहा दद्युर्लग्ने वा गोचरेऽपि वा ।
सप्तविंशति भागोर्ध्वं परराशिफलं खलु ॥ ४७ ॥
ऋक्षसंधिगताः खेटा राशिसंधिगता ग्रहाः ।
एष्यराशेः फलं दद्युर्वक्री तद्विपरीतगम् ॥ ४८ ॥

लग्नीं किंवा गोचरीं असलेले सूर्यादि नवग्रह सत्तावीस अंशांपुढें गेले असतां पुढील राशीचें फल देतात. त्याचप्रमाणें दोन नक्षत्रांच्या अथवा दोन राशींच्या संधींत असलेले ग्रह देखील पुढील राशीचेंच फल देतात, व वक्रीग्रह मागील राशींचें फल देतात. राहूकेतूंची गति नेहमींच उलट असते.

नवग्रहांचीं दानें व धारण करण्याच्या वस्तु.

रौप्यं शुक्रेंद्वोः सुवर्णं बुधस्य मुक्ता प्रोक्ता देवपूज्यस्य तुष्ट्यै ।
लोहं सौरेर्विद्रुमं भौमभान्वोर्लाजावर्तं राहुकेत्वोश्च केचित् ॥ ४९ ॥
माणिक्यमुक्तविद्रुमगारुत्मतपुष्पवज्रनीलानि ।
गोमेदकवैडूर्यं सूर्यादौ धारयेद्दद्यात् ॥ ५० ॥ गीति.

अनिष्टस्थानीं ग्रह असतां प्रत्येक ग्रहानिमित्त दान किंवा धारण करावयाच्या वस्तु नेमलेल्या आहेत, त्या अशा. शुक्र किंवा चंद्र यांना रुपें, बुधाला सुवर्ण, गुरूसाठीं मोतीं, शनीकरितां लोह, मंगळ व रवि यांस पोंवळें, आणि राहु व केतु यांस लसुन, असें कांहीं ऋषींचें मत आहे. अथवा १ सूर्याला माणिक, २ चंद्राला मोतीं, ३ मंगळ–पोंवळें. ४ बुध–पाच, ५ गुरु–पुष्पराग, ६ शुक्र–हिरा, ७ शनि–नील, ८ राहु–गोमेद, ९ केतु–वैडूर्य, याप्रमाणें सूर्यादि अनिष्टग्रहांप्रीत्यर्थ रत्नें धारण किंवा दान करावीं. नवग्रहांच्या दानाचें कोष्टक पुढें दिलें आहे तें पहा.

ग्रहपीडापरिहारार्थ उपाय.

भानुस्तांबूलदानादपहरति नृणां वैकृतं वासरोत्थं
सोमः श्रीखंडदानादवनितनुभवो भोजनात्पुष्पदानात् ।
सौम्यः शक्रस्य मंत्री हरिहरनमनाद्भार्गवः शुभ्रवस्त्रै-
स्तैलस्नानप्रभाते दिनकरतनयो ब्रह्मनत्याऽपरौ च ॥ ५१ ॥

रवि तांबूलदानानें आपल्या वाराची पीडा मनुष्याला करीत नाहीं; त्याचप्रमाणें चंद्र चंदनाच्या दानानें; मंगल अन्नभोजनाच्या दानानें; बुध पुष्पें दान केल्यानें;

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

गुरु विष्णु व शंकर यांना नमस्कार घातल्यानें; शुक्र शुभ्रवस्त्रें दान व धारण केल्यानें; शनि प्रातःकाळीं तेल लावून स्नान केल्यानें; आणि राहुकेतु हे ब्राह्मणांस नित्य वंदन केल्यानें पीडा करीत नाहींत, व त्यामुळें मानसिक व्यथा, हानि व शरीरकष्ट दूर होतात. स्वधर्माचरण केल्यानें ग्रहपीडा सौम्य होतात.

देवब्राह्मणवंदनाद्गुरुवचः संपादनात् प्रत्यहं ।
साधूनामभिभाषणात् श्रुतिरवश्रेयः कथाकर्णनात् ॥
होमादध्वरदर्शनाच्छुचिमनोभावाज्जपाद्दानतो ।
नो कुर्वंति कदाचिदेव पुरुषस्यैवं ग्रहाः पीडनम् ॥ ५२ ॥

देव आणि सच्छील विद्वान् ब्राह्मण यांस नित्य वंदन केल्यानें, गुरूची आज्ञा पालन केल्यानें, सज्जनांशीं भाषण, वेदमंत्र आणि पुण्यपुरुषांच्या कथा श्रवण केल्यानें, ग्रहांप्रीत्यर्थ होम, यज्ञाचें दर्शन, मनाच्या ठिकाणीं पावित्र्य ठेवणें, ग्रहांच्या मंत्रांचा जप, ग्रहांचीं पूर्वोक्त दानें, इत्यादि कर्में निर्विकार अंतःकरणानें केलीं असतां त्या पुरुषाला ग्रह कदापि पीडा करीत नाहींत.

ग्रहेषु विषमस्थेषु शांतिं यत्नात्समाचरेत् ।
हानिवृद्धी ग्रहाधीने तस्मात्पूज्यतमा ग्रहाः ॥ ५३ ॥
होतव्या मधुसर्पिर्भ्यां दध्ना क्षीरेण वा युतः ।
नरो यः कुरुते सम्यक् ग्रहयज्ञं विधानतः ।
ग्रहपीडा जपाद्दानात्तस्य नश्यन्ति निश्चितम् ॥ ५४ ॥
तस्माद्दातुमशक्तो यो दक्षिणां चान्नमेव वा ।
जपैः प्रणामैः स्तोत्रैश्च तर्पणैस्तोषयेद्ग्रहान् ॥ ५५ ॥

अनिष्टस्थानीं ग्रह असतां विधिपूर्वक ग्रहयज्ञ केला म्हणजे सर्व ग्रहपीडा नाश पावतात. लाभ हानि इत्यादि शुभाशुभ सर्व ग्रहांच्या आधीन आहे, म्हणून शांति करून ग्रह अनुकूल करून घ्यावे. शुचिर्भूतपणानें यथासांग ग्रहांचा जप स्वतः केला तर प्राप्तसंकट निवारण होतें. ग्रहयज्ञाप्रीत्यर्थ दक्षिणा देण्यास, किंवा ब्राह्मणभोजन करण्यास जो असमर्थ असेल त्यानें ग्रहमंत्रांचा जप, स्तोत्रपाठ, तर्पण किंवा नमस्कार इत्यादि भक्ति स्वतः करून ग्रह संतुष्ट करावे.

ग्रह कोणत्या पायीं आहे हें पाहणें.

जन्मे रसे रुद्रसुवर्णपादो द्विपंचनंदा रजतः शुभः स्यात् ।
त्रिःसप्तदिक् चेद्यदि ताम्रपादश्चतुर्थमर्काष्टमलोहपादः ॥ ५६ ॥
सौरी लोहः शुभः प्रोक्तो हेमपादश्च वै गुरुः ॥
रजते चंद्रशुक्रौ च बुधश्चान्यत्र ताम्रके ॥ ५७ ॥

ज्या दिवशीं एका राशींतून कोणताही ग्रह दुसऱ्या राशींत जात असेल त्या

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

दिवशीं चंद्र ज्या राशीस असेल त्या चंद्राच्या राशीपर्यंत आपल्या राशीपासून मोजावें आणि जी संख्या येईल त्यावरून पालटणारा ग्रह आपल्याला कोणत्या पायीं आहे हें पाहावें. जसें–आपल्या राशीपासून पहिला, सहावा किंवा अकरावा चंद्र असतां एखादा ग्रह बदलला तर पालटणारा ग्रह आपल्याला सोन्याच्या पायीं आहे असें जाणावें. दुसरा, नववा व पांचवा चंद्र असतां रुप्याचे पायीं, तिसरा, सातवा व दहावा चंद्र असतां तांब्याचे पायीं आणि आपल्या राशीपासून चवथा, आठवा व बारावा चंद्र असतां ग्रह बदलेल तर लोखंडाचे पायानें ग्रह आला असें जाणावें. सामान्यतः रौप्य आणि ताम्रपायानें आलेला ग्रह शुभ, सुवर्णपायीं मध्यम व लोहपायीं आलेला ग्रह कष्टदायक होय. परंतु शनि लोखंडाचे पायीं, गुरु सोन्याचे पायीं, चंद्र, शुक्र, व बुध हे रुप्याचे पायीं आणि रवि, मंगळ व राहुकेतू हे तांब्याचे पायीं आले असतां शुभफलदायक होतात. हा ग्रह पाहण्याचा प्रकार कोणत्याही प्राचीन ज्योतिष ग्रंथांत असेल असें वाटत नाहीं. कारण, वरील पद्यरचनेचा विचार केला तर तीं कोणी अर्वाचीन ज्योतिष्यानें रचलेलीं असावीं असें दिसतें परंतु अशा रीतीनें ग्रह पाहण्याचा कित्येक लोकांचा संप्रदाय आहे. आणि तो सर्वथैव निराधार आहे असेंही म्हणतां येत नाहीं. कारण चंद्रबलाच्या आश्रयानें सर्व ग्रह असतात, ह्या प्राचीन मतानुसार वरील कल्पना अगदीं बरोबर आहे. ह्यासंबंधीं वसिष्ठोक्ति अशी आहे कीं,

(गीति) हिमकरवीर्याद्वीर्यं संश्रित्यैव ग्रहाश्च साधुफलं ।
दधतींद्रियाणि मनसा सहितानि यथा स्वकार्यदक्षाणि ॥ ५८ ॥

जशीं सर्व इंद्रियें मनाच्या आश्रयानें आपापलीं कार्यें करण्यांत प्रवृत्त असतात, त्याप्रमाणें संपूर्ण ग्रह चंद्रबलाश्रयानें शुभफल देतात. ह्या कल्पनेस अनुसरून वरील श्लोक असतील असें वाटतें.

शनीची साडेसाती.

द्वादशस्थे शनौ दृष्टिरुदरे जन्मनि स्थितिः ।
लत्ता प्रोक्ता द्वितीयस्थे इत्येते कालसंक्रमे ॥ ५९ ॥

आपल्या जन्मराशीपासून शनि द्वादशस्थानीं आला म्हणजे तो दृष्टीस आला; प्रथमस्थानीं (राशीस) आला म्हणजे उदरीं आला, आणि जन्मराशीपासून दुसरा आला म्हणजे लत्तेस आला असें म्हणतात.

ज्या राशीला शनि असतो त्या राशीला जशी तो पीडा देतो, त्याचप्रमाणें त्या राशीच्या मागची एक रास व पुढची एक रास अशा दोन राशींवर त्याची दृष्टि असते; म्हणजे तो एका राशींत असून एकाच वेळीं तीन राशींना पीडा देतो. शनि प्रत्येक राशींत अडीज वर्षें असतो हें मागें एकदां सांगितलेंच आहे; अर्थात् प्रत्येक राशीला शनीची पीडा साडेसात वर्षें असते, म्हणून शनीच्या ह्या फेऱ्याला

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

साडेसाती म्हणतात. उदाहरणार्थ, एकाची मेष रास आहे असें समजा. जेव्हां मीनराशीला शनि असेल तेव्हां मेषराशीच्या साडेसातीला आरंभ होतो, आणि मीन, मेष आणि वृषभ अशा तीन राशींतून मिथुन राशींत शनि जाईपर्यंत मेषराशीला साडेसाती असते. म्हणजे कोणत्याही राशीपासून बारावा; पहिला अथवा दुसरा शनि असतां त्या राशीला साडेसाती आहे असें समजावें. एकदां साडे; साती येऊन गेली म्हणजे तीस वर्षांनीं त्याच राशीला पुनः येते. शनि हा ग्रह सर्व ग्रहांमध्यें तेजानें व गतीनें अत्यंत मंद आहे, आणि म्हणूनच शनिवाराला मंदवार अशी संज्ञा आहे. तेव्हां पायांचा जड, तेजानें मंद व रंगानें काळा असा हा शनिराज ज्याच्या राशीस येतो, त्याची सर्वस्वी हानि करतो, हें त्याच्या स्वभावाला अनुरूपच आहे. साडेसातींमध्यें कोणाचा धननाश, कोणाचा स्त्रीनाश किंवा कोणाचा पुत्रनाश असें कांहीं ना कांहीं तरी विशेष दुःखजनक घडल्यावांचून राहत नाहीं; असा पुष्कळ अनुभव आहे. परंतु शनीची आराधना केली असतां अनिष्ट फलाची तीव्रता कमी होते. खालीं शनैश्चरस्तोत्र दिलें आहे तें सकाळ-संध्याकाळ नेमानें पठण करावें. जन्मकुंडलींत शनि शुभस्थानीं असतां त्या मनुष्याला साडेसातीची पीडा सौम्य होते. साडेसातींत शनि आरंभीं किंवा शेवटीं ६।७ महिने शुभाशुभफल देतो. शक्य असतां शनीचा मंत्रजप स्वतःच करावा.

शनिस्तोत्रम् ।

श्रीगणेशाय नमः ॥ अस्य श्रीशनैश्चरस्तोत्रस्य । दशरथ ऋषिः । शनैश्चरो देवता । त्रिष्टुप्छंदः । शनैश्चरप्रीत्यर्थं जपे विनियोगः । दशरथ उवाच । कोणोऽन्तको रौद्रयमोऽथ बभ्रुः कृष्णः शनिः पिंगलमंदसौरिः । नित्यं स्मृतो यो हरते च पीडां तस्मै नमः श्रीरविनंदनाय ॥ १ ॥ सुरासुराः किंपुरुषोरगेंद्रा गंधर्वविद्याधरपन्नगाश्च । पीड्यंति सर्वे विषमस्थितेन तस्मै नमः श्रीरविनंदनाय ॥ २ ॥ नरा नरेंद्राः पशवो मृगेंद्रा वन्याश्च ये कीटपतंगभृंगाः । पीड्यंति सर्वे विषमस्थितेन० ॥ ३ ॥ देशाश्च दुर्गाणि वनानि यत्र सेनानिवेशाः पुरपत्तनानि । पीड्यंति सर्वे० ॥ ४ ॥ तिलैर्यवैर्माषगुडान्नदानैर्लोहेन नीलांबरदानतो वा । प्रीणाति मंत्रैर्निजवासरे च तस्मै नमः श्री० ॥ ५ ॥ प्रयागकूले यमुनातटे च सरस्वतीपुण्यजले गुहायाम् । यो योगिनां ध्यानगतोऽपि सूक्ष्मस्तस्मै नमः० ॥ ६ ॥ अन्यप्रदेशात्स्वगृहं प्रविष्टस्तदीयवारे स नरः सुखी स्यात् । गृहाद्गतो यो न पुनः प्रयाति तस्मै० ॥ ७ ॥ स्रष्टा स्वयंभूर्भुवनत्रयस्य त्राता हरीशो हरते पिनाकी । एकस्त्रिधा ऋग्यजुःसाममूर्तिस्तस्मै० ॥ ८ ॥ शन्यष्टकं यः प्रयतः प्रभाते नित्यं सुपुत्रैः पशुबांधवैश्च । पठेत्तु सौख्यं भुवि भोगयुक्तः

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

प्राप्नोति निर्वाणपदं तदंते ॥ ९ ॥ कोणस्थः पिंगलो बभ्रुः कृष्णो रौद्रोऽन्तको यमः । सौरिः शनैश्चरो मंदः पिप्पलादेन संस्तुतः ॥ १० ॥ एतानि दशनामानि प्रातरुत्थाय यः पठेत् । शनैश्चरकृता पीडा न कदाचिद्भविष्यति ॥ ११ ॥ पिप्पलाद उवाच । नमस्ते कोणसंस्थाय पिंगलाय नमोस्तु ते । नमस्ते बभ्रुरूपाय कृष्णाय च नमोस्तु ते ॥ नमस्ते रौद्रदेहाय नमस्ते चांतकाय च । नमस्ते यमसंज्ञाय नमस्ते सौरये विभो ॥ नमस्ते मंदसंज्ञाय शनैश्चर नमोस्तु ते । प्रसादं कुरु देवेश दीनस्य प्रणतस्य च ॥ इति श्रीशनैश्चरस्तोत्रं संपूर्णम् ॥ शुभंभवतु ॥

राशीवरून शुभाशुभ ग्रह पाहण्याचें व पलभा ४ वरून लग्नमानाचें कोष्टक.

राशी.	१ मेष	२ वृ.	३ मि.	४ कर्क	५ सिंह	६ क.	७ तुला	८ वृ.	९ धनु	१० म.	११ कुं.	१२ मी.
मानं	३१५८	४१२७	५११०	५१३६	५१३१	५११८	५११८	५१३१	५१३६	५११०	४१२७	३१५८
रवि	स्था.ना.	भय	श्रीः	मानभं.	दैन्य	विजय	मार्ग	पीडा	सुक्र.ना	सिद्धि	धनला.	द्रव्यना.
चंद्र	अन्नला.	धनना.	सुख	रोग	कार्यना.	धनला.	स्त्रीला.	रोग	राजभ.	सौख्य	धनला.	धनक्षय
भौम	शत्रुभ.	धनना.	धनला.	शत्रुभ.	धनना.	धनला.	द्रव्यना.	शत्रुभय	शत्रुपी.	शोक	धनला.	धनक्षय
बुध	बंधन	धनला.	शत्रुभ.	पशुला.	सुख	स्था.ला	पीडा	धनला.	पीडा	सौख्य	धनला.	धनना.
गुरु	भय	धनला.	क्लेश	धनना.	सुख	शोक	राजमा.	मृ.स.पी	सौख्य	दैन्य	धनला.	पीडा
शुक्र	शत्रुना.	धनला.	सौख्य	धनला.	पुत्रला.	शत्रुभ.	शोक	धनला.	वस्त्रला.	दुःख	धनला.	धनला.
शनि	भय	धनना.	ऐश्वर्य	शत्रुभ.	पुत्रना.	धनला.	दोष	पीडा	धर्मक्ष	दौर्मन	धनला.	धनना.
राहु	हानि	धनना.	धनला.	वैर	शोक	श्रीः	कलह	मृत्यु	दुरित	वैर	सुख	शोक
केतु	रोग	वैर	सुख	भय	सुख	धन	गमन	रोग	पाप	शोक	कीर्ति	शत्रुभय

ऋणमोचक मंगलस्तोत्राचा जप—मंगलो भूमिपुत्रश्च ऋणहर्ता धनप्रदः । स्थिरासनो महाकायः सर्वकर्मविरोधकः ॥ लोहितो लोहिताक्षश्च सामगानां कृपाकरः । धरात्मजः कुजो भौमो भूतिदो भूमिनंदनः ॥ अंगारको यमश्चैव सर्वरोगापहारकः ॥ वृष्टेः कर्ताऽपहर्ता च सर्वकामफलप्रदः ॥ एतानि कुजनामानि नित्यं यः श्रद्धया पठेत् । ऋणं न जायते तस्य धनं शीघ्रमवाप्नुयात् ॥४॥ या जपानें मंगळाची पीडा जाते.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

नवग्रहांचीं दानें व जपसंख्या.									
ग्रह	रवि	चंद्र	भौम	बुध	गुरु	शुक्र	शनि	राहु	केतु
धातु	सुवर्ण	सुवर्ण	सुवर्ण	सुवर्ण	सुवर्ण	सुवर्ण	सुवर्ण	सुवर्ण	सुवर्ण
उपधा.	ताम्र	रौप्य	ताम्र	कांस्य	कांस्य	रौप्य	लोह	शिसें	पोलाद
रत्न	माणिक	मोतीं	प्रवाल	पाच	पुष्परा.	हिरा	नीलम.	गोमेद	लसण्या
धान्य	गोधूम	तांदूळ	मसूरा	मूग	हर्ब.डा.	तांदूळ	उडीद	तिल	तिल
पशु	रक्तधेनु	श्वेतवृष	रक्तवृष	हत्ती	अश्व	श्वेताश्व	महिषी	अश्व	बोकड
रस	गुड	घृत	गुड	घृत	साखर	घृत	तैल	तैल	तैल
वस्त्र	कुसुंभव	श्वेतव.	र. वस्त्र	नीलव.	पी.वस्त्र	चित्रव.	कृष्णकं.	नीलव.	कृष्णव.
पुष्प	रक्तकम	श्वेतपु.	र.कण्हे.	सर्वपुष्पें	पी.पुष्प	श्वेतपु.	कृष्णपु.	कृष्णपु.	धूम्रपु.
जपसं.	६०००	११०००	१००००	४०००	१९००	१६०००	२३०००	१८०००	१७०००

जन्मटिप्पणाचा नमुना.

शके १८३२ माघशुक्ल ५ शनिवार रात्रीं ७ वाजून १० मिनिटांनीं एकाचा जन्म झाला आहे असें कल्पून पुढील जन्मटिप्पण लिहिलें आहे.

श्री.

श्रीगणेशाय नमः ॥ स जयति सिंधुरवदनो देवो यत्पादपंकजस्मरणम् ॥ वासरमणिरिव तमसां राशीन्नाशयति विघ्नानाम् ॥ १ ॥ अथ स्वस्ति श्रीमन्नृपविक्रमार्कसमयातीतसंवत् १९६७ दुंदुभिनामसंवत्सरे तथा च श्रीमन्नृपशालिवाहन शके १८३२ साधारणनामसंवत्सरे उत्तरायणे शिशिरर्तौ माघमासे शुक्लपक्षे तिथौ ५ घट्यः १२ पलानि ४८ परं षष्ठी जन्मतिथौ शनिवासरे रेवतीजन्मनक्षत्रे घ. ४७ प. ४६ साध्यजन्मयोगे घ. ५१ प. ४० तात्कालिके कौलवकरणे मीनराशिस्थिते चंद्रे गजैयोनौ देवगणे विप्रवर्णे सिंहवर्गे श्रीसूर्यभादिनभं पुरुषाकारचक्रे

---

१ पत्रिकेंत आरंभीं लिहावयाचीं मंगलाचरणाचीं पद्यें जातकाभरणग्रंथांत अनेक दिलेलीं आहेत. २ सूर्योदयीं जी तिथि असेल ती जन्मकालपूर्वींच संपली असतां प्रथम सूर्योदयाच्या वेळची तिथि घटिकापळांसह दाखवून नंतर पुढील जन्मतिथि पत्रिकेंत लिहितात. याचप्रमाणें नक्षत्र-योगांविषयीं जाणावें. ३ कोणत्या नक्षत्राची कोणती योनि, गण, नाडी वगैरे असतात हें या पुस्तकांत मागें पृष्ठ १०५ मध्यें सांगितलें आहे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मुखस्थिते पूर्वभागयुंजायां वारिहंसके अंत्यनाडीस्थिते श्रीफणीश्वरचक्रे मकरसंक्रांतेर्गतांशाः २१ कला ४१ विकलाः ५१ एवं पंचांगशुद्धावत्रदिने श्रीमन्मार्तंडमंडलोदयादिष्टघ. ३१ प. ३३ तदा रात्रिगतासु घटिषु ३ पलेषु २० समये सिंहलग्ने वहमानायामस्यां शुभग्रहनिरीक्षितकल्याणवतीवेलायां ब्राह्मणकुलोत्पन्नस्य मेघश्यामशर्मणः भार्योभयकुलशुद्धकर्त्री सौदामिनीनाम्नीकुक्षौ पुत्ररत्नमजीजनत् । अस्य शिशोः रेवतीजन्मनक्षत्रतृतीयचरणानुगमवकहडाचक्रानुसारेणाभिधानं चारुदत्तः । अस्य बालकस्य घातवारः शुक्रः, घाततिथयः ५।१०।१५ घातनक्षत्रं आश्लेषा, घातचंद्रः १२ एतानि प्रयाणनूतनवस्त्रालंकारादिधारणेषु वर्ज्यानि । असौ देवप्रसादाद्बालको दीर्घायुर्भूयात् ॥ शुभं भवतु ॥

वंशो विस्तरतां यातु कीर्तिर्यातु महद्यशः ॥ आयुर्विपुलतां यातु यस्यैषा जन्मपत्रिका ॥ शुभं भवतु ॥

लग्नकोष्टकाचें स्पष्टीकरण. (पृष्ठ २४१ पहा)

यत्सूर्यराश्यंशसमानकोष्ठे घट्यादिकं स्वेष्टघटीयुतं तत् ।
तत्तुल्यघट्यादि भवेद्धि यत्र तत्तिर्यगूर्ध्वांकमितां हि लग्नम् ॥

ज्या वेळेचें लग्न पाहावयाचें असेल, त्या वेळेपर्यंत (सूर्योदयापासून) किती घटिका पळें झालीं तें पाहून निराळें मांडून ठेवावें. नंतर ज्या राशीचा सूर्य असेल त्या राशीसन्मुख जितके अंश सूर्यानें भोगले असतील त्या अंशाखालील कोष्टकांतील अंक घ्यावे. नंतर त्यांत निराळे मांडून ठेवलेले अंक मिळवावे. जी बेरीज येईल ती कोष्टकांत शोधून काढावी. ज्या राशीसन्मुख येईल तेंच लग्न, व ज्या अंशाखालीं येईल तितके अंश भोगले असें जाणावें.

दशमभावसारिणीचें स्पष्टीकरण. (पृष्ठ २४२ पहा)

दशमभाव लग्नाप्रमाणेंच पश्चिमनत इष्टघटिका धरून सूर्यावरून आणावा. मात्र पूर्वनत असल्यास उन्नत इष्टघटिका धरून सूर्यांत सहा राशी मिळवून आणावा. बाकी रीति लग्नसारिणीप्रमाणेंच.

---

१ रेवतीपासून मृगापर्यंत ६ नक्षत्रें पूर्वभाग, पुढें अनुराधापर्यंत १२ नक्षत्रें मध्यभाग व शेवटीं उत्तराभाद्रपदापर्यंत ९ नक्षत्रें अंत्यभाग याप्रमाणें नक्षत्रांच्या युंजा जाणाव्या. त्यास वचन–'अंत्यभाद्रसभंपूर्वा रौद्राद्द्वादशमध्यमा । ज्येष्ठादेर्नवभान्यंत्यायुंजैवं त्रिविधा मता' २ मेषापासून मीनापर्यंत अनुक्रमानें अग्नि, भूमि, वायु आणि जल हीं १२ राशींचीं तत्वें पुनः पुनः मोजावीं. त्यास वचन–'मेषादग्निर्मही वायुर्नीरं चेति यथाक्रमम् । गणयेदात्मवर्गं च सुहृद्वैरभतोऽन्यथा' । ३ अवकहडाचक्र पृष्ठ ८६ पहा. ४ पुढें मुहूर्तप्रकरणीं घातचक्र पहा.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मुंबईचें २३॥ अयनांशांचें लग्नकोष्टक.

राशि अं.	०	१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२	१३	१४
मेष	३ ६	३ १४	३ २२	३ ३०	३ ३८	३ ४६	३ ५४	४ ३	४ १२	४ २१	४ ३०	४ ३८	४ ४७	४ ५६	५ ५
वृषभ	७ २८	७ ३६	७ ४५	७ ५४	८ ३	८ १२	८ २१	८ ३०	८ ४१	८ ५१	९ १	९ १२	९ २२	९ ३२	९ ४३
मिथुन	१२ २८	१२ ३८	१२ ४८	१२ ५९	१३ ९	१३ २०	१३ ३०	१३ ४१	१३ ५२	१४ ३	१४ १४	१४ २६	१४ ३७	१४ ४८	१४ ५९
कर्क	१७ ५८	१८ १०	१८ २१	१८ ३२	१८ ४३	१८ ५५	१९ ६	१९ १७	१९ २८	१९ ३९	१९ ५०	२० १	२० १२	२० २३	२० ३४
सिंह	२३ ३१	२३ ४२	२३ ५३	२४ ४	२४ १५	२४ २६	२४ ३७	२४ ४८	२४ ५८	२५ ९	२५ १९	२५ ३०	२५ ४०	२५ ५१	२६ १
कन्या	२८ ५२	२९ ३	२९ १३	२९ २४	२९ ३४	२९ ४५	२९ ५५	३० ५	३० १५	३० २६	३० ३६	३० ४७	३० ५७	३१ ८	३१ १८
तुला	३४ ९	३४ २०	३४ ३०	३४ ४१	३४ ५१	३५ २	३५ १३	३५ २४	३५ ३५	३५ ४६	३५ ५७	३६ ८	३६ १९	३६ ३०	३६ ४१
वृश्चिक	३९ ३८	३९ ४९	४० ०	४० ११	४० २२	४० ३३	४० ४४	४० ५५	४१ ६	४१ १७	४१ २८	४१ ४०	४१ ५१	४२ २	४२ १३
धनु	४५ १२	४५ २४	४५ ३५	४५ ४६	४५ ५७	४६ ९	४६ २०	४६ ३०	४६ ४१	४६ ५१	४७ १	४७ १२	४७ २२	४७ ३२	४७ ४३
मकर	५० २८	५० ३८	५० ४८	५० ५९	५१ ९	५१ २०	५१ ३०	५१ ३९	५१ ४८	५१ ५७	५२ ६	५२ १४	५२ २३	५२ ३२	५२ ४१
कुंभ	५५ ४	५५ १२	५५ २१	५५ ३०	५५ ३८	५५ ४७	५५ ५६	५६ ५	५६ १३	५६ २१	५६ २९	५६ ३७	५६ ४४	५६ ५२	५७ ०
मीन	५९ ७	५९ १५	५९ २३	५९ ३१	५९ ३९	५९ ४७	५९ ५६	० ४	० १२	० २०	० २८	० ३६	० ४३	० ५१	० ५९

राशि अं.	१५	१६	१७	१८	१९	२०	२१	२२	२३	२४	२५	२६	२७	२८	२९
मेष	५ १४	५ २३	५ ३२	५ ४१	५ ५०	५ ५९	६ ७	६ १६	६ २५	६ ३४	६ ४३	६ ५२	७ १	७ १०	७ १९
वृषभ	९ ५३	१० ३	१० १३	१० २४	१० ३४	१० ४४	१० ५५	११ ५	११ १५	११ २६	११ ३६	११ ४६	११ ५७	१२ ७	१२ १७
मिथुन	१५ १०	१५ २२	१५ ३३	१५ ४४	१५ ५५	१६ ६	१६ १८	१६ २९	१६ ४०	१६ ५२	१७ २	१७ १४	१७ २५	१७ ३६	१७ ४७
कर्क	२० ४५	२० ५६	२१ ७	२१ १८	२१ २९	२१ ४०	२१ ५१	२२ ३	२२ १४	२२ २५	२२ ३६	२२ ४७	२२ ५८	२३ ९	२३ २०
सिंह	२६ १२	२६ २२	२६ ३३	२६ ४४	२६ ५५	२७ ५	२७ १६	२७ २६	२७ ३७	२७ ४७	२७ ५८	२८ ९	२८ २०	२८ ३०	२८ ४१
कन्या	३१ २९	३१ ३९	३१ ५०	३२ १	३२ १२	३२ २२	३२ ३३	३२ ४३	३२ ५४	३३ ४	३३ १५	३३ २६	३३ ३७	३३ ४७	३३ ५८
तुला	३६ ५२	३७ ३	३७ १४	३७ २५	३७ ३६	३७ ४७	३७ ५८	३८ १०	३८ २१	३८ ३२	३८ ४३	३८ ५४	३९ ५	३९ १६	३९ २७
वृश्चिक	४२ २४	४२ ३६	४२ ४७	४२ ५८	४३ ९	४३ २०	४३ ३२	४३ ४३	४३ ५४	४४ ५	४४ १६	४४ २८	४४ ३९	४४ ५०	४५ १
धनु	४७ ५३	४८ ३	४८ १३	४८ २४	४८ ३४	४८ ४४	४८ ५५	४९ ५	४९ १५	४९ २६	४९ ३६	४९ ४६	४९ ५७	५० ७	५० १७
मकर	५२ ५०	५२ ५९	५३ ८	५३ १७	५३ २६	५३ ३५	५३ ४३	५३ ५२	५४ १	५४ १०	५४ १९	५४ २८	५४ ३७	५४ ४६	५४ ५५
कुंभ	५७ ८	५७ १६	५७ २४	५७ ३२	५७ ४०	५७ ४८	५७ ५६	५८ ४	५८ १२	५८ २०	५८ २८	५८ ३६	५८ ४३	५८ ५१	५८ ५९
मीन	१ ७	१ १५	१ २३	१ ३१	१ ३९	१ ४७	१ ५५	२ ३	२ १२	२ १९	२ २७	२ ३५	२ ४२	२ ५०	२ ५८

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

२३॥ अयनांशांची दशमभावसारणी.

राशि अं.	०	१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२	१३	१४
मेष	४८ ३८	४८ ४७	४८ ५६	४९ ६	४९ १५	४९ २४	४९ ३३	४९ ४३	४९ ५३	५० ३	५० १३	५० २३	५० ३३	५० ४३	५० ५३
वृषभ	५३ ३२	५३ ४२	५३ ५२	५४ २	५४ १२	५४ २२	५४ ३२	५४ ४२	५४ ५३	५५ ४	५५ १५	५५ २५	५५ ३६	५५ ४७	५५ ५८
मिथुन	५८ ५०	५९ १	५९ ११	५९ २२	५९ ३३	५९ ४४	५९ ५५	० ६	० १७	० २८	० ३९	० ४९	१ ०	१ ११	१ २२
कर्क	४ १४	४ २५	४ ३६	४ ४७	४ ५७	५ ८	५ १९	५ २८	५ ३८	५ ४८	५ ५८	६ ८	६ १८	६ २८	६ ३८
सिंह	९ १७	९ २७	९ ३७	९ ४७	९ ५७	१० ७	१० १७	१० २७	१० ३६	१० ४५	१० ५४	११ ४	११ १३	११ २२	११ ३२
कन्या	१४ ०	१४ ९	१४ १९	१४ २८	१४ ३७	१४ ४७	१४ ५६	१५ ५	१५ १४	१५ २३	१५ ३३	१५ ४२	१५ ५१	१६ १	१६ १०
तुला	१८ ३८	१८ ४७	१८ ५८	१९ ६	१९ १५	१९ २४	१९ ३४	१९ ४३	१९ ५३	२० ३	२० १३	२० २३	२० ३३	२० ४३	२० ५३
वृश्चिक	२३ ३२	२३ ४२	२३ ५२	२४ २	२४ १२	२४ २२	२४ ३२	२४ ४२	२४ ५३	२५ ४	२५ १५	२५ २५	२५ ३६	२५ ४७	२५ ५८
धनु	२८ ५०	२९ ०	२९ ११	२९ २२	२९ ३३	२९ ४३	२९ ५४	३० ५	३० १६	३० २७	३० ३८	३० ४८	३० ५९	३१ १०	३१ २१
मकर	३४ १३	३४ २३	३४ ३४	३४ ४५	३४ ५६	३५ ६	३५ १७	३५ २८	३५ ३८	३५ ४८	३५ ५८	३६ ८	३६ १८	३६ २८	३६ ३८
कुंभ	३९ १७	३९ २७	३९ ३७	३९ ४७	३९ ५७	४० ७	४० १७	४० २७	४० ३६	४० ४५	४० ५५	४१ ४	४१ १३	४१ २२	४१ ३२
मीन	४४ ०	४४ ९	४४ १९	४४ २८	४४ ३७	४४ ४७	४४ ५६	४५ ५	४५ १४	४५ २३	४५ ३२	४५ ४२	४५ ५१	४६ ०	४६ ९

राशि अं.	१५	१६	१७	१८	१९	२०	२१	२२	२३	२४	२५	२६	२७	२८	२९
मेष	५१ ३	५१ १३	५१ २३	५१ ३३	५१ ४३	५१ ५३	५२ ३	५२ १२	५२ २२	५२ ३२	५२ ४२	५२ ५२	५३ २	५३ १२	५३ २२
वृषभ	५६ ८	५६ १९	५६ ३०	५६ ४१	५६ ५१	५७ २	५७ १३	५७ २४	५७ ३४	५७ ४५	५७ ५६	५८ ७	५८ १७	५८ २८	५८ ३९
मिथुन	१ ३३	१ ४३	१ ५४	२ ५	२ १६	२ २७	२ ३७	२ ४८	२ ५९	३ १०	३ २०	३ ३१	३ ४२	३ ५३	४ ३
कर्क	६ ४८	६ ५८	७ ८	७ १८	७ २८	७ ३८	७ ४८	७ ५७	८ ७	८ १७	८ २७	८ ३७	८ ४७	८ ५७	९ ७
सिंह	११ ४१	११ ५०	११ ५९	१२ ८	१२ १८	१२ २७	१२ ३६	१२ ४५	१२ ५४	१३ ३	१३ १३	१३ २२	१३ ३२	१३ ४१	१३ ५१
कन्या	१६ १९	१६ २८	१६ ३८	१६ ४७	१६ ५६	१७ ५	१७ १५	१७ २४	१७ ३३	१७ ४३	१७ ५.३	१८ १	१८ ११	१८ २०	१८ २९
तुला	२१ ३	२१ १३	२१ २३	२१ ३३	२१ ४३	२१ ५३	२२ ३	२२ १२	२२ २२	२२ ३२	२२ ४२	२२ ५२	२३ २	२३ १२	२३ २२
वृश्चिक	२६ ८	२६ १९	२६ ३०	२६ ४१	२६ ५१	२७ २	२७ १३	२७ २४	२७ ३४	२७ ४५	२७ ५६	२८ ७	२८ १७	२८ २८	२८ ३९
धनु	३१ ३१	३१ ४२	३१ ५३	३२ ४	३२ १४	३२ २५	३२ ३६	३२ ४७	३२ ५७	३३ ८	३३ १९	३३ ३०	३३ ४०	३३ ५१	३४ २
मकर	३६ ४८	३६ ५८	३७ ८	३७ १८	३७ २८	३७ ३८	३७ ४८	३७ ५७	३८ ७	३८ १७	३८ २७	३८ ३७	३८ ४७	३८ ५७	३९ ७
कुंभ	४१ ४१	४१ ५०	४२ ०	४२ ९	४२ १८	४२ २७	४२ ३७	४२ ४६	४२ ५५	४३ ४	४३ १४	४३ २३	४३ ३३	४३ ४२	४३ ५१
मीन	४६ १९	४६ २८	४६ ३७	४६ ४६	४६ ५६	४७ ५	४७ १४	४७ २४	४७ ३३	४७ ४२	४७ ५१	४८ १	४८ १०	४८ १९	४८ २८

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मुहूर्तादिमिश्रप्रकरणम् ४.

व्यवहारांतील प्रत्येक कृत्य करण्याविषयीं आमच्या धर्मशास्त्रकारांनीं ज्या कांहीं नियमित वेळा ठरविल्या आहेत, त्यांस मुहूर्त अशी संज्ञा आहे. आणि उक्त मुहूर्तावर विवक्षित कृत्यें केलीं असतां इष्टफलप्राप्ति होते, असें सांगितलेलें आहे; म्हणून मुहूर्त पाहून प्रत्येक महत्त्वाचें कृत्य करावें. पुढें निरनिराळ्या कार्याकरितां जे मुहूर्त सांगितले आहेत, त्यांत ज्या ठिकाणीं फक्त नक्षत्रेंच दिलीं असतील त्या ठिकाणीं असें समजावें कीं, इतर कुयोग म्हणजे व्यतीपात, वैधृति, दग्धयोग, मृत्युयोग, मंगळवार, शनिवार, रिक्तातिथि, अमावास्या इत्यादि नसतील तरच तीं नक्षत्रें त्या त्या कार्यास उक्त आहेत. कोणत्याही कार्यास मुहूर्त पहाणें असल्यास पहिल्या प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें शुभाशुभ तिथिवारनक्षत्रादिक पाहून नंतर मुहूर्त ठरवावा. तात्पर्य, सर्व कार्यास पंचांगशुद्धि असावी. याशिवाय खालीं लिहिल्याप्रमाणें शून्य तिथि शून्य लग्नें इत्यादिकांचाही महत्वाच्या मुहूर्तसमयीं विचार करावा.

सिद्धातिथि.

नंदा तिथिः शुक्रवारे सौम्ये भद्रा कुजे जया ।
रिक्ता मंदे गुरोर्वारे पूर्णा, सिद्धाह्वया तिथिः ॥ १ ॥

शुक्रवारीं नंदातिथि (१।६।११) बुधवारीं भद्रातिथि (२।७।१२) मंगळवारीं जयातिथि (३।८।१३) शनिवारीं रिक्तातिथि (४।९।१४) आणि गुरुवारीं पूर्णातिथि (५।१०।१५) असतां, त्यांना सिद्धातिथि अशी संज्ञा असून त्या शुभ कार्याला सर्वदा ग्राह्य आहेत.

मृततिथि.

आदित्यभौमयोर्नंदा, भद्रा शुक्रशशांकयोः ।
जया सौम्ये गुरौ रिक्ता शनौ पूर्णा मृतिप्रदा ॥ २ ॥

रविवारीं व मंगळवारीं नंदा, शुक्रवारीं व सोमवारीं भद्रा, बुधवारीं जया, गुरुवारीं रिक्ता आणि शनिवारीं पूर्णा तिथि असतां त्या मृततिथि समजून शुभ कार्यास वर्ज्य कराव्या. कित्येकांच्या मतें ह्या अमृततिथि असून शुभकार्याला ग्राह्य आहेत.

मासपरत्वें शून्यतिथि.

चैत्राष्टमीनवम्यौ च वैशाखे द्वादशी तिथिः ।
श्रावणे द्वितृतीये च भाद्रे भूनेत्रसंमिते ॥ ३ ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आश्विने दशमी रुद्रा सप्तम्यष्टौ च मार्गके ।
चतुर्थी पंचमी पौषे शून्यास्ताः पक्षयोर्द्वयोः ॥ ४ ॥
कार्तिके पंचमी कृष्णा तथा शुक्ला चतुर्दशी ।
आषाढे बहुला षष्ठी शुक्लपक्षे तु सप्तमी ॥ ५ ॥
चतुर्थी फाल्गुने कृष्णा शुक्ले पक्षे तृतीयका ।
ज्येष्ठे चतुर्दशी कृष्णा शुक्ले चैव त्रयोदशी ।
कृष्णा तु पंचमी माघे षष्ठी शुक्ले प्रकीर्तिता ॥ ६ ॥

पुढील महिन्यांसमोर लिहिलेल्या तिथि, दोन्ही पक्षांतील शून्य आहेत असें समजावें. ह्या सर्व शुभकार्यांस वर्ज्य सांगितल्या आहेत.

चैत्र—अष्टमी नवमी	श्रावण—द्वितीया, तृतीया	आश्विन—दशमी, एकादशी
वैशाख—द्वादशी	भाद्रपद—प्रतिपदा, द्वितीया	मार्गशीर्ष—सप्तमी, अष्टमी

पौष—चतुर्थी व पंचमी

पुढील महिन्यांसमोर लिहिलेल्या कृष्ण व शुक्लपक्षांतील त्या त्या तिथि शून्य जाणाव्या व शुभकार्यांस वर्ज्य कराव्या.

कार्तिक	कृष्ण	पंचमी,	व	शुक्ल	चतुर्दशी.
आषाढ	,,	षष्ठी	,,	,,	सप्तमी.
फाल्गुन	,,	चतुर्थी	,,	,,	तृतीया.
ज्येष्ठ	,,	चतुर्दशी	,,	,,	त्रयोदशी.
माघ	,,	पंचमी	,,	,,	षष्ठी.

तिथिनक्षत्रसंबंधदोष.

तथा निंद्यं शुभे सार्पं द्वादश्यां, वैश्वमादिमे ।
अनुराधा द्वितीयायां पंचम्यां पित्र्यभं तथा ॥ ७ ॥
त्र्युत्तराश्च तृतीयायामेकादश्यां च रोहिणी ।
स्वातीचित्रे त्रयोदश्यां सप्तम्यां हस्तराक्षसे ।
नवम्यां कृत्तिकाष्टम्यां पूभा षष्ठ्यां च रोहिणी ॥ ८ ॥

द्वादशीचे दिवशीं आश्लेषा, प्रतिपदेला उत्तराषाढा, द्वितीयेला अनुराधा, पंचमीला मघा, तृतीयेला तिन्ही उत्तरा, एकादशीला रोहिणी, त्रयोदशीला चित्रा, स्वाती, सप्तमीला हस्त व मूळ, नवमीला कृत्तिका, अष्टमीला पूर्वाभाद्रपदा आणि षष्ठीला रोहिणी असा तिथिनक्षत्रसंयोग असतां तो शुभ कार्यांना वर्ज्य सांगितला आहे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मासपरत्वें शून्यराशी.

घटो झषो गौर्मिथुनं मेषकन्यालितौलिनः ।
धनुः कर्को मृगः सिंहश्चैत्रादौ शून्यराशयः ॥ ९ ॥

चैत्रांत कुंभ, वैशाखांत मीन, ज्येष्ठांत वृषभ, आषाढांत मिथुन, श्रावणांत मेष, भाद्रपदांत कन्या, आश्विनांत वृश्चिक, कार्तिकांत तुला, मार्गशीर्षांत धनु, पौषांत कर्क, माघांत मकर आणि फाल्गुनांत सिंह हीं सर्व लग्नें (राशी) त्या त्या महिन्यांत निष्फल होत म्हणून शुभ कार्यांना निंद्य मानिलीं आहेत.

विषमतिथि व दग्धलग्नें.

मृगसिंहौ तृतीयायां प्रथमायां तुलामृगौ ।
पंचम्यां बुधराशी द्वौ सप्तम्यां चापचंद्रभे ॥ १० ॥
नवम्यां सिंहकीटाख्यावेकादश्यां गुरोर्गृहे ।
वृषमीनौ त्रयोदश्यां दग्धसंज्ञास्त्वमी गृहाः ॥ ११ ॥
दग्धसद्मनि यत्कर्म कृतं सर्वं विनश्यति ।
तस्माद्दग्धगृहास्त्याज्याः शोभनेष्वखिलेष्वपि ॥ १२ ॥

प्रतिपदेला तूल व मकर, तृतीयेला सिंह व मकर, पंचमीला मिथुन व कन्या, सप्तमीला धनु व कर्क, नवमीला कर्क व सिंह; एकादशीला धनु व मीन आणि त्रयोदशीला वृषभ व मीन; याप्रमाणें प्रत्येक महिन्यांतील प्रतिपदादि विषम तिथींना वर सांगितल्याप्रमाणें शून्य लग्नें जाणावीं. यांना दग्धलग्नें असें म्हणतात. या दग्ध लग्नांवर शुभकार्य, प्रयाण, गृहप्रवेश, इत्यादि कृत्यें करूं नयेत.

आनंदादि २८ योगसंज्ञा.

आनंदाख्यः कालदंडश्च धूम्रो धाता सौम्यो ध्वांक्षकेतू क्रमेण ।
श्रीवत्साख्यो वज्रकं मुद्गरश्च छत्रं मित्रं मानसं पद्मलुंबौ ॥ १३ ॥
उत्पातमृत्यू किल काणसिद्धी शुभोऽमृताख्यो मुसलो गदश्च ।
मातंगरक्षश्चरसुस्थिराख्याः प्रवर्धमानाः फलदाः स्वनाम्ना ॥ १४ ॥
रविवारक्रमादेते दास्रभादिन्दुभाद्विधौ ।
सार्पाद्भौमे बुधे हस्तान्मैत्रभाद्देवमंत्रिणि ।
वैश्वदेवाद्भृगुसुते वारुणाद्भास्करात्मजे ॥ १५ ॥

हे आनंदादि अठ्ठावीस योग जाणण्याची रीति अशी आहे कीं, रविवारीं अश्विनीपासून, सोमवारीं मृगापासून, मंगळवारीं आश्लेषापासून, बुधवारीं हस्तापासून, गुरुवारीं अनुराधापासून, शुक्रवारीं उत्तराषाढापासून आणि शनिवारीं शततारकापासून अभिजित् नक्षत्रांसहित सर्व नक्षत्रें लिहावीं म्हणजे आनंदादि योग उत्पन्न होतात. त्यांपैकीं १४ योग शुभ व बाकीचे अशुभ जाणावे. आनंद, प्रजापति,

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सौम्य, ध्वज, श्रीवत्स, छत्र, मित्र, मानस, पद्म, सिद्धि, शुभ, अमृत, मातंग, चर, स्थिर, आणि वर्धमान हे शुभ योग आहेत.

आनंदादिक योगांच्या नांवाचें कोष्टक.

	र.	चं.	मं.	बु.	गु.	शु.	श.	फलें.		र.	चं.	मं.	बु.	गु.	शु.	श.	फलें.
आनंद	अ	मृ	आ	ह	अ	उ	श	सिद्धि	लुंबक	स्वा	मू	श्र	उ	कृ	पु	पू	धननाश
काल	भ	आ	म	चि	ज्ये	अ	पू	मृत्यु	उत्पात	वि	पू	ध	रे	रो	पु	उ	प्राणनाश
धूम्र	कृ	पु	पू	स्वा	मू	श्र	उ	असुख	मृत्यु	अ	उ	श	अ	मृ	आ	ह	मृत्यु
प्रजाप.	रो	पु	उ	वि	पू	ध	रे	सौख्य	काण	ज्ये	अ	पू	भ	आ	म	चि	क्लेश
सौम्य	मृ	आ	ह	अ	उ	श	अ	सौख्य	सिद्धि	मू	श्र	उ	कृ	पु	पू	स्वा	कार्यसिद्धि
ध्वांक्ष	आ	म	चि	ज्ये	अ	पू	भ	धनक्षय	शुभ	पू	ध	रे	रो	पु	उ	वि	कल्याण
ध्वज	पु	पू	स्वा	मू	श्र	उ	कृ	सौख्य	अमृत	उ	श	अ	मृ	आ	ह	अ	राजयोग
श्रीवत्स	पु	उ	वि	पू	ध	रे	रो	सौख्य	मुसल	अ	पू	भ	आ	म	चि	ज्ये	धननाश
वज्र	आ	ह	अ	उ	श	अ	मृ	क्षय	गद	श्र	उ	कृ	पु	पू	स्वा	मू	अविद्या
मुद्गर	म	चि	ज्ये	अ	पू	भ	आ	श्रीनाश	मातंग	ध	रे	रो	पु	उ	वि	पू	कुलवृद्धि
छत्र	पू	स्वा	मू	श्र	उ	कृ	पु	राजस	राक्षस	श	अ	मृ	आ	ह	अ	उ	महाकष्ट
मैत्र	उ.	वि	पू	ध	रे	रो	पु	पुष्टी	चर	पू	भ	आ	म	चि	ज्ये	अ	कार्यसिद्धि
मानस	ह	अ	उ	श	अ	मृ	आ	सौख्य	स्थिर	उ	कृ	पु	पू	स्वा	मू	श्र	गृहारंभ
पद्म	चि	ज्ये	अ	पू	भ	आ	म	धनलाभ	वर्धमान	रे	रो	पु	उ	वि	पू	ध	लग्न

प्रयाणास मुहूर्त.

महत्वाच्या कामाकरितां एका स्थलाहून दूर दुसऱ्या स्थलीं जाणें, ह्याला प्रयाण म्हणतात. प्रयाणास खालीं लिहिलेल्या तिथि, नक्षत्रें व वार उक्त आहेत असें जाणावें. एका दिवसाच्या प्रयाणास मुहूर्तांची आवश्यकता नाहीं.

नक्षत्रें–धनिष्ठा श्रवणो हस्तोऽनुराधा रेवतीद्वयम् ।
मृगः पुनर्वसुः पुष्यः श्रेष्ठान्येतानि भानि च ॥ १६ ॥
मूलं पूर्वात्रयं ज्येष्ठा रोहिणी शततारका ।
उत्तराणां त्रयं याने मध्यान्येतानि भानि च ॥ १७ ॥
चित्रात्रयं मघाश्लेषा कृत्तिकार्द्रा भरण्यपि ।
वर्ज्यान्येतानि धिष्ण्यानि यात्रायां जन्मभं तथा ॥ १८ ॥
वार–अर्के क्लेशमनर्थकं च गमने सोमे च बंधुप्रियं ।
चांगारेऽनलतस्करज्वरभयं प्राप्नोति चार्थं बुधे ॥
क्षेमारोग्यसुखं करोति च गुरुर्लाभं च शुक्रः शुभो ।
मंदे बंधनहानिरोगमरणान्युक्तानि गर्गादिभिः ॥ १९ ॥
तिथि–न षष्ठी न च द्वादशी नाष्टमी नो ।
सिताद्यातिथिः पूर्णिमामा न रिक्ता ॥ २० ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

धनिष्ठा, श्रवण, हस्त, अनुराधा, रेवती, अश्विनी, मृग, पुनर्वसु, पुष्य, हीं नऊ नक्षत्रें प्रयाणास उत्तम मानिलेलीं आहेत. तसेंच मूळ, तिन्ही पूर्वा, ज्येष्ठा, रोहिणी, शततारका आणि तिन्ही उत्तरा हीं नक्षत्रें मध्यम होत. यांवांचून बाकी जीं नक्षत्रें राहिलीं, तीं म्हणजे चित्रा, स्वाती, विशाखा, मघा, आश्लेषा, कृत्तिका, आर्द्रा, भरणी व तसेंच जन्मनक्षत्र हीं मात्र प्रयाणास वर्ज्य करावीं. परंतु विशेष अडचणीच्या प्रसंगीं या कनिष्ठ नक्षत्रीं जाणें असतां निदान पहिल्या २१ घटिका तरी वर्ज्य करून नंतर प्रयाण करावें. प्रयाणाला सोम, बुध, गुरु आणि शुक्र, हे वार प्रशस्त होत. ह्यावांचून इतर वारीं प्रयाण करणें अनिष्ट मानिलेलें आहे. तसेंच, आपल्या घातवारीं प्रयाण करूं नये. घातचक्राची माहिती याच प्रकरणांत पुढें दिली आहे. कित्येक ठिकाणीं बुधवारीं प्रयाण करणें अनिष्ट समजतात, परंतु ज्योतिःशास्त्रांत बुधवार शुभ मानिलेला आहे. जरूरीच्या प्रसंगीं अशुभवारीं प्रयाण करणें असल्यास रात्रीं प्रयाण करावें, म्हणजे वाराचा दोष रहात नाहीं. तिथींपैकीं षष्ठी, अष्टमी, द्वादशी, शुक्लप्रतिपदा, पूर्णिमा, अमावास्या आणि रिक्तातिथि म्हणजे ४।९।१४ इतक्या तिथि प्रयाणास नेहमीं वर्ज्य कराव्या. प्रयाणदिवशीं आपल्या जन्मराशीला चंद्रबल असावें. चंद्रबलाविषयीं पृष्ठ ३८ मध्यें मागें लिहिलें आहेच. तसेंच वैधृति, व्यतीपात, दग्धयोग, मृत्युयोग, इत्यादि वर्ज्य करून पंचांगशुद्धि असेल त्या दिवशीं प्रयाण करावें. म्हणजे कार्यसिद्धि होऊन मनुष्य सुखानें स्वस्थानीं लवकर परत येतो.

गमनास चंद्रबल व ताराबल.

चंद्रस्यैव बलं शुक्ले न तु ताराप्रधानता ।
कृष्णपक्षे तु ताराया बलं ग्राह्यं सदायतः ॥ २१ ॥
शुक्लाष्टम्यूर्ध्वदलाद्यावत्कृष्णाष्टमीदलं पूर्वम् ।
पूर्णश्चंद्रः पूर्वैः प्रोक्तः क्षीणस्ततोऽन्यत्र ॥ २२ ॥ (गीति)
जन्मभादिनभं यावत्तारा ज्ञेया न चोद्भृता ।
जन्म संपद्विपत् क्षेम पापः सिद्धो वधः क्रमात् ।
मित्रातिमित्रसंज्ञा च नाम तुल्यफलाश्च ताः ॥ २३ ॥
द्विचतुःषण्णवाष्टभ्यस्तारा श्चैवोत्तमा मताः ।
जन्माख्या मध्यमा ज्ञेया नष्टास्त्वन्याः प्रकीर्तिताः ॥ २४ ॥

पूर्वी ३८ पृष्ठामध्यें शुभ व अशुभ चंद्र कोणता हें सांगितलेंच आहे. शुक्लपक्षांत जसें चंद्रबलाचें विशेष महत्व, त्याप्रमाणें कृष्णपक्षांत ताराबलाचें श्रेष्ठत्व आहे. शुक्लपक्षांतील अष्टमीपासून कृष्णपक्षांतील अष्टमीपर्यंत चंद्र पूर्ण व बलिष्ठ असतो व त्यानंतर हीनबली होतो. सर्व कार्यांस चंद्रबल अवश्य आहे. आतां ताराबल-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

विषयीं सांगतों. आपल्या जन्मनक्षत्रापासून दिवसनक्षत्रापर्यंत नक्षत्रें मोजावीं. नवांपेक्षां ज्यास्त नक्षत्रें असल्यास त्या अंकास नवांनीं भागावें. बाकी १ असतां जन्म, २ असतां संपत्, ३ विपत्, ४ क्षेम, ५ पाप (प्रत्यरिः), ६ सिद्ध (साधिका), ७ वध, ८ मित्र, आणि ९ अतिमित्र, याप्रमाणें नांवें जाणावीं. व नांवाप्रमाणें फळें समजावीं. नवांनीं भाग जात नसेल व जितकी नक्षत्रसंख्या असेल, त्याचीं फळें वरील अंकानुक्रमानेंच जाणावीं. यांपैकीं ३।५।७ संख्या असतां अशुभ, १ असतां मध्यम, व २।४।६।८।० असतां शुभ होत.

चंद्रताराबलाची आवश्यकता.

विना चंद्रबलं शुक्ले कृष्णे ताराबलं विना ।
कार्यं न कार्यं किं वाच्यमुभयत्रोभयं न चेत् ॥ २५ ॥

शुक्लपक्षांत चंद्रबलावांचून व कृष्णपक्षांत ताराबलावांचून कोणतेंही कार्य केलें असतां सिद्धीस जात नाहीं, म्हणून चंद्रबल व ताराबल पाहून कार्य करावें.

प्रयाणास दिशापरत्वें चंद्रमुख.

मेषे च सिंहे धनुःपूर्वभागे वृषे च कन्या मकरे च याम्ये ।
तुले च कुंभे मिथुने प्रतीच्यां कर्कालिमीने विधुरुत्तरस्याम् ॥२६॥
संमुखो ह्यर्थलाभाय दक्षिणे सुखसंपदे ।
पृष्ठतः प्राणनाशाय वामे चंद्रे धनक्षयः ॥ २७ ॥

प्रयाणदिवशीं कोणत्या राशीस चंद्र आहे हें प्रथम पहावें. मेष, सिंह, धनु या राशींचा चंद्र असला म्हणजे पूर्वेस; वृषभ, कन्या, मकर या राशींचा दक्षिणेस; कुंभ, तूळ, मिथुन यांचा पश्चिमेस; आणि कर्क, वृश्चिक आणि मीन या राशींचा चंद्र उत्तरेस असतो. समोर चंद्र असतां प्रयाण केलें तर अर्थलाभ व सौख्यप्राप्ति, उजव्या बाजूस चंद्र असतां सुखसंपदा, पृष्ठभागीं चंद्र असतां प्राणनाश, व डाव्या बाजूस चंद्र असतां प्रयाण केलें तर धनक्षय होतो, याकरितां चंद्रमुख पाहून गमन करावें. संमुख चंद्र म्हणजे ज्या दिशेस आपणाला जावयाचें असेल त्या दिशेचा चंद्र असला म्हणजे तो संमुख चंद्र होतो. उदाहरणार्थ, प्रयाणदिवशीं धनु राशीचा चंद्र आहे, व आपणास उत्तरेकडे जावयाचें आहे, असें समजा. धनुराशीचा चंद्र पूर्वेस असतो हें वर सांगितलेंच आहे, तेव्हां उत्तरेकडे जाणाऱ्या मनुष्याला पूर्वेचा चंद्र उजव्या बाजूस आला किंवा पूर्वेसच जाणें असेल तर संमुख आला. याचप्रमाणें इतर दिशांचे चंद्र पहावे. संमुख चंद्र असतां प्रयाण केलें तर नक्षत्र, वार व इतर कुयोग यांचा दोष रहात नाहीं.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

संमुखचंद्राची प्रशंसा.

करणभगणदोषं वारसंक्रांतिदोषं ।
कुतिथि कुलिकदोषं यामयामार्धदोषम् ।
कुजशनिरविदोषं राहुकेत्वादिदोषं ।
हरति सकलदोषं चंद्रमा संमुखस्थः ॥ २८ ॥

संमुख चंद्र असतां प्रयाण केलें तर करण, नक्षत्र, वार, संक्रांति, कुतिथि, कुलिक, यामार्ध, मंगळ, शनि, रवि, राहु, केतु, इत्यादि सर्व दोषांचा व दुष्ट ग्रहांचा परिहार होतो.

काळराहु.

रविगुरुदिनपूर्वे सोमशुक्रे च याम्ये ।
वरुणदिशि तु भौमे उत्तरे सौरि सौम्ये ॥
अभिमुख उत दक्षे कालराहुर्दिशायां ।
हरति; सकलकार्यं वामपृष्ठेऽर्थसिद्धिः ॥ २९ ॥

रवि आणि गुरु या वारीं पूर्वेस राहु असतो. सोम आणि शुक्र या वारीं दक्षिणेस, मंगळवारीं पश्चिमेस, बुध आणि शनि या वारीं उत्तरेस असतो. सन्मुख किंवा उजव्या बाजूला राहु असतां प्रयाण केलें तर कार्यहानि होते. आणि डाव्या बाजूस व पाठीमागें राहु असतां कार्यसिद्धि होते. म्हणून ज्या वारीं ज्या दिशेकडे राहु असेल, त्या वारीं त्या दिशेला जाऊं नये. जसें रवि-गुरुवारीं पूर्वेस राहु असतां पूर्वेस किंवा उत्तर दिशेला जाऊं नये. याचप्रमाणें इतर दिशांचें जाणावें.

तिथिपरत्वें वर्ज्य लग्नें.

नंदायामलिहर्योस्तु तुलामकरयोस्तथा ।
भद्रायां मीनधनुषोः कालस्तिष्ठति सर्वदा ॥ ३० ॥
जयायां स्त्रीमिथुनयो रिक्तायां मेषकर्कयोः ।
पूर्णायां कुंभवृषयो वर्जयेत् गमने सदा ॥ ३१ ॥

नंदा तिथींना वृश्चिक, सिंह, तूळ व मकर हीं लग्नें वर्ज्य करावीं. त्याचप्रमाणें भद्रा तिथींना मीन व धन; जया तिथींना कन्या व मिथुन; रिक्ता तिथींना मेष व कर्क आणि पूर्णा तिथींना कुंभ व वृषभ हीं लग्नें गमनास वर्ज्य करावीं. कारण ह्या तिथींना त्या त्या लग्नीं काल उभा असतो, त्यामुळें त्या त्या वेळीं प्रयाण केलें असतां संकटावस्था प्राप्त होते.

घबाडमुहूर्त.

सूर्यभाद्गणयेच्चांद्रं त्रिगुणं तिथिमिश्रितम् ।
नवभिस्तु हरेद्भागं त्रीणि शेषं घबाडकम् ॥ ३२ ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सूर्यनक्षत्रापासून दिवसनक्षत्रापर्यंत मोजून जीं नक्षत्रें येतील त्यांची तिप्पट करावी. त्या अंकांत त्या दिवशीं जी तिथि असेल ती मिळवावी आणि त्या बेरजेस नवांनीं भागावें. बाकी तीन उरले तर घबाडमुहूर्त आहे असें समजावें. घबाड-मुहूर्तावर प्रयाण केलें असतां कार्यसिद्धि होऊन मोठा लाभ होतो.

अडल, भ्रमण आणि हैवर योग.

रविभात्साभिजिच्चांद्रे सप्तह्द्व्यद्रिशेषके ।
आडलोथ त्रिषट्शेषे भ्रमो नेष्टौ गमे त्विमौ ॥ ३३ ॥
चंद्रभं सूर्यभाद्युक्तं पक्षादितिथिवासरैः ।
नवाप्तं सप्तशेषे तु हैवरैः स्याच्छुभागमे ॥ ३४ ॥

सूर्यनक्षत्रापासून दिवसनक्षत्रापर्यंत अभिजित् नक्षत्रासह नक्षत्रें मोजून जितके अंक होतील त्या संख्येला ७ नीं भागावें. बाकी २ अथवा ७ राहिली तर अडल-दोष आणि ३ किंवा ६ बाकी असतां भ्रमणदोष आहे असें समजावें. प्रयाणाला भ्रमणदोष अशुभ आणि अडलदोष मध्यम जाणावा.

सूर्यनक्षत्रापासून दिवसनक्षत्रापर्यंत नक्षत्रें मोजून त्या अंकांत चालू पंधरव-ड्याच्या प्रतिपदेपासून तिथि आणि वाराचे अंक मिळवून त्या बेरजेला ९ नीं भागावें. बाकी ७ राहिली तर हैवरनामकयोग होतो. हा योग प्रयाणास फारच शुभ मानिलेला आहे. येथें वाराचे अंक मोजणें ते रविवार १ सोमवार २ या पद्धतीनें मोजावे.

त्र्यंक मुहूर्त.

तिथयः पक्षगुणिताः सप्तभिर्भाजिताश्च ताः ।
वाराः स्युर्वह्निगुणिता वसुभिश्चैव भाजिताः ॥ ३५ ॥
चतुर्गुण्यानि भान्यंगभाजितानि यथाक्रमम् ।
पीडा स्यात्प्रथमे शून्ये मध्यशून्ये महद्भयम् ।
अंत्यशून्ये तु मरणं त्र्यंके च विजयो भवेत् ॥ ३६ ॥

ज्या तिथीस प्रयाण करणें असेल त्या तिथीची दुप्पट करून त्या अंकांस सातांनीं भागावें. त्या दिवशीं जो वार असेल त्याची तिप्पट करून त्या अंकांस आठांनीं भागावें. नंतर त्या दिवशीं जें नक्षत्र असेल त्या नक्षत्रासुद्धां अश्विनीनक्षत्रापासून नक्षत्रें मोजून जे अंक येतील त्यांची चौपट करून त्या अंकांस सहांनीं भागावें. जी बाकी राहील तिचीं फळें. तिथीला भागतांना बाकी शून्य असेल तर मार्गांत पीडा, वाराला भागतांना शून्य राहिलें तर भीति आणि नक्षत्राला भागतांना शून्य राहिलें तर मृत्युसम दुःख प्राप्त होईल असें जाणावें; परंतु तिन्ही ठिकाणीं बाकी अंक राहिले तर त्यास त्र्यंक मुहूर्त म्हणतात. त्यावर प्रयाण केलें असतां विजय प्राप्त होतो. तिथि मोजणें त्या शुक्लप्रतिपदेपासून मोजाव्या.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

गर्गादि ऋषिमतें प्रयाणास मुहूर्त.

उषः प्रशस्यते गर्गः शकुनं च बृहस्पतिः ।
अंगिरा मनउत्साहं विप्रवाक्यं जनार्दनः ॥ ३७ ॥

सूर्योदयाच्या पूर्वीं पहांटेच्या ज्या पांच घटिका, त्याला उषःकाल अशी संज्ञा असून त्या वेळीं गर्गऋषीच्या मताप्रमाणें प्रयाण करणें शुभ होय. बृहस्पतीच्या मताप्रमाणें गमनकाळीं शुभ शकुन होणें हाच मुहूर्त होय. अंगिराऋषीच्या मतानें मनाला उत्साह वाटेल तीच वेळ गमनास प्रशस्त समजावी. आणि जनार्दनमतें विप्रवाक्यानुसार प्रयाण करावें.

प्रयाणास दिशापरत्वें वारनक्षत्रशूल.

न मंदेंदुदिने प्राचीं न गच्छेद्दक्षिणां गुरौ ।
शुक्रार्कयोर्न प्रतीचीं नोदीचीं बुधभौमयोः ॥ ३८ ॥
दिक्शूलं पूर्वदिग्भागे ज्येष्ठायां शनिसोमयोः ।
पूर्वाभाद्रपदे याम्यां तथैव गुरुवासरे ॥ ३९ ॥
रवौ शुक्रे च रोहिण्यां पश्चिमायां त्यजेद्ध्रुवम् ।
उदीच्यामुत्तराफाल्गुन्यविधे मंगले बुधे ॥ ४० ॥

ज्येष्ठानक्षत्रावर किंवा शनि आणि सोम ह्या वारीं पूर्व दिशेस गमन करूं नये. गुरुवारीं किंवा पूर्वाभाद्रपदा नक्षत्रावर दक्षिणेस प्रयाण करूं नये. शुक्र आणि रवि ह्या वारीं किंवा रोहिणी नक्षत्रावर पश्चिम दिशेकडे गमन करूं नये. बुध आणि मंगळ ह्या वारीं किंवा उत्तराफाल्गुनी नक्षत्रावर उत्तरेस जाऊं नये. ज्या दिशेस ज्या वारीं गमन करूं नये असें सांगितलें आहे, त्या वारीं त्या दिशेस वारशूलाचा व नक्षत्रशूलाचा दोष असतो असें जाणावें.

प्रयाणास लग्नें.

चरलग्ने प्रयातव्यं द्विस्वभावे तथा नरैः ।
लग्ने स्थिरे न गतव्यं यात्रायां क्षेममीप्सुभिः ॥ ४१ ॥
कुंभे कुंभांशकौ मीने मीनांशौ वर्जयेत् सदा ।

चरलग्नें म्हणजे मेष, कर्क, तूळ, मकर आणि द्विस्वभाव म्हणजे मिथुन, कन्या, धन, मीन अशीं आठ लग्नें कोठेंही गमन करण्यास प्रशस्त आहेत. बाकी राहिलेलीं चार लग्नें म्हणजे वृषभ, सिंह, वृश्चिक, कुंभ हीं स्थिरलग्नें आहेत म्हणून त्या लग्नांवर प्रयाण करूं नये. विशेषतः कुंभलग्नीं किंवा कुंभांशावर मुळींच जाऊं नये. तसेंच मीन लग्न किंवा कोणत्याही लग्नीं मीनांश असतां प्रयाण करूं नये. अमुक वेळेस अमुक लग्न आहे हें समजण्याची रीति मागें तिसऱ्या प्रकरणांत दिली आहे. प्रयाणसमयीं निष्पंचक लग्न असावें. निदान चोरपंचक व मृत्युपंचक यांनीं रहित

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

अशा लग्नीं गमन करावें. पंचक पाहण्याचा प्रकार मागें विवाहप्रकरणीं पृष्ठ १२० मध्यें सांगितला आहे. द्विस्वभावलग्नीं पूर्वार्धं स्थिर व उत्तरार्धं चर असतो.

गमनास लग्नीं शुभाशुभ ग्रह.

हित्वा सप्तमगं शुक्रं केंद्रकोणे शुभाशुभाः ।
पापाश्चोपचये शस्ता याने नो दशमः शनिः ॥ ४२ ॥
चंद्रस्तु गमने नेष्टो लग्नारिव्ययरंध्रगः ।
द्यूने षष्ठाष्टरिःफस्थो लग्नेशोपि न शोभनः ॥ ४३ ॥
अंभो राशौ तदंशे वा नौकायानं प्रशस्यते ।
श्रेष्ठशीर्षोदये लग्ने यात्रा सर्वार्थदायिनी ॥ ४४ ॥

ज्या लग्नीं प्रयाण करावयाचें असेल त्या लग्नापासून केंद्रीं (१।४।७।१०) आणि त्रिकोणीं (९।५) शुभग्रह असतां प्रयाणाला इष्ट होय. परंतु शुक्र सप्तम स्थानीं अशुभ होय. तसेंच पापग्रह उपचयस्थानीं (३।११।६।१०) इष्ट होत; परंतु दशमस्थानाचा शनि अशुभ जाणावा. १।६।८।१२ ह्या स्थानीं चंद्र असतां अशुभ समजावा; आणि लग्नस्वामी ७।६।८।१२ ह्या स्थानीं अनिष्ट होय. जलराशी म्हणजे कर्क, वृश्चिक, व मीन या लग्नीं किंवा या अंशांवर जलप्रवासाला जावें. तथापि लग्नस्वामी किंवा चंद्र अनिष्ट नसावा व केंद्रीं शुभग्रह असावे. शीर्षोदय लग्नांवर प्रयाण करणें शुभ आहे.

विजयादशमीचा मुहूर्त.

आश्विने शुक्लदशमी सा तिथिर्विजयाभिधा ।
श्रवणर्क्षयुता तत्र सर्वकार्येषु सिद्धिदा ॥ ४५ ॥

आश्विन महिन्यांतील शुक्ल दशमी, (जिला विजयादशमी किंवा दसरा असें म्हणतात) हा दिवस प्रयाणास किंवा महत्वाच्या कार्यांकरितां राजे लोकांना कोठेंही गमन करण्यास अत्यंत शुभ आहे. परंतु ही दशमी श्रवणनक्षत्रयुक्त मात्र असावी म्हणजे सर्व कार्यांमध्यें यश प्राप्त करून देणारी आहे. तथापि आपल्या घातवारीं विजयादशमी आली असतां ती त्याज्य मानून त्या दिवशीं दूरदेशीं गमन करूं नये.

योग, अधियोग, योगाधियोग.

एकेन वा बुधबृहस्पतिभार्गवाणां
योगो भवेन्नवमपंचमकंटकेषु ।
द्वाभ्यां वदंति मुनयस्त्वधियोगमेषां
योगाधियोगमपरे त्रिभिरुद्दिशंति ॥ ४६ ॥
योगे क्षेमं भवेदत्राऽधियोगे मंगलं जयः ।
योगाधियोगे गमने यशःक्षेमं धनागमः ॥ ४७ ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

प्रयाणाच्या इष्ट लग्नापासून १।४।७।१०।५।९ ह्या सहा स्थानांपैकीं कोणत्याही एका स्थानीं बुध, गुरु किंवा शुक्र यांतील कोणताही एक ग्रह असतां त्याला योग म्हणतात. त्याच सहा स्थानीं म्हणजे केंद्रांत अथवा त्रिकोणांत बुध, गुरु, शुक्र या तीन ग्रहांतून दोन ग्रह एकत्र असतां अधियोग होतो. आणि तीन्ही ग्रह एका स्थानीं असतां योगाधियोग होतो. योगावर प्रयाण करणारा मनुष्य सुखरूप परत येतो. अधियोगावर जय व कल्याण प्राप्त होतें आणि योगाधियोगावर यश, क्षेम व धन ह्यांचा लाभ होतो.

प्रस्थानविचार.

यज्ञोपवीतकं वस्त्रं मधु च स्थापयेत्फलम् ।
विप्रादिक्रमतः सर्वं स्वर्णधान्यांबरादिकम् ॥ ४८ ॥
राजा दशाहं पंचाहमन्यो हि प्रस्थितो वसेत् ।
अंगप्रस्थानके पूर्णं वस्तुप्रस्थानकेऽर्धकम् ॥ ४९ ॥

आवश्यकतेमुळें अमक्याच दिवशीं गेलें पाहिजे असें असेल आणि तो दिवस प्रयाणास प्रशस्त मानिलेला नसेल तर शुभ दिवशीं पूर्वीं प्रस्थान ठेवावें. म्हणजे पुढें लिहिलेल्या वस्तु दुसऱ्या ठिकाणीं ठेवून, त्या जातेवेळीं गमनकर्त्यानें बरोबर घेऊन जाणें या विधीला प्रस्थान म्हणतात. प्रस्थानवस्तु जातिपरत्वें ठरविलेल्या आहेत. जसें—ब्राह्मणांनीं यज्ञोपवीत, क्षत्रियांनीं शस्त्र, वैश्यांनीं मध आणि शूद्रांनीं नारळाचें फळ ठेवावें. अथवा कोऱ्या वस्त्रांत सुवर्ण, धान्य, सुपारी बांधून ठेवणें हा प्रस्थानाचा दुसरा प्रकार आहे. हा ब्राह्मणादि सर्व जातींस प्रशस्त आहे. राजांनीं ठेविलेलें प्रस्थान दहा दिवस व इतरांनीं ठेविलेलें पांच दिवस उपयोगी पडतें. अंगप्रस्थान (घर सोडून अन्यत्र राहणें) केल्यास संपूर्ण फलप्राप्ति व वस्तुप्रस्थान केल्यास अर्धफल मिळतें.

प्रस्थान ठेवण्याचें स्थळ.

गर्गो गेहांतरं गेहात् भृगुः सीमांतरं जगौ ।
प्रस्थानं तु भरद्वाजो वाणविक्षेपणावधिम् ॥ ५० ॥
पुराद्बहिर्वसिष्ठोऽन्ये धनुषां शतपंचकम् ।
केचिच्छतद्वयं चैके धनुर्दशमितं जगुः ॥ ५१ ॥

प्रस्थान किती दूर ठेवावें याविषयीं निरनिराळीं मतें आहेत. आपल्या घराच्या बाहेर एकाद्या ठिकाणीं प्रस्थान ठेवावें असें गर्गाचार्यांचें मत आहे. गांवाच्या सीमेपलीकडे ठेवावें असें भृगुऋषीचें मत आहे. साधारणपणें बाण जितका दूर जातो तितकें दूर प्रस्थान ठेवावें असें भरद्वाज म्हणतात. वसिष्ठाचें मत नगराबाहेर प्रस्थान असावें असें आहे. आणि कित्येकांचें मत तर पांचशें, दोनशें, निदान

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

दहा धनुष्यांवर प्रस्थान असावें असें आहे. ४ हात म्हणजे १ धनुष्य होय. ह्यांत पहिलें गर्गऋषीचें मत सोयीचें दिसतें म्हणून प्रस्थान घराच्या बाहेर शुद्धस्थलीं ठेवावें म्हणजे झालें.

प्रयाणसमयीं शकुनांचें महत्त्व.

नक्षत्रवारैस्तिथिभिश्च लग्नैः कार्यं न किंचिच्छकुने विरुद्धे ।
दोषेपि तेषां शकुनेऽनुकूले सदैव सिद्ध्यंति समीहितार्थाः ॥ ५२ ॥

नक्षत्र, वार, तिथि, लग्न इत्यादि योग शुभ असून निघतेवेळीं जर अशुभ शकुन झाले तर त्या शुभ योगांचा कांहींच उपयोग होत नाहीं; आणि नक्षत्रवारादि पंचांगशुद्धि नसूनही जर गमनसमयीं शुभ शकुन झाले तर त्या शकुनांच्या सूचनेनें इष्टकार्य घडून येतें; म्हणून शुभाशुभ शकुनांविषयीं कांहीं सांगतों.

शुभशकुन.

विप्राश्वेभफलान्नदुग्धदधिगोसिद्धार्थपद्मांबरं ।
वेश्या वाद्यमयूरचाषनकुला बद्धैकपश्वामिषं ॥
सद्वाक्यं कुसुमेक्षुपूर्णकलशच्छत्राणि मृत्कन्यका ।
रत्नोष्णीषसितोक्षमद्यससुतस्त्रीदीप्तवैश्वानराः ॥ ५३ ॥
आदर्शांजनधौतवस्त्ररजका मीनाज्यसिंहासनं ।
शावं रोदनवर्जितं ध्वजमधुच्छागास्त्रगोरोचनम् ॥
भारद्वाजनृयानवेदनिनदा मांगल्यगीतांकुशा ।
दृष्टाः सत्फलदाः प्रयाणसमये रिक्तो घटः स्वानुगः ॥ ५४ ॥

एकाहून अधिक ब्राह्मण, अश्व, हत्ती, फळें, शिजलेलें अन्न, दूध, दहीं, धेनु, सिद्धार्थ म्हणजे शुभ्रशिरस, कमल, पांढरें वस्त्र, वेश्या, वाद्यें, मोर, चाषपक्षी, मुंगुस, बांधलेला पशु, मांस, शुभवाक्यें कानावर येणें, फुलें, ऊंस, भरलेला कलश, छत्र, ओली माती, कन्या, रत्नें, उष्णीष म्हणजे पागोटें, पांढरा बैल, मद्य, अपत्यासह सुवासिनी स्त्री, प्रदीप्त अग्नि, आरसा, काजळ, धूतवस्त्रांसह परीट, मासे, तूप, सिंहासन, बरोबर असलेले लोक रडत नसतील असें प्रेत, पताका, मध, छाग म्हणजे बोकड, धनुष्यादि अस्त्रें, गोरोचन, भारद्वाजपक्षी, मेणा, पालखी वगैरे नरयानें, वेदघोष, मंगल पदार्थ, गायन, हत्तीचा अंकुश, इत्यादि शकुन गमनसमयीं शुभ होत. गमनकर्त्यांच्या मागें रिकाम्या घागरी आल्या असतांही शुभ होत. हे शकुन आपोआप झाले असतां निश्चयेंकरून इष्ट फलदायक होतात. आणि मुद्दाम घडवून आणले असतां मात्र गौण किंवा निष्फल समजावे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

अशुभशकुन.

वंध्याचर्मतुषास्थिसर्पलवणांगारेंधनक्लीबविट्ट ।
तैलोन्मत्तवसौषधारिजटिलप्रव्राट्तृणव्याधिताः ॥
नग्नाभ्यक्तविमुक्तकेशपतितव्यंगक्षुधार्ता असृक् ।
स्त्रीपुष्पं सरटः स्वगेहदहनं मार्जारयुद्धं क्षुतं ॥ ५५ ॥
काषायी गुडतक्रपंकविधवाकुब्जाः कुटुंबे कलिः ।
वस्त्रादेः स्खलनं लुलायसमरं कृष्णानि धान्यानि च ।
कार्पासं वमनं च गर्दभरवो दक्षेतिरुड्गर्भिणी ।
मुंडार्द्रांबरदुर्वचोऽन्धवधिरोदक्या न दृष्टाः शुभाः ॥ ५६ ॥

वंध्या स्त्री, पश्वादिकांचें चर्म, धान्याचा कोंडा, हाडें, साप, मीठ, निर्धूम निखारे, लांकडें, नपुंसक, विष्ठा, तेल, मद्यादिकांनीं उन्मत्त झालेला, चरबी, औषध, आपला शत्रु, जटा वाढविलेला, संन्यासी, गवत, रोगी मनुष्य, नग्न मनुष्य, अंगाला तेल लावलेला, केश मोकळे असलेला, जातिभ्रष्ट, व्यंग, भुकेलेला, रक्त, स्त्रियांचें आर्तव, सरडा, स्वगृहाचें दहन, मांजरांचें भांडण, शिंक, भगवें वस्त्र परिधान केलेला, गुड, तक्र, चिखल, विधवा स्त्री, कुबडा मनुष्य, कुटुंबांत भांडण, वस्त्रांत पाय अडखळणें, रेड्याचें युद्ध, काळें धान्य, कापूस, वांती, उजवीकडे गाढवांचा शब्द, अतिशय रागावणें, गर्भवती स्त्री, क्षौर केलेला, ओलें वस्त्र नेसलेला, दुष्ट भाषण बोलणें किंवा ऐकणें, आंधळा, बहिरा, रजस्वला स्त्री इत्यादिकांचें दर्शन हीं प्रयाणकाळीं अशुभ होत.

अपशकुनांचा परिहार.

आद्येऽपशकुने स्थित्वा प्राणानेकादश व्रजेत् ।
द्वितीये षोडश प्राणांस्तृतीये न क्वचिद्व्रजेत् ॥ ५७ ॥

प्रयाणाला निघतेसमयीं प्रथम अपशकुन झाला तर ११ प्राणांपर्यंत थांबून, नंतर अवश्य गेलेंच पाहिजे असें असेल तर, जावें. १० दीर्घ अक्षरें उच्चारण्यास जो अवधि लागतो त्यास "प्राण" असें म्हणतात. दुसऱ्या खेपेस अपशकुन झाला असतां १६ प्राणांपर्यंत थांबून नंतर जावें. तिसऱ्या खेपेस अपशकुन झाला असतां मात्र कधींही जाऊं नये. कित्येकांच्या मतें पहिल्या खेपेस ८ व दुसऱ्या खेपेस १६ प्राणायाम हातपाय धुवून करावे व नंतर जावें. प्रणवपूर्वक त्रिरावृत्ति गायत्रीमंत्र पठन केला असतां एक प्राणायाम होतो. कित्येकांच्या मतें 'वाराणस्यां दक्षिणे भागे कुर्कुटो नाम वै द्विजः । तस्य स्मरणमात्रेण भवेद्दुःशकुनः शुभं' ॥ या मंत्राचा जप करावा म्हणजे दुःशकुनांचा परिहार होतो. अपशकुन झाला असतां निदान विष्णुस्मरण करून नंतर पुढें जावें.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

प्रयाणासंबंधीं नवम वाराचा निषेध.

प्रवेशान्निर्गमं तस्मात्प्रवेशं नवमे तिथौ ।
नक्षत्रे च तथा वारे नैव कुर्यात्कदाचन ॥ ५८ ॥

प्रयाण करून पुनः घरीं परत येणें तें प्रयाणदिवसापासून नवव्या दिवशीं, नवव्या नक्षत्रावर आणि नवव्या तिथीवर येऊं नये. निदान नवव्या वारीं तरी गृहप्रवेश करूं नये. तसेंच पहिल्या प्रयाणदिवसापासून किंवा प्रयाणाहून घरीं परत आल्या दिवसापासून नवव्या वारीं, नवव्या तिथीस व नवव्या नक्षत्रीं पुनः प्रयाण करूं नये.

घातचक्रम्.

मासाः—घातमासाः क्रमान्मेषात् कार्तिको मार्गशीर्षकः ।
आषाढपौषौ ज्येष्ठश्च भाद्रमाघाश्विनास्तथा ।
श्रावणो माधवश्चैत्रः फाल्गुनः कथितो बुधैः ॥ ५९ ॥

तिथयः—मेषवृश्चिकयोर्नंदा भद्रामिथुनकर्कयोः ।
सिंहधन्वो जया प्रोक्ता रिक्तास्तौलिननक्रयोः ।
कन्यावृषभमीनेषु पूर्णा घाततिथिः स्मृता ॥ ६० ॥

वाराः—रविः शनिः शशी सौम्यः शनिः शनिगुरू भृगुः ।
भृगुः कुजो गुरुः शुक्रो घातवाराश्च मेषभात् ॥ ६१ ॥

नक्षत्राणि—मघा हस्तस्तथा स्वाती राधा मूलं श्रवस्तथा ।
शततारा रेवती च भरणी रोहिणी स्मृता ।
आर्द्राश्लेषा जन्मराशौ घातधिष्ण्यान्यजादितः ॥ ६२ ॥

चंद्राः—भूपंचनंदा यमषट्दिशाश्च, वह्न्यद्रिवेदा वसुरुद्रसूर्याः ।
मेषादिकानां क्रमशो भवंति यात्रासु युद्धेषु च घातचंद्रः ॥ ६३ ॥

लग्नानि—भूमिद्व्यब्ध्यद्रिदिक्सूर्यागाष्टांकेशाग्निसायकाः ।
मेषादिघातलग्नानि यात्रायां वर्जयेत्सुधीः ॥ ६४ ॥

स्त्रीणां घा० चं०—भूनागाश्वांकवेदाग्निरसाश्व्याशाशिवेषुभिः ।
सूर्यैश्च प्रमिता मेषात् घातचंद्रा मृगीदृशाम् ॥ ६५ ॥

घातप्रकरणीं वर्ज्य कृत्यें.

घातचक्रमिदं वर्ज्यं प्रयाणे राजदर्शने ।
विवादे वाहनारोहे युद्धभैषज्यसेवने ॥ ६६ ॥
न धारयेन्नवं वस्त्रं घाताख्ये नवभूषणम् ।
सर्वमंगलकार्येषु घातचक्रं न चिंतयेत् ॥ ६७ ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

द्वादशराशिपरत्वें घातवारादि कोष्टक.

राशि.	मास.	तिथि.	वार.	नक्षत्र.	योग.	करण.	प्र.	ल.	पु.चं.	स्त्री.चं.
मेष.	कार्तिक.	नंदा.	रवि.	मघा.	विष्कं.	बव.	१	१	१	१
वृषभ.	मार्ग.	पूर्णा.	शनि.	हस्त.	शुक्ल.	शकुनी.	४	२	५	८
मिथुन.	आषा.	भद्रा.	सोम.	स्वाती.	परि.	चतुष्प.	३	४	९	७
कर्क.	पौष.	भद्रा.	बुध.	अनु.	व्याघा.	नाग.	१	७	२	९
सिंह.	ज्येष्ठ.	जया.	शनि.	मूल.	धृति.	बव.	१	१०	६	४
कन्या.	भाद्र.	पूर्णा.	शनि.	श्रव.	शूल.	कौल.	१	१२	१०	३
तुला.	माघ.	रिक्ता.	गुरु.	शत.	शूल.	तैति.	४	६	३	६
वृश्चिक.	आश्वि.	नंदा.	शुक्र.	रेव.	व्यति.	गर.	१	८	७	२
धन.	श्रावण.	जया.	शुक्र.	भर.	वरी.	तैतिल.	१	९	४	१०
मकर.	वैशाख.	रिक्ता.	मंगळ.	रोहि.	वैधृति.	शकुनी.	४	११	८	११
कुंभ.	चैत्र.	जया.	गुरु.	आर्द्रा.	गंड.	किंस्तुघ्न	३	३	११	५
मीन.	फाल्गुन	पूर्णा.	शुक्र.	आश्ले.	वैधृति.	चतुष्प.	४	५	१२	१२

घातचंद्र, घातवार, घाततिथि किंवा घातनक्षत्र असेल त्या दिवशीं कोणत्याही गांवाला जाऊं नये. तसेंच नवीन वस्त्र व दागिना धारण करूं नये किंवा कोणतेंही शुभ कार्य करूं नये. परंतु चौल, उपनयन, विवाह अन्नप्राशन इत्यादि मंगलकार्यें करण्यास घातवार घातचंद्र इत्यादिकांचा दोष नाहीं. तसेंच, एक दिवसाचा प्रवास असतां घातवारादिकांचा दोष मानूं नये. नंदाभद्रादि संज्ञा पृष्ठ २३ मध्यें पहा.

गोरक्षमतें गमनास तिथिचक्र.

मासे शुक्लादिके पौषे तिथिःप्रतिपदादितः ।
द्वितीयाद्यास्तु माघेस्युस्तृतीयाद्यास्तु फाल्गुने ॥ ६८ ॥
एवं चान्येषु मासेषु तिथ्यो द्वादशसंज्ञकाः ।
तृतीयादित्रये यत्तत्रयोदश्यादिके फलम् ॥ ६९ ॥
याने प्राच्यादि काष्ठासु वक्ष्ये द्वादशधा क्रमात् ।
सौख्यं शून्यं धनार्तिश्च लाभः प्रीतिर्भयं धनम् ॥ ७० ॥
कष्टं सौख्यं कलिर्मृत्युः शून्यं प्राच्यां फलं क्रमात् ।
क्लेशो नैःस्वं व्यथा सौख्यं द्रव्याप्तिर्लाभपीडने ॥ ७१ ॥
सौख्यं लाभो व्ययो लाभः सौख्यं याम्यदिशि ध्रुवम् ।
भयं नैःस्वं प्रियाप्तिश्च भद्रं द्रव्यं मृतिर्धनम् ।
क्लेशो लाभोऽर्थसिद्धिः स्वलाभो मृत्युश्च पश्चिमे ॥ ७२ ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

धनं मित्रं धनं लाभः सौख्यं लाभोऽन्यथा सुखम् ।
कष्टं द्रव्यत्वशून्यत्वं कष्टमुत्तरदिग्बलम् ॥ ७३ ॥

याचा अर्थ कोष्टकरूपानें खालीं दिला आहे त्यावरून ध्यानीं येईल. कोष्टकांत द्वादशीपर्यंत तिथि आहेत. कारण तृतीया, चतुर्थी व पंचमी यांचीं फळें तींच अनुक्रमें त्रयोदशी, चतुर्दशी व पूर्णिमा यांचीं फळें जाणावीं. अमावास्या सर्वदा प्रयाणास वर्ज्य करावी. या मुहूर्तांवर त्या त्या महिन्यांत त्या त्या तिथींना व त्या त्या दिशांना गमन केलें असतां कोणताही कुयोग किंवा घातवारादिक यांचा दोष नाहीं. आतां कोष्टक कसें पहावें हें सांगतों. पहिल्या आडव्या कोष्टकांत पौष मासांतील प्रतिपदेला, माघ द्वितीयेला, फाल्गुन तृतीयेला किंवा चैत्रचतुर्थीला इत्यादि सर्व महिन्यांच्या प्रथम कोष्टकांतील तिथींना पूर्वेस गमन केलें असतां सौख्य, दक्षिणेस क्लेश, पश्चिमेस भय व उत्तरेस द्रव्यप्राप्ति, याप्रमाणें सर्व कोष्टक पहावें.

पौ	मा.	फा.	चै.	वै.	ज्ये.	आ.	श्रा.	भा.	आ.	का.	मा.	पूर्व	दक्षिण	पश्चिम	उत्तर
१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२	सौख्य	क्लेश	भीति	धनप्रा.
२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२	१	शून्य	दरिद्र	दरिद्र	मित्रला.
३	४	५	६	७	८	९	१०	११	१२	१	२	धननाश	व्यथा	इष्टप्राप्ति	द्रव्यप्रा.
४	५	६	७	८	९	१०	११	१२	१	२	३	लाभ	सुख	कल्याण	लाभ
५	६	७	८	९	१०	११	१२	१	२	३	४	प्रीति	द्रव्यप्रा.	द्रव्यप्रा.	सुख
६	७	८	९	१०	११	१२	१	२	३	४	५	भय	लाभ	मृत्यु	लाभ
७	८	९	१०	११	१२	१	२	३	४	५	६	धनलाभ	पीडा	धनप्रा.	सुख
८	९	१०	११	१२	१	२	३	४	५	६	७	कष्ट	सुख	क्लेश	सुख
९	१०	११	१२	१	२	३	४	५	६	७	८	सुख	लाभ	लाभ	कष्ट
१०	११	१२	१	२	३	४	५	६	७	८	९	कलह	व्यय	अर्थला.	द्रव्यला.
११	१२	१	२	३	४	५	६	७	८	९	१०	मृत्यु	लाभ	अर्थला.	शून्य
१२	१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	शून्य	सुख	मृत्यु	कष्ट

चरादियोग.

रविवारादि सातवारीं विशिष्ट नक्षत्रें किंवा विशिष्ट तिथि आल्यामुळें जे निरनिराळे योग उत्पन्न होतात ते खालील कोष्टकांत दाखविले आहेत, त्यांचीं फळें त्यांच्या नांवाप्रमाणें जाणावीं.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

योग.	रवि	सोम	मंगळ	बुध	गुरु	शुक्र	शनि
चर	पू.भा.	आर्द्रा	विशा०	रोहि०	पुष्य	मघा	मूळ
ककच	१२ ति०	११ ति०	१० ति०	९ ति०	८ ति०	७ ति०	६ ति०
हुताशन	द्वाद०	षष्ठी	सप्त०	अष्ट०	नव०	दश०	एका०
विष	चतुर्थी	षष्ठी	सप्त०	द्विती०	अष्ट०	नव०	सप्त०
मृत्युदा	१।६।११	२।७।१२	१।६।११	४।९।१४	२।७।१२	३।८।१३	५।१०।१५
सिद्धि	०	०	३।८।१३	२।७।१२	५।१०।१५	१।६।११	४।९।१४
उत्पात	विशा०	पू.षा.	धनि०	रेव०	रोहि०	पुष्य	उत्त.फा.
काण	ज्येष्ठा	अभि०	पू.भा.	भर०	आर्द्रा	मघा	चित्रा
सिद्धि	मूळ	श्रवण	उत्त.भा.	कृत्ति०	पुन०	पू.फा.	स्वाती
यमदंष्ट्र	मघा	मूळ	भर०	पुन०	अश्वि०	रोहि०	श्रव०
	धनि०	विशा०	कृत्ति०	रेव०	उ.षा.	अनु०	शत०
मुसलवज्र	भर०	चित्रा	उ.षा.	धनि०	उ.फा.	ज्येष्ठा	रेव०

सार्प व संवर्त योग.

द्वितीयेला अनुराधा, पंचमीला मघा, एकादशीला रोहिणी, तृतीयेला तीन्ही उत्तरा, नवमीला कृत्तिका, त्रयोदशीला चित्रा स्वाती, षष्ठीला रोहिणी आणि अष्टमीला पूर्वाभाद्रपदा अशा तिथिनक्षत्रोत्पन्न योगाला सार्पयोग म्हणतात. तसेंच रविवारीं सप्तमी व बुधवारीं प्रतिपदा असतां संवर्तनामक योग होतो. हे दोन्ही योग शुभकार्यांस निंद्य आहेत.

कुलिकादि दुर्मुहूर्त.

मागें पृष्ठ ४५ मध्यें कुलिकादि मुहूर्त कसे उत्पन्न होतात हें संक्षेपतः सांगितलें आहे. त्याची स्पष्ट समजूत होण्यासाठीं कोष्टकरूपानें दिवारात्रीचें मुहूर्त येथें देतों. मुहूर्त म्हणजे दोन घटिकांचा काल. वारांच्या खालीं जे अंक दिले आहेत, त्याची दुप्पट करावी म्हणजे त्या दिवशीं त्या वेळेला तो मुहूर्त असतो. जसें रविवारीं १४×२=२८ म्हणजे २६ घटिकांपासून २८ घटिकांपर्यंत दोन घटिकांचा काल हा कुलिक मुहूर्त जाणावा. याचप्रमाणें दिवारात्रीचे मुहूर्त पहावे. दिवसाच्या मुहूर्तांत १ वजा केला म्हणजे रात्रीचे मुहूर्त होतात.

	र.	चं.	मं.	बु.	गु.	शु.	श.	
दिवसाचे	१४	१२	१०	८	६	४	२	कुलिक
	६	४	२	१४	१२	१०	८	कंटक
	८	६	४	२	१४	१२	१०	कालवेला
	१०	८	६	४	२	१४	१२	यमघंट
रात्रीचे	१३	११	९	७	५	३	१	कुलिक
	५	६	१	१३	११	९	७	कंटक
	७	५	३	१	१३	११	९	कालवेला
	९	७	५	३	१	१३	११	यमघंट

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

वास्तुमुहूर्तविचार.

ग्रामयोजना.

स्वनामराशितो ग्रामराशिर्द्व्यंकेषुदिक्शिवैः ।
संमितश्चेत्तदा स्वस्य तद्ग्रामे वास उत्तमः ॥ ७४ ॥
एकभे सप्तमे ग्रामे वैरं, हानिस्त्रिषष्ठगे ।
तुर्याष्टद्वादशे रोगो ग्रामराशौ स्वनामभात् ॥ ७५ ॥

घर बांधणाराच्या व्यावहारिक नांवाच्या राशीपासून, ज्या गांवांत घर बांधावयाचें असेल, त्या गांवाच्या राशीपर्यंत मोजून २।९।५।१०।११ इतकी संख्या आली असतां तो गांव घर बांधावयास शुभ होय. १।७ असतां वैर, ३।६ असतां हानि आणि ४।८।१२ असतां रोगोत्पत्ति याप्रमाणें जाणावें.

घर बांधण्यास,

काकिणी व ऋण—धनविचार.

स्ववर्गं द्विगुणं कृत्वा पुरवर्गान्वितं, गजैः ।
भजेच्छेषास्तु काकिण्यः कार्याश्चैवं परस्परम् ॥ ७६ ॥
अधिका यस्य काकिण्यो भवेदन्यस्य सोऽर्थदः ।
इत्थं काकिणिकाधिक्ये निवसेन्नगरे नरः ॥ ७७ ॥
स्ववर्गं द्विगुणं कृत्वा परवर्गेण योजयेत् ।
अष्टभिस्तु हरेद्भागं योऽधिकः स ऋणी भवेत् ॥ ७८ ॥

घर बांधणाऱ्या मनुष्याच्या नामाक्षराचा जो वर्गांक असेल त्याची दुप्पट करून त्यामध्यें गांवाच्या नामाक्षराच्या वर्गाचा अंक मिळवावा. त्या संख्येस आठांनीं भागावें. जो अंक बाकी राहील त्याला त्या मनुष्याच्या काकिणी अशी संज्ञा आहे. त्याचप्रमाणें गांवाच्या नांवाच्या वर्गांकाची दुप्पट करून त्यांत घर बांधणाऱ्याच्या नामाक्षराचा वर्ग मिळवून त्या संख्येस आठांनीं भागावें, बाकी राहील ती गांवाची काकिणी जाणावी. ज्याच्या बाकीचा अंक अधिक असून दुसऱ्या बाकींतून वजा जाणार नाहीं तो ऋणी व ज्याचा शेषांक कमी असून दुसऱ्या शेषांकांतून वजा जाईल तो धनी, म्हणजे अर्थप्राप्ति करून देणारा असें जाणावें. उदाहरणार्थ, घर बांधणाऱ्या मनुष्याचें नांव नारायण आहे व गांवाचें नांव चंद्रपूर आहे. नारायण या नांवांतील आद्याक्षर 'न' हें त वर्गांतील अक्षर आहे. (अ[1] क[2] च[3] ट[4] त[5] प[6] य[7] श[8] असे आठ वर्ग आहेत. मागें पृष्ठ १०७ मध्यें पहा.) 'त' वर्ग हा पांचवा वर्ग आहे; पांचाची दुप्पट १० यांत चंद्रपुराचा वर्ग अंक ३ मिळविला. बेरीज १३ झाली, तिला ८ नीं भागिलें. बाकी ५ राहिली. ह्या नारायणाच्या काकिणी झाल्या. आतां चंद्रपुराच्या काकिणी काढा.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

चंद्रपुराचा वर्गांक ३ याची दुप्पट ६ यांत नारायणाचा वर्गांक ५ मिळवा = ११ ÷ ८ = बाकी ३ ह्या चंद्रपूरच्या काकिणी होत. ह्या ३ अंकांतून नारायणाचा काकिणीचा ५ अंक वजा जात नाहीं, म्हणून नारायण ऋणी झाला; अर्थात् चंद्रपूर हें स्थान नारायणाच्या राशीस अनिष्ट समजावें. याचप्रमाणें व्यापारांत किंवा अन्यत्र ऋणधन पहावें. आपल्या वर्गापासून पांचवा वर्ग हानिप्रद म्हणजे आपला शत्रु समजावा.

गृहासाठीं आयसाधन.

आयाः क्रमात् ध्वजो धूम्रः सिंहः श्वा वृषभः खरः ।
गजो ध्वांक्ष इमे ज्ञेयाः प्राज्ञैर्गेहादिकर्मसु ॥ ७९ ॥
विस्तारगुणिते क्षेत्रे व्यायामेऽथाष्टभिर्हते ।
शेषे ध्वजादितश्चायः प्रशस्तो विषमोऽखिलः ॥ ८० ॥
विषमायः शुभायैव समायः शोकदुःखदः ।
ध्वजः सिंहे तौ च गजे ह्येते गवि शुभप्रदाः ॥ ८१ ॥

गृहकर्त्याच्या हातानें मोजून गृहाची लांबीरुंदी दीर्घचतुरस्र असून दोन्ही (लांबीरुंदी) विषमसंख्यांक असावी. जसें १५ हात रुंदी तर ३५ हात लांबी इ०. क्षेत्रफळ म्हणजे घराची लांबी व रुंदी या दोहोंचा गुणाकार करून जे अंक येतील त्याला क्षेत्रफळ म्हणावें. क्षेत्रफळाच्या अंकांना ८ नीं भागून भागाकाराची बाकी राहील तिच्यावरून आय जाणावे, ते असे. १ बाकी असतां ध्वज, २ असतां धूम, ३ असतां सिंह, ४ श्वान, ५ वृषभ, ६ गर्दभ, ७ हत्ती आणि बाकी ८ असतां ध्वांक्ष असे अष्टविध आय आहेत. विषम आय म्हणजे १।३।५।७ असतां (ध्वज, सिंह, वृषभ व गज यांचे आय असतां) शुभ होत. अर्थात् बाकीचे अशुभ समजावे.

आयावरून द्वारदिशा.

ध्वजादिकाः सर्वदिशि ध्वजे मुखं कार्यं हरौ पूर्वयमोत्तरे तथा ।
प्राच्यां वृषे प्राग्यमयोर्गजेऽथवा पश्चादुदक्पूर्वयमे द्विजादितः ॥ ८२ ॥

ध्वज नामक आय असतां चारही दिशांना गृहाचें द्वार करावें. सिंह नामक आय असतां पूर्वेस, दक्षिणेस अथवा उत्तरेस द्वार करावें. वृष आय असतां पूर्वेस द्वार असावें. आणि हत्ती आय असतां पूर्वेला किंवा दक्षिणेला गृहाचें द्वार करावें. अथवा

ध्वजे प्रतीच्यां विप्राणां राज्ञां सिंहेऽप्युदङ्मुखम् ।
गजे शूद्रस्य याम्यास्यं विशः पूर्वामुखं वृषे ॥ ८३ ॥

सर्वसाधारणपणें ब्राह्मणांच्या गृहाचें द्वार पश्चिमेस, राजवाड्याचें द्वार उत्तरेस, शूद्रगृहाचें द्वार दक्षिणेस व वैश्याचें गृहद्वार पूर्वेस असावें, अशीं वर्णपरत्वें गृहाचीं द्वारें करण्याविषयीं सांगितलें आहे. किंवा ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र यांनीं अनुक्रमें ध्वज आय असतां पश्चिमेस, सिंह असतां उत्तरेस, हत्ती असतां दक्षिणेस आणि वृषभ असतां पूर्वेस द्वार करावें.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

गृहारंभास निषिद्ध काल.

रवौ गृहस्थो गृहिणी शशांके, धनं सिते देवगुरौ च सौख्यम् ।
विनाशमायाति बलेन हीने नीचस्थिते वास्तमुपागते वा ॥ ८४ ॥

गृहारंभाच्या वेळीं रवि, चंद्र, गुरु व शुक्र हे चार ग्रह गृहकर्त्यांच्या राशीला अनिष्ट नसावे. कारण, रवि जर निर्बली, अस्तंगत किंवा नीचीचा असेल तर गृहकर्त्यांची हानि करणारा होतो. तसेंच, चंद्र निर्बली असतां गृहकर्त्यांच्या पत्नीला अनिष्ट असतें. आणि निर्बली गुरु असतां त्या घरांत सुख होत नाहीं आणि शुक्र निर्बली असतां द्रव्यनाश होतो.

गृहारंभास नक्षत्रवारपरत्वें शुभाशुभयोग.

शुभयोग.

हस्तार्यमत्वाष्ट्रदस्रचतुरास्येंदुमेषु च ।
बुधेन सहितेष्वेषु धनपुत्रसुखप्रदम् ॥ ८५ ॥
पूर्वाषाढोत्तरा पुष्यैराश्लेषा रोहिणीमृगे ।
जीवयुक्ते गुरोर्वारे गेहं धान्यसुतप्रदम् ॥ ८६ ॥
अश्विनी शततारासु विशाखा आर्द्रचित्रके ।
धनिष्ठादिति संयुक्ते सशुक्रे शुक्रवासरे ।
कृतं गेहं शुभं ज्ञेयं कुबेरसदृशो भवेत् ॥ ८७ ॥

अशुभयोग.

पूर्वा-फाल्गुनि-षाढा च मघा मूलं तथैव च ।
कृत्तिका रेवती हस्तः सप्तके कुजसंस्थिते ।
कुजेऽह्नि निर्मितं गेहं भस्मसादग्निना भवेत् ॥ ८८ ॥
द्यूनांबरे यदैकोऽपि परांशस्थो ग्रहो गृहम् ।
अब्दान्तः परहस्तस्थं कुर्याच्चेद्वर्णपो बलः ॥ ८९ ॥
अजैकपादहिर्बुध्न्यशक्रमित्रानिलांतकैः ।
समंदैर्मंदवारे स्याद्रक्षोभूतयुतं गृहम् ॥ ९० ॥

शुभयोग—१ रोहिणी, अश्विनी, उत्तराफाल्गुनी, हस्त आणि चित्रा हीं नक्षत्रें बुधवारीं असतां किंवा या नक्षत्रांत बुध असतां जर गृहारंभ केला तर तें घर विपुल धनधान्य देतें. २ पूर्वाषाढा, तीन्ही उत्तरा, पुष्य, आश्लेषा, रोहिणी व मृग या नक्षत्रांत गुरु असेल किंवा हीं नक्षत्रें गुरुवारीं असून गृहारंभ केला तर तें घर धनधान्य व पुत्रपौत्रादिकांची वृद्धि करणारें होतें. ३ धनिष्ठा, शततारका, चित्रा,

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

विशाखा, अश्विनी, आर्द्रा हीं सहा नक्षत्रें शुक्रवारीं असतां किंवा ह्या सहा नक्षत्रीं शुक्र असतां त्या दिवशीं आरंभिलेलें घर अपार संपत्तीनें युक्त होतें.

अशुभयोग—१ पूर्वा, पूर्वाषाढा, मघा, मूळ, कृत्तिका, रेवती व हस्त हीं सात नक्षत्रें मंगळवारीं असतां किंवा मंगळ या सात नक्षत्रीं असतां जर गृहारंभ केला तर त्या घराला अग्नीचें भय असतें. २ गृहारंभाच्या इष्ट लग्नापासून सप्तमस्थानीं अथवा दशमस्थानीं असणारा कोणताही ग्रह आपल्या शत्रुग्रहाच्या नवांशामध्यें असेल आणि गृहकर्त्यांचा (मालकाचा) वर्णस्वामी निर्बली असेल तर लवकरच तें घर परहस्तीं जातें. परंतु मालकाचा वर्णस्वामी बलवान् असेल तर मात्र घर परहस्तीं जाणार नाहीं. (ब्राह्मणाचे वर्णस्वामी गुरु शुक्र, क्षत्रियांचे रवि-मंगळ, वैश्यांचा चंद्र, शूद्रांचा बुध, आणि अंत्यजांचा शनि हे ग्रह त्या त्या जातीला बलवान् समजावे.) ३ पूर्वाभाद्रपदा, उत्तराभाद्रपदा, ज्येष्ठा, अनुराधा, स्वाती व भरणी हीं सहा नक्षत्रें शनिवारीं असतां किंवा ह्या सहा नक्षत्रांत शनि असतां गृहारंभ केला तर त्या गृहांत भूतपिशाचादि वास करितात.

गृहनक्षत्राचा निषेध.

क्षेत्रमष्टाहतं धिष्ण्यैर्विभक्तं स्याद्गृहस्य भम् ।
गृहस्य तत्पतेस्त्वेकं नक्षत्रं चेन्मृतिप्रदं ।
राश्यैक्येऽयं तु दोषः स्यान्न दोषो भिन्नभे स्मृतः ॥ ९१ ॥
गृहभात्स्वामिभं गण्यं भक्तं च नवभिः पुनः ।
यच्छेषं सा भवेत्तारा सप्तपंचत्रिकाधमा ॥ ९२ ॥
राशिकूटादिकं सर्वं दंपत्योरिव चिंतयेत् ।
नैःस्वं द्विद्वांदशे नूनं त्रिकोणे त्वनपत्यता ॥ ९३ ॥
षडष्टके नैधनं स्यात् गेहं तत्कर्तृराशितः ।
एकनाडी प्रशस्ता स्याद्विरुद्धा भिन्ननाडिका ॥ ९४ ॥

गृहनक्षत्र आणि गृहकर्त्याचें जन्मनक्षत्र एक असतां अशुभ होय. क्षेत्रफळाला ८ नीं गुणून २७ नीं भागावें. बाकी राहील तो अंक गृहनक्षत्राचा समजावा. उदाहरणार्थ, रुंदी १३ × लांबी २५ = ३२५ हात क्षेत्रफळ झालें. याला २७ नीं भागून बाकी १ अंक राहिला. अर्थात् गृहनक्षत्र पहिलें म्हणजे अश्विनी होय. आतां गृहनक्षत्र आणि मालकाचें जन्मनक्षत्र एक असून जर भिन्न राशी असेल तर एक नक्षत्राचा दोष मानूं नये. तसेंच, गृहनक्षत्रापासून मालकाच्या जन्मनक्षत्रापर्यंत नक्षत्रें मोजून त्या अंकांस नवांनीं भागावें. बाकी ३।५।७ असेल तर अशुभ. एऱ्हवीं शुभ. तसेंच, मालकाच्या नक्षत्रापासून गृहनक्षत्रापर्यंत मोजावें. व शुभाशुभ जाणावें. नवांनीं भाग जात नसेल तर जे अंक येतील, तीच भागाकाराची बाकी समजावी. याच पद्धतीनें विवाहप्रकरणांत सांगितल्याप्रमाणें राशिकूट पहावें. अशुभ द्विद्वांदशकानें निर्धनत्व, नवपंचकानें अनपत्यत्व व षडष्टकानें हानि असें समजावें. गृहनक्षत्र

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

व मालकाचें नक्षत्र यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें राशी जाणाव्या. येथें एक नाडी असतां शुभ आणि विरुद्ध असतां अशुभ होय.

गृहाचे आयव्यय.

गेहनक्षत्रसंख्यांके नागतष्टे व्ययो भवेत् ।
वह्व्यायं शुभदं चाल्पव्ययं वेश्म न चान्यथा ॥ ९५ ॥

गृहनक्षत्राच्या संख्येला आठांनीं भागावें. जी बाकी उरेल तो व्ययाचा अंक समजावा. आणि त्याच गृहनक्षत्राच्या अंकांना तिहींनीं भागून जो अंक बाकी राहील तो लाभाचा अंक जाणावा. लाभाचा अंक व्ययाच्या अंकापेक्षां अधिक असतां शुभ आणि व्ययाचा अंक अधिक असतां अशुभ समजावें.

गृहनक्षत्रावरून राशी.

अश्विन्यादित्रयं मेषे मघातस्त्रितयं हरौ ।
मूलात्त्रयं धनुष्येवं द्वे द्वे मे शेषराशिषु ॥ ९६ ॥

अश्विनी, भरणी, कृत्तिका (१।२।३) या नक्षत्रांत गृहनक्षत्र असेल तर गृहाची मेषराशी; मघा, पूर्वा, उत्तरा (१०।११।१२) नक्षत्र असतां सिंह रास; आणि मूळ, पूर्वाषाढा व उत्तराषाढा (१९।२०।२१) असतां धनुराशी जाणावी. बाकी दोन दोन नक्षत्रांची अवकहडाचक्राप्रमाणें (मागें पृष्ठ ३८ पहा) एक एक रास समजावी. जसें—रोहिणी, मृग-वृषभ; आर्द्रा, पुनर्वसु-मिथुन इ०.

गृहारंभास लग्नशुद्धि.

लग्ने शुक्रे गुरौ, षष्ठे भौमसूर्यौ, सुखे भृगौ ।
त्रिगे मंदे रवौ, द्युने बुधे, वा पंचमे गुरौ ॥ ९७ ॥
केंद्रे गुरौ, बुधे चंद्रे व्योमे, लाभे रवौ तथा ।
मंदे कुजे, कृतं तिष्ठेन्मंदिरं शरदां शतम् ॥ ९८ ॥
शुक्रे स्वोच्चे तनौ वापि, गुरौ पातालगेऽथवा ।
शनौ स्वोच्चे लाभगे वा लक्ष्म्या युक्तं गृहं चिरम् ॥ ९९ ॥

चर लग्नें वर्ज्य करून स्थिर लग्नावर आणि द्विस्वभाव लग्नांच्या पूर्वार्धांमध्यें गृहारंभ करावा. गृहारंभसमयीं लग्नीं गुरु किंवा शुक्र, षष्ठस्थानीं मंगळ किंवा रवि; चतुर्थस्थानीं शुक्र, तृतीयस्थानीं शनि किंवा सूर्य, सप्तमस्थानीं बुध किंवा पंचमस्थानीं गुरु असे ग्रह असावे. अथवा केंद्रीं गुरु, दशमस्थानीं बुध, चंद्र; एकादशस्थानीं रवि, शनि किंवा मंगळ असा योग असतांही तें घर दीर्घकाल टिकतें. लग्नीं उच्चीचा शुक्र, चतुर्थस्थानीं उच्चीचा गुरु किंवा एकादशस्थानीं उच्चीचा शनि असे ग्रह गृहारंभसमयीं असतां तें घर चिरकाल लक्ष्मीयुक्त नांदतें. चंद्र १।६।८।१२ या स्थानीं नसावा. ३।६।११ ह्या स्थानीं पापग्रह शुभ होत.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

गृहारंभास मासतिथिनक्षत्रें.

वैशाखे फाल्गुने पौषे श्रावणे मार्गशीर्षके ।
गृहारंभप्रवेशौ स्तः स्तंभोच्छ्रायश्च शस्यते ।
ज्येष्ठकार्तिकमाघांश्च शुभदान्प्राह नारदः ॥ १०० ॥
त्यक्त्वा चतुर्दशीं षष्ठीं चतुर्थीमष्टमीममाम् ।
नवमीं च रविं भौमं गृहारंभो विधीयते ॥ १०१ ॥
पुष्ये मृगेऽनुराधायां धनिष्ठायुगुलोत्तरे ।
हस्तत्रये च रोहिण्यां रैवत्यां गृहमारभेत् ॥ १०२ ॥

वैशाख, फाल्गुन, पौष, श्रावण, मार्गशीर्ष हे महिने प्रथमतः गृहारंभ करण्यास गृहप्रवेश करण्यास आणि घराचा खांब उभा करण्यास प्रशस्त होत. त्याचप्रमाणें हीं कृत्यें करण्यास ज्येष्ठ, कार्तिक व माघ हेही महिने शुभ होत असें नारदमत आहे. चतुर्दशी, षष्ठी, चतुर्थी, अष्टमी, अमावास्या आणि नवमी ह्या तिथि वर्ज्य करून अन्य तिथींना व रवि आणि मंगळ हे वार वर्ज्य करून अन्य वारीं गृहारंभ करावा. पुष्य, मृग, अनुराधा, धनिष्ठा, शततारका, तिन्ही उत्तरा, हस्त, चित्रा, स्वाती, रोहिणी आणि रेवती हीं नक्षत्रें गृहारंभास शुभ होत. वैधृति, व्यतीपात, दग्ध, यमघंट व मृत्युयोग इत्यादि वर्ज्य करून चंद्रबल असेल तो दिवस गृहारंभास घ्यावा.

गृहारंभास वृषवास्तुचक्र.

रविभात्सप्त नेष्टानि शुभान्येकादशाष्टमात् ।
दश शेषाण्यनिष्टानि साभिजित् वृषवास्तुनि ॥ १०३ ॥

सूर्यनक्षत्रापासून दिवसनक्षत्रापर्यंत नक्षत्रें मोजावीं. त्यांत पहिलीं ७ नक्षत्रें अशुभ, त्याच्या पुढील ११ नक्षत्रें शुभ आणि त्यापुढील १० नक्षत्रें अशुभ होत. येथें अभिजित् नक्षत्र सुद्धां मोजावें. गृहादिकांच्या आरंभाला जीं नक्षत्रें उक्त आहेत तीं, ह्या वृषवास्तुचक्राप्रमाणें शुभ असतील तरच योजावीं.

घराचा पाया, कोणशिला व द्वारें इत्यादिकांस मुहूर्त.

अधोमुखैर्भैर्विदधीत खातं शिलास्तथा चोर्ध्वमुखैश्च पट्टं ।
तिर्यङ्मुखैर्द्वारकपाटयानं गृहप्रवेशो मृदुभिर्ध्रुवर्क्षैः ॥ १०४ ॥

अधोमुख नक्षत्रांवर म्हणजे भरणी, कृत्तिका, आश्लेषा, मघा, तिन्ही पूर्वा, विशाखा आणि मूळ ह्या नक्षत्रांवर, इतर दुष्ट योग वर्ज्य करून घराचा पाया खणावा. तसेंच, शुभ वारीं व शुभ तिथींना उर्ध्वमुख नक्षत्रें, म्हणजे आर्द्रा, पुष्य, श्रवण, तिन्ही उत्तरा, धनिष्ठा, शततारका आणि रोहिणी हीं नक्षत्रें पायाची पहिली कोणशिला बसविण्यास शुभ होत. तसेंच, ज्येष्ठा, पुनर्वसु, हस्त, अश्विनी, मृग,

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

अनुराधा, रेवती, स्वाती व चित्रा हीं नक्षत्रें घराचीं द्वारें व खिडक्या करण्यास प्रशस्त होत. आणि गृहप्रवेश करण्यास मृदु नक्षत्रें म्हणजे मृग, चित्रा, अनुराधा, रेवती आणि ध्रुवनक्षत्रें म्हणजे रोहिणी व तिन्ही उत्तरा हीं शुभ होत.

पाया खणण्यास शेषमुख पाहणें.

कन्यासिंहे तुलायां भुजगपतिमुखं शंभुकोणेऽग्निखातं ।
वायव्ये स्यात्तदास्यं त्वलिधनमकरे ईशखातं वदंति ॥
कुंभे मीने च मेषे निर्ऋतिदिशि मुखं खातवायव्यकोणे ।
चाग्ने कोणे मुखं वै वृषमिथुनगते कर्कटे रक्षखातम् ॥ १०५ ॥

कन्या, सिंह आणि तूळ ह्या लग्नीं सूर्य असतां शेषाचें मुख ईशान्येच्या कोंपऱ्याकडे असतें म्हणून त्या लग्नीं पाया खणावयाचा असतां प्रथम आग्नेय दिशेच्या कोणीं पाया खणावा. वृश्चिक, धन व मकर ह्या लग्नीं शेषमुख वायव्येस असतें म्हणून ईशान्य कोणीं खणावें. कुंभ, मीन व मेष ह्या लग्नीं शेषमुख नैर्ऋति दिशेस असतें म्हणून वायव्येस खणावें. वृषभ, मिथुन व कर्क ह्या लग्नीं शेषमुख आग्नेय दिशेस असतें म्हणून नैर्ऋति दिशेस खणावें. तात्पर्य, शेषाच्या मुखाकडे पाया न खणतां पृष्ठभागीं खोदावा.

कोणशिलास्थापन.

दक्षिणपूर्वे कोणे कृत्वा पूजां शिलां न्यसेत् प्रथमाम् ।
शेषाः प्रदक्षिणेन स्तंभाश्चैवं प्रतिष्ठाप्याः ॥ १०६ ॥
ध्रुवं दृष्ट्वाऽथवा स्मृत्वा कर्तव्यं वास्तुरोपणं ।
सायाह्नवर्ज्यदिवसे रात्रौ त्यक्त्वा महानिशाम् ॥ १०७ ॥

दक्षिण दिशेच्या अलीकडील कोपऱ्यांत म्हणजे आग्नेयीच्या कोणावर प्रथम शिलेची पूजा करून ती तेथें पुरावी. बाकीच्या शिला तशाच मार्गें पूर्वेकडे बसवीत यावें. म्हणजे पूर्व, उत्तर, पश्चिम या अनुक्रमानें शिलास्थापन करावें. आणि दक्षिणदिशेकडील शिला शेवटीं बसवाव्या. शिलास्थापन करितेवेळीं ध्रुवाकडे पहावें अथवा त्याचें स्मरण करावें. शिलास्थापन प्रातःकाळीं करावें. सायंकाळीं अथवा रात्रीं करूं नये.

स्तंभस्थापनास कूर्मचक्र व आद्यास मुहूर्त.

तिथिस्तु पंचगुणिता कृत्तिकाद्यृक्षसंयुता ।
तथा द्वादशमिश्रा च नवभागेन भाजिता ॥ १०८ ॥
जले वेदमुनिश्चंद्रः स्थले पंचद्वयं वसुः ।
त्रिषट्कनवचाकाशे त्रिविधं कूर्मलक्षणम् ॥ १०९ ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

जले लाभस्तथा प्रोक्तः स्थले हानिस्तथैव च ।
आकाशे मरणं प्रोक्तमिदं कूर्मस्य चक्रकम् ॥ ११० ॥

ज्या तिथीला स्तंभस्थापना करावयाची असेल त्या तिथीला ५ नीं गुणावें. आणि कृत्तिकानक्षत्रापासून दिवसनक्षत्रापर्यंत नक्षत्रें मोजून ते अंक त्यांत मिळवावे. नंतर त्या बेरजेंत १२ मिळवावे, आणि त्या सर्व बेरजेला नवांनीं भागावें. बाकी ४।७।१ असेल तर कूर्म जलांत आहे. तसेंच, बाकी ५।२।८ असतां कूर्म पृथ्वीवर आहे व ३।६।९ असतां कूर्म आकाशांत आहे असें जाणावें. यांतून कूर्म जलांत असतां शुभ व अन्यत्र असतां हानिकारक होय. प्रथम स्तंभाची पूजा करून त्यावर छत्री बांधून सुमुहूर्तावर आग्नेयदिशेकडे स्थिर व मृदु नक्षत्रीं स्तंभ उभा करावा. आडें घालण्याकरितां सूर्यनक्षत्रापासून दिवसनक्षत्रापर्यंत नक्षत्रें मोजावीं. त्यांत पहिलीं ३ नक्षत्रें अशुभ, पुढील १३ शुभ, पुढील ८ अशुभ व शेवटचीं ३ शुभ याप्रमाणें मोजून त्यांमध्यें शुभफलात्मक नक्षत्र असेल त्या दिवशीं व गृहप्रवेशोक्त नक्षत्र पाहून आडें घालावें.

गृहाचीं द्वारें.

द्वारस्योपरि यद्द्वारं द्वारस्यान्यच्च संमुखम् ।
व्ययदं तु यदा तच्च न कर्तव्यं शुभेप्सुभिः ॥ १११ ॥

तळमजल्यावरील एका द्वारावर माडीवरचें दुसरें द्वार किंवा घरामध्यें कोठेंही समोरासमोर द्वार ठेवणें हा योग व्ययदायक होय असें मानिलेलें आहे; म्हणून स्वहितेच्छु जनांनीं अशीं द्वारें घराला ठेऊं नयेत.

दाराची चौकट बसविण्यास नक्षत्रें.

अश्विन्यामुत्तराहस्तपुष्यश्रुतिमृगेषु च ।
रोहिण्यां स्वातिभेऽन्त्ये च द्वारशाखां प्ररोपयेत् ॥ ११२ ॥

अश्विनी, तिन्ही उत्तरा, हस्त, पुष्य, श्रवण, मृग, रोहिणी, स्वाती व रेवती ह्या नक्षत्रीं शुभवारीं व स्थिरलग्नीं प्रथम द्वाराची चौकट बसवावी.

गृहाची विभागयोजना.

स्नानागारं दिशि प्राच्यामाग्नेय्यां पचनालयम् ।
याम्यायां शयनागारं नैर्ऋत्यां शस्त्रमंदिरम् ॥ ११३ ॥
वायव्यां पशुगेहं च प्रतीच्यां भोजनालयम् ।
भांडकोशं चोत्तरस्यां ईशान्यां देवमंदिरम् ॥ ११४ ॥

घराच्या पूर्व दिशेस स्नानाची जागा असावी. आग्नेय दिशेस स्वयंपाकगृह, दक्षिणेस शयनस्थान, नैर्ऋत्य दिशेस शेतकीचीं व संसारोपयोगी हत्यारें ठेवण्याची जागा, वायव्येस गुरांचा गोठा, पश्चिमेस जेवावयास बसण्याची जागा, उत्तरेस भांडार व धान्यादि वस्तुसंग्रह करण्याची जागा व ईशान्येस देवमंदिर असावें.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

गृहांत वापी—कूप करण्याच्या दिशा.

कूपे वास्तोर्मध्यदेशेऽर्थनाशस्त्वैशान्यादौ पुष्टिरैश्वर्यवृद्धिः ।
सूनोर्नाशः स्त्रीविनाशो मृतिश्च संपत्पीडा शत्रुतः स्याच्च सौख्यम् ११५

घराच्या मध्यभागीं विहीर केली असतां धननाश होतो. ईशान्येस कूप केल्यानें पुष्टि, पूर्वेस ऐश्वर्यवृद्धि, आग्नेयीला गृहस्वामीच्या पुत्राला वाईट, दक्षिणेला स्त्रीचा नाश, नैर्ऋत्येला कूप असतां गृहस्वामीला मृत्युप्रद, पश्चिमेला संपत्तिदायक, वायव्येला शत्रूपासून त्रास, आणि उत्तरेस विहीर केल्यानें घराच्या यजमानाला सुख होतें. म्हणून ईशान्य, पूर्व, पश्चिम व उत्तर या चार दिशांनाच विहीर असावी. विहीर, तलाव इत्यादि खणण्याचा मुहूर्त पुढील प्रकरणांत पृष्ठ २७१ मध्यें दिला आहे.

वास्तु वगैरे शांतींस व गृहप्रवेशास मुहूर्त.

त्र्युत्तरा रोहिणी हस्त धनिष्ठा शततारका ।
पुनर्वसु मघा स्वाती अश्विनी रेवती तथा ॥ ११६ ॥
पुष्यानुराधा श्रवणं चित्रा मूलं तथैव च ।
वास्तुपूजनमेतेषु नक्षत्रेषु करोति यः ।
स प्राप्नोति नरो लक्ष्मीमिति प्राह पराशरः ॥ ११७ ॥
माघफाल्गुनवैशाखज्येष्ठाः शस्ता नवे गृहे ।
कार्तिकः श्रावणो मार्गो गृहे जीर्णे प्रशस्यते ।
चैत्रो मासः कुजार्कौ च रिक्तादग्धास्त्वमा मृतिः ॥ ११८ ॥
दुष्टचंद्र इमे त्याज्या नवगेहप्रवेशने ।
चरे लग्ने चरांशस्थे प्रवेशो न शुभावहः ॥ ११९ ॥
शुभैः केंद्रत्रिकोणायद्विगैरायत्रिषष्ठगैः ।
पापैः शुद्धेऽष्टमे तुर्ये विजनुर्भाष्टमेंगके ॥ १२० ॥

तिन्ही उत्तरा, रोहिणी, हस्त, धनिष्ठा, शततारका, पुनर्वसु, मघा, स्वाती, अश्विनी, रेवती, श्रवण, अनुराधा, पुष्य, चित्रा व मूल हीं नक्षत्रें वास्तुशांतीस किंवा इतर कोणत्याही शांतीस शुभ होत. तसेंच, माघ, फाल्गुन, वैशाख व ज्येष्ठ हे उत्तरायणांतील महिने नव्या घरांत प्रवेश करण्यास शुभ होत; आणि नवीन बांधलेल्या जुन्या घरांत जाण्यास श्रावण, मार्गशीर्ष व कार्तिक हे महिने शुभ होत. चैत्रमास, मंगळ व रविवार, रिक्तातिथि, दग्ध व मृत्युयोग, अमावास्या, दुष्ट चंद्र, जन्मस्थ चंद्र, व जन्मलग्न हे योग नव्या घरांत जाण्यास फारच वाईट आहेत. तसेंच चर म्हणजे मेष, कर्क, तूळ व मकर हीं लग्नें व ह्यांचे नवांश गृहप्रवेशास अशुभ होत. गृहप्रवेश ज्या लग्नीं करावयाचा त्या लग्नापासून शुभग्रह केंद्रांत, त्रिकोणांत, किंवा

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

११।२।३ या स्थानीं असावे. ३।६।११ या स्थानीं पापग्रह असावे, व ४।८।१२ या स्थानीं एकही ग्रह नसावा. गृहप्रवेश दिवसा करणें शुभ होय, म्हणून रात्रीं नव्या घरांत जाऊं नये. दिवसा मुहूर्त नसतां अडचणीच्या प्रसंगीं मात्र रात्रीं सुमुहूर्तावर गृहप्रवेश करावा. जुन्या घरांत प्रवेश करण्यास सिंहस्थ किंवा गुरु-शुक्रास्त इत्यादिकांचा दोष नाहीं. पंचांगशुद्धि मात्र असावी.

गृहप्रवेशास वामगत सूर्य.

रंध्रात्मंजकुटुंबायांत्पंचमे भास्करे स्थिते ।
पूर्वाशादि गृहे श्रेष्ठं क्रमाद्द्वारा स्तुतो रविः ॥ १२१ ॥

प्रवेशाच्या इष्टलग्नापासून ८।९।१०।११।१२ ह्या पांच स्थानीं सूर्य असतां पूर्वेकडील द्वारानें गृहांत प्रवेश करणाराला तो वामगत होतो. तसेंच, दक्षिणद्वार असलेल्या गृहांत प्रवेश करणाराला ५।६।७।८।९ ह्या पांच स्थानीं सूर्य असतां, पश्चिमाभिमुख गृहांत प्रवेश करणाराला २।३।४।५।६ ह्या पांच स्थानीं सूर्य असतां आणि उत्तरद्वार असलेल्या गृहांत ११।१२।१।२।३ ह्या पांच स्थानीं सूर्य असतां तो वामगत असतो असें जाणावें. वामगत सूर्य गृहप्रवेशसमयीं शुभ जाणावा.

गृहप्रवेशास कलशचक्र.

प्रवेशे कलशेऽर्कक्षीत्पंचर्नागांगाष्टर्षट्क्रमात् ।
अशुभं च शुभं ज्ञेयमशुभं च शुभं तथा ॥ १२२ ॥
कृत्वार्कं वामतो गेहे विधायाग्रे द्विजन्मनः ।
जलपूर्णघटं धृत्वा मांगल्येन गृहं विशेत् ॥ १२३ ॥

गृहप्रवेशसमयीं कलशचक्र असावें. सूर्यनक्षत्रापासून दिवसनक्षत्रापर्यंत नक्षत्रें मोजून पहिलीं ५ नक्षत्रें अशुभ. त्यापुढें ८ नक्षत्रें शुभ. पुढील ८ नक्षत्रें अशुभ व पुढील ६ नक्षत्रें शुभ होत. ह्या कलशचक्राचें तात्पर्य असें कीं, सूर्यनक्षत्रापासून प्रवेशाचें दिवसनक्षत्र मोजून ६।७।८।९।१०।११।१२ व १३ त्याचप्रमाणें २२।२३। २४।२५।२६ व २७ यांपैकीं कोणताही अंक आला असतां शुभ. बाकीचे म्हणजे १ ते ५ व १४ ते २१ हे अंक अशुभ होत. यालाच कलशचक्र म्हणतात. पूर्वोक्त नक्षत्रांपैकीं गृहप्रवेशास जें नक्षत्र घ्यावयाचें तें कलशचक्रयुक्त असावें. गृहप्रवेशसमयीं वर लिहिल्याप्रमाणें सूर्य वामभागीं करून, पुढें अनेक सदाचरणी व विद्वान् ब्राह्मण असून, हातांत पाण्यानें भरलेली घागर घेऊन मंगलमंत्र व मंगलवाद्ययुक्त गृहाधिकारी पुरुषानें पत्नीसह व कुटुंबीजनांसह प्रथम गृहप्रवेश करावा. गृहप्रवेश केल्यानंतर घर बांधणारे शिल्पकार व इतर जन आणि पुरोहित यांची यथाशक्ति संभावना करावी असें सांगितलेलें आहे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

गृहप्रवेशास योग्य घर.

जातु न प्रविशेद्धीमान्ननाच्छन्नं नवं गृहम् ।
कपाटरहितं तद्वद्वास्तुपूजनवर्जितम् ॥ १२४ ॥

ज्या घरावर छप्पर नसेल, किंवा ज्या घराचीं द्वारें बसविलीं गेलीं नसतील, अथवा ज्या घराचें वास्तुपूजन झालें नसेल त्या घरांत प्रवेश किंवा वस्ती करूं नये.

शांतीस अग्नि व आहुति पाहणें.

सैका तिथिर्वारयुता कृताप्ता शेषे गुणेऽभ्रे भुवि वह्निवासः ।
सौख्याय होमे शशियुग्मशेषे प्राणार्थनाशौ दिवि भूतले च ॥ १२५ ॥

ज्या तिथीला एकादी शांति करावयाची असेल त्या तिथीपर्यंत शुक्ल प्रतिपदेपासून सर्व तिथि मोजून जी संख्या येईल तीमध्यें १ मिळवावा आणि त्या मिळवणींत वाराचे अंक मिळवावे व त्या बेरजेस चोहोंनीं भागावें. भागाकाराची बाकी ३ किंवा ० असतां अग्नि भूलोकीं असून त्याचें फळ सुखप्राप्ति असें जाणावें. शेष १ उरला तर अग्नि आकाशांत आहे, व २ उरले तर पाताळीं असून दोहोंचेंही फळ हानिकारक होय असें जाणावें. म्हणून आकाशीं किंवा पाताळीं अग्नि असतां शांति करूं नये. कोणतीही शांति करावयाची असतां त्या दिवशीं अग्नि व आहुति असावी. निदान दोहींतून एक तरी योग असावा. आतां आहुती कशी पहावी हें सांगतों.

रवौ बुधे भृगौ मंदे चंद्रे भौमे गुरौ तमे ।
केतौ च सूर्यभात् ज्ञेयं प्रत्येकं भत्रयं न्यसेत् ।
होमाहुतिः खले नेष्टा शुभदा शुभखेचरे ॥ १२६ ॥

सूर्यनक्षत्रापासून दिवसनक्षत्रापर्यंत नक्षत्रें मोजून पुढील अनुक्रमाप्रमाणें प्रत्येक ग्रहाला तीन तीन नक्षत्रें विभागून द्यावीं, म्हणजे ९ विभाग होतात. ग्रहांचा अनुक्रम सूर्य, बुध, शुक्र, शनि, चंद्र, मंगळ, गुरु, राहु व केतु याप्रमाणें जाणावा. रवि, शनि, मंगळ, राहु व केतु यांच्या मुखांत आहुति असतां अशुभ होय; म्हणून त्या दिवशीं शांति करूं नये. उदाहरण; सूर्यनक्षत्र ज्येष्ठा आहे व दिवसनक्षत्र शततारका आहे असें समजा. म्हणजे ज्येष्ठापासून शततारकापर्यंत एकंदर ७ नक्षत्रें होतात. त्यांत वरील अनुक्रमाप्रमाणें पहिलीं तीन नक्षत्रें सूर्याचीं, पुढील तीन बुधाचीं व नंतर तीन शुक्राचीं होत. आपलें नक्षत्र तिसऱ्या विभागांत आहे; म्हणून शुक्रमुखांत आहुति येते, ती शुभ होय असें जाणावें. शांतीच्या दिवशीं पापग्रहाच्या मुखीं आहुति नसावी.

देवालय व मठ इत्यादिकांच्या आरंभास नक्षत्रें.

गृहारंभोक्तनक्षत्रैर्मठं कुर्यात्तु साश्विभैः ।
सर्वदेवालयं तैस्तु पुनर्भश्रवणान्वितैः ॥ १२७ ॥

अश्विनी नक्षत्र आणि गृहारंभास सांगितलेलीं सर्व नक्षत्रें यांवर मठाचा आरंभ करावा. गृहारंभाचीं नक्षत्रें आणि पुनर्वसु व श्रवण यांवर देवालयाचा आरंभ करावा.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

देवप्रतिष्ठेस मुहूर्त.

प्रतिष्ठा सर्वदेवानां वैशाखज्येष्ठफाल्गुने ।
चैत्रे तु स्याद्विकल्पेन माघे विष्ण्वन्यमूर्तिषु ॥ १२८ ॥
सौम्यायने शुभा प्रोक्ता निन्दिता दक्षिणायने ।
देव्या माघेऽश्विने विष्णोः शस्ता चैत्रेऽश्विने नभे ॥ १२९ ॥
हस्तत्रये सित्रहरित्रये च पौष्णद्वयादित्यसुरेज्यभेषु ।
तिस्रोत्तराधातृशशांकभेषु सर्वामरस्थापनमुत्तमं स्यात् ॥१३०॥

वैशाख, ज्येष्ठ, फाल्गुन या महिन्यांत सर्व देवांच्या अर्चा करणें प्रशस्त होय. कित्येकांच्या मतें चैत्र महिनाही शुभ होय. माघ मासांत विष्णुमूर्तीवांचून अन्य देवतेची प्रतिष्ठा करावी. देवप्रतिष्ठा उत्तरायणांत करणें शुभ आहे. देवीच्या प्रतिष्ठेला माघ व आश्विन आणि विष्णुमूर्तीच्या अर्चेला चैत्र, आश्विन व श्रावण हे महिने प्रशस्त सांगितलेले आहेत. हस्त, चित्रा, स्वाती, अनुराधा, श्रवण, धनिष्ठा, शततारका, रेवती, अश्विनी, पुनर्वसु, पुष्य, तिन्ही उत्तरा, रोहिणी व मृग हीं नक्षत्रें कोणत्याही देवप्रतिष्ठेस उत्तम आहेत. रिक्ता तिथि व अमावास्या वर्ज्य करून इतर तिथींना व मंगळवारखेरीज इतर सर्व वारीं स्थिरलग्नावर देवांची अर्चा करावी.

विहिरी–तलावादिकांस मुहूर्त.

चित्रास्वातिपुनर्वसूमृगशिरो मूलाश्विनी रोहिणी ।
हस्तः पुष्यधनिष्ठकं शतभिषक् मित्रोत्तरा रेवती ॥
एतेषु श्रवणान्वितेषु मकरे लग्ने च कुंभे झषे ।
वापीकूपजलाशयादिखननं शस्तं प्रशस्ते दिने ॥ १३१ ॥

चित्रा, स्वाती, पुनर्वसु, मृग, मूळ, अश्विनी, रोहिणी, हस्त, पुष्य, धनिष्ठा, शततारका, अनुराधा, तिन्ही उत्तरा, रेवती ह्या नक्षत्रांवर; मकर, कुंभ व मीन ह्या लग्नीं व पंचांगशुद्धि असेल अशा शुभ दिवशीं विहिरी, तलाव इत्यादि खणण्यास आरंभ करावा. तसेंच, ह्याच नक्षत्रांवर आणि २।३।५।१०।१३।१५ ह्या तिथींस, बुध-गुरु-शुक्र ह्या वारीं; मेष, सिंह आणि धन हीं तीन लग्नें वर्ज्य करून इतर लग्नीं; माघापासून पुढील सहा महिन्यांत किंवा मार्गशीर्ष महिन्यांत विहीर, वापी, तळीं इत्यादि जलाशयांचा संस्कार करून नंतर तें पाणी प्यावें असें सांगितलेलें आहे.

नूतन वस्त्रालंकारादि वस्तुधारणास नक्षत्रें.

हस्तादिपंचके पुष्ये धनिष्ठा रेवतिद्वये ।
पुनर्वसौ त्र्युत्तरे च रोहिण्यां च शुभे तिथौ ॥ १३२ ॥
बुधे शुक्रेऽज्यवारेषु नूतनांबरधारणम् ।
प्रागुक्तधिष्ण्यवारेषु स्वर्णाद्याभरणादिकम् ॥ १३३ ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

हस्त, चित्रा, स्वाती, विशाखा, अनुराधा, पुष्य, धनिष्ठा, रेवती, अश्विनी, तिन्ही उत्तरा, पुनर्वसु, रोहिणी ह्या नक्षत्रांवर, अमावास्या, रिक्ततिथि, षष्ठी ह्या तिथि सोडून इतर शुभतिथींस, बुध, गुरु व शुक्र ह्या वारीं नवीन वस्त्रें, नवीन दागिने धारण करावे. नवीन शय्या, नवीन आसन इत्यादि नवीन वस्तूंचाही ह्याच मुहूर्तांवर संग्रह करावा.

शिल्पविद्यारंभास मुहूर्त.

हस्तत्रये श्रवत्र्यक्षें त्र्युत्तरे रोहिणी मृगे ।
रेवत्यामश्विनीपुष्ये पुनर्वस्वनुराधयोः ।
शस्ते तिथौ शुभे वारे शिल्पविद्यां समाचरेत् ॥ १३४ ॥

हस्त, चित्रा, स्वाती, श्रवण, धनिष्ठा, शततारका, तिन्ही उत्तरा, रोहिणी, मृग, रेवती, अश्विनी, पुष्य, पुनर्वसु, अनुराधा ह्या नक्षत्रांवर शुभ तिथींना आणि शुभवारीं शिल्पविद्येचा म्हणजे कोणत्याही कारागिरीच्या विद्येचा आरंभ करावा. लहान मुलांस विद्यारंभ करण्याविषयीं मागें १०८ पृष्ठामध्यें मुहूर्त सांगितला आहे. किंवा पुढें दिलेल्या साडेतीन मुहूर्तांतून एकादा दिवस घ्यावा.

गीतनृत्यारंभास मुहूर्त.

रेवत्यामनुराधायां धनिष्ठादिद्वये करे ।
रोहिणीयुगुले पुष्ये त्र्युत्तरे गीतनर्तने ॥ १३५ ॥

रेवती, अनुराधा, धनिष्ठा, शततारका, हस्त, रोहिणी, मृग, पुष्य, व तिन्ही उत्तरा ह्या नक्षत्रांवर गायनविद्येस आरंभ करावा.

नाटकादि कृत्यारंभास.

मृगार्द्रा रोहिणी पुष्ये पुनर्भे श्रवणत्रये ।
चित्रात्रयोत्तरामूले कृत्यं शृंगारजीविनाम् ॥ १३६ ॥

मृगशीर्ष, आर्द्रा, रोहिणी, पुष्य, पुनर्वसु, श्रवण, धनिष्ठा, शततारका, चित्रा, स्वाती, विशाखा, तिन्ही उत्तरा आणि मूळ ह्या नक्षत्रीं शुभवारीं नाटक, नृत्य, इत्यादिकांचा आरंभ कुयोग वर्ज्य करून करावा. पूर्णा व जया तिथि शुभ होत, लग्नीं बुध-चंद्र असावे किंवा कन्या व मिथुन राशींवर बुधाची दृष्टि असावी. चतुर्थस्थानीं शुभग्रह असावे व चंद्र शुभस्थानीं असावा.

नव्या चुलींत अग्नि घालण्यास.

विशाखा कृत्तिका पुष्ये ज्येष्ठा स्वाती मघा मृगे ।
श्रवः पुनर्वसौ वह्निं चुल्लौ संस्थापयेच्छुभम् ।
अमा रिक्ता कुयोगादीन् मंदवारं च वर्जयेत् ॥ १३७ ॥

मृत्युयोग, वैधृति, व्यतीपात इत्यादि कुयोग वर्ज्य करून, विशाखा, कृत्तिका, पुष्य,

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ज्येष्ठा, स्वाती, मघा, मृग, श्रवण, पुनर्वसु या नक्षत्रांवर नव्या चुलींत विस्तव घालावा. रिक्ता तिथि, अमावास्या व शनिवार वर्ज्य करावे.

मल्लविद्यारंभास.

ज्येष्ठार्द्रा भरणी पूर्वा मूलाश्लेषा मघाभिधे ।
जयापूर्णासु सद्वारे सार्के शीर्षोदयेंगके ।
सत्खेटैः केंद्रगैः सार्कैर्मल्लक्रीडा शुभावहा ॥ १३८ ॥

ज्येष्ठा, आर्द्रा, भरणी, पूर्वा, मूल, आश्लेषा आणि मघा या नक्षत्रांवर; जया म्ह० ३।८।१३ व पूर्णा म्ह० ५।१०।१५ या तिथींना, शुभवारीं, शीर्षोदय लग्नांवर म्ह० मिथुन, कन्या, तुला, वृश्चिक, कुंभ या लग्नांवर सूर्य व इतर शुभग्रह केंद्रीं असतील अशा समयीं व्यायामास आरंभ करावा.

बाळंतिणीस देवास जाण्यास मुहूर्त.

अथ निष्क्रमणं नाम गृहात्प्रथमनिर्गमः ।
जन्मतो द्वादशाहे वा चतुर्थे मासि कारयेत् ॥ १३९ ॥
हस्तः पुष्यपुनर्वसू हरियुगं मैत्रत्रयं रोहिणी ।
रेवत्युत्तरफल्गुनी मृगयुताषाढोत्तरस्वातिषु ।
मासौ तुर्यतृतीयकौशिककुजौ त्यक्त्वातिरिक्तां तिथिं ।
सिंहादित्रितये घटेन सहितं निष्काशनं शस्यते ॥ १४० ॥

नवीन जन्मलेल्या बालकास तिसऱ्या किंवा चवथ्या महिन्यांत बाळंतिणीसह देवदर्शन किंवा सूर्यदर्शन करवावें. त्यास शुक्लपक्षांतील मुहूर्त घ्यावा. शनि, भौमवार व ४।९।१४ ह्या तिथि वर्ज्य कराव्या. हस्त, पुष्य, पुनर्वसु, श्रवण, धनिष्ठा, अनुराधा, ज्येष्ठा, मूल, रोहिणी, रेवती, उत्तरा, मृग, उत्तराषाढा व स्वाती हीं नक्षत्रें शुभ आहेत. सिंह, कन्या, तूळ, कुंभ हीं लग्नें उक्त आहेत. या मुहूर्तावर कुयोग वर्ज्य करून, बालकास प्रथम घरांतून बाहेर न्यावें. बाराव्या दिवशींही बालकास सूर्यदर्शन करण्याची कोठें कोठें चाल आहे.

पशूंचा क्रयविक्रय करण्यास नक्षत्रें.

विशाखा रेवती पुष्ये धनिष्ठा शतभेऽश्विभे ।
हस्ते पुनर्वसुज्येष्ठे पशूनां क्रयविक्रयौ ॥ १४१ ॥

विशाखा, रेवती, पुष्य, धनिष्ठा, शततारका, अश्विनी, हस्त, पुनर्वसु व ज्येष्ठा ह्या नक्षत्रांवर पशूंचा क्रयविक्रय करावा.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

घर, भूमि विकत घेण्यास व विकण्यास मुहूर्त.

जीवे शुक्रे च नंदासु पूर्णायां मूलभे मृगे ।
पूर्वाश्लेषामघांत्ये च विशाखाद्वितये तथा ।
पुनर्भे मुनिभिः प्रोक्तं क्रयविक्रयणं भुवः ॥ १४२ ॥

गुरुवार व शुक्रवार, नंदा म्हणजे १।६।११ व पूर्णा म्हणजे ५।१०।१५ ह्या तिथींना, मूळ, मृग, तिन्ही पूर्वा, आश्लेषा, मघा, रेवती, विशाखा, अनुराधा आणि पुनर्वसु ह्या नक्षत्रांवर गृह व भूमि ह्यांचा क्रयविक्रय करावा.

व्यापार, दुकान इत्यादिकांस मुहूर्त.

अनुराधोत्तरापुष्ये रेवतीरोहिणीमृगे ।
हस्तचित्राऽश्विभे कुर्याद्वाणिज्यं दिवसे शुभे ॥ १४३ ॥

अनुराधा, उत्तरा, पुष्य, रेवती, रोहिणी, मृग, हस्त, चित्रा, अश्विनी ह्या नक्षत्रांवर चंद्रबलयुक्त शुभ दिवशीं वाणिज्य, उदीम इत्यादिकांचा आरंभ करावा.

भूमि नांगरण्यास नक्षत्रें.

पुनर्वसुद्वये मूले त्र्युत्तरे रोहिणीद्वये ।
हस्तत्रयेऽनुराधायां रेवत्यां श्रवणत्रये ।
तिथौ वारे शुभेऽश्विन्यां हलप्रवहणं शुभम् ॥ १४४ ॥

पुनर्वसु, पुष्य, मूळ, तिन्ही उत्तरा, रोहिणी, मृग, हस्त, चित्रा, स्वाती, अनुराधा, रेवती, श्रवण, धनिष्ठा, शततारका आणि अश्विनी ह्या नक्षत्रांवर शुभतिथींस अर्थात् रिक्ता तिथि व ६।८।३० ह्या वर्ज्य करून, अन्य तिथींवर प्रथम भूमि नांगरणें शुभ होय. वृषभ, मिथुन, कन्या, वृश्चिक, धन व मीन ह्या लग्नीं भूमि नांगरावी. तसेंच, भूमि नांगरण्यास खालीं लिहिल्याप्रमाणें हलचक्र पहावें.

नांगरण्यास हलचक्र.

सूर्यस्य भुक्तनक्षत्राद्रामाष्टकनवाष्टकम् ।
अशुभं च शुभं ज्ञेयं हलचक्रे क्रमेण भम् ॥ १४५ ॥

जें चालू सूर्यनक्षत्र असेल त्याच्या पूर्वीच्या नक्षत्रापासून (म्हणजे सूर्यनक्षत्र रोहिणी असतां कृत्तिकापासून) दिवसनक्षत्रापर्यंत नक्षत्रें मोजावीं. त्यांत पहिलीं ३ अशुभ, पुढें ८ शुभ, पुढील ९ अशुभ व शेवटचीं ८ नक्षत्रें शुभ होत.

धान्य पेरण्यास व लावणीस नक्षत्रें व फणिचक्र.

हस्तत्रये मघापुष्ये त्र्युत्तरे रोहिणीद्वये ।
धनिष्ठारेवतीयुग्मे तथा मूलानुराधयोः ॥ १४६ ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

शुभे वारे तिथौ श्रेष्ठा बीजोप्तिस्त्वथ राहुभात् ।
अष्टाग्नींदुत्रयं चैकं त्र्येंदुत्रिचतुष्टयम् ।
असच्छुभं क्रमाज्ज्ञेयं दिनर्क्षं फणिचक्रगम् ॥ १४७ ॥

हस्त, चित्रा, स्वाती, मघा, पुष्य, तिन्ही उत्तरा, रोहिणी, मृग, धनिष्ठा, रेवती, अश्विनी, मूल, अनुराधा ह्या नक्षत्रीं व शुभतिथींना व शुभवारीं सर्व प्रकारचें बीज पेरणें शुभ जाणावें. बीज पेरण्यास फणिचक्र पाहतात, तें असें. राहु ज्या नक्षत्रीं असेल त्या नक्षत्रापासून दिवसनक्षत्रापर्यंत नक्षत्रें मोजून पहिलीं ८ अशुभ, त्या पुढील ३ शुभ, १ अशुभ, ३ शुभ, १ अशुभ, ३ शुभ, १ अशुभ, ३ शुभ, ४ अशुभ ह्या अनुक्रमानें फणिचक्र जाणावें. सस्यारोपणास म्हणजे एका ठिकाणाहून दुसरीकडे धान्य नेऊन लावण्यासही वरील नक्षत्रेंच उक्त आहेत. ह्याला कोंकणांत तरवा किंवा लावणी म्हणतात.

धान्य कापण्यास नक्षत्रें.

पूर्वोत्तरामघाश्लेषाज्येष्ठार्द्राश्रवणद्वये ।
भरणीद्वितये मूले मृगे पुष्ये करत्रये ।
धान्यच्छेदः शुभो रिक्तां हित्वा भौमशनैश्चरौ ॥ १४८ ॥

तीन्ही पूर्वा, तीन्ही उत्तरा, मघा, आश्लेषा, ज्येष्ठा, आर्द्रा, श्रवण, धनिष्ठा, भरणी, कृत्तिका, मूल, मृग, पुष्य, हस्त, चित्रा, स्वाती ह्या नक्षत्रांवर धान्य कापावें. रिक्तातिथि व भौम व शनिवार वर्ज्य करावे.

धान्य मळण्यास नक्षत्रें.

अनुराधाश्रवोमूले रेवत्यां च मघात्रिभे ।
ज्येष्ठायां चैव रोहिण्यां शुभं स्यात्कणमर्दनम् ॥ १४९ ॥

अनुराधा, श्रवण, मूल, रेवती, मघा, पूर्वा, उत्तरा, ज्येष्ठा व रोहिणी या नक्षत्रांवर धान्य मळावें.

कोठारांत धान्यसंग्रह करण्यास मुहूर्त.

पुनर्भे मृगशीर्षेंन्त्येऽनुराधा श्रवणत्रये ।
हस्तत्रयेऽश्विनीपुष्ये रोहिण्यामुत्तरात्रये ।
गुरौ शुक्रे रवींद्वोः सत्कोष्ठादौ धान्यरक्षणम् ॥ १५० ॥

पुनर्वसु, मृग, रेवती, अनुराधा, श्रवण, धनिष्ठा, शततारका, हस्त, चित्रा, स्वाती, अश्विनी, पुष्य, रोहिणी व तिन्ही उत्तरा ह्या नक्षत्रांवर आणि गुरु, शुक्र, रवि व सोमवारीं कोठारांत धान्यसंग्रह करावा.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

नवान्नभक्षणास नक्षत्रें.

हस्तचित्रानुराधांत्ये रोहिणीश्रवणद्वये ।
मृगाश्विन्युत्तरास्वर्के शुभे वारे तिथावपि ।
नवान्नस्य विधानं च प्राशनं फलमूलयोः ॥ १५१ ॥

हस्त, चित्रा, अनुराधा, रेवती, रोहिणी, श्रवण, धनिष्ठा, मृग, अश्विनी, तिन्ही उत्तरा हीं नक्षत्रें व रविवार आणि इतर शुभवार व शुभतिथि पाहून नवें धान्य भक्षण करावें. कोकणप्रांतीं आश्विनशुक्ल पौर्णिमेसच नवान्न भक्षण करण्याचा सर्वत्र प्रचार आहे.

बाग करण्यास मुहूर्त.

हस्तचित्रोत्तरामूलेनुराधारेवतीद्वये ।
विशाखारोहिणीपुष्येप्यारामोत्तिर्मृगे शुभा ॥ १५२ ॥

हस्त, चित्रा, तिन्ही उत्तरा, मूल, अनुराधा, रेवती, अश्विनी, विशाखा, रोहिणी, पुष्य व मृग, ह्या नक्षत्रीं उदगयनांत मंगळ व शनिवार आणि अमावास्या व रिक्ता तिथि वर्ज्य करून नवीन झाडें लावावीं.

गलबताचा मुहूर्त.

ज्येष्ठोभयं विशाखार्द्रा रोहिणी भरणीद्वयम् ।
आश्लेषां च विहायान्यनक्षत्रेर्के गुरौ भृगौ ।
सल्लग्ने सत्तिथौ नावो घट्टनं तारणं शुभम् ॥ १५३ ॥

ज्येष्ठा, मूल, विशाखा, आर्द्रा, रोहिणी, भरणी, कृत्तिका, आश्लेषा, हीं ८ नक्षत्रें सोडून इतर नक्षत्रांवर रवि, गुरु व शुक्रवारीं, शुभतिथींचर आणि ज्या लग्नीं शुभग्रह व शुभग्रहांची दृष्टि असेल अशा शुभलग्नीं नवें गलबत बांधण्यास आरंभ करावा. भरतीची वेळ पाहून नवें गलबत प्रथम पाण्यांत सोडण्यास हाच मुहूर्त उक्त आहे.

औषध करण्यास व घेण्यास मुहूर्त.

हस्तत्रयेनुराधायां मूले पुष्ये श्रवत्रये ।
मृगभे रेवतीयुग्मे पुनर्वस्वोर्विजन्मभे ॥ १५४ ॥
शैदुशुक्रेज्यसूर्याणां वासरे सत्तिथावपि ।
द्विस्वभावे शुभे लग्ने शुद्धे द्यूनमृतिव्यये ।
भैषज्यं शुभदं प्रोक्तं योगे चायुष्यदायिनि ॥ १५५ ॥

हस्त, चित्रा, स्वाती, अनुराधा, मूल, पुष्य, श्रवण, धनिष्ठा, शततारका, मृग, रेवती, अश्विनी, पुनर्वसु ह्या नक्षत्रीं (आपलें जन्मनक्षत्र सोडून) घातवार वर्ज्य

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

करून रवि, चंद्र, बुध, गुरु, व शुक्र ह्यांच्या वारीं, शुभ तिथींना, वैधृति, व्यतीपात, दग्ध, मृत्युयोग इत्यादि वर्ज्य करून, द्विस्वभाव लग्नीं ७।८।१२ ह्या स्थानीं कोणी पापग्रह नसतां औषध करणें व घेणें हीं शुभ होत. आज औषध न घेतां यथावकाश घेतलें तरी चालेल अशी रोग्याची स्थिति असेल तरच शुभदिवशीं प्रथम औषध घ्यावें. तसें नसेल तर मुहूर्त न पाहतां औषध पाहिजे तेव्हां घ्यावें. औषध घेतेवेळीं 'अच्युतानंतगोविंदनामोच्चारणभेषजात् । नश्यन्तु सकला रोगाः सत्यं सत्यं वदाम्यहं ॥' ह्या मंत्र म्हणून औषध प्राशन करण्याची प्राचीन पद्धति आहे.

दत्तकपुत्र घेण्यास.

हस्तादिपंचकभिषग्वसुपुष्यभेषु ।
सूर्यक्षमाजगुरुभार्गववासरेषु ॥
रिक्ताविवर्जिततिथिष्वलिकुंभलग्ने ।
सिंहे वृषे भवति दत्तपरिग्रहोयम् ॥ १५६ ॥

हस्त, चित्रा, स्वाती, विशाखा, अनुराधा, अश्विनी, धनिष्ठा, पुष्य ह्या नक्षत्रीं; रवि, मंगळ, गुरु, शुक्र ह्या वारीं; ४।९।१४।३० ह्या तिथि सोडून इतर तिथींवर व वृश्चिक व कुंभ हीं लग्नें वर्ज्य करून इतर लग्नीं, विशेषतः सिंह किंवा वृषभ या लग्नांवर दत्तक पुत्र घेणें प्रशस्त होय.

यंत्रकृत्य, ऊंस, तेल इत्यादिकांच्या घाण्यांस नक्षत्रें.

धनिष्ठाश्विकरे चित्रानुराधापुष्यभे तथा ।
ज्येष्ठायां च पुनर्वस्वो रेवत्यां शुभवासरे ।
सर्वयंत्रक्रियां कुर्यात्तैलगंधादिके तथा ॥ १५७ ॥

धनिष्ठा, अश्विनी, हस्त, चित्रा, अनुराधा, पुष्य, ज्येष्ठा, पुनर्वसु, रेवती हीं नक्षत्रें व शुभवार पाहून ऊंस, तेल इत्यादिकांचा घाणा किंवा इतर यांत्रिक कृत्यें यांचा आरंभ करावा.

मंत्रदीक्षाग्रहणास मुहूर्त.

रोहिण्यां त्र्युत्तरे मौंजीबंधनोदितभादिषु ।
मंत्रदीक्षा शुभे चाह्नि ग्रहणेप्यागमोदिता ॥ १५८ ॥

रोहिणी, तिन्ही उत्तरा आणि पूर्वीं तिसऱ्या प्रकरणीं मौंजीबंधनास जीं नक्षत्रें सांगितलीं आहेत तीं सर्व नक्षत्रें, गुरुमंत्र वगैरे ग्रहण करण्यास उक्त होत. विषारी प्राण्यांचें विष उतरविण्याचे मंत्र सूर्यचंद्रांच्या ग्रहणांत घ्यावे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मुद्राकरण, छापखाना इत्यादिकांस मुहूर्त.

त्र्युत्तरे चानुराधायां श्रवणत्रितये तथा ।
पुनर्वसुद्वये हस्तत्रितये रेवतीयुगे ॥ १५९ ॥
मृगशीर्षे च रोहिण्यामष्टमीपंचमीदिने ।
तृतीयायां त्रयोदश्यां दशम्यां पूर्णिमातिथौ ।
त्यक्त्वा शनैश्चरं सोमं मुद्राकार्यं प्रशस्यते ॥ १६० ॥

तिन्ही उत्तरा, अनुराधा, श्रवण, धनिष्ठा, शततारका, पुनर्वसु, पुष्य, हस्त, चित्रा, स्वाती, रेवती, अश्विनी, मृगशीर्ष व रोहिणी ह्या नक्षत्रांवर आणि ८।५।३। १३।१०।१५ ह्या तिथींवर छापखाना, टांकसाळ इत्यादिकांचा आरंभ करावा. झाला शनिवार आणि सोमवार वर्ज्य करावे.

नोकरी धरण्यास व नोकर ठेवण्यास नक्षत्रें.

हस्तद्वयेऽनुराधायां रेवतीयुगुले मृगे ।
पुष्ये बुधे गुरौ शुक्रे सत्तिथौ रविवासरे ॥ १६१ ॥
उत्तरासु च रोहिण्यां दासदास्यादिसंग्रहः ।
स्थिरे लग्ने शुभैर्दृष्टे मंदवारे विशेषतः ॥ १६२ ॥

हस्त, चित्रा, अनुराधा, रेवती, अश्विनी, मृग, पुष्य ह्या नक्षत्रीं; शुभतिथींस; रवि, बुध, गुरु, शुक्र ह्या वारीं नोकरी धरावी. तीन्ही उत्तरा व रोहिणी हीं नक्षत्रें, शुभग्रहांनीं दृष्ट अशीं स्थिरलग्नें व शनिवार हीं दासदासी ठेवण्यास विशेष शुभ होत.

पालखी, गाडी, घोडा, हत्ती इत्यादि वाहनांस नक्षत्रें.

त्र्युत्तरारोहिणीयुग्मे पुष्ये हस्तत्रये तथा ।
श्रवत्रयेऽनुराधायां ज्येष्ठायां च पुनर्वसौ ॥ १६३ ॥
शनिभौमान्यवारेषु शुभे लग्ने शुभे तिथौ ।
गजाश्वरथमुख्यानां शिविकायाश्च रोहणम् ॥ १६४ ॥

तिन्ही उत्तरा, रोहिणी, मृग, पुष्य, हस्त, चित्रा, स्वाती, श्रवण, धनिष्ठा, शततारका, अनुराधा, ज्येष्ठा, पुनर्वसु ह्या नक्षत्रांवर; शनि व भौम या वारांखेरीज अन्य वारीं; शुभलग्नीं व शुभतिथींवर हत्ती, घोडा, गाडी, पालखी इत्यादि वाहनांचा प्रथम उपयोग करावा. गाडी व पालखी बांधण्यास हींच नक्षत्रें उक्त होत.

चारणीवर गुरें पाठविण्यास.

सूर्यभादुडुगणं पुनःपुनर्गण्यतामिति चतुष्टयं त्रयम् ।
अंतरंगबहिरंगसंज्ञकं तत्र कर्म विदधीत तादृशम् ॥ १६५ ॥

सूर्यनक्षत्रापासून दिवसनक्षत्रापर्यंत नक्षत्रें मोजावीं. त्यांपैकीं पहिलीं चार नक्षत्रें

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आंतचालीचीं व नंतर तीन नक्षत्रें बाहेरचालीचीं होत; या क्रमानें जितकीं नक्षत्रें असतील तेथपर्यंत मोजीत जावें. आंतचालीचीं नक्षत्रें चारणीवरून गुरू घरीं आणण्यास व बाहेरचालीचीं नक्षत्रें चारणीवर गुरू पोहोंचविण्यास उक्त आहेत. उदाहरणार्थ, सूर्यनक्षत्रापासून दिवसनक्षत्रापर्यंत एकंदर तेरा नक्षत्रें झालीं, असें समजा. ह्यांपैकीं पहिलीं चार नक्षत्रें आंतचालीचीं, पुढील तीन नक्षत्रें बाहेरचालीचीं, पुनः चार नक्षत्रें आंतचालीचीं व तीन बाहेरचालीचीं याप्रमाणें चवदा नक्षत्रें झालीं, म्हणजे बाराव्या नक्षत्रापासून चवदाव्या नक्षत्रापर्यंत जीं तीन नक्षत्रें तीं बहिरंग नक्षत्रें असल्यामुळें चारणीवर गुरू पाठविण्यास उक्त होत. शुभतिथींस व शुभवारीं वरील रीतीप्रमाणें नक्षत्रें मोजून पश्चू चारणीवरून आणावे, किंवा चारणीवर पाठवावे.

वैद्यक व गारुडीविद्यारंभास नक्षत्रें.

हस्तत्रयेनुराधाया पुनर्भे श्रवणत्रये ।
मूले चांत्येऽश्विनीपुष्ये ज्येष्ठाश्लेषार्द्रभे मृगे ।
वैद्यविद्या कुजेब्जेर्के ज्येष्ठाहीनेत्र गारुडी ॥ १६६ ॥

हस्त, चित्रा, स्वाती, अनुराधा, पुनर्वसु, श्रवण, धनिष्ठा, शततारका, मूळ, रेवती, अश्विनी, पुष्य, ज्येष्ठा, आश्लेषा, आर्द्रा, मृग हीं नक्षत्रें व मंगळ, सोम व रवि हे वार वैद्यकी शिकण्यास व वैद्यकी धंद्याचा आरंभ करण्यास शुभ होत. गारुडीविद्या शिकण्यास ज्येष्ठा नक्षत्र सोडून हींच नक्षत्रें व वार उक्त आहेत.

अग्निहोत्र घेण्यास नक्षत्रें.

त्र्युत्तरारेवतीपुष्ये विशाखाकृत्तिकात्रये ।
सौम्यायने च ज्येष्ठायामग्न्याधानं शुभे तिथौ ॥ १६७ ॥

उत्तरायणांत, रिक्ता व अमावास्या तिथि वर्ज्य करून तिन्ही उत्तरा, रेवती, पुष्य, विशाखा, कृत्तिका, रोहिणी, मृग आणि ज्येष्ठा ह्या नक्षत्रीं प्रथम अग्निहोत्र घ्यावें.

नारायणबलीस व नागबलीस मुहूर्त.

बलिर्नारायणाख्यो वै पंचम्यां श्रवणेऽथवा ।
एकादश्यां च शुक्लाया नरैः कार्यः सुतेप्सुभिः ॥ १६८ ॥
आश्लेषाऋक्षयुक्तायां नवम्यां पंचमीदिने ।
पौर्णमास्याममावास्यां कार्यो नागबलिः शुभः ॥ १६९ ॥

शुक्ल अथवा कृष्णपक्षांतील पंचमी, किंवा शुक्ल एकादशी या दिवशीं किंवा श्रवण नक्षत्रीं पुत्रेच्छु मनुष्यानें नारायणबलि करावा. तसेंच नवमी, पंचमी, पौर्णिमा किंवा अमावास्या या दिवशीं किंवा आश्लेषा नक्षत्रीं नागबलि करावा. हे

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

विधि केले असतां संततिप्रतिबंधक पिशाचोपद्रव दूर होऊन दीर्घायु सुसंतति होते असें सांगितलेलें आहे.

सर्व कार्यांस शुभ मुहूर्त.

येथपर्यंत मुख्य मुख्य कृत्यांसाठीं मुहूर्तांचीं नक्षत्रें सांगितलींच आहेत. त्यावांचून कोणत्याही इतर शुभकृत्यांना दिनशुद्धि पहावयाची असतां पुढील गोष्टी ध्यानांत ठेवून मुहूर्तयोजना करावी.

शुभतिथि—१।२।३।५।७।१०।१२।१३ (सामान्यतः शुक्ल प्रतिपदा व कृष्ण १३-१४-३० या तिथि सर्वत्र वर्ज्य कराव्या.

शुभवार—चंद्र, बुध, गुरु, शुक्र; शुभनक्षत्रें—रोहिणी, तीन्ही उत्तरा, अश्विनी, पुष्य, अभिजित्, हस्त, मृग, चित्रा, अनुराधा व रेवती हीं नक्षत्रें सर्व स्थिर कार्यांस उक्त आहेत. चर कार्यांला श्रवण, धनिष्ठा, शततारका, पुनर्वसु, स्वाती व मूळ हीं नक्षत्रें उक्त आहेत. केचिन्मतानें मघाही ग्राह्य आहेत. तथापि संक्रांतीचा दिवस, परिघ योगाचें पूर्वार्ध, व्यतीपात, वैधृति, ग्रहणाचा व करीचा दिवस, क्षयवृद्धीचे दिवस, भद्रा, रवि, भौम, शनि हे वार, जन्मतिथि, मृत्युयोग, दग्धयोग इत्यादि वर्ज्य करून शुभ कृत्य करावें. शुक्ल पंचमीपासून कृष्ण पंचमीपर्यंत चंद्रबल पहावें व बाकी राहिलेल्या १५ दिवसांत ताराबल पहावें.

सर्व शुभकार्यांची लग्नशुद्धि.

व्ययाष्टशुद्धोपचये लग्नगे शुभदृग्युते ।
चंद्रे त्रिषड्दशायस्थे सर्वारंभः प्रसिद्ध्यति ॥ १७० ॥

ज्या लग्नीं कांहीं कृत्य करावयाचें असेल त्या लग्नापासून १२।८ ह्या दोन स्थानीं कोणीही ग्रह नसावा. तसेंच उपचय म्हणजे ३।६।१०।११ ह्या स्थानीं शुभग्रह विशेषतः चंद्र, आणि लग्नीं, केंद्रीं व त्रिकोणीं शुभग्रह असून तेथें पापग्रहांची दृष्टि नसावी म्हणजे कार्यसिद्धि होते.

साडेतीन मुहूर्त.

प्रतिपद्वत्सरादिर्या तृतीयाक्षय्यसंज्ञिका ।
दशमीविजयाख्या च मुहूर्तास्त्रय ईरिताः ॥ १७१ ॥
प्रतिपत्कार्तिके शुक्ला स मुहूर्तार्धसंज्ञकः ।
स्वयंसिद्धा इमे ज्ञेयाः सर्वकार्यप्रसाधकाः ॥ १७२ ॥

चैत्रशुक्ल प्रतिपदा, अक्षय्य तृतीया आणि विजयादशमी (दसरा) हे पूर्ण तीन मुहूर्त व कार्तिकशुक्ल प्रतिपदा हा अर्धा मुहूर्त असे साडेतीन स्वयंसिद्ध मुहूर्त आहेत. म्हणजे ह्या दिवशीं कोणतेंही कर्म करावयास पंचांगशुद्धि पाहण्याची आवश्यकता नाहीं. ह्या दिवशीं बालकांकडून विद्यारंभ करावा.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

प्रश्नविचार.

लाभहानीचा दिवस पाहणें.

चैत्रादितिथिवारर्क्षयोगतिथ्यर्धसंयुतम् ।
जन्मनक्षत्रसंयुक्तं तत्रिधा स्थापितं पदम् ।
गुणशैलकरैर्हत्वा वसुवह्निशरैर्हृतम् ॥ १७३ ॥
आदिशून्ये भवेद्व्याधिर्मध्यशून्ये महद्भयम् ।
अंत्यशून्ये भवेद्धानिस्त्र्यंकोऽथ विजयी भवेत् ॥ १७४ ॥
विषमे अर्थलाभः स्यात्समे च समता भवेत् ।
शून्ये शून्यमिति प्रोक्तं स्कंदाय फलमीदृशम् ॥ १७५ ॥

कोणताही एकादा दिवस आपणांस लाभदायक आहे किंवा नाहीं हें पुढील रीतीनें पहावें. चैत्रापासून महिने मोजून चालू महिन्याचा अंक, शुक्लपक्षापासून तिथी मोजून तिथीचा अंक, रविवारापासून वाराचा अंक, अश्विनीपासून नक्षत्राचा अंक, विष्कंभादि योगाचा अंक आणि बवापासून करणाचा अंक घेऊन त्या सर्व अंकांची बेरीज करावी, व त्यांत जन्मनक्षत्राचा अंक मिळवून ती संख्या तीन ठिकाणीं मांडावी. एका ठिकाणच्या संख्येस ३ नीं गुणून ८ नीं भागावें; दुसऱ्या ठिकाणच्या संख्येस ७ नीं गुणून ३ नीं भागावें; व तिसऱ्या ठिकाणच्या संख्येस २ नीं गुणून ५ नीं भागावें. तिन्ही भागाकारांत बाकी अंक राहिल्यास यश, लाभ व जय हीं प्राप्त होतात. पहिल्या भागाकारांत बाकी शून्य राहिल्यास व्याधि, दुसऱ्यांत बाकी शून्य राहिल्यास मोठें भय, व तिसऱ्या ठिकाणीं शून्य राहिल्यास हानि, असें जाणावें. तसेंच, बाकी विषम अंक राहिल्यास धनलाभ, सम अंक राहिल्यास लाभही नाहीं किंवा हानीही नाहीं, अर्थात् सम स्थिति; व तीन्ही ठिकाणीं शून्य असतां सर्वनाश असें जाणावें.

गांवाहून मनुष्य किंवा पत्र येण्याचा पंथाप्रश्न.

तिथिः प्रहरसंयुक्ता तारकावारसिश्रिता ।
सप्तभिस्तु हरेद्भागं शेषं तु फलमादिशेत् ॥ १७६ ॥
एकशेषं तथा स्थाने द्वितीये पथि वर्तते ।
तृतीयेऽप्यर्धमार्गे तु चतुर्थे ग्राममादिशेत् ॥ १७७ ॥
पंचमे पुनरावृत्तिः षष्ठे व्याधियुतं वदेत् ।
शून्यं ज्ञेयं सप्तमे वै चैतत्प्रश्नस्य लक्षणम् ॥ १७८ ॥

रीति पहिली—ज्या तिथीला प्रश्न केला असेल त्या तिथीसुद्धां शुक्ल प्रतिपदेपासून तिथि मोजून त्या अंकांत प्रश्नकाळचा प्रहर, वार व नक्षत्र यांचे अनुक्रमांक मिळवून त्या सर्व बेरजेला ७ नीं भागावें; आणि भागाकाराची जी बाकी राहील तिचें

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

फल पुढें लिहिल्याप्रमाणें जाणावें. शेषांक १ असतां स्वस्थानीं आहे, २ असतां घर सोडून मार्ग चालूं लागला, ३ असतां अर्धमार्ग चालून आला, ४ असतां गांवाजवळ आला, ५ असतां परत गेला, ६ असतां व्याधिग्रस्त झाला आणि ० असतां लवकर येणार नाहीं असें जाणावें. पत्रसंबंधीं प्रश्न पाहातेवेळीं ५।६।० बाकी राहिली तर पत्र लवकर येणार नाहीं, असें जाणावें.

वर्तमानं च नक्षत्रं गणयेत्कृत्तिकादितः।
सप्तभिश्च हरेद्भागं शेषं प्रश्नस्य लक्षणम् ॥ १७९ ॥

रीति दुसरी—प्रश्नकाळीं जें नक्षत्र असेल त्या नक्षत्रापर्यंत कृत्तिकापासून नक्षत्रें मोजून त्या अंकास सातांनीं भागावें आणि जी बाकी राहील तिचें फळ वरच्याप्रमाणें जाणावें. सातांनीं भाग जात नाहीं अशी संख्या असेल तर तीच भागाकाराची बाकी समजून फळें पहावीं.

प्रश्नाक्षरं रुद्रयुक्तं सप्तभिर्भाजितं तथा।
फलमेवं क्रमाज्ज्ञेयं सर्वेषां हि शुभाशुभम् ॥ १८० ॥

रीति तिसरी—प्रश्नाचीं अक्षरें मोजून त्यांत ११ मिळवून त्या बेरजेस ७ नीं भागावें. जी बाकी राहील तिचें फल वर पहिल्या प्रकारांत लिहिल्याप्रमाणें जाणावें.

रीति चवथी—प्रश्नकाळची लग्नकुंडली मांडावी. आणि कुंडलींत लग्नीं किंवा द्वितीयस्थानीं शुक्र, तृतीय किंवा चतुर्थस्थानीं गुरु, अथवा बुधचंद्र एकाच स्थानीं असतां, कार्यसिद्धि होऊन मनुष्य किंवा पत्रोत्तर शीघ्र येईल. प्रश्नलग्नीं शुभग्रह असून धनेश व पराक्रमेश यांनीं दृष्ट असतां, ५।७ या स्थानीं चंद्रयुक्त गुरुशुक्र असतां, चरलग्नीं सूर्य, बुध, शुक्र, किंवा यांतून कोणीही ग्रह असतां प्रवासी अथवा पत्रोत्तर मार्गांत असून शीघ्र येईल. प्रश्नकाळीं स्थिरलग्न असून वरीलप्रमाणें ग्रहयोग असेल तर पत्र किंवा मनुष्य अवकाशानें येईल. द्विस्वभाव लग्न असतां येण्याचा बेत रहित झाला असें जाणावें. ह्या रीतीनें प्रश्न पाहिला असतां बराच अनुभव येतो. परंतु ज्योतिष्याचें आचरण मात्र शुद्ध पाहिजे.

कार्यप्रश्न.

*दिशा प्रहरसंयुक्ता तारकावारमिश्रिता।
अष्टभिस्तु हरेद्भागं शेषं प्रश्नस्य लक्षणम् ॥ १८१ ॥
पंचैके त्वरिता सिद्धिः षट्तुर्ये च दिनत्रयम्।
त्रिःसप्तके विलंबश्च द्वौ चाष्टौ न च सिद्धिदौ ॥ १८२ ॥

रीति पहिली—पृच्छकाचें मुख ज्या दिशेस असेल त्या दिशेचा अंक, तसेंच प्रश्नसमयींचे प्रहर, नक्षत्र आणि वार या सर्वांचे अंक एकत्र करून त्या बेरजेस

* दिशांचे अंक मोजणें ते पूर्वेचा १, आग्नेयीचे २, दक्षिणेचे ३, नैर्ऋत्येचे ४, पश्चिमेचे ५, वायव्येचे ६, उत्तरेचे ७, आणि ईशान्येचे ८, याप्रमाणें मोजावे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आठांनीं भागावें. बाकी १ किंवा ५ उरले तर त्वरित कार्यसिद्धि होईल. ६ किंवा ४ उरले तर तीन दिवसांनंतर कार्य होईल, ३।७ उरले तर विलंबेंकरून कार्य होईल, व २।८ उरले तर कार्य होणें कठीण असें समजावें.

सप्तत्रयांके कथयंति वार्तां नवैकपंच त्वरितं वदंति ।
अष्टौ द्वितीये नहि कार्यसिद्धी रसाश्च वेदा घटिकात्रयं च ॥ १८३ ॥

रीति दुसरी—बाजूस दाखविल्याप्रमाणें एक नवगृहात्मक यंत्र करून त्यांतील

४	३	८
९	५	१
२	७	६

एका अंकावर पृच्छकाला हात ठेवण्यास सांगावा. हात ठेवलेला अंक ७ अथवा ३ असेल तर कार्यसिद्धीबद्दल वार्ता ऐकण्यांत येईल. ९।१।५ असेल तर कार्य लवकर होईल. ८।२ असले तर कार्य होणें कठीण. आणि ४।६ असले तर तीन घटिकांनीं कार्य होईल.

अष्टोत्तरशतांकेषु प्रश्निको न्यूनमाचरेत् ।
सर्वं द्वादशभिर्भक्तं शेषं चैव शुभाशुभं ॥ १८४ ॥

एकं दुर्गासप्तके वै विलंबश्चाङ्के तुर्ये दिक्षु सूतेषु नाशः ।
रुद्रे सिद्धिः कार्यवृद्धिश्च नेत्रे शीघ्रं कार्यं स्यात्रिषड्द्वादशेषु ॥ १८५ ॥

रीति तिसरी—प्रश्न करणाऱ्या मनुष्यास १०८ अंकांतून एका अंकाचें नांव घ्यावयास सांगावें, व त्या अंकास बारांनीं भागून जी बाकी राहील तिचीं फळें पुढें लिहिल्याप्रमाणें समजावीं. १।७।९ उरले तर विलंबानें कार्य होईल. ८।४।१०।५ उरले तर कार्यनाश आणि २।३।६।११।१२ उरले तर शीघ्र कार्यसिद्धि होईल असें समजावें.

अंकं द्विगुणितं कृत्वा फलनामाक्षरैर्युतं ।
त्रयोदशयुतं कृत्वा नवभिर्भागमाहरेत् ।
शेषांके विषमे सिद्धिः समे नाशश्च जायते ॥ १८६ ॥

रीति चवथी—पृच्छकाला नऊ अंकांतून एका अंकाचें नांव घ्यावयास सांगावें. त्या अंकाची दुप्पट करून त्यांत एकाद्या फळाच्या नांवाचीं अक्षरें मिळवावीं व त्यांत दुसरे १३ मिळवावे. त्या बेरजेस नवांनीं भागावें. बाकी विषम अंक असेल तर कार्यसिद्धि आणि सम असेल तर कार्यनाश असें जाणावें.

रीति पांचवी—चंद्र व लग्नस्वामी हे चर राशीस असतां किंवा त्यांची पूर्ण दृष्टि लग्नावर असतां त्वरित कार्यसिद्धि होईल व इतर लग्नीं अशी स्थिति असतां विलंबेंकरून कार्य होईल. चंद्र व लग्नेश स्थिरलग्नीं असून उभयतांची लग्नावर पूर्ण दृष्टि असेल तर फारच विलंबानें कार्य होईल. चंद्र व लग्नेश द्विस्वभाव राशीस असून लग्नही द्विस्वभाव राशीचें असेल तरीही विलंबानें कार्य होईल. चर लग्न, चर नवांश व लग्नेशाची लग्नीं पूर्ण दृष्टि असेल तर २–३ दिवसांत कार्य

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

होईल. चर लग्नीं लागणाऱ्या वेळेपेक्षां स्थिर लग्नीं दुप्पट वेळ व द्विस्वभाव लग्नीं अडीचपट, आणि या दोन प्रकारांपैकीं कोणतीही एकादी स्थिति असून वक्री ग्रह तेथें असतील तर तिप्पट काळानें कार्य होईल. १–४–७–१०–५–९ या स्थानीं शुभ ग्रह, व ३–६–१०–११–४–८ या स्थानीं पापग्रह व लग्नेश ८–११–१२ या स्थानीं अशी स्थिति असतां अवश्य कार्य होईल. तसेंच, प्रश्नकाळचा लग्नस्वामी, धनेश व चंद्र हे परस्परयुक्त किंवा दृष्ट असतील किंवा २।५।९।१०।११ ह्या स्थानांवर त्यांच्या त्यांच्या स्वामींची किंवा चंद्र, बुध, गुरु, शुक्र, किंवा लग्नेश यांची दृष्टि असेल तर कार्यसिद्धि लवकर होईल. ८।१२ या दोन स्थानीं शुभग्रह नसावे.

लाभप्रश्न.

प्रश्नकाळीं कोण लग्न आहे तें शेवटीं दिलेल्या लग्नकोष्टकांत पाहून नंतर लग्नीं ग्रह पहावयाचे ते असेः—(१) प्रश्नकालीं चंद्र, धनेश व लग्नेश हे परस्परांशीं युक्त अथवा दृष्ट असतील, अथवा धन, नवम किंवा लग्न या स्थानीं पूर्वोक्त ग्रह असतील तर प्रश्नकर्त्यास द्रव्यलाभ होईल. यांतून एकही योग घडला तरी फलप्राप्ति होते. चंद्रामुळें योग घडला तर यजमान अगर वरिष्ठ यांचेकडून लाभ होईल. (२) लग्नेश व लाभेश यांची लाभस्थानीं दृष्टि असेल तरीही लाभ होईल. (३) लाभभावावर सर्व ग्रहांची दृष्टि असेल तर पूर्णपणें लाभ होईल. (४) लाभभावावर लाभेशाची दृष्टि असेल तर चालू कार्यांत लाभ होईल. (५) लाभस्थानीं गुरु, शुक्र अथवा चंद्र हे ग्रह असतील तरीही चालू कार्यांत लाभ होईल. (६) धन अथवा भाग्यस्थानीं चंद्र असेल तरीही इष्ट कार्यांपासून लाभ होईल. (७) धर्मेश लग्नीं अथवा लग्नेशाची धर्मभावावर दृष्टि असेल तर राजापासून लाभ होईल. (८) नवमेशावर अथवा लग्नेशावर अथवा लग्नीं चंद्राची दृष्टि असेल तर लाभ विशेष प्रकारें होईल. (९) धनेश धनांत अथवा लग्नीं असेल तर इच्छेपेक्षां ज्यास्त धनलाभ होईल. (१०) धनांत शुक्र, चंद्र, गुरु आणि धनेश हे असल्यास कलम ९ प्रमाणेंच धनलाभ होईल. (११) लग्नेश धनांत व धनेश चंद्रयुक्त लग्नीं व चंद्रराशिस्वामी–लाभेश–लग्नेश हे परस्परांस पहातील तर विशेष लाभ होईल. शीर्षोदय म्हणजे सिंह, कन्या, तुला, वृश्चिक व कुंभ हीं प्रश्नलग्नें असतां व लग्नीं शुभ षड्वर्गाधिक्य असतां पृच्छकाचे हेतु पूर्ण होतात.

ऋणप्रश्न.

लग्नीं, सप्तमांत व एकादशांत शुभग्रह असतां ऋण मिळेल असें समजावें. लग्नेश चंद्रानें युक्त असून षष्ठस्थानीं त्याची दृष्टि असतां ऋण मिळण्याचा संभव विशेष व खात्रीचा असतो. प्रश्नलग्नापासून २।८।१२ या स्थानीं पापग्रह असतां ऋण मिळालें तरी लवकर फिटत नाहीं. मंगळ केंद्रीं व शुभस्थानीं असतां घेतलेलें ऋण लवकर फिटतें. ऋणाची देवघेव शनिवारीं किंवा अमावास्येस करूं नये.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

शिक्षा अथवा मुक्तिप्रश्न.

प्रश्नकालीं जें लग्न असेल त्याचा स्वामी लग्नीं अथवा ३।६।९।१२ या स्थानीं असेल किंवा या स्थानांचे स्वामी आपआपल्या स्थानीं असतील तर मनुष्य बंधनापासून मुक्त होईल. हेच योग पापग्रहानें युक्त असतां मुक्तता लवकर घडेल व शुभग्रह असतां बंधनाचा संभव अधिक होईल. प्रश्नलग्नीं सप्तमांत शनि, द्वादशांत रवि, मंगळ, शनि, राहु किंवा धनस्थानीं शनि, मंगळ असणें किंवा हीं स्थानें त्या त्या ग्रहांनीं दृष्ट असणें हे योग बंधन किंवा शिक्षा घडविणारे आहेत. जन्मकुंडलींत अशी स्थिती असतांही बंधनयोग घडतो.

विवाहप्रश्न.

प्रश्नकालीं ३।५।७।११।६ यांपैकीं कोठेंही चंद्र असून तेथें गुरु, रवि किंवा बुध यांची दृष्टि असेल तर विवाहाचा योग जमून येईल. विरुद्ध प्रकार असतां विलंबानें कार्य होईल. प्रश्नकालीं ९।५।१।४।७।१० या स्थानीं केवळ सौम्यग्रह असतांही लवकर विवाहकार्य होईल. असा योग नसतां विवाह लांबणीवर पडेल. सप्तमेश पापग्रह असतां किंवा पापग्रहानें दृष्ट असतां जमलेला विवाह बिघडण्याचा संभव असतो. पुरुषाच्या प्रश्नलग्नीं सप्तमांत स्त्रीग्रह आणि स्त्रीच्या प्रश्नलग्नीं सप्तमांत पुरुषग्रह किंवा शुभ ग्रहांची दृष्टि असतां विवाह लवकर जमतो असें समजावें.

नष्टवस्तुप्रश्न.

अंधके लभते शीघ्रं मंदके च दिनत्रयम् ।
मध्यके च चतुःषष्टी न प्राप्नोति सुलोचने ॥ १८७ ॥
अंधके पूर्वतो वस्तु मंदके दक्षिणे तथा ।
पश्चिमे मध्यनेत्रे च उत्तरे तु सुलोचने ॥ १८८ ॥

रीति पहिली—अंधनक्षत्रीं वस्तु नष्ट झाली असतां शीघ्र मिळेल. मंदनक्षत्रीं हरवली असतां प्रयत्नेंकरून तीन दिवसांनंतर मिळेल. मध्यलोचन नक्षत्रीं सांडली तर दीर्घ प्रयत्न केले असतां चौसष्ट दिवसांनीं सांपडेल. आणि सुलोचन नक्षत्रीं वस्तु गेली तर मिळणें अत्यंत कठीण. तसेंच, अंधनक्षत्रीं पूर्वेस, मंदनक्षत्रीं दक्षिणेस, मध्यनक्षत्रीं पश्चिमेस व सुलोचननक्षत्रीं वस्तु गेली असतां उत्तरेस पहावी.

मघादिरर्यमांतं च समीपे वस्तु दृश्यते ।
हस्तादिवसुपर्यंतमन्यहस्ते च दृश्यते ॥ १८९ ॥
शततारायमांतं तु स्वगृहे वस्तु दृश्यते ।
अघ्न्यादिसार्पपर्यंतमदृष्टं दूरगं तथा ॥ १९० ॥

रीति दुसरी—जर मघानक्षत्रापासून उत्तरानक्षत्रापर्यंत वस्तु सांडली तर जवळच दृष्टीस पडेल. हस्तनक्षत्रापासून धनिष्ठापर्यंत सांडली, तर परहस्तीं दृष्टीस

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पडेल. शततारकापासून भरणीपर्यंत सांडली असतां स्वगृहांत सांपडेल. कृत्तिकापासून आश्लेषापर्यंत हरवली असतां सांपडणार नाहीं असें जाणावें.

तिथिर्वारं च नक्षत्रं प्रहरेण समन्वितम् ।
दिक्संख्यया हतं चैव सप्तभिर्विभजेत्पुनः ॥ १९१ ॥
एकेन भूतले द्रव्यं द्वयं चेद्भांडसंस्थितम् ।
तृतीये जलमध्यस्थं अंतरिक्षे चतुर्थके ॥ १९२ ॥
तूषस्थं पंचमे तु स्यात्षष्ठे गोमयमध्यगम् ।
सप्तमे भस्ममध्यस्थं इत्येतत्प्रश्नलक्षणम् ॥ १९३ ॥

रीति तिसरी—प्रश्नसमयींची तिथि, नक्षत्र व प्रहर[1] यांचे अंक एकत्र मिळवून त्या बेरजेस आठांनीं गुणून सातांनीं भागावें. बाकी १ असतां जमिनीवर, २ असतां भांड्यांत, ३ असतां जलाच्या आश्रयाला, ४ असतां वर ठेविलेली आणि ५।६।० असतां तूस, शेण, राख, इत्यादि ठिकाणीं कचऱ्यामध्यें वस्तु आहे असें जाणावें.

लग्नाच्चंद्रो भवेद्यत्र तत्र चोरगृहं भवेत् ।
लग्ने तूर्ये च जामित्रे दशमेंदुक्रमेणतः ।
पूर्वे सौम्ये पश्चिमे च याम्ये नष्टं ध्रुवं वदेत् ॥ १९४ ॥

रीति चवथी—प्रश्नकाळीं जें लग्न असेल त्या लग्नापासून ज्या दिशेस चंद्र असेल त्या बाजूस चोरीस गेलेली वस्तु आहे असें जाणावें. तसेंच, लग्नापासून ३ स्थानीं चंद्र असतां पूर्वेस, चतुर्थस्थानापासून सप्तमस्थानापर्यंत असतां उत्तरेस, सप्तम व दशम यांच्यामध्यें चंद्र असतां पश्चिमेस व त्यापुढें असतां वस्तु दक्षिणेस आहे असें जाणावें. प्रश्नलग्नापासून १।३।५।७ ह्या स्थानीं मंगळ, शुक्र, शनि, राहु यांतून कोणीही ग्रह असतां नष्टवस्तु मिळेल. १।३।१०।५।४।९।११ ह्या स्थानीं शुभग्रह असून पापग्रह नसतील तर नष्टधन परत मिळेल. लग्नस्वामीची चंद्रावर दृष्टि असतां नष्टवस्तु लवकर मिळेल. १।२।४।५।७।८।९।१० ह्या स्थानीं पापग्रह असतां नष्टवस्तु मिळणें अत्यंत दुर्लभ होय. प्रसंगीं उलट तत्संबधीं आणखी पदरचें द्रव्य जाण्याचा संभव असतो. प्रश्नलग्नापासून धनेश सप्तमस्थानीं असेल किंवा धनस्वामीवर शुक्रचंद्रांची दृष्टि असेल तर चोरी करणारी स्त्री आहे असें सांगावें. धनेश सप्तमस्थानीं नसतां पुरुष चोर आहे असें सांगावें. प्रश्नलग्नाचा स्वामी चंद्र, मंगळ, बुध किंवा शुक्र असेल तर चोराचें वय सुमारें २० वर्षांचे आंत, गुरु असतां सुमारें ३० वर्षांचे आंत, व इतर ग्रह असतां वयोवृद्ध चोर आहे असें सांगावें. लग्नस्वामी बुध किंवा शनि असतां हीन वर्णांचा व इतर ग्रह असतां उच्चवर्णांचा चोर आहे असें समजावें. प्रश्नलग्न स्थिरराशीचें किंवा अंश स्थिरराशीचा किंवा

---

१ प्रहर मोजणें ते अहोरात्रांचे आठही प्रहर मोजावे. जसें, दिवसाचे प्रहर चार म्हणून रात्रीचा पहिला प्रहर तो ५, दुसरा प्रहर तो ६, इत्यादि.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

वर्गोत्तम असतां नष्टवस्तु ओळखीच्या मनुष्यानें चोरिली, आणि चरलग्न व चर अंश असतां वस्तु बाहेर गेली. द्विस्वभाव लग्न असतां वस्तु शेजारीं गेली. स्थिरलग्नीं गेलेली वस्तु घरांत आहे व चरलग्नीं गेलेली बाहेर आहे असें समजावें.

गर्भिणीप्रश्न.

तत्पृच्छलग्ने रविजीवभौमास्तृतीयसप्ते नवपंचमे च ।
गर्भः पुमान्वै ऋषिभिः प्रणीतश्चान्यग्रहे स्त्री विबुधैः प्रणीता ॥ १९५ ॥

रीति पहिली—गर्भिणीसंबंधीं ज्या वेळीं कोणी प्रश्न करील, त्या वेळेची लग्नकुंडली तयार करून ग्रह पहावे. ३।५।७।९ ह्या स्थानीं रवि, भौम अथवा गुरु असतां पुत्र व अन्य ग्रह असतां कन्या होईल. प्रश्नलग्न पुरुषराशीचें असून त्यावर बलिष्ठ पुरुषग्रहांची दृष्टि असतां पुत्र, आणि स्त्रीलग्न व स्त्रीग्रहांची दृष्टि असतां कन्या, अथवा प्रश्नलग्नाचे षड्वर्ग साधावे. त्यांत पुरुषवर्गाधिक्य असतां पुत्र व स्त्रीवर्गाधिक्य असतां कन्या असें जाणावें.

नामाक्षराणि गर्भिण्याः कृत्वा त्रिगुणितं तथा ।
तिथिर्देशयुतं चैव अश्वनामाक्षरैर्युतं ।
अष्टभिस्तु हरेद्भागं समे स्त्री विषमे सुतः ॥ १९६ ॥

रीति दुसरी—गर्भिणीच्या नांवाच्या अक्षरांची तिप्पट करून त्यांत शुक्लप्रतिपदेपासून तिथि मोजून प्रश्नसमयींची तिथि मिळवावी. त्या अंकांत पृच्छकाला विचारून एकाद्या देशाच्या नांवाचीं व अश्वाच्या नांवाचीं अक्षरें मिळवावीं. आणि त्या सर्व बेरजेस आठांनीं भागून बाकी सम अंक म्ह० २।४।६।० राहिले तर कन्या आणि विषम अंक म्ह० १।३।५।७ असतां पुत्र होईल असें जाणावें.

रोगसंबंधी प्रश्न.

तिथिर्वारं च नक्षत्रं लग्नं प्रहर एव च ।
अष्टभिस्तु हरेद्भागं शेषं तु फलमादिशेत् ॥ १९७ ॥
हयाग्नौ देवतावाधा पैत्री वै नेत्रदंतिषु ।
षट्चतुर्षु भूतवाधा न वाधा एकपंचके ॥ १९८ ॥

प्रश्नसमयींची तिथि, वार, नक्षत्र, लग्न व प्रहर या सर्वांची बेरीज करून त्या बेरजेस आठांनीं भागावें. ७।३ उरले तर देवतेची बाधा, २।८ उरले तर पितृबाधा, ४।६ उरले तर पिशाचबाधा आणि १।५ उरले तर दुसरी कांहीं बाधा नसून केवळ शरीरपीडा आहे असें जाणावें. आर्द्रा, आश्लेषा, पूर्वा, स्वाती, अनुराधा, ज्येष्ठा, पूर्वाषाढा, पूर्वाभाद्रपदा आणि रेवती ह्या नक्षत्रांवर, तसेंच १।४।६।९।११।१४।३० ह्या तिथींवर आणि रवि, भौम, शनि, ह्या वारीं, व व्यतीपात, वैधृति इत्यादि कुयोगांवर प्रथम ज्वरादि रोग उत्पन्न झाल्यास रोग दूर होण्यास कष्ट पडून दीड

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

महिन्यांनीं रोगी बरा होईल. उत्तराषाढा किंवा मृग या नक्षत्रीं रोगोत्पत्ति झाली असेल तर एक महिना पीडा भोगावी लागेल. मघा नक्षत्रावर प्रथम रोग उत्पन्न झाला असेल तर वीस दिवस, हस्त नक्षत्रावर पंधरा दिवस, अश्विनी, कृत्तिका, विशाखा, मूल आणि धनिष्ठा या नक्षत्रांवर नऊ दिवस, भरणी, चित्रा, श्रवण आणि शततारका या नक्षत्रांवर अकरा दिवस, आणि उत्तरा, उत्तराभाद्रपदा, पुष्य, पूर्वा, अभिजित् या नक्षत्रीं रोग उत्पन्न झाला असेल तर सात दिवस पीडा भोगावी लागेल. सोमवारीं किंवा बुधवारीं रोग उत्पन्न झाल्यास बारा दिवसांनीं, गुरुवारीं उत्पन्न झाल्यास दहा दिवसांनीं व शुक्रवारीं उत्पन्न झाल्यास तेवीस दिवसांनीं पीडा दूर होईल. आश्लेषा, शततारका, आर्द्रा, धनिष्ठा, हस्त, पूर्वा, पूर्वाषाढा, पूर्वाभाद्रपदा, भरणी, मघा, विशाखा हीं नक्षत्रें व प्रतिपदा, चतुर्थी, अष्टमी, नवमी, द्वादशी ह्या तिथि व रवि, मंगळ आणि शनि हे वार या नक्षत्र-तिथिवारांच्या संयोगावर जर रोगोत्पत्ति होईल तर जिवावरचें दुखणें येतें. ज्वराची शांति होण्यास ज्वरशांति किंवा शंकरावर अभिषेक करवावा. रोग प्रबल असेल तर मृत्युंजयाचा जप किंवा सप्तशतीचा पाठ विद्वान्, सच्छील व सदाचरणी ब्राह्मणाकडून करवावा असें धर्मशास्त्रग्रंथांत लिहिलेलें आहे.

विषनक्षत्रें व सर्पदंश.

विशाखा कृत्तिका मूले रेवत्यार्द्रामघासु च ।
ऋक्षे श्लेषा विधाने च सर्पदष्टो न जीवति ॥ १९९ ॥

विशाखा, कृत्तिका, मूल, रेवती, आर्द्रा, मघा आणि आश्लेषा ह्या विषनक्षत्रांवर सर्प वगैरे विषारी प्राण्यांचा दंश झाला असतां जीविताची शाश्वति संशयास्पद असते.

जनावर चुकल्याचा प्रश्न.

द्युमणिभान्नवभेषु वने पशुं तदनु षड्सु तु कर्णपथे स्थिरम् ।
अचलभेषु गतं गृहमागतं द्वयगतं गतमेव मृतं त्रिषु ॥ २०० ॥

सूर्यनक्षत्रापासून दिवसनक्षत्रापर्यंत नक्षत्रें मोजावीं. दिवसनक्षत्र नऊ नक्षत्रांच्या आंत असेल तर गुरूं रानांत आहे. नऊ नक्षत्रांच्या पुढें व पंधरा नक्षत्रांच्या आंत असलें तर गुरूं रस्त्यांत आहे. सोळापासून बाविसांच्या आंत असलें तर घरीं लवकर परत येईल. बावीस नक्षत्रांपुढें दोन नक्षत्रें म्हणजे चौवीस नक्षत्रांपर्यंत सांपडण्यास श्रम पडतील व चौविसांपुढच्या तीन नक्षत्रांत दिवसनक्षत्र असेल तर गुरूं संकटांत आहे.

कार्तवीर्यार्जुनो नाम राजा बाहुसहस्रवान् ।
तस्य स्मरणमात्रेण गतं नष्टं च लभ्यते ॥ २०१ ॥

ह्या श्लोकाचा अष्टोत्तरशत जप केला असतां कोणतीही हरवलेली वस्तु लवकर सांपडते असें ग्रंथांतरीं लिहिलेलें आहे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

दुष्टदृष्टि लागल्यास उपाय.

बालकाला मनुष्याची दृष्टिबाधा झाली असतां सायंकाळीं हातपाय धुवून पुढील मंत्रानें विभूति अभिमंत्रून त्याला लावावी, असें धर्मसिंधु ग्रंथांत लिहिलें आहे. मंत्रः—

'वासुदेवो जगन्नाथः पूतनातर्जनो हरिः ॥ रक्षतु त्वरितो बालं मुंच मुंच कुमारकं ॥ कृष्ण रक्ष शिशुं शंखमधुकैटभमर्दन ॥ प्रातःसंगवमध्याह्न-सायाह्नेषु च संध्ययोः ॥ महानिशि सदा रक्ष कंसारिष्टनिषूदन ॥ यद्गोरजः पिशाचांश्च ग्रहान् मातृग्रहानपि ॥ बालग्रहान् विशेषेण छिंधि छिंधि महाभयान् ॥ त्राहि त्राहि हरे नित्यं त्वद्रक्षाभूषितं शिशुं' ॥ या मंत्रेकरून अभिमंत्रण केलेलें भस्म बालकाच्या कपाळाला व सर्वांगाला लावावें. विभूति लावणें ती प्रथम शनिवारीं लावूं नये. अथवा 'रक्ष रक्ष महादेव नीलग्रीव जटाधर ॥ ग्रहैस्तु सहितो रक्ष मुंच मुंच कुमारकं' ॥ हा मंत्र भूर्जपत्रावर लिहून तें भूर्जपत्र काळ्या सुतानें बांधून तो काळा दोरा धूपवून घातवार वगैरे वर्ज्य करून मुलाच्या उजव्या व मुलीच्या डाव्या बाहूस बांधावा. असें केलें असतां दुष्टदृष्टि लागली असेल तर ती पीडा दूर होते व मुलांचें रडणें बंद होतें.

शिंकाप्रश्न.

बुधैश्छिकारवं श्रुत्वा पादच्छायां च कारयेत् ।
त्रयोदशयुतां कृत्वा चाष्टभिर्भागमाहरेत् ॥ २०२ ॥
लाभः सिद्धिर्हानिशोकौ भयं श्रीर्दुःखनिष्फले ।
क्रमेणैवं फलं ज्ञेयं गर्गेण च यथोदितम् ॥ २०३ ॥
आसने शयने चैव दाने चैव तु भोजने ।
वामांगे पृष्ठतश्चैव षट् छिंकाश्च शुभावहाः ॥ २०४ ॥

शिंकेचा आवाज ऐकूं आल्यावर लगेच आपली छाया आपल्या पावलांनीं मोजावी. जितकीं पावलें होतील त्यांत तेरा मिळवावे, आणि त्या बेरजेस आठांनीं भागावें. बाकी १।२।६ उरले तर लाभ, आणि ३।४।५।७।० उरले तर कार्य होणार नाहीं असें समजावें. आसनावर, शयनस्थानावर, दान देतेवेळीं, भोजनाचे वेळीं, डाव्या बाजूस किंवा पाठीमागें अशा सहा ठिकाणच्या शिंका शुभ मानिल्या आहेत. आपण महत्वाची गोष्ट बोलत असतां कोणी शिंकलें तरच प्रश्न पहावा. एका शिंकेपेक्षां अधिक शिंका एकाच वेळीं आल्यास प्रश्न पाहूं नये. आतां दिशापरत्वें फल सांगतों.

शिंकाप्रश्नं प्रवक्ष्यामि पूर्वस्यामशुभं फलं ।
आग्नेय्यां शोकदुःखे स्यादरिष्टं दक्षिणे तथा ॥ २०५ ॥
नैर्ऋत्यां च शुभं प्रोक्तं पश्चिमे मिष्टभक्षणं ।
वायव्ये धनलाभस्तु उत्तरे कलहस्तथा ॥ २०६ ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ईशान्यां च शुभं ज्ञेयमात्मशिंका महद्भयं ।
ऊर्ध्वं चैव शुभं ज्ञेयं मध्ये चैव महद्भयम् ॥ २०७ ॥

दिशापरत्वें शिंकाफळ—पूर्वेची शिंका अशुभ, आग्नेयीची दुःखकारक, दक्षिणेची अरिष्टकारिणी, नैर्ऋत्येची शुभ, पश्चिमेची मिष्टान्नभक्षण देणारी, वायव्येची धनदायक, उत्तरेची कलहकारिणी, आणि ईशान्येची शुभ, असें जाणावें. तसेंच, स्वतः आपल्याला शिंक आली तर भीति, ऊर्ध्व (वर) झाली तर शुभ, आणि मध्यें झाली तर मोठें भय याप्रमाणें समजावें.

काकशब्दशकुन.

काकस्य वचनं श्रुत्वा पादच्छायां च कारयेत् ।
त्रयोदशयुतां कृत्वा षड्भिर्वै भागमाहरेत् ॥ २०८ ॥
लाभः खेदस्तथा सौख्यं मिष्टान्नं च धनागमः ।
अशुभं च क्रमेणैव गर्गस्य वचनं तथा ॥ २०९ ॥
मस्तके वायसस्पर्शे दारिद्र्यं मरणं कलिः ।
योषितां मस्तके भर्तुररिष्टं वा सुतस्य च ॥ २१० ॥
वृक्षाधो वाथ सिद्धान्नभक्ष्ये दध्यादियोगतः ।
काकस्पर्शो न दोषाय न पश्येत् काकमैथुनम् ॥ २११ ॥

आपण एकादी महत्वाची गोष्ट बोलत असतां कावळा ओरडला तर लगेच प्रश्न पहावा. तो असा कीं, आपली छाया पावलांनीं मोजून त्यांत १३ मिळवावे आणि त्या बेरजेस सहांनीं भागावें; शेष राहील त्याचें फळ—१ उरेल तर लाभ, २ खेद, ३ सौख्य, ४ भोजन, ५ धनलाभ आणि ० उरलें तर अशुभ जाणावें, असें गर्गऋषीचें मत आहे. कोणाच्या मस्तकाला काकस्पर्श घडेल तर त्यापासून धनचिंता, रोग किंवा कलह हीं उत्पन्न होतात. स्त्रियांच्या मस्तकाला काकस्पर्श होईल तर पतीला किंवा अपत्याला अनिष्ट होय. परंतु एकाद्या वृक्षाखालीं राहिलें असतां, शिजलेलें अन्न भक्षण करीत असतां किंवा दहीं इत्यादि पदार्थ घेऊन जात असतां काकस्पर्श घडेल तर मात्र दोष नाहीं. काकमैथुन दृष्टीस पडेल तर तें अत्यंत अनिष्ट होय. म्हणून त्याबद्दल शांति करावी असें शांतिग्रंथांत सांगितलें आहे.

नेत्रस्फुरण.

नेत्रस्योर्ध्वं हरति सकलं मानसं दुःखजालं ।
नेत्रोपांते लभति च धनं नासिकांते च रोगः ।
नेत्रस्याधः स्फुरणमसकृत्संगरे भंगहेतु- ।
र्वामे चैतत्फलमविफलं दक्षिणे वैपरीत्यम् ॥ २१२ ॥

थोडा वेळपर्यंत थांबून थांबून जर डोळा लवत असला तरच प्रश्न पहावा. कधीं-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कधीं दोनतीन दिवसपर्यंत देखील एकसारखा डोळा लवत असतो तो बहुतकरून वाततविकारानें लवत असतो. अशा वेळेस प्रश्न पाहूं नये. नेत्राच्या वरील पापण्या स्फुरण झाल्या तर मनाचें दुःखहरण किंवा धनप्राप्ति, भिंवयांच्या मध्यें स्फुरण होईल तर प्रियाची भेट, नासिकाजवळची स्फुरण झाली तर रोग व अधरप्रांत स्फुरण झाल्यास अपजय, असें जाणावें. पुरुषाचा उजवा डोळा लवत असला तर हीं फळें घ्यावीं; डावा लवत असला तर याच्या उलट फळें घ्यावीं. तसेंच स्त्रियांचा डावा लवत असला तर शुभ, आणि उजवा लवत असला तर अशुभ होय असें जाणावें.

पल्लीपतन.

अंगावर पाल पडली तर सचैल (त्या वेळेस अंगावर जीं वस्त्रें असतील त्यांसुद्धां) स्नान करावें. आणि शंकराचे देवळांत जाऊन तुपाचा दिवा लावून 'ॐ नमः शिवाय' या षडक्षरी मंत्राचा अकराशें निदान १०८ जप करावा; म्हणजे दोष दूर होतो असें ग्रंथांतरीं सांगितलेलें आहे.

शरीरस्थानपरत्वें शुभाशुभ फळें—मनुष्य प्रयाणास निघाला असतां जर अंगावर पाल पडली तर त्याचीं फळें खालीं लिहिल्याप्रमाणें समजावीं. अशुभ फल असतां प्रयाण करूं नये.

शीर्ष......राज्यप्राप्ति.	स्तन...दुर्भाग्य.	उजवें मणगट...धनक्षय.
कपाळ...बंधुदर्शन.	उदर...आश्रयप्राप्ति.	डावें मणगट.धनकीर्तिलाभ.
भिंवया...राजसन्मान.	दक्षिणबाहु...राजाश्रय.	नखें......धान्यलाभ.
वरील ओंठ...धनक्षय.	वामबाहु...राजक्षोभ.	मुख......मिष्टान्नभोजन.
खालचा ओंठ...ऐश्वर्यलाभ.	पाठ......बुद्धिनाश.	गुल्फ...बंधन.
नासिका...व्याधि.	ढोंपर, पोटऱ्या...शुभ.	केश......रोग.
उजवा कान...आयुष्य.	दोन्ही हात...वस्त्रलाभ.	दक्षिणपाद...मार्ग चालणें.
डावा कान...लाभ.	खांदा......विजय.	वामपाद...बंधुनाश.
नेत्र......बंधन.	नाभि......बहुधन.	पावलांचा मध्य...स्त्रीनाश.
कंठ...शत्रुनाश.	मांड्या......वाहनलाभ.	पावलांचा अंत...रोग.

स्वप्नविचार.

सर्वेंद्रियव्युपरतौ मनोऽनुपरतं यदा ।
विषयेभ्यस्तदा स्वप्नं नानारूपं प्रपश्यति ॥ २१३ ॥

स्वप् ह्या संस्कृत धातूपासून स्वप्न शब्द उत्पन्न झाला आहे. स्वप् धातूचा अर्थ झोंप घेणें असा आहे. अर्थात् ज्या अवस्थेचा झोंपेशीं संबंध आहे तें स्वप्न. जागृतावस्थेंत पाहिलेल्या वस्तूंचें झोंपेमध्यें घडलेलें दर्शन तेंच स्वप्न होय. झोंपेंत ज्ञानेंद्रियें व कर्मेंद्रियें ह्यांचे व्यापार बंद पडून मनाचे व्यापार मात्र जेव्हां सुरू असतात, तेव्हांच स्वप्नें पडतात. वस्तुतः प्रत्येक क्षणीं आपल्याला स्वप्नें पडतच

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

असतात, परंतु इंद्रियांचे व्यापार चालले असतांना त्यांत मन मग्न असल्यामुळें त्या वेळीं त्यांचें ज्ञान मनाला होत नाहीं. परंतु आपल्या मेंदूमध्यें जी विद्युच्छक्ति आहे तिच्या प्रभावानें, प्रत्येक क्षणीं घडणाऱ्या क्रियेचा किंवा संस्काराचा मेंदूवर ठसा उमटून रहातो; आणि मनाचा व मेंदूचा परस्पर निकट संबंध असल्यामुळें जेव्हां मन व्यापारमुक्त होऊन स्वस्थ असतें तेव्हां, म्हणजे झोंपेंत, त्या क्रियांची मेंदूच्या साहाय्यानें मनाला स्मृति होते, तींच स्वप्नें होत. तसेंच, अतिशय खाण्यानें, अपचनामुळें, शरीराच्या अस्वास्थ्यामुळें, मन चिंताग्रस्त किंवा विचारमग्न असल्यामुळें किंवा कांहीं अन्य कारणामुळें शरीरामध्यें निद्राविघातक क्रिया उत्पन्न होऊन इंद्रियांना वासनाजागृति किंवा पूर्वसंस्काराचें स्मरण होतें म्हणून स्वप्नें पडतात. स्वप्नांची सुरुवात होण्यापूर्वीं मनुष्य प्रथम अर्धवट जागा होतो; व स्वप्नें पडूं लागलीं म्हणजे पुन: अर्धवट असलेली जागृतीची अवस्था जाऊन, झोंप अधिक प्रबल होते. मनाची प्रवृत्ति नेहमीं इतर इंद्रियांकडेच असल्यामुळें इंद्रियवासनाविषयक जें जें मनाला गम्य असतें तें तें सारें स्वप्नांत दिसतें. उदाहरणार्थ, पोटांत अन्नसंचय प्रमाणापेक्षां कमी असल्यामुळें जर झोंपेंत क्षुधा लागली तर भक्ष्य पदार्थांचें मनाला स्मरण होऊन पूर्वीं पाहिलेल्या भोजनसमारंभाचीं स्वप्नें पडतात. किंवा कोठ्यांत जलसंचय पुरेसा नसल्यामुळें झोंपेंत तहान लागली तर तृषेचा विषय कल्पनेपुढें येऊन तहान भागविण्याचीं सर्व साधनें म्हणजे घरांतील रोजचीं पाणी पिण्याचीं भांडीं, विहीर, आसपासची नदी किंवा पाण्याचा पाट हीं दिसूं लागतात. जर तृषा प्रबल होऊन कंठ सुकला किंवा क्षुधा प्रखर होऊन पोटांत दाह झाला तर मात्र त्या विकारांपुढें झोंपेचें प्राबल्य अगदीं न चालून मनुष्य एकदम जागाच होतो. अशाच प्रकारच्या कांहीं कारणांनीं इतर स्वप्नें पडतात. ह्या अल्प विवेचनावरून स्वप्नांची उत्पत्ति इंद्रियवासनेमुळें होते, हें वाचकांच्या ध्यानांत येईलच. जें पूर्वीं कधीं जागृतावस्थेंत आपण पाहिलेलें, चिंतिलेलें किंवा ऐकिलेलें असतें तेंच बहुतेक प्रसंगीं स्वप्नांत दिसतें. असें आहे तरी, कांहीं स्वप्नें अगदीं अपूर्व असून भविष्यसूचकही असतात व अनेक प्रसंगीं तीं खरीं ठरतात, असा पुष्कळ अनुभव आहे. आणि त्यामुळेंच ह्या विषयाचा ऊहापोह आमच्या आर्यलोकांनीं करून आपले अनुभव ग्रथित करून ठेविले आहेत. तसेंच इतर राष्ट्रांतील कांहीं विद्वान् शोधकांनींही ह्या विषयाकडे लक्ष पुरविलें आहे. हा विषय मानसशास्त्राचा असल्यामुळें त्याचें विवेचन करण्याचें हें स्थळ नव्हे, म्हणून त्याविषयीं येथें अधिक लिहीत नाहीं. असो. प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें किंवा गाढ झोंप न लागून जीं स्वप्नें पडतात, त्यांचा कोणी विचार करूं नये. उत्तर रात्रीं म्हणजे पहांटेस किंवा अरुणोदयाबरोबर गाढ झोंपेंत जीं स्वप्नें पडतील त्यांचीं पुढें लिहिल्याप्रमाणें शुभाशुभ फलें पहावीं. जे मिताहारी असतात व कफवातपित्त ह्या त्रिदोषांपैकीं एकाद्या दोषानें ज्यांची प्रकृति विशेष दूषित नसते त्यांना मात्र कमी स्वप्नें पडतात; आणि

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

त्यांचींच कांहीं स्वप्नें बहुधा भविष्यसूचक असतात. आणि ज्यांस अन्नपचन बरोबर होत नाहीं, त्यांस नित्य अनेक निरर्थक स्वप्नें पडतात; आणि जेवल्याबरोबर निजूं नये, असें म्हणतात त्याचें कारण तरी हेंच. असो.

स्वप्नाचें लक्षण.

स्वप्नास्तु प्रथमे यामे संवत्सरविपाकिनः ।
षड्भिर्मासैर्द्वितीये तु त्रिभिर्मासैस्तृतीयके ॥ २१४ ॥
चतुर्थे प्रहरे स्वप्नो मासैकेन फलप्रदः ।
अरुणोदयवेलायां दशाहेन फलं भवेत् ।
प्रभातसमये स्वप्नात् सद्य एव फलं लभेत् ॥ २१५ ॥

कोणतेंही स्वप्न रात्रीच्या पहिल्या प्रहरांत पडलें असतां त्याचें फल एका वर्षानें मिळतें. दुसऱ्या प्रहरांत स्वप्न पडेल तर फलप्राप्ति सहा महिन्यांनीं होतें. तिसऱ्या प्रहरीं पडलेल्या स्वप्नाचें फल तीन महिन्यांनीं व चवथ्या प्रहरीं स्वप्न पडल्यास एक महिन्यानें फल मिळतें. अरुणोदयीं स्वप्न पडेल तर दहा दिवसांनीं व सूर्योदयीं पडलेल्या स्वप्नाचें फल तात्काल मिळतें. आतां शुभाशुभ स्वप्नांविषयीं किंचित् सांगतों.

शुभस्वप्नें.

नदी, समुद्र, तलाव वगैरे पाहणें किंवा तरणें; सूर्यचंद्रमंडल यांचें दर्शन; मोठ्या राजवाड्यावर, माडीवर किंवा पर्वतावर चढणें, मद्यपान, मांसभक्षण; विष्ठा वगैरे अंगास लागणें; रक्ताचें स्नान; दहींभाताचें व खिरीचें भोजन; पांढरें वस्त्र, गंध, पुष्पें, रत्नें, अलंकार हीं स्वप्नांत पाहिलीं असतां मोठा मान मिळून कार्यसिद्धि होते. देव, ब्राह्मण, राजा, हरिण, हत्ती, घोडा, सोनें व उत्तम अलंकार घातलेल्या व शुभ्रवस्त्र परिधान केलेल्या सुवासिनी स्त्रिया यांचें अवलोकन; सिंह, अश्व, बैल, पर्वत, उंबर, ताडमाड व इतर फलयुक्त वृक्ष यांवर चढणें; आरसा, मांस, कमलपुष्पें यांची प्राप्ति; श्वेतसर्पानें उजव्या हातास दंश केलेला पहाणें; पाण्यांत उभें असतां सुसर चावणें, तसेंच, विंचू वगैरे चावणें; आपल्यास बांधलेलें पहाणें; शरीर, घर, पालखी, गाडी इत्यादिकांना आग लागलेली पहाणें; कोंबडी, बेडूक, मोर वगैरे दृष्टीस पडणें, जंगलांत भटकणें, इत्यादि गोष्टी स्वप्नांत पाहिल्या असतां धनलाभ, स्त्रीलाभ व कार्यसिद्धि होते. रोदन, वीणावादन, नौकेंत बसणें, आपल्या शरीरांतून रक्तस्राव पहाणें, जलस्नान करणें, आपला मृत्यु, दीप, धान्य, कन्या, पक्षी यांचें दर्शन, गाय, म्हैस, वाघीण, सिंहीण यांचें दुग्धपान, राजदर्शन, तृण, दूर्वा असलेल्या भूमीवर चालणें, पिता, माता व मित्र यांचें दर्शन हीं स्वप्नें आनंदजनक होत. निरभ्र आकाश, स्वतःचें नाचणें, पुलावरून न अडखळतां पार चालत जाणें; प्रेतदर्शन, मेजवानीचा समारंभ फक्त पहाणें, स्वतः धांवणें, स्वर्गप्राप्ति, दुसऱ्यास फांशीं देतांना पाहणें, घर बांधणें, जिना, शिडी यांवर चढणें, गायनवादन ऐकणें, पशूंचा कळप

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पाहणें, हीं स्वप्नें पाहिलीं असतां मनाप्रमाणें कार्यसिद्धि होते. मुंग्या पाहणें, स्वतः उत्तम पोपाक केलेला पाहणें, आपल्याला पकडलेलें पाहणें, धान्य, कापड खरेदी करणें, किल्ला पहाणें, हीं शुभसूचक स्वप्नें होत. कापूस, भस्म, भात, ताक, यांवांचून इतर सर्व पांढरे पदार्थ स्वप्नांत दृष्टीस पडले असतां चांगले, आणि गाय, देव, ब्राह्मण आणि हत्ती यांवांचून इतर सर्व काळे पदार्थ स्वप्नांत दिसतील तर वाईट समजावें.

अशुभस्वप्नें.

पळस, वारुळ व कडुनिंब यांवर चढणें, तेल, लोखंड व कापूस यांचा लाभ हीं स्वप्नांत पाहिलीं असतां शरीराला क्लेश होतात; लग्न किंवा घड्याळ बंद पडलेलें पाहिलें असतां कोणाची तरी मृत्युवार्ता ऐकण्यांत येते. कोळसे, तांबडें वस्त्र, तांबड्या फुलांच्या माळा, आकाशांतून तारे पडणें; घृत, तेल अंगास लावणें; केश व दांत गळणें; श्वान, गर्दभ, उंट, टोणगा, म्हैस, डुकर यांचें दर्शन; प्रेताचें आलिंगन; कृष्ण व नग्न पुरुष यांचें दर्शन; नाक व कान तुटणें, पाण्यांत व चिखलांत बुडणें ह्या गोष्टी स्वप्नांत पाहिल्या असतां धनहानि, संकट किंवा शरीराला क्लेश हीं प्राप्त होतील असें समजावें. श्मश्रु करविणें, नखछेदन, पक्वान्नभोजन, काळे पुरुष पाहणें, अमंगल व कृष्णवस्त्रयुक्त स्त्रियेचें दर्शन किंवा आलिंगन, कोणाचें पत्र येणें, कावळा, कोल्हा, घुबड, गिधाड व मार्जार यांचें दर्शन, उंचावरून खालीं पडणें, आपल्यापासून कोणी वस्त्रालंकार व फळपुष्पें हिरावून घेतलेलीं पाहणें, ऊन पाणी पिणें, श्राद्धपिंडदान करणें, स्वतः गाणें, हंसणें, रागावणें व झोंपाळ्यावर वसणें, ढग आलेले पाहणें, राजद्वारीं दंड होणें, गुहेंत किंवा अंधःकारांत जाणें, बाळंतिणीच्या खोलींत किंवा स्वयंपाकगृहांत जाणें इत्यादि गोष्टी स्वप्नांत पाहिल्या असतां हानिप्रद होत. मधमाशा उडतांना पहाणें, भूमीवरील द्रव्य गोळा करणें, कर्ज घेणें, बंदुकीचे आवाज ऐकणें, चाव्या सांडणें, हातांत चाकू घेणें, हीं सर्व स्वप्नें दुःखसूचक जाणावीं. ज्या मनुष्याचा मृत्यु स्वप्नांत दृष्टीस पडेल त्या मनुष्याला तें शुभ जाणावें.

दुष्ट स्वप्न पडलें असतां सप्तशतीचा पाठ, विष्णुसहस्रनाम किंवा महाभारतांतील गजेंद्रमोक्ष या स्तोत्रांचा पाठ करावा, किंवा तीं स्तोत्रें दुसऱ्याकडून वाचवून आपण श्रवण करावीं, म्हणजे दुष्टस्वप्नदोषपरिहार होतो, असें सांगितलें आहे.

पर्जन्यविचार.

मार्गे शुक्लादितो ज्ञेयो मेघगर्भसमुद्भवः ।
तुहिनात्परिधेर्वृष्ट्याः संध्यारागात्तथापि वा ॥ २१६ ॥
पौषेऽतिशीततो माघे संध्याभ्रादनिलादपि ।
फाल्गुने ताम्रवर्णं च स्निग्धाभ्राद्वाऽस्वरानिलात् ।
चैत्रे तु परिधेर्वृष्ट्या वायुना वाभ्ररेखया ॥ २१७ ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पर्जन्यकालापूर्वीं, सूर्याच्या उष्णतेमुळें पृथ्वीवरील पाण्याची वाफ होऊन, ती वाफ आकाशांत जाऊन तिचे ढग बनत जातात, त्याला मेघगर्भधारणा असें म्हणतात. गर्भधारणेच्या कालापासून सामान्यतः १९५ दिवसांनीं पर्जन्यवृष्टि होते. त्याच्या पूर्वीच मध्यंतरीं म्हणजे चैत्रारंभीं किंवा वैशाखांत पाऊस पडेल, तर तो मेघगर्भपात जाणावा. आतां मेघगर्भोत्पत्तीचें लक्षण सांगतों. मार्गशीर्ष शुक्लपक्षांत ज्या दिवशीं पूर्वाषाढा नक्षत्रीं चंद्र असेल त्या दिवसापासून मेघगर्भोत्पत्ति जाणावी. प्रातःकाळीं आणि सूर्यास्तसमयीं आकाश अत्यंत आरक्त होणें हें मेघगर्भधारणेचेंच लक्षण आहे. तसेंच, पौषांत व माघांत फार थंडी पडणें, संध्याकाळीं अभ्र येऊन वायु सुटणें, फाल्गुनांत ताम्रवर्णयुक्त अभ्र येणें, चैत्रांत चंद्रसूर्याला खळें पडणें व अभ्र येऊन वायु सुटणें, इत्यादि लक्षणें मेघगर्भधारणेचींच आहेत. मेघगर्भपात जितका होईल तितका पाऊस वर्षाकाळीं कमी पडतो. कधीं कधीं थोडा पाऊस माघादि मासांत पडणें हेंही एक मेघगर्भधारणेचें चिन्ह आहे. परंतु मेघगर्भपात मात्र थोड्या पावसानें होत नाहीं. निदान चिखल होण्याइतका तरी पाऊस पडला पाहिजे.

पर्जन्यवृष्टीचें भविष्य.

अश्विन्यादिषु धिष्ण्येषु चैत्रे दशसु चेद्भवेत् ।
अभ्रादिकं तदा गर्भ आर्द्रादौ वृष्टिदः क्रमात् ॥ २१८ ॥
मेषार्कदिनमारभ्य ज्ञेयमेवमथापि वा ।

चैत्र महिन्यांत किंवा मेषराशीस सूर्य आल्यानंतर अश्विनीपासून मघापर्यंत जीं दहा चंद्रनक्षत्रें, तीं वर्षाकाळांतल्या आर्द्रापासून स्वातीपर्यंतच्या दहा सूर्यनक्षत्रांशीं अनुक्रमानें प्रतितुल्य होत असें समजावें. आणि म्हणून चैत्रांत ज्या अश्विन्यादि दहा नक्षत्रांपैकीं एकाद्या दिवशीं पाऊस पडून मेघगर्भपात होईल तत्तुल्य नक्षत्राचा पुढें वर्षाकाळीं तितका पाऊस कमी पडेल असें जाणावें. उदाहरणार्थ, अश्विनी नक्षत्राच्या दिवशीं पाऊस पडेल तर आर्द्रामहानक्षत्राची तितकी वृष्टि कमी होईल, भरणीचे दिवशीं वृष्टि झाल्यास पुनर्वसु महानक्षत्राचा पाऊस कमी पडेल, कृत्तिकांचे दिवशीं वृष्टि झाल्यास पुष्य नक्षत्र कमी पडेल, इत्यादि. तसेंच—

ज्येष्ठे चतुर्षु धिष्ण्येषु स्वातीमारभ्य वर्षणे ।
क्रमाच्छ्रावणतो वृष्टिर्नो भवेत्तत्र तत्र च ॥ २१९ ॥

ज्येष्ठमासाच्या शुक्लपक्षांतील स्वाती, विशाखा, अनुराधा व ज्येष्ठा ह्या चार दिवसनक्षत्रांची जर वृष्टि होईल तर अनुक्रमें श्रावणादि चार महिन्यांत पुढें पर्जन्य कमी पडेल असें जाणावें. म्हणजे ज्येष्ठांत स्वाती नक्षत्राचे दिवशीं पाऊस पडल्यास श्रावणांत पाऊस पडणार नाहीं, विशाखा नक्षत्राचे दिवशीं पाऊस पडल्यास भाद्रपदांत पाऊस कमी पडेल. अनुराधा नक्षत्राचे दिवशीं पाऊस पडेल तर आश्विनांत

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पाऊस कमी पडेल, इत्यादि. कारण ह्या चार नक्षत्रीं ज्येष्ठांत पर्जन्यवृष्टि झाली तर त्यामुळें मेघगर्भपात होतो. त्याचप्रमाणें—

अश्विनीमृगपुष्येषु पूषविष्णुमघासु च ।
स्वात्यां प्रविशते भानुर्वर्षते नात्र संशयः ॥ २२० ॥

अश्विनी, मृग, पुष्य, रेवती, श्रवण, मघा आणि स्वाती ह्या दिवसनक्षत्रांवर जर महानक्षत्र निघेल तर त्या महानक्षत्राचा पाऊस पुष्कळ पडेल.

जललग्नें.

कुंभः कर्कवृषौ मीनमकरौ वृश्चिकस्तुला ।
जललग्नानि चोक्तानि लग्नेष्वेतेषु सूर्यभम् ॥
लभत्येव सदावृष्टिर्ज्ञातव्या गणकोत्तमैः ॥ २२१ ॥

कुंभ, कर्क, वृषभ, मीन, मकर, वृश्चिक आणि तूळ ह्या सात लग्नांवर किंवा चंद्र जलराशींत असतां जर सूर्यमहानक्षत्राचा आरंभ होईल तर पर्जन्यवृष्टि पुष्कळ होईल.

स्त्रीपुंनपुंसकनक्षत्रें.

आर्द्रादि दशकं स्त्रीणां विशाखात् त्रिनपुंसकम् ।
मूलाच्चतुर्दशं पुंसां नक्षत्राणि क्रमाद्बुधैः ॥ २२२ ॥
वायुर्नपुंसके भे च स्त्रीणां भे चाभ्रदर्शनम् ।
स्त्रीणां पुरुषसंयोगे वृष्टिर्भवति निश्चितम् ॥ २२३ ॥

आर्द्रापासून स्वातीपर्यंत जीं दहा नक्षत्रें तीं स्त्रीसंज्ञक होत. विशाखा, अनुराधा व ज्येष्ठा हीं नपुंसक नक्षत्रें व मूळ नक्षत्रापासून मृग नक्षत्रापर्यंत जीं चवदा नक्षत्रें तीं पुरुषसंज्ञक नक्षत्रें होत असें जाणावें. दिवसनक्षत्र नपुंसक असून महानक्षत्र स्त्रीसंज्ञक असेल तर वायु सुटेल व वृष्टि मध्यम प्रमाणांत होईल. दोन्ही स्त्रीनक्षत्रें असतील तर अभ्रपटल येऊन पाऊस सामान्य प्रमाणांत होईल. स्त्रीपुरुष असा योग असेल तर मात्र पर्जन्य समाधानकारक होईल.

सूर्यचंद्रनक्षत्रसंज्ञा.

अश्विन्यादित्रयं चैव आर्द्रादेः पंचकं तथा ।
पूर्वाषाढादि चत्वारि चोत्तरा रेवतीद्वयम् ॥ २२४ ॥
उक्तानि शशिभान्यत्र प्रोच्यंते सूर्यभान्यथ ।
सूर्ये सूर्ये भवेद्वायुश्चंद्रे चंद्रे न वर्षति ।
चांद्रसूर्यौ भवेद्योगस्तदा वर्षति मेघराट् ॥ २२५ ॥

अश्विनी, भरणी, कृत्तिका, आर्द्रा, पुनर्वसु, पुष्य, आश्लेषा, मघा, पूर्वाषाढा,

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

उत्तराषाढा, श्रवण, धनिष्ठा, उत्तरा आणि रेवती हीं चवदा नक्षत्रें चंद्रनक्षत्रें होत. आणि शेष राहिलेलीं तेरा नक्षत्रें सूर्यनक्षत्रें जाणावीं. दिवसनक्षत्र आणि महानक्षत्र हीं दोन्ही सूर्यनक्षत्रें असतां वारा सुटेल. दोन्ही चंद्रनक्षत्रें असतां पर्जन्य पडणार नाहीं, आणि एक सूर्यनक्षत्र व दुसरें चंद्रनक्षत्र असतां त्या योगावर पर्जन्यवृष्टि चांगली होईल.

नक्षत्रांचीं वाहनें.

सूर्यर्क्षाद्दिनभं नवाप्तमवशिष्टे घोटको जंबुको
मंडूकाविमयूरमाखुमहिषौ स्याद्गर्दभः कुंजरः।
ज्ञेयं यत्फलमश्वके गिरिजलं क्रोष्ट्राविकौ निर्जलौ
स्वल्पा केकिखराखुषु प्रचुरतः शेषेषु वृष्टिः शुभा ॥ २२६ ॥

ज्या सूर्यनक्षत्राचें वाहन जाणावयाचें असेल त्या सूर्यनक्षत्रापासून दिवसनक्षत्रापर्यंत अंक मोजावे व त्या संख्येस नवांनीं भागावें. शेषांक १ राहील तर वाहन घोडा, २ असतां कोल्हा, ३ असतां बेडूक, ४ असतां मेंढा, ५ मयूर, ६ मूषक, ७ महिष, ८ गर्दभ, ९ हत्ती याप्रमाणें वाहनें जाणावीं. दिवसनक्षत्रापर्यंत मोजलेले अंक नवांचे आंत असतील तर तेच अंक भागाकाराचे शेषांक समजावे. अश्व वाहन असतां पर्वतावर वृष्टि होईल. कोल्हा व मेंढा असतां वृष्टि होणार नाहीं. मयूर, गर्दभ व मूषक असतां स्वल्प वृष्टि होईल व बाकीच्या वाहनांवर चांगला पर्जन्य पडेल असें जाणावें. सूर्यनक्षत्राला महानक्षत्र असेंही म्हणतात.

रोहिणी नक्षत्राचें फल.

पूर्वोद्भूतैः सस्यनिष्पत्तिरब्दैराग्नेय्याशा संभवेदग्निकोपः।
याम्ये सस्यं क्षीयते नैर्ऋतेऽर्धं पश्चाज्जातैः शोभना वृष्टिरब्दैः ॥२२७॥
वायव्योत्थैर्वातवृष्टिः कचिच्च पुष्टा वृष्टिः सौम्यकाष्ठासमुत्थैः।
श्रेष्ठं सस्यं स्थाणुदिक्संप्रवृद्धैर्वायुश्चैवं दिक्षु धत्ते फलानि ॥ २२८ ॥

आषाढ कृष्णपक्षांत रोहिणी नक्षत्र असेल त्या दिवशीं जर पूर्व दिशेकडे मेघ उत्पन्न होतील तर सुवृष्टि होऊन धान्यसमृद्धि होईल. आग्नेयीकडे मेघोत्पत्ति झाल्यास अग्निकोप होतो; दक्षिणेकडे झाल्यास धान्यनाश; नैर्ऋत्येकडे झाल्यास अर्धधान्याचा नाश होतो. पश्चिमेकडच्या मेघांनीं उत्तम पर्जन्य, वायव्येकड्या मेघांनीं वारा सुटून अल्प पर्जन्यवृष्टि; उत्तरदिशेकडे मेघोत्पत्ति झाल्यास परिपूर्ण पर्जन्य आणि ईशान्येकडे मेघ उत्पन्न होतील तर धान्याचें पुष्कळ पीक याप्रमाणें वायूचीं दिशापरत्वें फळें जाणावीं.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

धान्यमहर्घादिनिर्णय.

सर्वधान्यं महर्घं स्याच्छुक्रक्षेत्रगते कुजे ।
राहौ मंदे च दुर्भिक्षं शुभं चंद्रग्रहे स्थिते ॥ २२९ ॥
बुधर्क्षे भास्करे चंद्रे विरोधो धरणीभुजाम् ।
तत्रार्कनंदने चंद्रे सर्वधान्यमहर्घता ॥ २३० ॥
शनौ राहौ शनिक्षेत्रे तृणाभावात्पशुक्षयः ।
विरोधो भूभुजां भौमे वृष्टिः स्याद्भूयसी बुधे ॥ २३१ ॥
कुजर्क्षे राहुमंदज्ञैर्नश्यंति पशवो नराः ।
महर्घं भृगुपुत्रेण शेषैः खेटैः फलं शुभम् ॥ २३२ ॥

शुक्रक्षेत्रीं म्हणजे वृषभ व तूळ ह्या राशींस मंगळ आल्यास सर्व धान्यें महाग होतील. तेथेंच राहु किंवा शनि असल्यास दुर्भिक्षता होईल. चंद्र असतां सुभिक्षता होते. बुधाच्या राशींमध्यें म्हणजे मिथुन किंवा कन्या राशीस रवि चंद्र असतां राजांमध्यें परस्परकलहाचीं कारणें उद्भवतील. त्याच राशीस शनिचंद्र असतां सर्व धान्यांची महर्घता होईल शनिक्षेत्रीं म्हणजे मकर कुंभ ह्या राशींस शनिराहु असतां तृणाचा नाश होऊन पशूंचाही क्षय होईल. तेथेंच मंगळ असतां राजांमध्यें विरोध उत्पन्न होईल. बुध आला असतां पर्जन्यवृष्टि चांगली होईल. मंगळाचे क्षेत्रीं म्हणजे मेष व वृश्चिक राशीस राहु, शनि किंवा बुध आले असतां मनुष्यें व पशु यांचा नाश होईल. तेथेंच शुक्र असतांही महागाई होईल. याहून इतर ग्रहांचे योगानें किंवा युतीनें शुभफलप्राप्ति जाणावी.

राज्यविपत्तियोग.

यदि भवति कदाचिच्चाश्विनी नष्टचंद्रा ।
शनिरविकुजवारे स्वातिरायुष्मयोगे ।
गगनचरपशूनां जंगमस्थावराणां ।
नृपतिजनविनाशो राज्यभंगस्तु चोक्तः ॥ २३३ ॥

जर कदाचित शनि, रवि किंवा मंगळवारीं अमावास्या येऊन त्या दिवशीं अश्विनी अथवा स्वाती नक्षत्र येईल तर पक्षी, पशू, जंगमस्थावर वस्तु, राजे व प्रजा यांचा नाश घडेल, म्हणजे देशांत नानाविध संकटें येतील.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

प्रकरण ५ तिथिनिर्णय.

सामान्यपरिभाषा.

पूर्णा-सखंडा तिथि—स्थलसंकोचामुळें येथें द्वादशमासांतील सर्व तिथींचा सविस्तर निर्णय देतां येत नाहीं; तथापि संवत्सरांतील विशेष कृत्यांच्या मुख्य मुख्य तिथींचा शास्त्रार्थ लिहितों. मागें पृष्ठ २२ मध्यें तिथींची उपपत्ति दिली आहे, त्यांत तिथि कशा होतात, हें सांगितलेंच आहे. तिथींचे दोन प्रकार आहेत. पूर्णातिथि व खंडातिथि त्यांचें लक्षण असें:—

सर्वा ह्येताश्च तिथय उदयादुदयं स्थिताः ।
शुद्धा इति विनिश्चेयाः षष्टिनाड्यो हि वै तिथिः ॥ १ ॥
पक्षद्वयेपि तिथयस्तिथिं पूर्वां तथोत्तरां ।
त्रिभिर्मुहूर्तैर्विध्यंति सामान्योऽयं विधिः स्मृतः ॥ २ ॥
खर्वो दर्पस्तथा हिंसा त्रिविधं तिथिलक्षणं ।
खर्वदर्पौ परौ पूज्यौ हिंसा स्यात्पूर्वकालिकी ॥ ३ ॥

एका सूर्योदयापासून दुसऱ्या सूर्योदयापर्यंत पूर्ण साठ घटिका असणारी तिथि किंवा शिवरात्र्यादिक व्रतांसाठीं मध्यरात्रीपर्यंत असणारी जी तिथि ती संपूर्णा तिथि होय, आणि दिवसामध्यें कांहीं नियमित घटिकांनीं दुसऱ्या तिथीला स्पर्श करणारी ती खंडा किंवा विद्धा तिथि होय. विद्धा म्हणजे वेधयुक्त तिथि. हा वेधही द्विविध आहे. प्रातर्वेध व सायंवेध. त्याचें लक्षण असें:—

तिथींचा वेध—कोणतीही तिथि सूर्योदयानंतर निदान सहा घटिकांपर्यंत असून त्यानंतर जर दुसऱ्या तिथीचा आरंभ होत असेल, तर त्या उत्तरतिथीला, प्रातःकाळीं सहा घटिकांनीं संपणाऱ्या पूर्व तिथीचा वेध झाला असें म्हणतात; हा प्रातर्वेध होय. त्याचप्रमाणें, सूर्यास्त होण्याचे पूर्वीं सहा घटिकांनीं जर एकाद्या तिथीचा आरंभ होत असेल, तर त्या उत्तरतिथीला सकाळपासून २४ घटिकांनीं संपणाऱ्या पूर्व तिथीचा जो वेध होतो, तो सायंकालीन वेध होय. तथापि कांहीं तिथींना सहा घटिकांहूनही ज्यास्त वेध सांगितला आहे, तो असा—पंचमी बारा घटिकांनीं षष्ठीला वेध करिते. दशमी पंधरा घटिकांनीं एकादशीला वेध करिते व चतुर्दशी, पूर्णिमेला अठरा घटिकांनीं पूर्वीं वेध करिते, असें जाणावें.

खर्व, दर्प व हिंसातिथि—याशिवाय खर्व, दर्प आणि हिंसा अशीही कधीं कधीं तिथींची व्याप्ति असते. दोन्ही दिवस सारखी कर्म-कालपर्यंत जी तिथि असते, तिला खर्व किंवा समान व्यापिनी तिथि म्हणावें. दर्प म्हणजे तिथीची वृद्धि आणि हिंसा

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

म्हणजे तिथीचा क्षय. वृद्धि व क्षयतिथींची माहिती पूर्वी पृष्ठ २४ मध्यें सांगितली आहे. खर्व व दर्प तिथी जर दोन्ही दिवस कर्मकालव्यापिनी असतील तर दुसऱ्या दिवसाच्या घ्याव्या. तथापि ग्राह्य तिथि मुख्य कालीं जर पूर्व दिवशीं असेल तर पूर्वीचीच घ्यावी. क्षयतिथि मात्र पूर्व दिवसाचीच घ्यावी. तसेंच, ज्या तिथीची दोन्ही दिवस सारखी व्याप्ति असेल अथवा नसेल अशा वेळीं पूर्व दिवसाची तिथि घ्यावी. दोन्ही दिवस कर्मसमाप्ति होईल इतकी तिथि असेल तर युग्म तिथींच्या नियमानें निर्णय करावा, तो असा—

युग्मतिथी.

युग्माग्नियुगभूतानां षण्मुन्योर्वसुरंध्रयोः ।
रुद्रेण द्वादशीयुक्ता चतुर्दश्या च पूर्णिमा ।
प्रतिपद्यप्यमावास्या तिथ्योर्युग्मं महाफलम् ॥ ४ ॥

युग्मतिथि—आतां युग्मतिथीविषयीं लिहितों. प्रतिपदादि ज्या पंधरा तिथि आहेत, त्यांचा दोन दिवस योग असतां कोणती तिथि कोणत्या तिथीनें विद्ध असतां घ्यावी, हें शास्त्रकारांनीं ठरविलें आहे. त्यालाच युग्मवाक्यनिर्णय म्हणतात. उदाहरणार्थ, द्वितीया तिथि घेणें आहे आणि द्वितीयेचा दोन दिवस योग आहे तर प्रतिपदायुक्त द्वितीया न घेतां दुसऱ्या दिवसाची तृतीयायुक्त द्वितीया घ्यावी; त्याच प्रमाणें तृतीया, द्वितीयायुक्त घ्यावी. येथें द्वितीया व तृतीया यांचें परस्पर युग्म आहे. तसेंच, चतुर्थी पंचमींचें युग्म, षष्ठी सप्तमींचें युग्म, अष्टमी नवमींचें परस्पर युग्म, एकादशी द्वादशीचें युग्म, चतुर्दशी पूर्णिमांचें युग्म आणि अमावास्या प्रतिपदांचें युग्म. याप्रमाणें दोन दोन तिथींचें युग्म जाणावें. क्वचित् स्थळीं याला अपवाद आहे. जसें—चतुर्थी गणनाथस्य मातृविद्धा प्रशस्यते । म्हणजे गणपतीच्या व्रतासाठीं चतुर्थी घेणें ती तृतीयाविद्धा घ्यावी. हे अपवाद यथास्थळीं पुढें लिहिले आहेत. आतां दिवसाचे काल सांगतों.

मुहूर्तत्रितयं प्रातस्तावानेव तु संगवः ।
मध्याह्नस्त्रिमुहूर्तः स्यादपराह्णश्च तादृशः ।
सायाह्नस्त्रिमुहूर्तः स्यात्सर्वकर्मसु गर्हितः ॥ ५ ॥

दिवसाचे काल—नित्यनैमित्तिक कर्मासाठीं दिवसाचे पांच विभाग कल्पिले आहेत. १ प्रातः, २ संगव, ३ मध्यान्ह, ४ अपराण्ह आणि ५ सायान्ह. दिवसाच्या घटिका तीस, अर्थात् सामान्यतः सहा घटिकांचा एक विभाग होतो. पण दिनमान कमी अधिक असतां दिनमानाच्या घटिकांना पांचांनीं भागून ज्या घटिका येतील, त्यांचा एक भाग होईल. कोठें कोठें दिवसाचे तीन काल म्हणजे प्रातःकाल, मध्यान्ह व सायंकाल असेही कल्पिलेले आहेत. किंवा चार प्रहरांचे चार काल मानिले

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आहेत, ते पूर्वाण्ह, मध्यान्ह, अपराण्ह व सायान्ह हे होत. सूर्योदयव्यापिनी म्हणजे सूर्योदयाला असणारी तिथि, पूर्वाण्ह किंवा संगवव्यापिनी म्हणजे सकाळपासून १२ घटिकांपर्यंत, मध्यान्हव्यापिनी म्ह० १८ घटिकांपर्यंत, अपराण्हव्यापिनी म्ह० २४ घटिकांपर्यंत तिथि जाणावी. प्रदोषव्यापिनी म्ह० सूर्य मावळल्यापासून रात्रीं ६ घटिका रात्रीपर्यंत असणारी तिथि. निशीथव्यापिनी म्ह० मध्यरात्रीला असणारी व अरुणोदयव्यापिनी म्ह० २५ घटिका रात्रीपुढें व सूर्योदयापर्यंत असणारी तिथि असें जाणावें.

यस्मिन्काले तु यत्कर्म तत्कालव्यापिनी तिथिः ।
तया कर्माणि कुर्वीत ह्रासवृद्धी न कारणम् ॥ ६ ॥

कर्मकालतिथि—ज्या कर्माला जो काल सांगितला असेल त्या काळाला स्पर्श करणारी इष्ट तिथि कर्माच्या वेळीं असावी. जसें अष्टमीचें श्राद्ध अष्टमींतच अपराण्हाला करावें. अष्टमी अपराण्हकाळाला आज आहे व उद्यां मध्यान्हकालापर्यंतच आहे, आणि अपराण्हकाळीं श्राद्ध करण्याला सवड नसल्यामुळें जर पूर्वाण्हांतच तें करणें अवश्य असेल तर दुसऱ्या दिवशींच अष्टमींत पूर्वाण्हांत करावें. पूर्वदिवशीं सप्तमीमध्यें करूं नये.

यां तिथिं समनुप्राप्य उदयं याति भास्करः ।
सा तिथिः सकला ज्ञेया स्नानदानजपादिषु ।
पूजाव्रतेषु सर्वेषु मध्याह्नव्यापिनी तिथिः ॥ ७ ॥

सूर्योदयाचे वेळीं जी तिथि असेल तीच तिथि स्नान, दान, जप व देवकार्य यांकरितां घ्यावी. विशिष्टपूजा किंवा व्रत यांसाठीं मध्यान्हव्यापिनी देखील तिथि घेतली असतां चालेल.

चैत्रमासः.

वर्षप्रतिपदा—प्रतिपद्वत्सरारंभे ग्राह्या पूर्वैव सर्वदा । सा सूर्योदयव्यापिनी ग्राह्या । मलमासो यदा चैत्रो वर्षारंभस्तदा मले । नतु शुद्धे । सूर्योदयाला जी प्रतिपदा असेल ती वर्षप्रतिपदेकरितां घ्यावी. दोन्ही दिवस तशी उदयव्यापिनी असेल किंवा नसेल तर प्रथम दिवसाचीच घ्यावी. ज्या वर्षी चैत्र अधिकमास असेल त्या वर्षीं अधिकमहिन्यांतच नवीन वर्षारंभ पूजादि संकल्पांत धरावा व तैलाभ्यंग करावा. याशिवाय ध्वजारोपण, निंबपत्रभक्षण, रामनवरात्रारंभ इत्यादि सर्व कृत्यें मात्र शुद्धचैत्रांत करावीं.

देवीनवरात्रं—अमायुक्ता न कर्तव्या प्रतिपच्चंडिकार्चने । मुहूर्तमात्रा कर्तव्या द्वितीयादिगुणान्विता ॥ कित्येकांच्या कुलांत चैत्रशुद्ध प्रतिपदेपासून देवीचें नवरात्र करण्याचा प्रचार आहे; त्याला प्रतिपदा घेणें ती मुहूर्तमात्र म्हणजे दोन घटिका असली तरी द्वितीयायुक्त घ्यावी. अमावास्यायुक्त घेऊं नये.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आंदोलनगौरीव्रतम्—चैत्रशुक्लतृतीयायां शिवगौरीं प्रपूजयेत् । याव-न्मासो भवेन्नित्यं नारी पतिमती सदा ॥ मुहूर्तमात्रसत्वेपि दिने गौरीव्रतं परे । चतुर्थीसंयुता ग्राह्या द्वितीयासहितां त्यजेत् ॥ चैत्र शुक्ल तृतीयेपासून वैशाखशुक्ल तृतीयेपर्यंत एक महिनाभर सुवासिनी स्त्रियांनीं गौरीची पूजा करावी असें स्कंदपुराणांत सांगितलें आहे. दोन दिवस तृतीयेचा योग असतां दुसऱ्या दिवसाची म्हणजे चतुर्थीयुक्त असेल ती घ्यावी. ती मुहूर्तमात्र म्हणजे दोन घटिका असली किंवा वैधृत्यादि कुयोगयुक्त असली तरी चालेल. पण द्वितीयायुक्त जी तृतीया ती निषिद्ध म्हणून कदापि घेऊं नये.

रामनवमी—चैत्रशुक्ले तु नवमी पुनर्वसुयुता यदि । सैव मध्याह्नयोगेन महापुण्यतमा भवेत् ॥ नवमी चाष्टमीविद्धा त्याज्या विष्णुपरायणैः । उपोषणं नवम्यां च दशम्यां चैव पारणम् ॥ इयं मलमासे न कार्या ॥ चैत्रशुक्ल नवमीला रामजयंती म्हणतात. ह्या दिवशीं जगदीशानें रामावतार घेतला. दोन दिवस नवमीचा योग असतां पुनर्वसु नक्षत्रयुक्त मध्याह्नव्यापिनी जी असेल त्या दिवशीं रामजयंती करावी. दोन दिवस तशी असेल तर दुसऱ्या दिवसाची घ्यावी. पण अष्टमीयुक्त असेल ती घेऊं नये. कारण नवमीच्या उपोषणाचें पारणें दशमींत व्हावें. अधिक चैत्र असतां शुद्धचैत्रांत रामनवमी करावी.

हनुमज्जयंती—सा सूर्योदयव्यापिनी ग्राह्या । सामान्यनिर्णयात् ग्राह्या पौर्णमासी परैव च ॥ ही सूर्योदयाला असेल ती घ्यावी. दोन्ही दिवस तशी असेल तर दुसऱ्या दिवसाची घ्यावी. धर्मसिंधुमतानें पूर्वदिवसाची घ्यावी असें आहे.

दमनारोपणं—ऊर्जे व्रतं मधौ दोलां श्रावणे तंतुपूजनम् । चैत्रे च दमनारोपमकुर्वाणो व्रजत्यधः ॥ कार्तिकामध्यें व्रताचरण, चैत्रांत आंदोलन, श्रावणांत पोंवती आणि चैत्रांत दवणा वाहणें हीं कृत्यें जो आपल्या कुलदेवतेसंबं-धानें प्रतिवर्षी करीत नाहीं तो अधोगतीला जातो असें सांगितलेलें आहे. दवणा वाहणें तो गौरीला तृतीयेस, गणपतीला चतुर्थीस, देवीला अष्टमीस किंवा नवमीस, विष्णूला द्वादशीस व शंकराला चतुर्दशीस वाहावा. कित्येक ठिकाणीं चैत्री पौर्णिमेस कुलदेवतेला दवणा वाहण्याची चाल आहे. या पूजनाला तिथि घेणें ती सूर्योदया-पासून निदान ६ घटिकांपर्यंत असणारी तिथि घ्यावी. ह्याला गुरुशुक्रास्ताचा दोष नाहीं. अधिकमासांत मात्र करूं नये.

'देवदेव जगन्नाथ वांछितार्थप्रदायक । हृत्स्थान् पूरय मे देव कामा-न्कामेश्वरीप्रिय' या मंत्रानें दवणा वहावा. आणि 'आवाहनं न जानासि' या मंत्रानीं प्रार्थना करावी.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

वैशाखमास.

अक्षय्यतृतीया—वैशाखे शुक्लपक्षे तु तृतीया रोहिणीयुता । पूर्वाह्णव्यापिनी ग्राह्या, परा यदि दिनद्वये । दुर्लभा बुधवारेण सोमेनापि युता तथा । रोहिणीबुधयुक्तापि पूर्वविद्धा विवर्जिता । वैशाख शुक्ल तृतीयेला केलेलें दान अक्षय्य राहतें म्हणून हिला अक्षय्यतृतीया म्हणतात. हा साडेतीन मुहूर्तांपैकीं एक मुहूर्त आहे. ही तृतीया पूर्वाण्हव्यापिनी म्हणजे सूर्योदयापासून निदान बारा घटिकांपर्यंत असेल ती घ्यावी. दोन्ही दिवस पूर्वाण्हव्यापिनी असेल तर दुसऱ्या दिवसाची घ्यावी. रोहिणी नक्षत्र, बुधवार किंवा सोमवारादि योगांनीं युक्त असेल तर ती फार पुण्यकारक आहे; पण रोहिणी, बुधवार ह्या योगांनीं युक्त असून जर द्वितीयायुक्त आहे तर मात्र घेऊं नये; दुसऱ्या दिवसाची चतुर्थीयुक्त असेल तीच घ्यावी. या दिवशीं पुढील मंत्रानें उदकुंभ दान करावा. एष धर्मघटो दत्तो ब्रह्मविष्णुशिवात्मकः । अस्य प्रदानात् तृप्यंतु पितरोपि पितामहाः । गंधोदकतिलैर्मिश्रं सान्नं कुंभं फलान्वितं । पितृभ्यः संप्रदास्यामि ह्यक्षय्यमुपतिष्ठतु ॥

परशुरामजयंती—वैशाखस्य सिते पक्षे तृतीयायां पुनर्वसौ । निशायाः प्रथमे यामे रामाख्यः समये हरिः । स्वोच्चगैः षड्ग्रहैर्युक्ते मिथुने राहुसंस्थिते । रेणुकायास्तु यो गर्भादवतीर्णः प्रभुः स्वयम् । सा प्रदोषव्यापिनी ग्राह्या । दिनद्वये तद्व्याप्तावव्याप्तौ समव्याप्तौ च परा । अन्यथा पूर्वैव । अक्षय्यतृतीयेच्या दिवशीं रात्रीं प्रथम प्रहरीं पुनर्वसु नक्षत्रावर रेणुकेच्या उदरीं परशुरामानें अवतार घेतला म्हणून ही परशुरामजयंतीची तृतीया होय. दोन्ही दिवस तृतीया प्रदोषव्यापिनी किंवा रात्रींच्या प्रथमयामव्यापिनी असेल किंवा सारखी असेल तर जयंतीकरितां दुसऱ्या दिवसाची घ्यावी. असें नसेल तर प्रथम दिवसाचीच उक्त होय.

नृसिंहजयंती—वैशाखे शुक्लपक्षे तु चतुर्दश्यां निशामुखे । जातो नृसिंहो भगवान् दैत्यानां मर्दनाय च । सा प्रदोषव्यापिनी ग्राह्या । दिनद्वये तद्व्याप्तावव्याप्तौ समव्याप्तौ च परा । स्वातीनक्षत्रयोगेन शनिसोमेन संयुता । प्रशस्ता सिद्धियोगेन वणिजेन तथैव च ॥ वैशाखशुक्लपक्षामध्यें चतुर्दशीच्या दिवशीं प्रदोषकाळीं नृसिंहावतार झाला. ही चतुर्दशी प्रदोषव्यापिनी घ्यावी. दोन्ही दिवशीं तशी असेल, नसेल किंवा सारखी असेल तर दुसऱ्या दिवसाची घ्यावी. शनिवार, सोमवार, स्वाती नक्षत्र, सिद्धि योग आणि वणिज करण इत्यादि योगांनीं किंवा यांपैकीं अधिक किंवा एकाद्या योगानें युक्त असेल तर ती प्रशस्त होय.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ज्येष्ठमास.

ज्येष्ठशुक्लदशमी दशहरा इति प्रसिद्धा । हरते दशपापानि तस्माद्दश-हरा स्मृता । ज्येष्ठे मासि सिते पक्षे दशम्यां बुधहस्तयोः । व्यतीपाते गरानन्दे कन्याचंद्रे वृषे रवौ । दशयोगे नरः स्नात्वा सर्वपापैः प्रमुच्यते । यत्रैव योगबाहुल्यं ग्राह्या यदि दिनद्वये । अत्र दशमीव्यतीपातयोर्मु-ख्यत्वं । मलमासे यदा ज्येष्ठे इयं तत्रैव कारयेत् ॥ ज्येष्ठशुक्ल दशमीला दश-हरा म्हणतात. ह्या तिथीचे दहा योग सांगितले आहेत ते असेः—१ ज्येष्ठमास २ शुक्लपक्ष ३ दशमी ४ बुधवार ५ हस्तनक्षत्र ६ व्यतीपात ७ गरकरण ८ आनंदयोग ९ कन्येचा चंद्र आणि १० वृषभराशीचा सूर्य अशा दहा योगांनीं युक्त जी दशमी तिचे ठायीं गंगास्नान व गंगापूजन केलें असतां महत्पुण्यकारक मानिलेलें आहे. दोन दिवस दशमी असेल तर वरील योगांपैकीं अधिक योगांनीं युक्त जी दशमी असेल ती घ्यावी. त्यांत दशमी आणि व्यतीपात हे दोन योग मुख्य आहेत. ज्येष्ठ अधिकमास असतां दशहराव्रत अधिक ज्येष्ठांतच करावें. शुद्ध ज्येष्ठांत करूं नये.

वटसावित्री—ज्येष्ठे मासि सिते पक्षे पूर्णिमायां वटव्रतम् । पूर्वविद्धैव सावित्रीव्रते पंचदशी तिथिः । नाड्योष्टादशभूतस्य स्युश्चेतश्च परेहनि । अत्र त्रिरात्रव्रते पूर्णिमा सूर्यास्तात्प्राक् त्रिमुहूर्तापि ग्राह्या । त्रिमुहूर्त-न्यूनत्वे परैव । अत्र रजस्वलादिदोषे पूजादिब्राह्मणद्वारा च स्वयमुपवा-सादिकं कार्यम् । ज्येष्ठशुद्ध पौर्णिमेला वटपूर्णिमा म्हणतात. त्या दिवशीं सुवा-सिनी स्त्रियांनीं वटवृक्षाची पूजा करावी. कोणी त्रिरात्रव्रत करितात. त्रिरात्रव्रता-करितां पूर्णिमा घेणें ती सूर्यास्तापूर्वीं सहा घटिका जरी पूर्णिमा लागत असेल तरी तीच घ्यावी. म्हणजे त्या दिवसापूर्वीं त्रिरात्रव्रताला दोन दिवस आरंभ करावा, केवळ पूजेकरितां पूर्णिमा घेणें ती जर दोन दिवस पौर्णिमेचा योग असेल तर प्रथम दिवसाचीच घ्यावी. तथापि चतुर्दशी अठरा घटिकांहून ज्यास्त असून नंतर लागणारी पूर्णिमा मात्र प्रथम दिवसाची घेऊं नये. अशा वेळीं दुसऱ्या दिवसाची घ्यावी. स्त्री रजस्वला वगैरे असेल तर तिनें ब्राह्मणद्वारा पूजा करवून आपण उपोषण मात्र करावें,

आषाढमास.

कर्कसंक्रांतिः—'त्रिंशत्कर्कोटके पूर्वे' इति वचनात् कर्कसंक्रांतौ पूर्वं त्रिंशन्नाड्यः पुण्यकालः । तत्रापि संक्रांतिसन्निहिता नाड्यः पुण्यतमाः । रात्रौ तु निशीथात्प्राक् संक्रमेपि पूर्वदिने पुण्यकालः । तदूर्ध्वं परदिने पंचनाड्यः पुण्यकालः । कर्कसंक्रांतीचा पर्वकाळ संक्रांत लागण्यापूर्वीं तीस घटिका असतो, तथापि संक्रांतिकालाच्या अधिक जवळच्या घटिका विशेष पुण्य-कारक आहेत. मध्यरात्रीच्या पूर्वीं संक्रांत निघत असेल तर पूर्व दिवशींच पर्वकाळ

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

धरावा. मध्यरात्रीनंतर निघत असेल तर दुसऱ्या दिवशीं सकाळीं पांच घटिकांपर्यंत पर्वकाल समजावा.

कोकिलाव्रतम्—आषाढौ द्वौ यदा स्यातां कोकिलायास्तदार्चनम् । शुद्धाषाढे तु कर्तव्यमवश्यं पुण्यकारकम् ॥ पूर्णिमायां व्रतं कुर्यात् परा यदि दिनद्वये । अस्य नक्तव्रतत्वात् सायाह्नव्यापिनी पूर्णिमा ग्राह्या । ज्या वर्षीं अधिक आषाढमास असतो, त्या वर्षीं निज आषाढ म्हणजे शुद्ध आषाढ पूर्णिमेपासून श्रावणशुद्ध पूर्णिमेपर्यंत प्रतिदिवशीं स्नान करून व सायंकालीं कोकिलापूजन करून नक्तभोजन करावें. हें नक्तव्रत असल्यामुळें व्रताच्या आरंभाला सायान्हव्यापिनी पूर्णिमा घ्यावी. दोन दिवस पूर्णिमेचा योग असतां दुसऱ्या दिवसाची घ्यावी.

श्रावणमासः.

सोमवारः—सोमवारव्रतं कार्यं श्रावणे वै यथाविधि । शक्तेनोपोषणं कार्यमथवा निशिभोजनम् ॥ श्रावण मासांत सोमवारीं उपोषण करावें. ज्यांस अहोरात्र उपोषण करवणार नाहीं, त्यांनीं सायंकाळपर्यंत उपोषित राहून रात्रीं स्नानपूर्वक शिवपूजन करून भोजन करावें.

मंगलागौरी—श्रावणे मंगलागौरीं पूजयेद्विधिना व्रती । प्रथमे वत्सरे मातुर्गृहे कर्तव्यमेव च ॥ ततो भर्तृगृहे कार्यमवश्यं स्त्रीभिरादरात् । पंचमे वत्सरे प्राप्ते कुर्यादुद्यापनं शुभम् ॥ लग्न झाल्यानंतर प्रथमवर्षापासून मुलींनीं श्रावणांतील प्रत्येक मंगळवारीं मंगलागौरीचें पूजन करावें. प्रथम वर्षीं ही पूजा माहेरीं करावी. हें व्रत पांच वर्षेंपर्यंत करून पांचव्या वर्षीं उद्यापन करावें, असें भविष्यपुराणांत सांगितलें आहे. अधिक श्रावण असतां त्यांत मंगलागौरीचें पूजन करूं नये. शुद्ध श्रावणांत करावें. अलीकडे प्रौढकन्यांचे विवाह होऊं लागल्यामुळें लग्नानंतर पांचच मंगळागौरीचें पूजन करण्याचा प्रघात कित्येक ठिकाणीं पडत चालला आहे.

नागपंचमी—श्रावणे पंचमी शुक्ला संप्रोक्ता नागपंचमी । चतुर्थीसहितां त्यक्त्वा ग्राह्या षष्ठीसमन्विता । वल्मीके पूजयेन्नागान् दुग्धं चैव तु पाययेत् । सा त्रिमुहूर्तव्यापिनी षष्ठीयुता ग्राह्या । परेद्युस्त्रिमुहूर्तन्यूना यदि दिनद्वये सति तथा उदयात् पंचमी पूर्वेद्युस्त्रिमुहूर्तन्यूना चतुर्थीविद्धा तदा पूर्वैव । त्रिमुहूर्ताधिकचतुर्थीवेधे द्विमुहूर्तापि परैव । श्रावणशुक्ल पंचमीला नागपंचमी म्हणतात. त्या दिवशीं वारुळाची पूजा करून सर्पाला दूध पाजावें असें सांगितलें आहे. त्याकरितां पंचमी घेणें ती, दोन दिवस पंचमीचा योग असतां, सूर्योदयापासून सहा घटिकांपर्यंत असणारी षष्ठीयुक्त घ्यावी. चतुर्थीयुक्त घेऊं नये. तथापि दुसऱ्या दिवशीं पंचमी सहा घटिकांपेक्षांही कमी असेल व जर पूर्व दिवशीं चतुर्थी सहा घटिकांपेक्षां अधिक नसेल तर मात्र पूर्वदिवसाची

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

घेतली असतां चालेल. पण चतुर्थी सहा घटिकांहून अधिक असून नंतर लागणारी पंचमी केव्हांही घेऊं नये. अशा वेळीं दुसऱ्या दिवशीं पंचमी दोन मुहूर्त म्हणजे चार घटिका जरी असली तरी तीच घ्यावी.

पोंवतीं वहाण्याचा निर्णय—श्रावणशुक्लद्वादश्यां विष्णोः पवित्रारोपणम्। शिवस्य चतुर्दश्यां देव्याः अष्टम्यां गणेशस्य चतुर्थ्यां सर्वेषां देवानां पौर्णमास्यां वा कार्यम्। पवित्रारोपणं विघ्नाच्छ्रावणे न भवेद्यदि। कार्तिक्यावधि शुक्लास्ते कर्तव्यमिति नारदः॥ अत्र सूर्योदयात् त्रिमुहूर्तव्यापिनी तिथिर्ग्राह्या। श्रावणशुक्ल द्वादशीस विष्णूला, चतुर्दशीस शंकराला, अष्टमीस देवीला व चतुर्थीस गणपतीला याप्रमाणें पोंवतीं वहावीं; किंवा सर्व देवांला पोंवतीं वहाण्याला पौर्णिमा तिथि उक्त आहे. याविषयीं जसा कुलाचार असेल त्याप्रमाणें करावें. कांहीं अडचणीमुळें श्रावणांत पोंवतीं वहाणें घडलें नाहीं तर कार्तिकपूर्णिमेपर्यंत पवित्रारोपण करावें. पोंवतीं ज्या तिथीला वहावयाचीं ती तिथि सूर्योदयापासून सहा घटिकांपर्यंत तरी असावी.

श्रावणी—श्रावणमहिन्यांत श्रवणनक्षत्रयुक्त दिवशीं अथवा पूर्णिमेस एक विशेष विधि करितात त्याला श्रावणी म्हणतात. या विधीचें खरें रहस्य न समजून केवळ पंचगव्य घेऊन व नवीन यज्ञोपवीत घालून 'संवत्सरकृतं पापं' पासून आपण पुनीत होऊं असें कांहीं लोक समजतात, पण ती समजूत यथार्थ नाहीं. कारण याज्ञवल्क्यस्मृतीमध्यें आचाराध्यायांतील स्नातकधर्मप्रकरणांत असें लिहिलें आहे कीं, अध्यायानामुपाकर्म श्रावण्यां श्रवणेन वा। हस्तेनौषध्यभावे वा पंचम्यां श्रावणस्य तु। वनस्पति उगवल्या म्हणजे श्रावणांत श्रवणनक्षत्रयुक्त दिवशीं किंवा हस्तनक्षत्रीं वेदाध्ययनाला आरंभ करावा. वनस्पति उगवल्या नाहींत तर भाद्रपदमासीं उपाकर्म करून साडेचार महिनेपर्यंत अध्ययन चालू ठेवावें, व नंतर उत्सर्जन करावें. ही खरी श्रावणी होय. परंतु सांप्रत त्या विधीला पापविमोचनविधि समजतात.

ऋग्वेद्यांच्या श्रावणीचा निर्णय—गृह्यसूत्रे। श्रवणेन श्रावणस्य पंचम्यां हस्तेन वा। श्रावणशुक्लपक्षे श्रवणनक्षत्रं मुख्यकालः। तदभावे पंचमी हस्तसंयुता। तदभावे केवलपंचमी वा केवलहस्तः। इति बह्वृचानां कालत्रयम्। श्रवणस्य दिनद्वययोगे धनिष्ठायुक्तं मुहूर्तत्रयं न्यूनं वा परैव ग्राह्यम्। उत्तराषाढासंयुतं न ग्राह्यम्। पंचमी हस्त इति कालद्वयं तु औदयिकं मुहूर्तत्रयव्यापि मुख्यम्। तदलाभे पूर्वविद्धमपि। एवं भाद्रपदशुक्लपक्षेपि श्रवणं पंचमी हस्त इति कालत्रयनिर्णयो ज्ञेयः। यद्यर्धरात्रादर्वाक्तु संक्रांतिर्ग्रहणं तथा। उपाकर्म न कुर्वीत श्रावण्यां श्रवणेऽपि वा। श्रावण शुक्लपक्षांत श्रवण, पंचमी आणि हस्त असे तीन काल ऋग्वेद्यांना उपाकर्मास म्हणजे श्रावणीस सांगितलेले आहेत. त्यांत श्रवण नक्षत्र मुख्य

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आहे. श्रवण नक्षत्र न मिळेल तर पंचमीयुक्त हस्त किंवा केवळ पंचमी किंवा केवल हस्त घ्यावे. दोन दिवस श्रवणाचा योग असतां दुसऱ्या दिवशीं सूर्योदयापासून सहा घटिका किंवा त्याहून कमी असेल तरी धनिष्ठायुक्त जें श्रवणनक्षत्र तेंच उपाकर्मास घ्यावें. उत्तराषाढायुक्त घेऊं नये. पंचमी व हस्त देखील, दोन दिवस योग असतां, सूर्योदयापासून सहा घटिकांपर्यंत असतील ते घ्यावे. सहा घटिकांहून कमी असतां पूर्व दिवसाचे घ्यावे. याचप्रमाणें भाद्रपदांतील श्रवण, हस्त, पंचमी हे काल संकटकालीं ऋग्वेदी यांस श्रावणी करण्यास उक्त आहेत. पौर्णिमेस श्रावणीच्या दिवशीं मध्यरात्रीच्या पूर्वीं ग्रहण किंवा संक्रांति असेल तर त्या दिवशीं श्रावणी करूं नये. नागपंचमीस किंवा भाद्रपदमासांत करावी.

यजुर्वेद्यांच्या श्रावणीचा निर्णय—हिरण्यकेशितैत्तिरीयकाणां श्रावण्यां पौर्णमास्यां वा हस्ते उपाकर्म कार्यम्। तत्र श्रावणपौर्णमासी सर्वेषां याजुषाणां मुख्यः कालः। श्रावणशुक्लपंचमी तत्तत्सूत्रेऽनुक्तेर्न ग्राह्या। एवं श्रावणे ग्रहणसंक्रांतिदोषात् भाद्रपदेपि कालद्वयमिति। उपाकर्मणि सूर्योदयमारभ्य पूर्णिमा ग्राह्या। यदि पूर्वदिने पूर्णिमा मुहूर्ताद्यनंतरं प्रवृत्ता च द्वितीयदिने षण्मुहूर्तव्यापिनी सति तदा उत्तरैव। वृद्धियोगात्पूर्वैव। हिरण्यकेशी व तैत्तिरीय शाखेच्या लोकांनीं श्रावणपौर्णिमा किंवा हस्त नक्षत्र यांवर श्रावणी करावी. त्यांत श्रावणपौर्णिमा हा काल सर्व यजुर्वेद्यांना मुख्य आहे. त्यांच्या सूत्रांत पंचमी मुळींच सांगितलेली नाहीं; म्हणून त्या दिवशीं त्यांनीं श्रावणी करूं नये. श्रावणांत पौर्णिमेच्या दिवशीं ग्रहणाची, संक्रांतीची किंवा दुसरी व्यावहारिक अडचण आल्यास भाद्रपदमासीं पौर्णिमेस किंवा हस्तनक्षत्रावर श्रावणी करावी. श्रावणीकरितां पूर्णिमा घेणें ती सूर्योदयाला असेल अशी घ्यावी. दोन दिवस पौर्णिमेचा योग असून प्रथम दिवशीं तीन चार घटिकांनीं पौर्णिमा लागत असेल आणि दुसऱ्या दिवशीं सूर्योदयापासून निदान बारा घटिकांपर्यंत असेल तर दुसऱ्या दिवशींच श्रावणी करावी. पौर्णिमेची वृद्धि असून जर दोन्ही दिवस सूर्योदयीं पूर्णिमा असेल तर प्रथम दिवसाचीच घ्यावी.

सामवेदीश्रावणीचा निर्णय—भाद्रपदशुक्लपक्षे हस्तनक्षत्रे उपाकर्म कार्यं। संक्रांत्यादिदोषेण तत्रासंभवे श्रावणमासे हस्तो ग्राह्यः। सामवेदी यांच्या उपाकर्माचा मुख्य काल भाद्रपदशुक्लपक्षामध्यें ज्या दिवशीं हस्त नक्षत्र असेल तो दिवस होय. संक्रांति वगैरे दोषांनीं भाद्रपदांतील हस्त नक्षत्र दूषित असतां श्रावणांतील हस्त घ्यावें.

नूतनश्रावणी—सिंहस्थे मलमासे च अस्ते च गुरुशुक्रयोः। प्रथमोपाकृतिर्न स्यात्कृतं कर्म विनाशकृत्॥ सिंहराशीस गुरु असतां, मलमासामध्यें किंवा गुरुशुक्रांच्या अस्तामध्यें नवीन मौंजी झालेल्या मुलाचें उपाकर्म करूं नये.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

रक्षाबंधनम्—श्रावणपूर्णिमायां भद्रारहितायां त्रिमुहूर्ताधिकोदयव्यापिन्यामपराह्णे प्रदोषे वा कार्यम् । इदं ग्रहणसंक्रांतिदिनेपि कर्तव्यम् । श्रावणपूर्णिमेला अपराण्ह किंवा प्रदोषकालीं रक्षाबंधन करावें. त्याला सूर्योदयापासून सहा घटिकांहून अधिक व भद्रारहित पूर्णिमा घ्यावी. त्या दिवशीं ग्रहण किंवा संक्रांति असतांही रक्षाबंधन करण्यास प्रत्यवाय नाहीं.

कृष्णजन्माष्टमी—इयं निशीथव्यापिनी पूर्वा वा परा ग्राह्या । उभयेद्युः निशीथयोगे परैव । अस्यां रोहिणीनक्षत्रयोगे बुधसोमवारयोगे च फलातिशयः । ही दोनप्रहररात्रीला असेल ती घ्यावी, मग पूर्वदिवशीं असो किंवा परदिवशीं असो. दोन्ही दिवस अशी असेल तर दुसऱ्या दिवसाची घ्यावी. रोहिणीयुक्त किंवा बुधसोमवारयुक्त अष्टमी असेल ती अवश्य घ्यावी.

पिठोराव्रतं—श्रावणामावास्यायां प्रदोषव्यापिन्यां कार्यम् । दिनद्वये प्रदोषव्याप्तावव्याप्तौ एकदेशव्याप्तौ परा । परदिने प्रदोषव्याप्त्यभावे पूर्वा ग्राह्या । श्रावण अमावास्येला सायंकाळीं पिठोरा व्रत म्ह० चतुःषष्ठी योगिनींचें पूजन करावें, त्यास प्रदोषव्यापिनी अमावास्या घ्यावी. दोन दिवस तशी असतां किंवा नसतां दुसऱ्या दिवसाची घ्यावी. दुसऱ्या दिवशीं प्रदोष व्यापिनी नसेल तर पूर्व दिवसाची घ्यावी.

कुशग्रहणम्—नभोमासस्य दर्शे तु शुचिर्दर्भान् समाहरेत् । शुचिर्भूत होऊन श्रावणअमावास्येच्या दिवशीं दर्भ आणावे. 'विरिंचना सहोत्पन्न परमेष्ठि निसर्गज । नुद सर्वाणि पापानि दर्भ स्वस्तिकरो भव' या मंत्रानें उत्तर किंवा पूर्वदिशेकडे तोंड करून 'हुं फट्' असें म्हणून दर्भ तोडावे.

भाद्रपदमासः.

हरितालिका—कला काष्ठा मुहूर्तापि द्वितीया यदि दृश्यते । सा तृतीया न कर्तव्या कर्तव्या परसंयुता । केवलक्षयवशादभावे द्वितीयायुक्ता ग्राह्या । तृतीयेचा दोन दिवस योग असतां दुसऱ्या दिवसाची, दोन घटिका असली तरीही, तीच घ्यावी. तृतीयेचा क्षय असतां मात्र द्वितीयायुक्त व वृद्धि असतां चतुर्थीयुक्त घ्यावी.

गणेशचतुर्थी—सा मध्याह्नव्यापिनी ग्राह्या । दिनद्वये साकल्येन मध्याह्नव्याप्तौ अव्याप्तौ वा पूर्वा । दिनद्वये साम्येन वैषम्येण वा एकदेशव्याप्तावपि पूर्वैव । वैषम्येण व्याप्तावधिकव्यापिनी चेत्परेति । चतुर्थी गणनाथस्य मातृविद्धा प्रशस्यते । अस्यां चंद्रदर्शने मिथ्याभिदूषणं दोषः। ही मध्यान्हव्यापिनी घ्यावी. दोन्ही दिवस सारखी तशी असेल किंवा नसेल तर पूर्वदिवसाची घ्यावी. कमी अधिक व्याप्ति असतां दुसऱ्या दिवसाची अधिक असेल

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

तर ती घ्यावी. ही चतुर्थी तृतीयायुक्तच घेणें प्रशस्त आहे. गणेशचतुर्थीच्या दिवशीं चंद्र पाहूं नये; कारण चोरीचा आळ येतो असें सांगितलेलें आहे. परंतु चुकून चंद्रदर्शन झालें असतां 'सिंहः प्रसेनमवधीत् सिंहो जांववता हतः। सुकुमारक मा रोदीस्तव ह्येष स्यमंतकः' ह्या मंत्राचा जप करावा. म्हणजे दोषपरिहार होतो.

ऋषिपंचमी—सा मध्याह्नव्यापिनी ग्राह्या । दिनद्वये मध्याह्नव्याप्तौ तदव्याप्तौ च पूर्वा । ही मध्यान्हव्यापिनी घ्यावी. दोन्ही दिवस मध्यान्हीं असतां किंवा नसतां पूर्वदिवसाची घ्यावी.

ज्येष्ठागौरी—मैत्रेणावाहयेद्देवीं ज्येष्ठायां तु प्रपूजयेत् । मूले विसर्जयेद्देवीं त्रिदिनं व्रतमुत्तमम् । यदा ज्येष्ठा द्वितीयदिने मध्याह्नात्पूर्वं समाप्यते तदा पूर्वेदिन एव पूजनम् । परदिने अपराह्नं स्पृशति तदा परैव । ज्येष्ठादेवीचें अनुराधा नक्षत्रीं आवाहन, ज्येष्ठानक्षत्रीं पूजन व मूळनक्षत्रीं विसर्जन करावें. मध्यान्हकाळापासून ज्येष्ठा नक्षत्र असतां पूर्वदिवशीं पूजन, परंतु मध्यान्होत्तर प्रवृत्ति असतां (अष्टमीतिथीनें युक्त विशेष ग्राह्य) दुसऱ्या दिवशींच्या ज्येष्ठा घ्याव्या.

वामनद्वादशी—मध्याह्नव्यापिनी श्रवणयुता ग्राह्या । उभयदिने श्रवणयोगे पूर्वैव । द्वादश्याः सर्वथा श्रवणयोगाभावे एकादश्यामेव । मध्यान्हीं श्रवणयुक्त द्वादशी असेल ती घ्यावी. दोन्ही दिवस तशी असतां पूर्वदिवसाची घ्यावी. द्वादशीला मुळींच श्रवण नक्षत्र नसून एकादशीला असेल तर एकादशीला वामनद्वादशीचें व्रत करावें.

अनंतचतुर्दशी—तत्रोदये त्रिमुहूर्तव्यापिनी ग्राह्या। तदभावे द्विमुहूर्ता ग्राह्या द्विमुहूर्तन्यूनत्वे पूर्वैव । अत्र पूर्वाह्नो मुख्यः तदभावे मध्याह्नोऽपि । सूर्योदयव्यापिनी असून सहा घटिकांपेक्षां अधिक असेल ती चतुर्दशी घ्यावी. दोन्ही दिवस तशी असेल तर पूर्वदिवसाची घ्यावी. पूर्वदिवशीं सूर्योदयव्यापिनी नसेल व दुसऱ्या दिवशीं असून चार घटिकांपेक्षांही कमी असेल तर मात्र पूर्वदिवसाचीच घ्यावी. ह्या व्रताविषयीं पूर्वाण्हकाल मुख्य आहे.

महालयपितृश्राद्धे अपराह्णव्यापिनी तिथिर्ग्राह्या। पितृकार्याकरितां तिथि घेणें ती अपराण्हकाळीं म्हणजे सूर्योदयापासून अठरा घटिकांपेक्षां जास्त असेल ती घ्यावी.

आश्विनमासः.

मातामहश्राद्धम्—आश्विनशुक्लप्रतिपदि मातामहश्राद्धम्। जातमात्रोपि दौहित्रो जीवत्यपि च मातुले । कुर्यान्मातामहश्राद्धं प्रतिपद्याश्विने सिते । प्रातःसंगवयोर्मध्ये याश्वयुक् प्रतिपद्भवेत् । इयं संगवकालव्यापिनी ग्राह्या । आश्विनशुक्लप्रतिपदेच्या दिवशीं आईचा बाप मृत असतां उपनीत नातवानें त्याचें (मातामहाचें) श्राद्ध करावें. मुलाचा मामा आपल्या घरीं जरी पितृश्राद्ध करणारा असेल तरीही नातवानें मातामहश्राद्ध करावें.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

नवरात्रारंभः—उदये तु त्रिमुहूर्तव्यापिनी प्रतिपत् ग्राह्या । अमायुक्ता न कर्तव्या प्रतिपच्चंडिकार्चने । उदये द्विमुहूर्तापि ग्राह्या सोदयगामिनी । मुहूर्तन्यूनत्वे क्षये वा अमाविद्धापि ग्राह्या । वृद्धौ दिनद्वये सूर्योदयव्यापिन्यां पूर्णत्वात्पूर्वैव । मलमासे न कार्यं । शावाशौचजननाशौचयोस्तु घटस्थापनादि ब्राह्मणद्वारा कार्यम् । तथैव नवम्यां होमं घटोत्थापनं च । नवरात्राकरितां प्रतिपदा घेणें ती सूर्योदयापासून सहा घटिकांपर्यंत असेल अशी दुसऱ्या दिवसाची घ्यावी. दोन घटिका असली तरी तीच घ्यावी. परंतु अमावास्यायुक्त घेऊं नये. प्रतिपदेचा क्षय असेल तर अमावास्यायुक्त प्रतिपदा घ्यावी. वृद्धि असतां पूर्व दिवसाची घ्यावी. आशौच असतां घटस्थापन व उत्थापन ब्राह्मणद्वारा करावें.

ललितापंचमी—अत्र शुक्लपंचमी अपराह्णव्यापिनी ग्राह्या । दिनद्वये अपराह्णव्याप्तौ पूर्वैव । ही अपराण्हव्यापिनी घ्यावी. दोन दिवस तशी असेल किंवा नसेल तर पूर्वदिवसाची घ्यावी.

महाष्टमी—इयं घटिकामात्राप्यौदयिकी नवमीयुता ग्राह्या । सप्तमीसंयुता सर्वथा वर्ज्या । भौमवारेऽतिप्रशस्ता । आश्विनशुक्ल अष्टमीला महाअष्टमी म्हणतात. जी अष्टमी सूर्योदयाला असून नवमीयुक्त असेल ती हवनाल घ्यावी. सप्तमीयुक्त असेल ती सर्वथा त्याज्य होय. जी अष्टमी मंगळवारीं असेल ती अतिप्रशस्त होय.

विजयादशमी—इयं श्रवणसहिता नवमीयुता चापराह्णव्यापिनी ग्राह्या। दिनद्वये श्रवणयोगेऽपि नवमीयुतैव । उत्तरदिन एव श्रवणयुता तदा तूत्तरैव । श्रवणनक्षत्रयुक्त दशमी घ्यावी. श्रवणयोग असतां किंवा नसतां नवमीयुक्त अपराण्हव्यापिनी घ्यावी. दुसऱ्या दिवशीं श्रवणयुक्त दशमी असतां दुसऱ्या दिवशीं करावी. ही दशमी साडेतीन मुहूर्तांपैकीं एक मुहूर्त असून देशांतरीं प्रयाण करण्यास, विद्यारंभास किंवा प्रस्थान ठेवण्यास फार प्रशस्त आहे. त्यांत ही श्रवणनक्षत्रयुक्त असतां विशेष शुभ होय. ह्या दिवशीं शमीची पूजा करितात. त्याचा मंत्र—शमी शमयते पापं शमी शत्रुविनाशिनी । धारिण्यर्जुनबाणानां रामस्य प्रियवादिनी ॥ शमीचा वृक्ष नसतां आपट्याच्या झाडाची पूजा करितात. त्याचा मंत्र—अश्मंतक महावृक्ष महादोषनिवारण । इष्टानां दर्शनं देहि शत्रूणां च विनाशनम् ॥

कोजागरी पौर्णिमा—निशीथव्यापिनी ग्राह्या । दिनद्वयेप्येव निशीथास्पर्शे वा परा । ही पौर्णिमा मध्यरात्रीला असेल ती घ्यावी. दोन्ही दिवस तशी असतां किंवा नसतां दुसऱ्या दिवसाची घ्यावी.

नरकचतुर्दशी—चंद्रोदयव्यापिनी ग्राह्या । दिनद्वयेप्येव चंद्रोदयव्याप्त्यलाभे वा अरुणोदयव्यापिनी पूर्वविद्धा ग्राह्या । तत्राप्यलाभे चतुर्थ-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

यामव्यापिनी त्रयोदशीयुता ग्राह्या । ही चंद्रोदयव्यापिनी असेल त्या दिवशीं स्नान करावें. दोन्ही दिवस तशी असतां अथवा नसतां अरुणोदयव्यापिनी पूर्व दिवसाची घ्यावी. तशीही नसतां चौथ्या प्रहरीं रात्रीं असणारी त्रयोदशीयुक्त घ्यावी.

लक्ष्मीपूजा—लक्ष्मीपूजादौ प्रदोषव्यापिनी अमावास्या ग्राह्या । दिनद्वये सत्वे च परा । अत्र प्रदोषव्याप्त्यभावे पूर्वा । लक्ष्मीपूजनाला अमावास्या प्रदोषव्यापिनी घ्यावी. दोन्ही दिवशीं तशी असतां दुसऱ्या दिवशीं आणि दोन्ही दिवस तशी नसतां पूर्व दिवशीं लक्ष्मीपूजन करावें.

कार्तिकमासः.

बलिप्रतिपदा—सूर्योदयव्यापिनी ग्राह्या । ही सूर्योदयाला असेल ती स्नानादिकृत्यांना घ्यावी. 'अष्टपंच ५८ भवेत्प्रातः शेषः सूर्योदयः स्मृतः' ।

यमद्वितीया—अपराह्णव्यापिनी ग्राह्या । दिनद्वयेऽप्येवाव्याप्त्यादि वा परैव । ही द्वितीया अपराण्हव्यापिनी घ्यावी. दोन्ही दिवस तशी असतां किंवा नसतां दुसऱ्या दिवसाची घ्यावी. यमुनेनें आपला भाऊ जो यम त्याला ह्या दिवशीं आपल्या घरीं बोलावून भोजन वगैरे दिलें म्हणून ह्या द्वितीयेला यमद्वितीया किंवा भाऊबीज म्हणतात. ह्या दिवशीं बहीण किंवा बहिणीसमान स्त्रियांच्या हातचें भोजन करून त्यांचा सत्कार करावा.

तुलसीविवाह—कार्तिकशुक्लैकादश्यादिदिनपंचकं विवाहनक्षत्राणि, विशेषतस्तु रेवतीनक्षत्रं, काल उक्तः । तथापि सर्वत्र द्वादश्यामेव अनुष्ठीयते । कार्तिकशुक्लएकादशीपासून पौर्णिमेपर्यंत पांच दिवसांत विवाहनक्षत्रयुक्त दिवशीं, विशेषतः रेवतीनक्षत्र असेल त्या दिवशीं, तुलसीविवाह करावा. तथापि द्वादशीच्या दिवशीं तुलसीविवाह करण्याची प्रायः सर्वत्र पद्धति आहे.

वैकुंठचतुर्दशी—कार्तिकशुक्लचतुर्दश्यां पूर्वेद्युरुपवासं कृत्वा अरुणोदयव्यापिन्यां चतुर्दश्यां शिवं संपूज्य । पूर्वदिवशीं उपोषण करून अरुणोदयव्यापिनी अशा चतुर्दशीमध्यें शिवपूजन करावें. सूर्योदयापूर्वी ३ घटिकांचा काल तो अरुणोदय होय. 'पंचपंच ५५ उषःकालः सप्तपंचा ५७ रुणोदयः' ।

कालभैरवाष्टमी—सा प्रदोषव्यापिनी ग्राह्या। दिनद्वये चेत्पूर्वा—कार्तिककृष्णाष्टमीच्या दिवशीं कालभैरवाची पूजा करितात. ही प्रदोषव्यापिनी घ्यावी. उभय दिवशीं तशी असतां पूर्वदिवसाची घ्यावी.

मार्गशीर्षमासः.

चंपाषष्ठी—सा शततारकारविभौमवारवैधृतीनां मध्येऽधिकैर्योगैस्त्रिमुहूर्ताधिकव्यापिनी ग्राह्या । ही सूर्योदयापासून सहा घटिकांपर्यंत असेल ती

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

घ्यावी. उभय दिवशीं अशी असतां रविवार, भौमवार, शततारका, वैधृति इत्यादि योगांपैकीं अधिक योगांनीं युक्त असेल ती घ्यावी.

दत्तजयंती—इयं प्रदोषव्यापिनी ग्राह्या । मार्गशीर्षपूर्णिमेला रविवारीं दत्तजन्म झाला. ही प्रदोषव्यापिनी असेल त्या दिवशीं दत्तजयंती करावी.

पौषमासः.

मकरसंक्रान्तिः । मकरसंक्रमे संक्रांत्यनंतरं चत्वारिंशन्नाड्यः पुण्याः । माधवमते तु विंशतिः पराः । प्रदोषे ह्यर्धरात्रे वा स्नानं दानं परेऽहनि । तत्राप्युत्तरदिने सूर्योदयोत्तरं पंचनाड्यः पुण्यतमाः । ह्या संक्रांतीच्या संक्रमणानंतर चाळीस घटिका पर्वकाळ असतो. माधवाच्या मतें वीस घटिकांपर्यंत उत्तम पर्वकाळ होय. प्रदोषकालीं किंवा रात्रीं संक्रांतीचा प्रवेश असतां दुसऱ्या दिवशीं मध्यान्हकाळापर्यंत पर्वकाल धरावा. त्यांत सूर्योदयापासून पहिल्या पांच घटिका उत्तम पर्वकाळ होय.

माघमासः.

माघशुक्लपंचमी वसंतपंचमी—सा पूर्वाह्णव्यापिनी ग्राह्या । दिनद्वये तथा सत्वे पूर्वा । माघशुक्लपंचमीला वसंतपंचमी म्हणतात. ही पूर्वाण्हव्यापिनी घ्यावी. दोन्ही दिवस तशी असतां पूर्वदिवसाची घ्यावी. ह्या दिवशीं कित्येक ठिकाणीं रति व मदन ह्यांची पूजा करून मोठा उत्सव करितात.

रथसप्तमी—सा अरुणोदयव्यापिनी ग्राह्या । दिनद्वयेप्येव पूर्वा । माघशुक्ल सप्तमीला रथसप्तमी म्हणतात. ही अरुणोदयव्यापिनी घ्यावी. दोन्ही दिवस तशी असतां पूर्वदिवशीं करावी. ही सप्तमी अरुणोदयीं असून तीर्थस्नान केलें असतां सूर्यग्रहणासारखें फल आहे.

महाशिवरात्रिः—सा निशीथव्यापिनी ग्राह्या । दिनद्वययोगे परा । रविभौमवारसहिता प्रशस्ता । ही मध्यरात्रीला असेल त्या दिवशीं उपोषण करावें. दोन दिवस तशी असतां दुसऱ्या दिवशीं उपोषण करावें. रविमंगळवारयुक्त असतां प्रशस्त होय.

फाल्गुनमासः.

फाल्गुनी पौर्णिमा ग्राह्या प्रदोषव्यापिनी सदा । तस्यां भद्रामुखं त्यक्त्वा। दिनद्वये प्रदोषव्याप्तौ समव्याप्तावेकदेशव्याप्तौ अव्याप्तौ वा परा। फाल्गुनी पूर्णिमेला होळीचें पूजन सूर्यास्ताबरोबर करावें. त्यास पौर्णिमा प्रदोषव्यापिनी असेल ती घ्यावी. दोन्ही दिवस तशी असतां किंवा नसतां किंवा एकभागीं असतां दुसरे दिवसाची घ्यावी. कल्याणीच्या मुखकालामध्यें किंवा दिवसा होलिकापूजन करूं नये. पूजेचा मंत्र—असृक्पाभयसंत्रस्तैः कृता त्वं होलि बालिशैः । अतस्त्वां पूजयिष्यामि भूते भूतिप्रदा भव ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

प्रकीर्णतिथि.

संकष्टचतुर्थी—सा चंद्रोदयव्यापिनी ग्राह्या । दिनद्वये चंद्रोदये सत्वे परा ग्राह्या । दिनद्वयेपि चंद्रोदये न स्यात् तदा प्रदोषव्यापिनी । केचित्तु तृतीयायुक्तैव ग्राह्येत्याहुः । संकष्टचतुर्थी चंद्रोदयीं असेल ती घ्यावी. दोन्ही दिवस तशी असतां दुसऱ्या दिवसाची घ्यावी. दोन्ही दिवस चंद्रोदयाला नसतां प्रदोषव्यापिनी घ्यावी. कित्येकांच्या मतें तृतीयायुक्त चतुर्थी प्रशस्त होय.

एकादशीः—स्मार्तानां शुद्धाविद्धैकादशीवृद्धौ पूर्वेद्युरुपवासः । वैष्णवानां अरुणोदयवेधे आधिक्ये वा सर्वत्र एकादशीं विहाय द्वादश्यामुपवासः । स्मार्त आणि वैष्णव असे एकादशीचे दोन भेद आहेत. ह्याविषयींचा शास्त्रार्थ निर्णयसिंधु व धर्मसिंधु ह्या ग्रंथांत विस्तारेंकरून सांगितला आहे. त्याचा सारांश असा आहे कीं, स्मार्तांनीं शुद्ध किंवा विद्ध (सूर्योदयीं दशमीतिथीनें युक्त ती विद्ध व सूर्योदयीं दशमीतिथीच्या स्पर्शानें रहित ती शुद्ध) अशा एकादशीची वृद्धि असतां पूर्वदिवशीं उपोषण करावें. आणि वैष्णवांनीं अरुणोदयीं दशमीचा पलमात्र वेध किंवा आधिक्य असतां ती एकादशी टाकून द्वादशीचे दिवशीं उपोषण करावें.

हरिवासर.

द्वादश्यां प्रथमः पादो हरिवासरसंज्ञकः ।
तमतिक्रम्य कुर्वीत पारणं विष्णुतत्परः ॥ ८ ॥
आभाकासितपक्षेषु मैत्रश्रवणरेवती ।
संगमे नहि भोक्तव्यं द्वादशद्वादशीर्हरेत् ॥ ९ ॥
तिथिनक्षत्रसंयोगे उपवासो यदा भवेत् ।
पारणं तु न कर्तव्यं यावन्नैकस्य संक्षयः ॥ १० ॥

द्वादशी तिथीच्या पहिल्या चरणाला हरिवासर असें म्हणतात. म्हणून द्वादशीचा पहिला चरण संपल्यानंतर विष्णुभक्तांनीं एकादशीचें उपोषण सोडावें. तसेंच आ-भा-का म्हणजे आषाढ, भाद्रपद व कार्तिक या तीन महिन्यांच्या शुक्लपक्षांतील द्वादशीला जर अनुक्रमानें अनुराधा, श्रवण व रेवती (आषाढ १२ ला अनुराधा, भाद्र० १२ ला श्रवण, कार्तिक १२ ला रेवती) या नक्षत्रांचा योग येईल तर त्या द्वादशीचे दिवशीं एकादशीप्रमाणें उपोषण करावें. उपोषण न केलें तर बाराही द्वादशा निष्फळ होतात. तिथि व नक्षत्र यांच्या संयोगासंबंधानें जेव्हां उपोषण करावयाचें असतें, तेव्हां दोहोंपैकीं निदान एकाची समाप्ति झाल्यावांचून पारणा (भोजन) करूं नये. उदाहरणार्थ, जन्माष्टमीचें उपोषण सोडणें तें अष्टमी तिथि व रोहिणी नक्षत्र या दोहोंची समाप्ति झाल्यानंतर सोडण्याची कित्येक ठिकाणीं पद्धति आहे, पण निदान अष्टमीची समाप्ति झाल्यानंतर नवमींत पारणा (भोजन) करावी.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

युगादितिथि.

वैशाखे शुक्लपक्षस्य तृतीयायां कृतं युगं ।
कार्तिके शुक्लपक्षे तु त्रेता च नवमेऽहनि ॥ ११ ॥
अथ भाद्रपदे कृष्णत्रयोदश्यां तु द्वापरं ।
माघे तु पौर्णिमास्यां च घोरं कलियुगं तथा ॥ १२ ॥
युगारंभास्तु तिथयो युगाद्यास्तेन कीर्तिताः ।
फलं दत्तहुतानां च अनंतं परिकीर्तितम् ॥ १३ ॥

वैशाख शुक्ल तृतीयेच्या दिवशीं कृतयुगाचा आरंभ झाला. कार्तिक शुक्ल नवमीला त्रेतायुगाचा, भाद्रपद कृष्णपक्षांतील त्रयोदशीला द्वापारयुगाचा आणि माघशुक्लपूर्णिमेला पापरूपी कलियुगाचा आरंभ झाला. या युगादि तिथींना तीर्थस्नान, जप, दान, होम, पितृश्राद्ध इत्यादि विधि केले असतां अनंत पुण्यफलाची प्राप्ति होते. युगादितिथींचें श्राद्ध शुक्लपक्षांतील तिथीला मध्यान्हाच्या म्हणजे पंधरा घटिकांच्या पूर्वीं करावें व कृष्णपक्षामध्यें अपराण्हकालीं करावें.

मन्वादितिथि.

आश्वयुक् शुक्लनवमी कार्तिके द्वादशी तथा ।
तृतीया चैत्रमासस्य तथा भाद्रपदस्य च ॥ १४ ॥
श्रावणस्य त्वमावास्या पौषस्यैकादशी तथा ।
आषाढस्यापि दशमी माघमासस्य सप्तमी ॥ १५ ॥
श्रावणस्याष्टमी कृष्णा आषाढस्यापि पूर्णिमा ।
कार्तिकी फाल्गुनी चैत्री ज्येष्ठी पंचदशी स्मृता ।
मन्वंतराद्यश्चैता दत्तस्याक्षय्यकारिकाः ॥ १६ ॥

युगादितिथींप्रमाणेंच ह्या मन्वंतरारंभाच्या तिथि महत्वाच्या आहेत. आश्विन शुक्ल नवमी, कार्तिकशुक्ल द्वादशी व पूर्णिमा, चैत्रशुक्ल तृतीया व पूर्णिमा, भाद्रपद शुक्ल तृतीया, श्रावण कृष्ण अमावास्या व अष्टमी, पौषशुक्ल एकादशी, आषाढशुक्ल दशमी व पूर्णिमा, माघशुक्ल सप्तमी, फाल्गुन व ज्येष्ठ शुक्ल पूर्णिमा ह्या सर्व मन्वंतराच्या तिथि होत. ह्या तिथींच्या दिवशीं तीर्थस्नान, दान, श्राद्ध इत्यादि विधि केले असतां त्यापासून अनंत पुण्यफल प्राप्त होतें.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

प्रकरण ६.

लग्नवेळापत्रक.

मुंबईच्या पंचांगांतील सूर्योदय आणि सूर्यास्त-काल व सध्यांच्या सुमारें २३॥ अयनांशांप्रमाणें मुंबई येथील राशींचे उदयकाल प्रमाणभूत धरून तदनुरोधानें गणित करून स्टँडर्ड टाइमाप्रमाणें पुढील स्थूलमानाचें लग्नपत्रक तयार केलें आहे. ह्या लग्नपत्रकावरून प्रत्येक इंग्रजी महिन्याच्या प्रत्येक तारखेला कोणत्या वेळीं कोणतें लग्न आहे हें सहज कळेल. कोणत्याही इंग्रजी तारखेचे सूर्योदयास्तांचे काल किंवा सूर्याचे अंश प्रतिवर्षीं जवळजवळ सारखेच असतात. तसेंच सूर्यासभोंवतीं पृथ्वीची एक प्रदक्षिणा होण्यास, म्हणजे मेषादि सौरमासांची एक आवृत्ति पूर्ण होण्यास इंग्रजी वर्षाप्रमाणेंच ३६५ दिवस ५ तास व ४८ मिनिटें इतका काल सुमारें लागतो. अर्थात् तारखा ह्या सौरतिथि होत. एका सौरतिथीला ज्या स्थळीं म्हणजे क्रांतिवृत्ताच्या ज्या भागांत सूर्य असेल त्याच ठिकाणीं त्याच तारखेला दुसऱ्या वर्षीं सामान्यतः असेल हें उघड आहे. म्हणून तारखांवरून तयार केलेल्या लग्नपत्रकांत ४।५ मिनिटांहून अधिक अंतर पडत नाहीं. संवत्सराचें पंचांग बदललें म्हणून सूर्याची स्थिति बदलते असें नाहीं. तात्पर्य, तारखा व सूर्याची स्थिति यांत बराच नियमितपणा आहे. असो. पुढील लग्नवेळापत्रक हें मुंबईशहराचें लग्नवेळापत्रक आहे, म्हणून एकाद्या गांवचे सूर्योदयास्त व मुंबईतील सूर्योदयास्त यांत जर कांहीं मिनिटांचें अधिक उणें अंतर असेल, तर तितकें अंतर मात्र पुढील पत्रकांतील उदयास्तकालच्या लग्नवेळेंत पडेल, म्हणून अशा वेळीं जर स्थानिक सूर्योदय मुंबईच्या मागाहून होत असतील तर तितकीं मिनिटें प्रत्येक लग्नवेळेंत मिळवावीं व पूर्वी होत असतील तर कमी करावीं. म्हणजे लग्नवेळा बरोबर येईल. आतां पुढील पत्रकांतील लग्न पाहण्याची रीति सांगतों. जान्युआरी तारीख पहिली या दिवसाचें पहिलें आडवें कोष्टक पहा. धनलग्नाच्या खालीं ८·९ असे अंक आहेत. याचा अर्थ प्रातःकालीं पहिल्या तारखेस स्टँडर्ड टाईम ८ वाजून ९ मिनिटेंपर्यंत धनु लग्न आहे, नंतर ९–५९ पर्यंत मकर लग्न, पुढें ११–३६ पर्यंत कुंभ लग्न; इत्यादि. याप्रमाणें प्रत्येक तारखेचीं अहोरात्रांतील द्वादशलग्नें जाणावीं. दिवसाचे व रात्रीचे तास वेगळे दाखविले आहेत. महिन्याच्या १२ ते १७ तारखेपर्यंतच्या दरम्यान सूर्याची राशि बदलते, आणि म्हणून सूर्याची राशि बदलल्यामुळें उदयास्तसमयींचें लग्न एकेक राशी पुढें जातें. यासाठीं महिन्याचे दोन भाग करून मध्यंतरीं बदलणारें लग्न आडवी रेषा काढून खालीं लिहिलें आहे. म्हणून त्या दुसऱ्या भागांतील लग्नांचे तास पाहतांना सावधवृत्ति ठेवावी. सूर्योदयीं जें लग्न असतें, त्याच्या सातव्या लग्नीं सूर्यास्त होतो, असा सामान्य नियम आहे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ज्यानुआरी.

तारीख.	दिवसाचे तास.						रात्रीचे तास.					
	धन	मकर	कुंभ	मीन	मेप	वृषभ	मिथुन	कर्क	सिंह	कन्या	तूळ	वृश्चिक
१	८·९	९·५९	११·३६	१·११	२·५५	४·५५	७·६	९·१९	११·२७	१·३४	३·४५	५·५९
२	८·५	९·५५	११·३२	१·७	२·५१	४·५१	७·२	९·१५	११·२३	१·३०	३·४१	५·५५
३	८·१	९·५१	११·२८	१·३	२·४७	४·४७	६·५८	९·११	११·१९	१·२६	३·३७	५·५१
४	७·५७	९·४७	११·२४	१२·५९	२·४३	४·४३	६·५४	९·७	११·१५	१·२२	३·३३	५·४७
५	७·५३	९·४३	११·२०	१२·५५	२·३९	४·३९	६·५०	९·३	११·११	१·१८	३·२९	५·४३
६	७·४९	९·३९	११·१६	१२·५१	२·३५	४·३५	६·४६	८·५९	११·७	१·१४	३·२५	५·३९
७	७·४५	९·३५	११·१२	१२·४७	२·३१	४·३१	६·४२	८·५५	११·३	१·१०	३·२१	५·३५
८	७·४१	९·३१	११·८	१२·४३	२·२७	४·२७	६·३८	८·५१	१०·५९	१·६	३·१७	५·३१
९	७·३७	९·२७	११·४	१२·३९	२·२३	४·२३	६·३४	८·४७	१०·५५	१·२	३·१३	५·२७
१०	७·३३	९·२३	११·०	१२·३५	२·१९	४·१९	६·३०	८·४३	१०·५१	१२·५८	३·९	५·२३
११	७·२९	९·१९	१०·५६	१२·३१	२·१५	४·१५	६·२६	८·३९	१०·४७	१२·५४	३·५	५·१९
१२	७·२५	९·१५	१०·५२	१२·२७	२·११	४·११	६·२२	८·३५	१०·४३	१२·५०	३·१	५·१५
१३	७·२१	९·११	१०·४८	१२·२३	२·७	४·७	६·१८	८·३१	१०·३९	१२·४६	२·५७	५·११
१४	७·१७	९·७	१०·४४	१२·१९	२·३	४·३	६·१४	८·२७	१०·३५	१२·४२	२·५३	५·७
	मकर	कुंभ	मीन	मेष	वृषभ	मिथुन	कर्क	सिंह	कन्या	तूळ	वृश्चिक	धन
१५	९·३	१०·४०	१२·१५	१·५९	३·५९	६·१०	८·२३	१०·३१	१२·३८	२·४९	५·३	७·९
१६	८·५९	१०·३६	१२·११	१·५५	३·५५	६·६	८·१९	१०·२७	१२·३४	२·४५	४·५९	७·५
१७	८·५५	१०·३२	१२·७	१·५१	३·५१	६·२	८·१५	१०·२३	१२·३०	२·४१	४·५५	७·१
१८	८·५१	१०·२८	१२·३	१·४७	३·४७	५·५८	८·११	१०·१९	१२·२६	२·३७	४·५१	६·५७
१९	८·४८	१०·२५	१२·०	१·४४	३·४४	५·५५	८·८	१०·१६	१२·२३	२·३४	४·४८	६·५४
२०	८·४४	१०·२१	११·५६	१·४०	३·४०	५·५१	८·४	१०·१२	१२·१९	२·३०	४·४४	६·५०
२१	८·४०	१०·१७	११·५२	१·३६	३·३६	५·४७	८·०	१०·८	१२·१५	२·२६	४·४०	६·४६
२२	८·३६	१०·१३	११·४८	१·३२	३·३२	५·४३	७·५६	१०·४	१२·११	२·२२	४·३६	६·४२
२३	८·३२	१०·९	११·४४	१·२८	३·२८	५·३९	७·५२	१०·०	१२·७	२·१८	४·३२	६·३८
२४	८·२८	१०·५	११·४०	१·२४	३·२४	५·३५	७·४८	९·५६	१२·३	२·१४	४·२८	६·३४
२५	८·२४	१०·१	११·३६	१·२०	३·२०	५·३१	७·४४	९·५२	११·५९	२·१०	४·२४	६·३०
२६	८·२०	९·५७	११·३२	१·१६	३·१६	५·२७	७·४०	९·४८	११·५५	२·६	४·२०	६·२६
२७	८·१६	९·५३	११·२८	१·१२	३·१२	५·२३	७·३६	९·४४	११·५१	२·२	४·१६	६·२२
२८	८·१२	९·४९	११·२४	१·८	३·८	५·१९	७·३२	९·४०	११·४७	१·५८	४·१२	६·१८
२९	८·८	९·४५	११·२०	१·४	३·४	५·१५	७·२८	९·३६	११·४३	१·५४	४·८	६·१४
३०	८·४	९·४१	११·१६	१·०	३·०	५·११	७·२४	९·३२	११·३९	१·५०	४·४	६·१०
३१	८·०	९·३७	११·१२	१२·५६	२·५६	५·७	७·२०	९·२८	११·३५	१·४६	४·०	६·६

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

फेब्रुआरी.

तारीख.	दिवसाचे तास.						रात्रीचे तास.					
